Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानचा अभिनव इतिहास

लेखक
विष्णु सिताराम चितळे,
बी. ए., बी. टी. (मुंबई), टी. डी. (लंडन),
एम्. आइ. एल्. टी. (इंग्लंड),
असिस्टंट सुपरिंटेंडेंट, न्यू इं. स्कूल, पुणे

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



LIBRARY,
GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ४१ म/20

पंजिका-संख्या २०९८४

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानचा अभिनव इतिहास

(इंग्रजी चौथी ते सातवी इयत्तांकरितां)

CHECKED 1973

लेखक

विष्णु सिताराम चितळे,

बी. ए., बी. टी. (मुंबई), टी. डी. (लंडन),

एम्. आर्. एस्. टी. (इंग्लंड),

' हिंदुस्थानची शासनपद्धति,' ' ब्रिटिशांचा इतिहास '

वगैरे पुस्तकांचा कर्ता

असिस्टंट सुपरिंटेंडेंट, न्यू इं. स्कूल, पुणें.

४१५/२०

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

२०९८४ / ५.२०७१

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, मुंबई २

मूल्य अडीच रुपये

LIBRARY, GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिली आवृत्ति १९४२

[सर्व हक्क स्वाधीन]

Printed by M. N. KULKARNI at the KARNATAK PRINTING PRESS, Chira Bazar, Bombay, and published by him at the KARNATAK PUBLISHING HOUSE, Chira Bazar, Bombay 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

'ब्रिटिशांचा इतिहास' लिहितांना जें ध्येय व जें धोरण मीं आखलें होतें, त्यास अनुसरूनच हिंदुस्थानचा हा अभिनव इतिहास मीं लिहून तयार केला आहे. हिंदुस्थानचा इतिहास लिहिण्याचें काम थोडें जिकीरीचें, कंटाळवाणें व देशकालपरिस्थिति लक्षांत घेतां, थोडें अवघड होऊन बसलेलें आहे. परंतु त्या सर्व गोष्टी सांभाळून व वर्ण्य विषय अत्यंत हळूवारपणें हाताळून तो इतिहास लिहिण्याचा मीं हा प्रयत्न केला आहे. प्रचलित पाठ्यपुस्तकांत आणखी एक निष्कारण भर कशाला? असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. परंतु हें पुस्तक वरवर पाहाणारासही त्याचें अभिनवत्व चटकन् समजेल अशी माझी दृढ आशा आहे; व प्रस्तुत पुस्तकासारख्या पुस्तकाची आधुनिक शाळांतून किती जरुरी आहे हें जाणत्यांसच काय पण नेणत्यांसही सहज समजून येणारें आहे. असें असलें तरी हें पुस्तक सर्वांगपरिपूर्ण आहे असें नाहीं. त्या दिशेनें एक प्रयत्न आहे एवढेंच.

आजच्या शाळांतून इतिहासाचें अध्यापन अत्यंत एकमार्गी अर्थात चुकीचें आहे, असें पुष्कळांस वाटतें. शिक्षकानें वर्गांत विषयाचें विवेचन सांगोपांग, पाल्हाळानें व क्वचित् प्रसंगीं अत्यंत रुक्षपणें करावें, वेळेनुसार पाठ्यपुस्तक नुसतें वाचावें अगर वर्गांत विद्यार्थ्यांकडून तें वाचून घ्यावें व तो तो मजकूर विद्यार्थ्यांकडून पाठ करवून घ्यावा, त्यांस लांबलचक, साद्यंत पण कंटाळवाणीं वर्णनें वह्यांतून उतरून द्यावीं व केवळ त्यांच्या जोरावरच निरनिराळ्या परीक्षा सहज पास होतां येतात असें विद्यार्थ्यांस भासवून त्यांची कुचंबणा करावी, हाच आजचा जमाना होऊन राहिला आहे. यामुळें इतिहास विषयाची गोडी विद्यार्थ्यांस तर लागत नाहींच, उलट तो विषय त्यांच्या मनांतून उतरतो! इतिहासाच्या अध्यापनाच्या वेळीं शिक्षकानें आपला विषय रंगवून सांगूं नये किंवा एखाद्या विषयाची पुस्तकांत नसलेली माहिती त्यानें मुलांस उतरून देऊं नये असें नाहीं. पण त्याचा अतिरेक टाळावा हेंच माझें म्हणणें. ही स्थिति सुधारावी या हेतूनेंच शिक्षणशास्त्रांत मान्यता पावलेल्या अनेक नव्या नव्या साधनांचा उपयोग ठिकठिकाणीं या पुस्तकांत मीं केला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

पुस्तकाची भाषा सहज समजेल अशी सोपी व शक्य तितकी चटकदार वापरण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक धड्याच्या शेवटीं अनेक सूचक व विद्यार्थ्यांच्या बुद्धीस चालना देणारे प्रश्न अभ्यासाकरितां व मुलांच्या हस्तव्यवसायास, नाट्याभिनयास अगर वादविवादास वाव मिळावा म्हणून घातले आहेत. सुमारें शें-दीडशें चित्रें जमवून तीं या पुस्तकांत ठिकठिकाणीं घातलीं आहेत. अनेक माहितीपूर्ण नकाशे, आलेख, नवीन पद्धतीचे वंशवृक्ष, चरित्रांचे आलेख, थोर व्यक्तींच्या चरित्रांतील महत्त्वाचे प्रसंग दाखविणारे चित्रमय तक्ते, मुलांस दोन्ही बाजू समजावून देऊन स्वतःचें मत बनविण्यास मदत करणारे इतिहासव्यवसायात्मक स्तंभ, हिंदुस्थानांत निरनिराळ्या वेळीं राहिलेल्या लोकांच्या चालीरीति व त्यांच्या धार्मिक, सामाजिक व औद्योगिक जीवनावर प्रकाश पाडणारीं वर्णनें वगैरे प्रकारांमुळें या पुस्तकाचें अंतरंग खरोखरच अभिनव करण्याचा मीं कसोशीनें प्रयत्न केला आहे. तो सर्वांस आवडेल असा माझा विश्वास आहे.

या पुस्तकांत जरूर ती राजकीय घडामोडींची उकल व त्यांचीं उपपत्ति यांचीं वर्णनें मी थोडक्यांत पण संगतवार देण्याचा प्रयत्न केला आहे. पाल्हाळपणें अगर भावनेच्या आहारीं जाऊन विषय रंगविण्याचा मोह मी बाजूस सारून जरूर ती माहिती खुलासेवार दिली आहे. मात्र जेथें ही माहिती अपुरी पडण्याचा संभव आहे असें मला वाटलें, तेथें भरपूर व अस्सल उतारेच मी मुद्दाम पुराव्याकरितां विद्यार्थ्यांपुढें ठेवलेले आहेत. मात्र या उताऱ्यांची निवड परिपूर्ण आहे असें नाहीं. मुलांच्या मनांत इतिहासाच्या ठिकाणीं असलेली गोडी उत्पन्न व्हावी व इतिहासाचीं नवीं दालनें त्यांनीं उघडून त्यांत शिरण्यास उत्सुक व्हावें एवढाच हे उतारे देण्यांत माझा मुख्य उद्देश आहे. यामुळें हे उतारे म्हणजे या पुस्तकाचें एक मोठेंच वैशिष्ट्य होऊन बसलें आहे. हे उतारे देण्यामुळें दोन हेतु साध्य होण्यासारखे आहेत. ते ते उतारे वाचून खरें कोणतें व खोटें कोणतें याचा न्यायनिवाडा—प्रत्यक्ष पुरावाच हातीं आल्यानें—विद्यार्थ्यांस स्वतःच करतां येईल. शिवाय केवळ शिक्षकावर अवलंबून राहणारे 'पढवून तयार केलेले पोपट' तयार न होतां, आपल्या चिकित्सकबुद्धीनें ग्राह्याग्राह्य ठरविणारे ध्येयवादी विद्यार्थी निर्माण होतील. याखेरीज विद्यार्थ्यांच्या इतिहासज्ञानाची वाढ व्हावी या हेतूनें विद्यार्थ्यांनीं कोणतीं पुस्तकें वाचणें जरूर आहे हें अनेक धड्यांच्या शेवटीं व पुस्तकाच्या अखेरीसही अनेक बहुमोल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकांचीं नांवें देऊन दर्शविलें आहे. त्यांचा योग्य तो उपयोग शिक्षक व विद्यार्थी करून घेतील अशी मला दृढ आशा आहे.

मात्र आपल्या वर्गांतील विद्यार्थ्यांपुढें वक्तृत्व गाजवून इतिहासाचें मर्म विद्यार्थ्यांच्या गळीं उतरविण्याचे दिवस संपले आहेत. या प्रकारानें एखादे वेळीं विद्यार्थ्यांच्या मनांत त्या विषयाबद्दल एक प्रकारची अढी व तिरस्कारच उत्पन्न होण्याचा संभव फार! तेव्हां शिक्षकानें स्वतःचें ज्ञान तर प्रत्यहीं वाढवावेंच; शिवाय विद्यार्थ्यांची सहज प्रवृत्ति लक्षांत घेऊन त्यांच्या मनांत इतिहासाबद्दल प्रेम उत्पन्न करण्यासाठीं अहर्निश झटावें. या दृष्टीनें शिक्षकाला मार्गदर्शक होतील असे किती तरी प्रकार या पुस्तकांत मीं घातलेले आढळून येतील. त्यांचें त्यानें नीट परिशीलन करावें व आपल्या बुद्धीला थोडी चालना देऊन तशाच तऱ्हेचे, किंबहुना त्यापेक्षांही अधिक मार्मिक व मनोरम, अनेक प्रसंग व प्रकार शोधून काढून ते आपल्या विद्यार्थ्यांकडून तयार करवून घ्यावे. अशा प्रसंगीं शिक्षकानें स्वस्थ न बसतां विद्यार्थ्यांकडून ते ते प्रसंग चित्रित करून घ्यावे, त्या त्या प्रसंगांचे लांकडी, मातीचे अगर कागदी नमुने तयार करवावे, विद्यार्थ्यांकडूनच नाट्यप्रसंग लिहवून घेऊन ते त्यांच्याकडून वठवून घ्यावे, अनेक ऐतिहासिक प्रसंगांवर वादविवाद करवावे, नकाशे, वंशवृक्ष, कालादर्श, आलेख, चित्रमय चरित्रें वगैरे प्रकार त्यांच्याकडून काढून घ्यावे, त्यांस प्राचीन व अर्वाचीन नाणीं प्रत्यक्ष वा चित्रांच्या सहाय्यानें दाखवावीं व त्यांसारखीं दुसरीं जमविण्यास उत्तेजन द्यावें, ऐतिहासिक स्थळांस प्रत्यक्ष भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या मनांत त्यांच्याबद्दल आवड उत्पन्न करावी, जेथें जातां येत नसेल त्या स्थळांचीं चित्रें स्वतः गोळा करून तीं एपिडायास्कोप अगर मॅजिक लँटर्नच्या मदतीनें विद्यार्थ्यांस दाखवावीं. या व अन्य उपायांनीं शिक्षकानें आपल्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं इतिहासाबद्दल आवड उत्पन्न करून, त्यांचें त्या विषयासंबंधाचें ज्ञान सदैव वाढीस लागेल असें करावें.

पुस्तकांत घातलेलीं अनेक अस्सल चित्रें दिल्लीच्या 'पुराणवस्तुसंशोधन' खात्याच्या डायरेक्टरांच्या मेहेरबानीनें मला मिळालीं. तसेंच मुंबईच्या 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम'च्या क्यूरेटरनींही, त्यांनीं प्रसिद्ध केलेलीं, अनेक चित्रें या पुस्तकांत घालण्यास मोठ्या उदार अंतःकरणानें मला परवानगी दिली. माझ्या माजी विद्यार्थ्यांनींही स्वतः काढलेले फोटो, या पुस्तकांत घालण्यास मोठ्या आपुलकीनें मला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

संमति दिली. कर्नाटक प्रेसच्या मालकांनींही त्यांच्या इतर ग्रंथांत प्रसिद्ध झालेलीं कांहीं चित्रें या पुस्तकांत मला घालूं दिलीं. या उपकृतीबद्दल मी वरील सर्वांचा खरोखर अत्यंत ऋणी आहें. याशिवाय ज्यांनीं मला चित्रें दिलीं व ज्यांचा नामनिर्देश मीं पुढील अनुक्रमणिकेंत केला आहे त्या सर्वांचाही मी आभारी आहें. पुस्तकांतील नकाशे, आलेख व कांहीं चित्रें अत्यंत सुबक काढून दिल्याबद्दल श्री. मो. व. पुरंदरे व श्री. कृ. के. केळकर यांचे मी आभार मानतों. माझें हस्तलिखित वाचून माझे स्नेही श्री. शि. आ. आंबर्डेकर यांनीं मला ज्या उपयुक्त पण मार्मिक सूचना केल्या व मुद्रितें तपासण्यांत मला अमूल्य मदत केली, त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें. पुस्तकाच्या प्रकाशनाची मोठी जबाबदारी कर्नाटक पब्लिशिंग हाउसचे मालक श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनीं या महर्गतेच्या दिवसांतही, स्वतःवर घेऊन मला उपकृत केलें आहे यांत शंका नाहीं. युद्धजन्य परिस्थितीमुळें पुस्तकाची किंमत मात्र थोडी जास्त ठेवावी लागत आहे.

या पुस्तकांत अनेक प्रकारच्या उणीवा, चुका व दोष राहणें शक्य आहे. त्या सर्वांची जबाबदारी माझ्या एकट्यावरच आहे. तेव्हां सर्वांस विनंति एवढीच कीं त्यांनीं ते कोणत्याही प्रकारचा अनमान न करतां, माझ्या निदर्शनास आणावे. त्याबद्दल मी त्यांचा आभारी होईन.

पुणें शहर,
१५ फेब्रुवारी, १९४२.

वि. सि. चितळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

प्राचीन हिंदुस्थान

पृष्ठांक

१. हिंदुस्थानची प्राचीन संस्कृति. १-१०
२. आर्यांचें हिंदुस्थानांत आगमन व प्रसार. ११-१८
३. आर्य वाङ्मयाची अभिवृद्धि. १९-२४
४. मगधचा नंदवंश–शिकंदराची स्वारी. २५-२९
५. जैन व बौद्धधर्मांचा उदय. ३०-३९
६. सम्राट चंद्रगुप्त मौर्य. ४०-४५
७. सम्राट अशोक. ४६-५५
८. शुंग व कण्व राजवंश. ५६-५९
९. शक व कुशान राजे. ६०-६७
१०. गुप्तवंश–सुवर्णकाल. ६८-७७
११. कनोजचा हर्षवर्धन. ७८-८६
१२. हर्षानंतरचा हिंदुस्थान ८७-९२

मध्ययुगीन भारत

१३. रजपुतांचा उदय–कांहीं रजपूत राज्यें. ९३-९९
१४. दक्षिणेंतील चालुक्य, राष्ट्रकूट व इतर घराणीं. ... १००-११०
१५. अरबांचा हिंदुस्थानांत प्रवेश–मोहंमद पैगंबर. १११-११६
१६. गझनीचा राजवंश. ११७-१२३
१७. शेहाबुद्दीन घोरी. १२४-१२९
१८. दिल्लीची सुलतानशाही–गुलामवंश. १३०-१३५
१९. खलजी घराणें. १३६-१४३
२०. तुगलक, सय्येद व लोदी घराणीं. १४४-१५३
२१. दक्षिणेंतील बहामनी राज्य. १५४-१६०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२२. विजयनगरचें हिंदु साम्राज्य. १६१-१६६
२३. दिल्लीच्या सुलतानांच्या वेळचा हिंदुस्थान. १६७-१७३

अर्वाचीन काळ—मोंगल अंमल

२४. जहीरुद्दीन मोहंमद बाबर. १७४-१८१
२५. हुमायून व शेरशाह. १८२-१८९
२६. जलालुद्दीन मोहंमद अकबर. १९०-२०१
२७. अकबराची राज्यव्यवस्था. २०२-२१०
२८. विलासी जहांगीर. २११-२१७
२९. वैभवशाली शाहजहान. २१८-२२८
३०. औरंगजेब. २२९-२४३
३१. बहादुरशाह ते मोहंमदशाह. २४४-२५४
३२. मोंगलशाहीची अखेर. २५५-२६४
३३. मोंगलांच्या वेळचा हिंदुस्थान. २६५-२७६

अर्वाचीन काळ—मराठी अंमल

३४. शिवाजीच्या पूर्वीचा महाराष्ट्र. २७७-२८६
३५. स्वराज्याची संस्थापना. २८७-२९६
३६. मोंगलांशीं सामना व राज्याभिषेक. २९७-३०८
३७. शिवाजीची राज्यव्यवस्था. ३०९-३१८
३८. मराठ्यांचें स्वातंत्र्य-युद्ध. ३१९-३३१
३९. छत्रपति शाहू—पेशवा बाळाजी विश्वनाथ. ३३२-३३७
४०. छत्रपति शाहू—पेशवा बाजीराव. ३३८-३५०
४१. छत्रपति शाहू व रामराजा—पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब ३५१-३६६
४२. छत्रपति रामराजा व पेशवा पहिला माधवराव. ३६७-३७६
४३. माधवरावाच्या वेळचीं कांहीं ठळक मंडळी. ३७७-३८०
४४. छत्रपति रामराजा व पेशवा नारायणराव. ३८१-३८८
४५. पेशवा सवाई माधवराव. ३८९-३९९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४६. मराठेशाहीची अखेर. ४००-४१३
४७. मराठ्यांचा राज्यकारभार. ४१४-४२३
४८. मराठेशाहींतील लोकांची राहणी. ४२४-४३६

आर्वाचीन काळ-ब्रिटिश अंमल

४९. युरोपियनांचा हिंदुस्थानांत प्रवेश. ४३७-४४९
५०. इंग्रज व फ्रेंच यांचा झगडा. ४५०-४५७
५१. इंग्रजांस बंगालची प्राप्ति. ४५८-४७०
५२. दुहेरी राज्यव्यवस्थेचा बोजवारा. ४७१-४७९
५३. वॉरन हेस्टिंग्ज. ४८०-४९०
५४. लॉर्ड कॉर्नवालिस व सर जॉन शोअर. ४९१-४९६
५५. लॉर्ड वेल्स्ली. ४९७-५०८
५६. बार्लो-मिंटो-हेस्टिंग्ज-ॲम्हर्स्ट. ५०९-५१७
५७. लॉर्ड विल्यम बेंटिंक. ५१८-५३०
५८. ऑक्लंड-एलेनबरो-हार्डिंज ५३१-५४१
५९. लॉर्ड डलहौसी. ५४२-५५४
६०. सन १८५७. ... ... ५५५-५६३

अर्वाचीन काळ-बादशाही अंमलाखालील हिंदुस्थान

६१. लॉर्ड लॉरेन्स ते लॉर्ड रिपन. ५६४-५७१
६२. लॉर्ड डफरिन ते लॉर्ड मिंटो. ५७२-५७९
६३. लॉर्ड हार्डिंज ते आजतागाईत. ५८०-५९१
६४. हिंदी संस्थानें. ५९२-५९५
६५. इंग्रजी अंमलांतील स्थित्यंतरें. ५९६-६१८

नकाशे – आलेख – अनुक्रमणिका

१. प्राचीन भारतवर्ष.... ... ... १५
२. शिकंदराच्या स्वारीचा मार्ग. २८
३. अशोकाचें साम्राज्य. ५२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नकाशांची अनुक्रमणिका

४. कनिष्काचें साम्राज्य. ६२
५. गुप्तांचें साम्राज्य. ७३
६. हिंदु व बौद्ध या धर्मांचा विकास व ऱ्हास (आलेख) ८०
७. हर्षाचें साम्राज्य ८२
८. हिंदुस्थान. इ. स. १०२२. ... ... ११९
९. बाबराच्या स्वारीच्या वेळचा हिंदुस्थान. १७५
१०. अकबरचरित्र (आलेख) १९३
११. अकबराचें साम्राज्य. १९५
१२. मोंगलसत्तेचा उत्कर्ष व अपकर्ष. २६१
१३. मोंगल बादशाह (वंशवृक्ष). २७६
१४. भोसले घराणें (वंशवृक्ष). २८२
१५. श्रीशिवचरित्र (आलेख.) २९८
१६. शिवाजीचें स्वराज्य. २९९
१७. मराठ्यांचा राज्यविस्तार (१७६०). ३५७
१८. भाऊसाहेबांचा पानिपताकडील मार्ग. ३५९
१९. पानिपतचा सामरिक नकाशा. ३६१
२०. मराठे व इंग्रज–सत्तेंतील चढ-उतार (आलेख) ४१५
२१. कर्नाटकांतील युद्धें... ... ... ४५५
२२. प्लासीचा सामरिक नकाशा. ४६०
२३. इंग्रजांचें राज्य (१७६५). ४७२
२४. इंग्रजांचें राज्य (१८०५). ५००
२५. इंग्रजांचें राज्य (१८२३). ५१२
२६. इंग्रजांचें राज्य (१८५७). ५४५
२७. ब्रिटिशांच्या सत्तेची वाढ. ५४७
२८. मोंगल, मराठे व इंग्रज-सत्तेंतील चढउतार (आलेख) ... ५४९
२९. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार. ५८१
३०. आजचा हिंदुस्थान. ५९३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

१. प्राचीन काळचीं मातीचीं भांडीं (Prince of Wales Museum, Bombay) ... ५

२. प्राचीन काळचीं लोखंडी शस्त्रास्त्रें (Prince of Wales Museum, Bombay) ... ६

३. मोहोंजोदारो उत्खननांत सांपडलेल्या स्त्रियांच्या चित्रांचे नमुने (Archaeological Survey of India) ... ८

४. मोहोंजोदारो उत्खननांत सांपडलेल्या मुलांचीं खेळणीं (Archaeological Survey of India) ... ९

५. प्राचीन हत्यारें २६

६. शिकंदर (British Museum, London) २७

७. वर्धमान महावीर ३१

८. गौतमबुद्ध (Photo—Vinayakumar) ३२

९. गौतम बुद्धाच्या चरित्रांतील दोन देखावे (Archaeological Survey of India) ... ३३

१०. गौतमबुद्धाचें पलायन (Archaeological Survey of India) ३४

११. सेल्यूकस निकेटर ४१

१२. सम्राट अशोक ४६

१३. धौली येथील अशोकाचा शिलालेख (Archaeological Survey of India) ... ४७

१४. सारनाथ येथील अशोकस्तंभावरील सिंह (Photo—Vinayakumar) ... ४८

१५. सांचीचा स्तूप ४९

१६. अशोकाचा शिलालेख (Archaeological Survey of India) ५०

१७. कनिष्काचा करंडक (Archaeological Survey of India) ६४

१८. कार्ल्याच्या लेण्यांतील चैत्य (Archaeological Survey of India) ६५

१९. चंद्रगुप्ताचें नाणें ६८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

२०. समुद्रगुप्ताचें नाणें ६९
२१. दुसऱ्या चंद्रगुप्ताचें नाणें ७०
२२. किन्नरांचें आकाशभ्रमण–अजिंठा (Prince of Wales Museum, Bombay) ... ७१
२३. पहारपूरचीं लेणीं (Archaeological Survey of India) ... ७५
२४. सारनाथचा स्तूप (Photo—Vinayakumar) ७६
२५. प्राचीन प्रवासाचीं साधनें ८८
२६. भुवनेश्वरीच्या देवळावरील सुंदर खोदकाम. (Archaeological Survey of India) ... ९०
२७. श्रीशंकराचार्य ९२
२८. बदामीच्या लेण्यांतील एक देखावा (Archaeological Survey of India) ... १००
२९. घारापुरीच्या लेण्यांतील त्रिमूर्ति १०१
३०. पुलकेशीचा दरबार १०२
३१. कैलास मंदिर १०४
३२. देवगिरीवरील सिंहासन (Archaeological Survey of India) १०६
३३. सोमनाथच्या देवळाचा अंतर्भाग (Archaeological Survey of India) ... १२०
३४. पृथ्वीराज चव्हाण १२५
३५. कुतुबमिनार (Archaeological Survey of India) ... १३१
३६. तैमूरलंगाचा दरबार (Prince of Wales Museum, Bombay १४८
३७. गोलघुमट–विजापूर (Archaeological Survey of India) १५५
३८. विजापूरचा किल्ला (आजची स्थिति) (Photo—Vinayakumar) १५६
३९. मुलुख–ई–मैदान तोफ (Photo—Vinayakumar) ... १५८
४०. गणेश मंदिर–विजयनगर (Photo—Vinayakumar) ... १६२
४१. कमल महाल–विजयनगर (Photo—Vinayakumar) ... १६३
४२. अश्मरथ–विजयनगर (Photo—Vinayakumar) १६५
४३. महात्मा कबीर. १७२
४४. बाबर वकिलास भेट देतो (British Museum, London) ... १७८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४५. मोंगलांचीं नाणीं १९१
४६. चांदबिबी (Prince of Wales Museum, Bombay) ... १९६
४७. किल्ले अशीरगड. (Archaeological Survey of India) ... १९६
४८. अकबराची छत्री–शिकंदरा (Photo—Vinayakumar) ... १९७
४९. चित्रमय अकबर. १९८
५०. अकबराची वाघाची शिकार. (Archaeological Survey of India)... ... २०३
५१. अबुल फज्ल (Archaeological Survey of India) ... २०५
५२. तानसेन (Archaeological Survey of India)... ... २०६
५३. मुल्ला दोप्याजा (Archaeological Survey of India) ... २०७
५४. नूरजहान व शेर अफगाण अकबरास नजर देत आहेत. (Archaeological Survey of India) २१२
५५. नूरजहान व जहांगीर यांचा शपथविधि (Archaeological Survey of India) ... २१३
५६. नूरजहान (Archaeological Survey of India) ... २१४
५७. शाहजहान (Prince of Wales Museum, Bombay) ... २१८
५८. खानजहान लोदी (Archaeological Survey of India) ... २१९
५९. दारा शेको (Archaeological Survey of India) ... २२१
६०. शाहजहान व धर्मगुरु (British Museum, London) ... २२२
६१. ताजमहाल (Photo—Vinayakumar) २२३
६२. दिवाण–इ–आम (Photo—Vinayakumar) २२४
६३. दिवाण–इ–खास (Photo—Vinayakumar) २२५
६४. मस्त हत्तीशीं औरंगजेबाची झुंज (Archaeological Survey of India) २३१
६५. गुरु तेजबहादूर (Archaeological Survey of India) ... २३२
६६. औरंगजेबाचा गोवळकोंड्याचा वेढा (Archaeological Survey of India)... ... २३५
६७. जहांदरशहाचा दरबार (Archaeological Survey of India) २४५
६८. फर्रुखसियर (Archaeological Survey of India) ... २४६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६९. सय्येद अब्दुल्ला (Archaeological Survey of India) ... २४७
७०. मोहंमदशाह. २४८
७१. नादीरशाह (Archaeological Survey of India) ... २५१
७२. अहंमदशाह दुराणी ऊर्फ अब्दाली (Archaeological Survey of India) २५६
७३. मयूरसिंहासन. (Archaeological Survey of India) ... २६६
७४. मोंगलाईतील भालाइत (Archaeological Survey of India) ... २६७
७५. मोंगलाईतील शिकार (Archaeological Survey of India) २७०
७६. मोंगलकालीन गजरथ (Archaeological Survey of India) २७१
७७. उंटांची झुंज. (Prince of Wales Museum, Bombay)... २७२
७८. वृत्त नेणारा ससाणा (British Museum, London) ... २७३
७९. हत्तींची झुंज. २७४
८०. ज्ञानेश्वर. २८०
८१. तुकाराम. २८०
८२. रामदास. २८१
८३. शिवाजीचें शिवनेरीचें जन्मस्थान (Archaeological Survey of India) ... २८७
८४. कल्याण खजिना (Courtesy, Principal, S. S. P. Military School, Poona) ... २८९
८५. अफजलखान (Prince of Wales Museum, Bombay)... २९१
८६. किल्ले प्रतापगड (Archaeological Survey of India) ... २९२
८७. शिवाजी–रुस्तुमजमान युद्ध (Prince of Wales Museum, Bombay) ... २९३
८८. शिवाजीचा राज्याभिषेक दरबार (Courtesy, Principal, S. S. P. Military School, Poona) ... ३०२
८९. शिवाजीची रायगडावरील छत्री (Archaeological Survey of India) ... ३०३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९०. शिवाजी महाराज व त्यांचें हस्ताक्षर (Prince of Wales Museum, Bombay) ... ३०९

९१. किल्ले विजयदुर्ग (Archaeological Survey of India) ... ३११

९२. सचित्र शिवचरित्र... ... ... ३१५

९३. पेशवा बाजीराव ३३९

९४. राजा छत्रसाल ३४१

९५. जंजिऱ्याचा किल्ला ३४२

९६. वसईच्या किल्ल्याचा दर्शनी भाग (Archaeological Survey of India) ... ३४४

९७. मूळ उपटलें कीं खांद्या आपोआपच खालीं येतील ३४७

९८. बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब ३५२

९९. सवाई माधवराव व नाना फडणीस (Archaeological Survey of India) ... ३८४

१००. पेशव्यांचा दरबार (Archaeological Survey of India) ... ३९१

१०१. सवाई माधवराव–भालाफेक–शिक्षण (Archaeological Survey of India) ... ३९३

१०२. हिंदुस्थानांत बांधलेलें जुनें लढाऊ जहाज... ... ... ४१८

१०३. मराठेशाहींतील खेळ्याचा एक नमुना ४२७

१०४. १७ व्या व १८ व्या शतकांतील प्रवासाचीं साधनें ४२९

१०५. मराठ्यांच्या वेळची चित्रकला (होळी मिरवणूक) Archaeological Survey of India) ... ४३३

१०६. पेशव्यांच्या गणपतीची मिरवणूक (Archaeological Survey of India) ... ४३४

१०७. प्राचीन जलमार्ग. ४३८

१०८. वास्को-ड-गामा ४३९

१०९. वास्को-ड-गामाचें जहाज ४४०

११०. इंग्रजांची सुरतेची वखार ४४२

१११. सलाबतजंगाचा दरबार. (Archaeological Survey of India) ४५२

११२. लॉर्ड क्लाइव्ह ४५३

११३. प्लासीच्या विजयाचा स्मारकस्तंभ (Archaeological Survey of India) ... ४६१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११४. बक्सारच्या विजयाचा स्मारकस्तंभ (Archaeological Survey of India) ... ४६५
११५. शाहाआलम (Archaeological Survey of India) ... ४७३
११६. एडमंड बर्क ४८६
११७. धाकटा पिट ४८६
११८. नेपोलियन बोनापार्ट ४९८
११९. टिपू सुलतान (Archaeological Survey of India) ... ५०२
१२०. आर्थर वेल्स्ली ५०३
१२१. लॉर्ड लेक (Archaeological Survey of India) ... ५०४
१२२. जनरल ऑक्टरलोनी (Archaeological Survey of India) ५११
१२३. राजा राममोहन रॉय (Archaeological Survey of India) ५२४
१२४. लॉर्ड ऑक्लंड (Archaeological Survey of India) ... ५३२
१२५. दोस्त मोहंमदखान (Archaeological Survey of India)... ५३३
१२६. बालाहिसार–काबूल (Archaeological Survey of India)... ५३४
१२७. लॉर्ड एलेनबरो (Archaeological Survey of India) ... ५३५
१२८. सर जेम्स औट्रॅम ५३६
१२९. सर हेन्री लॉरेन्स ५३९
१३०. लॉर्ड डलहौसी ५४२
१३१. लॉर्ड ह्यू गो ५४३
१३२. लॉर्ड कॅनिंग ५५६
१३३. शेवटचा मोंगल बादशाह—बहादूरशाह ५५७
१३४. सर हेन्री हॅवलॉक... ... ... ५५९
१३५. राणी व्हिक्टोरिया ५६३
१३६. लॉर्ड कर्झन. ५७५
१३७. लॉर्ड किचनेर ५७८
१३८. बादशाह सहावे जॉर्ज व राणी एलिझाबेथ. ५८८
१३९. लॉर्ड लिनलिथगो.... ... ... ५८९
१४०. विन्स्टन चर्चिल. ५९०
१४१. लोकमान्य टिळक. ५९८
१४२. महात्मा गांधी. ६००
१४३. आधुनिक प्रवासाचीं साधनें ६१२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन हिंदुस्थान

१. हिंदुस्थानची प्राचीन संस्कृति

१. हिंदुस्थान : नंदनवन :—आपला हिंदुस्थानदेश फार प्राचीन आहे. एके काळीं सर्व जगांत सुधारलेला देश म्हणून तो अति प्रसिद्ध होता. आपल्या देशांत धनधन्याची चांगली समृद्धि होती. सुधारणा उच्च कळसाला पोचली होती. सुखाची लयलूट होती. लोक सबल व सधन होते. ते मोठे धर्मप्रवण असून कलाकुसरींतही त्यांची उत्तम प्रगति झालेली होती. हवा, पाणी, सुपीक जमीन, खनीज संपत्ति, विद्या, कला, व्यापार वगैरे बाबतींत आपला देश सर्वांत पुढें होता. त्यामुळेंच आपल्या देशावर ईश्वराचा वरदहस्त आहे, असें समजून आपल्या देशाला ‘ नंदनवन ’ असेंही समजण्यांत येई. अर्थात जगांतील सर्व लोकांचे डोळे आपल्या देशाकडे लागले असल्यास नवल नाहीं !

२. भौगोलिक स्थिति :—आपला हिंदुस्थान १९०० मैल लांब व १८०० मैल रुंद आहे. त्याचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें १८ लाख चौरस मैल आहे. त्याची लोकसंख्या चाळीस कोटींवर आहे. क्षेत्रफळाचे दृष्टीनें पाहतां, रशिया वगळल्यास, सर्व युरोपखंडाएवढा आपल्या देशाचा विस्तार आहे; व इंग्लंडच्या क्षेत्रफळापेक्षां तो तिप्पट मोठा आहे. यामुळें त्याला एखाद्या खंडाचीच उपमा शोभेल. हिंदुस्थानचा समुद्रकिनारा सुमारें ३६०० मैल लांब आहे. त्याच्या उत्तरेस हिमालयासारखा जगांतील अत्युच्च पर्वत पसरलेला आहे. पूर्वेस बंगालचा उपसागर, दक्षिणेस हिंदी महासागर व पश्चिमेस अरबी समुद्र आहे. या चतुःसीमा पाहतां निसर्गानेंच आपल्या देशाचें संरक्षण करण्याचें ठरविल्यासारखें दिसतें. वायव्येकडे पसरलेल्या हिंदुकुश पर्वतांतून मात्र बोलन, खैबर, खुर्रम, गोमल वगैरे खिंडींतून लहान-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठ्या वाटा आहेत. त्यांचा फायदा परकीयांनीं चांगलाच घेतला ! आपल्या देशावर परचक्रें आलीं, तीं याच दिशेनें होत.

३. विविधतेंतही एकसूत्रीपणा :—आजपर्यंत आपल्या हिंदुस्थानावर परकीयांचे अनेक हल्ले आले. त्यामुळें अनेक प्रकारचे व नाना जातीचे लोक येथें येऊन स्थाईक झाले. आज नाना लोक नाना भाषा बोलतात. त्यांचे धर्मपंथही अनेक प्रकारचे आहेत. त्यांचे रीतिरिवाज, पोषाखांची पद्धति, आचार-विचार, अन्न व राहणी सर्वस्वी भिन्न व विविध स्वरूपाची आहे. जगांतील निरनिराळ्या मानवकुलांतील वंशज आज आपल्या देशांत आहेत. आर्य, अनार्य, मोंगल, द्रविड, तुर्क वगैरे मानव जाती हिंदुस्थानांत एकोप्यानें आज रहात आहेत. जणूं सर्वांचें हिंदुस्थानांत प्रदर्शनच मांडलें आहे ! आज हिंदुस्थानांत निरनिराळ्या ४३ जाती व २३७८ पोटजाती आहेत. सर्व लोक निरनिराळ्या १५० भाषा बोलतात. असें असलें तरी आज येथें ७/८ मानववंश प्रमुख असून, मुख्य अशा सहाच भाषा मानल्या जातात. जगांतील बहुतेक सर्व प्रमुख धर्म आपल्या देशांतच उत्पन्न झाले असें म्हणतात. मात्र आज येथें तीनच मुख्य धर्मपंथ आहेत. इतकी भिन्नता व इतका विविधपणा असूनही सर्व ठिकाणीं एकसूत्रीपणा व एकोपा दिसून येतो, हेंच हिंदुस्थानचें आजचें वैशिष्ट्य आहे.

४. भौगोलिक स्थितीचा परिणाम :—हिंदुस्थानची स्वाभाविक रचना लोकांना उपकारक झालेली नाहीं. आपला देश अलग राहिला व त्यामुळेंही आपलें अतोनात नुकसान झालेलें आहे. संपन्नता व जमिनीचा सुपीकपणा यांमुळें लोक आरामशीर व सुखलोलुप झाले. त्याचा फायदा परकीयांनीं घेतला. दुर्गम पर्वतराजी, दुस्तर वाळवंटें व देशाचा अफाटपणा यांमुळें येथील लोकांस अलग राहावें लागलें व त्यामुळें त्यांच्यांत सुधारणा होणें मुष्कीलीचें झालें. येथील हवा, पाणी, अन्न व अनेक प्रकारची विपुलता यांमुळें लोकांत घरकोंबडेपणा आला व त्यामुळें लोकांच्या आचाराविचारांत व राहणींत पुराणप्रियता बाणली; त्यांच्यांतील उत्साह व धाडसीपणा नष्ट झाला. समुद्रकिनारा दंतुर नसल्यामुळें व नद्याही दुर्गम व दुस्तर असल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुळें हिंदी लोकांमध्यें नौकानयन मागासलें. शेती हाच मुख्य धंदा असल्यामुळें मोठमोठीं शहरेंही निर्माण झालीं नाहींत. एकंदरींत पाहतां निसर्गानें आपल्या देशावर जितके उपकार केलेले दिसतात, तितका अपकारही केलेला दिसतो.

५. **इतिहासाचीं साधनें** :—अशा या देशाचा इतिहास लिहावयाचा तर महाकर्म कठीण आहे. कारण पूर्वींच्या लोकांमध्यें आपला इतिहास लिहून ठेवण्याची प्रथाच नव्हती. त्यामुळें आपल्याला अन्य, पण उपलब्ध, साधनांवरच अवलंबून रहावें लागतें. आपल्या सुदैवानें अशीं अनेक साधनें आज उपलब्ध झालेलीं आहेत. धातुलेख, शिलालेख, स्तंभलेख, गुहालेख, ताम्रपट, नाणीं, आर्यांचें वाङ्मय व वंशग्रंथ, प्राचीन नगरांचा शोध, परकीय प्रवाशांचीं वृत्तें वगैरे अनेक साधनें आज उपलब्ध आहेत व त्यांच्यावरूनच आपल्या देशाचा इतिहास आज जुळवितां येतो. हल्लींच्या 'पुराणवस्तुसंशोधन खात्याची' कामगिरीही महत्त्वाची आहे. त्या खात्यानें प्राचीन ठिकाणांचें उत्खनन करून अनेक शोध लावले. त्यामुळें हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासावर चांगलाच प्रकाश पडतो. त्या सर्वांचा उपयोग करून आपल्या देशाचा इतिहास लिहिला गेला. प्रथमतः आपण प्राचीन कालाकडे वळूं.

६. **हिमयुग** :—आजचा हिंदुस्थान आपल्याला द्वीपकल्पासारखा दिसतो; परंतु फार पूर्वीं तो तसा नव्हता. हजारों वर्षांपूर्वीं आजचा उत्तर हिंदुस्थानचा भाग समुद्राच्या गर्भांत होता. त्यावेळीं हिमालय पर्वतही नव्हता असें म्हणतात! या सर्व भूभागावर 'टेथिस' नामक एक मोठा समुद्र होता. त्याच्या दक्षिणेस विंध्यपर्वत असून त्याच्या अलीकडे 'गोंडवन' नामक भूप्रदेश होता. त्याचा विस्तार पूर्वेस मलायापर्यंत, पश्चिमेस आफ्रिकेपर्यंत व दक्षिणेस ऑस्ट्रेलियापर्यंत होता असें म्हणतात! पुढें दक्षिण ध्रुवापासून या प्रदेशाकडे हिमनद्या वाहूं लागल्या व त्यांनीं हा भूभाग व्यापून टाकला. त्यामुळें कालांतरानें हिंदीमहासागर निर्माण होऊन आफ्रिका, मलाया, ऑस्ट्रेलिया व गोंडवन हे भूप्रदेश भिन्न व एकमेकांपासून अलग झाले. उत्तर ध्रुवाकडूनही हिमनद्या वाहत येत होत्या. त्या टेथिस समुद्रापर्यंत येत व परत जात. तशांतच एक मोठा भूकंप होऊन टेथिस समुद्राच्या तळाचा भूभाग वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येऊन हिमालयाची उत्पत्ति झाली असें मानतात! भूकंपामुळें भूमीला ज्या चुण्या पडल्या त्या आजच्या हिमालयाच्या रांगा होत. यापुढें कालांतरानें तेथील समुद्र आटत गेला व तेथें सुंदर भूप्रदेश निर्माण झाला. त्यांतूनच गंगा, यमुना, सिंधु, ब्रह्मपुत्रा वगैरे नद्या वाहूं लागल्यानें तो प्रदेश अत्यंत सुपीक झाला. जेथें अशा नद्या नव्हत्या तेथें वाळवंटें निर्माण झालीं. या सर्व घडामोडी ज्या युगांत झाल्या त्याला 'हिमयुग' असें म्हणतात. त्यावेळीं मनुष्य नव्हता, रानटी पशू विपुल होते, असें म्हणतात. मनुष्य असलाच तर तो माकडाच्या स्वरूपांत होता असें मानिलें जातें.

७. प्राचीन अश्मयुग (इ. स. पूर्वी ५००००):—हिमयुगानंतर प्राचीन अश्मयुगाचा काळ महत्त्वाचा समजला जातो. हा काळ इ. स. पूर्वी ५०००० वर्षे असावा असें समजतात. या काळांत हिंदुस्थानांत लोक होते. हे लोक अगदीं रानटी अवस्थेंत रहात. गिरिगव्हरांत, झाडांच्या ढोलींत अगर आश्रयाचें अन्य स्थान शोधून तेथें ते रहात. कंदमुळें, फळें अगर वन्य पशूंचें मांस हा त्यांचा आहार होता. अग्नि त्यांस माहीत नव्हता. भांडीं-कुंडीं ते वापरीत नसत. धातू त्यांस माहीत नव्हत्या. झाडांच्या साली ते वस्त्रांऐवजीं वापरीत. नित्योपयोगी वस्तू व हत्यारें ते दगडाचींच करीत व वापरीत. क्वचित हाडांचीं शस्त्रेंही ते वापरीत असत. अशा प्रकारचीं शस्त्रें आजही हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावरील भागांत सांपडत आहेत. यामुळें या काळांतील लोक दक्षिणेंत—विशेषतः मद्रासमध्यें—पुष्कळ रहात असावेत असा समज आहे. या काळांतील लोक दगडाचा उपयोग सर्रास करीत असत. म्हणून त्यांच्या काळाला 'अश्मयुग' असें म्हणतात.

८. नूतन अश्मयुग (इ. स. पू. १००००):—वरील युगानंतर हजारों वर्षांनींही हिंदुस्थानांत राहणाऱ्या रानटी लोकांत फारशी सुधारणा झाली नाहीं. या काळांतील लोकही दगडाचीं हत्यारें वापरीत होते; फरक इतकाच कीं तीं जरा जास्त सुधारलेलीं होतीं. या काळांतील लोकांना मातीचीं भांडीं बनवितां येत. कुंभारी चाकही त्यावेळीं चालू होतें. ते लोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेतीही करूं लागले होते. गाई, बैल, घोडे वगैरे जनावरें ते पाळीत. याव-



प्राचीन काळचीं मातीचीं भांडीं.

रून ते लोक बरेच स्थाईक झाले होते असें म्हणतां येईल. ते घरेंही बांधूं लागले होते. त्यांचीं घरें एकमेकांस अगदीं खेटून बांधलेलीं असत. अग्नीचा उपयोग त्यांस माहीत होता. आपलें अन्न ते शिजवून खात. विणण्याची कलाही त्यांस अवगत झाली होती. अर्थात ते कापड विणून त्याचीं वस्त्रें तयार करीत व वापरीत. ते आपलीं प्रेतें पुरीत व त्यांवर थडगीं रचीत. या काळांतील लोकांस सोन्याशिवाय इतर धातू माहीत नव्हत्या; व त्यामुळें त्यांचा सर्व व्यवहार दगड व माती यांच्याशींच होई. म्हणून या युगाला 'नूतन अश्मयुग' असें म्हणतात. या युगाला इ. स. पू. सुमारें १०००० वर्षांपासून सुरुवात झाली असें मानतात.

९. लोहयुग–ताम्रयुग:—वरील परिस्थितींत हजारों वर्षांनंतर फरक पडून दक्षिणेंतील लोकांना लोखंडाचा उपयोग कळूं लागला. त्यामुळें तेथील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक लोखंडाचीं भांडीं व शस्त्रास्त्रें करूं लागले. या गोष्टीमुळें दक्षिणेंत



प्राचीन काळचीं लोखंडी हत्यारें.

'लोहयुगाला' सुरुवात झाली. परंतु त्याच्या अगोदर उत्तर हिंदुस्थानांत रहाणाऱ्या लोकांना तांब्याचा उपयोग माहीत झाला होता. त्यामुळें तेथील लोक, आपलीं शस्त्रें व भांडीं तांब्याचीं करीत असत. त्यांस लोखंडाचा उपयोग माहीत नव्हता. त्यामुळें तेथें 'ताम्रयुग' निर्माण झालें. ब्राँझ ही धातु हिंदी लोकांस माहीत नव्हती असें विद्वानांचें मत आहे. या दोन्ही युगांतील लोक पुष्कळच सुधारलेले होते. ते शेती करीत, अन्न शिजवून खात, घरांतून रहात, वस्त्रें विणून वापरीत, धातूंचीं भांडीं व शस्त्रें बनवीत व टोळयांनीं स्थाइक होऊन एकत्र रहात. ते आपापले विचार भाषेनें एकमेकांस कळवीत. त्या भाषेचे कांहीं वाक्प्रचार अजूनही तामीळ भाषेंत सांपडतात.

१०. हिंदुस्थानचे मूळ रहिवासी :—आज हिंदुस्थानांत अनेक मानववंशांतील लोकांची खिचडी झालेली दिसत आहे. त्यांतील अगदीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूळचे रहिवासी कोण हें ओळखणें मोठें मुष्किलीचें होऊन बसलें आहे. तरीही आज हिमालयाच्या पायथ्याशीं असणाऱ्या प्रदेशांत राहणारे नाग, कुकी वगैरे लोक, बंगालमधील संताळ, ओढ्या प्रांतांतील गोंड व सातपुड्यांतील भिल्ल वगैरे लोक हिंदुस्थानचे मूळ रहिवासी असावेत असा विद्वानांचा समज आहे. या लोकांना कांहीं लोक 'कोल' अथवा 'आदि द्रविड' असेंही म्हणतात. लंकेमधील 'वेद्द लोक' व अंदमानांतील रहिवासी त्यांचेच वंशज असावेत असेंही समजलें जातें. हे लोक कृष्णवर्णी व नकटे आहेत. अजूनही त्यांच्यांत सुधारणा झालेली नाहीं. रानटीपणा सोडण्यासही ते फारसे उतावीळ नसतात.

११. द्रविड लोकः—आर्यांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला त्यावेळीं हिंदुस्थानांत द्रविड लोक होते. हे लोक येथील मूळच्या रहिवाशांचे वंशज होते किंवा ते बाहेरून येथें आले तें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु द्रविड लोक बरेच सुधारलेले होते यांत शंका नाहीं. हे लोक शेती करीत. व्यापारही त्यांस चांगला अवगत होता. इराण, मेसापोटेमिया, आशिया मायनर वगैरे दूरदूरच्या प्रांतांशींही त्यांचा व्यापार चाले; व तिकडे द्रविड लोक हिंदुस्थानांतून तांदूळ, मलमलीचें कापड, चंदन, मोर वगैरे पाठवीत. यावरून नौकानयनांतही त्यांनीं चांगलीच प्रगति केलेली दिसते. द्रविडांनीं अनेक गांवें व शहरें वसविलीं. ते मोठे शूर, काटक, मेहेनती व धाडसी लोक होते. त्यांचा वर्ण कृष्ण होता. त्यांचीं नाकें चपटीं होतीं. मात्र त्यांच्या शरीरांची बांधणी मोठी मजबूत असे. ते मोठे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्यांत मूर्तिपूजा नव्हती; परंतु भूमि, वृक्ष, नाग, पाषाण, सूर्य वगैरेंस देवता कल्पून त्यांची ते आराधना व उपासना करीत. भुतांखेतांवरही त्यांचा विश्वास होता. त्यांना प्रसन्न करून घेण्याकरितां ते पशूही बळी देत. आर्य लोक या द्रविडांनाच अनार्य, दस्यू, दानव अथवा राक्षस या नांवानें संबोधीत. द्रविड लोकांनीं कांहीं ग्रंथही लिहिले होते. आजचे कानडी, मल्याळी व तामीळ लोक त्यांचेच वंशज असावेत असा समज आहे. द्रविडांचा काळ इ. स. पू. सुमारें ५००० वर्षांचा असावा.

१२. मोंगोल लोकः—हिंदुस्थानांत द्रविड लोक होते त्याच सुमारास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ईशान्य दिशेकडून मोंगोल लोक हिंदुस्थानावर चाल करून आले. बंगाल, आसाम व ब्रह्मदेश या ठिकाणीं या लोकांनीं वस्ती केली. ते मूळ चीनमध्यें रहात होते. ते पीतवर्णी, रुंद कपाळाचे व बसक्या नाकाचे होते. त्यांचा चेहेरा सपाट होता व ते थोडे खुजे होते. त्यांची वृत्ति भटकण्याकडे फार होती. त्यांनीं द्रविड लोकांचा अनेक वेळां पराभव करून त्यांना उत्तर हिंदुस्थानांतून दक्षिणेकडे पिटाळलें होतें. मोंगोल लोकांनीं बंगाल, आसाम, वगैरे प्रांतांतील रहिवाशांशीं लग्नें केलीं. त्यामुळें त्या प्रांतांतील लोकांत हे मिसळून गेले. आज या लोकांचे वंशज बंगाल, आसाम, नेपाळ, भूतान, ओरिसा, ब्रह्मदेश वगैरे प्रांतांतून दिसतात. मोंगोल लोकांनंतर श्वेतवर्णी आर्य लोक हिंदुस्थानांत आले व ते येथें कायमचे राहिले. अशातऱ्हेनें कृष्णवर्णी द्रविड, पीतवर्णी मोंगोल व श्वेतवर्णी आर्य या सर्वांचें कालांतरानें मिश्रण झालें. त्यामुळेंच आजच्या हिंदुस्थानांतील लोकांत त्या सर्वांचें रक्त आपल्याला दिसतें. मात्र त्या सर्वांवर आर्यांचा पगडा विशेष आहे.

१३. मोहोंजोदारोची संस्कृति:—प्राचीन इतिहासाच्या बाबतींत



मोहोंजोदारो उत्खननांत सांपडलेल्या स्त्रियांच्या चित्रांचे नमुने (त्यांच्या गळ्यांतील दागिने पहा).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुराण-वस्तु संशोधनखात्यानें सन १९२४ मध्यें अमोलिक भर घातली. त्या सालीं सिंधच्या एका दरीमध्यें मोहोंजोदारो येथें जमिनीमध्यें उत्खनन चालू होतें. त्यावेळीं एकाखालीं एक अशीं भिन्न शहरें आढळून आलीं. त्या ठिकाणीं जे अवशेष सांपडले त्यावरून त्या शहरांतून उच्च संस्कृति नांदत असावी असा समज दृढ झाला. त्या शहरांची रचना, उत्तम बांधलेलीं स्नानगृहें, सांडपाण्याकरितां केलेलीं पक्कीं गटारें, पाण्याचे नळ, नदीवरील घंधारे, पक्क्या विटांच्या भिंती, निरनिराळी नाणीं, नानाविध सोन्यामोत्यांचे दागिने वगैरेवरून तीं शहरें चांगलींच सुधारलेलीं होतीं यांत शंका नाहीं. त्या शहरांतील लोक उत्तम व्यापारीही होते. अनेक प्राण्यांची चित्रेंही तेथें सांपडलीं; यावरून ते लोक उत्तम चित्रकारही होते असें सिद्ध होतें. विद्वानांचा असा समज आहे कीं मोहोंजोदारोची संस्कृति इ. स. पू. ३००० ते ३५०० वर्षांची असावी व तेथें राहणारे लोक द्रविड असावेत. मोहोंजोदारोप्रमाणेंच पंजाबांत मॉंटगॉमेरी गांवाजवळ **हरप्पा** येथेंही



मोहोंजोदारोच्या उत्खननांत सांपडलेलीं मुलांचीं खेळणीं.

उत्खनन झालें. तेथेंही प्राचीन संस्कृतीचे अनेक अवषेश सांपडले आहेत. तेही मोहोंजोदारोचे समकालीन असावेत असें समजलें जातें. हरप्पा येथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांब्याचीं अनेक भांडीं सांपडलीं. त्याचप्रमाणें निरनिराळ्या धातूंचीं शस्त्रेंही सांपडलीं.

अभ्यास

१. हिंदुस्थानचे मूळ रहिवासी कोण? त्यानंतर येथें कोण लोक आले? त्यांची माहिती सांगा.

२. हिमयुग व लोहयुग यासंबंधीं माहिती द्या.

३. मोहोंजोदारो व हरप्पा येथील संस्कृतीसंबंधीं माहिती सांगा.

४. 'हिंदुस्थानांत विविधता आहे; परंतु त्यांत एकसूत्रीपणा आहे.' हें विधान सिद्ध करा.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
   द्रविड लोक, अश्मयुग, इतिहासाचीं साधनें, मोंगोल लोक, टेथिस समुद्र.

६. हिंदुस्थानास नंदनवन कां म्हणतात? हिमालयामुळें तोटे काय झाले?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. आर्यांचें हिंदुस्थानांत आगमन व प्रसार.

१. आर्यलोक—मूलवसतिस्थान :— मोंगोल लोकांनंतर आर्य लोक हिंदुस्थानांत आले. ते खैबर खिंडींतून पंजाबांत उतरले. सिंधूनदाच्या तीरावर प्रथम त्यांनीं वसाहती स्थापन केल्या. हें आर्य लोक प्रथम कोठें रहात याबद्दल विद्वानांमध्यें एकवाक्यता नाहीं. त्यांचें मूळ वसतिस्थान मध्य आशियांत असावें असें मोक्षमुल्लर म्हणतो. कांहींच्या मतें कॉकेशस पर्वतालगतच्या प्रदेशांत ते असावेत. कांहीं समजतात कीं आर्य लोक हिंदुस्थानांतच होते. लो. टिळकांच्या मतें ते उत्तर ध्रुवाजवळ रहात होते. मूलवसतिस्थानाबद्दल मतभेद असले, तरी आर्य लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं सरदारिया व अमुदारिया या नद्यांच्या कांठीं रहात होते हें निश्चित. तेथून त्यांना दुसऱ्या आर्य टोळ्यांनीं हुसकल्यामुळें कांहीं युरोपांत गेले, कांहीं इराणांत गेले व कांहीं हिंदुस्थानांत आले. हिंदुस्थानांत आल्यावर पंजाबांतील द्रविडांशीं त्यांनीं झगडा केला; व त्यांना पिटाळून ते तेथें स्थाइक झाले. आर्यांच्या आगमनाचा काळही निश्चित नाहीं. सर्वांच्या मतें तो काळ इ. स. पूर्वीं ४००० ते २००० हजार वर्षांचा असावा. पुढें एकामागून एक अनेक आर्य टोळ्या हिंदुस्थानांत आल्या व स्थाईक झाल्या.

२. आर्यांची राहणी :— आर्य लोक गोऱ्या रंगाचे, उंच, सुदृढ बांध्याचे, लांबट डोक्याचे, सुंदर व सरळ नाकाचे होते. ते उत्तम लढवय्ये होते, शेती हा त्यांचा मुख्य धंदा होता. त्यामुळें ते खेड्यांत घरें बांधून रहात. गायी व मेंढ्या यांचीं खिल्लारें ते पाळीत. दूध, तूप, धान्यें, मांस, फळें हा त्यांचा नेहमींचा आहार होता. द्राक्षें, मध, जव, सातू वगैरेपासून ते मद्य तयार करून पीत. गुरेंढोरें हीच संपत्ति असें ते मानीत. सुतारकाम, विणकाम, कापड रंगविणें, धातूंचीं भांडीं तयार करणें, दगड, धातू व हाडें यांचीं हत्यारें बनविणें वगैरे कला त्यांस माहीत होत्या. रथ व बोटी ते तयार करीत. धनुष्य, भाला, तरवार हीं त्यांचीं शस्त्रें होतीं. ते स्वतःस ‘ आर्य ’

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे 'श्रेष्ठ' समजत व इतरांस अनार्य, दस्यू, दानव या नांवांनीं संबोधीत. त्यांच्यांत कुटुंबपद्धति रूढ होती. कुटुंबांतील वडील व कर्ता पुरुष कुटुंबाचा नेता समजला जाई. त्याची आज्ञा सर्वांना मानावी लागे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे समाजाचे मुख्य घटक होते. जातिभेद नव्हता, वर्णव्यवस्था होती. तरी पण ब्राह्मणांचें सर्व समाजावर वर्चस्व होतें. ज्याच्याजवळ जास्त गाई, तो श्रीमंत समजला जाई. त्यावेळीं नाणीं प्रचारांत नव्हतीं. अनेक कुटुंबांची टोळी होई. अनेक टोळ्या मिळून समाज होई. कामकाजाकरितां टोळ्यांच्या सभा होत. त्यांचा निर्णय सर्व मानीत. सर्वांकडून एक मुख्य नायक निवडला जाई. त्याच्यावरच सर्वांच्या संरक्षणाची जबाबदारी असे. यालाच पुढें लोक राजा म्हणूं लागले. तो प्रजेचा सल्ला घेत असे. त्यावेळच्या खेड्यास 'ग्राम' ही संज्ञा होती. अनेक खेड्यांच्या समुदायास विस उर्फ विहार म्हणत. अनेक विसांच्या समुदायास जनपद अथवा राष्ट्र असें संबोधीत.

३. आर्यांचें सामाजिक जीवन:—त्यावेळीं स्त्रीपुरुषांत फारसा भेद नव्हता. ऋषी संसारी असत. समाजांत स्त्रियांस फार मान मिळे. त्यांच्यांत बालविवाह नव्हता. सतीची चाल नव्हती. पुनर्विवाहाची चाल होती. स्त्रिया वेदविद्येचें अध्ययन करीत. एकपत्नित्वाची चाल रूढ होती. क्वचित् बहुपत्नित्वाची चाल होती. व्यभिचार व स्त्रियांचा छळ हे मोठे गुन्हे समजत. मुलीस वारसा मिळत असे. स्त्रिया सोन्यामोत्यांचे दागिने वापरीत. स्त्रिया घराची सर्व व्यवस्था पहात, सभांतून वादविवाद करीत, व्याख्यानें देत, न्यायसभेंत जात व आपल्या पतींस हरेक कामांत मदत करीत. गायन, काव्य व ज्योतिषशास्त्र आर्यांना अवगत होतें. गणितशास्त्रांतही त्यांनीं पुष्कळच प्रगति केली होती. आर्यांना नक्षत्रें व ग्रह यांची माहिती होती; सूर्याभोवतीं पृथ्वीचें भ्रमण, पृथ्वीची गुरुत्वाकर्षणशक्ति, चंद्रग्रहण व सूर्यग्रहणाचे आधुनिक सिद्धांत आर्यांना मान्य होते. वेद प्रमाण व पूज्य मानले जात. घोड्यांच्या व रथांच्या शर्यतींचा त्यांना अति नाद होता. शर्यती व तंतुवाद्यें हीं त्यांच्या करमणुकीचीं साधनें होतीं. जुगारही खेळला जाई, पण तो खेळणें व गाई चोरणें हा मोठा गुन्हा समजला जाई. द्यूत खेळणें राजमान्य होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जलप्रवास निषिद्ध नव्हता. समाजांतील लोकांच्या धंद्यांवरून लोहार, सुतार, न्हावी, हेर, नृत्यकार, रंगारी, चांभार, कोळी, कुंभार वगैरे अनेक वर्ग समाजांत निर्माण झाले होते. सोमरसाचें पान व मोकळ्या हवेंतील राहणी आर्यांना फार पसंत असे.

४. आर्यांची धर्मविषयक कल्पना :—आर्य लोक धर्मशील होते. इंद्र, वरुण, सूर्य, अग्नि, आकाश इत्यादि पंचमहाभूतांची ते आराधना व प्रार्थना करीत. त्यांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. अग्निपूजेला ते फार महत्त्व देत व त्यायोगें सर्व देव-देवता प्रसन्न होतात असें ते समजत. आपल्या उपास्याची भक्तिभावानें प्रार्थना करून ते त्यास प्रसन्न करीत. प्रार्थनेकरितां ते स्तोत्रें रचीत. तीं म्हटल्यानें देवता प्रसन्न होतात व आपल्याला पाहिजे असलेली वस्तु त्या देतात, असा त्यांचा विश्वास होता. भुतांखेतांवर त्यांचा विश्वास नव्हता. यज्ञ करण्याची व त्यावेळीं पशूस बळी देण्याची चाल त्यांच्यांत होती. मृत मनुष्यें ते प्रथमतः पुरीत; पुढें त्यांस ते जाळूं लागले. सृष्टींतील महान शक्तींना ते देवता कल्पित. त्यांच्या सर्व धार्मिक कल्पना व वाङ्मय ऋग्वेदांत सांपडते. तोच त्यांचा मुख्य आधार.

५. ऋग्वेद :—ऋग्वेद हा ग्रंथ आर्यांनीं लिहिला. तो केव्हां लिहिला गेला तें ठाम झालेलें नाहीं. परंतु विद्वानांच्या मतें तो ग्रंथ इ. स. पू. ४००० ते १२०० पर्यंत लिहिला असावा. यज्ञयागाच्या वेळीं निरनिराळ्या ऋषींनीं जीं स्तोत्रें वा सूक्तें रचिलीं, तीं ऋग्वेदांत आहेत. अर्थात ऋग्वेद ग्रंथ एकानें लिहिलेला नाहीं. पुढें सर्व सूक्तांचें एकीकरण करण्यांत आलें. त्यांस 'संहिता' असें म्हणतात. ऋग्वेदामध्यें १०१७ सूक्तें आहेत. त्या सर्वांचा दहा मंडलांत समावेश करण्यांत आला आहे. हीं सूक्तें गुरुमुखांतून शिष्य ऐकत असत; म्हणून त्यांस 'स्मृति' असेंही म्हणत असत. स्मृति ईश्वरप्रणीत मानल्या जातात. ऋग्वेदांत देव एकच आहे अशी शिकवण सांपडते. ऋग्वेदग्रंथावरूनच आर्यांसंबंधीं सर्व प्रकारची माहिति मिळते. पंजाबांत असतांना आर्यांनीं ऋग्वेद लिहिला असा समज आहे.

६. आर्यांचा हिंदुस्थानांत प्रसार :—आर्य लोक पंजाबांत असतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दृशद्वती व सरस्वती या दोन नद्यांच्या दुआबांत रहात. त्या प्रदेशाला त्यांनीं 'ब्रह्मावर्त' हें नांव दिलें. तेथें त्यांची लोकसंख्या वाढली; व ते पूर्वेकडे सरकूं लागले. त्याचवेळीं खैबर खिंडींतून आर्यांची दुसरी टोळी हिंदुस्थानांत आली. त्यांच्याशीं त्यांचे अनेक खटके उडाले. त्यांत त्यांचा पराभव झाल्यानें गंगा व यमुना या नद्यांच्या कांठीं त्यांनीं नव्या वसाहती स्थापन केल्या. त्या प्रदेशास त्यांनीं 'ब्रह्मर्षिदेश' असें नांव दिलें. पुढें आर्य लोक सबंध उत्तर हिंदुस्थानांत पसरले व त्यांनीं त्याला 'आर्यावर्त' हें नांव दिलें. आर्य जसजसे पुढें सरकत तसतसे त्यांचे अनार्यांशीं व द्रविडांशीं एकसारखे झगडे होत. त्यांत आर्यांचा विजय होई. त्याचप्रमाणें जुने आर्य व नवे आर्य यांच्यांतही चकमकी होत. एके काळीं आर्यांच्या यदु, अनु, पुरु वगैरे दहा टोळ्या एकत्र झाल्या. त्यांचे राजे भरत लोकांच्या टोळ्यांवर चाल करून गेले. भरत लोकांचा सुदास नामक राजा होता. सुदासानें त्या सर्वांचा सरस्वती नदीचे कांठीं पूर्ण पराभव केला. पुढें पुढें ज्यांना आर्यांनीं दानव, असुर, दस्यू वगैरे संबोधनांनीं हिणविलें, ते लोक आर्यांमध्यें पूर्णपणें मिसळून गेले. कांहींना त्यांच्या वृत्तीप्रमाणें ब्राह्मणत्व अगर क्षत्रियत्वही प्राप्त झालें. आर्यांनीं अनार्यांच्या शिव, शक्ति वगैरे देवतांना आपल्या धर्मामध्यें समाविष्ट करून घेतले. अनार्यांनींही आर्यांची संस्कृति व त्यांचा धर्म यांचा पूर्णपणें अंगिकार केला. मात्र दक्षिणेमध्यें सरकत गेलेले व तेथें पूर्वीं कायम राहिलेले द्रविड लोक, यांनीं त्यांना लौकर दाद दिली नाहीं. आपल्या धर्माचें व आपल्या संस्कृतीचें त्यांनीं बऱ्याच काळपर्यंत संरक्षण केलें.

७. आर्यांचीं निरनिराळीं राज्यें :—हळूहळू सर्व आर्यावर्त आर्यांनीं व्यापून टाकला व तेथें आपलीं राज्यें स्थापन केलीं. त्याच सुमारास आजचा अफगाणिस्थान–म्हणजेच त्यावेळचा गांधार—प्रांतही त्यांनीं जिंकून घेतला होता. दिल्लीजवळ कुरूंचें राज्य होतें. अयोध्या प्रांतांत कोसलांचें राज्य होतें. पांचाळ लोकांनीं हल्लींच्या आग्र्याजवळ आपलें राज्य स्थापिलें होतें. बहारमध्यें विदेहांचें राज्य होतें. दक्षिण बहारमधील द्रविडांचें राज्य जिंकून, मगध येथें आर्यांनीं नवें राज्य स्थापिलें. हल्लींच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजपुतान्याच्या उत्तरेस मत्स्य व त्याच्या थोडें वर मद्र हीं राज्यें होतीं. विंध्य पर्वताच्या आजूबाजूस अवंती, विदर्भ, निषध, शूरसेन हीं राज्यें होतीं. काशीस स्वतंत्र राजा होता. अंग व वंग हीं अनार्य राज्यें सध्यांच्या बंगाल प्रांतांत होतीं. तीं आर्यांनीं जिंकलीं. अशा तऱ्हेनें सर्व आर्यावर्तांत निरनिराळीं, स्वतंत्र व सुटसुटीत राज्यें आर्यांनीं स्थापन केलीं. दक्षिणेमध्यें मात्र त्यांचा प्रवेश झाला नव्हता. तेथें द्राविडांचीं चेर, चोल, केरळ, पांड्य, आंध्र, कलिंग वगैरे राज्यें होतीं. या राज्यांतून द्रविडांची संस्कृति व त्यांचा धर्म अव्याहत चालू होता. दक्षिणेंतील या राज्यांस आर्य लोक 'अनार्यांचीं राज्यें' समजत.



८. दक्षिणेंतील द्रविड राज्यें :—आर्य लोक द्रविडांना अनार्य म्हणून हिणवीत असत. परंतु त्यांची संस्कृति फार चांगली होती. इतर अनार्यां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणें ते मागासलेले नव्हते. तेही चांगले योद्धे होते. आर्यांशीं निकरानें झगडून त्यांनीं आपलें क्षात्रतेज चांगलेंच दाखविलें होतें. द्रविड लोक चांगले व्यापारी होते. हिंदुस्थानच्या बाहेर जावा, सुमात्रा, लंका, मलाया, बोर्निओ, कँबोडिया वगैरे प्रांतांशीं त्यांचा व्यापार चाले. पुढें त्यांनीं तेथें जाऊन कायमच्या वसाहती स्थापल्या. त्यांनीं आपल्या तामीळ, तेलगू, कानडी वगैरे भाषा टाकल्या नाहींत. लेखनाकरितां एक लिपीही त्यांनीं शोधून काढली होती. तिच्यापासूनच हल्लींची लिपी निघाली असें मानितात. पुढें आर्यांची झडप त्यांच्यावर आली. त्यांतून ते निसटूं शकले नाहींत. त्यामुळें द्रविड लोक आर्य संस्कृतींत पूर्ण मिसळून गेले. आर्यांचे आचार-विचार, धर्म, चालीरिती, भाषा वगैरेंचा त्यांनीं स्वीकार केला. द्रविडांच्या कांहीं देवतांचाही आर्यांनीं आपल्या धर्मात समावेश करून घेतला. या सर्व घडामोडी इ. स. पू. सहाव्या-सातव्या शतकांत झाल्या असाव्यात असा तर्क आहे.

अभ्यास

१. आर्यांचें मूल वसतिस्थान कोणतें ? हिंदुस्थानांत त्यांनीं कोठें कोठें वसाहती स्थापल्या ?

२. आर्यांसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा. त्यांच्यांत व द्रविडांत काय फरक होता ?

३. आर्यांची धर्मविषयक कल्पना काय होती ? ऋग्वेदासंबंधीं माहिती सांगा.

४. आर्यांची धार्मिक व सामाजिक स्थिति वर्णन करा.

५. आर्यांच्या वेळचा हिंदुस्थानचा एक नकाशा काढून त्यांत आर्य व अनार्य यांचीं राज्यें दाखवा.

उतारे

१. ऋग्वेदांतील उषावर्णन

पाण्याच्या लाटांप्रमाणें उषेचे दैदीप्यमान शुभ्र प्रभाकिरण उदय पावत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. (ही) सर्व सुमार्ग सुगम करिते व सर्वांना दाक्षिण्यवती व धन आणि समृद्धि देणारी होते. (१)

हे उषे, तूं अश्वांच्या साहाय्यानें अप्रतिहतगति (असून) (याचकाच्या) इच्छेप्रमाणें त्याला (इष्ट) वर पोंचवितेस. ती तूं आम्हांला (इष्ट धन) दे. हे द्युकन्ये, जी तूं सर्वांच्या अगोदर आवाहनीय व पूजनीय आहेस ती तूं आम्हांला दर्शन दे. (५).

विस्तीर्ण प्रदेशावर पसरणाऱ्या या प्रभा सुभग व दैदीप्यमान रक्तकिरण वाहून नेतात. शूर (अस्त्र) क्षेपकाप्रमाणें ही शत्रूंना घालवून देते. वेगवान रथ्याप्रमाणें ही (शत्रूंचा) अंधकाराचा नाश करते.

२. ऋग्वेदान्तर्गत कांहीं ऋचा

हे सूर्या, जेव्हां तुला आसुर स्वर्भानूनें (राहूनें) अंधकारानें ग्रासलें, तेव्हां सर्व लोक वेड्यासारखे झाले आणि त्यांना आपण कोठें आहोंत हेंही कळेना.

फाळ आम्हांकरितां सुखानें नांगरो. शेतकरी बैलांसह सुखानें जावोत. पर्जन्य सुखानें मधुर उदकाचा वर्षाव करो. हे शुनासीरांनो (इंद्र व वायु), तुम्ही आम्हांला सुख द्या.

जे लोकरीचीं स्वच्छ वस्त्रें वापरतात ते पयोष्णी (रावी) नदीच्या तीरावर राहतात.

हे मरूतांनो, रसा, अनितभा, कुभा (काबूल), क्रमु किंवा सिंधू तुम्हांस थोपवून न धरोत. पाण्यानें उचंबळणारी शरयू तुम्हांला आडवी न होवो. तुमचें सुख आम्हांलाच मिळो.

आम्ही शत्रूंच्या गाई धनुष्यानें जिंकूं, युद्ध धनुष्यानें जिंकूं, उन्मत्त झालेल्या कडव्या सैन्याला धनुष्यानें जिंकूं, धनुष्य शत्रूंना उद्विग्न करो, आम्ही सर्व दिशा धनुष्यांनीं जिंकूं.

हे राजा, तुला आम्ही उदयाला आणलें आहे. तूं आमचा राजा हो. तूं नित्य आणि स्थिर रहा. सर्व लोक तुला (राजा म्हणून) मानोत. तुझ्यापासून राज्य नष्ट होऊं नये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे राजा, सवितादेव तुला राष्ट्र प्राप्त करून देवो. सोम आणि सर्व प्राणिमात्र तुला राष्ट्र प्राप्त करून देवोत, कीं ज्यायोगें तूं सर्व सूत्रधारी होशील.

प्रश्न :—१. वरील ऋचांवरून आर्यांसंबंधीं तुम्हांस कोणती माहिती मिळते? ती सर्व एकत्रित करा.

२. त्यावेळीं आर्य कोठें रहात? कशावरून? ते कोणते धंदे करीत?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. आर्य वाङ्मयाची अभिवृद्धि

१. रामायण :—आर्यांच्या निरनिराळ्या टोळ्या हिंदुस्थानांत आल्या व त्यांनीं अनेक प्रबल राज्यें आर्यावर्तांत स्थापिलीं. त्यांत कुरु, पांचाल, कोसल, विदेह व काशी हीं राज्यें फार प्रसिद्ध व पराक्रमी होतीं. कोसल व विदेह हीं राज्यें एकमेकाशेजारीं होतीं. कोसलचा प्रख्यात राजा श्रीरामचंद्र होय. त्याच्याचवेळीं सर्व भरतखंडांत एकछत्री राज्य स्थापन झालें. त्याचा इतिहास ज्या महाकाव्यांत वर्णिला आहे, त्याला रामायण असें म्हणतात. रामायणांतील वर्णनावरून त्या वेळच्या आर्यांच्या सामाजिक जीवनावर चांगलाच प्रकाश पडतो. विदेहकन्या सीता हिच्याशीं श्रीरामचंद्राचा विवाह झाला होता. तो स्वयंवरपद्धतीनें झाला. त्यावेळचे राजे प्रजाहिततत्पर व क्षात्रतेजानें तळपणारे असत. त्यावेळचे आर्य शूर, सदाचरणी, कर्तव्यनिष्ठ, एकवचनी व सत्य बोलणारे होते. रामायणकालीं बंधुप्रेम, एकपत्नीव्रत, पातिव्रत्य, मातृ-पितृप्रेम, भ्रातृप्रेम वगैरे गुण आर्यांनीं आत्मसात् केलेले दिसतात. श्रीरामचंद्र कर्तव्यनिष्ठ पुत्र, नमुनेदार पती, प्रेमळ भाऊ व प्रजाहितदक्ष असा आदर्श राजा होऊन गेला. तसेंच आर्यांचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर झाला हें रामायणावरून दिसतें. लोकांची करमणूक करून त्यांना उत्तम बोधामृत पाजणारा असा रामायण हा ग्रंथ आहे. रामायण ग्रंथ वाल्मिकी नामक प्रसिद्ध ऋषीनीं लिहिला.

२. महाभारत :—रामायणाप्रमाणेंच महाभारत हाही काव्यग्रंथ अतिप्रसिद्ध आहे. भगवान व्यासानीं तो लिहिला. त्या ग्रंथांत मुख्यतः कुरु व पांचाल या देशांच्या राजांच्या पराक्रमांचें वर्णन आहे. कौरव व पांडव यांच्यामधील घनघोर लढाईचें वर्णनही त्यांत आहे. तें भारतीय युद्ध केव्हां झालें हें निश्चित नाहीं. परंतु त्या वेळीं भगवान श्रीकृष्णानें अर्जुनाला उपदेशिलेली 'श्रीभगवद्गीता' आजही जगाला वंद्य होऊन राहिली आहे. महाभारतावरूनही त्या वेळच्या आर्य लोकांचे अनेक गुण दिसून येतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्यासंबंधाची विविध माहितीही मिळते. रामायण व महाभारत हीं काव्यें सर्व प्रकारच्या वाङ्मयाचा व व्यवहारज्ञानाचा अमोलिक ठेवा होय. अजूनही हिंदुस्थानांतील लोक आपलीं ध्येयें त्यावरून ठरवितात.

३. महाकाव्यकालीन लोकस्थिति :—त्यावेळीं राजे लोक प्रजाहित-दक्ष पण पिढीजाद असत. राजा हा विष्णूचा अवतार मानण्यांत येई. राजा प्रजेचा सल्ला घेई. त्यावरून राजसत्ता नियंत्रित होती असें दिसतें. राजे विद्वान असत. त्यांस वेदाधिकारही होता. विद्वानांचा योग्य सन्मान राजाकडून होत असे. जमिनीच्या उत्पन्नाचा एक षष्ठांश भाग कर म्हणून घेतला जाई. त्यावेळीं ग्रामव्यवस्था ग्रामपंचायतीमार्फत उत्तम होत असे. युद्धाची नीति ठरविलेली होती व त्याप्रमाणें युद्धें होत. राजे न्यायी होते. राजे लोक राजसूय व अश्वमेध यांसारखे मोठे यज्ञ करीत. त्याकाळीं वर्ण-व्यवस्था मागें पडूं लागली होती. जातीबंधनें कडक होऊं लागली. जन्मा-वरून जात ठरविली जाई. ब्राह्मणवर्गाला श्रेष्ठ मान मिळे. गुणकर्माप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे समाजाचे चार भाग पडले होते. पहिल्या तीन वर्णांतील लोकांस वेदाधिकार होता. वर्णाश्रमव्यवस्थाही त्यावेळीं सिद्ध झाली होती. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम असे चार आश्रम होते. चारी आश्रमवासीयांचीं कर्तव्येंही त्यावेळीं आंखून देण्यांत आलीं होतीं. लोक सदाचारी व संपन्न होते. गाईच्या खिल्लारांवरून त्यांची संपत्ति मापली जाई. तरीही सोनें–रुपें, रत्नें, हत्ती, घोडे, दासदासी यांवरूनही श्रीमंती अजमावली जाई. बहुपतित्व व बहुपत्नित्व यांची चाल रूढ होती. प्रौढविवाह व पुनर्विवाह मान्य होते. स्वयंवरपद्धति संमत होती. स्त्रीपुरुषांचा दर्जा समान होता. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा, वगैरे स्त्रिया मंत्रद्रष्ट्या होत्या. स्त्रिया युद्धांतही कधीं कधीं भाग घेत. दही-दूध-तूप, फळें, मांस, दारू वगैरे पदार्थ त्यावेळचे लोक अन्न म्हणून स्वीकारीत असत. उत्तम घरेंदारें बांधून त्यांत लोक रहात असत. निरनिराळे मौल्यवान कपडे व दागदागिने वापरले जात. एकंदरींत लोक सुखी, सधन, सत्यनिष्ठ, शौर्यवीर्यादि गुणांनीं युक्त व धार्मिक असत.. ज्योतिष, गणित, भूमिति, संगीत, आयुर्विद्या वगैरेंत लोक पारंगत होऊं लागले होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४१५/२०   २०१८४
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. धर्मविषयक कल्पना :—वेदकालीं आर्य लोकांच्या ज्या धर्मविषयक कल्पना होत्या, त्या हळूहळू मागें पडूं लागल्या होत्या. पंचमहाभूतांच्या आराधनेऐवजीं ब्रह्मा, विष्णु, महेश, गणपति, सरस्वती, लक्ष्मी वगैरे देव-देवतांच्या आराधनेस सुरवात झाली. त्यांच्या स्तुतिपर कवनें, सूक्तें वगैरे रचण्यांत येऊं लागलीं. मूर्तिपूजाही सुरू झाली. यज्ञ हें देवदेवतांना प्रसन्न करण्याचें साधन होऊन बसलें. पुनर्जन्माची कल्पना प्रसार पावली. धार्मिक विधींचें स्तोम माजूं लागलें. उच्च तात्त्विक विचार मागें पडूं लागले. गीतेची शिकवण लोकांनीं आचरणांत उतरविण्याचा पायंडा पाडला. गायींना पूज्य मानण्यांत येऊं लागलें. लोक दुर्वृत्त झाले म्हणजे परमेश्वर अवतार धारण करतो ही कल्पना उगम पावली. मोठमोठ्या धर्मपरिषदा भरून धर्मनिर्णय होऊं लागले.

५. आर्यवाङ्मयाची अभिवृद्धि :—या काळांत अनेक ग्रंथ निर्माण झाले. ऋग्वेद हा आर्यांचा प्रसिद्ध व पूज्य धर्मग्रंथ होय. त्यानंतर यजु, साम व अथर्व या तीन वेदांची रचना झाली. यज्ञयागाचे वेळीं जीं सूक्तें म्हणत तीं एकत्रित करण्यांत आलीं व त्यांचा यजुर्वेदांत समावेश करण्यांत आला. ऋग्वेदांतीलही कांहीं सूक्तें त्यांत घेण्यांत आलीं. ऋग्वेदांतील कांहीं सूक्तें गाण्याच्या सुरांत बसविण्यांत आलीं. त्यांची स्वतंत्र संहिता निर्माण झाली. त्यांस सामवेद हें नांव मिळालें. अथर्ववेद जादु-टोण्यासंबंधींच्या मंत्रतंत्रांनीं भरलेला आहे. या चारी वेदांप्रमाणेंच ब्राह्मणें, उपनिषदें व आरण्यकें यांचीही उत्पत्ति याच काळांत झाली. विद्वान व अनुभवी गुरुजनांजवळ बसून ईश्वर, आत्मा वगैरेसंबंधीं जें ज्ञान प्राप्त झालें तें उपनिषदांत सांठविलेलें आहे. उपनिषदें म्हणजे वेदांचें सार आहे. अरण्यांत बसून, अगदीं एकांत व निवांत जागीं, तत्त्वविषयक चर्चा चाले. ती ज्यांत समाविष्ट झाली तीं आरण्यकें होत. धार्मिक विधि व आचार कां, केव्हां व कसे करावे व पाळावे हें ज्यांत स्पष्टपणें सांगितलें आहे ते ब्राह्मण ग्रंथ होत. ते गद्यरूपांत आहेत. या सर्व ग्रंथांस ‘ श्रुति ’ अशी संज्ञा आहे. विश्वामित्र, वसिष्ठ, अत्रि, काश्यप, गौतम, वगैरे ऋषींनीं ते लिहिले. पुढें कांहीं काळानें सूत्रेंही रचण्यांत आलीं. मोठा अर्थ थोडक्यांत आणणें हा या सूत्रांचा विशेष होय. गृह्यसूत्रें व

LIBRARY,
GURUKULA KANGRI.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मसूत्रें प्रमुख होत. गृह्यसूत्रांत उपनयन, लग्न, अंत्यविधि वगैरे विधीसंबंधीं माहिती आहे. धर्मसूत्रांत आर्यांच्या चालींसंबंधीं व धर्मशास्त्रांसंबंधीं नियम आहेत. या सूत्रांवरच पुढें मनु, पराशर, याज्ञवल्क्य वगैरेनीं स्मृतिग्रंथ लिहिले. पुढें कांहीं काळानें व्याकरण, ज्योतिष, शिक्षा (वर्णोच्चार) छंदस् (प्रास, वृत्तें), निरूक्त (वेदांतील शब्दांचें स्पष्टीकरण) व कल्प (विधि व यज्ञयाग यांचे नियम) हीं सहा शास्त्रें निर्माण झालीं. त्यांस ' वेदांगें ' म्हणत. त्याचप्रमाणें वैद्यकशास्त्र, संगीतशास्त्र व युद्धशास्त्र अशीं शास्त्रेंही निर्माण झालीं. त्यांस ' उपवेद ' म्हणत. त्याचप्रमाणें सांख्य, योग, वेदान्त, उत्तर व पूर्व मीमांसा व वैशेषिक अशीं सहा ' दर्शनेंही ' निर्माण झालीं. हीं दर्शनें तत्त्वज्ञानविषयक होतीं. व्याकरणकार पाणिनी याच काळांत होऊन गेला.

६. **जातिभेदाची उत्पत्ति :**—आर्य लोक हिंदुस्थानांत आले त्यावेळीं त्यांच्यांत वर्णव्यवस्था होती. ती श्रमविभागाच्या तत्त्वावर रूढ झाली असें मानितात. अर्थात त्यावेळची चातुर्वर्ण्यव्यवस्था लवचीक होती. भिन्न वर्णीयांचे आपापसांत रोटी-बेटी व्यवहार होत. परंतु पुढें पुढें ब्राह्मणांनीं आपला वर्ण शुद्ध राखण्याकडे दृष्टि ठेविली. त्यांतच वर्णव्यवस्थेंत शूद्रांचा समावेश झाल्यानें अनेक घोटाळे उत्पन्न झाले. पुढें जन्म, कुल व धंदा यांवरून जात ठरूं लागली. त्यामुळें निरनिराळ्या जाति निर्माण झाल्या. त्यांचे व्यवहार सुरळीत चालावेत म्हणून नियमही करण्यांत आले. निरनिराळ्या जातींचे लोक निरनिराळ्या प्रांतांत गेल्यानेंही नानाविध जाति निर्माण झाल्या. पुढेंपुढें जातिबंधनें फार कडक होऊं लागलीं; व भिन्न भिन्न जातींतील रोटी-बेटी व्यवहार बंद झाले. अशातऱ्हेनें जातिभेदावर हिंदुसमाजाची उभारणी झाली. जातिभेदामुळें निरनिराळ्या धंद्यांत सुधारणा झाली, विद्या व कला यांची प्रगति झाली व निरनिराळे वर्ण शुद्ध राखण्यास मदत झाली. परंतु पुढें जातिभेदामुळें समाजांत अस्वस्थता निर्माण झाली, भिन्न भिन्न जातीयांत द्वेष उत्पन्न झाला, समाजांतील बंधुभाव नष्ट झाला व राष्ट्रांत बेकी निर्माण होऊन अन्य धर्मीयांचें फावलें. जातिभेदामुळेंच जैन, बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, वगैरे धर्मांचा हिंदुस्थानांत प्रसार होऊं शकला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. काव्यकालीन आर्यांच्या धार्मिक व सामाजिक स्थितीचें वर्णन करा.
२. प्राचीन आर्य व काव्यकालीन आर्य यांत कोणते फरक होते ?
३. आर्य वाङ्मयासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.
४. जातिभेदाची उत्पत्ति कशी झाली ? त्याचे फायदे व तोटे सांगा.
५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

चार वेद, जातिभेद, महाभारत, रामायण, सूत्रें, उपनिषदें, ब्राह्मणें.

उतारे

१. नैतिक तत्त्वें

'सत्यं वद. धर्मं चर.' वेदाध्ययनाविषयीं अनवधान करूं नको. आचार्याला प्रिय असलेली वस्तू दिल्यावर व त्यानें अनुज्ञा दिल्यावर गृहस्थाश्रम स्वीकार. सत्यापासून (कधींही) ढळूं नकोस. धर्मापासून च्युत होऊं नको. आत्मरक्षणार्थ जें कुशल करावें लागतें, त्यापासून प्रमाद पावूं नकोस. ऐश्वर्यासाठीं जें मंगलयुक्त कर्म (करावें लागतें) त्यापासून प्रमाद पावूं नकोस. अध्ययन–अध्यापनापासून भ्रष्ट होऊं नये. (दोहोंचेंही अनुष्ठान करावें.) याचप्रमाणें देव व पिता यांच्यासंबंधींच्या कर्तव्यांत चुकी होऊं देऊं नको. माता, पिता, अतिथि व आचार्य यांस देवाप्रमाणें मान देऊन त्यांची उपासना कर. यांशिवाय जीं कांहीं दुसरीं निर्दोष, अनिंद्य, शिष्टाचाराचीं कर्मे आहेत तींच तूं नेहमीं कर. दुसरीं दुष्ट, अनिंद्य व अशिष्ट कर्मे केव्हांही करूं नकोस. आचार्यांच्या पुण्यकारक व वेदविरुद्ध नसलेल्या कर्मांचेंच अनुकरण करीत जा.

—तैत्तिरीयोपनिषद्—एकादशोनुवाद : ।

प्रश्न :—१. धर्मरक्षणार्थ कोणत्या गोष्टी करणें जरूर आहे ?

२. ब्रह्म म्हणजे काय ?

माझ्या हृदयांतील हा माझा आत्मा तण्डुल कणापेक्षां, यव, सोहरी वगैरेपेक्षांही सूक्ष्म आहे. परंतु हा माझा आत्मा पृथ्वीपेक्षां, वातावरणापेक्षां, आकाशापेक्षां व सर्व ग्रहांपेक्षांही मोठा आहे. सर्व कृत्यें, इच्छा, सुगंध, व अभिरुचि त्याच्या ठिकाणीं वास करतात. या सर्वांना त्यानें आपल्या ठिकाणीं कोंडून ठेवलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. तो बोलत नाहीं व त्याला कशाचीच अपेक्षा नाहीं. माझ्या हृदयांतील आत्मा म्हणजेच ब्रह्म होय. या जीवितापासून आत्म्याची जेव्हां ताटातूट होईल तेव्हां मी त्याच्याशीं मिसळून जाईन. —छांदोग्य उपनिषद् ३–१४.

३. पुनर्जन्म

हृदयाग्र चकाकूं लागल्यावर, पडलेल्या प्रकाशांत, चक्षूंमधून, डोक्यांमधून किंवा इतर कोणत्या तरी इंद्रियांतून आत्मा निघून जातो, व तो जात असतां, प्राणही त्याच्या पाठोपाठ जातो, व नंतर जीवनाधार अशीं इतर इंद्रियें निघून जातात; नंतर संवेदना निघून जाते. परंतु आत्मा मात्र युक्तज्ञान असतो. फक्त पूर्वजन्मींचें ज्ञान व कर्म हीं (त्याच्या) आत्म्याशीं नेहमीं असतात...... पूर्वींचा देह व अविद्या टाकल्यावर हा आत्मा अगदीं नवीन व अधिक सुंदर असें पितरांचें, गंधर्वांचें, ब्रह्म्याचें, प्रजापतीचें किंवा दुसऱ्या एखाद्या प्राण्याचें रूप धारण करतो. जसें त्यानें आचरण केलें असेल, तशी स्थिति त्याला प्राप्त होते. ज्यानें सत्कृत्य केलें असेल तर तो साधु पुरुष होतो, ज्यानें दुष्कर्में केलीं असतील तो पुनः दुष्ट होतो. सत्कृत्यांमुळें चांगला जन्म मिळतो, दुष्कर्मांच्या योगानें वाईट जन्म मिळतो. वासनेप्रमाणें निश्चयात्मक इच्छा असते. निश्चयात्मक इच्छेप्रमाणें कर्म घडतें व कर्माप्रमाणें त्याची भवितव्यता असते; अशाप्रकारें जशी वासना असेल तसा मनुष्य होत असतो.

—बृहदारण्यकोपनिषद् ४–५

प्रश्नः—१. ब्रह्म कशाला म्हणतात? पुनर्जन्म कशावर अवलंबून आहे? वासना व दुष्कर्में यांचा पुनर्जन्मावर काय परिणाम होतो?

वाचा.

१. द. गो. लिमयेकृत–भारतीय युद्ध. २. किनरेकृत–मुलांचा श्रीकृष्ण. ३. चिं. वि. वैद्यकृत–श्रीरामचरित्र व श्रीकृष्णचरित्र. ४. चिं. वि. वैद्यकृत–महाभारताचा उपसंहार. ५. श्रीमत् भगवद्गीता वाचून तिच्यांतील कांहीं अध्याय अर्थासह पाठ करा. ६. दशोपनिषदांतील एखादें उपनिषद् अर्थ समजून घेऊन पाठ करा. ७. डॉ. केतकर यांचा जातिभेदासंबंधाचा निबंध वाचा. ८. 'वेदशास्त्रदीपिका' हा ग्रंथ चाळा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. मगधचा नंदवंश—शिकंदराची स्वारी

१. मगधच्या राज्याचा विस्तार:—आर्यांनीं सर्व आर्यावर्तांत आपलीं अनेक राज्यें स्थापिलीं हें आपण मागील धड्यांत पाहिलेंच आहे. त्यांत अनार्यांचींही कांहीं राज्यें दिलीं आहेत. त्यांत मगधचें राज्य प्रख्यात होतें. महाभारतकाळीं तेथें जरासंध नामक राजा होता. प्रसिद्ध भारतीय युद्धानंतर तेथील अनेक राज्यें नामशेष झालीं. पुढें इ. स. पू. सातव्या शतकांत मगध येथें प्रबळ राजसत्ता निर्माण झाली. त्यावेळीं त्या देशावर शिशुनाग वंशाचे राजे राज्य करीत होते. त्या वंशांतील पहिला राजा शिशुनाग व पांचवा बिंबिसार होय. बिंबिसारानें इ. स. पू. ५८२ पासून इ. स. पू. ५५४ पर्यंत राज्य केलें. त्यानेंच अंग देश जिंकला. गौतमबुद्ध व महावीर हे त्याचे समकालीन होते. बिंबिसाराचा पुत्र अजातशत्रू होय. त्यानें इ. स. पू. ५५४ तें ५२७ पर्यंत राज्य केलें. त्यानें आपल्या बापाचा खून करून मगधचें राज्य मिळविलें होतें. त्यानें कोशल व वैशाली हीं राज्यें जिंकलीं. पाटलीपुत्र शहरही त्यानेंच वसविलें. त्याच्या बापानें बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. अजातशत्रूनेंही बौद्ध व जैन या दोन्ही धर्मांस आश्रय दिला. भगवान बुद्धाचें निर्वाण याच्याच कारकीर्दीत झालें. त्याचा मुलगा दर्शक मगधवर इ. स. पू. ५२७ ते ५३० पर्यंत राज्य करीत होता. तो राजा असतांच डरायस या इराणच्या राजानें हिंदुस्थानावर स्वारी केली व त्यानें पंजाब प्रांत जिंकला. दर्शकानंतर तीन राजे झाले व पुढें शिशुनागवंशाचा शेवट झाला. (इ. स. पू. ४१३).

२. नंदवंश :—शिशुनाग वंशाचा शेवट झाल्यावर नंदवंशांतील राजे मगधवर राज्य करूं लागले. हे राजे शूद्रवंशीय होते. नंद घराण्याचा संस्थापक नंदीवर्धन होय. त्यानें सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केला होता. त्याचा पुत्र महापद्मनंद होय. त्यानें बरीच वर्षें राज्य केलें. त्याच्यानंतर त्याच्या सहा मुलांनीं त्याच्या राज्याचा उपभोग घेतला. नंदवंशांतील शेवटचा राजा महा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंद ऊर्फ धननंद होय. नंदवंशांत एकंदर नऊ राजे होऊन गेले व त्यांनीं



प्राचीन हत्यारें.

सुमारें शंभर वर्षें राज्य केलें. (इ. स. पू. ४१३– इ. स. पू. ३२३). त्यानंतर त्या वंशाचा शेवट झाला. त्यांच्या राज्यांत शांतता नव्हती. प्रजेस पीडा फार होई. शेवटच्या नंदाच्या मुलानें आर्य चाणक्य याचा अपमान केला होता. ती गोष्ट लक्षांत ठेवून चाणक्यानें चंद्रगुप्त मौर्याच्या मदतीनें नंदघराण्याचा शेवट केला. नंद राजे राज्य करीत होते, त्यावेळींच ग्रीसमधील मॅसिडोनियाचा राजा शिकंदर ऊर्फ अलेक्झांडर यानें हिंदुस्थानावर स्वारी केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. शिकंदरची हिंदुस्थानावर स्वारी (इ. स. पू. ३२७):—ग्रीसमधील मॅसिडोन प्रांताचा राजा अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर मोठा पराक्रमी होता. सर्व जग जिंकण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. केवळ वीस वर्षांचा असतांच तो राजा झाला व जग जिंकण्याच्या उद्योगाला लागला. इराण, सीरिया, इजिप्त वगैरे देश जिंकल्यावर तो हिंदुस्थानाकडे वळला. इ. स. पू. ३२७ व्या वर्षी तो खैबर घाटानें हिंदुस्थानांत उतरला. पुढील वर्षीं त्याला तक्षशिलेचा राजा अंभी शरण गेला. अंभी राजाचें पौरव (पोरस) राजाशीं वाकडें होतें. तेव्हां त्यानें पौरवावर स्वारी करण्यास शिकंदराला सांगितलें. त्यावेळीं झेलम नदीच्या कांठीं शिकंदर व पौरव यांच्या सैन्यांत मोठी लढाई होऊन पौरवाचा पराभव झाला. पौरवानें शिकंदरचें सार्वभौमत्व कबूल केलें. पौरवाचा बाणेदारपणा पाहून शिकंदर खूष झाला व त्यानें त्याचें राज्य त्याला परत दिलें. या विजयानंतर मगधची कीर्ति व संपत्ति त्याच्या कानीं आली. तेव्हां तो देशही पादाक्रांत करावा असें त्याला वाटलें. त्याची कल्पना त्याच्या शूर सैनिकांस पसंत पडली नाहीं. घरीं जाऊन बायका-मुलांस भेटण्यास ते फार उत्सुक झाले होते. शिकंदर परतला नाहीं तर ते बंड करतील असाही संभव दिसूं लागला. तेव्हां मोठ्या कष्टानें शिकंदर स्वदेशीं जाण्यास तयार झाला. मात्र आलेल्या वाटेनें न जातां तो सिंधमार्गें परतला. जातांना तो प्रांत त्यानें जिंकून घेतला; व नंतर जलमार्गानें तो ग्रीसकडे निघाला. परंतु स्वदेशीं पोंचण्यापूर्वींच इ. स. पू. ३२३ मध्यें बाबिलोन शहरीं तो मृत्यु पावला. त्यावेळीं त्याचें वय अवघें बत्तीस होतें. मगधशीं त्याची गांठ पडती तर त्याचा पराभव होणें शक्य होतें.



शिकंदर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. शिकंदरच्या स्वारीचे परिणाम :—परत जातांना शिकंदरानें योग्य ती व्यवस्था करून जिंकलेले प्रांत आपल्या ताब्यांत राहतील अशी



काळजी घेतली होती. परंतु तसें झालें नाहीं. शिकंदर जातांच त्याच्या सैनिकांनीं बंड केलें; व तेथील सरदार स्वतंत्र झाले. शिकंदरच्या स्वारीनें युरोप व हिंदुस्थान यांचा प्रथमच संबंध जडला. त्यामुळें पौर्वात्य व पाश्चात्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशांमध्यें विचारविनिमय व दळणवळण सुरू झालें. व्यापारही वाढला. शिकंदरानें आपल्याबरोबर अनेक हिंदी कारागीर ग्रीसकडे नेले होते. तसेंच त्याच्याबरोबर वैदिक संस्कृति, संगीत, व्याकरण, ज्योतिष, गणित, भूमिति, तत्त्वज्ञान वगैरे विद्याही गेल्या. त्या सर्वांनीं ग्रीक संस्कृतीवर मोठाच पगडा बसविला. उलट ग्रीक कला, ग्रीकांची शिल्पकला व लष्करी सुधारणा या सर्वांचा हिंदी लोकांवरही परिणाम झाला. लष्करी कवाइतीचा प्रभावही हिंदी लोकांच्या मनावर बसला. त्याचें महत्त्व त्यांस पूर्णपणें पटलें; पण त्यांनीं तें आचरणांत उतरविलें नाहीं! बौद्ध देवदेवतांवर व संस्कृतीवर ग्रीक देवतांचा बराच परिणाम झाला. हिंदु संस्कृति मात्र अलिप्त राहिली. ख्रिश्चन धर्माच्या प्रारंभींच्या तत्त्वांवर मात्र बौद्ध धर्माचा बराच परिणाम झाला. पुढें हिंदुस्थानांत जे ग्रीक लोक वसाहती करून राहिले ते कालांतरानें हिंदू लोकांत पूर्णपणें मिसळून गेले.

अभ्यास

१. शिकंदरानें हिंदुस्थानावर स्वारी कां केली? त्याच्या स्वारीचें वर्णन करा.

२. शिकंदराच्या स्वारीचा ग्रीस व हिंदुस्थान या देशांवर काय परिणाम झाला?

३. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा:—

अजातशत्रू, बिंबिसार, महापद्मनंद, धननंद, चाणक्य, चंद्रगुप्त, दर्शक, जरासंध.

४. शिकंदराच्या वेळचा एक नकाशा काढा व त्यांत त्याच्या स्वारीचा मार्ग दाखवून त्यावेळचीं हिंदुस्थानांतील राज्यें दाखवा.

५. प्रा. श्री. म. माटेकृत पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ हें पुस्तक वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. जैन व बौद्ध धर्मांचा उदय

१. नव्या धर्मास अनुकूल परिस्थिति :—इ. स. पू. सुमारें पांचव्या शतकांत हिंदुस्थानांत फार मोठी खळबळ उडाली. त्या काळीं जातिभेद कडक झाला होता. विधि व मंत्रतंत्र फार वाढून, केव्हां कसें वागावें हें लोकांस कळेनासें झालें. सूत्रांमुळेंही अनेक घोटाळे निर्माण झाले. समाजांतील ब्राह्मणवर्गीयांचें श्रेष्ठत्व लोकांस सहन होईनासें झालें. त्यांतल्या त्यांत शूद्र जातींतील लोकांना त्या वेळचीं सामाजिक बंधनें आवडेनाशीं झालीं. त्यांना धार्मिक शिक्षण नव्हतें, धार्मिक हक्क नव्हते व त्यामुळें त्यांस समाजांत मान नसे. यामुळें त्यांस नवा धर्म उत्पन्न व्हावा असें वाटूं लागलें. धर्मग्रंथांची भाषा संस्कृत असल्यानें ते कोणास वाचतां येईनात. त्यामुळें निव्वळ कर्मठपणा देशांत माजला. त्यांतच लोकांना मतस्वातंत्र्य असल्यानें अनेकांनीं वैदिक धर्मावर हल्ले चढविले. त्यामुळें अनेक नवे संप्रदाय निघाले. त्या सर्वांत चार्वाकानें स्थापिलेला संप्रदाय महत्त्व पावला. मिळालेल्या जन्माचा पुरेपूर फायदा घ्यावा व यथेच्छ चैन करावी, असें तो उपदेशी. चार्वाकाचीं नास्तिक मतें अनेकांस पसंत पडूं लागलीं. अशा खळबळीच्या वातावरणांतच जैन व बौद्ध या नव्या धर्मांचा उदय व प्रसार झाला.

२. जैनधर्म संस्थापक—महावीर :—वैशाली नगरांत सिद्धार्थ नामक एक लिच्छवी सरदार रहात होता. त्याचा मुलगा वर्धमान महावीर हा होय. त्याच्या आईचें नांव त्रिशला. योग्य काळीं वर्धमान महावीराचें लग्न यशोदा नामक स्त्रीशीं झालें. परंतु संसारसुखाबद्दल तो उदासीन होता. त्यामुळें साधुसंतांच्या संगतींत काळ कंठणें त्याला आवडूं लागलें. पुढें तो पार्श्वनाथ ऊर्फ पारसनाथ याचा शिष्य बनला. महावीराचें व त्याचें पुढें पटलें नाहीं. त्यामुळें त्यानें पार्श्वनाथाचा पंथ सोडून दिला. नंतर त्यानें घोर तपश्चर्या आरंभिली. वयाच्या चाळिसाव्या वर्षी त्याला पूर्ण ज्ञान झालें. तेव्हां महावीरास लोक 'जिन' असें म्हणूं लागले. त्यानें नंतर आपला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवा संप्रदाय काढला व आपल्या पंथाच्या तत्त्वांचा तो प्रसार करूं लागला. त्याच्या पंथास 'जैन' हें नांव मिळालें. आपल्या धर्माचा त्यानें सुमारें तीस वर्षें प्रचार केला. विदेह, मगध व अंग येथील राजांनीं त्याला पाठिंबा दिला होता. तो वयाच्या ७२ व्या वर्षीं मृत्यु पावला. दया, क्षमा, शांति, वैराग्य व धर्म यांचा तो जणूं अवतारच होता.


वर्धमान महावीर

३. जैनधर्माची शिकवण :— त्या वेळच्या समाजांतील विषमता व धर्माचा कृत्रिमपणा जैनधर्मास मान्य नव्हता. जातिभेद नष्ट व्हावा, तो नैसर्गिक नाहीं व त्यामुळेंच समाजांत विषमता निर्माण होते असें जैनांचें म्हणणें होतें. ऐहिक सुखांचा त्याग करावा व संन्यस्तवृत्तीनें राहून आत्म्याची शुद्धि करून घ्यावी. मोक्ष मिळवावयाचा असेल तर सदाचरण, सत्कर्म व सद्ज्ञान यांकडे दृष्टि ठेवून प्रत्येकानें वागावें. भूतमात्राचे ठिकाणीं आत्मा असतो; अर्थात हिंसा करूं नये. जन्ममरणाचा फेरा चुकवावयाचा असेल तर प्रत्येकानें घोर तपश्चर्या करावी व आत्मक्लेश सोसावे. आपलें ध्येय गांठण्यासाठीं आत्मनाश करून घेण्यासही कोणी कमी करूं नये. त्याकरितां यज्ञ-जप-जाप्य वगैरे मार्ग चूक आहेत. अशी जैनधर्माची एकंदर शिकवण होती. एकंदरींत जैनधर्मानें शुद्धाचरण, संन्यास व अहिंसा या तत्त्वांवर जोर दिला; व सत्य, प्रामाणिकपणा, निष्पाप आचरण, सदाचार व आत्मक्लेश यांची त्यांस जोड दिली.

४. जैनधर्माचा प्रसार :—महावीराच्या धर्मतत्त्वांची शिकवण अनेकांस पसंत पडली. त्यांतल्या त्यांत शूद्रादिकांनीं त्याच्या धर्माचा चटकन स्वीकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला. वैदिक धर्मानें ज्यांचा ज्यांचा छळ केला त्यांनीं त्यांनीं जैनधर्म स्वीकारला. मागें सांगितल्याप्रमाणें महावीराला राजाश्रय मिळाल्यानेंही त्या धर्माच्या प्रसारास मोठी मदत झाली. परंतु एकंदरींत पाहतां त्या धर्माचा जोरदार प्रसार झाला नाहीं. आज फार थोडे जैन लोक हिंदुस्थानांत आहेत. जैन लोक एकंदर चोवीस तीर्थंकर अथवा सिद्ध पुरुष मानतात. महावीर जैनधर्माचा संस्थापक मानला जातो. तरी त्याच्याही पूर्वीं तेवीस तीर्थंकर होऊन गेले. जैनांत श्वेतांबर व दिगंबर असे दोन उपपंथ निर्माण झाले. महावीर हा गौतम बुद्धाचा समकालीन होता असा समज आहे.

५. **सिद्धार्थ—गौतमबुद्ध:**—जैनधर्माचा संस्थापक महावीर याच्याप्रमाणेंच त्याकाळीं दुसरा एक मोठा धर्मसंस्थापक होऊन गेला. त्याचें नांव सिद्धार्थ ऊर्फ गौतम बुद्ध होय. त्याला शाक्यमुनि असेंही म्हणत. कपिलवस्तु नगराचा राजा शुद्धोदन व राणी मायादेवी यांच्या पोटीं त्याचा जन्म झाला (इ. स. पू. ६२३). त्याचें बालपण मोठ्या श्रीमंतींत व सुखांत गेलें. एकोणिसाव्या वर्षींच यशोधरा नामक एका राजकन्येशीं त्याचा विवाह झाला. प्रथमपासूनच गौतमाला संसारसुखाविषयीं तिटकारा असे. रोग, दारिद्र्य, ऐहिक दुःखें वगैरेमुळें होणारे मानवी हाल पाहून, त्याचें अंतःकरण तिळतिळ

गौतमबुद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुटे. त्याची वैराग्यवृत्ति पाहून त्याच्या आईबापांसही चिंता उत्पन्न होई. पुढें त्याला राहुल नामक पुत्ररत्न झालें. त्यावेळीं त्याला एकदम उपरति झाली व संसाराचा त्याग करून आत्मशुद्धि करून घ्यावी असें त्याला वाटूं लागलें. त्यांतच एका मंगल प्रसंगीं रस्त्यानें तो जात असतां त्याला एक व्याधिग्रस्त म्हातारा, दुःखी रोगी व एक प्रेत दिसलें. त्यामुळें त्याचें अंतःकरण विदीर्ण झालें. तेव्हां एका रात्रीं आपलीं पूज्य मातापितरें, सुस्वरूप व प्रिय पत्नी व सुखासीन राज्य यांचा त्याग करून तो अरण्यांत गेला. तेथें त्यानें तरवारीनें आपले केस कापून टाकले व शिकाऱ्याचा वेष घेऊन तो दोघा पंडितांस शरण गेला. त्यांच्या उपदेशाप्रमाणें, अक्षय्य शांति मिळविण्याकरितां, त्यानें सहा वर्षें घोर तपश्चर्या केली. परंतु त्यानें त्याचा उद्देश सफळ झाला नाहीं. तेव्हां उपास-तपास, घोर तपश्चर्या व आत्मक्लेश यांमुळें अक्षय्य शांति मिळणें अशक्य आहे, अशी त्याची खात्री झाली. परमेश्वरावरील त्याचा विश्वासही उडाला. पुढें तो एकसारखा भटकत राहिला. एके दिवशीं सध्यांच्या बुद्धगयेजवळ एका पिंपळाच्या झाडाखालीं तो ध्यानमग्न असतां त्याला साक्षात्कार झाला. तेव्हां अक्षय्य शांतीकरितां, देहदंड न सोसतांही, शुद्धाचरणानें वागल्यास निष्पाप स्थितीप्रत मनुष्य जातो, असें त्याचें ठाम मत झालें. लगेच त्यानें काशीस जाऊन आपल्या नव्या धर्माचा प्रसार



गौतमबुद्धाच्या चरित्रांतील दोन देखावे.
१ राजवाड्यांतील जीवन; २ संसारत्याग.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यानें आपल्या धर्माचा पंचेचाळीस वर्षें प्रसार केला. इ. स. पू. ५४३ मध्यें आपल्या वयाच्या ऐशींव्या वर्षी कुशीनगर येथें तो मृत्यु पावला.

६. **बौद्धधर्माची शिकवण :**—गौतमबुद्धानें स्थापिलेल्या धर्मास 'बौद्धधर्म' असें म्हणतात. त्याची शिकवण साधी व सरळ आहे. या जगां-



गौतमबुद्धाचें पलायन व अरण्यांत शिकाऱ्याच्या पोषाखाचा स्वीकार

तून दुःखाचा पूर्णपणें नायनाट करावा असा गौतमाचा मूळ उद्देश होता. सर्व दुःखाचें मूळ स्वार्थ आहे असें त्याचें म्हणणें होतें. तेव्हां स्वार्थ नष्ट झाला कीं दुःख संपलें, असें तो म्हणे. स्वार्थाच्या पोटीं इंद्रियजन्य सुखाची व ऐहिक सुखाची आशा असते. तीं सुखें मिळालीं नाहींत म्हणजे मनुष्य दुःखी होतो. तेव्हां सर्व प्रकारच्या सुखाची आशा नष्ट करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. निर्वाण मिळविण्याकरितां आत्मक्लेशाची, जपतपांची, हिंसात्मक यज्ञयागांची अगर अघोर तपश्चर्येची जरूरी नाहीं असें गौतमबुद्ध म्हणे. अर्थात मनोनिग्रह, शुद्धाचरण, निष्काम कर्म, भूतदया, अहिंसा, सत्यनिष्ठा, आत्मोन्नति, विश्वबंधुत्व वगैरे तत्त्वांचें एकनिष्ठपणें आचरण करणेंच योग्य होय असें त्याचें ठाम मत होतें. कर्मठपणा, बाह्योपचार, मंत्रतंत्र वगैरेवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा विश्वास नव्हता. मनुष्यास पुर्नजन्म आहे असें तो मानी. निष्पाप स्थिति प्राप्त व्हावी, म्हणजेच निर्वाणपदाची जोड मिळावी, असें मनुष्याला वाटत असेल तर, त्यानें आपलें नैतिक आचरण शुद्ध ठेवावें असें तो सांगे. जातिभेदावर त्याचा मुळींच विश्वास नव्हता. वेदांचें अपौरुषेयत्व व मूर्तिपूजा त्यास मान्य नव्हती.

७. बौद्धधर्माचा प्रसार :—आपल्या हयातींत गौतमबुद्धानें सुमारें पंचेचाळीस वर्षें आपल्या धर्मांचा प्रचार केला. त्यावेळीं मगधचा राजा बिंबिसार व त्याचा पुत्र अजातशत्रू यांनीं त्याच्या धर्मांचा स्वीकार केला. त्या नंतर त्यानें कपिलवस्तूस जाऊन आपल्या मात्यापित्यांसही आपल्या धर्मांची दीक्षा दिली. त्याच्या धर्मास राजाश्रय मिळाल्यानें त्याचा धर्म जास्त प्रसार पावला. त्याचीं तत्त्वें साधीं व व्यापक असल्यामुळें व तीं पालीसारख्या सोप्या भाषेंत सांगितल्यानें अनेकांनीं त्याच्या धर्मांचा स्वीकार केला. त्याच्या धर्मांत जातिभेद, यज्ञयाग, उपासतपास, देहदंड वगैरे भानगडी नव्हत्या. उलट भूतदया, सदाचार, अहिंसा, निष्काम कर्म, आत्मोन्नति वगैरेसारख्या सोप्या मार्गावरच भर देण्यांत आला होता. यामुळेंही त्याचा धर्म प्रसार पावूं शकला. वैदिक धर्माभिमान्यांना न दुखवितां, लोकांना पटतील अशा धर्मतत्त्वांवरच गौतमबुद्धानें भर दिला. त्यामुळें त्याचा मार्ग सुकर झाला. आपल्या धर्माच्या प्रसाराकरितां त्यानें बौद्ध भिक्षूंचीही योजना केली होती. या सर्व कारणांमुळें त्याचा धर्म हिंदुस्थानभर झाला. पुढें पुढें त्या धर्मानें हिंदुस्थानाबाहेर लंका, ब्रह्मदेश, चीन, जपान, नेपाळ, तिबेट, सीरिया, मलाया, सयाम वगैरे प्रांतांतही आपलें ठाणें मांडलें. सम्राट अशोक यानें तर त्या धर्माच्या प्रसाराचें कंकण आपल्या हातीं बांधून घेतलें होतें. त्यामुळें तो धर्म फोफावला.

८. बौद्धधर्मांचा ऱ्हास :—सम्राट अशोकानें बौद्धधर्म स्वीकारून त्याचा प्रसार जगभर केला. (ती हकीकत पुढें येईलच.) त्याच्यानंतर कनिष्कानें तसाच प्रयत्न केला. परंतु कालांतरानें बौद्धधर्माची पीछेहाट होऊं लागली. बौद्ध भिक्षू आळशी, श्रीमान, दुर्वर्तनी व सुखलोलूप बनले. बुद्धाची शिकव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णही मागें पडूं लागली. त्यामुळें बौद्धधर्मावरील लोकांचा विश्वास ढळूं लागला. वैदिक धर्माचा लोप झाला नव्हता. उलट त्या धर्माच्या अभिमान्यांनीं बौद्धधर्मावर जोराचे हल्ले चढविले. बौद्धधर्मातील सदाचार, भूतदया, अहिंसा, संन्यास, महोत्सवांचें व यात्रेचें महत्त्व वगैरे गोष्टी वैदिक धर्माभिमान्यांनीं आपल्या धर्मांत घेतल्या. एवढेंच नव्हे तर गौतमबुद्धाला ते श्रीविष्णूचा नववा अवतार मानूं लागले. यामुळेंही बौद्धधर्म ऱ्हास पावूं लागला. राजाश्रयही पुढेंपुढें नष्ट झाला. या सर्व कारणांमुळें बौद्धधर्माला उतरती कळा लागली. हिंदुस्थानांत बौद्धधर्म उत्पन्न झाला; परंतु आज बौद्धधर्मीयांचा आपल्या देशांत अभावच आहे. उलट जपान, चीन, ब्रह्मदेश, सयाम, मलाया वगैरे देशांत तो आजही जोर धरून आहे.

अभ्यास

१. गौतमबुद्धाचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याच्या धर्माची शिकवण कोणती होती ?

२. जैनधर्माची स्थापना कोणीं केली ? त्याचें चरित्र थोडक्यांत सांगा.

३. जैन व बौद्ध या धर्मांची शिकवण सांगून त्यांच्यांतील भेद व साम्य वर्णा.

४. नव्या धर्माची लोकांस आवश्यकता कां भासूं लागली ? त्या नव्या धर्माचा त्यांनीं स्वीकार कां केला ?

५. बौद्धधर्माच्या प्रसाराचीं व ऱ्हासाचीं कारणें सांगा.

६. खालील पुस्तकें वाचा. १. गो. ग. तळवळकरकृत–आशियाचे धर्मदीप. २. प्रा. धर्मानंद कोसंबीकृत–गौतमबुद्धाचें चरित्र व गौतमबुद्ध लीलासार. ३. डॉ. प. ल. वैद्यकृत–बौद्धधर्माचा अभ्युदय.

उतारा

१. बुद्धाचा उपदेश

१. श्रद्धा हें बीं आहे. त्यावर सदाचरणाची वृद्धि होते. प्रज्ञा हा माझा नांगर आहे व पापाची लाज हा त्या नांगराचा मधला दांडा होय. मनोरूपी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रज्जूनें हा नांगर जखडलेला असतो. स्मृति हा माझ्या नांगराचा फाळ आणि हाच माझा चाबूक होय. सत्य हेंच माझें बोलणें होय; आणि शांति ही माझी विश्रांति होय. माझा उत्साह हेच माझे बैल होत. माझें नांगरणें निर्वाणाच्या दिशेला जात असतें. याप्रमाणें केलेली शेती अमृतफलदायी होते; व मनुष्य सर्व दुःखांपासून मुक्त होतो.

२. दान, प्रियवचन, अर्थचर्या (म्हणजे उपयोगीं पडणें) आणि समानात्मता (म्हणजे दुसऱ्यास आपल्यासारखें वागविणें) हीं चार लोकसंग्रहाचीं साधनें आहेत. आईबापांनीं जर या साधनांचा उपयोग केला नसता, तर केवळ जन्म दिला म्हणूनच मुलांनीं त्यांचा गौरव केला नसता.

३. अधार्मिक आचरणामुळें मनुष्य मरणोत्तर नरकाला जातो आणि धार्मिक आचरणामुळें स्वर्गाला जातो. मनुष्याचें चित्त सुरक्षित असलें, तरच त्याचीं सर्व कर्मे सुरक्षित राहतात. कर्म हेंच माझें धन, कर्म हाच माझा बांधव. त्याच्या चिंतनानें मनुष्य पापकर्मांपासून निवृत्त होतो.

४. जन्मानें चांडाळ किंवा ब्राह्मण होत नाहीं; कर्मानेंच होतो.

५. विषयाची आसक्ति सोडून देण्यामुळेंच मनुष्याची त्यापासून मुक्तता होते.

६. हा भवसागर तरून जाण्याकरितां सामान्य माणूस यज्ञयागादिक किंवा देहदंडनादिक उपायांचें स्तोम माजवितो ! परंतु तो मार्ग खरा नव्हे.

७. द्वेषानें द्वेष नष्ट होत नाहीं, स्नेहानें तो नष्ट होतो. सर्वांचें आपल्या जीवितावर प्रेम असतें. सबब हत्या करणें योग्य नाहीं.

प्रश्न :—१. बुद्धाच्या धर्मांतील कोणतीं तत्त्वें वरील उताऱ्यांत दिसतात ?

इतिहास व्यवसाय

१. जैनधर्म व बौद्धधर्म—साम्य.

१. पुनर्जन्म व कर्माप्रमाणें फळ यांवर दोन्ही धर्मांचा विश्वास आहे.
२. ईश्वराची सत्ता दोघांसही अमान्य आहे, मात्र सिद्धांची पूजा त्यांस मान्य आहे.
३. जग दुःखमय आहे, असें समजून दोहो धर्मांचे लोक गिरिकंदरांचा आश्रय घेतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. निर्वाणपदप्राप्ति हीच मानवाची इतिकर्तव्यता, असें दोहोंचें म्हणणें आहे.
५. त्याकरितां जप-तप व यज्ञयाग यांची व धर्माचें बाह्यतंत्र व विधिनियमांचें पालन यांची आवश्यकता नाहीं. सदाचारानें उत्तरोत्तर मनुष्याच्या अंगीं शुद्धता बाणते व अंतीं तो मोक्षपदास जातो असें दोघेही मानतात.
६. 'अहिंसा' दोहोंसही मान्य आहे.
७. वेद व वैदिक वाङ्मय यांस दोन्ही धर्म प्रमाण मानीत नाहींत.
८. जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था दोहोंसही मान्य नाहीं. अर्थात धर्मक्रिया करण्याची पात्रता सर्वांस आहे असें ते मानतात.
९. भिक्षूंचे संघ दोघांनींही स्थापिले; व आपल्या धर्माच्या प्रसारार्थ त्यांनीं आपल्या धर्माची शिकवण लोकांत रूढ असलेल्या प्राकृत भाषांत केली.

२. जैनधर्म व बौद्धधर्म—विरोध

जैनधर्म	बौद्धधर्म
१. निर्वाणप्राप्तीकरितां उपवास, नम्रता व आत्मपीडा यांचा अवलंब. कठोर तपश्चर्या व वेळीं प्राणत्यागही योग्य.	१. सत्य, सदाचरण व आत्मोन्नति यांच्यायोगेंच—व्रतादिकांनीं व आत्मपीडेनें नव्हे—निर्वाण पदप्राप्ति होते.
२. सत्यविश्वास, सत्यज्ञान व सत्कर्म यांवरच जास्त भर.	२. बुद्ध, त्याचा धर्म, व संघ या त्रिरत्नांस प्राधान्य.
३. जैन २४ तीर्थंकर मानतात.	३. बौद्ध लोक २४ बुद्ध मानतात.
४. तीर्थंकरांचीं देवळें उभारणें व त्यांची पूजा करणें योग्य.	४. बुद्धाच्या अवशेषावर चैत्य उभारून त्याची पूजा.
५. ऐहिक सुखें सोडून देण्याची आत्यंतिक इच्छा.	५. ही गोष्ट बौद्धांस अमान्य.
६. अहिंसेचा अतिरेक. त्यामुळेंच प्राण्यांची काळजी घेणें संमत. त्याकरितां तोंडास फडकें, वाट साफ करण्यास मोरपिसांची कुंचली हातीं बाळगणें, रात्रौ जेवणें.	६. व्यवहार व अहिंसातत्त्व यांची फारकत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. हिंदुधर्म व बौद्धधर्म—साम्य

१. पुनर्जन्म व कर्मानुसार फळ मिळणें या गोष्टी दोन्ही धर्मांत आहेत.
२. संन्यासधर्माची कल्पना दोन्ही धर्मांत आहे. ती कल्पना मूळ हिंदुधर्मांत होतीच.
३. नीतिकल्पना व पंचमहायज्ञ यांसंबंधाच्या कल्पना, वैदिक देवता व स्वर्गादि निरनिराळे लोक यांचें अस्तित्व वगैरे गोष्टी दोहोंसही मान्य आहेत.
४. दोन्ही धर्मांत मनाची निर्विषय स्थिति हेंच अंतिम साध्य मानलें आहे.
५. हिंदुधर्मांतूनच बौद्धधर्माची उत्पत्ति झाल्यानें त्यांतील अनेक तत्त्वें बौद्धांनीं आपल्या धर्मांत स्वीकारलीं आहेत.

४. हिंदुधर्म व बौद्धधर्म—विरोध

हिंदुधर्म	बौद्धधर्म
१. वेद व वैदिक वाङ्मय यांचें प्रामाण्य.	१. बौद्धांस तें मान्य नाहीं.
२. आत्मज्ञानावर धर्माची उभारणी.	२. दुःख, कारण, विरोध, मार्ग यांवर उभारणी.
३. आत्मक्लेश, धर्मविधि, तपश्चर्या, यज्ञयाग यायोगें मोक्षप्राप्ति.	३. सत्य, सदाचार, आत्मोन्नति यांमुळें निर्वाणपद. आत्मक्लेश, यज्ञयाग अमान्य.
४. चातुर्वर्ण्य व जातिसंस्था मान्य.	४. जातिसंस्था व चातुर्वर्ण्य अमान्य.
५. हिंसात्मक कर्में अमान्य.	५. 'अहिंसा परमोधर्मः' हें तत्त्व मान्य.

कालादर्श

हिंदुस्थान	वर्ष (इ. स. पू.)	जग-युरोप
राजा बिंबिसार	५८२–५५४	या काळांत युरोपांत ग्रीस,
राजा अजातशत्रू	५५४–५२७	इटली हीं राज्यें अग्रेसर होतीं.
गौतमबुद्धाचा जन्म	६२३	इंग्लंडांत रानटी लोक होते.
गौतमाचा मृत्यु	५४३	आफ्रिकेंत इजिप्तमध्यें उच्च
शिकंदराची हिंदुस्थानावर स्वारी	३२७	संस्कृति वसत होती. सीरिया, चीन, खाल्डिया वगैरे
शिकंदराचा मृत्यु	३२३	राष्ट्रेंही पुढारलेलीं होतीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. सम्राट चंद्रगुप्त मौर्य (इ. स. पू. ३२२–२९८)

१. चंद्रगुप्त–मगधचा पाडाव:—नवनंदांचा शेवट होऊन इ. स. पू. ३२२ या वर्षीं मगधच्या गादीवर चंद्रगुप्त मौर्य बसला. नंदवंशांतील महानंद या शेवटच्या राजाचा तो दासीपुत्र होय. त्याच्या आईचें नांव मुरा होतें. म्हणून त्याच्या घराण्याला 'मौर्य' नांव पडलें असें म्हणतात. त्याच्या बापानें त्याला मगध देशांतून हद्दपार केल्यानें तो पंजाबांत गेला. तेथेंच त्याची कौटिल्य ऊर्फ आर्य चाणक्य याशीं गांठ पडली. त्याच्याच सल्यावरून चंद्रगुप्तानें अलेक्झांडरची भेट घेतली. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर पंजाबांत बंडाळी माजली असतां चंद्रगुप्तानें त्या प्रांतावर हल्ला केला व तो प्रांत काबीज केला. त्यानंतर त्यानें आपल्या लष्कराची चांगली तयारी करून, चाणक्याच्या मदतीनें, मगधवर चाल केली. त्यांत त्याला यश मिळून तो मगधचा राजा झाला (इ. स. पू. ३२२). लगेच त्यानें चाणक्याला आपला मुख्य प्रधान नेमलें. चाणक्य ऊर्फ विष्णुगुप्त हा मोठा चतुर व राजकारणपटु ब्राह्मण होता. 'कौटिलीय अर्थशास्त्र' हा त्याचा ग्रंथ विख्यात आहे. ज्या नंदराजानें त्याचा अपमान केला होता, त्याचा निःपात केल्याशिवाय शेंडी बांधणार नाहीं असा त्याचा निर्धार होता. शेवटीं त्याची प्रतिज्ञापूर्ती झाल्यानें त्याचें समाधान झालें. असा विद्वान् व चतुरस्त्र ब्राह्मण चंद्रगुप्ताचा प्रधान होता.

२. साम्राज्यविस्तार:—चंद्रगुप्त मगधचा राजा झाला त्यावेळीं हिंदुस्थानांत लहान लहान राज्यें होतीं. त्यांच्यामध्यें एकोपा नव्हता. याचा फायदा घेण्याचें चंद्रगुप्तानें ठरविलें. प्रथमतः त्यानें सेल्यूकस निकेटरचा पराभव केला. निकेटर हा शिकंदरचा एक ग्रीक सेनापति होता. त्यानें सिंधपलीकडील प्रांतावर आपला अंमल बसविला होता. हें न खपून चंद्रगुप्तानें त्याच्यावर स्वारी केली. अखेरीस पराभव झाल्यानें सेल्यूकसला चंद्रगुप्ताबरोबर अपमानकारक तह करावा लागला (इ. स. पू. ३०५).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या तहानें चंद्रगुप्ताला हिरात, काबूल, कंदाहार व बलुचिस्तान हे प्रांत, पुष्कळ खंडणी व ५०० हत्ती मिळाले. शिवाय सेल्यूकसनें आपल्या मुलीचें लग्नही चंद्रगुप्ता-बरोबर लावून मेगॅस्थिनीसला त्यानें आपला वकील म्हणून चंद्रगुप्ताच्या दरबारीं ठेवून दिलें. यानंतर चंद्रगुप्तानें लहान लहान राजांस आपलें सार्वभौमत्व स्वीकारण्यास लावलें. त्यामुळें त्याच्या साम्राज्याचा विस्तार बंगाल ते काबूल –कंदाहारपर्यंत झाला.

सेल्यूकस निकेटर

कांहींच्या मतें त्यानें दक्षिण देश पादाक्रांत करून म्हैसूरपर्यंतचा मुलुखही आपल्या राज्यास जोडला होता. चंद्रगुप्त मौर्य हा हिंदुस्थानचा पहिला सम्राट समजला जातो. कारण त्याच्याच वेळीं सर्व हिंदुस्थानांत एकछत्री अंमल स्थापन झाला.

३. चंद्रगुप्ताची राज्यव्यवस्था :—चंद्रगुप्ताचा राज्यकारभार चाणक्याच्या मदतीनेंच चालला होता. त्यावेळचा राज्यकारभार मेगॅस्थिनीसनें वर्णिला आहे. कौटिलीय अर्थशास्त्रावरूनही त्याच्या वर्णनास दुजोरा मिळतो. चंद्रगुप्तानें आपल्या राज्याची व्यवस्था उत्तम केली होती. साम्राज्याचे त्यानें निरनिराळे सुभे पाडले होते. प्रत्येक सुभ्यावर राजकुलांतील पुरुष असे. तो तेथील कारभार पाही. राज्यकारभाराचे सोयीसाठीं त्यानें निरनिराळीं सहा-सात खातीं निर्माण केलीं होतीं. प्रत्येकावर एकेक जबाबदार अधिकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. प्रत्येक नगरांत पंचायती होत्या. खेड्यांतूनही ग्रामपंचायती होत्या. पंचायतींचें काम नीट व्हावें म्हणून त्यांच्या निरनिराळ्या पोटसमित्या होत्या. त्यांच्याकडे परदेशीयांची सरबराई, कर वसुली, खानेसुमारी, व्यापार-वृद्धि, संरक्षण, कारखान्यांची देखरेख, जन्ममृत्यूंची नोंद वगैरे अनेक कामें सोपविण्यांत आलीं होतीं. त्याच्या वेळीं हेरखातें महत्त्वाचें होतें. राज्यांतील गूढ घडामोडी व कारस्थानें समजून घेण्याकरितां या खात्याचा त्याला फार उपयोग होई. वसुलीखातें राज्याचा वसूल गोळा करण्याकरितां होतें. जमीनमहसूल उत्पन्नाच्या एक चतुर्थांश घेतला जाई. लोकांस योग्य न्याय मिळावा म्हणून चंद्रगुप्त फार दक्षता बाळगी. त्याकरितां त्यानें न्यायखात्याची उभारणी केली. शेवटचा न्याय तोच देत असे. शेतीला उत्तेजन मिळावें म्हणून त्यानें पाटबंधारे व कालवे बांधले. त्यांचीं व्यवस्था नीट राखावी म्हणून त्यानें स्वतंत्र खातें निर्माण केलें होतें. सार्वजनिक हित साधावें म्हणून त्यानें दळणवळणाची चांगली सोय ठेविली होती. त्यानें चांगले व नवे रस्ते बांधले. त्यामुळें प्रवाशांची व सैन्याचीही उत्तम सोय झाली.

४. लष्काराची व्यवस्था :—चंद्रगुप्ताच्या साम्राज्याची सर्व मदार सुसज्ज लष्करावर होती. त्याचें लष्कर चतुरंग असे. हत्ती, घोडेस्वार, पायदळ व रथ हीं त्याच्या सैन्याचीं मुख्य अंगें होत. त्याच्या लष्करांत ९००० हत्ती, ३०००० घोडेस्वार, ६०००० पायदळ व ८००० रथ होते. सर्व सैन्याची व्यवस्था ठेवण्याकरितां निरनिराळे अधिकारी होते. सर्वांचा पगार योग्य वेळीं सरकारी खजिन्यांतून दिला जाई. वर सांगितलेल्या प्रत्येक खात्याचा कारभार पहाण्याकरितां स्वतंत्र मंडळें होतीं. लष्कराप्रमाणेंच चंद्रगुप्तानें आपलें आरमारही सुसज्ज ठेवलें होतें. त्याची व्यवस्था लष्करी व्यवस्थेप्रमाणें चोख ठेवलेली होती; मुख्य दर्यासारंगाच्या मदतीसही मंडळ होतें.

५. पाटलीपुत्राची व्यवस्था :—चंद्रगुप्ताच्या राजधानीचें शहर पाटलीपुत्र (हल्लीचें पाटणा शहर) होतें. त्या शहराची व्यवस्था अत्यंत नांवाजलेली होती. ‘ त्या शहराच्या भोवतीं उत्तम तट होता. त्याला ५७० बुरूज होते व ६४ वेशी होत्या. मुख्य राजवाडा लांकडी होता व त्याच्या खांबांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोनेरी मुलामा दिला होता. त्यांत सहा-सात फूट उंचीचीं सोन्याचीं अनेक भांडीं होतीं. सम्राट चंद्रगुप्त सोन्याच्या पालखींतून अगर सोन्याच्या अंबारींतून जाई. त्याचे कपडेही भरजरी व मखमलीचे असत. त्याच्याबरोबर अनेक यवनी शरीररक्षक असत. अनेक उद्यानेंही पाटलीपुत्र नगरींत होतीं. ' त्या शहराची व्यवस्था पाहण्याकरितां एक स्वतंत्र म्युनिसिपालिटीही होती. तिचा कारभार चोख असे. वरील एका परिच्छेदांत सांगितल्याप्रमाणें या म्युनिसिपालिटीचा कारभारही निरनिराळ्या समित्यांमार्फत चाले.

६. **त्यावेळची लोकस्थिति :**—चंद्रगुप्ताच्या दरबारीं मेगॅस्थिनीस हा ग्रीक वकील होता. त्यानें चंद्रगुप्त व त्याचें साम्राज्य यांच्यासंबंधीं मोठी मनोरंजक माहिती लिहिली होती. ती सर्व आज उपलब्ध नाहीं. त्यावरून अनेकांनीं उतारे घेतले होते. त्यांवरूनच त्यावेळच्या लोकस्थितीवर चांगला प्रकाश पडतो. ' हिंदु लोक सुखानें व प्रामाणिकपणें राहतात. ते अत्यंत मितव्ययी आहेत. यज्ञाच्या वेळींच ते दारू पितात. त्यांचा शब्दावर विश्वास फार. त्यामुळें त्यांना न्यायकचेरींत जावें लागत नाहीं. ते आपलें घर उघडें टाकूनही बाहेर जाऊं शकतात. ते सत्याला व आपल्या धर्माला फार मानतात. ते कुणालाही गुलाम करीत नाहींत. कलाकौशल्यांत ते चांगलेच तरबेज व कुशल आहेत. त्यांचे कपडे जरीचे असतात. त्यांवर रत्नेंही बसविलेलीं असत. तलम असें मलमलीचें कापडही ते तयार करतात व वापरतात. देशांत शांतता व सुव्यवस्था होती. लोक उद्योगी, प्रामाणिक व आदरातिथ्य करणारे होते. शिक्षा फार कडक असत. पुरुष सत्यनिष्ठ, शूर व पराक्रमी असून स्त्रिया सुशील व पतिव्रता असत. मोठ्या शहरांची व्यवस्था नमुनेदार असे. सभोंवार युद्धें चालत असतांही शेतकरी आपलें काम निर्वेधपणें करीत.' या सर्व वर्णनावरून त्या वेळची लोकस्थिति कळून येईल. त्यावेळीं रोम, ग्रीस, इजिप्त वगैरे परकीय देशांशींही हिंदुस्थानचा व्यापार चालत असे. हिंदुस्थानांतून हस्तिदंत, साखर, टिन, सोनें, हिरेमाणकें, औषधें, रेशमी, जरतारी व कापसाचें कापड वगैरे नानाप्रकारचा माल बाहेर जाई.

७. **बिंदुसार** (इ. स. पू. २९८–२३७) :—चंद्रगुप्त मौर्य इ. स. पू. २९८ व्या वर्षी मृत्यु पावला. त्यानंतर त्याचा मुलगा बिंदुसार हा मग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धचा सम्राट झाला. त्याच्यासंबंधीं फारशी माहिती मिळत नाहीं. त्यानें इजिप्त, सीरिया, ग्रीस वगैरेशीं मैत्री राखली. आपल्या साम्राज्याचेंही त्यानें योग्य रक्षण केलें. मद्रासपर्यंतचा दक्षिणेंतील भाग त्यानें जिंकला असेंही म्हणतात. आपल्या बापाची राज्यव्यवस्था त्यानें तशीच चालू ठेवली होती. तो इ. स. पू. २७३ या वर्षी मृत्यु पावला. बिंदुसाराला सुसीम, अशोक व वीताशोक असे तीन मुलगे होते. त्याचा प्रधान राधागुप्त यानें अशोकाला राज्य द्यावें असें सुचविल्यानें बिंदुसारानें आपल्या पश्चात अशोकास राज्य देण्याचें ठरविलें.

अभ्यास

१. चंद्रगुप्त मौर्याचें पूर्ववृत्त सांगून, त्यानें राज्य कसें मिळविलें तें वर्णा.

२. चंद्रगुप्त मौर्याच्या राज्यकारभाराचें वर्णन करा.

३. मेगॅस्थिनीस कोण होता? चंद्रगुप्ताच्या कारभारासंबंधीं व तत्कालीन लोकस्थितीसंबंधीं त्याचें मत काय होतें?

४. आर्य चाणक्य, सेल्यूकस, मेगॅस्थिनीस, पाटलीपुत्राची शोभा, वगैरे-संबधीं थोडक्यांत माहिती सांगा.

५. करंदीकर व हिवरगांवकर यांचें कौटिलीय अर्थशास्त्राचें भाषांतर चाळा. न. चिं. केळकर यांचें चंद्रगुप्त हें नाटक वाचा.

उतारा

१. राजाची दिनचर्या

राजा उद्योगी असला म्हणजे चाकरही उद्योगी असतात. राजानें सतत उद्योग करावा. घटकापात्राच्या साहाय्यानें किंवा सांवली मोजून दिवस व रात्र यांचे आठ आठ भाग करावे. दिवसाच्या पहिल्या भागांत राज्यांतील बंदोबस्ताची हालहवाल व जमाखर्च ऐकावा. दुसऱ्या भागांत पौरजानपदांच्या तक्रारी ऐकाव्यात. तिसऱ्या भागांत स्नान व भोजन करावें व अभ्यास करावा. चवथ्या विभागांत वसुलीचा स्वीकार करावा व निरनिराळ्या खात्यावरील अध्यक्षांच्या भेटी घ्याव्या. पांचव्या भागांत पत्रें पाठवून मंत्रीपरिषदेची सल्लामसलत घ्यावी व गुप्त हेरांनीं आणलेल्या महत्त्वाच्या बातम्या ऐकाव्या. सहाव्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विभागांत स्वच्छंद विहार करावा किंवा मसलत करावी. सातव्यांत हत्ती, घोडे, रथ व योद्धे यांची पहाणी करावी. आठव्यांत सेनापतीबरोबर युद्धचर्चा करावी. रात्रीच्या पहिल्या प्रहरांत गुप्त हेरांच्या भेटी घ्याव्या.

प्रजासुख हेंच राजाचें सुख. प्रजेचें हित तेंच राजाचें हित. स्वतःच्या इच्छेची तृप्ति करण्यांत त्याचें हित नसतें, तर प्रजेच्या इच्छेप्रमाणें वागण्यांत त्याचें हित असतें. सर्व जरुरीचीं कार्यें लागलींच पहावीं; कालावधीवर टाकूं नयेत. कार्यें लांबणीवर पडलीं असतां तीं दुर्घट होतात.

—कौटिलीय अर्थशास्त्रावरून

प्रश्न :—१ वरील उताऱ्यांत राजाचीं कोणतीं कर्तव्यें सांगितलीं आहेत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. सम्राट अशोक (इ. स. पू. २७३–२३२)

१. सम्राट अशोक–पूर्ववृत्त :—बिंदुसार मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा अशोक इ. स. पू. २७३ मध्यें मगधच्या गादीवर बसला. त्याला सुसीम नांवाचा एक वडील भाऊ होता. परंतु अशोकाला आपल्या पश्चात् गादी मिळावी असें बिंदुसारानें सांगितलें होतें. त्यामुळें अशोक राजा झाला. राज्यपद मिळण्यापूर्वीं तो फार क्रूर व उग्रकर्मा होता. त्यामुळें बापास तो आवडत नसे. तक्षशिलेस झालेल्या बंडाचा मोड करण्याकरितां त्यास पाठविण्यांत आलें होतें. तें बंड त्यानें मोडलें. तेव्हां त्याला उज्जयिनी व तक्षशिला येथील सुभेदार नेमण्यांत आलें. राज्यावर आल्यानंतर चार वर्षांनीं त्याला राज्याभिषेक झाला. त्याला ९८ भाऊ-बहिणी होत्या असें म्हणतात! पुढें त्याचा उग्र स्वभाव चांगलाच निवळला.

सम्राट अशोक

२. कलिंगशीं युद्ध व उपरति :—सम्राट अशोक राज्यावर आला तेव्हां मगधचें साम्राज्य अफाट होतें. कलिंग देश मात्र पराभूत व्हावयाचा राहिला होता. तेव्हां तो प्रांत जिंकण्याकरितां त्यानें इ. स. पू. २६२ या वर्षी त्या प्रांताशीं युद्ध आरंभिलें. त्यांत कलिंग देशाच्या राजाचा पराभव झाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व कलिंग देश अशोकाच्या राज्यांत समाविष्ट झाला. या युद्धांत एक लाख मनुष्यें मारलीं गेलीं व तितकींच गुलाम करण्यांत आलीं. या भयंकर कृत्यामुळें अशोकाला मोठा पश्चात्ताप झाला. यापुढें युद्ध करावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें. त्याचप्रमाणें त्याला पूर्णपणें उपरति होऊन त्याचें क्रौर्य व त्याचा उग्र स्वभाव त्याला पार सोडून गेला. दया, क्षमा, शांति, सत्य, बंधुप्रेम यांनीं त्याचें मन पूर्ण व्यापून टाकलें. त्यानें अहिंसा धर्माचा स्वीकार केला, शिकार बंद केली व मांसाशनही करावयाचें नाहीं असें ठरविलें. अखेरीस त्याचा कल बौद्धधर्माकडे झुकूं लागला. त्यांतच त्यानें अनेक बौद्ध क्षेत्रांस भेटी दिल्या व शेवटीं त्यानें उघडपणें त्या धर्माचा स्वीकार केला. उपगुप्त हा त्याचा गुरु होता.

३. बौद्धधर्माचा प्रसार :—अशोकानें बौद्धधर्माचा स्वीकार केला ही गोष्ट अत्यंत क्रांतिकारक समजली जाते. कारण त्यामुळें बौद्धधर्माला राजाश्रय मिळाला व त्या धर्माचा जगभर फैलाव होण्यास मदत झाली. बौद्धधर्माचा स्वीकार केल्यानंतर अशोकानें त्या धर्माच्या प्रसाराकरितां जिवापाड मेहेनत घेतली. प्रथमतः त्यानें बौद्धधर्मीयांची पाटलीपुत्र येथें



धौली येथील अशोकाचा शिलालेख

धर्मपरिषद भरविली. प्रसिद्ध बौद्ध पंडित उपगुप्त हा त्या सभेचा अध्यक्ष होता. त्या सभेंत बौद्धधर्माच्या तत्त्वांची एकवाक्यता करण्यांत आली. आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्माच्या प्रसारार्थ त्यानें अनेक शिलालेख कोरले, स्तंभांवर धर्माज्ञा लिहून घेऊन ते स्तंभ ठिकठिकाणीं उभारले व अनेक गुहांमधूनही गुहालेख खोदविले. निरनिराळ्या तीर्थांच्या ठिकाणीं त्यानें स्तूपही बांधविले. अनेक ठिकाणीं त्यानें ८४ हजार बौद्ध विहारांची स्थापना केली. एवढेंच नव्हे, तर त्यानें बौद्धधर्माच्या प्रसारार्थ सुमारें ६४ हजार बौद्ध भिक्षूंची प्रचारक म्हणून योजनाही केली. या प्रचारकांनीं हिंदुस्थानभर प्रचार केला. एवढेंच नव्हे, तर चीन, जपान, सीरिया, इजिप्त, नेपाळ, सयाम, सिलोन वगैरे परप्रातांतही त्यांनीं बौद्धधर्माच्या प्रसाराचें काम केलें. मात्र आपल्या धर्माची त्यानें कोणावरही सक्ति केली नाहीं. परधर्मसहिष्णुतेच्या तत्त्वाचा त्यानें पूर्णपणें अंगिकार केला होता. अर्थात त्यानें वैदिक धर्माभिमान्यांना दुखविलें नाहीं. उलट तो त्यांस बौद्ध भिक्षूंप्रमाणेंच समानतेनें वागवी. यांतच त्याच्या मनाचा मोठेपणा दिसतो. त्याची बहीण संघमित्रा सिलोनांत धर्मप्रसारार्थ गेली होती.


सारनाथ येथील अशोकस्तंभावरील सिंह.

४. अशोकाची राज्यव्यवस्थाः— अशोक फार मोठ्या राज्याचा सम्राट होता. म्हैसूरच्या दक्षिणेकडील भागाशिवाय सर्व हिंदुस्थान त्याच्या राज्यांत मोडत होता. शिवाय हिंदुस्थानच्या वायव्येकडील खोतान प्रांतही त्याच्या राज्यांत असावा. आपल्या सबंध साम्राज्याचे त्यानें उज्जयिनी, कलिंग, म्हैसूर व तक्षशिला असे चार भाग केले. या प्रत्येकावर एकेक राजप्रतिनिधि नेम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेला होता. तो राजाला जबाबदार असे. ग्रामपंचायती व नगरसभा अनुक्रमें खेडीं व शहरें यांची व्यवस्था पहात. लोकांच्या धर्माचरणावर व वर्तनावर नजर ठेवण्याकरितां त्यानें धर्ममहामात्र, वचभूमिक व रज्जुक असे अधिकारी नेमले होते. ते लोकांस धर्मोपदेश करीत व त्यांस सन्मार्गावर आणीत. त्या सर्वांची एक सभाही त्यानें स्थापिली होती. त्यांत धर्मविषयांचा विचार होत असे. अशोक निःपक्षपातीपणानें न्याय देत असे. देहान्त शिक्षा त्यानें बंद केली होती. त्याच्या काळीं शिक्षणाचा प्रसारही चांगला झालेला होता. नालंद येथील विद्यापीठाला त्यानें सढळ हातानें मदत केली होती. अशोक स्वतः प्रजाहितदक्ष, धर्मशील व लोकप्रिय होता. लोककल्याणाकरितां तो अहर्निश झटे.

५. **लोकोपयोगी कामें :**—सर्व आयुष्यभर अशोक आपल्या प्रजेकरितां झटत होता. प्रवाशांच्या सोयीकरितां त्यानें रस्त्यांच्या दुतर्फा झाडें लाविलीं.



सांचीचा स्तूप.

ठिकठिकाणीं विहिरी व धर्मशाळा त्यानें बांधल्या. जागजागीं मठ ऊर्फ विहार बांधून धर्मोपदेशाचें काम तेथें चालावें म्हणून त्यांच्या खर्चाकरितां जमिनीही तोडून दिल्या. दीनदुबळ्यांच्या दुःखनिवारणाकरितां त्यानें रुग्णालयें बांधलीं. हीं रुग्णालयें केवळ मनुष्यांकरितांच नव्हतीं; पशूंकरितांही होतीं. औषधांचा पुरवठा योग्यरीतीनें व्हावा म्हणून त्यानें दिव्य वनस्पती व औषधी यांचे बागही ठिकठिकाणीं फुलविले. लोकांना धर्माज्ञा कळाव्या व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध धर्माचरणानें त्यांनीं वागावें म्हणून त्यानें अनेक स्तूप बांधले. स्तंभ उभारले व निरनिराळ्या प्रकारचे लेख लिहिले. काठेवाडांतील सुदर्शन सरोवराला धरण बांधण्याचें कामही त्यानें पुरें केलें. श्रीनगर व देवपाटण हीं नवीन शहरें त्यानें वसविलीं.

६. **अशोकाचे लेख:**—धर्माचा प्रसार व्हावा व लोकांनीं त्याप्रमाणें वागावें म्हणून अशोकानें अनेक प्रकारचे लेख निर्माण केले. त्याच्या एकंदर लेखांत स्तंभलेख, गुहालेख, शिलालेख, गिरीलेख वगैरे प्रकार आढळतात. या लेखांतून त्याच्यासंबंधीं व त्याच्या राज्यकारभारासंबंधीं माहिती मिळते. अनेकांवर त्याच्या धर्माज्ञा पाली भाषेंत लिहिलेल्या आहेत. लोकांनीं कसें



अशोकाचा शिलालेख

वागावें व धर्माचें आचरण कसें करावें हेंही या लेखांतून लिहिलेलें आढळतें. हे लेख हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत आढळतात. त्यावरून त्याच्या राज्याचा विस्तार सर्व हिंदुस्थानभर (दक्षिणेकडील थोडा भाग वगळून) होता हें सिद्ध होतें. आतांपर्यंत अशोकानें निर्मिलेले चौतीस लेख सांपडले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत स्तंभलेख सात असून शिलालेख चौदा आहेत. स्तंभलेख अजूनही उत्तम स्थितींत आहेत. त्यानें अनेक स्तूपही बांधले होते. सांची येथील स्तूप अतिशय मोठा व भव्य आहे.

७. **अशोकाची योग्यता** :—जगाच्या इतिहासांत अशोकाला फार उच्च स्थान आहे. आपल्या प्रजेच्या सुखाची त्याला एकसारखी तळमळ लागून राहिली होती. राजा असूनही तो एखाद्या भिक्षूसारखा रहात असे. राज्याचा लोभ त्याला कधींही शिवला नाहीं. बौद्धधर्माच्या प्रसाराच्या दृष्टीनें पाहतां गौतमबुद्धाच्या खालोखाल त्यालाच स्थान द्यावें लागेल. तो स्वतःला 'देवांचा लाडका' किंवा 'प्रियदर्शी' असें म्हणवून घेत असे. सर्वांच्या कल्याणाकरितां झटणें हेंच तो आपलें कर्तव्य समजत असे. प्राणिमात्राच्या ठिकाणीं भूतदया बाळगून तो वागे. मी दरबारांत, भोजनगृहांत, खाजगी खोलींत, अंतर्गृहांत, रथांत, कोठेंही असलों तरीही माझ्या नोकरांनीं माझ्या प्रजेच्या तक्रारी मला सांगितल्या पाहिजेत असें तो म्हणत असे. यावरून त्याचें प्रजाप्रेम निदर्शनास येतें. राजा या नात्यानें व बौद्धधर्माचा पुरस्कर्ता म्हणून त्याची कीर्ति अजरामर झाली यांत शंका नाहीं. तो निःपक्षपाती व परधर्म-सहिष्णु होता. त्यानें चाळीस वर्षें राज्यकारभार केला व तो इ. स. पू. २३२ व्या वर्षीं मृत्यु पावला.

८. **अशोकानंतर** :—अशोकाच्या मृत्यूनंतर त्याचा नातू संप्रति गादीवर आला. परंतु त्याच वेळीं अशोकाच्या साम्राज्याचे तुकडे होत होते. जलुक नामक अशोकाच्या मुलानें काश्मीर प्रांत जिंकला व तो तेथें स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. संप्रतीनें, मगध व त्याच्या लगतचे प्रांत अशोकाचा दुसरा मुलगा दशरथ याला दिले व तो स्वतः उज्जयिनीस राज्य करूं लागला. या विभागणीनें अशोकाच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. मध्यवर्ती असें मगधचें राज्यही लोप पावूं लागलें. तेथील गादीवर पुढें कांहीं राजे बसले; परंतु ते सर्व नालायक होते. त्याच काळांत परकीयांचे हल्ले हिंदुस्थावर येऊं लागले होते. ते परतवितां येईनासे झाले. शेवटीं मौर्य घराण्याची अखेर होण्याची वेळ आली. ब्राह्मणधर्मीयांचाही मौर्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्धधर्मीय धोरणास फार विरोध होऊं लागला. दक्षिणेकडील मांडलिकांनींही जोर धरला व त्यांनीं आपलें स्वातंत्र्य पुकारलें. अशा स्थितींत



मौर्य घराण्यांतील शेवटचा राजा बृहद्रथ याचा त्याच्या सेनापतीनें खून केला व मगधच्या गादीवर तो विराजमान झाला.(इ. स. पू. १८५). त्याचें नांव पुष्यमित्र शुंग. त्यानेंच शुंगवंशाची स्थापना केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. अशोकानें बौद्धधर्माचा स्वीकार कां केला? त्या धर्माच्या प्रसारार्थ त्यानें कोणकोणते उपाय योजिले?

२. अशोकाचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा.

३. बौद्धधर्माला अशोकानें राजाश्रय दिला ही गोष्ट क्रांतिकारक समजली जाते, ती कां?

४. चंद्रगुप्त व अशोक यांच्यांत चांगला कोण? कशावरून?

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—

उपगुप्त, सुसीम, संप्रति, अशोकाचे लेख व स्तंभ, कलिंग युद्ध.

६. वा. गो. आपटेकृत—अशोकाचें चरित्र व वा. ना. शहाकृत—सम्राट अशोक हीं पुस्तकें वाचा.

उतारे

१. सद्धर्मानें वागावें

प्रियदर्शी सम्राटानें राज्यारोहणानंतर आठ वर्षांनीं कलिंग देश जिंकला. त्यावेळीं त्यानें १,५०,००० लोक धरून नेले, १,००,००० लोक ठार झाले व पुष्कळसे बेपत्ता झाले. पण कलिंग देश राज्याला जोडल्यानंतर मात्र सम्राटानें धर्माचें पालन, त्यावर प्रेम व त्याचा प्रसार करण्यास सुरुवात केली. कलिंग युद्धाचा सम्राटाच्या मनावर परिणाम होऊन त्याला फार पश्चात्ताप झाला. यापुढें सदरहू युद्धांतील हालअपेष्टांच्या दशांश हालअपेष्टा जरी लोकांस झाल्या तरी सम्राटाच्या मनाला फार वाईट वाटेल. सम्राटाचा कोणीं अपराध केल्यास, सोसणें शक्य असल्यास, सम्राट तो सोसण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं. रानटी लोकांवरही सम्राटाची कृपा असून त्यांनीं सद्धर्मानें वागावें अशी त्याची इच्छा आहे. सर्व मानव प्राण्यांच्या अंगीं संयमन, मनःशांति व समाधान असावें असें सम्राटास वाटतें. धर्मानें मानवांचीं अंतःकरणें आपल्याकडे वेधून घेणें हाच खरा विजय होय.

—कलिंगयुद्धानंतरचा अशोकाचा शिलालेख.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. अशोकाची व्यवहारनीति

माझ्या राज्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं तसेंच प्रांतिक व तालुकानिहाय अधिकाऱ्यांनीं दर पांच वर्षांनीं कामाची तपासणी करण्याकरितां व धर्माचा प्रसार करण्याकरितां सर्व राज्यभर हिंडलें पाहिजे. हा धर्म म्हणजे पित्राज्ञापालन, दान, सदाचार, अहिंसा, भूतदया, मिताहार व विहार होय. धर्मदानासारखें दुसरें दान नाहीं. स्वधर्माविषयीं अभिमान व परधर्माविषयीं तिरस्कार असूं नये.

गेलीं अनेक वर्षें सर्व काळ प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐकून घेणें व प्रजेच्या हितसंबंधांकडे लक्ष देणें या गोष्टी घडल्या नाहींत. पण मीं आतां अशी व्यवस्था केली आहे कीं, जेवतांना, अंतःपुरांत असतांना, खासगी कामांत असतांना अगर कोठेंही असतांना अधिकाऱ्यांनीं आपापल्या कामासाठीं माझ्याकडे यावें; मी प्रजेचीं कामें पाहण्यास सर्वकाळ सिद्ध आहें. प्रजेला नेहमीं सौख्य होत असावें, यासाठीं मी माझ्या प्रयत्नांत मुळींच कसूर करणार नाहीं.

—अशोकाच्या शिलालेखावरून

३. धर्म म्हणजे काय ?

देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं, धर्म हा उत्तम आहे. पण धर्म म्हणजे काय ? धर्म हाच कीं पापापासून दूर रहावें; पुष्कळ चांगलीं कृत्यें करावीं; दया, दान, सत्य व पावित्र्य यांचें पालन करावें. मीं अनेकप्रकारें चक्षुदान (पारमार्थिक दृष्टि) केलें आहे. द्विपाद, चतुष्पाद, पक्षी व जलचर प्राण्यांवर मीं अनेकप्रकारें कृपा केली आहे. इतकी कीं, मी त्यांना प्राणदानही दिलें आहे. हा लेख मी अशाकरितां लिहिला कीं, लोकांनीं या उदाहरणाप्रमाणें वागावें व तें चिरकाल राहावें. जो याप्रमाणें वागेल तो पुण्यकृत्य करील.

—स्तंभलेखावरून

प्रश्न :—१. वरील तीन लेखांवरून बौद्धधर्माच्या कोणत्या तत्त्वांचा अशोकानें प्रसार केलेला दिसतो ?

२. अशोकाचें राज्यकारभाराचें धोरण कोणतें होतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श. इ. स. पू. ३२२–१८५.

हिंदुस्थान	वर्ष इ. स. पू.	जग–यूरोप.	प्रसिद्ध व्यक्ति
चंद्रगुप्त मौर्य राजा होतो.	३२२	या काळांतही इंग्लंड देश रानटी स्थितींत होता.	चाणक्य
सेल्यूकसची स्वारी व तह.	३०५		सेल्यूकस निकेटर
चंद्रगुप्ताचा मृत्यु.	२९८	युरोपांतील रोम व ग्रीस हीं राष्ट्रें पुढारलेलीं होतीं.	मेगॅस्थिनीस
बिंदुसाराचा मृत्यु. अशोक राजा.	२७३	फोनीशियन व कोर्थेजीनियन लोक पुढें सरसावले होते.	
कालिंगविजय व उपरति.	२६२		उपगुप्त
अशोकाचा मृत्यु.	२३२	मध्य युरोपांत मनुष्यें असल्याचा शोध लागला होता.	हॅनिबॉल
शेवटचा मौर्यराजा बृहद्रथ याचा वध.	१८५	चीन, इजिप्त, सीरिया वगैरे देश पुढारलेले होते.	कॅटो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. शुंग व कण्व राजवंश (इ. स. पू. १८५–२७).

१. शुंग राजवंश (इ. स. पू. १८५–७३) :— पुष्यमित्र शुंग यानें मौर्यांचा शेवटचा राजा बृहद्रथ याचा वध करून मगधचें राज्य मिळविलें व शुंग वंशाची स्थापना केली (इ. स. पू. १८५). तो वैदिक धर्माचा अभिमानी होता. शिवाची आराधना तो करीत असे. त्यानें बौद्ध लोकांचा फार छळ केला असा प्रवाद आहे. त्यानें अनेक बौद्ध मठ जाळले व बौद्ध भिक्षूंस ठार मारलें असें वर्णन बौद्ध ग्रंथांतून आढळतें. दक्षिणेस नर्मदा नदीपर्यंत व पश्चिमेस पंजाबपर्यंत त्याचें राज्य पसरलें होतें. प्रसिद्ध व्याकरणकार भगवान पतंजली हा त्याचा समकालीन होता. त्यानें 'पतंजल योगसूत्रें' हा मोठा अद्वितीय ग्रंथ लिहिला. पुष्यमित्राच्या वेळींच पुण्याजवळील भाजें व कालें येथील लेणीं बौद्धांनीं खोदलीं व अजिंठ्याच्या लेण्यांची खोदाई सुरू केली असें मानण्यांत येतें. इतरही अनेक लेणीं त्याच्या-वेळीं झालीं.

२. मिनांदरचा पराभव :— पुष्यमित्राच्या वेळीं काबूल व पंजाब प्रांता-वर मिनांदर ऊर्फ मिलिंद हा ग्रीक राजा राज्य करीत होता. तो बौद्धधर्मीय होता. मोठा तत्त्ववेत्ता म्हणूनही तो प्रसिद्ध आहे. 'मिलिंद प्रश्न' नामक एक तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ त्यानें लिहिला होता. तो बौद्ध लोक अजूनही फार मानतात. इ. स. पू. १७५ मध्यें मिलिंदानें पुष्यमित्राच्या राज्यावर झडप घातली व अयोध्येपर्यंतचा मुलूख त्यानें जिंकून बेचिराख केला. साकेत नगरीही त्यानें हस्तगत केली होती. सिंध, राजपुताना, पंजाब वगैरे प्रांत त्याच्या सैन्यानें जिंकून घेतले. पाटलीपुत्र नगरीवर स्वारी करण्याचा त्याचा विचार होता. इतक्यांत पुष्यमित्र त्याच्यावर चालून गेला. त्या लढाईंत मिनांदरचा पूर्ण पराभव होऊन त्याला परत जावें लागलें. तिकडेच तो पुढें मारला गेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. अश्वमेध यज्ञ :—राजा मिलिंद ऊर्फ मिनांदर याचा पराभव केल्यावर पुष्यमित्रानें सार्वभौमत्वाची खूण म्हणून प्राचीन परंपरेस अनुसरून अश्वमेध यज्ञ केला. अनेक राजे त्याच्या समारंभास हजर होते. भगवान पतंजलीही त्या समारंभास उपस्थित होता. पुष्यमित्रानें वैदिक धर्माचा अभिमान धरलेला पाहून कलिंग देशाच्या खरवेल या जैनमतानुयायी राजानें पुष्यमित्रावर स्वारी केली होती. परंतु पुष्यमित्रानें त्याचा पराभव केला. पुष्यमित्र शुंगानें सुमारें तीस वर्षें राज्य केलें. त्यानंतर तो इ. स. पू. १५५ मध्यें मरण पावला.

४. शुंगवंशाचा शेवट :—पुष्यमित्राच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अग्निमित्र मगधच्या गादीवर बसला. महाकवि कालिदास याच्या ' मालविकाग्निमित्र ' या नाटकांतील तो मुख्य नायक असावा असें मानलें जातें. आपल्या बापाच्या वेळीं त्यानें पुष्कळ पराक्रम केला होता. त्यानें सुमारें आठ वर्षें राज्य केलें. त्याच्यानंतर शुंगवंशांतील सुमारें दहा राजांनीं मगधवर राज्य केलें. त्या वंशांतील शेवटचा राजा देवभूमि अत्यंत दुर्व्यसनी होता. वसुदेव नामक त्याच्या प्रधानानें त्याचा खून करून मगधचें राज्य बळकावलें व तो मगधचा राजा झाला (इ. स. पू. ७३). अशातऱ्हेनें शुंगवंशाचा शेवट झाला.

५. कण्ववंश (इ. स. पू. ७३–२७):—वसुदेवानें कण्ववंशाची स्थापना केली. तो वैदिकधर्माचा अभिमानी होता. त्यानें व त्याच्या वंशजांनीं सुमारें पंचेचाळीस वर्षें राज्य केलें. याचवेळीं अनेक परकीय लोकांचे हल्ले हिंदुस्थानावर होऊं लागले. कण्ववंशांतील सुशर्मा नांवाचा राजा राज्य करीत असतां, आंध्र राजा सीमुख यानें मगधचें राज्य जिंकून आपल्या राज्यास जोडलें. कण्वराजे राज्य करीत असतांच सर्व हिंदुस्थानांत गडबड, गोंधळ व बजबजपुरी माजून राहिली होती. कण्ववंशाचा इ. स. पू. २७ मध्यें शेवट झाला.

६. ग्रीक लोक :—सिकंदरचा सेनापति सेल्यूकस निकेटर हा काबूलचा ग्रीक राजा, चंद्रगुप्त मौर्य याचा मित्र व नातेवाईक होता. तो मृत्यु पावल्यानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाल्क व पार्थिया हे त्याच्या राज्यांतील दोन प्रांत स्वतंत्र झाले. शक लोकांनीं बाल्क प्रांत जिंकून तेथून ग्रीकांना हांकून दिलें होतें. त्यानंतर पुढें बरींच वर्षें ग्रीक लोक पंजाबमध्यें लहान लहान राज्यांचे स्वामी होऊन राहिले होते. त्यांच्यापैकींच मिनांदर ऊर्फ मिलिंद हा बौद्धधर्मीय राजा होय. तो बलाढ्य होता. सियालकोट ही त्याची राजधानी होती. पुढें ग्रीक लोक हिंदु संस्कृतींत पूर्णपणें मिसळून गेले. हिंदुधर्मही त्यांनीं स्वीकारला होता. या ग्रीक लोकांसच हिंदु लोक 'यवन' या नांवानें संबोधीत.

७. पार्थियन लोक:—इराणच्या उत्तरेस पार्थिया नांवाच्या देशांत राहणारे लोक पार्थियन म्हणून ओळखले जात. ग्रीक लोकांपासून यांनीं आपलें स्वातंत्र्य मिळविलें होतें. त्यांचा पहिला राजा मिथ्रिडेटस् हा होय. त्यानें इ. स. पू. १३८ मध्यें पंजाब प्रांतावर स्वारी केली; व सिंधूनदापर्यंतचा भाग त्यानें आपल्या राज्यांत सामील केला. पुढें शक लोकांचे हल्ले हिंदुस्थानावर होऊं लागले. त्यावेळीं पार्थियन लोक शकांमध्यें हळूहळू मिसळून गेले. पार्थियन लोकांचाच 'पल्लव' या नांवानें उल्लेख होऊं लागला असें म्हणतात. यापुढें शक व यूची ऊर्फ कुशान लोक हिंदुस्थानावर स्वाऱ्या करूं लागले.

८ सीथियन ऊर्फ शक:—सीथियन ऊर्फ शक लोक मध्य आशिया व उत्तर यूरोप यांत भटकणाऱ्या अनेक जातींतील लोक होत असा समज आहे. कांहींच्या मतें ते चीनमध्येंही होते. भटक्या माराव्या, कसेंतरी पोट भरावें व कोठेंतरी रहावें हा त्यांचा मूळ धंदा. कृषिकर्म करून एके ठिकाणीं स्थाइक होणें त्यांस आवडत नसे. जनावरांचें मांस व घोड्याचें दूध त्यांस आवडे. तरवारीस ते देवता मानीत व तिला पशूंचा व युद्धकैद्यांचा बळी देत. पुढें हे लोक एकत्र वस्ती करून राहूं लागलें; व ते बॅक्ट्रिया व सीस्तान या प्रांतांमध्यें आले. तेव्हां त्यांचें पार्थियन लोकांमध्यें मिश्रण झालें. हे लोक पुढें हिंदुस्थानावर स्वाऱ्या करूं लागले.

अभ्यास

१. पुष्यमित्र शुंग याच्यासंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. मिनांदर, पार्थियन, ग्रीक, सीथियन वगैरेसंबंधीं थोडक्यांत हकीकत सांगा.

३. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा:—
राजा खरवेल, वसुदेव, निकेटर, मिनांदर, अग्निमित्र, सीमुख, बृहद्रथ, पतंजलि.

४. गौतमबुद्ध व सम्राट अशोक यांच्या चरित्रांसंबंधीं आलेख तयार करा. (अशा तऱ्हेचे आलेख पुढें अकबर अगर छत्रपति शिवाजी यांच्या चरित्रांसंबंधीं पुढें दिले आहेत ते पहा व मग वरील आलेख तयार करा).

५. सम्राट चंद्रगुप्त मौर्य व अशोक यांची तुलना करा. त्यांपैकीं तुम्हांस मोठा कोण वाटतो? कारणें द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. शक व कुशान राजे

१. शक व कुशान यांच्या हालचाली :—मौर्य साम्राज्य लयास जात होतें, त्या सुमारास मध्य आशियांत भयंकर घडामोडी चालू होत्या. शक नांवाचे रानटी लोक मंगोलियांत भटकत असत. त्यांना यूची लोकांनीं तेथून हुसकलें. त्यामुळें ते लोक खालीं बाल्क प्रांतांत शिरले. परंतु यूची लोकही मंगोलियांत कायमचे राहूं शकले नाहींत. हूण नांवाच्या दुसऱ्या एका रानटी लोकांनीं त्यांना तेथून हुसकून लावलें. यामुळें यूची लोक शकांच्या प्रांतांत शिरले व तेथून त्यांनीं शकांना हुसकलें. त्यावेळीं अफगाणिस्थानांत ग्रीक लोक होते. त्यांच्यावर हल्ला करून शकांनीं त्यांना पिटाळून लावलें. त्यामुळें अनेक ग्रीक लोक हिंदुस्थानांत शिरले. या सर्व रेटारेटीचा व्हावयाचा तोच परिणाम होऊन शक लोकांनीं पुढें बाल्क, अफगाणिस्थान व पंजाब प्रांतांवर स्वाऱ्या करून ते प्रांत जिंकले. इतकें होतें न होतें तोंच यूची लोकांची पुन्हां टोळधाड आली. तेव्हां शक लोक पुन्हां पंजाबमधून खालीं उतरले. अशा रीतीनें इ. स. पू. दुसऱ्या शतकांत शक लोकांच्या टोळ्यांनीं अफगाणिस्थान, काश्मीर, मथुरेपर्यंतचा हिंदुस्थान, माळवा, राजपुताना, सिंध व सौराष्ट्र येथें आपलीं निरनिराळीं राज्यें स्थापन केलीं. या प्रत्येक प्रांतावर त्यांचा एक अधिकारी असे त्याला 'क्षत्रप' असें म्हणत.

२. शकांची कामगिरी :—शक लोक हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं हिंदुधर्माचा स्वीकार केला. हिंदु संस्कृतीही त्यांनीं आत्मसात केली. एवढेंच नव्हे, तर हिंदुधर्माचा पुरस्कार व प्रसारही केला. हिंदुस्थानांतील लोकांशीं ते पूर्णपणें मिसळून गेल्यानें त्यांच्यांतील अडाणीपणा व रानटीपणा नष्ट झाला व त्यांच्यांत पुष्कळ सुधारणा झाली. शकांपैकीं जे लोक पंजाब, काशी, काश्मीर वगैरे भागांत होते त्यांनीं बौद्धधर्माचा स्वीकार केला व त्या धर्माच्या प्रसारास चालना दिली. शकांचा एक क्षत्रप नहपान हा मोठा सामर्थ्यवान होऊन गेला. त्याच्यानंतर त्याचा नातू रुद्रदमन हाही बलाढ्य होता. उज्ज-यिनी ही त्याची राजधानी होती. आंध्र प्रांताचा बलिष्ठ राजा पुळुयामी हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा जांवई होता. त्याच्यावरही त्यानें स्वारी केली. परंतु त्या स्वारींत त्याचा पराभव झाला. रुद्रदमनाचें राज्य सिंध, गुजराथ, माळवा, कोंकण वगैरे प्रांतांवर होतें. त्यानें गुजराथमधील पुष्कळ कालवे दुरुस्त केले व कांहीं नवे बांधले. शक लोकांच्या राज्याचा नाश पुढें चंद्रगुप्त विक्रमादित्य यानें इ. स. ४१० मध्यें कायमचा केला.

३. यूची ऊर्फ कुशान लोक:—शक लोकांना यूची लोकांनीं हुसकून दिलें होतें हें वर सांगितलेंच आहे. त्यांनाही हूण नांवाच्या रानटी लोकांनीं हुसकून लावलें. तेव्हां ते लोकही हळूहळू शक लोकांच्या मार्गानें आले व बाल्क प्रांतांतून शकांना हुसकून तेथें ते स्थाइक झाले. बाल्क प्रांतांत ते सुमारें शंभर वर्षें होते. परंतु तेथून त्यांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला. यूची लोकांचीच कुशान या नांवाची दुसरी एक टोळी होती. ती पुढें फार प्रबळ झाली. त्यामुळें यूची लोकांच्या सर्वच टोळ्यांस कुशान हें नांव मिळालें. कुशानांचा पहिला कडफायसिस हा पुढारी होता. त्यानें सर्व कुशानांचें एक मोठें राज्य स्थापिलें व तो त्यांचा राजा झाला. त्यानें नंतर काबूल, काश्मीर व इराणचा कांहीं भाग जिंकून घेऊन आपलें राज्य वाढविलें. तो इ. स. ७८ मध्यें वयाच्या ८० व्या वर्षी मृत्यु पावला. त्यानेंच 'संवत्' नांवाची कालगणना सुरू केली असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. नंतर त्याचा मुलगा दुसरा कडफायसिस हा कुशान राज्याचा राजा झाला. त्यानें इ. स. १०० मध्यें काशीपर्यंतचा बहुतेक सर्व पश्चिम हिंदुस्थान आपल्या राज्याखालीं आणला होता. त्यानेंच 'शालिवाहन शक' सुरू केला असें म्हणतात. चीनवरही त्यानें मोठ्या उत्साहानें स्वारी केली होती; परंतु त्याचा पराभव झाला. तो इ. स. १२० मध्यें मृत्यु पावला. तो हिंदुधर्माभिमानी होता.

४. राजा कनिष्क:—दुसऱ्या कडफायसिसनंतर कुशान टोळींतील एक पराक्रमी पुरुष त्याच्या गादीवर बसला. त्याचें नांव कनिष्क होय. तो इ. स. १२० मध्यें राजा झाला. पुरुषपुर ऊर्फ पेशावर हें त्याच्या राजधानीचें नांव होय. त्याच्या राज्याचा विस्तार फार मोठा होता. नर्मदेपर्यंतचा सर्व मुलूख त्याच्या ताब्यांत होता. पूर्वेस काशीपर्यंतचा प्रांतही त्याच्याच राज्यांत मोडत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. त्याशिवाय यारकंद, खोतान, काशगर वगैरे प्रांतही त्यानें जिंकून घेतले होते. या साम्राज्यविस्तारानें त्याचें समाधान झालें नव्हतें. यापेक्षांही जास्त



मुलूख जिंकण्याची त्याची इच्छा होती; परंतु त्याचे सैनिकच त्याच्या विरुद्ध उठले. त्यांनींच कनिष्काचा खून केला असें म्हणतात (इ. स. १६२). कनिष्क मोठा कर्तबगार, पराक्रमी व राजनीतिकुशल होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. कनिष्काची कामगिरी :—राजा कनिष्क याचें नांव इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे. तो बौद्धधर्माचा मोठा पुरस्कर्ता होता. बौद्धधर्माचा प्रसार करण्याचें कार्य त्यानें आजन्म केलें. त्यावेळीं बौद्धधर्मीयांचे अनेक पंथ निर्माण झाले होते व त्यामुळें बौद्धधर्माच्या तत्त्वांतही अनेक घोटाळे निर्माण झाले होते; हे दोष नाहींसे करावे या हेतूनें कनिष्कानें काश्मीरमध्यें कुंडलवन येथें एक मोठी धर्मपरिषद भरविली होती. त्या सभेंत 'बुद्धचरितम्' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिणारा अश्वघोष व वसुमित्र या बौद्धधर्माच्या प्रमुख नेत्यांनीं महत्त्वाचा भाग उचलला होता. अश्वघोष हा पुढें कनिष्काच्या पदरीं राहिला. या धर्मपरिषदेंत मोठी चर्चा झाली. तिच्या निर्णयावरून एक नवा बौद्ध धर्मपंथ निर्माण झाला. त्याला 'महायान' असें म्हणतात. या पंथानें मूर्तिपूजा मान्य करून बौद्धधर्मसंस्थापक गौतम बुद्ध यालाही देवस्वरूप दिलें. बौद्धधर्मग्रंथ संस्कृत भाषेंत करविण्यांत आले. कनिष्क स्वतः बौद्धधर्माचा अभिमानी असला तरी त्यानें धर्मसहिष्णुतेचें धोरण अंगिकारलें होतें; व त्याप्रमाणें तो इतर धर्मीयांस त्यांच्या मतांप्रमाणें वागूं देत असे. कनिष्कानें अनेक बांधकामें केलीं. त्यानें बांधलेला एक स्तूप नुकताच पेशावरजवळ सांपडला आहे. कनिष्काच्या महायान पंथांत मूर्तिपूजा शिरली, त्याचप्रमाणें अनेक धार्मिक विधि व मंत्रतंत्र शिरले. यामुळें तो पंथ पूर्वीच्या बौद्धधर्मीयांना मान्य नव्हता. त्यामुळें महायानपंथीय लोक पूर्वीच्या धर्मपंथास 'हीनयान' या नांवानें संबोधित. याप्रमाणें बौद्धांत महायान व हीनयान असे दोन पंथ निर्माण झाले.

५. कुशानसत्तेचा शेवट :—कनिष्कानंतर त्याचा मुलगा हुविष्क राज्यावर बसला. त्यानें आपल्या बापाच्या राज्याचें संरक्षण चांगलें केलें. परंतु त्याच्यानंतरचे राजे दुर्बल निघाल्यानें कुशान वंशाचा शेवट झाला. (इ. स. २२६); त्याच्यानंतर गुप्त राजे राज्य करूं लागल्यापर्यंतच्या इतिहासाची फारशी माहिती मिळत नाहीं. सर्व कुशान लोक तुर्क होते. ते हिंदुस्थानांत आल्यानंतर ते पूर्णपणें भारतीय संस्कृतींत मिसळून गेले. त्या राजांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानचा व्यापार जगभर पसरला. त्यांच्या कारकीर्दींत शिक्षणाचा प्रसारही मोठ्या प्रमाणावर झाला. तक्षशिला येथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक मोठें विश्वविद्यालय होतें. त्याला कुशान राजांनीं मोठमोठ्या देणग्या दिल्या. त्यामुळें शिक्षणाचें पाऊल पुढें पडलें. कुशानांनीं बौद्धधर्माला राजाश्रय दिल्यानें त्या धर्माचा प्रसार झाला. त्यांच्याच प्रयत्नांमुळें बौद्धधर्माचा चीन, तिबेट, सयाम, जावा, कांबोडिया वगैरे देशांत जोरदार प्रसार झाला. शिल्पकला उर्जितावस्थेस येऊन अनेक मोठ्या इमारती व लेणीं याच वेळीं निर्माण झालीं असें मानण्यांत येतें.


निष्काचा करंडक

६. आंध्रांचें राज्य :— उत्तर हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या घडामोडी होत होत्या त्यावेळीं दक्षिणेंतही लहानमोठीं राज्यें निर्माण झालीं होतीं. त्यांत आंध्राचें राज्य फार प्रबळ होतें. प्रथमतः आंध्र राज्य अनार्यांचें राज्य असें समजण्यांत येत होतें. मौर्यांच्या काळीं तें मौर्य साम्राज्यांत मोडत होतें; परंतु अशोकानंतर तें राज्य स्वतंत्र झालें. त्यावेळीं सातवाहनवंश आंध्र गादीवर होता; व सीमुख राजा राज्य करीत होता. त्याचा मुलगा शटकर्णी होय. या वंशांतील राजांस शालिवाहन अगर सातवाहन अगर आंध्रभृत्य असें म्हणत. आंध्रांचें राज्य पश्चिमेकडे पैठण-नाशिकपर्यंत व पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंत पसरलेलें होतें. सीमुख राजानेंच कण्ववंश नष्ट करून मगधचें राज्य पादाक्रांत केलें. त्याच वेळीं शक, यूची वगैरे परकीय लोकांच्या टोळधाडी हिंदुस्थानावर येऊं लागल्या. त्यामुळें त्यांच्यापासून हिंदुस्थानाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संरक्षण करण्याचें काम आंध्र लोकांना करावें लागलें. त्यावेळीं आंध्रांचा गौतमीपुत्र शालिवाहन (इ. स. १०६-१३०) हा मोठा पराक्रमी राजा



कार्ल्याच्या लेण्यांतील चैत्य

होऊन गेला. त्यानें शकांस थोपवून धरून त्यांना पार पिटाळून लावलें. पुढें त्यानें माळवा, राजपुताना, काठेवाड वगैरे देशही काबीज केले. त्याच्यानंतर त्याचा मुलगा पुलुयामी राजा झाला.

७. राजा पुलुयामी (इ. स. १३०-१५८) :—पुलुयामी हा मोठा प्रतापी व भाग्यवान राजा होऊन गेला. त्याच्या वेळीं रुद्रदमन हा शक लोकांचा क्षत्रप होता. त्याच्या मुलीशीं पुलुयामीचें लग्न झालें होतें. परंतु या संबंधानें शक व आंध्र यांच्या संबंधांत कोणताही फरक पडला नाहीं. उलट जोरानें रुद्रदमनानें आंध्रांच्या राज्यावर स्वारी केली. मात्र पुलुयामीनें त्याला दाद दिली नाहीं. या विजयानेंच पुलुयामीचें राज्य पैठण-नाशिक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पर्यंत पश्चिमेकडे पसरलें. पुलुयामीनें सुमारें तीस वर्षें राज्य केलें. त्याच्या मृत्यूनंतर आंध्र प्रांतांतील लष्करी अधिकारी स्वतंत्र झाले. त्यामुळें आंध्रांचें राज्य लौकरच संपुष्टांत आलें. आंध्र राजे हिंदुधर्मास व बौद्धधर्मास समानतेनें वागवीत असत.

८. वैदिक धर्मावर परिणाम:—शक, यूची, कुशान वगैरे लोकांनीं हिंदुस्थानावर हल्ले चढविले. ते लोक पुढें येथें राज्य करूं लागले. त्यांतच कुशान लोकांनीं बौद्धधर्माचा स्वीकार व नंतर प्रसार केला. त्यामुळें वैदिक धर्म मागें पडूं लागला. त्यावेळीं ब्राह्मणांनीं बौद्धधर्मांतील मूर्तिपूजा, देवळें बांधण्याची पद्धति, यात्रा करणें, विधींचें व मंत्रतंत्रांचें स्तोम न माजविणें वगैरे गोष्टी आपल्या धर्मांत समाविष्ट केल्या. त्यामुळें व शुंगवंशीय राजांच्या आश्रयामुळें तो धर्म तग धरून राहिला व पुढें फोफावला. तसेंच कात्यायन, पतंजली वगैरे भाष्यकार व व्याकरणकार निर्माण झाले. मनुस्मृति नामक, भृगु ऋषींनीं लिहिलेला, धर्मशास्त्रावरील ग्रंथ निर्माण झाला. शूद्रक, भास वगैरे संस्कृत नाटककार निर्माण झाले. चरक हा प्रसिद्ध आर्य वैद्य निर्माण झाला व त्यानें आर्य वैद्यकांवर सुश्रुत हा ग्रंथ निर्मिला. याज्ञवल्क्य, पाराशर, गर्ग्य वगैरे महान स्मृतिकार याच काळांत होऊन गेले. या काळीं संस्कृतशिवाय कांहीं प्राकृत भाषाही पुढारल्या. त्यांत महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पाली, पैशाची वगैरे प्राकृत भाषा लोकांत फार रूढ होत्या. बौद्धधर्माचें बहुतेक वाङ्मय प्राकृत भाषांच्याद्वारें–त्यांतल्या त्यांत पाली भाषेच्याद्वारें–झालें. त्याकाळीं बौद्धधर्माचा उत्कर्ष होत असला तरी बौद्ध व हिंदु हे दोन्ही धर्म आपापल्यापरी नांदत होते. त्यांच्यांत तेढ नव्हती. तरीही बौद्धधर्माला उतरती कळा लागली होती यांत शंका नाहीं.

अभ्यास

१. शक व कुशान लोकांसंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत सांगा.

२. कनिष्काचें चरित्र सांगून बौद्धधर्माच्या प्रसारार्थ त्यानें काय केलें तें सांगा.

३. शक व कुशान राजांच्या वेळीं हिंदुधर्म व बौद्धधर्म यांचा परस्परांवर काय परिणाम झाला ? हिंदुधर्माची सरशी होण्यास कोणतीं कारणें घडलीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
नहपान, रुद्रदमन, पुळुयामी, सीमुख, गौतमीपुत्र शालिवाहन, तक्षशिला, महायान, हीनयान, अश्वघोष, वसुमित्र, पहिला कडफायसिस.

५. रुद्रदमन, पुळुयामी व पहिला कडफायसिस यांच्यासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

कालादर्श—इ. स. पू. १८५—इ. स. १६२

हिंदुस्थान	वर्ष	जग—यूरोप	प्रसिद्ध व्यक्ति
पुष्यमित्र शुंग—शुंगवंश स्थापना	१८५ इ. स. पू.	इंग्लंडमध्यें रानटी लोक होते.	भगवान पतंजली,
मिनांदरची हिंदुस्थानावर स्वारी	१७५ इ. स. पू.		मिलिंद,
पुष्यमित्राचा मृत्यु—अग्निमित्रराजा	१५५ इ. स. पू.	रोमनांकडून कार्थेजचा नाश	खरवेल, देवभूमि,
		सीथियनांची पंजाबवर स्वारी १२५ इ. स. पू.	व्हर्जिल,
कण्व घराणें	७३—२७ इ. स. पू.		सीझर, ॲग्रिकोला,
	५५ इ. स. पू.	सीझरची इंग्लंडवर स्वारी. येशू ख्रिस्ताचा जन्म.	शलिवाहन,
विक्रम संवत सुरू	५७ इ. स. पू.		हॅड्रियन,
पहिल्या कडफायसिसचा मृत्यु	इ. स. ७८	ॲग्रिकोला इंग्लंडचा रोमन गव्हर्नर.	रुद्रदमन, अश्वघोष,
दुसऱ्या कडफायसिसचा मृत्यु	इ. स. १२०		वसुमित्र, कात्यायन,
कनिष्काचें राज्यारोहण	इ. स. १२०	हॅड्रियनची इंग्लंडला भेट.	शूद्रक, भास
पुळुयामी आंध्र राजा	इ. स. १३०-५८		चरक, भृगु
कनिष्काचा खून	इ. स. १६२		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. गुप्तवंश—सुवर्णकाळ.

१. पहिला चंद्रगुप्त (इ. स. ३२०–३३०):—शक, कुशान वगैरे लोकांचा हिंदुस्थानांत धुमाकूळ माजला, त्यावेळीं येथें एकही सामर्थ्यवान अशी सत्ता नव्हती. असल्यास तिच्यासंबंधाची फारशी माहिती मिळत नाहीं. आंध्रांनीं मगध देश काबीज केल्यानंतरही त्या देशासंबंधीं फारशी हकीकत उपलब्ध नाहीं. इ. स. ३०० च्या सुमारास इतिहासाचा थोडा धागा सांपडतो. त्यावेळीं मगध येथें गुप्तवंश स्थापन झालेला होता. त्या वंशाचा संस्थापक चंद्रगुप्त हा होय. त्याच्या बापाचें नांव घटोत्कच व आजाचें नांव श्रीगुप्त असें होतें. चंद्रगुप्त यानें वैशाली येथील राजाच्या कुमारदेवी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें होतें. गुप्तवंशीय राजे शूद्र जातीचे होते असें मानतात. त्यामुळें लिच्छवी घराण्याशीं त्यांची सोयरीक जमली. हा योग महत्वाचा मानला जातो. त्यामुळेंच गुप्तांना पुढें येण्यास अवसर मिळाला. चंद्रगुप्तानें आपल्या राज्याची सरहद्द पुष्कळ वाढविली. बहार, अयोध्या व तिरुहत हे प्रांत त्याच्या राज्यांत मोडत होते. तो स्वतःस महाराज म्हणवीत असे. त्यानें एक गुप्त-शकही सुरू केला होता. तो सन ३३० मध्यें मृत्यु पावला. तो हिंदुधर्माचा अभिमानी होता.



चंद्रगुप्ताचें नाणें. दोन्ही बाजू.

२. सम्राट समुद्रगुप्त (इ. स. ३३०–३७५):—गुप्तवंशाचा संस्थापक चंद्रगुप्त याला पुष्कळ मुलगे होते. परंतु आपल्या मागें समुद्रगुप्तानें राज्य करावें असें त्यानें ठरवून दिलें होतें. त्याप्रमाणें समुद्रगुप्त मगधचा राजा झाला. मौर्य घराण्यांतील राजांप्रमाणें आपलें साम्राज्य वाढवावयाचें अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची महत्त्वाकांक्षा होती. ती त्यानें पार पाडली. तो मोठा कुशल योद्धा होता. गादीवर येतांच त्यानें दिग्विजय करण्यास सुरुवात केली. थोड्याच वर्षांत कोसल, कलिंग, आसाम, मध्यप्रांत, माळवा, पंजाब, राजपुताना वगैरे अनेक प्रांत त्यानें जिंकले. काबूलपासून थेट आसामपर्यंत व नेपाळपासून कांजीवरमूपर्यंत सर्व प्रदेश त्याच्या साम्राज्यांत मोडत होता. त्याच्या या दिग्विजयानंतर त्यानें अश्वमेध यज्ञ केला. अश्वमेध यज्ञाच्या घोड्यामागून तो जाई. हा घोडा आसामच्या मुलुखांतून निघाला. नंतर हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यानें त्यानें आक्रमण करून नेलोरपर्यंत तो गेला. नंतर तो पश्चिम किनाऱ्यानें जाऊन माळव्याच्या बाजूनें मगधला गेला. जेथें जेथें तो गेला तेथील राजांनीं त्याचें मांडलिकत्व स्वीकारलें. त्याच्या दिग्विजयामुळेंच त्याला 'हिंदी नेपोलियन' असें म्हणतात. मात्र नेपोलियनप्रमाणें समुद्रगुप्त कमनशिबी नव्हता. ज्यांना ज्यांना त्यानें जिंकलें त्यांचें राज्य त्यानें त्यांस परत दिलें. सिलोनचा राजा मेघवर्मा त्याचा मित्र होता.

३. समुद्रगुप्ताची योग्यता:—समुद्रगुप्त मोठा विजेता होता असें नव्हे; तो थोर पंडित, कवि, गवई व उत्कृष्ट योद्धा होता. बहुगुणसंपन्न असा हा अष्टपैलू सम्राट हिंदुधर्माचा अभिमानी होता. तरीही त्यानें बौद्धधर्मीयांचा अगर इतरांचा छळ केला नाहीं. त्यानें मोठें साम्राज्य स्थापिलें; परंतु आपल्या मांडलिकांस तो मोठ्या योग्यतेनें वागवीत असे. त्याच्या वेळचीं अनेक नाणीं आजही उपलब्ध आहेत; त्याचे कांहीं शिलालेखही सांपडतात. त्यावरून त्याच्या संबंधाची पुष्कळ माहिती कळते. विद्वानांस तो चांगला आश्रय देत असे. प्रख्यात बौद्ध ग्रंथकार वसुबंधु त्याच्या आश्रयास होता. समुद्रगुप्तानें स्वतःही उत्तम संस्कृत ग्रंथ लिहिले होते. त्याचे वकील हिंदुस्थानाबाहेरील प्रांतांतही होते. तो इ. स. ३७५ मध्यें मृत्यु पावला.



समुद्रगुप्ताचें नाणें

४. सम्राट दुसरा चंद्रगुप्त (इ. स. ३७५–४१५):—समुद्रगुप्ताचा मुलगा चंद्रगुप्त हा त्याच्यानंतर गादीवर बसला. तोही मोठा शूर व प्रतापी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघाला. तो आपल्या बापासारखाच विद्वान, रसिक व कर्तबगार होता. राज्य चालविण्यास लागणारे शौर्य, धैर्य, पराक्रम, मुत्सद्दीपणा, धाडस, साहस, कामाचा उरक वगैरे अनेक गुण त्याच्या अंगीं होते. शकांचा त्यानें समूळ उच्छेद केला म्हणून त्याला 'शकारि' असेंही म्हणतात. 'विक्रमादित्य' हें नांव घेऊन तो राज्यावर बसला. आपल्या बापाचें देश पादाक्रांत करण्याचें धोरण स्वीकारून त्यानें शक लोकांवर प्रथमतः शस्त्र उपसलें. त्यावेळीं शकांचा प्रबळ राजा रुद्रसिंह हा होता. त्याचा पराभव करून चंद्रगुप्तानें माळवा, गुजराथ, काठेवाड, कोंकण वगैरे संपन्न देश आपल्या राज्यास जोडले. त्यामुळें भडोच, खंबायत, सोपारा वगैरे बंदरें त्याच्या राज्यांत सामील झालीं. या बंदरांतून परदेशांशीं मोठ्या प्रमाणावर व्यापार चाले. तोही त्याच्या ताब्यांत आला. शकांचें राज्य जिंकून त्यानें आपल्या कीर्तींत व संपत्तींत फार मोठी भर टाकली. त्यामुळें मगधचें ऐश्वर्य व सामर्थ्य वाढून चंद्रगुप्त ऐश्वर्याच्या शिखरावर पोहोंचला. शकांचें राज्य जिंकल्यामुळें त्या राज्याची विद्या, कला व संपत्ति यांची माहेरनगरी, उज्जयिनी, त्याच्या हातीं आली. तेथेंच त्यानें आपली दुसरी राजधानी स्थापन केली. चंद्रगुप्तानें पंजाब व बंगाल हे दोन्ही प्रांत जिंकून तेही आपल्या राज्यास जोडले.



दुसऱ्या चंद्रगुप्ताचें नाणें.

५. चंद्रगुप्ताची योग्यता :—चंद्रगुप्त हा सर्व गुप्त राजांत मोठा भाग्यशाली व पराक्रमी होता. त्यानें सुमारें चाळीस वर्षें राज्य केलें. तो थोडा कडक स्वभावाचा व मोठें साम्राज्य चालविण्यास सर्वथैव योग्य व लायक होता. तो स्वतः गुणी, संगीताचा शोकी, वाङ्मयाचा अभ्यासू, विद्वानांचा चाहता, कलाकौशल्याचा भोक्ता, न्यायी व उदार दाता होता. त्यानें आपल्या पदरीं अनेक विद्वान व गुणी लोक ठेवून घेतले होते. त्यांत कवि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुलमणि कालिदास होता. शाकुंतल, मालविकाग्निमित्र वगैरे नाटकें व रघुवंश, कुमारसंभव, मेघदूत वगैरे काव्यग्रंथ त्यानेंच लिहिले. मुद्राराक्षसाचा कर्ता विशाखदत्त, अमरकोश लिहिणारा अमरसिंह, प्रसिद्ध ज्योतिषी वराहमिहीर, वैय्याकरणी वररुचि, वैद्य धन्वंतरी, फलज्योतिषी क्षपणक, शिल्पकार शंकु, मांत्रिक वेतालभट्ट, घटकर्पूरक वगैरे प्रसिद्ध विद्वान् त्याच्या दरबारीं होते असें म्हणतात. त्यांस 'नवरत्नें' असें म्हणत. चंद्रगुप्त इ. स. ४१५ मध्यें मृत्यु पावला. इ. स. पू. ५७ मध्यें सुरू झालेला शक पुढें त्याच्या नांवानें सुरू झाला असें म्हणतात.

६. चिनी प्रवासी–फाहाएन :—चंद्रगुप्ताच्या वेळीं फाहाएन हा चिनी

किन्नरांचें आकाशभ्रमण—अजिंठा

प्रवासी हिंदुस्थानांत आला. तो सुमारें १०।१२ वर्षें हिंदुस्थानांत प्रवास करीत होता. बौद्धधर्माची माहिती मिळविण्याकरितां तो हिंदुस्थानांत आला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. त्यानें आपल्या प्रवासाचें वृत्त लिहून ठेवलें आहे. त्यावरून त्या काळची पुष्कळ मनोरंजक हकीकत कळते. तो म्हणतो कीं त्यावेळीं, " लोक समृद्ध व सुखी होते. त्यांना मॅजिस्ट्रेटपुढें हजर रहावें लागत नाहीं किंवा त्याचे कायदे पाळावे लागत नाहींत. जे लोक राजाची जमीन करीत त्यांनाच पट्टी द्यावी लागे. लोकांना केव्हांही व कोठेंही जातांयेतां येई. शिक्षा नव्हत्याच. गुन्हेगार सांपडलेच तर त्यांस फक्त दंड होई. क्रूर शिक्षा नव्हत्याच. भयंकर गुन्हा केला तरच गुन्हेगाराचे हात तोडले जात. राज्यांतील सर्व लोक पशुहत्या करीत नाहींत किंवा मद्य पीत नाहींत. दानधर्म विपुल चाले. राज-रस्त्यांवर अनेक धर्मशाळा असत. धर्मार्थ दवाखानेही होते. पाटलीपुत्र हें अत्यंत श्रीमंत लोकांनीं भरलेलें शहर होतें. बौद्धधर्म नष्ट झालेला नव्हता, तरी वैदिक धर्माचें वर्चस्व ठिकठिकाणीं दिसत होतें." या वर्णनावरून त्या वेळच्या लोकस्थितीची आपल्याला चांगली कल्पना येते.

७. गुप्तवंशाचा शेवट :—चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा कुमारगुप्त हा (सन ४१५–५५) राज्यावर बसला. कुमारगुप्तानें अश्वमेध यज्ञ केला होता. त्यानें नाना प्रकारचीं नाणीं पाडलीं होतीं. तो सन ४५५ मध्यें मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा स्कंधगुप्त (इ. स. ४५५–८०) मगधच्या गादीवर बसला. तो मोठा पराक्रमी होता. त्याच्या बापाच्या वेळीं अनेक शत्रु निर्माण झाले होते. त्यांचा त्यानें पराभव केला. त्याच्या कारकीर्दीतच हूण लोकांचे हल्ले हिंदुस्थानावर होऊं लागले. त्यांच्याशीं त्यानें घनघोर युद्ध करून त्यांची कंबर मोडली. स्कंधगुप्ताच्या वेळीं शांतता व सुबत्ता नांदत होती व शंभर राजांनीं त्याचें मांडलिकत्व पत्करलें होतें असें म्हणतात. जुनागड येथील तलाव त्यानें दुरुस्त केला असें म्हणतात (सन ४५८). पुढें हूण लोकांनीं त्याला पुन्हां घेरलें व त्याचा पराभव केला. स्कंधगुप्त सन ४८० मध्यें मरण पावला. त्याच्या मृत्यूबरोबरच गुप्तांचें वैभव लुप्त झालें असें मानण्यांत येते. त्याच्यानंतर अनेक गुप्त राजे झाले; परंतु ते नाममात्र होते. गुप्तांचीं लहान-मोठीं अनेक राज्यें पुढें सन ६०० पर्यंत अस्तित्वांत होतीं.

८. हूणांचा धुमाकूळ :—गुप्तांच्या वेळीं हूण नांवाच्या रानटी टोळ्यांनीं हिंदुस्थानावर हल्ले करण्यास सुरवात केली. हे लोक मध्य आशियांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहणारे भटके होते. त्यांना श्वेत हूण असेंही म्हणत. गांधार देश त्यांनीं उध्वस्त केला होता. ते फार क्रूर असत व जेथें जात तेथें जाळपोळ व



लुटालूट करीत. त्यांचा एक पुढारी तोरमण होता. त्यानें सन ५०० मध्यें माळवा प्रांत जिंकून घेतला होता. पंजाबांत त्यांनीं अनन्वित प्रकार करूनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्ध तक्षशिला विश्वविद्यालयाचा नाश केला, अनेक मंदिरें व मठ उध्वस्त केले, अनेकांस कंठस्नान घातलें व सर्वत्र धुमाकूळ माजवून दिला. तोरमण सन ५०२ मध्यें मृत्यु पावला. तेव्हां त्याचा मुलगा मिहिरगुल हूणांचा राजा झाला. त्यानेंही लोकांस सतावून सोडलें. मगधचा राजा बलादित्य यानें एकदां त्याच्यावर स्वारी केली व त्याला पकडलें. परंतु पुढें त्यानें त्याला सोडून दिलें. यामुळेंही त्यानें आपला स्वभाव सोडला नाहीं. तेव्हां त्याच्या त्रासांतून लोकांस सोडविण्याचें काम माळव्याचा यशोधर्मन यानें अंगिकारलें. आसपासच्या राजांचीं सैन्यें जमा करून तो मिहिरगुलवर चालून गेला. सन ५२८ मध्यें मंदोसर येथें मोठें युद्ध होऊन मिहिरगुलचा पराभव झाला. तेव्हां तो काश्मीरकडे पळून गेला. तेथें त्यानें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. तो सन ५४२ मध्यें मेला. यशोधर्मन यानें पुढें माळव्यांत मालववंश स्थापून तो तेथें राज्य करूं लागला. त्याचवेळीं भावनगरजवळ वल्लभी शहरीं वल्लभीवंश स्थापन झाला. त्यांतील राजे मोठे कीर्तिमान निपजले. त्यांस शिलादित्य असेंही म्हणत. हें घराणें पुढें २५० वर्षें टिकून होतें.

९. **गुप्तांचा काळ–सुवर्णयुग :**—गुप्तकाळाला ‘सुवर्णयुग’ असें म्हणतात; कारण त्या काळीं हिंदुस्थानची सर्वांगीण उन्नति होत होती. गुप्तराजे रसिक, नीतिमान, विद्वान, दीर्घायुषी व पराक्रमी निपजल्यामुळें त्यांच्या प्रजेस फार सुख झालें. विद्या, कला,. वाङ्मय, कलाकौशल्य, शास्त्रीय शोध, परदेशांशीं व्यापार वगैरे बाबतींत हिंदुस्थानांतील लोकांची प्रगति एकसारखी होत होती. त्यामुळें हिंदुस्थानची कीर्ति अजरामर झाली. त्यावेळीं एकछत्री अंमल असल्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत शांतता व सुराज्य नांदत होतें. यामुळेंच निरनिराळ्या कलांचा उत्कर्ष झाला. गुप्त राजांनीं वैदिक हिंदुधर्माला आश्रय दिल्यानें बौद्धधर्माला उतरती कळा लागली. त्यामुळें आधींच तेजस्वी असणारा हिंदुधर्म जास्त तळपूं लागला. हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन होऊन त्यांत विष्णु, शिव, देवी वगैरे देवदेवतांची पूजाअर्चा होऊं लागली. हिंदु देवदेवतांचीं देवळें बांधून त्यांची प्रतिष्ठापना व विधियुक्त पूजा सुरू झाली. इतर धर्मीयांची मात्र कोणत्याही प्रकारची गळचेपी झाली नव्हती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उलट ग्रीक, शक, कुशान, पार्थियन वगैरे परकीय लोकांना हिंदुधर्मांत घेण्यांत आलें. धर्मांतराचें हें उदाहरण अत्यंत नमुनेदार आहे. वैदिक हिंदु

कृष्ण व बलराम यांचें मुष्टिक व चाणूर यांशीं युद्ध.
पहारपूरचीं लेणीं–गुप्तकाळ.

धर्माप्रमाणेंच संस्कृत वाङ्मय व संस्कृत भाषा यांची अभिवृद्धि याच गुप्त-काळांत झाली. गुप्तराजे विद्वान व रसिक होते. त्यामुळें अनेक विद्वानांना त्यांचा आश्रय मिळत असे. त्यामुळें या काळांत उत्तम वाङ्मय निर्माण झालें. कालिदास, अमरसिंह, शूद्रक, दंडी, भास, भारवी वगैरे कवि व ग्रंथकार याच काळांत झाले. हिंदु धर्माला आधारभूत असलेलीं पुराणेंही याच काळांत झालीं. वाङ्मयाप्रमाणेंच ज्योतिष, फलज्योतिष, शिल्प, चित्रकला, गणित, संगीत, मूर्तिकला वगैरे शास्त्रांना थोर दर्जा याच काळांत प्राप्त झाला. बीजगणितकार आर्यभट्ट, वराहमिहिर, ज्योतिषी ब्रह्मगुप्त हे उत्तम ज्योतिषी त्यावेळीं होते. गुप्तकालीन शिल्प उच्च दर्जाचें होतें. त्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून सारनाथाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देऊळ, वेरूळचीं लेणीं, अजिंठ्याचीं लेणीं, नालंदचा ७०।८० फूट उंचीचा बुद्धाचा पुतळा, दिल्लीस समुद्रगुप्तानें उभारलेला लोखंडी स्तंभ वगैरे गोष्टी



सारनाथचा स्तूप.

त्या काळच्या शिल्पाचा उत्कृष्ट नमुना होय. यांशिवाय अनेक पुतळे, विहार, लेणीं, स्तूप वगैरेही त्यावेळच्या नक्षीकामाची, खोदकामाची अगर चित्रकलेची साक्ष पटवूं शकतील. लोक उत्तम व्यापारी होते. त्यामुळें अनेक परदेशांशीं हिंदुस्थानाचा संबंध आला होता. रोम, इजिप्त, सीरिया, इराण, चीन, मलाया, जावा वगैरे देशांतून व्यापाराचे मिषानें अगणित संपत्ति दरसाल हिंदुस्थानांत येत होती. त्यामुळें गुप्तकाळीं हिंदुस्थान देश अत्यंत भरभराटलेला होता यांत शंका नाहीं. लोकही समृद्ध व सुखी होते. चोऱ्या अगर मारामाऱ्या होत नसत. कोर्टकचेऱ्या झडत नसत. धर्मशाळा, अन्नछत्रें, रुग्णालयें गरिबांकरितां सदैव उघडीं असत. शिक्षा फारच सौम्य असत. अहिंसा, भूतदया व सदाचार यांचें सर्वत्र पालन होत होतें. धर्मच्छळ मुळींच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हता. एकंदरींत पाहतां गुप्तांची कारकीर्द लोकांना अत्यंत सुखावह गेली यांत शंका नाहीं. यामुळेंच त्यांच्या काळाला 'सुवर्णयुग' असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे.

अभ्यास

१. सम्राट समुद्रगुप्ताला 'हिंदी नेपोलियन' कां म्हणतात? त्याचें चरित्र व कामगिरी थोडक्यांत सांगा.

२. दुसरा चंद्रगुप्त ऊर्फ विक्रमादित्य यासंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत सांगा.

३. गुप्तकाळास 'सुवर्णयुग' असें कां म्हणतात?

४. हूण लोकांसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा. हिंदुस्थानांत इतर कोण लोक व ते केव्हां आले? त्यांची हकीकत वर्णा.

५. फाहाएननें हिंदुस्थानासंबंधीं कोणता अभिप्राय दिला होता?

कालादर्श—इ. स. ३२०–५४२

हिंदुस्थान	वर्ष	इंग्लंड—यूरोप	प्रसिद्ध व्यक्ति
पहिला चंद्रगुप्त.	३२०–३३०		
समुद्रगुप्त राज्याभिषेक	३३०	या काळांत इंग्लंडमध्यें	
समुद्रगुप्ताचा दिग्विजय	३५०	रोमन साम्राज्य होतें.	
समुद्रगुप्ताचा मृत्यु.	३७५		
चंद्रगुप्त-विक्रमादित्य.	३७५–४१५		फाहाएन, धन्वंतरी,
	४१०	रोमनांचा ब्रिटन त्याग.	कालिदास, विशाखदत्त
	४४९	इंग्लिशांचें इंग्लंडांत	अमरसिंह, वराहमिहर
श्वेत हूणांच्या स्वाऱ्या.	४५०	आगमन.	हेंजिस्ट–होर्सा,
तोरमणाचा मृत्यु.	५०२		
मिहिरगुलचा पाडाव	५२८	राजा आर्थर (५१६)	आर्यभट, आर्थर,
मिहिरगुलचा मृत्यु	५४२		जस्टीनियन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. कनोजचा हर्षवर्धन

१. वर्धनवंशाची स्थापना:—गुप्तसाम्राज्याच्या नाशानंतर उत्तरहिंदुस्थानांत अनेक लहान मोठीं राज्यें स्थापन झालीं. त्यांतच हूण लोकांनीं सर्वत्रांस नकोसें करून टाकलें. हूण लोकांचा पाडाव करण्यांत छोटीं-मोठीं राज्यें पडलीं होतीं. त्यांतच स्थानेश्वर येथील राजा प्रभाकरवर्धन हा होता. त्यानें स्थानेश्वर येथें सन ५८३ मध्यें आपल्या वर्धनवंशाची स्थापना केली. आदित्यवर्धन हा त्याचा बाप होय. मगधचा राजा महासेनगुप्त याची बहीण महासेनगुप्ता हिच्याशीं त्याचा विवाह झाला होता. प्रभाकरवर्धनानें हूणांचा पराभव केला, गांधार, सिंध, माळवा वगैरे देश जिंकले व स्वतःस राजाधिराज अशी पदवी घेतली. त्याच्या राणीचें नांव यशोमति असें होतें. ती माळव्याच्या यशोधर्म राजाची मुलगी होय. आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस प्रभाकरवर्धनानें हूणांचा पराभव करण्याकरितां आपला मुलगा राज्यवर्धन यास सैन्यासह पाठविलें होतें. त्याच्याबरोबर श्रीहर्ष हा त्याचा दुसरा मुलगा होता. प्रभाकरवर्धन आजारी पडल्याचें वृत्त कळल्यावर श्रीहर्ष परत आला. थोड्याच दिवसांनीं सन ६०५ मध्यें प्रभाकरवर्धन मृत्यु पावला व त्याची राणी सती गेली. त्यानंतर राज्यवर्धन स्थानेश्वरचा राजा झाला.

२. राज्यवर्धनाचा शेवट:—राज्यवर्धन राजा झाला त्याच सुमारास त्याच्या बहिणीच्या–राज्यश्रीच्या—नवऱ्याचा वध झाल्याची वार्ता त्याच्या कानीं आली. राज्यश्रीचा नवरा गृहवर्मा हा कनोजचा राजा होता. माळव्याचा राजा देवगुप्त यानें गौडदेशचा राजा शशांक याच्या मदतीनें कनोजवर स्वारी केली. गृहवर्म्याचा पराभव होऊन त्याला ठार मारण्यांत आलें व त्याच्या बायकोला–राज्यश्रीला–तुरुंगांत टाकण्यांत आलें. ही बातमी कळतांच राज्यवर्धनानें त्या दोघांवर सैन्यासह चाल करून त्यांचा पराभव केला. या विजयानंतर शशांक राजानें कपटानें राज्यवर्धनाला ठार केलें. ही बातमी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कळतांच श्रीहर्ष यानें आपला सेनापति भांडी यास शशांक राजावर स्वारी करण्याकरितां पाठविलें व तो स्वतः आपल्या बहिणीच्या शोधासाठीं निघाला.

३. राजा हर्षवर्धन :—राज्यवर्धनाच्या वधानंतर त्याचा धाकटा भाऊ श्रीहर्ष हा स्थानेश्वरचा राजा झाला (सन ६०६). त्यावेळीं त्याचें वय फक्त सोळा वर्षांचें होतें. तो राजा झाला त्यावेळची परिस्थिति किती बिकट होती हें वर सांगितलेंच आहे. भांडी या त्याच्या सेनापतीनें शशांक राजाचा पूर्णपणें पराभव केला व त्याला पिटाळून लावलें. हर्षानेंही आपल्या बहिणीस सोडवून आणलें. तेव्हां तिचें कनोजचें राज्यही हर्षाला मिळालें. यानंतर हर्ष राजा दिग्विजयाकरितां निघाला. मोठ्या सैन्याच्या मदतीनें त्यानें माळवा, गुजराथ, कामरूप, गौड, नेपाळ वगैरे देश जिंकून आपल्या राज्यांत समाविष्ट केले. सिंध, काश्मीर, पंजाब येथील राजांनीं त्याचें मांडलिकत्व स्वीकारलें होतें. थोड्याच दिवसांत बहुतेक सर्व उत्तरहिंदुस्थान त्याच्या साम्राज्यांत आला. मगधच्या गुप्त राजांप्रमाणें मोठें साम्राज्य स्थापन करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याप्रमाणें सुमारें ३७ वर्षें लढाया मारून हिमालयापासून नर्मदेपर्यंतचा मुलूख त्यानें संपादिला. दक्षिण जिंकण्याचा प्रयत्न केला होता तो मात्र फसला. त्यावेळीं महाराष्ट्रांत चालुक्य-वंशीय राजे राज्य करीत होते. हर्षाच्या वेळीं पुलकेशी हा राजा होता. सन ६२० मध्यें त्यानें हर्षाचा पराभव केला. त्यामुळें हर्षाचा दक्षिणेंत शिरकाव होऊं शकला नाहीं.

४. हर्षाची राज्यव्यवस्था :—कनोज ही हर्षाच्या राज्याची राजधानी होती. त्याचें राज्य बरेंच विस्तृत होतें. राजाला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां हर्षानें एक प्रधानमंडळ नेमलें होतें. तो स्वतः तीर्थाटन, शिकार, टेहेळणी, तपासणी वगैरेंच्या मिषांनीं आपल्या राज्यांत सदैव हिंडत असे. त्याची स्वारी मोठ्या डामडौलानें निघे. प्रत्येक प्रांतावर सुभेदार असे. प्रत्येक प्रांतांत स्वतंत्र सरकारी दफ्तर असे. भेटीच्या वेळीं तो आपल्या अधिकाऱ्यांच्या भेटी-गांठी घेऊन त्यांस सूचना देई व त्यांच्या कारभारावर कडक नजर ठेवी. त्याच्या लष्करांत हत्ती, रथ, घोडदळ व पायदळ असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चतुरंग दळ होतें. शेवटीं शेवटीं त्याच्या लष्करांत साठ हजार हत्ती, एक लक्ष घोडेस्वार व पन्नास हजार पायदळ होतें. कर फार थोडे होते. उत्प-



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्नाच्या फक्त एक षष्ठांश भाग जमिनीचा सारा म्हणून तो घेत असे. त्याचे कायदे कडक होते; परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र तो सौम्यपणें करीत असे. तरीही हातपाय तोडण्याच्या शिक्षा दिल्या जात. प्रवास करणें त्या काळीं सोपें नव्हतें. चोरां-चिलटांचा त्रास फार होत असे. एकंदरींत पाहतां त्याच्या वेळीं त्याची प्रजा सुखी होती.

५. बौद्धधर्माचा स्वीकार :—हर्ष राजा प्रथमतः हिंदुधर्माचा अभिमानी होता. त्याचा बाप व भाऊ हिंदुधर्माचेच होते. परंतु त्यांचा ओढा बौद्ध-धर्माकडे होता. राज्यश्रीला माळव्याच्या राजानें पळवून नेलें, त्यावेळीं दिवाकर मित्र या बौद्ध साधूनें तिचा प्रतिपाळ योग्यरीतीनें केला होता. राज्यश्रीबरोबर हर्षानें त्यालाही आपल्याबरोबर कनोजला नेलें होतें. त्याच्या संगतीनें व उपदेशानें हर्षानें बौद्धधर्माचा स्वीकार केला असावा. तरीही तो परधर्मसहिष्णु होता. हिंदुधर्मीयांचा व जैनधर्मीयांचा त्यानें कधींही छळ केला नाहीं. त्यांसही त्यानें त्यांच्या योग्यतेप्रमाणें वागविलें. त्यानें आपल्या राज्यांत हिंसा बंद केली, मोठमोठे विहार बांधले व बौद्ध भिक्षूंस मोठमोठ्या देणग्या दिल्या. कनोज येथें त्यानें एक मोठी धर्मपरिषदही भरविली होती. पुढें ही सभा दर पांच वर्षांनीं भरूं लागली. त्यावेळीं तो आपली सर्व संपत्ति दान करी. दरसाल प्रयाग येथें मोठा मेळावा भरवूनही तो दानधर्म करी. त्यामुळें त्याचें दातृत्व सर्वतोमुखीं झालें. हर्ष विद्येचा मोठा भोक्ता होता. त्याकरितांही तो अगणित पैसा खर्च करीत असे. त्या काळीं नालंद, कनोज, गया, प्रयाग वगैरे ठिकाणीं मोठमोठीं विश्वविद्यालयें होतीं व तेथें हजारों विद्यार्थी शिकत असत. नालंदचें विश्वविद्यालय फार पुरातन व नामांकित होतें. त्यांत दहा हजार विद्यार्थी होते. या सर्व विद्यालयांस हर्ष उदारपणें मदत करीत असे. हर्षानें अनेक पंडितांना आपल्या पदरीं आश्रय दिला होता. प्रसिद्ध 'कादंबरीचा' कर्ता बाणभट्ट हा त्याचाच आश्रित होय. हर्षाचें चरित्र त्यानें लिहून ठेविलें आहे. स्वतः हर्षाच्या नांवावर 'नागानंद' व 'रत्नावली' हीं नाटकें मोडतात. त्यावरून तोही मोठा संस्कृत पंडित असावा.

६. ह्यूएनत्संग :—हर्षाच्या वेळीं प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएनत्संग हिंदुस्थानांत प्रवास करीत होता. तो एका चिनी सरदाराचा मुलगा होता.

५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्धधर्माचा सूक्ष्म अभ्यास करण्याकरितां तो हिंदुस्थानांत आला. अस्सल बौद्धंधर्मग्रंथ मिळविणें हाही त्याचा दुसरा हेतु होता. सन, ६२९ च्या सुमारास तो इकडे आला. तो हिंदुस्थानांत ८।१० वर्षें प्रवास करीत होता.



हिंदुस्थानासंबंधीं त्यानें मोठी मनोरंजक हकीकत लिहून ठेविली आहे. त्यावरून त्यावेळची हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति कळून येते. हर्षाचीही त्यानें भेट घेतली होती. कनोज येथील एका धर्मपरिषदेच्या वेळीं तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हजर होता. त्यानें आपल्याबरोबर अनेक बौद्ध भिक्षू, मूर्ति व इतर वस्तू चीनमध्यें नेल्या. तेथें त्याचा फार मान झाला. त्यानें स्थापिलेलें चीनमध्यें एक बौद्धधर्मीय विद्यापीठ आहे. आजही तेथें त्याला फार मान देतात.

७. ह्यूएनत्संगाचें लोकवर्णन :—त्यावेळचीं शहरें मोठीं विस्तीर्ण असून त्याभोंवतालच्या भिंती रुंद व भक्कम होत्या. रस्ते अरुंद व त्रासदायक होते. सर्व रस्त्यांवर दुतर्फा दुकानें होतीं. भंगी, खाटीक वगैरे जातीचे लोक गांवाबाहेर रहात. लोकांचीं घरें विटांचीं असत. घरांच्या भिंतींना चुना लावीत असत. घरें कौलारू असत. तीं शेणानें सारवीत असत. भिक्षू मठांतून रहात असत. न शिवतांच ते कपडे वापरीत. कपडे रेशमी, तागी अथवा लोकरीचे असत. कपडे रंगविण्यांत येत नसत. ब्राह्मण व क्षत्रिय अत्यंत नम्र, सभ्य, साधे व प्रामाणिक होते. त्यांची राहणी खर्चिक नसे. श्रीमंत व्यापारी हातांत कडीं व गळ्यांत मौल्यवान कंठे घालीत. गरीब लोक अनवाणी चालत. ते आपले दांत रंगवीत. लोक शुद्धाचरणी असत. चांदी, सोनें, माती, लाकूड वगैरेचीं भांडीं ते नित्यव्यवहाराकरितां वापरीत. मातीचीं व लाकडाचीं भांडीं एकदां वापरल्यानंतर फेकून देण्यांत येत. वेदविद्येचें अध्ययन त्यावेळीं फार चाले. ब्राह्मण लोक अरण्यांत राहून अध्ययन करण्यांत स्वतःला धन्य समजत. स्तुति अगर निंदा त्यांस सारखीच वाटे. समाज अशा माणसास फार मान देई. हे लोक भिक्षा मागून राहत. त्यांस कितीही द्रव्य दिलें तरी ते तें घेत नसत. त्यांस राजाही फार मानी. लोक अत्यंत साधे व सदाचारी होते. ते लोकांस कधींही फसवीत नाहींत. पैशाच्या व्यवहारांत ते सचोटीनें वागत. बालविवाहाची चाल नव्हती. पुनर्विवाह गर्हणीय समजला जाई. सतीची व बुरख्याची चाल होती. स्त्रियांस समाजाकडून मान मिळे. लोक नानाप्रकारचीं औषधें घेत. ते मृतास जाळून टाकीत. कधीं कधीं आजारास कंटाळून लोक आपलें शरीर गंगेंतही फेंकून देत. दारू पिण्याची पद्धति त्यावेळीं होती. चातुर्वर्ण्य चालू होता; तरी अनेक जाती निर्माण झालेल्या नव्हत्या. सर्वत्र स्वातंत्र्य व संघटना यांचें राज्य चालू होतें.

८. हर्षाची योग्यता :—हर्ष राजा चाळीस वर्षें राज्य करून सन ६४७ मध्यें मृत्यु पावला. तो मोठा पराक्रमी, विद्वान, सदाचारी, परम न्यायी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्तव्यपरायण व दानशूर होता. अनेक आपत्तींशीं झगडून त्यानें आपलें राज्य वैभवाप्रत नेलें. त्या दृष्टीनें पाहतां येवढें मोठें राज्य संपादणारा तोच शेवटचा हिंदु राजा ठरतो. तो विद्वानांचा मोठा भोक्ता होता. बाणभट्टानें त्याचें चरित्र लिहिलें. त्याचप्रमाणें 'दशकुमारचरिताचा' कर्ता दंडी, 'नीतिशतकांचा' कर्ता राजा भर्तृहरी, 'वासवदत्तेचा' जनक सुबंधु, 'मयूर-शतकाचा' कर्ता मयूर, 'पंचतंत्राचा' कर्ता विष्णुशर्मा हे सर्व हर्षाच्या वेळीं होऊन गेले. हर्ष आपल्या प्रजेची फार काळजी घेई. त्याकरितां झोप व जेवण यांचीही त्यानें कधीं पर्वा केली नाहीं. तो अविश्रांत श्रम करी. त्याला कामाला दिवस अपुरा पडे. पांथस्थांकरितां त्यानें अनेक धर्मशाळाही बांधल्या होत्या. त्याची राजधानी कनोज ही त्यावेळीं मोठी धनसंपन्न व वैभवसंपन्न नगरी मानली जाई. हर्षानंतर त्याचें राज्य लौकरच मोडकळीस आलें.

अभ्यास

१. हर्षाचें चरित्र थोडक्यांत सांगून त्याच्या राज्यकारभाराचें वर्णन करा.
२. ह्यूएनत्संगासंबंधीं माहिती सांगा. त्यावेळच्या हिंदुस्थानच्या परि-स्थितीसंबंधींचा त्याचा अभिप्राय काय होता?
३. प्रभाकरवर्धन, राज्यवर्धन व राज्यश्री यांच्यासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.
४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा:—
शशांक, गृहवर्मा, महासेनगुप्त, आदित्यवर्धन, भर्तृहरी, बाणभट्ट, भांडी, दिवाकर मित्र, पुलकेशी, सुबंधू, मयूर, विष्णुशर्मा, दंडी.
५. चिं. वि. वैद्यकृत–मध्ययुगीन भारत, भाग १।२ वाचा.

उतारे

१. हर्षाचा राज्यकारभार

राज्यकारभार उदार धोरणाचा व बिनभानगडीचा असल्यामुळें राज्यांतील कुळांची नोंद करण्याचें कारण पडत नसे आणि वेठीचें काम व जादा करवसुली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांचीही आवश्यकता कोणाला वाटत नसे. करांचें प्रमाण हलकें व वेठीचा उपयोग क्वचित् होत असल्यामुळें जो तो आपला वडिलार्जित धंदा व संपत्ति सांभाळून रहात असे. शेतकरी लोक शेतीच्या उत्पन्नाचा षष्ठांश राजाला कराबद्दल देत आणि व्यापारी लोक नद्यांचे उतार आणि रस्त्यांचीं नाकीं या ठिकाणीं थोडाबहुत कर देऊन आपला धंदा चालवीत.

—ह्यूएनत्संगाच्या वर्णनावरून

प्रश्न :—१. राज्यकारभाराचें मुख्य धोरण कोणतें होतें? त्याचा फायदा कोणास होत असे?

२. जंगल व्यवस्था-वर्णन

दुसऱ्या गांवांतून लांकूडफाटें तोडण्यासाठीं आलेल्या लोकांच्या कुऱ्हाडी जंगल अधिकारी जबरीनें हिसकावून घेताहेत. या जंगलांत कोठें कोठें लहान लहान शेतें आहेत. तीं नांगरण्याचें काम शेतकरी स्वतःच हातकुदळीनें करिताहेत. ज्या जंगलांत पाणी मिळण्यासारखें नसे त्यांच्या तोंडाशीं लहानशी झोपडी बांधून त्यांत पाणपोई ठेवलेली असे....कांहीं ठिकाणीं मध गोळा करणारे लोक मध काढून त्यांचीं भांडीं डोक्यांवरून नेतांना दिसताहेत. कोणी मोराचीं पिसें तर कोणी मधाचीं पोळीं, कोणी खैराच्या साली तर कोणी दुसरा जंगली पदार्थ विकण्यासाठीं गांवांत घेऊन जाताहेत. कित्येक ठिकाणीं जंगली लोकांच्या बायका तेथील फुलें व फळें गोळा करून टोपल्यांतून गांवांत विक्रीसाठीं नेताहेत.

—बाणभट्टकृत हर्षचरितावरून

३. न्यायदान

स्पष्ट पुराव्याच्या अभावीं न्यायाधिशाला शंका उत्पन्न झाल्यास निवाडा देणें तो आरोपिताकडून कांहीं दिव्य करवून त्यावरून देण्यांत येई. हीं दिव्यें विशेषतः चार प्रकारचीं होतीं. जलदिव्य, अग्निदिव्य, तुलादिव्य आणि विषदिव्य. जलदिव्यांत आरोपीला एका पोत्यांत घालून आणि दुसऱ्या पोत्यांत जड धोंडा बांधून दोन्ही पोतीं एकत्र झुलवीत व खोल नदींत फेकून देत. धोंड्याचें पोतें तरंगलें व आरोपीचें बुडूं लागलें, तर आरोप सिद्ध झाला असें मानीत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्निदिव्यांत गुडघे टेकून तापलेल्या लोखंडावरून आरोपीला चालवीत, त्याच्या हातांत तापलेली सळई देत किंवा तापलेलें लोखंड त्याला चाटावयास लावीत. इजा झाल्यास अपराधी, न झाल्यास निर्दोषी असें समजण्यांत येई. तुलादिव्यांत आरोपीला तराजूच्या एका पारड्यांत बसवून दुसऱ्यांत धोंडा ठेवीव; जर धोंडा कमी भरला तर आरोप खोटा, नाहीं तर खरा, असें ठरविण्यांत येई. विषदिव्यांत मेंढ्याची तंगडी कापून तींत विष भरण्यांत येई व ती आरोपीला खाण्यास देण्यांत येई. अपराधी खरा असल्यास त्याच्यावर विषाचा परिणाम होईल, नसल्यास तो होणार नाहीं असें समजत.

—ह्यूएनत्संगाच्या वर्णनावरून

प्रश्न :—१. हर्षाच्या वेळीं शिक्षा किती प्रकारच्या होत्या ? त्या केव्हां देत ? तुलादिव्य म्हणजे काय ?

कालादर्श—इ. स. ५७०–६४७.

हिंदुस्थान	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
	५७०		
	५८३		
	५९७		
	६०५		
	६०६		
	६२०		
	६२९		
	६३२		
	६४७		

प्रश्न :—१. वरील कालादर्श पुरा करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. हर्षानंतरचा हिंदुस्थान

१. कनोजचें वर्म घराणें :—हर्ष राजाला मुलगा नव्हता. तेव्हां त्याचा प्रधान अर्जुन यानें त्याचें राज्य घेतलें. त्याच वेळीं चीनच्या बादशहाचें एक शिष्टमंडळ आलें होतें. त्याचा अर्जुनानें अपमान केला. ही गोष्ट झोंबल्यामुळें या मंडळाचा पुढारी वँग ह्यूएनट्से यानें सैन्य उभारलें, चिनी बादशहाची मदत घेतली व अर्जुनावर स्वारी केली. अर्जुन पकडला गेला. तेव्हां त्याला चीनला नेण्यांत आलें. त्यानंतर हर्षाचें राज्य समूळ नष्ट होऊन उत्तर हिंदुस्थानांत अनेक लहान लहान राज्यें स्थापन झालीं. हर्षाकडे त्याच्या बहिणीचें कनोजचें राज्य गेलें होतें. हर्षानंतर तें राज्य राज्यश्रीच्या वर्म वंशजांकडे गेलें. त्यांतील राजे कमकुवत निघाले. थोड्याच दिवसांत काश्मीरचा राजा ललितादित्य यानें कनोजचा राजा यशोवर्मा याच्यावर स्वारी केली. झालेल्या लढाईत यशोवर्मा मारला गेला. 'उत्तर-रामचरित्र' व 'मालतीमाधव' या नाटकांचा कर्ता भवभूति हा यशोवर्म्याच्या पदरीं होता. त्याला ललितादित्यानें आपल्याबरोबर काश्मीरला नेलें. यानंतर कनोजचें वर्म घराणें कसेंबसें आठव्या शतकाच्या अखेरपर्यंत कनोजला होतें.

२. एकछत्री राज्याचा अभाव :—हर्षानंतर सर्व हिंदुस्थानांत अनेक लहानमोठीं राज्यें निर्माण झालीं. कारण त्यावेळीं सर्वांना एकत्रित आणून त्यांच्यावर एकछत्री अंमल गाजविणारा कोणीही राजा निर्माण झाला नाहीं. मात्र जीं राज्यें होतीं तीं सुव्यवस्थित होतीं. त्यांतील कांहीं अशीं. काश्मीरला कर्कोटक वंशांतील राजे राज्य करीत होते. त्यांनीं सुमारें २५० वर्षें म्हणजे सन ६०२ पासून सन ८५६ पर्यंत राज्य केलें. नेपाळांत लिच्छवी राजवंश होता. माळव्यांत परमारवंशांतील राजे राज्य करीत होते. बंगाल्यांत पालवंश सन ११९७ पर्यंत होता. त्यानंतर तेथें सेन घराणें स्थापन झालें. या सेनांच्या आश्रयालाच गीतगोविंदाचा कर्ता जयदेव होता. राजस्थान ऊर्फ राजपुताना या भागांत हर्षानंतर अनेक रजपूत घराणीं उदयास आलीं. सिंध, काबूल, गांधार,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



प्राचीन प्रवासाचीं साधनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसाम वगैरे प्रांतांतही हिंदू राज्यें होतीं. दक्षिणेमध्यें, चालुक्यवंश, राष्ट्रकूटवंश, यादववंश वगैरे घराणीं निर्माण झालीं. त्यांची हकीकत पुढें दिली आहे. त्याशिवाय मदुरा ते त्रावणकोरपर्यंतच्या भागावर पांड्यवंशीय राजे राज्य करीत होते. चेर ऊर्फ केरळ येथील राज्य प्रसिद्ध होतें. चोलांचें राज्य प्राचीन होतें. तें मध्यंतरीं लुप्त झालें होतें; परंतु त्याची पुनः स्थापना झाली. पल्लवांचें राज्य कांची येथें स्थापन झालें होतें. हे पल्लव क्षत्रिय होते. त्यांचें राज्य सन ९०० पर्यंत होतें. याशिवायही दक्षिणेंत शंभरांवर लहान लहान पण स्वतंत्र राज्यें होतीं.

३. सामाजिक स्थिति :—त्यावेळीं जातिभेदानें तीव्र स्वरूप धारण केलें होतें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार मुख्य जाती होत्या. त्यांच्यामध्यें रोटी-बेटी व्यवहार चालेनासे झाले होते. क्वचित्प्रसंगीं भिन्न-जातीयांचा विवाह होत असे. स्मृतिग्रंथांच्या आधारानेंच लोकांच्या दररोजच्या आचारांचें नियमन होत असे. न शिवतांच कपडे वापरण्याची त्यावेळीं चाल होती. साधारणतः धोतर-उपरणें हा पुरुषांचा पोषाख होता. स्त्रिया विकच्छ लुगडीं नेसत. स्त्रियांस दागिन्यांचा फार शोक होता. प्रौढविवाह रूढ होता. पुनर्विवाह फारसा संमत नव्हता. सतीची चाल रूढ होती. मद्यपान पहिल्या तीन जातींत निषिद्ध मानलें जात असे. ब्राह्मणां-शिवाय इतर लोक मांसाशनही करीत असत. भूर्जपत्रें व ताम्रपत्रें यांचा लिखाणाच्या कामीं उपयोग करण्यांत येई. लोक प्रामाणिक होते. त्यामुळें गुन्हे जवळ जवळ होतच नसत. कायदेकानू मनुस्मृतीसारख्या स्मृती-प्रमाणें असत. खाटीक, मांग, अंत्यज वगैरेंना अस्पृश्य समजण्यांत येई. त्यांस शहराच्या बाहेर रहावें लागे. ब्राह्मण व क्षत्रिय यांसच वेदाधिकार होता; इतरांस नव्हता. या नियमाचें उल्लंघन झाल्यास तसें करणाराची जीभ छाटण्यांत येई.

४. हिंदुधर्माची सरशी :—हर्षाच्या काळीं उत्तर हिंदुस्थानांत बौद्ध मठ व विहार सर्वत्र होते. त्यावरून त्या धर्माचा त्या भागांत बराच प्रसार झाला होता हें उघड आहे. तरीही वैदिक हिंदुधर्माचा लोप झालेला नव्हता. एवढेंच नव्हे तर तो जोर धरून होता. आपला धर्म लोकप्रिय करण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुधर्माभिमान्यांनीं जोराचा प्रयत्न सुरू केला होता. मूर्तिपूजा, देव-देवता, समारंभ, महोत्सव, यात्रा वगैरेचा हिंदुधर्मांत प्रवेश झाल्यानें हिंदुधर्मांत नवें चैतन्य निर्माण झालें होतें. वैदिक धर्माचा प्रसार करण्याकरितां प्रचारकही निर्माण झाले होते. त्यांची व बौद्ध-धर्माच्या प्रचारकांची मोठी चुरस लागलेली असे. अनेक विषयांवर वादविवाद होत. त्यांत वैदिक धर्माचा विजय होई. बौद्धधर्माला राजाश्रय होता तोंपर्यंत त्या धर्माचा प्रसार मोठ्या झपाट्यानें झाला; परंतु तो नष्ट झाल्यावर त्या



भुवनेश्वरीच्या देवळावरील सुंदर खोदकाम

धर्माची पीछेहाट झाली. हर्षानंतर मात्र बौद्धधर्माला कायमची उतरती कळा लागून वैदिकधर्माला एकसारखें महत्त्व प्राप्त होऊं लागलें. थोड्याच दिवसांत हर्षानंतरच्या राजांनीं वैदिकधर्माचा पुरस्कार केला. त्यामुळें राजाश्रय प्राप्त झाल्याबरोबर वैदिक धर्मानें बौद्धधर्मावर मात केली व त्या धर्माची हिंदुस्थानांतून कायमची हकालपट्टी केली. खुद्द दक्षिण हिंदुस्थानांत हर्षाच्या वेळीं जैन मताचा फार प्रचार चालू होता. त्यामुळें बौद्धधर्माचा प्रसार दक्षिणेंत फारसा झालाच नाहीं. जैन व हिंदुधर्माभिमान्यांत सातव्या शतकापर्यंत दक्षिणेंतही मोठा झगडा माजला होता. परंतु अखेरीस हिंदुधर्मानें जैन मतावरही मात केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. **हिंदुधर्माचे प्रसिद्ध प्रचारक :**—बौद्धधर्माची पीछेहाट होण्यास अनेक हिंदुधर्मीय प्रचारकांचे परिश्रम कारणीभूत झाले. त्यांत कुमारिलभट्ट, रामानुज, शंकराचार्य वगैरे सुप्रसिद्ध आहेत. त्या सर्वांनीं बौद्ध व जैन धर्मावर प्रखर हल्ले चढवून ते धर्म नेस्तनाबूद केले व हिंदुधर्माला उज्ज्वल स्वरूप प्राप्त करून दिलें. (१) **कुमारिलभट्ट** सातव्या शतकांत होऊन गेला. त्याचा जन्म आसाम प्रांतांत झाला. त्याला कार्तिकस्वामीचा अवतार समजत. तो वैदिकधर्माचा जाज्वल्य अभिमानी, धुरंधर वादी व जाडा विद्वान होता. बौद्ध व जैन या धर्मांच्या अभिमान्यांशीं त्यानें वादविवाद करून त्यांचा पराभव केला. वेदांबद्दलचा आदर व वैदिक धर्मविधींबद्दलचा लोकांचा विश्वास त्यानें वाढविला. त्यामुळें वैदिक आचार-विचार पुन्हां सुरू झाले. जैन लोक त्याला पाण्यांत पहात. बौद्धधर्माभिमान्यांस तर तो सलत असे. (२) **रामानुजाचार्य**—सुमारें अकराव्या शतकांत हा मोठा नामांकित आचार्य होऊन गेला. विशिष्टाद्वैतमताचा त्यानें प्रसार केला. वैष्णवपंथाचा तो संस्थापक समजला जातो. जैनांशीं त्यानें वाद करून त्यांस जिंकलें. (३) **मध्वाचार्य**—बाराव्या शतकांत हा होऊन गेला. कर्नाटकांत याचा जन्म झाला. यानें द्वैतमताचा पुरस्कार केला. अनेक जैनांशीं वादविवाद करून त्यांचा त्यानें पराभव केला. त्यामुळें वैदिकधर्माचा तो मोठा मान्यवर प्रचारक समजला जातो.

६. **श्रीमत् शंकराचार्य :**—हिंदुधर्माच्या वरील सर्व प्रचारकांपेक्षां श्रीशंकराचार्यांची कामगिरी अति प्रसिद्ध आहे. केरळ प्रांतांत, नंबुद्री ब्राह्मणकुळांत, सन ७८८ मध्यें त्यांचा जन्म झाला. बालपणींच त्यांचे वडील मृत्यु पावल्यानें त्यांच्या आईनें त्यांचें संगोपन केलें. त्यांची बुद्धिमत्ता असामान्य व अलौकिक होती. विद्याध्ययनाकरितां त्यांनीं गोविंदाचार्य यांचें शिष्यत्व पत्करलें होतें. गृहस्थाश्रम न स्वीकारतां त्यांनीं संन्यास घेतला. अध्ययनानंतर ते काशीस गेले. तेथील पंडितांशीं वाद करून त्यांनीं त्यांस जिंकलें. त्यामुळें त्यांच्या बुद्धीची चमक सर्वांस पटली व त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. कुमारिलभट्टाचे मंडनमिश्र नामक शिष्य होते. ते कर्ममार्गाचा प्रचार करीत. त्यांस शंकराचार्यांनीं वादांत जिंकून ज्ञानमार्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व संन्यास यांचें श्रेष्ठत्व सिद्ध केलें. त्यानंतर शंकराचार्यांनीं सर्व हिंदुस्थानभर हिंडून ठिकठिकाणच्या पंडितांस जिंकलें. शांकरभाष्य हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. आपलें कार्य अखंड चालावें म्हणून त्यांनीं श्रीबद्रिकेदार, शृंगेरी, द्वारका व जगन्नाथपुरी या हिंदुस्थानच्या चार दिशेस आपले मठ स्थापिले. वयाच्या बत्तिसाव्या वर्षीं आचार्यांनीं आपलें अवतारकार्य संपविलें. ते शंकराचा अवतार होते असें समजतात.

श्रीशंकराचार्य

७. श्रीशंकराचार्यांची कामगिरी :– श्रीशंकराचार्य हिंदुधर्माचे आद्यप्रवर्तक समजले जातात. वैदिकधर्मावरील बौद्ध व जैनधर्मांचा प्रचंड हल्ला त्यांनीं परतविला. हिंदुधर्माची विस्कळित झालेली घडी त्यांनीं पुन्हां नीट बसविली. बौद्ध मतें त्यांनीं खोडून काढिलीं. संन्यास व अहिंसा हीं तत्त्वें लोकांस आवडत; हें पाहून त्यांनीं त्या मतांचा पुरस्कार केला, वेदांवरील लोकांचा विश्वास दृढ केला व वर्णाश्रमधर्मासंबंधीं लोकांचा आदर दृढ केला. त्यांच्या जोरदार हल्ल्यामुळेंच बौद्धधर्म समूळ नष्ट झाला. त्यांच्या या अद्वितीय कामगिरीबद्दल त्यांस 'जगद्गुरु' ही पदवी लोकांनीं दिली. हल्लींच्या हिंदुधर्माची विस्तृत, मनोहर व भक्कम इमारत त्यांनींच उभारली.

अभ्यास

१. हर्षानंतरच्या हिंदुस्थानाची सामाजिक व धार्मिक स्थिति वर्णा.
२. बौद्धधर्माचा पाडाव कां झाला? हिंदुधर्माची सरशी होण्याकरितां कोणीं कोणीं प्रयत्न केले?
३. श्रीशंकराचार्यांचें चरित्र थोडक्यांत सांगा: त्यांची कामगिरी वर्णा.
४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
अर्जुन, भवभूती, मध्वाचार्य, मनुस्मृति, जयदेव.
५. आठल्येकृत–आद्य शंकराचार्य, वैद्यकृत–मध्ययुगीन भारत हीं पुस्तकें वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्ययुगीन भारत

———:0:———

१३. रजपुतांचा उदय—कांहीं रजपूत राज्यें

१. रजपुतांची उत्पत्ति :—हर्षानंतर हिंदुस्थानांत अनेक राज्यें अस्तित्वांत आलीं. त्यांतील बहुतेक सर्व हिंदु अगर रजपूत राज्यें होतीं. या वेळेपर्यंत रजपुतांचा कोठेंही उल्लेख नसतां यावेळींच तो कां? असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें समाधानकारक उत्तर देणें जरा अवघड आहे. कारण रजपूत लोकांच्या उत्पत्तीबद्दल विद्वानांत ऐकमत्य नाहीं. युरोपियन इतिहासकार म्हणतात कीं, शक, हूण, कुशान वगैरे लोकांपासून त्यांची उत्पत्ति झाली. कांहीं हिंदी इतिहासकार म्हणतात कीं रजपूत हे मूळचे आर्य क्षत्रिय होत. बौद्धधर्माचा सर्वत्र फैलाव होत असतां, वर्णसंकराची भीति त्यांस वाटली व त्यामुळें अनेक क्षत्रिय राजस्थान ऊर्फ राजपुताना येथील डोंगराळ मुलुखांत लपून बसले. पुढें बौद्धधर्माची पीछेहाट होतांच हे सर्व लोक पुढें आले व सर्व हिंदुस्थानभर त्यांनीं आपलीं लहान लहान राज्यें स्थापिलीं. खुद्द रजपूत लोक आपल्याला महाकाव्यकालीन क्षत्रियांचे वंशज समजतात. अर्थात ते स्वतःस सूर्यवंशीय अगर चंद्रवंशीय समजतात. त्यांच्या उत्पत्तीचा प्रश्न थोडा बाजूस ठेवूनही आपल्याला असें म्हणतां येईल कीं, रजपूत खरे लढवय्ये क्षत्रिय व कडवे हिंदुधर्माभिमानी होते व आहेत. आठव्या व नवव्या शतकांत त्यांचा उदय झाला व त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर छोटीं राज्यें स्थापिलीं. त्यांतील कांहींचें वर्णन पुढें दिलें आहे.

२. रजपुतांचे स्वभावविशेष :—राजस्थान हें रजपुतांचें मुख्य आश्रयस्थान. ते आपणांस राजपुत्र अर्थात रजपूत असें म्हणवीत. त्यामुळेंच पुढें रजपूत असा शब्द रूढ झाला. रजपुतांचीं एकंदर ३६ कुळें असून त्यांपैकीं गुहलोत, चौहान, चालुक्य, वल्लभी, राष्ट्रकूट, राठोड, तोमार,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिहारी, बुंदेले, परमार, वाघेल, कर्कोट, पाल वगैरे प्रसिद्ध आहेत. रजपूत मोठे शूर, मानी व निधड्या छातीचे वीर होते. त्यांचा दिलदारपणा, निष्कपट वृत्ति, धीरोदात्त वर्तन, कडक स्वाभिमान व करारी बाणा यांची बरोबरी कोणाच्यानेंही होणार नाहीं. आपल्या कुळाचा व स्थळाचा त्यांस अत्यंत अभिमान असे. समरांगणांत पराक्रम गाजवावा व आपलें कुल पावन करावें असें त्यांस नेहमीं वाटे. समरांगणावर मरणें म्हणजे मोक्ष गांठणें होय व तेथून पळून जाणें म्हणजे नरकाची सोय करणें होय अशी त्यांची कल्पना होती. त्यांचा धर्माभिमानही मोठा कडवा असे. बेइमानीपणा त्यांस माहीत नव्हता. आपण दिलेला शब्द खरा करण्याकरितां ते जिवाचें रान करीत.

३. रजपुतांचें स्त्रीदाक्षिण्य :—त्यांचें स्त्रीदाक्षिण्य पराकोटीचें होतें. आपल्या स्त्रियांच्या अब्रूस ते अति जपत. त्यांच्या स्त्रियांकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची कोणाचीही प्राज्ञा नसे. त्यांच्या स्त्रियाही अत्यंत बाणेदार व वीरास शोभणाऱ्या कन्या असत. पराजयाचें चिन्ह दिसतांच रजपूत लोक आपल्या बायकामुलांस स्वहस्तें ठार मारून संग्रामांत घुसत व प्राण-त्याग करीत. आपल्या पातिव्रत्यरक्षणार्थ व आपल्या अब्रूचे धिंडवडे होऊं नयेत म्हणून रजपूत स्त्रिया 'जोहारास' नेहमीं तयार असत. जोहार म्हणजे स्वतःस जाळून घेणें. सर्वक्षय होण्याचें दिसतांच रजपूत वीर, केशरी रंगाचा पोशाख करून, मारीन किंवा मरेन या भावनेनें समरांगणीं दाखल होत. यावरून त्या पद्धतीस 'केसरिया' असें म्हणत. अनेक गुण अंगीं असूनही अंतःकलह, आपापसांतील वैर, युद्धकलेचें अज्ञान, घरभेदेपणा, व्यवहार-कुशलता व राजकारणकुशलता यांचा अभाव, भोळेपणा वगैरेमुळें मुसल-मानांपुढें रजपुतांस हार खावी लागली.

४. रजपुतांचे भाट :—रजपूत लोक आपल्या पदरीं अनेक भाट ठेवीत असत. राजांच्या पराक्रमांचें कवितावद्ध वर्णन करून तें स्वतः दरबारांत म्हणून दाखविणें हें त्यांचें काम. हे भाट अत्यंत विश्वासू व प्रामाणिक असत. वीरांना प्रोत्साहन देणें, राजवंशाची कीर्ति आपल्या काव्यानें वाढविणें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परदरबारीं वकिली करणें, कोणास जामीन राहणें वगैरे त्यांचीं कामें होतीं. त्यांस कोठेंही आडकाठी नव्हती. राजांकडून त्यांना देणग्या मिळत व त्यांचा मानमरातबही होई. पुढें भाटांची एक जातच बनली. रजपुतांच्या पडत्या काळांत भाटांची दुर्दशा झाली. चंदभाट, भूषणभाट, गंगभाट वगैरे कांहीं भाट फार प्रसिद्ध आहेत. चंदवरदाई भाट पृथ्वीराजाच्या पदरीं होता. त्यानें 'पृथ्वीराजरासा' नामक काव्यग्रंथ लिहिला. तो फार प्रसिद्ध आहे.

५. कनोजचे प्रतिहारी :—कनोज येथें हर्षानंतर वर्मघराणें स्थापन झालें होतें. त्याचवेळीं गुजराथमध्यें गुर्जरांनीं स्थापन केलेलीं अनेक लहान लहान राज्यें होतीं. हर्षानें त्या सर्वांस जिंकलें होतें; परंतु त्याच्यानंतर त्यांनीं आपलें स्वातंत्र्य परत मिळविलें. त्यावेळीं भिनमल येथें गुर्जरवंशीय राजा राज्य करीत होता. त्याचा अंमल दक्षिण राजपुतान्यापर्यंत होता. पुढें अवंतीचा राजा नागभट्ट यानें भिनमलच्या राजाचा पराभव केला व त्याचें राज्य काबीज केलें (सन ७२५). हा नागभट्ट प्रतिहारी वंशाचा संस्थापक समजला जातो. पुढें त्याचा नातु नागभट्ट यानें सन ८१६ च्या सुमारास कनोजचें राज्य काबीज केलें. या नागभट्टाच्या राज्याचा विस्तार पुष्कळ मोठा होता. तो सन ८३२ मध्यें मृत्यु पावला व त्याचा मुलगा रणभद्र गादीवर आला. रणभद्राचा मुलगा मिहिर ऊर्फ भोजराजा सन ८४० मध्यें गादीवर बसला. त्यानें सुमारें पन्नास वर्षें राज्य केलें.

६. राजा भोज (सन ८४०-८९०) :—रणभद्र गादीवर असतांच प्रतिहारांच्या राज्यावर स्वकीय व परकीय शत्रूंचे हल्ले होऊं लागले होते. ते भोजानें परतवून लावले; व आपलें राज्य सुसंघटित केलें. एवढेंच नव्हे तर त्यानें उत्तर हिंदुस्थानांतीलही बराच मुलूख काबीज केला होता. त्यावेळीं बंगालचा राजा देवपाल यानें भोजावर स्वारी करून त्याचा पराभव केला व त्याला आपलें मांडलिकत्व स्वीकारावयास लाविलें. दक्षिणेंतील राष्ट्रकूटही त्याच्या राज्यावर स्वारी करीत. परंतु पुढें देवपाल वारल्यावर भोजानें आपल्या मागील पराभवाचें चांगलें उट्टें काढून घेतलें. त्यानें बंगाल प्रांतावर स्वारी केली व तेथें मोठे विजय संपादिले. याच वेळीं दक्षिणेंतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राष्ट्रकूटांचाही त्यानें पराभव केला. कनोज ही त्याच्या राज्याची राजधानी होती. त्याच्या राज्यांत काश्मीर व सिंध या प्रांतांशिवाय बाकीचा बहुतेक सर्व उत्तर हिंदुस्थान मोडत होता. मगध देशही त्याच्या राज्यांत होता. त्याचें सैन्य फार उत्तम होतें. त्याची राज्यव्यवस्थाही उत्तम होती. त्याच्या राज्यांत चोरांचिलटांचा उपद्रव होत नसे. भोजराजा मोठा श्रीमंत होता. तो विद्येचा भोक्ता व पंडितांचा चाहताही होता. प्रसिद्ध कवि राजशेखर त्याचा आश्रित होता. भोज हिंदुधर्माचा कट्टा अभिमानी होता. त्याच्या काळीं विद्या, कला व संपत्ति यांची फार भरभराट झाली. भोजराजा सन ८९० मध्यें मृत्यु पावला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा महेंद्रपाल कनोजचा राजा झाला. त्याचा मुलगा महीपाल राज्य करीत असतांच राष्ट्रकूटांचा राजा तिसरा इंद्र यानें कनोजच्या प्रतिहारांचा पराभव केला. यापुढें सुमारें १०२० पर्यंत कनोजचें राज्य कसेंबसें टिकलें. त्यावेळीं गझनीच्या महमुदानें कनोजच्या राज्याचा नाश केला.

७. कनोजचा राठोड वंश :—प्रतिहारींचें राज्य नष्ट झाल्यावर राठोड राजांनीं आपली सत्ता कनोजला स्थापिली. या वंशांत जयचंद राठोड हा फार प्रसिद्धी पावला. दिल्लीच्या पृथ्वीराज चव्हाणाचा तो मावसभाऊ होता. याचीच मुलगी संयुक्ता होय. तिला पृथ्वीराजानें स्वयंवरप्रसंगीं पळवून नेलें. त्यामुळें जयचंद व पृथ्वीराज यांच्यांत आणखी वांकडें आलें. पुढें या घराण्यांतील लोकांनीं कनोज ही राजधानी सोडून देऊन जोधपूर येथें आपली राजधानी नेली. तेथें त्यांची फार भरभराट झाली.

८. मेवाडचे गुहलोत :—मेवाडचें घराणें सर्वांत प्राचीन व उच्च मानलें जातें. श्रीरामचंद्राचा वंशज कनकसेन हा या घराण्याचा मूळ संस्थापक समजला जातो. त्यानें सन १४५ मध्यें काठेवाडांत प्रथम आपलें राज्य स्थापलें. तेथेंच या वंशांतील राजे सुमारें २००–२५० वर्षें राज्य करीत होते. सन ५२८ मध्यें शिलादित्य या त्यांच्या वंशजाचा हूणांनीं पराभव केला व त्याला ठार मारलें. त्याची राणी पुष्पावती हिला एका गुहेंत पुत्र झाला. त्याचें नांव गुहलोत. त्याच्या नांवावरून त्याच्या वंशाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'गुहलोत' असें नांव मिळालें. गुहलोत यानें ईदर येथें राज्य स्थापिलें होतें. त्यानंतर पुढें सन ७२८ च्या सुमारास गुहलोत घराण्यांतील बाप्पा रावळ यानें मेवाड येथें नवें राज्य स्थापिलें. बाप्पा रावळ हाच मेवाडच्या राज्याचा संस्थापक समजला जातो. तो मोठा पराक्रमी होता. त्याच्या वेळीं मोहंमद बिन कासीम यानें सिंध प्रांतावर स्वाऱ्या केल्या. त्याच्या आक्रमणास बाप्पा रावळनें चांगलाच पायबंद घातला; व त्याला व अरबांना त्यानें सिंधप्रांतांतून हुसकलें. तो सन ७६३ मध्यें मृत्यु पावला. त्याच्यानंतर बऱ्याच वर्षांनीं सन ११४० मध्यें समरसिंह मेवाडच्या गादीवर बसला. तो पृथ्वीराज चव्हाणाचा मेहुणा होता. मेवाडच्या घराण्यांतच पुढें राणा संग, राणा प्रताप, भीमसिंह, पद्मिनी वगैरे स्त्रीपुरुष नांवलौकिकास चढले.

९. **धारचे परमार (पवार)**:—धारचे परमार अग्निकुलोत्पन्न क्षत्रिय रजपूत होत. उपेंद्र ऊर्फ कृष्णराज हा या घराण्याचा मूळ संस्थापक होय. त्यानें सन ९१४ मध्यें कनोजचें स्वामित्व झुगारून धार येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें. यानंतर या घराण्यांतील मुंज राजा (९७४–९९५) चालुक्यांवरोबर झगडला. परमार वंशांतील भोजराजा फार प्रख्यात होऊन गेला (१०१०–१०६०). तो मोठा चतुरस्र होता. त्याला अनेक शत्रूंशीं झगडावें लागलें. त्यांतच त्याचा अंत झाला. त्याच्यावेळीं संस्कृत भाषेचा उत्कर्ष झाला व अनेक पंडित व नामांकित ग्रंथकार उदयास आले. धार येथें त्यानें एक विश्वविद्यालयही स्थापिलें होतें. तो पराक्रमी, बुद्धिवान व प्रतापी होता. त्याच्यानंतर दिल्लीच्या तोमार व चव्हाणांनीं त्याचें राज्य ग्रासलें.

१०. **दिल्लीचे तोमार व अजमीरचे चव्हाण**:—सन ९९३ च्या सुमारास दिल्लीस तोमारवंशीय राजे राज्य करूं लागले. त्यांनींच दिल्लीची स्थापना केली असें म्हणतात. तोमारवंशीय राजांनीं दिल्लीस सन ११७० पर्यंत राज्य केलें. त्या वर्षीं अनंगपाळ हा दिल्लीचा राजा निपुत्रिक वारला. तेव्हां त्याच्या मुलीच्या मुलास–पृथ्वीराज चव्हाण यास–दिल्लीचें राज्य मिळालें. चव्हाणवंशीय राजांनीं सांबरसरोवरालगतच्या प्रदेशांत आपली सत्ता स्थापन केली होती. या चव्हाणांनीं दिल्लीच्या तोमारांवर अनेक स्वाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केल्या होत्या. या वंशांतील पृथ्वीराज हा महापराक्रमी राजा होता. त्यांलाच वर सांगितल्याप्रमाणें दिल्लीचें राज्य मिळालें. पुढें त्याचा खून झाल्यानें दिल्लीचें व अजमीरचें राज्य मुसलमानांनीं जिंकलें.

११. इतर रजपूत राज्यें :—वरील रजपूत राज्यांशिवाय जेजांभुक्तीचें चंदेल घराणें बुंदेलखंडांत होतें. या कुळांतील धंग राजा (सन ९५५–१०००) हा मोठा राजा होऊन गेला. त्यानंतर सन १२०३ मध्यें तें राज्य बुडालें. अंबेर ऊर्फ जयपूरचें कच्छवाह घराणेंही मोठें होतें. कलचुरीचें चेदीघराणेंही महत्त्वाचें मानलें जातें. गुजराथचें सोळंखी घराणें प्रसिद्ध आहे. हीं दोन्ही घराणीं मुसलमानांनीं बाराव्या शतकांत नष्ट केलीं.

अभ्यास

१. रजपुतांची उत्पत्ति कशी झाली ? त्यांच्या स्वभावाचें वर्णन करा.

२. जोहार, केसरिया व भाट यांसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

३. प्रसिद्ध रजपूत घराण्यांची थोडक्यांत माहिती द्या.

४. खालील लोकांसंबंधीं माहिती सांगा :—

धारचा भोज राजा, पृथ्वीराज चव्हाण, चंदवरदाई, कनोजचा भोज राजा, बाप्पा रावळ, गुहलोत.

५. हिंदुस्थानचा नकाशा काढून त्यांत निरनिराळीं रजपूत राज्यें दाखवा.

६. वैद्यकृत–मध्ययुगीन भारत, लोकहितवादीकृत–राजस्थानचा इतिहास, ह. वा. देशपांडेकृत–‘ रजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास ’ व ‘ रजपूत संस्कृति ’ हीं पुस्तकें वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—इ. स. ६००–१२०५

हिंदुस्थान	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
राजा हर्ष	६०६–६४७		हर्ष, भवभूती
दुसरा पुलकेशी	६०८–६४२		बाणभट्ट
मोहंमद पैगंबराचें पलायन	६२२		ह्यूएनत्संग
मोहंमदाचा मृत्यु	६३२		कुमारिलभट्ट
नृसिंहवर्म्याकडून पुलकेशीचा पराभव	६४२	व्हिटबीची धर्मसभा (६६४)	
चालुक्य राजा विक्रमादित्य	६५५		भूषणभाट
मोहंमद बिन कासीमची हिंदु. स्वारी	७१२		
बाप्पारावळ चक्रवर्ती	७२८	पोपचें सार्वभौमत्व (७५० पासून)	कनोजचा राजा भोज (८४०–९०)
राष्ट्रकूट घराणें स्थापन	७५०		
अमोघवर्मा	८१५–५५	शार्लमन-रोमन सम्राट (८००)	शार्लमन, शंकराचार्य, राजशेखर
सुलतान महमूद	९९७–१०३०	आल्फ्रेड (८७१–९०१)	पहिला विल्यम
सोमनाथवर स्वारी	१०२४	राजा कन्यूट (१०१६–३५) हेस्टिंग्जची लढाई (१०६६)	रामानुजाचार्य
शेहाबुद्दीन घोरी	११८६		
देवगिरीची स्थापना	११८७		जयदेव
स्थानेश्वरची लढाई	११९२		पृथ्वीराज चव्हाण
शेहाबुद्दिनाचा मृत्यु	१२०५		मध्वाचार्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. दक्षिणेंतील चालुक्य, राष्ट्रकूट व इतर घराणीं

१. चालुक्य घराणें :—हर्षाच्या वेळीं दक्षिणेंत मोठें व समान दर्जाचें असें चालुक्यांचें राज्य होतें. पूर्वीं आंध्र राजे या प्रांतावर राज्य करीत होते. त्यानंतर कोणीं राज्य केलें तें नीटसें सांपडत नाहीं. सन ५५० च्या सुमारास मात्र तेथें चालुक्यवंशाची स्थापना झाली. त्यावेळीं पहिला पुलकेशी यानें विजापूरजवळ बदामी येथें चालुक्यांचें राज्य स्थापन केलें असें मानण्यांत येतें. चालुक्य राजे आपल्याला रजपूतवंशाचे समजतात. पहिला पुलकेशी मोठा राजा होता. त्यानें अश्वमेध केला होता असें म्हणतात. त्याच्यानंतर त्याच्या मुलानें राज्य बाढविलें. त्यानंतर दुसरा पुलकेशी गादीवर आला. पहिल्या पुलकेशीचा तो नातु. तो महाप्रतापी निघाला. हर्षानें दक्षिणेवर स्वारी केली त्यावेळीं यानेंच त्याचा पराभव केला होता.



बदामीच्या लेण्यांतील एक देखावा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. दुसरा पुलकेशी (सन ६०८–६४२):—राज्यावर बसल्यापासून पुलकेशीनें आपलें राज्य वाढविण्याचें ठरविलें. सन ६११ ते ६३४ पर्यंत तो दक्षिणेंतील राजांशीं एकसारखा लढत होता. त्या काळांत त्यानें चोल, वेंगी, केरळ, पांड्य, पल्लव, कोंकण वगैरे प्रांतांतील राजांस पादाक्रांत केलें. शिवाय गुजराथ, राजपुताना, माळवा वगैरे प्रांतांवरही त्यानें स्वाऱ्या केल्या होत्या. साधारणतः नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व मुलूख त्याच्या राज्यांत मोडत होता असें म्हणतां येईल. वेंगी येथील राज्य काबीज केल्यावर तेथें त्यानें आपला भाऊ विष्णुवर्धन यास आपला प्रतिनिधि म्हणून नेमलें होतें. तेथेंच त्यानें पुढें स्वतंत्र राज्य स्थापलें. पुलकेशीनें आपल्या विजयार्थ अश्वमेध यज्ञ केला होता. प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएनत्संग यानें त्याच्या राज्यास भेट दिली होती (सन ६४१). पुलकेशीचा राज्यकारभार त्याला फार आवडला होता. महाराष्ट्रांत त्यावेळीं बौद्धधर्माचा बराच प्रसार झाला होता असें तो म्हणतो. अजिंठ्याचीं कोरीव लेणीं त्यानें पाहिलीं होतीं. तेथील शिल्पकला व रंगकाम पाहून त्यास फार आश्चर्य वाटलें. पुलकेशी हिंदुधर्माचा अभिमानी होता. त्यामुळें वैदिकधर्माची उन्नति होऊन महाराष्ट्रांत बौद्धधर्माचा लोप होऊं लागला. परधर्मीयांस तो छळीत नसे. वैदिक धर्मविधि व यज्ञयाग त्यास आवडत; व त्यांचें तो मोठ्या आस्थेनें पालन करीत असे. कला व शिल्प यांचा तो मोठा पुरस्कर्ता होता. जैन व बौद्ध यांच्याप्रमाणेंच त्यानें अनेक ठिकाणीं लेणीं, विहार व देवळें खोदवून व बांधून घेतलीं. त्याच्याच वेळीं बदामीचीं



घारापुरीच्या लेण्यांतील त्रिमूर्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुंदर लेणीं व मुंबईजवळचीं एलेफंटाचीं ऊर्फ घारापुरीचीं लेणीं खोदलीं गेलीं असें मानण्यांत येतें. तीं वैदिक धर्माभिमान्यांनीं कोरलीं होतीं. त्यामुळें त्या लेण्यांत हिंदुधर्मांतील देवदेवतांच्या मोठ्या व अजस्र मूर्ति खोदलेल्या दिसतात. पश्चिमेकडील सर्व बंदरें पुलकेशीच्या ताब्यांत होतीं. त्यांतून परदेशांशीं मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत असे. इराणचा राजा दुसरा खुश्रु व पुलकेशी यांनीं एकमेकांच्या दरबारीं आपला वकील पाठविला होता. त्यावरून पुलकेशीची कीर्ति किती दूरवर गेली होती तें समजतें.

३. पुलकेशीचा पाडाव :—पुलकेशीच्या कारभाराच्या शेवटीं शेवटीं त्याला शत्रूंचा उपद्रव फार होऊं लागला होता. त्याच्या राज्यावर संकटेंही येऊं लागलीं. सन ६४२ मध्यें कांचीचा पल्लव राजा नृसिंहवर्मा यानें पुलकेशीच्या राज्यावर स्वारी केली. नृसिंहवर्म्यानें शेवटीं त्याच्या राजधानीवर हल्ला करून बदामी हें राजधानीचें शहर त्यानें उध्वस्त केलें. त्या लढाईतच पुलकेशी मारला गेला. त्यामुळें त्याचें राज्य लयास गेलें. पुढें त्याचा मुलगा



पुल्केशीचा दरबार—इराणी वकिलाचें स्वागत

विक्रमादित्य मोठा पराक्रमी निघाला. त्यानें दहा-बारा वर्षांनीं आपल्या बापाचें राज्य पुन्हां संपादन केलें व तो सन ६५५ मध्यें राजा झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें कांचीच्या पल्लव राजावर स्वारी करून आपल्या बापाच्या वधाचा सूड घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यानें कांचीवर स्वारी केली व पल्लवांचें राज्य धुळीस मिळविलें. एवढेंच नव्हे तर दक्षिणेंतील तंजावर, पांड्य वगैरे राज्येंही जिंकून घेतलीं. त्याच्या या विजयानें चालुक्य व पल्लव यांच्यामध्यें अखंड वैर माजलें. त्यामुळें चालुक्यांचें राज्य कांहीं काळानें नष्ट झालें. पल्लवांप्रमाणेंच चालुक्यांचें राज्य नष्ट करण्यांत राष्ट्रकूट घराण्यांतील लोकांनीं मोठा भाग उचललेला होता.

४. राष्ट्रकूट घराणें :—राष्ट्रकूट घराणें दंतिदुर्ग यानें सन ७५० च्या सुमारास स्थापिलें असें मानतात. चालुक्यांचा पराभव करण्यांत त्याचा बराच मोठा भाग होता. चालुक्यांच्या शेवटच्या राजास पदच्युत करून त्यानें त्याचें राज्य बळकाविलें. राष्ट्रकूट लोक आपल्याला श्रीकृष्णाच्या यादवांचे वंशज समजत. ते रजपूत असावेत असा समज आहे. ते लोक आपल्याला 'रट्टे' किंवा 'महारट्टे' असेंही म्हणवीत. त्यावरूनच त्यांना पुढें 'मराठे' असें म्हणण्याचा प्रघात पडला. दंतिदुर्ग हा राष्ट्रकूटांचा मूळ संस्थापक समजला जातो. तो फार दुष्ट होता. प्रजेला त्याच्याकडून त्रास होऊं लागला. तेव्हां त्याचा चुलता पहिला कृष्णराज यानें त्याला पदच्युत केलें व त्याचें राज्य घेतलें. कृष्णराजानें आपल्या राज्याचा विस्तार फार केला. नाशिक ही त्याच्या राज्याची राजधानी होती. अजिंठ्याच्या लेण्यापैकीं कैलासाचें मनोवेधक मंदिर त्यानें कोरवून घेतलें. शिल्पकलेचा अत्युत्तम नमुना म्हणून तें आजही सर्व जगांत प्रसिद्ध आहे. कृष्णराजानंतर ध्रुव, धारावर्ष व दुसरा गोविंद यांनीं राज्य केलें. त्यांच्यानंतर ध्रुवाचा मुलगा तिसरा गोविंद राज्य करूं लागला. तो मोठा पराक्रमी निघाला. त्यानेंही आपल्या राज्याचा विस्तार बराच केला. मालखेड (मान्यखेत) येथें त्यानें आपली राजधानी स्थापन केली. कल्याणीच्या चालुक्यघराण्यांतील राजांचा त्यानें अनेकदां पाडाव केला होता. उत्तरेस विंध्यपर्वतापासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत त्याचें राज्य पसरलें होतें.

५. पहिला अमोघवर्मा (सन ८१५–८७७):—तिसऱ्या गोविंदाचा मुलगा अमोघवर्मा सन ८१५ मध्यें गादीवर आला. तो फार मोठा राजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन गेला असें म्हणतात. त्याच्या वेळीं सुलेमान नांवाचा एक अरबी व्यापारी हिंदुस्थानांत आला होता. 'अमोघवर्मा जगांतील चार बलिष्ठ राजांपैकीं एक होय; चीन, बगदाद, अगर इस्तंबूल येथील राजेच त्याची बरोबरी करूं शकतील,' असा त्यानें आपला अभिप्राय व्यक्त केला होता. मालखेड हीच त्याची राजधानी होती. त्याचें लष्कर नेहमीं जय्यत व खडें असे. त्याकरितां त्यानें अपार संपत्ति खर्चिली होती. तो व्यापाऱ्यांस नेहमीं प्रोत्साहन देई. त्यानें जैनधर्म स्वीकारून दिगंबर जैनांस आश्रय दिला. जैनधर्मास त्यानें पाठिंबा दिल्यानें त्या धर्माचा महाराष्ट्रांत प्रसार झाला. अर्थात बौद्धधर्म मागें पडला. मालखेडच्या भोवतीं त्यानें मोठा तट बांधला. अमोघवर्म्यानंतर त्याचा मुलगा दुसरा कृष्ण हा गादीवर बसला. परंतु त्याच्यानंतर राष्ट्रकूटांच्या राज्यास उतरती कळा लागली. इतर राजांशीं झगडे चालूच होते. त्यामुळेंही त्यांची सत्ता कमकुवत झाली. अशा स्थितींतच राष्ट्रकूटांचा शेवटचा राजा दुसरा कक्क याचा तैलप नांवाच्या वीरानें पराभव करून त्याचें राज्य धुळीस मिळविलें (सन ९७३).


कैलास मंदिर

६. कल्याणीचें चालुक्य घराणें :—तैलप स्वतःस बदामीच्या चालु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा वंशज समजत असे. तो आपणास राजाधिराज अगर परमेश्वर असें म्हणवून घेई. त्यानें पूर्वीचें चालुक्य राज्य आपल्या पराक्रमानें जिंकून घेतलें. कल्याणी हें त्याचें राजधानीचें शहर. यामुळेंच त्याच्या घराण्यांतील लोकांस ' कल्याणीचे चालुक्य ' असें म्हणतात. तैलपानें माळवा जिंकून घेतला व तेथील राजा मुंज यास ठार मारलें. त्याचा मुलगा सत्याश्रय त्याच्यानंतर गादीवर बसला (९९७). त्यावेळीं राजराजा नांवाचा तंजावरचा चोल राजा त्याच्या राज्यावर चालून आला. त्यानें सर्व महाराष्ट्र पादाक्रांत करून सर्वांस सतावून सोडलें. सन १०५२ मध्यें सत्याश्रयाचा मुलगा सोमेश्वर राजा झाला. तो फार पराक्रमी निघाला. त्यानें राजराजाचा पराभव करून त्याच्यावर चांगला सूड उगवला. त्यानें अनेक राजांकडून खंडणी वसूल केली होती. पुढें त्याच्या मुलांत राज्याबद्दल लढाया लागल्या. त्यांत विक्रमांक ऊर्फ विक्रमादित्य हा यशस्वी होऊन राजा झाला (१०७६). प्रथमतः त्यानें आपल्या सोमेश्वर नांवाच्या भावाला राज्यपद दिलें होतें. परंतु विक्रमादित्यानें त्याला पदच्युत केलें व तो स्वतः राजा झाला. विक्रमादित्यानें चोल राजांवर शस्त्र उपसलें व त्यांचा त्यानें अनेक वेळां पराभव केला. माळवा प्रांतही त्यानें जिंकून घेतला होता. बंगाल, आसाम, केरळ व लंका या प्रांतांवरही त्यानें स्वाऱ्या केल्या होत्या असें म्हणतात. त्यानें सुमारें पन्नास वर्षें राज्य केलें. त्याच्या वेळीं प्रजा फार सुखी होती. तो हिंदुधर्माचा अभिमानी असून विष्णुभक्त होता. तो प्रतापी, रसिक, कलोपासक व पंडितांचा आश्रयदाता होता. काश्मीरचा प्रसिद्ध कवि बिल्हण त्याच्या पदरीं होता. त्यानें आपल्या राजाचें चरित्र लिहून ठेवलें आहे. स्मृतीवर ' मिताक्षरी ' नांवाची टीका लिहिणारा पंडित विज्ञानेश्वर त्याच्या पदरीं होता. विक्रमाच्या नंतरचे राजे नीट निघाले नाहींत. त्यामुळें हें चालुक्य घराणें पुढें नष्ट झालें. या घराण्याचा शेवटचा राजा दुसरा तैलप राज्य करीत असतांच त्याचा प्रधान बिज्जन यानें त्याला पदच्युत केलें व तो स्वतः राजा झाला (११६२).

७. लिंगायतधर्माची स्थापना :—बिज्जनाचा प्रधान बसव नांवाचा ब्राह्मण होता. त्यानें लिंगायत धर्माची स्थापना केली. त्याच्या पंथांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांस 'वीरशैव' असेंही म्हणतात. लिंगायत लोक शिवाची पूजा करतात व शिवलिंग आपल्या गळयांत नेहमीं अडकवितात. ते वेद मानीत नाहींत. पुनर्जन्मावर त्यांचा विश्वास नाहीं. विधवाविवाह त्यांस मान्य आहे. बालविवाह त्यांस संमत नाहीं. जातिभेद नष्ट व्हावा या हेतूनें हा धर्म प्रथमं निघाला. वैदिकधर्मावर त्या धर्मपंथीयांनीं उघड उघड हल्ले केले. जैन धर्मावरही त्यांचा कटाक्ष असे. या धर्माचा चांगलासा प्रसार झाला नाहीं. कानडी मुलुखांत आजही हा पंथ जीव धरून आहे. व्यापारीवर्गानें प्रथमतः या धर्माचा स्वीकार केला व त्या वर्गातच तो अजून आहे. गुरु, लिंग, व आपले धर्मपंथीय यांस ते मान देतात. बसवपुराण व चन्नबसवपुराण हे त्यांचे धर्मग्रंथ होत. ते कानडींत लिहिलेले आहेत. म्हैसूरच्या राजानेंही हा धर्मपंथ स्वीकारला होता.

८. देवगिरीचे यादव :—कल्याणीच्या चालुक्यवंशाचा नाश होण्यास यादव व म्हैसूरचा राजा होयसळ ऊर्फ बल्लाळ हे फार कारणीभूत झाले. वीरबल्लाळ यानें म्हैसूरचें राज्य स्थापन केलें. त्याच वेळीं भिल्लम यादव यानें महाराष्ट्रांत देवगिरी येथें स्वतंत्र राज्य उभारलें (११८७). यादव हे



देवगिरीवरील सिंहासन (आजची स्थिति)

आपल्याला श्रीकृष्णाचे वंशज समजत असत. भिल्लम सन ११९१ मध्यें मृत्यु पावला. त्याचा पराक्रमी नातु सिंघण सन १२१० मध्यें गादीवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला. त्यानें गुजराथ व कोकण प्रांत जिंकून घेतले होते. तो सन १२४७ मध्यें मृत्यु पावला. त्यानंतर यादवांचा नांव घेण्यासारखा राजा म्हणजे सिंघणचा नातु रामदेवराव होय. तो सन १२७१ मध्यें राज्यावर आला. त्याच्या वेळींच अलाउद्दीन व मलिक काफूर यांनीं देवगिरीचें राज्य बुडविलें. यादवांच्या काळीं पुष्कळ कवि व ग्रंथकार महाराष्ट्रांत निर्माण झाले. प्रसिद्ध ज्योतिषी व गणिती भास्कराचार्य हा सन ११५० च्या सुमारास होऊन गेला. 'सिद्धान्त-शिरोमणी' व 'लिलावती' हे त्याचे ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. त्याचा नातु चांगदेव मोठा ज्योतिषी होता. तो सिंघणाचे पदरीं होता. 'संगीत रत्नाकर' या नांवाचा संगीतावर ग्रंथ लिहिणारा शार्ङ्गधर सिंघणाच्या आश्रयास होता. रामदेवरावाचा प्रधान हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत हाही बुद्धिमान ग्रंथकार होता. त्यानेंच मोडी लिपी सुरू केली. एकखांबी देवळें बांधण्याची कल्पना त्याचीच होती. 'चातुर्वर्ण्य चिंतामणी' हा त्याचाच ग्रंथ होय. बोपदेव हा हेमाडपंताचा आश्रित होता. त्यानें 'हरिलीला' हा ग्रंथ लिहिला. तो एक उत्तम व्याकरणकारही होता.

यादवांच्या वेळींच आळंदी विशेष गाजली. कारण त्यावेळीं तेथें महाराष्ट्र-संतशिरोमणी श्रीज्ञानेश्वरमहाराज हे गाजले. त्यांचा 'ज्ञानेश्वरी' हा श्रीमद्भगवद्गीतेवरील मराठी टीकाग्रंथ प्रसिद्ध आहे. निवृत्ति, सोपानदेव व मुक्ताबाई हीं त्यांचीं भावंडें होत. श्रीज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्रांत भागवतधर्म व भक्तिपंथ सुरू केला व मराठींत ग्रंथरचना सुरू केली. केवळ अल्पवयांत त्यांनीं केलेली कामगिरी अपूर्व होय.

९. म्हैसूरचे होयसळ ऊर्फ बल्लाळ :—राष्ट्रकूटांचे मांडलिक म्हैसूरचे बल्लाळ होत. द्वारसमुद्र ही त्यांची राजधानी होती. राजा वीरबल्लाळ हा त्यांचा पराक्रमी राजा होऊन गेला. तो सन ११८७ मध्यें स्वतंत्र झाला. वीरनरसिंह हाही राजा मोठा पराक्रमी होता. त्या दोघांनीं आपलें राज्य कृष्णानदीपर्यंत वाढविलें होतें. ह्या घराण्यांतील राजांनीं सन १३२६ पर्यंत राज्य केलें व पुढें त्यांस मुसलमानांचें मांडलिकत्व स्वीकारावें लागलें. होयसळ राजाचा जैनधर्माकडे कल होता. त्यांच्याच वेळीं वैष्णव पंथाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कर्ता रामानुजाचार्य होऊन गेला. त्याला होयसळांनीं पाठिंबा दिला होता. त्यानें द्वैतमताचा पुरस्कार करून शंकराचार्यांचें अद्वैतमत खोडून काढण्याचा प्रयत्न केला.

१०. पल्लवांचें राज्य :—पल्लव हे महाराष्ट्रांत वसाहती स्थापन करणाऱ्या आर्यांपैकींच होत असें विद्वानांचें मत आहे. इ. स. दुसऱ्या शतकांत त्यांचें राज्य कावेरीपासून कृष्णेपर्यंत पसरलें होतें. कांची ऊर्फ कांजीवरम हें त्यांच्या राजधानीचें शहर होय. नंतर त्यांनीं बदामी व वेंगी प्रांत आपल्या राज्यांत मिळवून घेऊन गोदावरीपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. समुद्रगुप्तानें त्यांचा पराभव करून आपलें मांडलिकत्व त्यांस स्वीकारावयास लावलें होतें. सन ५०५ च्या सुमारास सिंहविष्णु या त्यांच्या राजानें पांड्य व चोल राजांनाही जिंकून घेतलें होतें. सिंहलद्वीपही त्यानें जिंकलें. पल्लवांचा राजा महेंद्रवर्मा याचा चालुक्य राजा दुसरा पुलकेशी यानें पराभव करून त्याचें राज्य घेतलें होतें. परंतु त्याचा पुत्र नृसिंहवर्मा यानें पुलकेशीचा पराभव केला व आपलें राज्य परत मिळविलें. ह्यूएनत्संग त्याच्या वेळीं दक्षिणेंत आला होता. पुढें पल्लवांचा चालुक्यांनीं पराभव करून त्यांचें राज्य घेतलें व सन ९०० च्या सुमारास पल्लवांची सत्ता संपुष्टांत आणली. पल्लव राजे हिंदुधर्माभिमानी शिवोपासक होते. ते परधर्मसहिष्णु असल्यानें त्यांच्या राज्यांत इतर धर्मीय लोकही गुण्यागोविंदानें रहात. त्यांनीं अनेक भव्य शिवमंदिरें बांधलीं आहेत. महाबलिपुरम् येथील भव्य लेणीं त्यांनींच बांधलीं. इजिप्त, रोम, ग्रीस वगैरे देशांशीं त्यांचा मोठा व्यापार चाले. त्यांच्या वेळीं विद्या व कला यांची भरभराट झाली.

११. कांचीचें चोल घराणें :—कारिकल नामक पुरुषानें हें घराणें स्थापिलें असें मानतात. विजयांचा चोल हा राजा (८४६–८०) मोठा पराक्रमी होऊन गेला. त्यानें तंजावर येथें आपलें राज्य स्थापिलें. कांची शहरही त्यानें जिंकलें होतें. पुढें राजराजदेव (९८५–१०१७) हा मोठा पराक्रमी राजा निर्माण झाला. त्यानें वेंगी, मदुरा, कूर्ग, कलिंग वगैरे देश जिंकून घेऊन आपलें राज्य पुष्कळ वाढविलें. चेर व पांड्य ह्या राज्यांवरही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें छाप बसविली. तो शिवभक्त होता. त्याचा प्रतापी मुलगा राजेंद्र (१०४२–१०६७) यानेंही आपल्या राज्याचा पुष्कळ विस्तार केला. पुढें कुलोत्तंग चोल (१०७०–१११८)—राजेंद्राचा नातु–यानें मोठ्या वैभवानें ५० वर्षे राज्य करून राज्याची अंतःस्थिति सुधारली. हा राजा शैवपंथी होता. त्याचें व रामानुजाचार्य याचें पटलें नाहीं. आपल्या राज्याचा बंदोबस्त त्यानें उत्तम ठेवला होता. चोल घराण्यांतील हाच शेवटचा पराक्रमी राजा होय. पुढें चौदाव्या शतकांत हें राज्य लयास गेलें.

१२. मदुरेचे पांड्य :—हें घराणें फार प्राचीन समजलें जातें. मदुरा, तिनेवल्ली, त्रिचनापल्ली, त्रावणकोर वगैरे भाग या राज्यांत मोडत. प्राचीन काळीं काराकोई हें राजधानीचें ठिकाण होतें. तेथें मोत्यांचा व्यापार फार भरभराटींत असे. पुढें मदुरा हें राजधानीचें शहर झालें. तेथें विद्यापीठ होतें व तें फार प्रसिद्ध होतें. हे राजे प्रथम बौद्धधर्मीय होते. पुढें त्यांनीं जैन व शेवटीं वैदिक धर्माला आश्रय दिला. शेवटीं शेवटीं हिंदुधर्माची त्यांच्या राज्यांत चलती होती. तेराव्या शतकांत जटावर्मन् सुंदर हा शेवटचा पराक्रमी राजा होऊन गेला. मलिक काफूरनें या राज्यावर एकसारखे हल्ले करून त्याची सत्ता खिळखिळी केली. पुढें विजयनगरच्या स्थापनेनंतर हें राज्य नामशेष झालें.

१३. चेरांचें राज्य (केरळ) :—चेरांचें राज्य हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर मलबारांत होतें. हें राज्यही फार प्राचीन म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. नंतर या राज्याला उतरती कळा लागली. यांत मिरी, दालचिनी, वेलदोडे वगैरे मसाल्यांच्या पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत असे. या राज्यांत कोचीन व त्रावणकोर हीं सध्यांचीं राज्यें मोडत होतीं. क्विलान हें त्या राज्याचें राजधानीचें ठिकाण होय. पुढें यांचा चोलांबरोबर लढा लागून हें राज्य लयास गेलें.

१४. द्रविड संस्कृति :—दक्षिणेंत होयसळ, पांड्य, चेर, चोल वगैरे राज्यांत द्रविडी संस्कृति होती व ती फार उच्च होती. तेलगू, कानडी व तामीळ या भाषा त्या प्रांतांतून बोलल्या जात. त्या भाषांतून उत्तम प्रकारचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाङ्मयही निर्माण झालें होतें. द्रविड लोक उत्तम व्यापारी असल्यानें त्यांनीं इराण, ग्रीस, बॅबिलोनिया, रोम, मेसापोटेमिया वगैरे देशांशीं उत्तम प्रकारचें व्यापारी दळणवळण ठेवलें होतें. द्रविड लोक कलाकौशल्याचेही मोठे भोक्ते होते. त्यांनीं उभारलेलीं उत्तमोत्तम देवालयें याची चांगली साक्ष देतील. प्राचीन भारताचा धर्म, कायदा, रूढी, चालीरिती अगदीं शुद्ध स्वरूपांत या प्रांतांतून पहावयास मिळतात असें तामीळ विद्वानांचें मत आहे. तें कितपत खरें आहे हें समजून घेणें योग्य ठरेल.

अभ्यास

१. दुसऱ्या पुलकेशीसंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत सांगा.

२. अमोघवर्म्याचें चरित्र थोडक्यांत सांगा.

३. विक्रमांक ऊर्फ विक्रमादित्य याची कामगिरी वर्णा.

४. लिंगायत धर्माची स्थापना कोणीं केली? त्या धर्मासंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.

५. चालुक्य व राष्ट्रकूट या लोकांसंबंधीं माहिती द्या. ते मूळचे कोण? त्यांच्यांत कोणते राजे उत्तम झाले? त्यांपैकीं एकाची कामगिरी वर्णा.

६. टिपणें करा :—
यादव, पल्लव राजे, द्रविड संस्कृति, कांचीचें चोल घराणें, होयसळ राजे.

७. कृष्णराज, तिसरा गोविंद, दंतिदुर्ग, श्रीज्ञानेश्वर, भास्कराचार्य, हेमाद्रि यांच्यासंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत थोडक्यांत सांगा.

८. शं. वा. दांडेकर, ल. रा. पांगारकर, आजगांवकर वगैरेंनीं लिहिलेलीं श्रीज्ञानेश्वरांचीं चरित्रें, प्रा. अ. स. अळतेकरकृत–राष्ट्रकूटांचा इतिहास, कोल्हटकरकृत–राणाप्रताप, बेहेरेकृत–मेवाडसिंह, गो. ह. देशमुखकृत-पृथ्वीराज चव्हाण हीं पुस्तकें वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५. अरबांचा हिंदुस्थानांत प्रवेश—मोहंमद पैगंबर

१. अरब लोक :—मुसलमान लोक हिंदुस्थानांत प्रथम आल्याला आज सुमारें बाराशें वर्षें होऊन गेलीं. त्यांचें मूळ वसतिस्थान अरबस्थान समजलें जातें. तेथील लोकांस अरब असें म्हणत. हे अरब लोक जनावरें पाळीत व अरबस्थानच्या वाळवंटांत भ्रमण करीत. त्यांच्यांत अनेक टोळ्या होत्या व निरनिराळ्या टोळ्यांमध्यें नेहमीं चकमकी उडत. ते लोक मूर्तिपूजक होते. मक्का या क्षेत्रांत काबा नांवाचें एक देऊळ होतें. त्यांत सुमारें तीनशें मूर्ति होत्या. त्याचवेळीं अरबस्थानांत ज्यू, ख्रिस्ती वगैरे लोक होते. त्यांच्यांत एकेश्वरीपंथ रूढ झाला होता. त्यामुळें अरबही पुढें एकेश्वरीपंथाचीं तत्त्वें मान्य करूं लागले. अरब लोक मोठे चिवट, स्वधर्माभिमानी, शूर व भावनाप्रधान असत. त्यांच्यांतील वैर नष्ट करण्याचा व त्यांस संघटित करण्याचा प्रयत्न मोहंमद पैगंबर यानें केला.

२. मोहंमद पैगंबर (सन ५७०–६३२)**:—**मोहंमद पैगंबर हा इस्लामी धर्माचा संस्थापक होय. त्याचा जन्म सन ५७० मध्यें अरबस्थानांत मक्का येथें झाला. कुरैश नांवाची अरबांची एक टोळी होती. त्या टोळींतील लोकांकडेच काबाच्या देवळाची व्यवस्था होती. मोहंमद पैगंबर याच टोळींतील होता व त्याचा बाप काबाच्या मंदिराचा पुजारी होता. आईबाप लहानपणींच वारल्यानें मोहंमदाचें लालनपालन त्याच्या चुलत्यानें केलें. त्याचें नांव अबु तालिब होय. तो व्यापारी होता. पुढें चुलत्यामुळें मोहंमदही व्यापारी बनला. त्यामुळें त्याला निरनिराळ्या ठिकाणीं जावें लागे. त्यावेळच्या सामाजिक व धार्मिक व्यवहारांचें त्यानें योग्य आकलन केलें. जवळ संपत्ति नसल्यानें मोहंमद खदीजा नामक एका विधवा परंतु श्रीमान स्त्रीजवळ राही. पुढें तिच्याशींच अठ्ठाविसाव्या वर्षीं त्याचें लग्न झालें. त्यानंतर मोहंमद यानें अरबांच्या धार्मिक विचारांत क्रांति घडवून आणण्याचें ठरविलें. अरब लोक मूर्तिपूजक आहेत ही गोष्ट त्याला आवडेनाशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली. दिवसेंदिवस त्याच गोष्टीच्या विचारांत तो असे. शेवटीं देव एक आहे अशी त्याची ठाम समजूत झाली व त्या मताचा तो लोकांस उपदेश करूं लागला. ईश्वराचा खरा धर्म लोकांस शिकविण्याकरितांच आपला जन्म झाला, असा त्याला साक्षात्कार झाला. त्यामुळें आपण ईश्वराचे प्रेषित आहोंत अशी त्याची भावना झाली व त्यामुळें तो मोठ्या जोमानें आपल्या एकेश्वरीमताचा पुरस्कार करूं लागला.

३. मोहंमद पैगंबराचा छळ :—मक्का गांवांतील लोकांस तो प्रथम उपदेशूं लागला. मूर्तिपूजेविरुद्ध तो बोलूं लागला. तें लोकांस पसंत पडेना व ते त्याला विरोध करूं लागले. त्यामुळें त्याला अनुयायी मिळेनात. तरी तो डगमगला नाहीं. त्यानें प्रथम आपल्या नातेवाईकांस आपल्या नव्या धर्माची दीक्षा दिली. त्यामुळें त्याच्या छळास खरी सुरुवात झाली. लोकांनीं त्यास ठारही मारण्याचा कट केला. त्याचवेळीं त्याची बायको मेली. त्यांतच वरील कटाची माहिती त्यास कळल्यावर मक्केस राहणें योग्य नाहीं असें त्यास वाटलें. तेव्हां सन ६२२ मध्यें तो मदिना येथें पळून गेला. या गोष्टीला ‘ हिजरा ’ ऊर्फ पळ असें नांव देण्यांत आलें व तेथूनच मुसलमानांचा ‘ हिजरी ’ हा सन सुरू होतो. मदिना येथें आल्यावर तो आपल्या धर्माचा जोमानें प्रसार करूं लागला. तेथें त्याला हळूहळू अनुयायीही मिळूं लागले. अबुबक्र व उमर हे प्रथम त्याचे शिष्य झाले व त्यांनीं त्याच्या धर्माचा अरबस्थानांत प्रसार केला. याचवेळीं आपल्या धर्माच्या प्रसारार्थ त्यानें तरवारीचा उपयोग करण्यासही मागेंपुढें पाहिलें नाहीं. मदिना येथें त्यानें एक स्वतंत्र राज्यही स्थापिलें, सर्व अरबांची जूट केली, नवे कायदे तयार केले व या सर्वांच्या जोरावर आपल्या धर्माचा जोरानें प्रसार केला. मदिना येथें असतांच मोहंमदानें अबुबक्र याच्या मुलीशीं–आयेशाशीं–लग्न केलें. पुढें त्यानें मक्केवर हल्ला केला व तेथील काबाचें देऊळ नष्ट करून तेथें मशीद बांधली. त्यानंतर सर्व अरबस्थानावर मोहंमदाचा अंमल सुरू झाला. मक्का हें त्याच्या राजधानीचें शहर व त्याच्या नव्या धर्माचें मोठें क्षेत्र बनलें. अशा तऱ्हेनें आपल्या नव्या धर्माची स्थापना व प्रसार केल्यावर इस्लामी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्माचा हा संस्थापक व राज्यकर्ता सन ६३२ मध्यें मरण पावला. मदिनेच्या मशिदीमध्यें त्याचें दफन झालें.

४. इस्लाम धर्माची शिकवण :—मोहंमद पैगंबरच्या धर्माची शिकवण अत्यंत साधी आहे. ईश्वर एक आहे व त्याचा मोहंमद हा पैगंबर (प्रेषित) आहे असें तो सांगे. ही गोष्ट सर्व मुसलमानांस मान्य आहे. मूर्तिपूजा व पुनर्जन्म यांवर मुसलमानांचा विश्वास नाहीं. शेवटच्या 'न्यायदिनापर्यंत' मृतांचे आत्मे, जगाच्या अंतापर्यंत, तसेच राहातात असें ते मानतात. न्यायदिनाचे दिवशींच मनुष्यास नरक अगर स्वर्ग ईश्वर देतो. शुद्धाचरण, दानधर्म, ईश्वरोपासना वगैरेमुळें मुक्ति मिळते असें मानलें जातें. मक्का व मदिना हीं धर्मक्षेत्रें व कुराण हा मुसलमानांचा मुख्य धर्मग्रंथ होय. त्या ग्रंथांत इस्लाम धर्माचीं तत्त्वें ग्रथित केलेलीं आहेत. तो ग्रंथ आरबी भाषेंत आहे.

५. खिलाफत व शिया-सुन्नीपंथांची स्थापना :—मोहंमद पैगंबर वारल्यानंतर त्याचा सत्‌शिष्य अबुबक्र हा अरबस्थानचा राजा झाला. त्याचप्रमाणें तो नव्या धर्माचा धर्मगुरूही झाला. त्याला 'खलीफा' व त्याच्या राज्यास 'खिलाफत' असें म्हणत. म्हणजे धर्मगुरु व राजा हीं दोन्हीं कामें एकाच अधिकाऱ्यास करावीं लागत. खलीफा म्हणजे पैगंबराचा प्रतिनिधि अर्थात त्याला सर्व प्रकारचा मान मिळे. अबुबक्रानंतर उमर, उस्मान व अली हे खलीफा झाले. हे सर्व खलीफा धर्मसभेकडून निवडले जात; परंतु पुढें अशी निवडणूक रद्द करावी व मोहंमद पैगंबराच्या वंशजाकडेच खिलाफतीचा अधिकार असावा असें लोक म्हणूं लागले. जे वरील तत्त्वास चिकटून राहिले त्यांस 'शिया' व जे त्यास विरोध करीत त्यांस 'सुन्नी' असें लोक म्हणूं लागले. पुढें वरील दोन्ही पंथांतील लोकांमध्यें तंटे सुरू झाले. त्यांतच मोहंमदाचे नातु व चौथा खलीफा अली याचे मुलगे हसन व हुसेन हे मारले गेले. हुसेनची कबर इराणांत करबला येथें आहे. त्या कबरीची प्रतिमा करून तिचा उत्सव करण्याची वहिवाट बाबरानें प्रथम हिंदुस्थानांत सुरू केली. हिंदुस्थानाबाहेर ही चाल नाहीं. तेव्हांपासूनच ताबूतांची चाल येथें सुरू झाली. सुन्नी पहिल्या चार खलिफांसच मानतात व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अली व त्याचे वंशज यांसच शिया मानतात. हिंदुस्थानांत सुन्नी मुसलमानांचा भरणा फार आहे. पुढें अनेक वंशांकडे खिलाफत गेली. एकोणिसाव्या शतकांत ती तुर्कस्थानच्या बादशहाकडे गेली. सन १९१४–१८ च्या महायुद्धानंतर तुर्कस्थानांत तरुण तुर्कांनीं जोर केला व बादशहास पदच्युत केलें.

६. मोहंमद बिन कासीमची स्वारी (सन ७१२):—उमर खलीफा होता त्याच वेळीं अरबांनीं इराण काबीज केला. सन ६५० च्या सुमारास हिंदुकुशपर्यंत त्यांचें राज्य पसरलें होतें. त्याचप्रमाणें सीरिया, इजिप्त व सर्व उत्तर आफ्रिका हे प्रांतही त्यांच्या ताब्यांत गेले. सन ६६२ च्या सुमारास त्यांनीं काबूलपर्यंत मजल मारली व ते हिंदुस्थानच्या सरहद्दीशीं भिडले. त्यानंतर सन ६६४ मध्यें मोहल्लब नामक खलीफाच्या सेनापतीनें मुलतानपर्यंतचा मुलूख लुटला. पुढें ५०।६० वर्षें अरबांनीं हिंदुस्थानाकडे लक्ष दिलें नाहीं. सन ७१२ मध्यें मोहंमद बिन कासीम या अरब सरदारानें खलीफाच्या आज्ञेवरून सिंधप्रांतावर स्वारी केली. त्यावेळीं दाहीर नांवाचा हिंदु राजा सिंधवर राज्य करीत होता. देवल हें एक सिंधचें मोठें बंदर होतें. तेथें अरबांचीं कांहीं गलबतें लागलीं असतां, चांचे लोकांनीं तीं लुटलीं. त्याबद्दल खलीफानें दाहीरकडे नुकसानभरपाई मागितली. ती त्यानें नाकारल्यानें मोहंमद बिन कासीम यानें त्याच्यावर स्वारी केली होती. या लढाईत दाहीर राजा व त्याचे स्वामिभक्त सैनिक ब्राह्मणाबाद येथें मोठ्या शौर्यानें लढले; परंतु अखेर फंदफितुरी होऊन दाहीरचा पराभव झाला. नंतर कासीमनें त्याचें राज्य खालसा केलें व तो त्या प्रांताची व्यवस्था करूं लागला. परंतु पुढें खलीफाची त्याच्यावर गैरमर्जी होऊन त्याचा नाश झाला. त्याच्यानंतर रजपुतांनीं सिंधप्रांत परत काबीज केला.

७. अरबांचा पराभव:—सिंधप्रांत काबीज केल्यानंतर अरबांनीं मुलतानवर स्वारी केली. तें शहर काबीज केल्यावर त्यांचा मोर्चा राजपुत्यान्याकडे वळला. त्यावेळीं मेवाडची राजधानी चितोड या शहरावर त्यांनीं स्वारी केली. परंतु बाप्पा रावळ या मेवाडच्या शूर सेनापतीनें अरबांचा पराभव करून त्यांस पिटाळून लाविलें. पुढें सन ७३० मध्यें बाप्पा रावळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चितोडचा राजा झाला. त्यानंतर अरबांनीं आपला पाय हळूहळू सिंधमधून काढून घेतला व ते हिंदुस्थानाकडे फिरकले नाहींत. मात्र अरब व हिंदु यांचा जो हा प्रथम संयोग झाला त्याचा अरबांवर मोठा परिणाम झाला. अरबांनीं आपल्याबरोबर हिंदी तत्त्वज्ञान, ज्योतिष, बीजगणित, भूमिति, वैद्यक व रसायनशास्त्र हीं अरबस्थानांत नेलीं. अनेक ब्राह्मण व बौद्ध पंडितही त्यांनीं आपल्याबरोबर नेले होते. पुढें अरबांनीं तीं सर्व शास्त्रें आत्मसात केलीं व त्यांचा सर्व युरोपांत प्रसार केला. यापुढें हिंदुस्थानांत अरबांचें राज्य झालें नाहीं; पठाणांचें झालें. अफगाण व तुर्क यांना पठाण असें म्हणत.

अभ्यास

१. मोहंमद पैगंबर याचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याच्या धर्माची शिकवण काय होती ?

२. मोहंमद कासीमनें हिंदुस्थानावर स्वारी कां केली ? त्यानें कोणता पराक्रम केला ?

३. अरब व हिंदुस्थान यांचा संयोग अरबांस फायदेशीर झाला ? कसा ?

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.

शिया व सुन्नी, बाप्पा रावळ, अबूबक्र, दाहीर, हिजरी, मोहंमद कासीम.

५. सय्यद अमीनकृत–मोहंमद पैगंबर, चिं. वि. वैद्यकृत–मध्ययुगीन भारत, भाग २।३ हीं पुस्तकें वाचा.

उतारा

१. कुराणांतील निवडक धर्माज्ञा

१. तुमच्या आईबापांच्या, नातेवाईकांच्या किंवा गरीब-श्रीमंत माणसांच्या विरुद्ध न्याय द्यावा लागला तरी हरकत नाहीं. सदैव परमेश्वरास साक्ष ठेवून न्यायदान व न्यायाचें परिपालन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. परमेश्वराची तुमच्यावर नित्य नजर आहे. अनाथ बालकांची मालमत्ता तुम्हीं त्यांच्या हवालीं करा. ती गिळंकृत करूं नका. हें महापातक होय.

३. सत्कृत्यें करणारांवर ईश्वर प्रेम करतो.

४. ज्या गोष्टींचें ज्ञान तुम्हांस नाहीं त्यांचा तुम्ही स्वीकार करूं नका.

५. स्त्रियांशीं दयाळूपणें वागा. जर तुम्ही त्यांचा द्वेष कराल तर ज्यांत परमेश्वरानें चांगुलपणा भरला आहे अशा माणसाचा द्वेष केल्यासारखें होईल.

६. ज्यांच्याशीं युद्ध पुकारलें आहे व ज्यांच्यावर जुलूम होत आहे, अशांनाच लढण्याची परवानगी दिली आहे.

७. जो परमेश्वर व त्याचा पैगंबर यांच्या हुकुमाप्रमाणें चालेल त्याचें सदासर्वदा हित होईल; जो त्याचा अनादर करील, त्याला परमेश्वर नरकाग्नींत दाखल करील व तो तेथें निरंतर राहील.

प्रश्न :—१. कुराणांत कोणतीं उच्च तत्त्वें सांगितलीं आहेत ?

२. हिंदु धर्मातील कोणत्या तत्त्वांशीं त्यांचें साम्य आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६. गझनीचा राजवंश

१. अलप्तगीन (सन ९६७–९७६) :—सुमारें दहाव्या शतकाचे सुमारास खलीफाची सत्ता कमकुवत झाली व त्यामुळें अरबांचें राज्य विस्कळीत होऊं लागलें. त्यामुळें त्यांचे अनेक सरदार स्वतंत्र होऊं लागले. तेव्हां खिलाफतीचे संरक्षणार्थ खलीफानें तुर्कांना नेमण्यास सुरुवात केली. थोड्याच वेळांत तुर्क लोकही प्रबळ झाले व खिलाफतीच्या निरनिराळ्या प्रांतांवर ते राज्य करूं लागले. अशा तुर्क राज्यांत मध्य आशियांतील बुखारा येथें सामानी वंशीय तुर्क लोक सन ९०० च्या सुमारास फार प्रबळ झाले होते. परंतु तेही कांहीं वर्षांनीं कमकुवत झाले. तेव्हां अलप्तगीन या नांवाच्या तुर्क सरदारानें गझनीचें राज्य घेतलें व सन ९६७ च्या सुमारास गझनी येथें तो स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. गझनीच्या राजवंशाचा तोच संस्थापक समजला जातो. अलप्तगीन सन ९७६ मध्यें मरण पावला. तेव्हां त्याचा गुलाम व जांवई सबुक्तगीन गझनीचा राजा झाला.

२. सबुक्तगीन (सन ९७६–९९७) :—सबुक्तगीन राज्यावर आला त्यावेळीं गझनीचा राजा नाममात्र सामानी राजाचा मांडलिक होता; परंतु सबुक्तगिनानें तें मांडलिकत्व झुगारून दिलें व तो पूर्ण स्वतंत्र झाला. त्यानंतर त्यानें आपलें राज्य वाढविण्याचा विचार सुरू केला. त्यावेळीं काबूल व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश लाहोरच्या हिंदु राजाच्या ताब्यांत होता. लाहोरास जयपाळ हा ब्राह्मण राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्याची व सबुक्तगिनाच्या राज्याची सरहद्द भिडल्यामुळें त्या दोघांमध्यें नेहमीं कुरबूर सुरू झाली. तेव्हां एकदां जयपाळानें सबुक्तगिनाच्या राज्यावर स्वारी केली; परंतु त्यावेळीं जयपाळाचा पराभव झाला. पुढें सबुक्तगिनानें जयपाळाच्या राज्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला व त्याचे पेशावर व लघमन हे दोन्ही प्रांत आपल्या राज्यांत सामील करून घेतले. तेव्हांपासून काबूल प्रांत मुसलमानांच्या ताब्यांत गेला तो कायमचाच. त्यामुळें त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिशेनें पुढें मुसलमानांस हिंदुस्थानावर स्वारी करणें सोपें गेलें. सबुक्तगीन सन ९९७ मध्यें मृत्यु पावला.

३. सुलतान महमूद (सन ९९७–१०३०) :—सबुक्तगिनानंतर त्याचा मुलगा महमूद हा गझनीचा राजा झाला. त्यानेंच प्रथम 'सुलतान' हें पद धारण केलें. तो फार महत्त्वाकांक्षी होता. आपलें राज्य वाढविणें, इस्लामधर्माचा प्रसार करणें व संपत्ति मिळविणें हे त्याचे मुख्य हेतु होते. बापाबरोबर अनेक समरप्रसंगीं हजर राहून त्यानें उत्तमप्रकारचें लष्करी ज्ञान मिळविलें होतें. त्याची बुद्धि तीव्र होती व कठीण प्रसंगांतून सोडवणूक कशी करून घ्यावी, हें त्यास चटकन समजे. तो कडवा मुसलमान असला तरी धर्मगुरूंच्या हातीं राजसत्ता नसावी असें त्याला नेहमीं वाटे. आपल्या ह्यातींत त्यानें आपल्या राज्याची सरहद्द पंजाब ते कास्पियन समुद्र व समरकंद ते गुजराथ येथपर्यंत वाढविली होती. त्यावरून त्याचें मोठेपण व कर्तृत्व लक्षांत येईल. त्यानें हिंदुस्थानावर सतरा स्वाऱ्या केल्या असें म्हणतात. खलीफानेंही त्याच्या सुलतानपदाला मान्यता दिली होती. उलट 'इस्लामी धर्माचा मी प्रसार करीन' असें वचन महमुदानें त्याला दिलें होतें.

४. हिंदुस्थानावर स्वाऱ्या :—महमुदानें सन १००० पासून हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. सन १००१ मध्यें महमुदानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. त्यावेळीं जयपाळाच्या सैन्याशीं पेशावरच्या मैदानांत घनघोर लढाई झाली. त्यांत जयपाळाचा पराभव झाला व तो महमुदाच्या हातीं लागला. त्यानंतरही दोनदां जयपाळाचा महमुदानें पराभव केला. त्यामुळें त्याचें मन उद्विग्न झालें. तेव्हां आपल्या मुलाला–अनंगपाळाला–राज्यावर बसवून जयपाळानें अग्निकाष्टें भक्षण केलीं. त्यानंतरही महमुदानें हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून मुलतान व उत्तर सिंधप्रांत काबीज केला. सन १००८ च्या सुमारास महमुदाचा पराभव करण्याच्या हेतूनें अनंगपाळानें कलिंजर, कनोज, दिल्ली, अजमीर वगैरे ठिकाणच्या रजपूत राजांस आपल्या मदतीला घेतलें. महमूदही मोठ्या तयारीनिशीं पंजाबवर आला होता. मोठें घनघोर युद्ध झालें. युद्ध चालू असतांच अनंगपाळाचा हत्ती तीर लागून सैरावैरा पळूं लागला. त्यामुळें आपला राजा भिऊन मागें पळतो आहे असें अनंगपाळाच्या सैनिकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटलें व तेही पळूं लागले. त्याचा फायदा घेऊन महमुदानें त्यांचा पाठलाग करून त्यांचा पराभव केला. पुढच्या वर्षीही महमुदानें फिरून स्वारी केली. त्यावेळीं लढाईत अनंगपाळ मारला गेला. तेव्हां त्याचा मुलगा



त्रिलोचनपाळ राज्यावर आला व त्यानें महमुदाचें मांडलिकत्व पत्करलें. त्यानंतर थोड्याच दिवसांत पंजाब प्रांत महमुदाच्या ताब्यांत पूर्णपणें गेला.

५. सोरटी सोमनाथावर स्वारी (सन १०२४):—यानंतर महमु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दानें शहरांची लूट करून अपार संपत्ति हरण करण्याचा सपाटा चालविला. नगरकोट, मथुरा, ठाणेश्वर, कनोज वगैरे धनाढ्य शहरें व क्षेत्रें त्यानें लुटलीं व अलोट संपत्ति स्वदेशीं नेली. याचवेळीं त्यानें हिंदूंचीं



सोमनाथाच्या देवळाचा अंतर्भाग

देवळें नष्ट केलीं व देवदेवतांच्या मूर्तीही फोडल्या. सन १०१९ मध्यें त्यानें कनोजचें राज्यही पादाक्रांत केलें; व नंतर कलिंजर, ग्वाल्हेर, रोहिलखंड वगैरे प्रांतांची लुटालूट करून तेथील राजांसही त्यानें आपलें स्वामित्व मान्य करण्यास भाग पाडलें. पुढें सन १०२४ मध्यें गुजराथमधील सोमनाथाच्या देवळाची लूट करण्याकरितां महमुदानें हिंदुस्थानावर स्वारी केली. त्यावेळीं अनहिलवाडा ही गुजराथची राजधानी होती व भीम नांवाचा चालुक्य राजा गुजराथेंत राज्य करीत होता. सोमनाथ हें प्रख्यात शिवमंदीर असून तें अतिसंपन्न होतें. सोमनाथाची मूर्ति पंधरा–सोळा फूट उंच असून ती रत्नजडित होती. तेव्हां अशा संपन्न देवस्थानांतील अपार संपत्ति लुटावी या उद्देशानें महमूद मुलतानहून राजपुतान्याच्या वाळवंटांत उतरला. व तेथून तो सरळ सोमनाथावर चालून गेला. तो आला हें पाहतांच तेथील राजा भीतीनें पळून गेला. तरीही अनेकांनीं सोमनाथाचें रक्षण करण्याकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपले जीवही दिले. त्या सर्वांचा फडशा पाडून महमुदानें देवालय लुटलें, अगणित संपत्ति गोळा केली, सोमनाथाच्या मूर्तींचे तुकडे केले व सर्व देवालय उध्वस्त करून तो परत गेला. जातांना त्याला त्रास होईल असें वाटत होतें. तेव्हां आपली वाट चुकवून कच्छ-सिंध-मार्गें तो परत गझनीस गेला. वाटेंत त्याला अनेकांशीं झगडे करावे लागले. त्यांत त्याचें बरेंच सैन्य नष्ट झालें.

६. **महमुदाची योग्यता :**—सोमनाथाच्या स्वारीनंतर महमुदानें हिंदुस्थानावर एखाद-दुसरीच स्वारी केली. तो सन १०३० मध्यें मरण पावला. महमूद 'मूर्ति फोडणारा' म्हणून ओळखला जातो. तो व्यवहारदक्ष, शूर, कारस्थानी, धाडसी व राजकारणकुशल होता. तो कुशल राज्यकर्ता होता. विद्या व कला यांचा तो शोकी होता. हिंदुस्थानांतून त्यानें अनेक कारागीर आपल्याबरोबर गझनीला नेले होते. त्यांनीं गझनीला अनेक सुंदर इमारती बांधून तें शहर सुंदर बनविलें. महमूद स्वतः विद्वान व विद्येचा भोक्ता होता. त्यामुळें त्याच्या पदरीं अनेक विद्वान लोक होते. त्यांत तत्त्वज्ञानी फराबी, इतिहासकार उटबी, प्रसिद्ध 'शहानामा' नांवाचें काव्य लिहिणारा होमरच्या तोडीचा कवि फिर्दौसी, प्रसिद्ध गणिती, ज्योतिषी व संस्कृतचा खोल अभ्यास केलेला अल्बेरुणी हे प्रसिद्ध होते. अल्बेरुणी महमुदाबरोबर हिंदुस्थानांत आला होता. तेथेंच तो संस्कृत भाषा शिकला. त्याचबरोबर हिंदी तत्त्वज्ञान, हिंदी शास्त्रें, हिंदी वाङ्मय यांचाही त्यानें अभ्यास केला व त्या सर्वांची ओळख त्यानें मुसलमानांस करून दिली. हिंदुस्थानांत कायमचें राज्य स्थापण्याची महमुदाची इच्छा नव्हती. तेथील संपत्तीवर त्याचा डोळा होता. त्याला खरा राज्यविस्तार करावयाचा होता, तो इराण-तुर्कस्थानच्या बाजूस. हिंदुस्थानांतून लुटून आणलेली अपार संपत्ति त्यानें त्याकरितांच खर्चिली. जिंकलेल्या मुलुखाची नीट व्यवस्था तो कधींही करीत नसे. तो नेहमीं नवा मुलूख जिंकण्याच्या भरीस पडे. यामुळेंच त्याच्यामागें त्याच्या राज्यांत बंडाळी माजली. तो धर्मवेडा होता व इस्लाम धर्माचा प्रसार करण्याकरितां त्यानें चंग बांधलेला होता. त्याकरितां त्यानें जिवापाड श्रम केले. खुद्द त्याच्या राज्यांत नित्य दंगेधोपे चालत. व्यापारी रस्तेही सुरक्षित नव्हते. तो आपल्या प्रजेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्यायानें व निःपक्षपातबुद्धीनें वागवी. तो क्रूर नव्हता. परंतु त्याचे अधिकारी जुलमी, क्रूर व निर्दय होते. हिंदुस्थानांत राज्य कमाविणारा महमूद हाच पहिला पराक्रमी मुसलमान पुरुष होय.

७. गझनीच्या राज्याचा शेवट :—महमुदानंतर त्याचा मुलगा मोहंमद गझनीच्या गादीवर बसला; परंतु पुढें त्याच्या भावानें गझनीचें राज्य बळकावलें. त्यानंतर गझनीच्या राज्याबद्दल यादवी माजली. त्याच सुमारास सलजूक नांवाच्या तुर्क लोकांनीं सुलतानाविरुद्ध बंड केलें; व गझनीच्या राज्याचे लचके तोडण्यास सुरुवात केली. त्याच सुमारास गझनीचा शेवटचा सुलतान बहराम यानें घोर प्रांतांतील सरदारांचा अत्यंत छळ केला. तेव्हां त्याच्या जुलमास कंटाळून घोर लोकांनीं बंड केलें. अलाउद्दीन हा त्यांचा पुढारी होता. त्यानें एकदम गझनीवर चाल केली व तें शहर लुटून उध्वस्त केलें. तेथील चांगल्या चांगल्या इमारतीही त्यानें पाडून टाकल्या. एवढेंच नव्हे तर गझनीच्या राजवंशांतील पुरुषांच्या कबरी उकरून काढून, त्यानें त्यांचीं प्रेतें कुत्र्यांकडून खावविलीं ! पुढें अलाउद्दीन गझनीचा सुलतान झाला. त्यानें चार वर्षें राज्य केलें. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा गादीवर आला; परंतु थोड्याच दिवसांत त्याचा खून होऊन गियासुद्दीन व शेहाबुद्दीन या दोन भावांकडे (अलाउद्दिनाच्या पुतण्यांकडे) गझनीचें राज्य गेलें. पुढें शेहाबुद्दीन हाच गझनीचा सुलतान झाला (११८६).

अभ्यास

१. सुलतान महमुदाचें चरित्र थोडक्यांत सांगून त्याची योग्यता वर्णा.
२. सबुक्तगिनाची कामगिरी सांगा.
३. सोमनाथवर स्वारी करण्याचें कारण काय ? त्यामुळें महमुदाचा काय फायदा झाला ?
४. गझनीच्या वंशाची कामगिरी थोडक्यांत सांगा.
५. चिं. वि. वैद्यकृत ' मध्ययुगीन भारत ' भाग २।३ वाचा.

उतारा

१. महमुदाची सोमनाथवर स्वारी–१०२४.

सोमनाथाची मूर्ति अखिल हिंदुस्थानांत अत्यंत प्रसिद्ध होती. माणसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेल्यावर त्यांचे आत्मे त्या ठिकाणीं जातात अशी हिंदूंची समजूत होती. त्या देवालयाला दहा हजार गांवें इनाम दिलेलीं होतीं. एक हजार ब्राह्मण देवाची पूजा करीत आणि यात्रेकरूंना दर्शन करवीत. यात्रेकरूंची स्मश्रू करण्यांत तीनशें न्हावी गुंतलेले असत !

महमुदानें सोमनाथाची मूर्ति फोडून हिंदूंचे देव खोटे आहेत हें त्यांच्या प्रत्ययास आणण्याचें ठरविलें. एका गुरुवारीं तो सोमनाथास पोंचला. किल्ल्याच्या तटावर उभे राहून हिंदू मुसलमानांकडे पाहून हंसत होते आणि 'सोमनाथ तुम्हां सर्वांचा नाश करील' असें त्यांस सांगत होते! शुक्रवारीं मुसलमानांनीं हल्ला चढविला. हिंदू पळून गेले. शिड्या लावून मुसलमान तटावर चढले व किल्ल्यांत उतरले. नंतर भयंकर कत्तल सुरू झाली. पुष्कळसे हिंदू देवळांत शिरले, त्यांनीं देवापुढें साष्टांग नमस्कार घातला आणि जय मिळावा म्हणून देवाची करुणा भाकली..........

शिशानें मढविलेल्या छप्पन्न लांकडी खांबावर सोमनाथाचें देऊळ उभारलें होतें. मूर्ति पांच हात उंच असून तिचा घेर तीन हातांचा होता. ती दोन हात तरी जमिनींत खोल गेलेली असावी. ती घडविलेली दिसत नव्हती. तिचा कांहीं भाग महमुदानें जाळून टाकला व कांहीं भाग गझनीला पाठविला. तेथें जामी मशिदींत दाराशींच पायरी म्हणून तो घातला गेला. देवळांत अंधार होता, परंतु तेथें रत्नजडित झुंबरांचा प्रकाश पडला होता. मूर्तीजवळ सोन्याची साखळी होती. खजिना जवळच होता; व त्यांत सोन्यारुप्याच्या मूर्ती आणि अत्यंत मौल्यवान् रत्नांनीं जडवलेले पडदे ठेवले होते. सगळ्या लुटीची किंमत वीस लाख दिनारांपेक्षां अधिक होती, आणि पन्नास हजारांपेक्षां जास्त लोक मृत्युमुखीं पडले.

—इब्नअसीरचें वर्णन–वैद्यकृत मध्ययुगीन भारतावरून.

प्रश्न :—१. सोमनाथासंबंधीं हिंदूंच्या कोणत्या कल्पना होत्या ?
२. सोमनाथाचें ऐश्वर्य वर्णा. महमुदाला किती संपत्ति मिळाली ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. शेहाबुद्दीन घोरी

१. शेहाबुद्दिनाच्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या :—शेहाबुद्दीन ऊर्फ मोहंमद घोरी हा शूर व पराक्रमी होता. महमुदाप्रमाणें आपणही हिंदुस्थानावर स्वाऱ्या कराव्या व तेथें मुसलमानांचें साम्राज्य स्थापन करून कीर्ति मिळवावी अशी मोहंमद घोरीची महत्त्वाकांक्षा होती. त्याला हिंदुस्थानांत अनुकूल परिस्थितीही प्राप्त झाली. त्यावेळीं उत्तरहिंदुस्थानांत अनेक लहान मोठीं रजपूत राज्यें होतीं. दिल्लीस पृथ्वीराज चव्हाण हा शूर रजपूत राजा होता. जयचंद राठोड कनोज येथें राज्य करीत असून, गुजराथेंत भीमदेव हा पराक्रमी राजा होता. मेवाडच्या गादीवर समरसिंह होता. वरील सर्व रजपूत राजे आपापल्यापरी शूर व पराक्रमी होते. त्यांचीं लष्करेंही चांगलीं होतीं. परंतु त्यांच्यांत एकोपा नव्हता. पृथ्वीराज व जयचंद यांचें बिनसलें होतें; व ते एकमेकांचे वैरी बनले होते. सिंधमध्येंही हिंदु राज्य होतें. बंगाल, बहार, अयोध्या येथेंही हिंदुराज्यें होतीं. अशा परिस्थितींत मोहंमद घोरी यानें प्रथमतः ११७५ मध्यें पंजाब प्रांतावर स्वारी करून तो प्रांत त्यानें आपल्या राज्यास जोडला. पुढें त्यानें सिंध प्रांतही घेतला. गुजराथवरही त्यानें स्वारी केली होती; परंतु त्यांत त्याचा पराभव झाला. यानंतर त्यानें कांहीं वर्षें जिंकलेल्या प्रांतांची व्यवस्था करण्यांत व तेथें आपली सत्ता प्रस्थापित करण्याकरितां खर्चिलीं. त्यानंतर सन ११९१ मध्यें त्यानें रजपुतांवर स्वारी केली.

२. मोहंमद घोरीचा पराभव (सन ११९१):—मोहंमद घोरी आपल्यावर चाल करून येणार हें वृत्त दिल्लीचा पृथ्वीराज चव्हाण यास अगोदरच समजलें होतें. तेव्हां त्यानें अनेक रजपुतांस एकत्र केलें व आपल्यावरील भावी संकटांस तोंड देण्याची तयारी केली. दोन्ही सैन्यांची स्थानेश्वरापासून तेरा-चौदा मैलांवर तरायन येथें लढाई झाली. दोन्ही सैन्यें निकरानें लढलीं व त्यांचें तुंबळ युद्ध होऊन घोरीचा पराभव झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृथ्वीराज विजयी होऊन शेहाबुद्दीन त्याच्या हातांत सांपडला. परंतु मोठ्या उदार अंतःकरणानें पृथ्वीराजानें त्याच्याकडून खंडणी घेऊन त्याला सोडून दिलें. परंतु शेहाबुद्दिनाला हा अपमान सहन झाला नाहीं. पृथ्वी राजावर सूड उगवावा म्हणून तो आपली तयारी करूं लागला.


पृथ्वीराज चव्हाण

३. स्थानेश्वरची लढाई (११९२):— पुढच्या वर्षी कडेकोट तयारी करून शेहाबुद्दीन चाल करून आला. त्यावेळीं रजपूत राजांमधील एकी नष्ट झाली होती. जयचंद राठोड यावेळीं पृथ्वीराजावर रागावला होता. त्याची कन्या संयुक्ता हिच्या स्वयंवरकालीं पृथ्वीराजानें तिचें हरण केलें होतें. ती गोष्ट त्याला आवडली नव्हती. सर्व रजपूत राजांचें पाठबळ मिळविण्याचा प्रयत्न करूनही, पृथ्वीराजाला तें मिळालें नाहीं. त्याची फौजही थोडी कमकुवत झालेली होती. अशा स्थितींतही त्यानें शेहाबुद्दिनाचा प्रथम पराभव केला. पुढें त्याचें लष्कर शेहाबुद्दिनाच्या सैन्याचा पाठलाग करूं लागलें. तेव्हां तें अव्यवस्थित झालें. या प्रसंगीं मुद्दाम राखून ठेवलेल्या सैन्यानिशीं शेहाबुद्दीन रजपुतांवर चाल करून गेला. मोठी लढाई झाली. त्यांत रजपुतांचा पराभव होऊन त्यांचा राजा पृथ्वीराज शेहाबुद्दिनाच्या हातीं लागला. परंतु शहाबुद्दिनानें, आपल्यावरील पूर्वीचा उपकार विसरून, पृथ्वीराजास ठार मारलें. ही लढाई स्थानेश्वर येथें झाली. या लढाईंत अनेक रजपूत मारले गेले. पुढें शेहाबुद्दिनानें अजमीरवर चाल करून, तें शहर काबीज केलें व तेथील असंख्य लोकांची कत्तल केली. नंतर शेहाबुद्दीन परत गेला. जिंकलेल्या मुलुखाची व्यवस्था लावण्याचें काम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें आपला गुलाम कुतुबुद्दीन ऐबक याच्याकडे सोपविलें. त्यानें पुढें दिल्ली व अलीगड जिंकून घेतलें.

४. इतर स्वाऱ्या :— त्यानंतर मोहंमद घोरी पुन्हां सन ११९४ मध्यें हिंदुस्थानावर चालून आला. त्यावेळीं त्यानें कनोजचा जयचंद राठोड याच्यावर हल्ला चढवून त्याचा पराभव केला व कनोजचें राज्य घेतलें. त्यामुळें कनोजवंशीयांनीं पुढें जोधपूर येथें नवें राज्य स्थापिलें. कनोजनंतर शेहाबुद्दिनानें काशी हें हिंदूंचें प्रसिद्ध क्षेत्र जिंकून तेथील मूर्ति फोडल्या व लुटालूट केली. त्यानंतर तो परतला. त्याच्या सांगण्यावरून त्याच्या गुलामानें–कुतुबुद्दीन–ऐबक यानें–गुजराथवर स्वारी केली व तेथील राजा भीमदेव याचा पराभव करून त्याचें राज्य खालसा केलें. त्याच वेळीं बखत्यार खलजी या शेहाबुद्दिनाच्या दुसऱ्या सरदारानें सन ११९७ च्या सुमारास बंगाल, बहार व अयोध्या हे प्रांत काबीज केले. ऐबकही त्यावेळीं रजपुतांशीं लढण्यांत गुंतला होता. त्यानें ग्वाल्हेर, काल्पी व कलिंजर येथील मजबूत किल्ले काबीज केले. चितोडही त्याला काबीज करावयाचें होतें. परंतु तेथील अल्पवयी राजा कर्ण याच्या आईनें सैन्य जमवून ऐबकचा पराभव केला.

५. शेहाबुद्दिनाचा मृत्यु व योग्यता (सन १२०५) **:—** शेहाबुद्दिनाच्या सरदारांनीं अशा तऱ्हेनें उत्तर हिंदुस्थानांत आपली घडी बसविली व बहुतेक सर्व उत्तर हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणला. त्या वेळीं स्वतः शेहाबुद्दीन मध्य आशियांतील लोकांशीं झगडत होता. तेथें विजय मिळवून तो मोकळा होतो न होतो तोंच पंजाबांतील गक्कर लोकांनीं बंड केल्याचें त्यास कळलें. तेव्हां तें मोडण्याकरितां तो पंजाबांत उतरला. हजारों गक्कर लोकांस पकडून त्यानें त्यांस ठार मारलें. याचा सूड घेण्याचें त्या लोकांनीं ठरविलें होतें. एके दिवशीं सिंधूच्या काठीं रोहतक येथील आपल्या तंबूंत शेहाबुद्दीन विश्रांति घेत असतां कांहीं गक्कर लोक तंबूंत शिरले व त्यांनीं शेहाबुद्दिनाचा खून केला (१२०५). मोहंमद घोरी उर्फ शेहाबुद्दीन हा शूर व महत्त्वाकांक्षी होता हें खरें. तथापि केवळ लूट व राज्यविस्तार यांवरच त्याची भिस्त होती. तो विद्वान नव्हता. मुत्सद्देगिरी त्यास माहीत नव्हती. हिंदुस्थानांत मुसलमानी सत्तेचा पाया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालणें हें त्याचें महत्त्वाचें काम होय. त्यानें हिंदुस्थानावर सात स्वाऱ्या केल्या व लुटालूट, कत्तल, हिंदूंचीं देवळें फोडणें, मूर्ति भ्रष्ट करणें यांवर भर दिला. मात्र जिंकलेल्या मुलुखाची त्यानें योग्य ती व्यवस्था लावून तेथें आपली सत्ता चिरकाल राहील याची खबरदारी घेतली. त्याच्या मृत्यूनंतर थोडक्याच वर्षांत त्याचें गझनीचें राज्य नष्ट झालें. त्यामुळें हिंदुस्थानांतील त्याचा गुलाम कुतुबुद्दीन ऐबक हा स्वतंत्र झाला व त्यानें दिल्लीस गुलाम-वंशाची स्थापना केली.

६. हिंदूंच्या अपजयाचीं कारणें :—हिंदूंना अरब, तुर्क वगैरे मुसलमान जातींतील लोकांपुढें हार खावी लागली, त्याला अनेक कारणें होतीं. रजपूत राजे शूर व पराक्रमी होते; परंतु त्यांच्यांत एकी नव्हती. मत्सर, द्वेष, राग वगैरेमुळें प्रत्येकजण दुसऱ्यावर जळफळत असे. त्यामुळें त्यांच्यांत नेहमीं भांडणें माजत. त्याचा त्यांच्या शत्रूंनीं चांगलाच फायदा घेतला. त्यावेळचा हिंदु समाज विस्कळीत झालेला होता. लढण्याचें काम क्षत्रियांचें आहे, ही भावना सर्वत्र होती. त्यामुळें समाजांतील इतर लोक युद्धशास्त्रासंबंधीं उदासीन असत. अर्थात लढण्याचें काम केवळ क्षत्रियांवरच पडे. समाजाचा त्यांस पाठिंबा नसल्यानें त्यांनींही त्या शास्त्राची उपेक्षाच केली. त्यामुळें राष्ट्ररक्षण करणें त्यांस दुर्घट झालें. अहिंसा तत्त्वानें सर्व समाजास एकप्रकारें भुरळच पाडली होती. त्यामुळेंही जनता युद्धविन्मुख झालेली होती. त्यावेळीं सर्व हिंदुस्थानांत एकछत्री राज्य स्थापन करून सर्व हिंदुसमाजाची संघटना करणारा एकही शूर व पराक्रमी राज्यकर्ता निर्माण झाला नाहीं. त्यामुळेंच लोकांचीं मनें राष्ट्रहितापेक्षां धर्माच्या अहिंसा, संन्यास वगैरे तत्त्वांमध्येंच नेहमीं गुरफटलेलीं होतीं. याच्या उलट मुसलमानांची स्थिति होती. मुसलमानांत एकजूट होती. युद्धशास्त्राचा त्यांनीं चांगला अभ्यास केलेला होता. युद्धाच्या नव्या नव्या कल्पना त्यांनीं आत्मसात केल्या होत्या. रणांगणावर लागणारे शौर्यवीर्यादी गुण, धाडस, मुत्सद्दीपणा, डावपेच यांतही ते हिंदूंपेक्षां सरस ठरले. आपल्या धर्माकरितां जिवावर उदार होऊन मुसलमान लढत. ते हिंदूंपेक्षां काटक, धिप्पाड व मजबूत बांध्याचे होते. या सर्व कारणांमुळें मुसलमानांस जय मिळत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेला व हिंदूंचा दर खेपेस पराभव होत गेला. हिंदूंनीं आपली ठराविक युद्धपद्धति बदलली नाहीं. धर्माच्या घातुक तत्त्वांची पकड त्यांनीं कधींही ढिली होऊं दिली नाहीं. आपल्या खऱ्या क्षत्रियवृत्तीस त्यांनीं पूर्णपणें वाव कधींच दिला नाहीं. या सर्व गोष्टींत हिंदूंनीं बदल केला असता व आपली एकजूट टिकविली असती, तर त्यांस मुसलमानांवर जय मिळवितां आला असता.

अ भ्या स

१. शेहाबुद्दीन घोरी याचें चरित्र थोडक्यांत सांगा.

२. पृथ्वीराज चव्हाणासंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत सांगा.

३. मुसलमानांपुढें हिंदूंना हार कां खावी लागली ?

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.

ऐबक, बखत्यार, स्थानेश्वर, जयचंद राठोड, भीमदेव, संयुक्ता.

उतारा

१. स्थानेश्वरची लढाई—११९२.

सुलतानानें आपल्या फौजेची मांडणी केली. फौजेच्या मध्यावर सामानसुमान, निशाणें आणि हत्ती यांस कित्येक मैल मागें ठेवलें. त्यानें आपल्या फौजेच्या रांगा नीट लावून सावकाशपणें चाल केली. पण हलक्या हत्यारांचे व चिलखताचे घोडेस्वार चार टोळ्यांत विभागले व त्यांस शत्रूवर चारी बाजूनें हल्ला करण्यास सांगितलें. डावी व उजवी बाजू, अघाडी व पिछाडी यावर दहा हजार घोड्यांवरील तिरंदाजांनीं शत्रूच्या फौजेस सारखें गुंतवावें आणि त्यांचे हत्ती, घोडे आणि पायदळ लढाईस पुढें होतील, तेव्हां एकदम तोंड फिरवून एका घोड्याच्या टप्प्यावर त्याच्यापुढें पळत सुटावें अशी सुलतानानें मुसलमानी फौजेस आज्ञा केली होती. ती तिनें अक्षरशः पाळली. त्यामुळें मुसलमानांस जय मिळाला.

प्रश्न :—१. सुलतानानें आपल्या फौजेची मांडणी कशी केली ? त्याचा एक नकाशा काढा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—९९७-१२१५

हिंदुस्थान	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
सबुक्तगिनाचा मृत्यु	९९७		
गझनीच्या महमुदाची पहिली स्वारी	१००१		अल्बेरुणी,
	१०१८	कन्यूट	
सोमनाथवर स्वारी	१०२४		
	१०६६	नॉर्मनांनीं इंग्लंड जिंकलें	उमरखय्याम,
पृथ्वीराज दिल्लीचें राज्य घेतो	११७०	बेकेटचा खून राजा जॉन	बिल्हण, विज्ञानेश्वर भास्कराचार्य,
सिंघण राजा	१२१०-४७	११९९-१२१६	
	१२१५	मॅग्नाकार्टा	चांगदेव, शार्ङ्धर, हेमाडपंत, बोपदेव, ज्ञानेश्वर, नामदेव.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८. दिल्लीची सुलतानशाही—गुलामवंश

१. कुतुबुद्दीन ऐबक (सन १२०६–१२१०):—शेहाबुद्दीन ऊर्फ मोहंमद घोरी याचे चार गुलाम होते. त्या सर्वांस त्यानें निरनिराळ्या प्रांतांवर आपले सुभेदार म्हणून नेमलें होतें. कुतुबुद्दीन ऐबक हा दिल्लीचा सुभेदार होता. बंगालवर बख्त्यार खलजी, सिंधवर नासिरुद्दीन व एल्दोज गझनीस सुभेदार होता. मोहंमद याला पुत्रसंतान नसल्यानें त्याच्या मृत्यूनंतर हे सर्व सुभेदार स्वतंत्र झाले; व आपल्या प्रांतांत राज्य करूं लागले. आपल्या पदरीं गुलाम बाळगण्याची मोठ्या लोकांना त्या काळीं हौस असे. मात्र ते आपल्या गुलामांस स्वतःच्या मुलांप्रमाणें वागवीत, शिक्षण देत व वेळेनुसार त्यांच्याशीं बेटीव्यवहारही करीत. मोहंमद घोरीनें आपल्या गुलामांस उत्तमरीतीनें वागविलें होतें. त्याचे चारी गुलाम मोठे कर्तबगार निपजले. त्यांतल्या त्यांत कुतुबुद्दीन ऐबक हा सर्वांत जास्त कर्तबगार निघाला. मोहंमदाच्या मृत्यूनंतर त्यानें सुलतानपद धारण केलें व दिल्लीस तो राज्य करूं लागला. तोच गुलामवंशाचा संस्थापक होय. ऐबकानें गुजराथपर्यंतचा टापू अगोदरच काबीज केलेला होता. सुलतान झाल्यावर त्यानें मीरत, बनारस, कलिंजर वगैरे ठिकाणें काबीज करून आपली सत्ता चिरस्थायी केली. आपल्या नांवाचीं नाणींही त्यानें पाडलीं होतीं. गझनीचें राज्य जिंकण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण तो फसला. तो न्यायी, प्रेमळ व दानशूर होता. कलाकौशल्याची त्याला आवड होती. दिल्लीस त्यानें अडीचशें फूट उंचीचा एक मनोरा उभारण्यास सुरुवात केली. त्यास 'कुतुबमिनार' असें म्हणतात. तो अजूनही आहे. दिल्लीची जुम्मामशीदही त्यानेंच बांधली. हीं बांधकामें करण्यास त्यानें हिंदूंच्या देवालयांचे दगड आणले होते. तो घोड्यावरून पडून सन १२१० मध्यें मरण पावला. जातीनें तो तुर्क होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. शमसुद्दीन अल्तमिश (सन १२१०-१२३५):—ऐबकाचा मुलगा आराम हा आपल्या बापानंतर दिल्लीचा सुलतान झाला; परंतु तो नालायक



कुतुबमिनार

असल्यानें ऐबकचा तुर्क गुलाम शमसुद्दीन अल्तमिश यानें दिल्लीचें राज्य बळकावलें. तो ऐबकचा जांवईही होता. सुलतान झाल्यावर अल्तमिशनें पंजाब व सिंध प्रांत काबीज केले. बंगालवर स्वारी करून तोही प्रांत त्यानें आपल्या राज्यास जोडला. ग्वाल्हेर, माळवा, रतनभोर वगैरे ठिकाणेंही त्यानें जिंकलीं. त्यामुळें जवळ जवळ सर्व उत्तरहिंदुस्थानांत त्याचा अंमल बसला. त्याच्या वेळीं मोंगल लोक मध्यआशियांत धुमाकूळ माजवूं लागले होते. अल्तमिश याला बगदादच्या खलीफानें त्याच्या शौर्यावर खूष होऊन, बहुमानाचीं वस्त्रें पाठविलीं होतीं; व त्याच्या सुलतानपदासही मान्यता दिली होती. अल्तमिशनें आपल्या नांवाचें नाणेंही पाडलें होतें. तो विद्येचा भोक्ता व इस्लामधर्माचा पुरस्कर्ता होता. कुतुबमिनार त्यानेंच पुरा केला. तो सन १२३५ मध्यें मरण पावला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. मोंगल लोक-चंगीझखान :—अल्तमिशच्या वेळीं मोंगल लोक हिंदुस्थानच्या सरहद्दीवर स्वाऱ्या करूं लागले होते. हे लोक चीनमधील मोंगोलिया प्रांतांत मूळ राहणारे. हे धनगरी पेशाचे, भटके व अत्यंत क्रूर होते. भुतांखेतांवर त्यांचा विश्वास होता. भुतांची व आपल्या पितरांची ते पूजा करीत. त्यांनीं प्रथमतः मुसलमानी धर्म स्वीकारलेला नव्हता. ते शूर, शिस्तीचे भोक्ते, आज्ञाधारक पण उद्दाम व गर्विष्ठ होते. विश्वासघातकीपणा त्यांच्या पांचवीलाच पूजिलेला असे. इस्लामधर्मीयांशीं प्रथमतः त्यांचें अत्यंत हाडवैर होतें; परंतु पुढें त्यांनीं तो धर्म स्वीकारल्यानें तें नष्ट झालें. परधर्मीयांशीं ते सहिष्णुतेनें वागत. तें जिकडे जात तिकडे लुटालूट, जाळपोळ व कत्तल करीत. अल्तमिशच्या वेळीं चंगीझखान हा त्यांचा पुढारी होता. पुढें तो त्यांचा राजा झाला. त्यानें चीन, मध्य आशियांतील तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान, अरबस्थान वगैरे प्रांत आपल्या राज्यास जोडले. त्यानंतर तुर्कस्थानच्या राज्यावर त्याची धाड गेली. त्यांत तुर्कस्थानच्या सुलतानाचा पराभव होऊन त्याचा नाश झाला. तेव्हां त्याच्या मुलानें युद्ध सुरू केलें. त्याचाही निभाव लागेना. तेव्हां तो पळत पळत पंजाबांत शिरला. त्याच्या पाठोपाठ मोंगलही आले. पुढें मोंगलांनीं लाहोर घेतलें. मुलतान त्यांस घेतां आलें नाहीं. तेव्हां ते हिंदुस्थानांतून परत फिरले. चंगीझखान सन १२२७ मध्यें मृत्यु पावला. तो फार क्रूर होता. आपल्या हयातींत त्यानें दीड कोट माणसांची कत्तल केली! विद्या व धर्म यांचा तो उघड उघड उपहास करी.

४. सुलताना रझिया (सन १२३६–३९):—अल्तमिशनंतर त्याचा मुलगा रुकनुद्दीन सुलतान झाला. परंतु तो व्यसनाधीन असल्यानें राज्यांत अव्यवस्था माजली. तेव्हां त्याला दूर करून त्याची बहीण रझिया ही गादीवर बसली. ती मोठी कर्तबगार व पराक्रमी होती. राज्यकारभाराचा अनुभवही तिला चांगला मिळालेला होता. दिल्लीच्या गादीवर बसलेली ती पहिलीच स्त्री होय. ती न्यायी, उदार, विद्वानांची चाहती, शूर व प्रजापालनदक्ष होती. पुरुषी पोशाख घालून ती दरबारांत बसे. परंतु स्त्रीनें आपल्यावर राज्य करावें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही कल्पनाच तिच्या कांहीं सरदारांना रुचत नसे. अशा लोकांनीं बंडही केलें. एका हबशी गुलामावर तिचें प्रेम जडलें होतें. ही गोष्ट समजल्यावर ते फारच खवळले. तेव्हां रझियानें मोठ्या धोरणानें अल्तुनिया नामक एका तुर्क सरदाराशीं लग्न लावलें. नंतर त्या दोघांनीं राज्यकारभार करण्यास सुरुवात केली; परंतु त्यानें सरदार नमले नाहींत. शेवटीं त्या दोघांसही सरदारांनीं ठार केलें. पुढें सहासात वर्षें राज्यांत बंडाळीच माजली होती. त्याचा फायदा घेऊन मोंगल लोकांनीं पंजाब प्रांतावर स्वारी करून तो प्रांत घेतला. शेवटीं सन १२४६ मध्यें अल्तमिशचा कनिष्ठ मुलगा नासिरुद्दीन सुलतान झाला.

५. **नासिरुद्दीन** (सन १२४६-१२६६):—नासिरुद्दीन अत्यंत धर्मशील, शांत, सालस व साधा होता. कुराणाच्या प्रती स्वहस्तानें लिहून त्या विकण्याचा त्याला नाद होता. राज्यकारभाराकडे त्याचें मुळींच लक्ष नसे. त्याचा प्रधान बल्बन बुद्धिवान व मुत्सद्दी होता. त्याच्याकडेच सर्व राज्यकारभार नासिरुद्दिनानें सोंपविला होता. त्यावेळीं मोंगलांचे हल्ले वारंवार होऊं लागले होते. राज्यांत बंडही एकसारखीं उत्पन्न होत. या सर्व गोष्टींस तोंड देऊन राज्याचें रक्षण करण्याचें काम बल्बननें उत्तमप्रकारें केलें. मोंगलांच्या चढाईसही त्यानें चांगलाच पायबंद घातला होता. सन १२६६ मध्यें नासिरुद्दीन मरण पावला. त्याला मुलगा नसल्यानें दिल्लीच्या गादीवर बल्बन बसला.

६. **बल्बन** (१२६६-८६):—बल्बन हा अल्तमिशचा तुर्क गुलाम होता. तो मूळ थोर कुळांतला होता. दुर्दैवानें त्याला गुलाम केलें. दिसण्यांत तो कुरूप होता. स्वतःच्या कर्तबगारीनें त्याला मोठेपण व मोठें पद प्राप्त झालें. वयाच्या साठाव्या वर्षी त्याला सुलतानपद मिळालें. तो मोठा कडक असे. गुन्हेगारांस तो फार कडक शिक्षा करी. फारशी वाङ्मयाचा तो भोक्ता होता. अमीर खुश्रू याचें काव्य त्याला फार आवडे. हिंदूंचा तो कट्टा द्वेष्टा होता. राज्यावर आल्याबरोबर त्यानें आपलें लष्कर वाढविलें, सरदारांवर वचक बसविला व आपली सत्ता दृढ करण्याच्या तो उद्योगास लागला. बंगालचा सुभेदार तुघ्रुलखान यानें बंड केलें, तेव्हां त्याच्यावर स्वारी करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें बंगाल प्रांत जिंकला. तुघ्रुलखान लढाईत मारला गेला. त्याच्या हजारों साथीदारांस बल्बननें कंठस्थान घातलें. त्याच वेळीं मोंगल लोकही हिंदुस्थानावर चाल करून आले होते. लाहोरपर्यंतचा मुलूख त्यांनीं जिंकला होता तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां बल्बनानें आपल्या मुलाला त्यांच्यावर पाठविलें. त्यानें त्यांचा पाडाव केला परंतु एका लढाईत तो स्वतः मरण पावला. पुत्रशोकानें पुढें म्हातारा बल्बनही लौकरच मृत्यु पावला (१२८६). त्याच्यानंतर त्याचा नातु कैकोबाद सुलतान झाला; परंतु तो नालायक निघाला. तेव्हां जलालुद्दीन खलजी या सरदारानें त्याला व त्याच्या मुलास ठार मारून दिल्लीची गादी बळकावली (१२९०).

अभ्यास

१. कुतुबुद्दीन ऐबक अथवा बल्बन याचें थोडक्यांत चरित्र सांगा.

२. कुतुबुद्दीन ऐबकाच्या वंशाला गुलामवंश असें कां म्हणतात ? त्या काळीं गुलामांस कसें वागवीत ? त्याचा परिणाम काय होत असे ? युरोपियन गुलामांस कसें वागवीत ?

३. गुलामवंशांतील राजांपैकीं तुम्हांस कोणता राजा आवडतो ? कां ?

४. खालीलसंबंधीं टीपा लिहा.

नासिरुद्दीन, रझिया, चंगीझखान, मोंगल लोक, कुतुबमिनार.

उतारा

१. दिल्लीचा कुतुबमिनार—मिनार कीं कीर्तिस्तंभ ?

कुतुबमिनाराचा आकार, त्याची कल्पना व त्याची रचना प्रारंभापासून मुसलमानांची आहे कीं पूर्वी असलेल्या एका हिंदु कीर्तिस्तंभाला कुतुबुद्दीन व अल्तमिश यांनीं मिनाराचें रूप दिलें या प्रश्नाचा उहापोह रायबहादूर दयाराम सहानी, जनरल कनिंगहॅम, कंवरसेन वगैरेंनीं केला. त्या उहापोहांत खालील मुद्दे आले आहेत. प्रश्न अनिर्णित आहे.

१. मिनाराच्या खालच्या मजल्यावरील भिंतीवर कुराणांतील अरबी वचनें खोदिलीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. ह्याशिवाय शेहाबुद्दीन, गियासुद्दीन, कुतुबुद्दीन वगैरेंचीं नांवेंही खोदिलीं आहेत.

३. कांहीं संस्कृत व हिंदी लेखही निरनिराळ्या मजल्यावर आहेत.

४. कुतुबुद्दीन व अल्तमिश यांनीं हा मिनार बांधला असा त्यावर उल्लेख नाहीं.

५. भिंतीवर कुराणांतील वाक्यें असलीं तरी तीं मागाहून खोदलेलीं दिसतात.

६. अरबी कुराणलेख खोदलेले दगड मागाहून बसविलेले आहेत (बेंग्लूर).

७. असे कीर्तिस्तंभ उभारण्याची कल्पना हिंदूंत होती.

वैद्यकृत-मध्ययुगीन भारत, भाग ३.

प्रश्न :—कुतुबमिनार हिंदु कीर्तिस्तंभ आहे याला प्रमाणें कोणतीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. खलजी घराणें (इ. स. १२९० – १३२०)

१. जलालुद्दीन खलजी (सन १२९०–९६):—खलजी लोक तुर्क होते. अफगाणिस्थानांतील पठाणांशीं त्यांचें वैर असे. त्यांचा पराभव करून खलजींनीं अफगाणिस्थान पादाक्रांत केला होता. खल्ज या गांवीं ते रहात म्हणून त्यांस 'खलजी' असें म्हणत. जलालुद्दीन खलजी हा गुलामवंशाच्या वेळीं फार प्रसिद्धीस आला होता. त्यानेंच सन १२९० मध्यें दिल्लीची गादी बळकावली. त्यावेळीं तो सत्तर वर्षांचा होता. स्वभावानें तो सौम्य व वृत्तीनें धार्मिक होता. त्यानें सामोपचाराचें धोरण स्वीकारलें होतें. त्यामुळें त्याचे सरदार शिरजोर बनले व लुटारू व चोर यांचेंही फावलें. तशांतच कुरा प्रांताचा सुभेदार छज्जू यानें बंड केलें होतें. त्याच्या बंडाचा मोड, जलालुद्दिनाचा पुतण्या अलाउद्दीन यानें केला. अलाउद्दीन मोठा शूर, धाडसी, पराक्रमी व महत्त्वाकांक्षी होता. राज्याच्या संरक्षणाची भिस्त त्याच्यावरच होती. सन १२९४ मध्यें महाराष्ट्रांतील देवगिरीच्या रामदेवरावावर त्यानें स्वारी केली. देवगिरीचें राज्य वैभवसंपन्न आहे असें त्याला कळलें होतें. तें लुटल्यास आपल्याला अपार संपत्ति मिळेल असें त्याला वाटलें. तेव्हां कांहीं एक कारण नसतां त्यानें देवगिरीवर, केवळ लुटीकरितां, स्वारी केली. 'चुलत्याशीं भांडून दक्षिणेंत नोकरी मिळविण्याकरितां मी येत आहें' असा त्यानें त्यावेळीं बहाणा केला. तें खरें समजून रामदेवराव स्वस्थ होता. अशा स्थितींत अलाउद्दिनानें त्याच्यावर अचानक हल्ला केला. अर्थात घाबरून गेल्यानें रामदेवरावाचा पराभव झाला. वार्षिक खंडणी देण्याचें कबूल करून रामदेवराव त्याला शरण गेला. नंतर एलिचपूर हें शहर व अपार संपत्ति घेऊन अलाउद्दीन दिल्लीस गेला. त्याच्या स्वागतार्थ जलालुद्दीन त्यास भेटण्यास गेला असतां अलाउद्दिनच्या सांगण्यावरून भेटीच्या वेळीं त्याचा खून झाला. त्यानंतर दिल्लीस जाऊन अलाउद्दिनानें दिल्लीचें राज्य घेतलें (१२९६).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. अलाउद्दीन खलजी (सन १२९६-१३१६) :—अलाउद्दीन मोठा धाडसी शिपाई होता. तो क्रूर, कपटी व निर्दय असला तरी राज्यकर्त्याला लागणारे गुण त्याच्या अंगीं चांगले होते. शिकंदराप्रमाणें आपणही जग जिंकावें व पैगंबराप्रमाणें नवीन धर्म स्थापावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. या त्याच्या दोन्ही इच्छा सफळ झाल्या नाहींत. हिंदूंचा तो द्वेष्टा होता. दक्षिणेंत यशस्वीरीतीनें त्यानेंच प्रथम पाऊल टाकलें. सुलतान झाल्यावर त्यानें आपलें राज्य वाढविण्यास सुरुवात केली. त्याच्यापूर्वींच त्यानें बुंदेलखंड व माळवा हे प्रांत लुटून पुष्कळ संपत्ति मिळविली होती. सन १२९८ मध्यें त्यानें गुजराथप्रांतावर स्वारी केली. राजा कर्णराय वाघेला त्यावेळीं अन्हिलवाडच्या गादीवर होता. तो देवगिरीस पळून गेला. त्याची राणी कमलदेवी अलाउद्दिनाच्या हातीं लागली. तिच्याशीं त्यानें लग्न केलें. त्यानंतर त्यानें सोरटी सोमनाथावर हल्ला केला व तें मंदीर लुटलें. या विजयानें सर्व गुजराथप्रांत अलाउद्दिनाच्या हातीं आला व त्याला अपार संपत्ति लाभली. त्यानंतर त्यानें रजपुतांकडे नजर फिरविली. प्रथम त्यानें सन १३०० मध्यें रतनभोरचा मजबूत किल्ला वेढा घालून जिंकून घेतला. तेथील राजा हंबीरदेव, प्रधानाच्या फितुरीनें, अलाउद्दिनाच्या हातीं लागला. त्याला त्यानें ठार केलें; त्याच्या प्रधानालाही त्यानें नंतर कंठस्नान घातलें. त्यानंतर तो चितोडवर चालून गेला.

३. चितोडवर स्वारी (सन १३०३) :—चितोडचें रजपूत राज्य श्रेष्ठ व सामर्थ्यवान समजलें जाई. तेथें लक्ष्मणसिंह राज्य करीत होता. त्याचा चुलता भीमसिंग. भीमसिंगाची राणी पद्मिनी ही अत्यंत लावण्यवती स्त्री होती. तेव्हां तिचें हरण करावें असें अलाउद्दिनास वाटत होतें. चितोड जिंकल्यास सर्व रजपूत आपल्या कह्यांत राहतील असा त्याचा हेतु होता. शेवटीं सन १३०३ मध्यें त्यानें चितोडवर स्वारी करून भीमसिंगास कैद केलें. 'पद्मिनी देत असल्यास तुझी सुटका होईल' असें अलाउद्दिनानें त्यास सांगितलें. ही बातमी पद्मिनीस समजली तेव्हां तिनें मोठ्या युक्तीनें त्यांतून त्याची सुटका केली. आपण लव्याजम्यासह सुलतानाच्या भेटीस जाणार असें तिनें सर्वांस कळविलें. लगेच पालख्यांतून अनेक बुरखेवाल्या अलाउद्दिनाकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठविण्यांत आल्या. प्रत्येक पालखींत बुरखा घेतलेला एकेक शूर हत्यारबंद रजपूत होता. भोईही हत्यारबंद रजपूत योद्धे होते. हे सर्व लोक अलाउद्दिनाच्या गोटांत गेले. पद्मिनीच्या लोभामुळें अलाउद्दिनानेंही सर्वांस जाऊं दिलें. तेथें गेल्यावर सर्वांनीं आपलें खरें स्वरूप सर्वांच्या निदर्शनास आणून देऊन भीमसिंगाची सुटका केली. या प्रकारानें अलाउद्दिनाच्या गोटांत हाहाःकार उडाला! त्याच वेळीं दिल्लीवर मोंगल लोकांनीं स्वारी केल्याचें कळल्यानें अलाउद्दिनाला तिकडे जाणें भाग पडलें. पण पुढें सन १३०४ मध्यें मोठ्या तयारीनिशीं तो चितोडवर पुन्हां चालून आला; व त्यानें चितोड जिंकलें. तेव्हां अब्रू वांचविण्याकरितां रजपूत स्त्रियांनीं 'जोहार' करून आपल्याला जाळून घेतलें. अनेक रजपूत वीर व त्यांचा राणा लक्ष्मणसिंह आपल्या अकरा मुलांसह धारातीर्थी पतन पावले. परंतु चितोड अलाउद्दिनाच्या हातीं फार काळ टिकलें नाहीं. कारण सन १३१३ मध्यें राणा हमीर यानें तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें.

४. मोंगलांचा उपद्रव :—अलाउद्दिनाच्या कारकीर्दींत मोंगल लोकांनीं चार-पांच स्वाऱ्या केल्या. सन १२९६ त त्यांचा पुढारी अमीर दाऊद यानें पहिली स्वारी केली; परंतु लाहोरजवळ अलाउद्दिनाचा सेनापति अलेफखान यानें त्याचा पराभव केला. पुढें सन १२९८ मध्यें त्यांनीं दुसरी स्वारी केली. त्यावेळीं दाऊदचा मुलगा कुत्लघखान दिल्लीपर्यंत चाल करून गेला; परंतु त्याचाही मोड झाला. सन १३०३ व सन १३०४ या दोन्ही वर्षांत त्यांनीं पुन्हां स्वाऱ्या केल्या, लुटालूटही केली व ते परत गेले. त्यानंतर सन १३०५ मध्यें त्यांची अखेरची टोळधाड पंजाबवर आली. मुलतान प्रांतही त्यांनीं घेतला. तेव्हां अलाउद्दिनाचा तेथील कारभारी गाझीबेग तुगलुक यानें त्यांचा पाठलाग करून त्यांचा फन्ना उडविला. हीच मोंगलांची अलाउद्दिनाच्या वेळची अखेरची स्वारी. मोंगलांचे हल्ले वरचेवर होतात हें पाहून अलाउद्दिनानें त्यांच्या निवारणार्थ खालील उपाय योजिले होते. (१) सरहद्दीवरील टापूंतील किल्ल्यांची त्यानें उत्तम तटबंदी केली. (२) दिल्लीस त्यानें कायमचें खडें सैन्य उभारलें. (३) त्या सैन्यांतील शिपायांचा पगार ठरवून दिला. त्यांचा चरितार्थ नीट चालावा म्हणून दिल्लीच्या बाजारां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तील वस्तूंच्या किंमती ठरवून दिल्या. (४) वजनें-मापें ठरवून दिलीं. (५) सरकारी धान्याचीं कोठारें उघडलीं. (६) वरील नियमांचें पालन योग्यरीतीनें होतें कीं नाहीं तें पाहण्याकरितां त्यानें अधिकारी नेमले. या सर्व सुधारणांमुळें त्याचें लष्कर मात्र उत्तम तयार झालें व त्याच्या जोरावरच मोंगलांचा शेवटचा हल्ला त्याला परतवितां आला.

५. मलिक काफूर–दक्षिणच्या स्वाऱ्या :—मोंगलांचा व रजपुतांचा मोड झाल्यावर अलाउद्दिनास दक्षिणेकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली. देवगिरीचा राजा रामदेवराव ठरलेली खंडणी नियमितपणें देत नसे. तेव्हां त्याच्यावर अलाउद्दिनानें मलिक काफूर या आपल्या सरदारास पाठविलें. गुजराथच्या स्वारींत असतां तेथील एका माणसानें आपला एक ' हजार-दिनारी ' गुलाम अलाउद्दिनास नजर केला होता. तोच मलिक काफूर होय. मोठा रूपसुंदर असल्यानें मलिक आपल्या धन्यास फार आवडे. तो शूर योद्धा होता. सन १३०४ मध्यें तो मोंगलांविरुद्ध लढला होता. आपल्या कर्तबगारीनेंच तो भाग्योदयास चढला होता. त्यानें अलाउद्दिनाच्या हुकुमा-प्रमाणें सन १३०८ मध्यें देवगिरीवर स्वारी केली व रामदेवरावास पकडून दिल्लीस पाठवून दिलें. अलाउद्दिनानें त्याला मानानें वागवून त्याला त्याचें राज्य परत दिलें. पुढें सन १३०९ मध्यें काफूरनें तेलंगणावर स्वारी करून वारंगळ हें राजधानीचें धनाढ्य शहर लुटलें. तेव्हां तेथील राजानें सुल-तानाचें आधिपत्य मान्य करून वार्षिक खंडणी देण्याचें कबूल केलें. नंतर सन १३१० मध्यें काफूरनें कर्नाटकांतील होयसळांच्या राज्यावर स्वारी केली. द्वारसमुद्र हें राजधानीचें ठिकाण त्यानें काबीज केलें. पुढें मदुरा येथील पांड्य राजांचा पराभव करून त्यानें कन्याकुमारीपर्यंत धडक मारली. ठिकठिकाणीं त्यानें आपले मुसलमान अधिकारी नेमले. सन १३१२ मध्यें रामदेवराव मृत्यु पावल्यानें त्याचा मुलगा शंकरदेव स्वतंत्रपणें कारभार करूं लागला. तेव्हां काफूरनें त्याच्यावर स्वारी करून त्याचा वध केला व त्याचें राज्य अलाउद्दिनाच्या राज्यास जोडून घेतलें. दक्षिणेंत स्वाऱ्या करण्यांत अपार संपत्ति मिळवावी एवढाच अलाउद्दिनाचा उद्देश होता; राज्य स्थाप-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्याचा नव्हता. काफूरनें दक्षिणेंतून ६१२ हत्ती, २५००० घोडे, शेंकडों मण सोनें व रत्नें दिल्लीस नेलीं व सुलतानास दिलीं !

६. अलाउद्दिनाची योग्यता:—सन १३१६ मध्यें अलाउद्दीन मृत्यु पावला. तो कठोर पण कर्तबगार होता. सर्व हिंदुस्थान जिंकण्याचा त्याला पहिला मान मिळाला. आपल्या सरदारांस ताब्यांत ठेवण्याकरितां त्यानें कडक उपायांची योजना केली होती. त्यांना मदिराप्राशनाची व आपल्या परवानगीशिवाय लग्न करण्याचीही त्यानें बंदी केली होती. त्यांच्यावर नजर ठेवण्याकरितां त्यानें अनेक हेरही सर्वत्र नेमले होते. अनेकांच्या जहागिरी व इनामेंही त्यानें जप्त केलीं होतीं. हिंदूंचा तो पक्का द्वेष्टा होता. ते सधन असल्यानें अनेक प्रकारचीं बंडें करण्यास प्रवृत्त होतात असा त्याचा समज होता. तेव्हां त्यांस निष्कांचन करण्याकरितां त्यानें त्यांच्या कपड्यांवर, गुरांवर व घरांवर कर बसविले. त्यांनीं पालख्यांतून जाऊं-येऊं नये असाही त्यानें हुकूम काढिला होता. हिंदूंवर 'जिझिया' कर त्यानेंच प्रथम लादला. एकंदरींत त्याची कारकीर्द यशस्वी दिसत असली तरी असंतोषाचीं बीजें खोलवर सर्वत्र गेलेलीं होतीं. अलाउद्दीन स्वतः निरक्षर होता. त्याचें धर्मवेड कमालीचें होतें. तो क्रूर व निर्दयही होता. परंतु हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत त्याला यशच येत गेलें. तो उत्तम शिपाई होता. त्यामुळेंच त्याला अचाट कृत्यें करतां आलीं व राज्याचा उत्तम प्रकारचा बंदोबस्त करतां आला. प्रसिद्ध इतिहासलेखक जियाउद्दीन बरनी त्याच्या पदरीं होता.

७. खलजी घराण्याचा शेवट:—अलाउद्दिनानंतर सर्वत्र बेबंदशाही माजली. मलिक काफूरनें आपल्या धन्याच्या धाकट्या मुलास गादीवर बसविलें; परंतु त्याचा खून झाला. पुढें बंडाळी माजली. त्यांत काफूरचाही खून झाला. तेव्हां अलाउद्दिनाचा तिसरा मुलगा मुबारक राज्यावर बसला. तो चैनी व विलासी असल्यानें त्याच्याकडून राज्यकारभार नीटपणें झाला नाहीं. तो पुढें लोकांस छळूंही लागला. तेव्हां सन १३२१ मध्यें, त्यानेंच मोठ्या पदावर चढविलेला मलिक खुसरौ यानें त्याचा खून केला; व दिल्लीची गादी बळकावली. त्याचा कारभारही जुलमी होऊं लागला. तो हिंदु अंत्यज असून पुढें मुसलमान झाला होता. सुलतान झाल्यावर तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुसलमानांस छळूं लागला. त्याच्या अनुयायांनीं मशिदींमध्यें मूर्तींची स्थापना केली, कुराणाचीं पुस्तकें बसण्यास घेण्यास सुरुवात केली व मुसलमान सरदारांच्या स्त्रियांस भ्रष्ट करण्यास कमी केलें नाहीं. या सर्व गोष्टींमुळें सर्वत्र कहर उडाला. तेव्हां पंजाबचा सुभेदार गाझीबेग तुगलुक यानें दिल्लीवर स्वारी केली, खुसरौस ठार केलें व तो स्वतः दिल्लीचा सुलतान झाला. अशातऱ्हेनें खलजीवंशाचा शेवट झाला व दिल्लीस तुगलुक वंशाची स्थापना झाली (१३२१).

अभ्यास

१. अलाउद्दीन खलजीचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा.

२. अलाउद्दीन व मलिक काफूर यांनीं दक्षिणेवर कां स्वारी केली? त्याचा परिणाम काय झाला? दक्षिणेंतील कोणतीं राज्यें सुलतानानें जिंकलीं?

३. मलिक काफूरच्या दक्षिणेंतील मोहिमांचें वर्णन द्या.

४. खालीलसंबंधीं टीपा द्याः—
पद्मिनी, मलिक काफूर, मलिक खुसरौ, जलालुद्दीन.

५. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख कराः—
रामदेवराव, कमलदेवी, हंवीरदेव, राजा कर्ण, भीमसिंग, जोहार, कुतलघखान, गाझीबेग तुगलुक.

६. अलाउद्दिनाचें धार्मिक धोरण वर्णा. मोंगलांचा उपद्रव नाहींसा करण्याकरितां त्यानें कोणते उपाय योजले?

उतारा

१. अलाउद्दिनाचें धोरण

राज्यांतील बंडें नष्ट करण्याकरितां लोकांची मालमत्ता जप्त करण्याचें धोरण सुलतानानें स्वीकारलें. लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं त्यानें गांवेंच्या गांवें जप्त करून सरकारजमा केलीं. लोकांवर जुलूम करून या ना त्या मार्गानें त्यानें अनेकांकडून पैसे उकळले. इनामें, वतनें, जमिनींची बक्षिसी, पेन्शनें वगैरे सर्व प्रकार त्यानें रद्द केले. यामुळें जो तो आपला प्राण वांचविण्याकरितां प्रयत्न करूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागला. त्याचें हेरखातें तर इतकें प्रभावी ठरलें कीं त्याला प्रत्येकासंबंधींची बित्तंबातमी बीनबोभाट कळूं लागल्यानें, चार भिंतींच्या आंत हळू बोलण्याचीहि प्रत्येकास चोरी वाटूं लागली ! हेरांचा सुळसुळाट इतका झाला कीं, हेर म्हटला कीं प्रत्येकाच्या अंगाचा नुसता थरकांप होई. सुलतानानें आपल्या राज्यांत सर्वत्र दारूबंदी केली होती. जुगारही त्यानें बंद केला होता. सर्व कलालांची त्यानें शहरांबाहेर हकालपट्टी केली, दारूवरील सर्व कर रद्द केले व दारूचीं भांडीं फोडून टाकण्यांत आलीं. त्यामुळें देशांत चोरूनमारून दारू गाळण्यास सुरुवात झाली. तेव्हां सुलतानानें अशा लोकांस पकडून फटक्यांच्या व तुरुंगवासाच्या शिक्षा दिल्या. सरदारांवर त्यानें अनेक निर्बंध घातले. त्यांनीं एकमेकांकडे जाऊं नये, मेजवान्या देऊं नये, समारंभ करूं नयेत, सुलतानाच्या संमतीशिवाय लग्नें करूं नये व परकीयांस आपल्या घरीं राहूं देऊं नये वगैरे निर्बंध सरदारांस निमुटपणें पाळावे लागत. हिंदूंवर त्याची विशेष नजर होती. त्यांनीं घोडा बाळगूं नये, उत्तम व उंची पोशाख लेवूं नये, चैन व नाचरंग करूं नयेत अशी त्याची सक्त ताकीद होती. यामुळें कोणाही हिंदूची डोकें वर काढण्याची छाती नव्हती किंवा सोन्यारुप्याचा अथवा अन्य चैनी पदार्थांचा उपभोग घेणें त्यांस शक्य नव्हतें.

—बराणीच्या तारीख–ई–फिरोजशाहीवरून.

प्रश्न :—१. सरदार व हिंदु यांस अलाउद्दीन कसें वागवी ? कां ?

२. त्यानें दारूबंदी कां केली ? त्यानें हेरखात्याचा काय उपयोग केला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—गुलाम व खलजी घराणीं–१२०६–१३२०.

वर्ष	हिंदुस्थान	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
१२०६–१२१०	कुतुबुद्दीन ऐबक	मॅग्नाकार्टा (१२१५)	स्टीफन लँग्टन,
१२२७	चंगीझखानाचा मृत्यु	तिसरा हेन्री (१२१६–१२७२)	चंगीझखान,
१२३५	अल्तमिशचा मृत्यु		
१२३६–३९	सुलताना रझिया	ऑक्सफर्डची सभा १२५४	
१२४६–६६	नासिरुद्दीन		
१२६६–८६	बल्बन	यादवी युद्ध १२६४	तुघ्रलखान, सायमन-ड-मॉंटफर्ड
१२९०–९६	जलालुद्दीन खलजी	पार्लमेंटची स्थापना १२६५	नामदेव, ज्ञानेश्वर,
१२९८	अलाउद्दीन गुजराथ घेतो	पहिला एडवर्ड १२७२–१३०७	कर्णराय, पद्मिनी,
१३०३	चितोडवर स्वारी	वालेसला फांशी १३०५	रामदेवराव, भीमसिंह,
१३०८	मलिक काफूरची देवगिरीवर स्वारी		रॉबर्ट ब्रूस, वालेस मलिक काफूर,
१३१२	रामदेवरावाचा मृत्यु	बॅनॉकबर्नची लढाई १३१४	
१३१६	अलाउद्दिनाचा मृत्यु		राणा हमीर, बरनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२०. तुगलुक, सय्येद व लोदी घराणीं

१. मोहंमद तुगलुक (सन १३२६-५१):—गाझीबेग तुगलुकनें दिल्लीचें सुलतानपद सन १३२१ मध्यें मिळविलें. तुगलुक घराण्याचा तोच संस्थापक होय. त्यानें पांच वर्षें राज्य केलें. सुलतान झाल्यावर त्यानें गियासुद्दिन हें नांव धारण केलें होतें. बल्बनच्या पदरीं तो गुलाम होता. अलाउद्दिनाच्या वेळीं तो पुढें आला. त्यानें अनेक सुधारणा केल्या, अनेक करही कमी केले. वारंगळ येथें बंड झालें होतें, तें त्याचा मुलगा उलुगखान यानें मोडलें. बंगालवर त्यानें स्वतः स्वारी केली व तेथील बंडें मोडलीं. तेथून परत आल्यावर अपघातानें त्याला मृत्यु आला (१३२६). त्याच्या नंतर त्याचा मुलगा उलुगखान ऊर्फ **मोहंमद तुगलुक** दिल्लीचा सुलतान झाला. तो पट्टीचा विद्वान, निःपक्षपातबुद्धीनें न्यायदान करणारा व धार्मिक बाबतींत उदारमतवादी होता. अत्यंत उद्योगी म्हणूनही तो प्रसिद्ध होता. असें असलें तरी तो रागीट व छांदिष्ट होता. त्याचा एककल्लीपणा व उतावळेपणा कमालीचा होता. व्यवहारदक्षता व तारतम्य यांचा अभावही त्याच्या ठिकाणीं होता. यामुळें तो वेडा म्हणून समजला जातो! तो कडक होता. शुद्ध वर्तन व दातृत्व यांबद्दल त्याची ख्याति होती. तो दारूस स्पर्श करीत नसे. सेनानायक या नात्यानें त्यानें चांगली कामगिरी केली. हट्टीपणांत त्याचा कोणीही हात धरला नसता. अनेक उच्च मनोरथ त्यानें रचिले व ते सिद्धीस नेण्यास त्यानें कमालीची खटपट केली. त्याच्या कल्पना उच्च होत्या; त्याचे हेतूही शुद्ध होते. त्या सर्वांस तारतम्य व व्यावहारिक शहाणपण यांची त्याला जोड देतां न आल्यानें त्याची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली.

२. मोहंमदाच्या मूर्खपणाच्या कल्पना:—सन १३२७ मध्यें तुर्कस्थानचा सुलतान तर्मशीरीखान यानें मोंगल लोकांच्या मदतीनें दिल्लीपर्यंत स्वारी केली. तेव्हां मोंगलांना जबर खंडणी देऊन मोहंमदानें त्यांस वाटेस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लावलें. पुढें त्यानें इराणवर स्वारी करण्याची मनीषा धरली. परंतु पैशाच्या अभावीं त्याला तो बेत रद्द करावा लागला. सन १३३० मध्यें चीनवर स्वारी करण्याकरितां आपला पुतण्या खुसरौ मलिक याला त्यानें नेपाळच्या हद्दींतून व हिमालयाच्या पहाडांतून जाण्यास सांगितलें. रस्त्यानें त्या लष्कराची फार आबाळ झाली. चीनच्या सरहद्दीवरच त्या लष्कराचा पराभव झाला. तेव्हां परत येत असतां हिमालयांतील थंडी, पाऊस, डोंगरी मुलूख वगैरेमुळें शिपायांचे अनंत हाल झाले व एक लाख लोकांपैकीं फक्त दहाच शिपाई परत स्वदेशीं आले! या योजनांमुळें अपार संपत्ति खर्चीं पडली. तेव्हां त्यानें लोकांवर नवे कर लादले व ते सक्तीनें वसूल करण्यास सुरुवात केली. त्यांतच देशांत मोठा दुष्काळ पडला. त्यामुळें देशांत बंडाळी माजली. उत्तरेंत दुष्काळ व दक्षिणेंत बंडाळी, यामुळें मोहंमद त्रासून गेला. त्यांतून सुटका करून घेण्याकरितां त्यानें एक अचाट कल्पना योजिली. ती म्हणजे दिल्ली ही राजधानी बदलून दक्षिणेंत दौलताबाद येथें राजधानी नेणें ही होय. देवगिरी या प्राचीन नगरास दौलताबाद हें नांव त्यानेंच दिलें होतें.

३. राजधानी बदलली :—सन १३३६ मध्यें दिल्लींतील सर्व लोकांस आपलीं घरेंदारें सोडून व आपली संपत्ति, मालमत्ता व मुलेंबाळें बरोबर घेऊन दौलतबाद ऊर्फ देवगिरी येथें जाण्याचा त्यानें हुकूम सोडला. त्याची अंमलबजावणीही त्यानें कडकरीतीनें केली. वाटेनें लोकांचे अतोनात हाल झाले. बरें, दौलताबादेस गेल्यावर तरी त्यांची नीट सोय लागावयाची! तेंही घडलें नाहीं. सुलतानाचेंही तेथें नीट बस्तान बसेना. तेव्हां त्यानें सर्वांस पुन्हां दिल्लीस परत जाण्याचा हुकूम सोडला. सर्वांचे पुन्हां अतोनात हाल झाले व अनेक लोक मृत्युमुखीं पडले. आपल्या या मूर्खपणाच्या कृत्याबद्दल पुढें त्यास चांगलाच पश्चात्ताप झाला. त्यामुळेंच त्यानें लोकांना अनेक प्रकारें साहाय्य केलें, त्यांस कर माफ केले, शेतकऱ्यांस कर्जाऊ पैसे दिले व आपल्या चुकीचें परिमार्जन करण्याचा प्रयत्न केला. परंतु या सर्व गोष्टींमुळें लोकांचें झालेलें नुकसान भरून निघणें शक्य नव्हतें.

४. तांब्यांचीं नवीं नाणीं :—सन १३२७ मध्यें मोहंमदानें लोकांचें नुकसान भरून काढण्याकरितां तांब्याचीं नाणीं पाडलीं व त्यावेळीं चालू अस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेल्या सोन्याच्या नाण्यांऐवजीं त्यांचा उपयोग व्हावा असें त्यानें फर्माविलें. त्यावेळचीं सोन्याचीं नाणीं आकारबद्ध नसत; त्यांच्यावरील छापही नीट नव्हते. म्हणून तांब्याचीं सुंदर नाणीं त्यानें पाडलीं. परंतु नाणीं पाडण्यास त्यानें कोणासही मनाई केलेली नव्हती. अर्थात् अनेकांनीं सरकारी नाण्यां-सारखीं तांब्याचीं नाणीं पाडलीं. त्यामुळें राज्यांत सर्वत्र तांब्याचीं नाणीं दिसूं लागलीं व सोन्याच्या नाण्यांबद्दल सर्वत्र ओरड होऊं लागली. बाजारभाव कडाडले, परदेशाचा व्यापार मंदावला व सर्वत्र गोंधळ माजला. तेव्हां मोहंमदानें नवें नाणें सरकारांत देऊन त्याबद्दल सोन्याचें नाणें घेऊन जाण्यास सर्वांस सांगितलें. ताबडतोब जो उठला तो सरकारी तिजोरींतून सोन्याचीं नाणीं घेऊन येऊं लागला! त्यामुळें सरकारी तिजोरींत सोन्याच्या नाण्यांची टंचाई भासूं लागली. शेवटीं मोहंमदाला आपली चूक कळून आली व त्यानें आपला हुकूम परत घेतला.

५. मोहंमदाचा मृत्यु (१३५१):—मोहंमदाच्या मूर्खपणाच्या कृत्यां-मुळें सर्वत्र बंडाळी माजली. फौजेनेंही बंड केलें. एकीकडे बंडाचा मोड करावा, तर दुसरीकडे बंड उद्भवे. बंगाल, सिंध, महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे दूरदूरचे प्रांत स्वतंत्र झाले. त्यामुळें सुलतान चिडला. सिंधमधील बंड मोडत असतांच तो सन १३५१ मध्यें ठठ्ठा येथें मरण पावला. त्याच्याच वेळीं दक्षिणेंत दोन मोठीं राज्यें स्थापन झालीं. हसन गंगू नांवाच्या एका बंडखोर सरदारानें सन १३४७ मध्यें गुलबर्गा येथें 'बहामनी' राज्याची स्थापना केली. तसेंच हरिहर व बुक्क या दोघा भावांनीं विद्यारण्यस्वामींच्या मदतीनें विजयनगरचें राज्य स्थापिलें (१३३६). मोहंमदाच्या बेलगामी धोरणामुळें त्याच्या राज्याचें फार नुकसान झालें व तें मोडकळीस आलें. बरनी व इब्ने बतूता या दोघा इतिहासलेखकांनीं त्याच्या वेळचा इतिहास लिहून ठेवला आहे. बतूता हा आफ्रिकेंतील मुसलमान सन १३४० मध्यें मोहंमदाकडे आला होता व तो सात वर्षें त्याचा आश्रित होता. कांहीं दिवस तो सुलतानाचा न्यायाधीशही होता. पण तें काम त्याला न आवडल्यानें तो पुढें स्वदेशीं निघून गेला.

६. फेरोज तुगलुक (१३५१–१३८८):—मोहंमद तुगलुकनंतर त्याचा चुलतभाऊ फेरोज तुगलुक दिल्लीचा सुलतान झाला. तो शांतता-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रिय, शाहणा, प्रजाहितदक्ष व सौम्य वृत्तीचा होता. राज्यविस्तारापेक्षां राज्यव्यवस्थेकडेच त्याचें लक्ष असे. राज्यावर आल्यावर त्यानें अनेकांस नुकसानभरपाई दिली व शेतकऱ्यांना कर्ज माफ केलें. यामुळें तो सर्वांस प्रिय झाला. त्यानें सन १३५३ मध्यें बंगालवर व सन १३५९ मध्यें सिंधवर स्वाऱ्या केल्या. त्यांत त्याला फारसें यश लाभलें नाहीं. तेव्हां त्यानें तेथील सरदारांशीं तह केले. यानंतर फेरोजनें फारशीं युद्धें केलीं नाहींत. या कामीं मुकिबलखान या त्याच्या वजीरानें त्याला फार मदत केली. तो हिंदु होता. त्याचें मूळ घराणें तेलंगणांतील होय. फेरोजचें त्याच्यावर फार प्रेम होतें. त्यानें पुढें मुसलमानीधर्म स्वीकारला. तेव्हांपासून तो फेरोजवर वजन ठेवून होता.

७. फेरोजच्या सुधारणा:—लोकोपयोगी कृत्यें केल्यामुळें फेरोजचें नांव महशूर झालें आहे. त्यानें अनेक कालवे बांधले. त्यांत यमुना नदीवर त्यानें बांधलेला कालवा फार मोठा आहे. तो सुमारें दोनशें मैल लांबीचा आहे. अजूनही तो चांगल्या स्थितींत आहे. पडित जमिनी लागवडीस आणण्याकरितां त्यानें शेतकऱ्यांस मदत केली. अनेक क्रूर शिक्षा त्यानें रद्द केल्या. इमारती बांधण्याचा त्याला शोक होता. त्यानें अनेक मशिदी बांधल्या. दिल्लीजवळील फिरोझाबाद व जोनपूर हीं शहरें त्यानेंच वसविलीं. त्याशिवाय त्यानें अनेक राजवाडे, धर्मशाळा, पूल व किल्ले बांधले. या सर्व सत्कृत्यांबरोबरच त्यानें एक दोन मोठ्या चुका केल्या. पहिली म्हणजे अधिकाऱ्यांस पगाराबद्दल तो जहागिरी देऊं लागला. दुसरें असें कीं, वार्षिक खंडणीऐवजीं तो गुलामांचाही स्वीकार करूं लागला. हिंदूंना मात्र तो वाईटरीतीनें वागवीत असे. त्यानें हिंदूंचीं देवळें पाडलीं, जिझिया कर चालू ठेवला व मूर्तिपूजा करणारांस शिक्षा ठेविली. प्रजेच्या हिताच्या दृष्टीनें फेरोजचा कारभार चांगला झाला. तो सन १३८८ मध्यें मृत्यु पावला.

८. तुगलुक घराण्याचा शेवट:—फेरोजच्या मृत्यूनंतर सर्वत्र यादवी माजली. दिल्लीचे सुलतानही दुर्बल असल्यानें त्यांचा दरारा नष्ट झाला. त्यामुळें रजपूत व हिंदू स्वतंत्रपणें वागूं लागले. राज्यांत सर्वत्र अंदाधुंदी माजून गेली. दिल्लीचे सुलतान नामधारी बनून कोणी ना कोणी सरदार राज्यकार-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भार कसाबसा करी. अशा स्थितींतच सन १३९८ मध्यें तैमूरलंग या समरकंदच्या राजानें दिल्लीवर स्वारी केली. तो जातीनें तुर्क होता. एका युद्धांत त्यानें एक पाय गमावला होता. त्यामुळें त्यास 'लंग' हें नांव मिळालें. तो अत्यंत बुद्धिमान व विलक्षण धाडसी होता. स्वपराक्रमानें त्यानें समरकंद येथें राज्य स्थापिलें होतें. पुढें मोंगलांच्या या राजानें चीन, इराण, रशिया, अफगाणिस्थान वगैरे प्रांत जिंकून तेथें आपलें राज्य स्थापिलें. हिंदुस्थानांत अंदाधुंदी आहे असें समजल्यावरून तो तडक दिल्लीवर चाल करून आला. तेथील सुलतानाचा पराभव करून त्यानें पंधरा दिवस दिल्ली लुटली, अनेकांस यमसदनीं पाठविलें, अनेक मूर्ति फोडल्या व

तैमूरलंगाचा दरबार

अपार संपत्ति घेऊन तो स्वदेशीं निघून गेला. जातांना त्यानें खिजरखान सय्येद यास दिल्लीस आपला प्रतिनिधी नेमलें होतें. तैमूरलंग अत्यंत दुष्ट होता; तरी तो विद्या व कला यांना योग्य आश्रय देत असे. हिंदुस्थानांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक कसबी लोक त्यानें आपल्याबरोबर गुलाम म्हणून स्वदेशीं नेले होते. तो सन १४०५ मध्यें मृत्यु पावला. तैमूरलंगाच्या स्वारीमुळें दिल्लीची सुलतानशाही गडगडली व तुगलुक घराण्याचा अंमल खिळखिळा झाला. शेवटीं सन १४१६ मध्यें पंजाबचा सुभेदार सय्येद खिजरखान यानें दिल्लीवर स्वारी करून तेथील राज्य बळकावलें.

९. सय्येद घराणें (सन १४१४–१४५०):—तैमूरलंगानें खिजरखानास आपला मुखत्यार नेमलें होतें. त्यानेंच तुगलुक घराण्यांतील मोहंमदशहा या शेवटच्या सुलतानाच्या मृत्यूनंतर दिल्लीची गादी बळकावली. मुसलमानी धर्मसंस्थापक मोहंमद पैगंबर याचा तो वंशज असल्यानें त्याच्या घराण्याला 'सय्येद' असें म्हणत. खिजरखानानें सुलतानपद धारण केलें नाहीं. तैमूरलंगाचा कारभारी या नात्यानेंच त्यानें सर्व कारभार हांकला. त्याचें राज्यही पूर्वीसारखें मोठें नव्हतें. बहुतेक सर्व प्रांत स्वतंत्र झाले होते. दिल्ली व त्याच्या आजुबाजूचा प्रदेश एवढाच मुलूख शिल्लक होता. सय्येद खिजरखान सन १४२७ मध्यें मृत्यु पावला व त्याच्यानंतर त्याचा मुलगा मुबारक गादीवर बसला. तो सौम्य प्रकृतीचा होता. त्याचा पुढें सन १४३५ मध्यें खून झाला. त्याचा मुलगा मोहंमद व नातु अलाउद्दीन यांनीं पुढें पंधरा वर्षें कसाबसा कारभार केला. शेवटीं सन १४५० मध्यें पंजाबचा सुभेदार बहलोल लोदी यानें दिल्लीचें सुलतानपद बळकावलें.

१०. लोदी घराणें (सन १४५०–१५२६):—बहलोल लोदी अफगाण होता. आपल्याबरोबर त्यानें पुष्कळ अफगाण लोक दिल्लीस नेले व त्यांना अधिकारी नेमलें. बहलोल मोठा उदार व पराक्रमी होता. त्यानें आपली सत्ता हळूहळू वाढविण्याचा उपक्रम सुरू करून जोनपूरचें राज्य काबीज केलें. बंगालपर्यंतही त्यानें आपल्या राज्याची सरहद्द पोंचविली होती. मेवाडवर त्यानें आपला अंमल स्थापिला व ग्वाल्हेर, इटावा इत्यादि ठिकाणच्या स्वतंत्र सरदारांकडून खंडणी घेतली. सन १४८८ मध्यें तो मरण पावल्यावर त्याचा तिसरा मुलगा सिकंदर गादीवर बसला. त्यानें बहार प्रांत आपल्या राज्यास जोडला. परंतु धोलपूर, चंदेरी, ग्वाल्हेर येथील राजे स्वतंत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाले. सिकंदर परोपकारी होता. त्यानें पोलिसखातें निर्माण करून लोकांच्या संरक्षणाची सोय केली. घोड्यावरील टपालाची त्यानें सुरुवात केली. पुष्कळ रस्तेही त्यानें बांधले. न्यायदानाची त्याची व्यवस्था चोख होती. तो विद्वान होता. इस्लामी धर्माचा तो कडवा उपासक होता. त्यामुळें हिंदूंचा त्यानें फार छळ केला. तो सन १५१७ मध्यें मृत्यु पावला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा इब्राहीम गादीवर आला. त्याच्या वेळीं अफगाण सरदारांचें प्राबल्य फार वाढलें होतें. तेव्हां त्यांना काबूंत ठेवण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. त्यामुळें ते चिडले व इब्राहीमचा दुसरा भाऊ जलालखान यास जोनपूरला स्वतंत्रपणें सुलतान म्हणून स्थापन केलें. तेव्हां जलालखानावर इब्राहीम चाल करून गेला व त्याचा त्यानें पराभव करून खून केला. त्यानंतर अफगाण सरदार चिडले व त्यांनीं सर्वत्र उचल केली. तेव्हां बहार प्रांत स्वतंत्र झाला. पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी सुलतानास जुमानीनासा झाला. तेव्हां इब्राहीमचा चुलता अलाउद्दीन लोदी काबूलास गेला व तेथें कारस्थानें करूं लागला. शेवटीं दौलतखान लोदीनें मोंगलांचा पुढारी बाबर याला आपल्या मदतीस बोलाविलें. त्याचें बोलावणें स्वीकारून मोठ्या सैन्यानिशीं बाबर इब्राहीमवर चालून गेला. सन १५२६ मध्यें पानिपत येथें मोठी लढाई होऊन बाबराची फत्ते झाली, इब्राहीम मारला गेला व त्याचें राज्य बाबरच्या हातीं आलें. तेव्हां मोंगलसत्तेची स्थापना बाबरानें दिल्लीस केली व त्यामुळें लोदी घराण्याचा नाश झाला.

अभ्यास

१. मोहंमद तुगलुकचा स्वभाव वर्णा. त्याच्या चुका सांगून त्यांचा राज्यावर परिणाम काय झाला तें सांगा. तो वेडा होता का? कारणें द्या.

२. फेरोजशहा तुगलुक लोकांस प्रिय कां झाला? त्याची कारकीर्द वर्णा.

३. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.

पानिपतची लढाई, गियासुद्दीन, उलुगखान, सिकंदर लोदी, तर्मेशिरीखान, बाबर, दौलतखान, हसन गंगू, हरिहर व बुक्क, इब्ने बतूता, बरनी, खुसरौ मलिक, मुकिबलखान.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. थोडक्यांत चरित्रें सांगा.

चंगीझखान, तैमूरलंग, खिजरखान, इब्राहीम लोदी.

५. मोहंमद तुगलुक तुमच्यासमोर उभा आहे असें समजून त्याच्या कारकीर्दीसंबंधीं त्याच्याशीं जी चर्चा होईल ती लिहून काढा.

उतारे

१. दिल्लीची राजधानी बदलण्याचा घाट.—१३३६

आपापलीं घरेंदारें सोडून देऊन दिल्ली शहर खालीं करण्याचा हुकूम मोहंमद तुगलुकानें आपल्या प्रजेस दिला, म्हणून त्याच्यावर गहजब उडाला. लोकही त्याला फार चिडवीत व त्यामुळें तो त्रासून गेला होता. उपरोधिक पत्रें व शिव्यांच्या लाखोल्यांनीं भरलेले कागद, रात्रींच्या वेळीं त्याच्या दरबारांत, लोक फेकीत. तेव्हां दिल्लीवर सूड उगविण्याचें सुलतानानें ठरविलें. सर्व घरें त्यानें विकत घेतलीं व सर्वांस दौलताबादला जाण्याचा हुकूम सोडला. त्याला प्रजेनें विरोध केला. तेव्हां तीन दिवसांत प्रत्येकानें आपलें घर खालीं केलेंच पाहिजे असा त्यानें जाहीरनामा लावला. तेव्हां सर्वांस जाणें भाग पडलें. कांहीं घरांत लपून बसले. तेव्हां त्यांचा जारीनें शोध करण्यांत आला. शोधाअंतीं एक लंगडा व एक अंधळा असे दोघे सांपडले. तेव्हां सुलतानानें लंगड्याला गोळी घालून ठार केलें. आंधळ्यास दोरानें दौलताबादपर्यंत फरपटत ओढून नेण्यांत आलें ! या चाळीस दिवसांच्या प्रवासांत त्या बिचाऱ्याचा जीव तर गेलाच; परंतु त्याच्या अंगाचे तुकडे तुकडे होऊन, दोरीस बांधलेला तंगडीचा एक तुकडा फक्त दौलताबादेला पोंचला ! ! थोड्याच दिवसांत दिल्ली रिकामी झाली व त्या शहराला स्मशानाचें स्वरूप प्राप्त झालें.

इब्ने बतूताच्या वृत्तावरून.

प्रश्न :—१. लोकांनीं दिल्ली कां सोडली ? सुलतानानें त्यांच्यावर कां सूड घेतला ?

२. प्रवासांत लोकांचे कोणते हाल झाले ?

२. पानिपतचें पहिलें युद्ध—१५२६

आमच्या डाव्या व उजव्या बगलेकडील सैन्यानें व बिनीच्या सैन्यानें शत्रूला वेढून त्यावर बाणांचा वर्षाव सुरू केला. आमची डावी व उजवी फळी फोड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्याचा शत्रूनें एक दोनदां निष्फळ प्रयत्न केला; पण आमच्या लोकांनीं बाणांचा वर्षाव करून शत्रूस मध्यभागीं कोंडलें. त्यामुळें गुरफटून जाऊन शत्रूला पुढें जातां येईना किंवा मागें पळूनही जातां येईना.

कासराभर दिवस वर आला असतां लढाईला तोंड लागलें. मध्याह्नीस लढाई संपली. मध्याह्न उलटून गेल्यावर शत्रू नामोहरम झाला. आमचा विजय झाला. त्या दयाघनाच्या कृपेनें हें अत्यंत बिकट काम सुलभ झालें व अर्ध्या दिवसांत आमचा शत्रू धुळीस मिळाला. इब्राहीम (लोदीच्या) जवळ सुमारें पांच सहा हजार प्रेतांचा ढीग पडला होता. रणांगणाच्या निरनिराळ्या भागांत सुमारें पंधरा-सोळा हजार लोक मरून पडले असावेत असा आमचा अंदाज होता. परंतु पुढें आग्र्यास गेल्यानंतर सुमारें चाळीस-पन्नास हजार लोक कामास आले असें कळलें. शत्रूचा पाठलाग करीत आम्हीं अनेकांना कंठस्नान घातलें व कित्येकांस कैद केलें.

—बाबराच्या आत्मवृत्तावरून.

प्रश्नः—१. पानपतच्या युद्धांत किती लोक मेले? इब्राहिमच्या सैन्यास कसें गुरफटण्यांत आलें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१३२६–१५२६.

हिंदुस्थान	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
	१३२६		
			बरनी,
	१३३६		
	१३४६		इब्ने बतूता,
	१३५१	वॅट टायरचें बंड १३८१	
	१३८८		विद्यारण्यस्वामी,
			तैमूरलंग,
	१३९८		सायणाचार्य,
	१४०५		आर्कची जोन,
	१४३५		जॉन गटेन्बर्ग,
	१४५३	कॉन्स्टँटिनोपलचा पाडाव	वास्को ड गामा,
	१४८८	सातवा हेन्री	
		१४८५–१५०९	कोपर्निकस, चैतन्य,
			लूथर, कोलंबस.
	१५१७		
	१५२६	आठवा हेन्री	
		१५०९–१५४७	

प्रश्न :—१ वरील कालादर्श पूर्ण करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१. दक्षिणेंतील बहामनी राज्य

१. बहामनी राज्याची स्थापना (१३४७):—मोहंमद तुगलुकाच्या वेळीं त्याच्या दक्षिणेंतील सरदारांनीं बंड उभारलें होतें. त्यांचा बंदोबस्त त्याला नीटपणें करतां आला नाहीं. या सरदारांचें पुढारीपण हसन गंगू ऊर्फ जाफरखान याच्याकडे होतें. देवगिरी ऊर्फ दौलताबाद येथील तो सुभेदार होता. बंडाचा वणवा पेटतांच त्यानें त्यांत उडी घेतली. त्याला त्यांत जय मिळाल्यावर त्यानें राजपद धारण केलें व गुलबर्गा येथें नवीन राज्याची स्थापना केली (१३४७). जाफरखान पूर्वी गुलाम होता. त्याचा मालक एक ब्राह्मण होता. त्यानें जाफरखानास गुलामगिरींतून मुक्त केलें व 'तूं राजा होशील' असें त्याचें भविष्य वर्तविलें. जाफरखानानें राज्य स्थापन केलें त्यावेळीं त्यानें आपल्या पूर्वीच्या धन्यास कृतज्ञतापूर्वक बोलावून आपल्या राज्याच्या फडणिशीचें काम सांगितलें. जाफरखान स्वतःस अलाउद्दीन हसन गंगू बहामनी असें म्हणवून घेत असे. जाफरखान मोठा हुशार व धोरणी होता. हिंदूंचा त्यानें छळ केला नाहीं. त्यांच्याशीं तो मोठ्या स्नेहानें वागे. आपल्या दहा वर्षांच्या कारकीर्दींत त्यानें आपल्या राज्याचा विस्तार जवळजवळ महाराष्ट्रभर केला. तो सन १३५८ मध्यें मृत्यु पावला.

२. कांहीं प्रसिद्ध सुलतान:—हसनशहा ऊर्फ जाफरखान याच्यानंतर गुलबर्ग्याच्या गादीवर अनेक राजे बसले. विजयनगरच्या हिंदू राजांशीं बहामनी राजांचें हाडवैर होतें. त्यामुळेंच कांहीं ना कांहीं कारणावरून त्यांच्यांत नेहमीं लढाया होत. सर्वसाधारणपणें तुंगभद्रा नदी त्या दोन्ही राज्यांची सरहद्द ठरून गेली होती. हे झगडे करण्यांत फेरोजशाह (१३९७–१४२२) व अहमदशाह (१४२२–३५) या बहामनी राजांनीं बराच पुढाकार घेतलेला होता. फेरोजनें एकदां विजयनगर शहर काबीज केलें व तेथील राजाच्या मुलीशीं लग्न केलें. अहमदशाह यानेंही विजयनगरशीं युद्धें केलीं, तेलंगणच्या राजाला आपलें मांडलिक बनविलें, अनेकांस इस्लामी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्माची दीक्षा दिली व बेदर येथें आपल्या राज्याची राजधानी नेली.



गोलघुमट–विजापूर

सन १४५७–६० पर्यंत बहामनी राज्यावर हुमायूनशाह नांवाचा सुलतान होता. तो फार क्रूर होता; परंतु त्याला मोहंमद गावान हा कर्तबगार वजीर मिळाला होता. त्यामुळें त्याचा बोज फार टिकला.

३. मोहंमद गावान (१४०३–१४८१):—मोहंमद गावान हा इराणी होता. व्यापाराच्या मिषानें तो बाहेर पडला व दाभोळ बंदरीं उतरला. तो बेदरला आल्यावर सुलतानाच्या आश्रयामुळें त्याचा अभ्युदय झाला. तो उदार, बुद्धिमान, न्यायी व धाडसी सेनानी होता. हुमायून, निजामशाह व मोहंमदशाह अशा तीन सुलतानांनीं त्यास आपली वजिरी दिली होती. त्याच्यामुळेंच बहामनी राज्याचा खरा विस्तार झाला. गावाननें विशाळगडचें राज्य व विजयनगरपासून गोवेंप्रांतही काबीज करून घेतला. तसेंच पूर्वे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडीलही बराचसा मुलूख त्यानें जिंकला होता. थोडक्यांत म्हणजे नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत सर्व मुलूख त्याच्या वेळीं बहामनी राज्यांत मोडे. या सर्व राज्यांतील सर्व खात्यांची त्यानें उत्तम व्यवस्था लावून दिली. उत्तम लष्कर ठेवून सैनिकांचा पगारही वेळेवर देण्याची पद्धति त्यानें पाडली. जमिनीची मोजणी व पहाणी करून त्यानें जमीनमहसूल ठरवून दिला होता. राज्यांतील लांचलुचपत त्यानें बंद केली. तो अत्यंत राजनिष्ठ होता व त्याची वागणूक कित्ता घेण्यासारखी होती. तो परदेशी मुसलमान होता. त्यामुळें व त्याच्या सुधारणा कांहीं सरदारांस न रुचल्यामुळें त्यांनीं गावानविरुद्ध सुलतानाकडे एकसारख्या कागाळ्या केल्या. शेवटीं सुलतानाच्या हुकमानें त्याचा खून झाला (१४८१). उत्तम सेनानी व कुशल मुत्सद्दी म्हणून गावान प्रसिद्ध आहे.

४. बहामनी राज्याचीं छकलें :—मोहंमद गावानच्या हाताखालीं हसन



विजापूरचा किल्ला (आजची स्थिति)

बहिरी ऊर्फ निजाम-उल्मुल्क, दर्याखान ऊर्फ इमाद-उल्मुल्क, युसुफ अदिल-खान वगैरे सरदार उत्तम तयार झाले होते. गावानच्या मृत्यूनंतर बहामनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यांत यादवी माजली. दक्षिणी व परदेशी असे मुसलमानांचे दोन तट दरबारीं होते. त्यांच्यांतही कलहाग्नि पेटत गेला. सुलतानही मद्यपी बनून राज्यकारभाराकडे लक्ष देईनासे झाले. त्यामुळें राज्यांत सर्वत्र बेबनाव होऊन निरनिराळे सुभेदार स्वतंत्र होऊं लागले. यामुळें बहामनी राज्याचे थोड्याच दिवसांत तुकडे पडून सन १४९० ते १५२६ च्या दरम्यान त्याचीं पांच निरनिराळीं राज्यें झालीं. युसुफ अदिलखानानें विजापुरास अदिलशाही, इमाद-उल्मुल्कनें वऱ्हाडांत इमादशाही, अमीर बरीदनें बेदरला बरीदशाही, निजामाचा मुलगा अहमद यानें अहमदनगरला निजामशाही व कुतुब-उल्मुल्क यानें तेलंगणांत गोवळकोंड्यास कुतुबशाही अशीं पांच स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. या नव्या राज्यांमुळें बहामनी राज्याचा नाश झाला असें मानण्यास हरकत नाहीं. वरील पांची राज्यांपैकीं विजापूरची अदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही व अहमदनगरची निजामशाही हीं मोठीं सत्तावान राज्यें झालीं व पुढें तीं बरीच वर्षें टिकलीं. आपापसांतही त्यांच्यामध्यें द्वेष व वैर होतें. त्याचा फायदा त्यांच्या शत्रूंनीं घेण्यास कमी केलें नाहीं. पुढें बरीदशाही व निजामशाही हीं दोन राज्यें मोडून तीं बाकीच्या तिन्ही राज्यांत सामील झालीं. मोंगलांनीं हीं तिन्हीं राज्यें पुढें नामशेष केलीं.

५. बहामनी राजांची कामगिरी :—बहामनी गादीवर एकंदर चौदा सुलतान बसले. ते बहुतेक सर्व गर्विष्ठ, व्यसनाधीन, निर्दय व क्रूर होते. राज्यकारभाराकडे त्यांनीं फारसें लक्ष दिलेंच नाहीं. त्यामुळें कारभाराची सर्व मदार त्यांच्या वजीरावरच पडत असे. मोहंमद गावानसारखे कुशल वजीर त्यांस लाभल्यानेंच बहामनी राज्याचें वैभव व सामर्थ्य वाढण्यास मदत झाली. ती इतकी कीं, ऐश्वर्य, संपत्ति व सामर्थ्य या बाबतींत बहामनी-राज्य दिल्लीच्या तोडीचें झालें. त्यावेळीं ॲथेनेसिस निटिकन हा रशियन प्रवासी दक्षिणेंत आला होता. तो म्हणतो कीं, "सुलतान लक्ष्मी व वैभव यांत लोळत असत; मात्र त्यांची प्रजा दुःख व दारिद्र्य यांनीं गांजून गेलेली होती. सरदारही सुलतानाचें अनुकरण करीत. चांदी–सोन्याच्या मेण्यांतून, मोठ्या लव्याजम्यासह व लष्करासह ते इकडून तिकडे मोठ्या दिमाखानें जात. सुलतान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्यावरही ताण करीत असे. नुसता शिकारीस निघाला तर त्याच्याबरोबर



मुलुख-ई-मैदान तोफ

६०-७० हजार लोक मोठ्या इतमामानें जात." यावरून बहामनी सुलतान किती मिजाशी, वैभवसंपन्न व ऐषारामी होते त्याची कल्पना करतां येईल. त्या काळीं त्या राज्यांत व्यापारामुळें संपत्तीही अपार येत होती; कारण बहामनी राज्याचा परदेशांशीं मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत असे. सर्व पश्चिम किनारा त्यांच्या ताब्यांत असल्यानें इराण, अरबस्थान, तुर्कस्थान, इजिप्त वगैरे देशांशीं पुष्कळ दळणवळण चाले. त्यामुळें चौल, दाभोळ, गोवा वगैरे पश्चिमेकडील बंदरें फार प्रसिद्धीस आलीं. याच बंदरांतून परदेशी माल व माणसें बहामनी राज्यांत येत-जात. त्यामुळें बहामनी राजांची कीर्ति दूरदूरच्या देशांतही पसरली होती. व्यापाराचे मिषानें परदेशांतून व्यापारी, कवि, सौदागर, साधु वगैरे अनेक प्रकारचे लोक बहामनी राज्यांत आले. त्या सर्वांस परदेशी असें संबोधण्यांत येई. याच्या उलट येथें राहणारे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुसलमान दक्षिणी म्हणून ओळखले जात. दक्षिणी व परदेशी यांच्यामध्यें नेहमीं अधिकाराकरितां धुसफूस चाले. सुलतान परदेशी मुसलमानांस फार मानीत व त्यांनाच अधिकाराच्या जागा देत. यामुळेंही दक्षिणी मुसलमान रुष्ट असत.

६. दक्षिणेंतील हिंदू व मुसलमान :—मुसलमानांचा हिंदूंशीं निकट संबंध येई. अनेक हिंदूंस जबरीनें मुसलमान करण्यांत आलें, अनेक हिंदूंस ठार मारण्यांत आलें व सर्व हिंदु जात नष्ट करण्याचे प्रयत्नही झाले. तरीही हिंदू नष्ट झाले नाहींत. उलट त्यांच्या चालीरीतींचा, संस्कृतीचा व आचारविचारांचा मुसलमानांवर फार परिणाम झाला. इतका कीं, त्या बाबतींत दक्षिणेंतील मुसलमान उत्तरेंतील मुसलमानांहून निराळे वाटूं लागले. हिंदू स्त्रियांशीं मुसलमानांचीं लग्नेंही होत. त्या काळीं प्रसिद्धीस आलेले अनेक मुसलमान हिंदू स्त्रियांच्या पोटीं जन्मास आलेले होते. या सर्व गोष्टींमुळें या दोन्ही जातींचे लोक सर्व प्रकारच्या व्यापारांत व व्यवहारांत एकोप्यानें वागत. बहामनी राजे हिंदूंस दरबारीं अधिकाराच्या जागा देत, फौजेंत नेमीत व त्यांस त्यांच्या धर्माप्रमाणें वागूं देत. उलट हिंदूंनीं बंडें केलीं नाहींत व राज्यक्रात्यांत भाग घेतला नाहीं. आपल्या धर्माप्रमाणें वागून त्यांनीं सुलतानांची इमानें-इतबारें सेवा केली. जे हिंदू सेनापति अगर वजीर झाले त्यांचें राज्यकारभारांत चांगलेंच महत्त्व असे. फडणिशी, हिशोब, वसूल वगैरे खात्यांत हिंदूंचाच भरणा फार असे. त्यामुळें राज्यकारभारांत त्यांस फार मान मिळे. हिंदू मुत्सद्दयांचें दरबारीं वजन फार असे.

७. कलांचा उदय :—बहामनी सुलतान फारसे विद्वान नव्हते. तरी त्यांच्या दरबारीं विद्वान, पंडित, कवि, साधु वगैरेंस आश्रय मिळे. राज्यांत सर्वत्र शाळा नव्हत्या. तरी मुसलमानांच्या शिक्षणाची सर्वत्र सोय होती. फारशी व अरबी भाषा सर्वांस शिकण्यास मिळत. प्रत्येक शहरांत एकेक पाठशाळा व ग्रंथालय असे. त्यावेळीं ग्रंथ फारसे लिहून झाले नाहींत. मराठी भाषा नुकतीच उदयास येऊं लागली होती. तिच्यांत ग्रंथरचनाही होऊं लागली होती. फेरिस्ता हा मुसलमान अदिलशाहींत उदयास आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व सुलतानांस संगीताची आवड फार होती. त्यामुळें संगीताची वाढ फार झाली. शिल्पकलाही त्यावेळीं चांगलीच पुढें आली होती. अनेक राजवाडे, मशिदी, तट व किल्ले अत्यंत भक्कम, सुंदर व कलाकुसरीचे होते. इब्राहीम रोजा, गगनमहाल, गोलघुमट इत्यादी विजापुरच्या इमारती व गाविलगड, बेदर, नरनाळा, गुलबर्गा वगैरे ठिकाणच्या वैभवानें नटलेल्या इमारती त्यावेळच्या ऐश्वर्याचीं, वैभवाचीं व शिल्पकलेचीं उत्तम प्रतीकें आहेत. प्रवासाची सोयही चांगली असे व प्रवास सुखाचा व बिनत्रासाचा होई. खेड्यांतून ग्रामव्यवस्था चालू होती. एकंदर प्रजा सुखी होती.

अभ्यास

१. बहामनी राज्य कोणी स्थापिलें? त्याची वाढ कोणीं कोणीं केली? त्याचीं छकलें केव्हां व कां झालीं?

२. मोहंमद गावानचें चरित्र सांगा.

३. बहामनी राज्याची कामगिरी थोडक्यांत वर्णा.

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
हसन गंगू, परदेशी मुसलमान, मराठी भाषा, सुलतानांचें वैभव.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२२. विजयनगरचें हिंदु साम्राज्य

१. विजयनगरची स्थापना (१३३६):—तेराव्या शतकाच्या अखेरीस मुसलमानांच्या स्वाऱ्या दक्षिणेवर एकसारख्या होऊं लागल्या; व मुसलमानांनीं दक्षिणेंतील पुरातन राज्यें नामशेष करण्यास सुरुवात केली. मलिक काफूर, अलाउद्दीन, मोहंमद तुगलुक वगैरेंनीं दक्षिणेंतील राज्यांवर एकसारख्या स्वाऱ्या करून तेथील देवळें नष्ट केलीं, अपार संपत्ति हरण केली व पुरातन राज्यें बुडविलीं. या सर्व घडामोडींमुळें हिंदुधर्माचें उच्चाटणही होतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली होती. परंतु सन १३४४ च्या सुमारास मुसलमानांचा तुफानी हल्ला परतविणारी एक शक्ति दक्षिणेंत निर्माण झाली. ती म्हणजे विजयनगरचें हिंदु राज्य ही होय. तुंगभद्रेच्या तीरावर पूर्वीं अनागोंदी नामक राज्य होतें. वारंगळचें राज्य मुसलमानांनीं बुडविल्यावर तेथील दोन सरदार अनागोंदीच्या राजाच्या आश्रयास आले. त्यांचीं नांवें हरिहर व बुक्क अशीं होतीं. ते दोघे भाऊ होते. पुढें मोहंमद तुगलुकानें अनागोंदीचें राज्यही बुडविलें. तेव्हां हरिहर व बुक्क यांनीं सन १३३६ मध्यें अनागोंदीच्याच समोर तुंगभद्रेच्या कांठीं विजयनगर नांवाचें शहर स्थापन केलें. हरिहर व बुक्क यांचे गुरु माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्यस्वामी होते. त्यांच्या सांगीवरूनच वरील बंधुद्वयानें विजयनगरची स्थापना केली होती. योगायोग असा कीं बहामनी राज्याची ज्यावेळीं स्थापना झाली, त्याच वेळीं विजयनगरच्या राज्याचीही स्थापना झाली.

२. विद्यारण्यस्वामी ऊर्फ माधवाचार्य:—त्या काळीं दक्षिणेंत सायणाचार्य व माधवाचार्य हे दोघे बंधू फार मोठे जाडे विद्वान पंडित होऊन गेले. सायणाचार्यांनीं उपनिषदें व वेद यांवर अप्रतिम भाष्यें लिहिलीं. माधवाचार्यांनीं संस्कृतांत 'सर्वदर्शन संग्रह' 'माधवनिदान' 'पंचदशी' 'कालमाधव' वगैरे ग्रंथ धर्म, न्याय, वैद्यक, वेदांत वगैरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रांसंबंधीं लिहिले. संन्यास घेतल्यावर शृंगेरीच्या आद्य-धर्मपीठावर त्यांची शंकराचार्य म्हणूनही निवड झाली होती. मुसलमानांनीं हिंदुधर्माचा उच्छेद मांडलेला पाहून त्यांस फार विषाद वाटे. तेव्हां हिंदुधर्म व राजसत्ता यांचें पुनरुज्जीवन करण्याची त्यांनीं महत्त्वाकांक्षा धरली. आपलें इष्ट साध्य व्हावयाचें असल्यास मुसलमानांची लाट थोपवून धरण्याशिवाय अन्य उपाय नाहीं, हें त्यांस समजून चुकलें होतें. त्याकरितांच त्यांनीं हरिहर व बुक्क या दोघा बंधूंस हातीं धरलें, त्यांस सर्व प्रकारची मदत दिली व त्यांच्याकडून विजयनगरच्या राज्याची मुहूर्तमेढ रोविली. शिवाजी–रामदास या महाराष्ट्रीय जोडीप्रमाणेंच हरिहर-विद्यारण्य ही जोडी हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर झाली यांत शंका नाहीं.



गणेशमंदीर–विजयनगर (या मंदिराचे खांब एका दगडाचेच कोरलेले आहेत.)

३. विजयनगरचे राजे :—हरिहर व बुक्क यांनीं आपल्या राज्याचा विस्तार मोठ्या झपाट्यानें केला. हरिहर हा विजयनगरचा पहिला राजा. तो सन १३४४ मध्यें मृत्यु पावल्यावर त्याचा भाऊ बुक्क विजयनगरचा राजा झाला. त्यानें आपल्या राज्याचा मोठा विस्तार केला. बहामनी राजांशीं त्याला त्याकरितां एकसारखें झगडावें लागलें. तुंगभद्रेच्या दक्षिणेचा बहुतेक सर्व मुलूख त्यानें जिंकला होता. तो सन १३७६ मध्यें मरण पावला व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा मुलगा दुसरा हरिहर राजा झाला. त्यानें कन्याकुमारीपर्यंत राज्यविस्तार केला. सायणाचार्य त्याचा दिवाण होता. दुसऱ्या हरिहरानंतर दुसरा बुक्क व देवराय (१४०६-१२) यांनीं राज्य केलें. देवरायाच्या वेळीं बहामनी सुलतान फेरोजशहा यानें त्याचा पराभव करून विजयनगर लुटून उध्वस्त केलें. त्याच्यानंतर वीरविजय व दुसरा देवराय यांनीं राज्य केलें. दुसऱ्या देवरायाच्या (१४१९-४४) वेळीं विजयनगरचें राज्य वैभवानें नटलें होतें. सन १४८६ मध्यें नरसिंहराज यानें विजयनगरचें राज्य बळकावलें. त्याचा मुलगा कृष्णदेवराय यानें सन १५०९-३० पर्यंत राज्य केलें. तो फार पराक्रमी राजा होऊन गेला. तो राज्यावर आला त्यावेळीं राज्यांत सर्वत्र अंदाधुंदी माजली होती. ती त्यानें नष्ट केली. त्यानें वसुलाची व्यवस्थाही उत्तम केली. ओरिसापर्यंतचा पूर्वेकडील मुलूख व साष्टी बेटापर्यंतचा पश्चिमेकडील



कमल महाल—विजयनगर

मुलूख त्यानें आपल्या राज्यास जोडला होता. विजापूरच्या राजाकडून त्यानें रायचूर व मुद्गल हा मुलूख जिंकला. गुलबर्ग्यापर्यंतचा मुलूख त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताब्यांत आला होता. रायचूरच्या विजयानें कृष्णदेवरायाचें राज्य वाढलें व अदिलशाहीस जोराचा धक्का बसून तें राज्य डळमळूं लागलें. दक्षिणेंत आपला टिकाव लागणार नाहीं असें वाटल्यावरून सर्व बहामनी सुलतान एकोप्यानें राहूं लागले. त्यामुळें राक्षसतागडीच्या लढाईचें अरिष्ट जवळ आलें. कृष्णदेवराय स्वतः सुसंस्कृत व विद्वान होता. अर्थात् त्यानें विद्वानांचा चांगलाच परामर्ष घेतला. त्यामुळें त्यास 'आंध्र-भोज' असें नांव पडलें. संस्कृत व तेलगू वाङ्मयाची त्याच्या काळीं फार वृद्धि झाली. त्याच्या दरबारीं 'नवरत्नें' होतीं असें म्हणतात. त्यांतीलच प्रसिद्ध पंडित अप्पय्या दीक्षित हें एक श्रेष्ठ रत्न होय. कृष्णरायानें बांधकामही चांगलें केलें होतें. त्यानें अनेक मंदिरें व विजयनगरास मोठा तलाव बांधला होता. कृष्णदेवराय सन १५३० मध्यें मृत्यु पावला. त्याच्यानंतर जे राजे झाले ते दुर्बल होते. शेवटचा राजा सदाशिवराय याच्या कारकीर्दीतच राक्षसतागडीची लढाई सन १५६५ मध्यें झाली. त्यावेळीं आपापसांतील वैर विसरून सर्व बहामनी सुलतान एक झाले व त्यांनीं विजयनगरवर चालून जाऊन त्या शहराचा विध्वंस केला. त्यानंतर विजयनगरचें राज्य संपुष्टांत येऊन त्याचा नायनाट झाला; व त्या राज्याचा प्रदेश सर्व सुलतानांनीं आपापसांत वांटून घेतला.

४. विजयनगरच्या राज्याचें वैभव :—विजयनगरच्या राजांची सत्ता बहामनी सुलतानांपेक्षां मोठी होती. त्यांची संपत्ति व ऐश्वर्यही अपार होतें. हिऱ्याच्या खाणी विजयनगरच्या हद्दींत होत्या. त्यांतूनच सर्व जगास हिऱ्यांचा पुरवठा होत असे. पूर्वकिनाऱ्यावर मोत्यांचे कारखाने होते. परदेशांशीं व्यापारही अफाट चाले. यामुळें विजयनगरांत संपत्तीचा संचय अपार झाला होता. विजयनगरसारखें वैभवसंपन्न शहर जगांत नव्हतें, असें एक इराणी गृहस्थ म्हणतो. शिवाय तो म्हणतो कीं "विजयनगरच्या राजाजवळ अकरा लाख फौज आहे; हिंदुस्थानांत इतका शक्तिमान राजा दुसरा नाहीं. विजयनगरसारखी नगरी जगांत नसेल. बाजार गुलाबाच्या फुलांनीं गजबजून गेला होता. प्रत्येक धंद्याचीं दुकानें एकमेकांस खेटून असत. त्यांतून मोतीं, पाच, माणकें, हिरे वगैरे मौल्यवान रत्नें जवाहिरे उघड्यावर विक्रीकरितां ठेवीत. राजवाड्यांत अनेक तळघरें असून तीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोन्यारुप्यानीं गच्च भरलेलीं आहेत. सिंहासन सोन्याचें असून त्यावर अनेक



अश्मरथ–विजयनगर

मौल्यवान रत्नें जडविलेलीं आहेत." दुसरा एक इटालियन प्रवासी निकोले कोंटी लिहितो, "मोठमोठ्या लोकांचीं घरें दगडी आहेत. शहरांत पाण्याचे कालवे असून तेथें मोठमोठ्या बागा आहेत. ऊंस व तांदूळ पुष्कळ पिकतो. जिकडेतिकडे सुंदर व विस्तीर्ण देवळें असून वाडे, मंदिरें, तट, गोपुरें वगैरेंमुळें नगराची शोभा अवर्णनीय झाली आहे. येथील लोकांस वाटेल तितक्या बायका करण्याची मुभा आहे. नवरा मेल्यावर त्या सती जातात." एकंदरींत पाहतां विजयनगरचें वैभव, दिमाख मिरविण्यासारखें होतें यांत शंका नाहीं; परंतु पुढें विजयनगरचे राजे अत्यंत सुखलोलुप, विषयी व चैनी बनले. प्रजेसंबंधीं अगर राष्ट्रासंबंधीं त्यांस कधींच कसलीही काळजी वाटली नाहीं. राजांनीं आरंभींचीं ध्येयें व धोरणें दूर सारून नीतिमत्ता पायाखालीं तुडविली. यामुळेंच त्यांच्या राज्याचा नाश झाला. एकंदर परिस्थितीचाही त्यांनीं कधीं विचार केला नाहीं. नाहीं म्हटल्यास, मुसलमानांच्या तडाख्यांतून हिंदुधर्म व संस्कृति यांचें संरक्षण विजयनगरच्या राज्यानें केलें. तें राज्य नसतें तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुधर्म टिकला नसता, लोकांस गुलामगिरींत खितपत पडावें लागलें असतें व लोकांस शांतता लाभली नसती.

अभ्यास

१. विजयनगरचें राज्य कोणीं स्थापिलें? त्याला कोणतीं कारणें घडलीं? त्या राज्यांत जो उत्तम राजा झाला त्याची हकीकत थोडक्यांत द्या.

२. विद्यारण्यस्वामींची तुलना रामदासांशीं कां करतात? त्यांचें चरित्र थोडक्यांत सांगा.

३. विजयनगरच्या राज्याचें वैभव व कामगिरी वर्णा.

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा:—
सायणाचार्य, राक्षसतागडीची लढाई, हरिहर व बुक्क, माधवाचार्य

५. 'विजयनगरस्मारक ग्रंथ' डोळ्यांखालून एकदां घाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३. दिल्लीच्या सुलतानांच्या वेळचा हिंदुस्थान

१. दिल्लीचे सुलतान :—सन १२०६ पासून १५२६ पर्यंत दिल्लीस सुलतानी सत्ता होती. इस्लामाचा प्रसार करणें, लूटमार करणें व हिंदूंचीं देवळें उध्वस्त करणें हें प्रथमतः मुसलमानांचें उद्दिष्ट होतें. पुढें दिल्लीस राज्य स्थापण्याची मनीषा त्यांनीं धरली व ती तडीस नेली. तरीही त्यांचें कडवें धर्मवेड नष्ट झालें नाहीं. त्यापायींच त्यांनीं अनेक लढाया केल्या, अनेकांस कंठस्नान घातलें व रक्ताचे पाट वाहवले. परंतु तेवढ्यानें त्यांचें उद्दिष्ट सफळ झालें नाहीं. आरंभींचे सुलतान इस्लामाकरितां लढणारे शूर लढवय्ये होते. परंतु ते आडदांड, एककल्ली, हटवादी व धर्मवेडानें पछाडलेले होते. सर्व सुलतान अनियंत्रित होते. स्वतःचा खून अगर बंड यांशिवाय त्यांस दुसऱ्या कशाचीही भीति वाटत नसे. त्यांच्या राज्यांत घात-पात, खून, अत्याचार वगैरे नेहमीं चालत. प्रजेच्या सुखाकरितां झटल्याचें उदाहरण फारच विरळा! प्रजेचें सुखदुःख सुलतानाच्या लहरीवर अवलंबून असे. सुलतानाच्या दंडुकेशाहीपुढें सर्वांस नमावें लागे. सुलतानांचें राज्य मोठें होतें. परंतु दूरच्या प्रांतांवरील त्यांची सत्ता नेहमीं ढिलीच राही. मोठ्या राज्याची धुरा अंगावर घेऊन त्यांत सुयंत्र राज्यकारभाराची मांडणी करण्याची बुद्धि एकानेंही प्रकट केली नाहीं. मुसलमानांस राजकीय ध्येय नव्हतें, राज्यकारभाराचें धोरण नव्हतें व राजनीतिही त्यांस माहीत नव्हती. केवळ लष्कराच्या जोरावरच त्यांनीं आपलें राज्य चालविलें. राज्य चालविण्यास लागणारे गुणच त्यांच्या ठिकाणीं नव्हते. त्यामुळें मध्यवर्ती सत्ता बळकट ठेवण्याची ते कोशीस बाळगीत; तीच ढिली झाली कीं सर्व सरदार स्वतंत्र होत. या गोष्टींमुळेंच सुलतानांचें राज्य लौकरच मोडकळीस आलें.

२. मुसलमानांत एकी नव्हती :—हिंदुस्थानांत तुर्क, इराणी, अरब, पठाण, मोंगल वगैरे अनेक तऱ्हेचे मुसलमान लोक आले. ते सर्व एकाच धर्माचे होते व त्या धर्माकरितां ते सर्व झटले. परंतु त्या सर्वांचा एकजीव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कधींच झाला नाहीं. मोंगल लोक मूळचे इस्लामी धर्माचे उपासक नव्हते. त्यांनीं तो धर्म पुढें स्वीकारला. तरीही ते त्या धर्मांत पूर्णपणें मिसळून गेले नाहींत. खुद्द मुसलमानांतही शिया व सुन्नी असे दोन पंथ होते. त्या दोन्ही पंथांतील लोक एकमेकांस पाण्यांत पहात. जे लोक मूळचे हिंदू होते, पण ज्यांनीं इस्लाम धर्म अंगीकारला होता, ते मुसलमानांत कधींच एकरूप झाले नाहींत. कारण त्यांचे आचारविचार, संस्कृति व समजुती पूर्वींप्रमाणेंच चालू होत्या. या सर्व जमातींना एकत्र ठेवील अशी भक्कम व खंबीर राजसत्ताही त्यावेळीं अस्तित्वांत नव्हती. त्यामुळें 'बळी तो कान पिळी' हा नियम सर्वत्र रूढ होता. जो तो त्याच्या जोरावरच आपल्या स्वार्थाचा नेहमीं विचार करीत असे. त्यामुळें भांडणांस नेहमीं ऊत येई, बंडेंही उद्भवत, सुलतानी धोक्यांत येई व एक राजवंश नष्ट होऊन दुसरा स्थापन होई. यावरून मुसलमानांचा मिलाफ पूर्णपणें व मजबूत असा झालाच नाहीं असें म्हणणें प्राप्त होतें.

३. राज्यकारभार व न्यायव्यवस्था :—सुलतानी राज्यपद्धति अनियंत्रित होती. सुलतानाच्या शब्दाप्रमाणें राज्यकारभार चाले व त्याची लहर सांभाळून त्याचे वजीर त्याच्या शब्दांची अंमलबजावणी करीत. तीही अनेक प्रसंगीं तरवारीच्या, म्हणजेच लष्कराच्या, जोरावर करीत. राजाचें लष्कर बलिष्ठ असलें तर ठीक; नाहींतर त्याला राज्य गमवावें लागे. सुलतान दुर्बल असला कीं लष्कराचें फावे. मोठमोठ्या शहरींच सरकारी अधिकारी असत. खेडेगांवांत स्थानिक व्यवस्था तेथील लोकांच्या हातीं असे. निरनिराळ्या प्रांतांवर सुभेदार असत. स्वतंत्र लष्कर उभारून ते आपल्या प्रांताचा कारभार सुलतानाच्या पावलावर पाऊल टाकून करीत. सुलतानास सैनिक पुरविणें हें त्यांचें एक महत्त्वाचें काम असे. एकंदर समाज राजकारणापासून अलिप्त व उदास असे. न्यायदानाकरितां काझींची नेमणूक होत असे व कुराणाप्रमाणें ते न्यायदान करीत. अर्थात मुसलमान काझी हिंदूंचा कायदा मानीत नसत. तसें करणें ते अधर्म्य समजत. त्यामुळें हिंदु लोक आपल्या धर्मशास्त्राचा उपयोग चोरूनमारून करीत. फारशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही दरबारी भाषा होती. सर्व व्यवहार त्याच भाषेंतून होई. सरकारी दप्तरही त्याच भाषेंत होतें.

४. सुलतानांचा कारभार व हिंदू :—राज्यकारभारांत सुलतानांस हिंदूंची मदत नित्यशः लागे. असें असूनही मोठ्या व मानाच्या जागा हिंदूंस दिल्या जात नसत. खालच्या प्रतीच्या सरकारी नोकऱ्या त्यांस मिळत. मुलकी खात्यांत हिंदूंचा भरणा विशेष असे. व्यापार हिंदूंच्या हातीं असे. राज्यांतील वसुलाचें व व्यवस्थेचें काम बहुधा हिंदूंच्याकडेच असे. मोठ्या व अधिकाराच्या जागा बहुधा मुसलमानांस व त्याही परदेशांतून आलेल्या मुसलमानांस मिळत. लष्करांतील मोठे अंमलदारही इराणी अगर पठाण असत. ते सर्व येथेंच स्थाइक होत असत. त्यामुळें त्यांना कधीं कधीं आपल्या जागांस मुकावें लागे. कारण सुलतान नेहमीं नव्या दमाच्या लोकांची—विशेषतः लष्करांत—निवड करीत असे. या सर्व गोष्टींवरून प्रत्यक्ष राज्यकारभारांत हिंदूंचा फारसा हात नसत हेंच दिसून येईल. सुलतान प्रजेच्या कल्याणाची काळजी फारशी बाळगीत नसत.

५. इस्लामधर्माचा फैलाव :—इस्लामधर्माचा फैलाव करण्याकरितां मुसलमान हिंदुस्थानांत आले; व त्यांचें उद्दिष्ट पुष्कळ अंशीं सफळ झालें असें मानलें जातें. त्याकरितां त्यांनीं बळजबरी केली, हिंदु देवतांच्या मूर्ति फोडल्या, देवळें उध्वस्त केलीं, यात्रा बंद केल्या, विद्यापीठांचा विध्वंस केला, लोकांवर जिझिया करासारखे जाचक कर लादले व अशारीतीनें आपल्या धर्माचा प्रसार केला. अनेक हिंदू भीतीनेंही इस्लामधर्माचा स्वीकार करीत. या सर्व गोष्टींमुळें थोड्याच काळांत अनेक हिंदु लोक मुसलमान झाले. असें असलें तरी, बाटलेले हिंदू मुसलमानी संस्कृतींत पूर्णपणें कधींच मिसळले नाहींत. जे हिंदू मुसलमान झाले त्यांनीं आपले पूर्वींचेच आचार-विचार उराशीं बाळगल्यानें मुसलमानी संस्कृतीचें स्वरूप निर्भेळ असें राहिलें नाहीं. कांहीं सुलतान हिंदूंस आपले धर्मविधि करण्यास पूर्णपणें मोकळीक देत असत.

६. हिंदूंचा मुसलमानांवर पगडा :—हिंदुस्थानांत आपल्या धर्माचा प्रसार करण्याचा मुसलमानांनीं आटोकाट प्रयत्न केला तरीही हिंदुधर्माचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांस पूर्णपणें नायनाट करतां आला नाहीं. उलट हिंदूंचाच त्यांच्यावर पगडा बसला. अनेक मुसलमानांनीं हिंदु स्त्रियांशीं लग्नें लाविलीं. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. शिवाय ज्या हिंदूंनीं खुषीनें अगर सक्तीनें इस्लामधर्म स्वीकारला त्यांनीं आपले हिंदु आचार-विचार सोडले नाहींत. या कारणांमुळें जेवणखाण, आहारविहार, करमणुकीचे खेळ, पोषाख, सणवार, डाम-डौलाचे लग्नसमारंभ वगैरे बाबतींत हिंदुसंस्कृतीप्रमाणेंच सर्व प्रकार होत. शिवाय मुसलमानांचे मूळचे धर्मसंस्कार नष्ट होऊन त्यांनीं हिंदूंचे अनेक संस्कार स्वीकारले. त्यांत साधूंची पूजा करणें, मयतांचे उत्सव व श्राद्धें करणें शकुनांवर विश्वासून बसणें, ज्योतिषावरून व्यवहार चालविणें वगैरे अनेक बाबी प्रमुख होत. यावरून हिंदूंच्या चालीरीतींचा मुसलमानांवर किती परिणाम झाला होता हें दिसून येईल. हिंदूंशीं संबंध आल्यानें मुसलमानांचा मूळचा कडक धर्मद्वेषही कमी झाला. त्यांच्यांत हिंदूप्रमाणें जातीही निर्माण झाल्या. हिंदु साधूप्रमाणें संन्यस्त वृत्तानें राहणारे साधूही त्यांच्यांत निर्माण झाले.. ते भगवीं वस्त्रें वापरीत, भस्म लावीत व ब्रह्मचर्यही पाळीत. या प्रकारच्या साधूंनींच 'सुफी' म्हणून एक नवीन पंथ निर्माण केला.

७. लोकस्थिति :—सुलतानीचा काळ तीनशें वर्षांवर होऊन गेला. त्या काळीं सर्वत्र रणधुमाळी माजलेली असे. त्यामुळें प्रत्येकजण घाबरून गेलेला असे. आपल्यावर व आपल्या कुटुंबीयांवर केव्हां घाला येतो याची प्रत्येकास चिंता लागून राहिलेली असे. त्यामुळें प्रत्येकजण विवंचनेंत असे. रस्ते, वाटा बंद झाल्या. शेतें उजाड झालीं. शेतें पिकलींच तर धान्य कोठें ठेवावें याचीच पंचाईत पडे. त्यामुळें दहादहा–वीसवीस वर्षांचीं धान्यें पेवांत पडत. घरें मोठमोठीं बांधलीं तरी खिडक्या कमी ठेवण्यांत येत. जिने, दारें आकुंचित असत. घरांभोवतीं व गांवांभोवतीं गढ्या व कोट बांधलेले असत. संरक्षणाचा मार्ग ज्याला जो सांपडे तो तो पाही. प्रवास व व्यापार शिपाई-प्याद्यांशिवाय होत नसे. तशाही काळीं खेड्यांतील ग्रामव्यवस्था टिकून होती. ग्रामपंचायतीकडून गांवांची सर्व व्यवस्था चाले. राजकारणासंबंधीं सर्व-जण उदास असत. मुसलमानांविरुद्ध उठाव करावा असें हिंदूंना कधींच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटलें नाहीं. जे मुसलमान होते त्यांची स्थिति बरी होती. कुराणावर त्यांची सर्व भिस्त असे. त्यांतील तत्त्वें पुढें ठेवूनच त्यांचे आचारविचार चालत असत.

८. **विद्या-कला व भाषा :**—त्यावेळीं उर्दू भाषेची उत्पत्ति झाली. 'उर्दू' याचा छावणी असा मूळ अर्थ होय. तो शब्द तुर्की भाषेंतील आहे. त्यावेळीं छावणींत बसूनच दरबारचीं कामें होत. तीं ज्या भाषेंत होत तिलाच 'तुर्की' अगर 'फारशी' असें म्हणत. हिंदुस्थानांत प्रथम याच भाषेंत मुसलमानांचे व्यवहार चालत. पुढें हिंदूंशीं त्यांचें दळणवळण सुगम व्हावें म्हणून तुर्की व हिंदी या भाषांचें मिश्रण झालें. तीच 'उर्दू' म्हणून प्रसिद्ध झाली. त्या भाषेंत तुर्की, अरबी व फारशी भाषांतील शब्द पुष्कळ आहेत. उर्दू भाषेंतील पहिलें वाङ्मय सोळाव्या शतकांत दक्षिणेंत प्रसिद्ध झालें. त्यावेळचे सुलतान विद्येचे फारसे मोठे भोक्ते होते असें नाहीं. त्यांनीं अरबी व फारशी शिकण्याकरितां शाळा घातल्या व फारशी पंडितांचा गौरव केला. तसें हिंदूंकरितां त्यांनीं कांहीं केलें नाहीं. मात्र त्यामुळें हिंदूंच्या वाङ्मयाची वृद्धि हटली नाहीं. त्यांची ग्रंथसंपत्ति वाढतच होती. या काळांत चैतन्य, विज्ञानेश्वर, कवि जयदेव, रामानुज, माधवाचार्य, सायणाचार्य, वल्लभाचार्य, कबीर, मिराबाई, चंडिदास, क्षेमेश्वर, भास्कराचार्य, जगन्नाथ पंडित, अपय्या दीक्षित, ज्ञानेश्वर वगैरे कवि, पंडित, ज्योतिषी, शास्त्रकार, गणिती वगैरेचें ग्रंथलेखन अव्याहतपणें चालू होतें. इमारतींचें बांधकामही त्या काळीं उत्तम होत असे. या काळांतील बांधणींत रचना, नकशी, सौंदर्य, प्रमाणबद्धता उत्तमप्रकारें प्रतीत होते. त्या सर्वांवरून त्या काळची शिल्पकला कमी प्रतीची नव्हती हें सिद्ध होतें.

९. **हिंदु-मुसलमानांच्या एकीचे प्रयत्न :**—देव एक आहे ही हिंदूंची मूळची कल्पना होती; पण ती पुढें मागें पडून अनेक देव निर्माण झाले. पुढें मुसलमानांशीं हिंदूंचा संबंध आल्यावर एकेश्वरी मताला जोरानें चालना मिळाली. तेव्हां देव एक आहे, नव्हे सर्व धर्मांचा देव एकच आहे ही भावना प्रसृत होऊं लागली. त्या कल्पनेचा प्रसारही हिंदुस्थानांत मुसलमानी काळांत होऊं लागला. हें प्रसाराचें काम रामानुज, रामानंद, कबीर,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नानक, चैतन्य वगैरे साधूंनीं उत्तमप्रकारें केलें. बाराव्या शतकांत रामानुजानें वैष्णवधर्माची स्थापना केली. विष्णु हा एकच देव आहे व त्याचीच भक्ति केल्यानें मोक्षप्राप्ति होते, अशी रामानुजाची शिकवण होती. रामानुजाच्या मतांस उचलून धरून त्यांचा प्रसार करण्याचें काम चौदाव्या शतकांत रामानंदानें केलें. त्याच्यानंतर त्याचा शिष्य कबीर यानें हिंदु-मुसलमानांत एकी उत्पन्न करण्याचा प्रयत्न आरंभिला. राम व रहीम एकच आहेत असें तो म्हणे. जन्मानें तो मुसलमान कीं हिंदु याबद्दल दुमत असलें तरी त्याच्या पंथांत हिंदु व मुसलमान आहेत हें सत्य होय. कबिराचे दोहे सर्वत्र प्रसिद्ध आहेत. मूर्तिपूजा, अवतार-कल्पना, धर्मविधि वगैरे कबिरास मान्य नव्हते. 'शुकनिधान' नांवाचा त्याचा एक ग्रंथ आहे. श्रुतगोपाळ व धर्मदास हे त्याचे पट्टशिष्य होत. कबिरानंतर हिंदु-मुसलमानांची एकी करण्याकरितां ज्यानें प्रयत्न केला तो नानक होय. त्यानेंच शीखधर्माची स्थापना केली. हिंदु व मुसलमान नानकाचे शिष्य झाले. तरी नानकाचें उदिष्ट साध्य झालें नाहीं. पुढें सन १४८५ मध्यें बंगाल्यांत चैतन्याचा जन्म झाला. धर्म-सुधारणा करण्याचा त्यानें अट्टा-

कबीर

हास केला. तो वल्लभाचार्याचा शिष्य होता. वल्लभाचार्य व चैतन्य यांनीं कृष्णभक्तीचा प्रसार केला. चैतन्यानें कृष्णभक्तिपर अनेक काव्यें रचलीं. या सर्व संतांप्रमाणेंच मराठी व हिंदी या भाषांमध्यें चौदाव्या शतकांत अभंगादि काव्यें करणारा महाराष्ट्रसंत नामदेव, मेवाडच्या राजघराण्यांत पंधराव्या शतकांत जन्मलेली साध्वी मिराबाई, गुजराथेंतील नरसी मेहेता व बंगाल्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चैतन्याचे शिष्य विद्यापति व चंडीदास हे प्रसिद्ध होते. या सर्वांनीं हिंदुधर्माचा प्रसार केला; व तो धर्म भक्कम पायावर उभारला. कांहींनीं एकीचे प्रयत्न केले परंतु ते फारसे यशस्वी झाले नाहींत.

अभ्यास

१. दिल्लीच्या सुलतानांच्या वेळीं हिंदूंची स्थिति कशी होती ? त्या वेळच्या हिंदु-मुसलमानांच्या आचाराविचारांवर परिस्थितीचा काय परिणाम झाला ?

२. सुलतानांची राज्यव्यवस्था कशी होती ? त्याचा लोकस्थितीवर काय परिणाम झाला ?

३. हिंदुधर्म व इस्लामधर्म यांच्या अनुयायांची एकी करण्याकरितां कोणीं कोणीं कसकसे प्रयत्न केले ? त्याचा परिणाम काय झाला ?

४. खालीलसंबंधीं टीपा तयार करा :—

उर्दू भाषा, कबीर, चैतन्य, मिराबाई, नामदेव, नानक.

५. त्यावेळचे सर्व मुसलमान एकोप्यानें रहात ? कां नाहीं ? बाटलेले मुसलमान हिंदूंस कसें वागवीत ? सुलतानांच्या राज्यकारभारांत हिंदूंचें स्थान कोणतें होतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्वाचीन काळ—मोंगल अंमल

—:0:—

२४. जहीरुद्दीन मोहंमद बाबर

१. मोंगल लोक :—मोंगलांसंबंधीं कांहीं हकीकत मागें सांगितलीच आहे. मुसलमान व मोंगल यांच्यामध्यें प्रथमतः वैर होतें व ते एकमेकांचा द्वेष करीत. मोंगल लोक रानटी समजले जात. त्यांच्यांतील अनेक लोक बौद्धधर्मीय व कांहीं ख्रिस्तधर्मीय झाले होते. त्यामुळें त्यांची धर्मनिष्ठा मुसलमानांइतकी कडवी नव्हती. आपला मूळचा धर्म सोडून इस्लामी धर्मपंथांत येण्यासही मोंगल लोक प्रथमतः तयार नव्हते. पुढें त्यांनीं इस्लामी धर्मपंथ स्वीकारला. तरीही धर्मसंबंधांत ते संशयी, ढिले व बेपर्वा होते, असें कट्टे मुसलमान समजत. या कारणांमुळेंच कडवे मुसलमान, मोंगल लोकांस प्रथमतः फारसा मान देत नसत. पुढें सन १५२६ मध्यें बाबरानें दिल्लीस मोंगल बादशाही स्थापन केली. त्यामुळें कित्येक अफगाण सरदार त्याच्यावर उलटले होते.

२. अर्वाचीन काळास सुरुवात :—बाबरानें मोंगलांचें राज्य स्थापन केलें त्यावेळेपासून अर्वाचीन काळास सुरुवात झाली असें मानण्यांत येतें. आतांपर्यंत एकछत्री राज्य हिंदुस्थानांत नव्हतें. तें मोंगलांनीं स्थापलें; व राज्यव्यवस्थेस व्यवस्थित स्वरूप दिलें. हिंदुमुसलमानांचे संबंधही दृढ होऊं लागले. आणखी एक क्रांतिकारक गोष्ट म्हणजे त्याच सुमारास परकीय युरोपियन लोक प्रथमतःच हिंदुस्थानांत व्यापाराकरितां आले. सन १४९८ मध्यें वास्को-ड-गामा हिंदुस्थानांत आला. त्यामुळें पूर्व-पश्चिमेचा पुन्हां एकदां संयोग झाला. त्यानंतर पूर्व-पश्चिमेंत दळणवळण वाढून पश्चिमेनें पूर्वेला जिंकलें. पुढें सन १५१० मध्यें पोर्तुगीजांनीं गोवें घेतलें व त्यांनीं हिंदुस्थानांत आपली सत्ता स्थापन केली. याच काळाच्या सुमारास जगाच्या इतिहासांतही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कित्येक नव्या घडामोडी सुरू झाल्या होत्या. युरोपांत विद्येचें पुनरुज्जीवन झालें व त्यामुळेंच अनेक प्रकारचे नवे शोध लागूं लागले. रसायनशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांतील शोध अग्रगण्य होत. पृथ्वी गोल आहे, गुरूला चार उपग्रह आहेत व सूर्यावर काळे डाग आहेत असले शोध त्यावेळीं क्रांतिकारक



समजले गेले. नौकानयनशास्त्रही पुढारलें. कोलंबसानें अमेरिका खंड शोधून काढल्यानें लोकांच्या जीवनांत क्रांति झाली. ल्यूथर, कॅल्व्हिन वगैरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मसुधारकांनीं युरोपांत धर्मक्रांति घडवून आणली. युरोपांतील लोकांनीं राष्ट्रीयत्वाच्या भावनेस उचलून धरलें. या सर्व कारणांमुळें अर्वाचीन युगास सुरुवात झाली असें मानतात.

३. बाबराच्या वेळचा हिंदुस्थान :—बाबरानें हिंदुस्थानांत मोंगल बादशाही स्थापन केली, त्यावेळची सर्वसाधारण स्थिति मागील धड्यांत सांगितलीच आहे. राजकीय स्थितीसंबंधानें एवढेंच म्हणतां येईल कीं, त्यावेळीं हिंदुस्थानांत एकही एकछत्री राज्य नसून कित्येक लहान लहान राज्यें होतीं. बंगाल, बहार, जोनपूर, खानदेश, माळवा, गुजराथ, सिंध, पंजाब, काश्मीर व दिल्ली येथें मुसलमान व अफगाण राज्यें होतीं. राजपुतान्यांत मेवाड, जोधपूर, बिकानेर वगैरे रजपूत राज्यें असून त्यांच्या मुसलमानांशीं लढाया होत. दक्षिणेंतील बहामनी राज्य फुटून त्याचीं पांच निरनिराळीं छकलें झालीं होतीं; मात्र तीं स्वतंत्र होतीं. विजयनगरचें राज्यही मोठें बलाढ्य व वैभवशाली समजलें जाई. अशा स्थितींतच बाबरानें सन १५२६ मध्यें हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्लीचें राज्य घेतलें व मोंगल बादशाही स्थापन केली.

४. बाबर-पूर्ववृत्त :—जहीरुद्दीन मोहंमद बाबर याचा जन्म सन १४८३ मध्यें खोकंद ऊर्फ फरघाना प्रांतांत एका तुर्क घराण्यांत झाला. तैमूरलंगाच्या नातवाचा तो नातु. आईच्या बाजूनें तो चंगेजखानाचा वंशज होता. बापाच्या बाजूनें तो तुर्क व आईच्या बाजूनें मोंगल होता. त्याचा बाप उमरशैख फरघाना प्रांताचा राजा होता. तो सन १४९४ मध्यें वारल्यावर बाबर त्या प्रांताचा राजा झाला. आपल्या राज्याचें संरक्षण करण्याकरितां त्याला आपल्या नातेवाईकांशीं झगडावें लागलें. समरकंदचें राज्य मिळविण्याची व तैमूरलंगाप्रमाणें मोठें राज्य स्थापण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याप्रमाणें त्यानें तीन वेळां तें शहर काबीज केलें. परंतु तें त्याच्या हातीं कायम राहिलें नाहीं. पुढें त्यानें काबूलचें राज्य जिंकून घेतलें. समरकंदच्या राज्याचा नाद सोडून तो हिंदुस्थानाकडे डोळे लावून बसला. सन १५१९ मध्यें त्यानें पंजाबवर स्वारी करून तो प्रांत मिळविला; पण तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तावडतोब त्याच्या हातांतून गेला. त्यानंतरही त्यानें हिंदुस्थानावर कांहीं स्वाऱ्या केल्या. पण त्याचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं सन १५२५ मध्यें पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी याच्या बोलावण्यावरून तो हिंदुस्थानांत आला. इब्राहीम लोदी त्यावेळीं दिल्लीस राज्य करीत होता. बाबर आला हें कळतांच तो त्याच्यावर चाल करून गेला. पानिपत येथें घनघोर लढाई झाली (१५२६). त्यांत इब्राहीम मारला गेला व त्याचें राज्य बाबरला मिळालें. हीच पानिपतची पहिली लढाई होय. ती क्रांतिकारक लढाई समजली जाते.

५. बादशाहीची स्थापना :— पानिपतच्या विजयानंतर बाबरानें दिल्ली व आग्रा हीं शहरें काबीज केलीं; व दोन्ही शहरीं आपल्या नांवानें द्वाही फिरविली. त्यानें आपल्याला 'बादशाह' असें नवें नांव स्वीकारलें. मोंगल बादशाहीचा तोच संस्थापक होय. त्यावेळीं त्याच्या ताब्यांत दिल्ली व आग्रा या शहरांच्या आसपासचाच प्रदेश होता. बाकीचे प्रांत स्वतंत्र झाले होते. दिल्ली शहर त्यानें लुटलें व अपार संपत्ति मिळविली होती. त्यानें त्यांतून आपल्या सैनिकांस बक्षिसें दिलीं. त्याच्या अनुयायांपैकीं अनेक लोक येथें राहण्यास तयार नव्हते. परंतु त्यांचें त्यानें गोड भाषणानें समाधान केलें. मात्र जे येथें राहण्यास तयार नव्हते त्यांस त्यानें काबूलास परत जाऊं दिलें. बाबराजवळ तोफा व बंदुका होत्या. त्यांचा त्यानेंच हिंदुस्थानांत प्रथमतः उपयोग केला. त्यांच्या जोरावरच बाबरानें पानिपतची लढाई जिंकली होती.

६. राणा संग व सिक्रीची लढाई (१५२७) :— बाबरानें दिल्लीस नवें राज्य स्थापलें ही गोष्ट अनेक रजपुतांस आवडली नाहीं. त्यावेळीं मेवाडचा राणा संग हा रजपुतांचा पुढारी होता. तो शूर, पराक्रमी व हुषार होता. दिल्लीचें राज्य मिळविण्याची त्यानें महत्त्वाकांक्षा धरली होती. तैमूरलंगाप्रमाणेंच बाबर लूट करून आपल्या प्रांतांत पुन्हां परत जाईल व तो गेल्यावर दिल्लीचें राज्य आपल्याला घेतां येईल अशी त्याची कल्पना होती. परंतु बाबर येथें कायमचाच तळ देऊन राहिल्यानें त्याची महत्त्वाकांक्षा रसातळास गेली. राणा संग "संग्रामसिंह' म्हणून ओळखला जात होता. त्याच्या शरीरावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐंशी जखमा होत्या. त्याचा एक डोळा व एक हात गेला होता. सर्व रजपूत त्याला मानीत असत. त्यानें सुमारें एक लाख सैन्य जमविलें व तो बाबरावर चालून गेला. बाबराची तयारी नव्हती. रजपुतांशीं लढण्याचा त्याचा हा पहिलाच प्रसंग. तरीही न डगमगतां त्यानें आपलें सैन्य जमा केलें, तोफखाना सज्ज केला व तो संगावर चालून गेला. दोन्ही सैन्यांची आग्र्यापासून वीस मैलांवर सिक्री येथें गांठ पडून भयंकर लढाई झाली. त्यांत बाबराला जय मिळाला (१५२७). याच लढाईच्या वेळीं दारूचा नाद सोडण्याची त्यानें शपथ वाहून आपल्याला जय मिळण्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना केली होती. परमेश्वरानें त्याच्या हांकेस 'ओ' दिली.



बाबर वकिलास भेट देतो

७. सिक्रीच्या लढाईचे परिणाम :— बाबर उत्तम सेनानायक होता. त्याचा तोफखानाही त्याच्या मदतीस होता. अनेक पराक्रमी रजपूत वीर या लढाईत मारले गेले. रजपुतांचें वर्चस्व नष्ट झालें व बाबराला त्यांची भीति उरली नाहीं. त्यामुळें त्याचें राज्य भक्कम पायावर रचलें गेलें. राणा संग जखमा होऊन रणांगणावर पडला होता. त्याला कोणींतरी उचलून नेलें. यशाशिवाय चितोडला न जाण्याची शपथ त्यानें वाहिली होती. पुढें सन १५३० मध्यें तो अरण्यांत असतांच मरण पावला. सिक्रीच्या विजयानंतर बाबरानें रजपुतान्यांतील मोठे व बलाढ्य किल्ले जिंकून घेतले व बुंदेलखंडही जिंकलें. या विजयानंतर त्यानें अफगाणांचा मोड करण्याचें ठरवून त्यांच्यावर चाल केली. बाबरानें मोंगलांचें राज्य स्थापलें हें त्यांस आवडेत नव्हतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून त्यांनीं बंगाल-बिहारमध्यें नवें अफगाण राज्य स्थापलें होतें. सिक्रीच्या विजयानंतर अफगाणांचा पराभव करणें बाबरास सोपें गेलें. त्यानें एकदम चुनारगडावर चाल केली व गोग्रा नदीच्या कांठीं अफगाणांचा त्यानें पराभव केला. या विजयानें सर्व बिहारप्रांत त्याच्या ताब्यांत आला. बंगालचा राजा नुस्रतशहा याच्याशीं मात्र त्यानें मैत्रीचा तह केला.

८. **बाबराचा मृत्यु व योग्यता**:—हिंदुस्थानांत सुमारें पांच वर्षें बाबराला फार दगदग पडली. त्यांतच तो एकाएकीं आजारी पडून सन १५३० मध्यें आग्रा येथें मृत्यु पावला. बाबर आजारी असतांच त्याचा मुलगा हुमायून त्याला भेटण्यास आला होता. परंतु त्यावेळीं हुमायून आजारी पडला. त्याचें दुखणें थोडें विकोपाला गेलें. तेव्हां बाबरानें ईश्वराची प्रार्थना करून, 'देवा, माझें उरलेलें आयुष्य माझ्या मुलाला दे; परंतु त्याला वांचीव' असा त्याचा धांवा केला. ईश्वरानें त्याचा धांवा ऐकला. हुमायून खडखडीत बरा झाला; परंतु त्यानंतर बाबराचा आजार वाढून तो मृत्यु पावला. त्यानें पांचच वर्षें राज्य केलें. तरी त्याची योग्यता मोठी आहे. त्यानें अनेक संकटें भोगलीं. रानोमाळ त्यास भटकावें लागलें. तरीही त्यानें आपली महत्त्वाकांक्षा सोडली नाहीं. तो स्वतः शूर, धाडसी व कुशल योद्धा होता. सेनानायकाला लागणारे गुण त्याच्या ठिकाणीं होते. चिकाटी, औदार्य, धूर्तपणा, काटकपणा वगैरे त्याच्या गुणांमुळेंच त्याला थोरपण लाभलें. त्याच्या शिपायांची त्याच्या ठिकाणीं निष्ठा होती. ईश्वरावर त्याची पूर्ण निष्ठा असे. तो विद्वान व रसिक असून विद्या व कला यांची त्यास अभिरुचि होती. मोठमोठे विद्वान लोक त्याच्या पदरीं होते. शिवाजी ज्याप्रमाणें आपल्या आईस मानी, त्याप्रमाणें बाबरही आपल्या आईच्या व आजीच्या अर्ध्या वचनांत असे. पैशाचा त्याला कधींच लोभ नसे. तो स्वतः उत्तम लेखक होता. त्यानें आपलें आत्मचरित्र लिहून ठेवलें आहे. सृष्टिसौंदर्याची त्याला फार आवड होती. शिस्तीचाही तो भोक्ता होता. दारूचें व्यसन त्याला जडलें होतें. परंतु सिक्रीच्या लढाईपासून तें त्यानें सोडून दिलें. एकंदरींत पाहतां बादशाह होण्यास लागणारे अनेक गुण त्याच्या ठिकाणीं असल्यामुळेंच त्याला येथें राज्य स्थापतां आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. त्याचें आत्मचरित्र :— बाबरानें आपलें आत्मचरित्र तुर्की भाषेंत लिहून ठेविलें आहे. उत्कृष्ट वाङ्मयाचा नमुना म्हणून तें अजूनही वाखाणलें जातें. त्या चरित्राची भाषा सोपी, चटकदार व मोहक आहे. त्यांत अनेक प्रकारचीं बहारीचीं वर्णनें वाचण्यास मिळतात. आपल्या आयुष्यांतील हरेक प्रसंगाची माहिती, मोठ्या कळकळीनें व आडपडदा न ठेवतां, त्यानें वर्णिली आहे. त्यावरून त्याच्या मनाची साक्ष सहज पटते. आत्मचरित्रांत केवळ आपली नुसती स्तुति केलेली नसून, बाबरानें आपले दोषही सांगितले आहेत. इतकें उत्तम आत्मचरित्र व तेंही एका राजानें लिहिलेलें! त्यामुळें जगाच्या वाङ्मयांतही त्याला फार किंमत आहे. त्याच्या आत्मचरित्रांतील कांहीं कांहीं भाग इतके मनोरम आहेत, कीं ते पुन्हां पुन्हां वाचावेसे वाटतात, असें एका युरोपियनानें म्हटलें आहे.

अ भ्या स

१. बाबराचें पूर्वचरित्र सांगा. त्याला दिल्लीचें राज्य कसें मिळालें? त्यानंतर त्याला कोणत्या संकटांशीं तोंड द्यावें लागलें ? त्यांतून तो कसा पार पडला ?

२. राणा संगाचें चरित्र सांगा. सिक्रीच्या लढाईत त्याचा पराभव कां झाला ?

३. सिक्रीच्या लढाईचे व पानिपतच्या लढाईचे परिणाम सांगा.

४. बाबराच्या वेळची हिंदुस्थानची परिस्थिति वर्णा.

५. बाबराची योग्यता सांगा. त्याचें आत्मचरित्र कां प्रसिद्ध आहे ?

उतारे

१. सिक्रीच्या लढाईच्या वेळीं बाबरानें शिपायांपुढें केलेलें भाषण.

माझ्या शिपायांचा निरुत्साह व त्यांची नाउमेद पाहून मी त्या सर्वांस एकत्र बोलाविलें व त्या सर्वांस उद्देशून एक भाषण केलें. मी म्हणालों, “शिपाई हो! आजपर्यंत तुम्हीं केवढा सन्मान मिळविला ? अनेक प्रसंगीं कसे विजय संपादन केले ? काफर लोकांस भिऊन आपण पळालों, तर ते लोक आपणांस काय म्हणतील? न पळालों तरी आपण शत्रूच्या हातून सुटत नाहींच. मनुष्य जन्मास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला कीं त्यास मरण हें आहेच; आणि एक दिवस हें दुःखमय जग सोडून आपणा सर्वांस गेलेंच पाहिजे. ईश्वरच फक्त सनातन व मुक्त आहे. तर मग अब्रू घालवून जिवंत राहण्यापेक्षां कीर्ति करून मरणें काय वाईट ? जीव गेला तरी बेहत्तर, परंतु कीर्ति मिळविल्याशिवाय मी मरणार नाहीं असा आपण दृढनिश्चय करूं या. आपल्याला समरांगणीं मृत्यु आल्यास ईशकृपेनें आपल्याला कायमची मुक्ति मिळेल; आपण जिंकलें तर आपली अखंड कीर्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां जिवांत जीव आहे तोंपर्यंत आपण लढूं व लढाईंतून अपयश घेऊन परत फिरणार नाहीं अशी कुराणाची आपण शपथ घेऊं या.' माझें हें भाषण ऐकतांच सर्वांनीं त्याप्रमाणें शपथ घेतली.

—बाबराच्या आत्मवृत्तावरून.

प्रश्न :—१ बाबरानें आपल्या शिपायांस कोणता उपदेश केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

२. बाबराची परधर्मसहिष्णुता.

प्रिय पुत्रा ! हिंदुस्थानांत अनेक धर्मांचे लोक राहतात. परमेश्वरानें कृपाळूपणें या देशाचें राज्य तुला दिलें आहे. तरी धर्मासंबंधानें तूं दुराग्रही होऊं नकोस. सर्वांचा न्याय निःपक्षपातानें करीत जा; आणि लोकांच्या धर्मभावना व चालीरिती यांस कोणत्याही प्रकारें दुखवूं नकोस. मुख्यतः राज्यांत गोवध बंद ठेव. म्हणजे लोकांचीं अंतःकरणें तुला वश होतील; आणि ते कृतज्ञभावानें तुला भजतील. कोणाच्याही मंदिरास व तीर्थास उपद्रव देऊं नकोस व न्यायानें वाग, म्हणजे प्रजा संतुष्ट राहून देशांत शांति व संतोष वास करतील. लोकांचीं मनें शस्त्रानें न जिंकतां प्रेमानें व उपकारानें आपलींशीं करून घे. शिया व सुन्नी यांचे कलहांत लक्ष घालूं नकोस, नाहीं तर इस्लामालाच कमीपणा येईल.

—बाबराचें हुमायुनास पत्र.

प्रश्न :—१ परधर्मासंबंधीं बाबराचा हुमायुनास कोणता उपदेश होता ? तो कां ?

२ त्याच्या उपदेशाप्रमाणें कोणता मोंगल बादशाह वागला ? त्याचा परिणाम काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५. हुमायून व शेरशाह

१. हुमायून (१५३०-४०):—बाबराच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा हुमायून सन १५३० मध्यें दिल्लीचा बादशाह झाला. तेविसाव्या वर्षीं तो गादीवर आला. तो उदार, ममताळू, शूर व दिलदार होता. परंतु त्याच्या अंगीं तडफ व निश्चय नसल्यानें त्याच्या हातून कोणतेंही काम चांगल्या तऱ्हेनें होत नसे. धरसोड त्याच्या पांचवीलाच पुजलेली होती. प्रेमळपणा, सौजन्य, औदार्य वगैरे त्याच्या गुणांचा अतिरेक झाल्यानें तो दुर्दैवी ठरला. धामधुमीच्या काळांत त्याचा निभाव लागणें शक्य नव्हतें. त्याची विलासप्रियता महशूर होती. त्यामुळेंही त्याचें पुष्कळ नुकसान झालें. त्याच्यासंबंधीं असें सांगतात कीं, 'ज्यावेळीं शिक्षा करणें जरूर, त्यावेळीं तो क्षमा करी व ज्यावेळीं घोड्यावर स्वार होऊन लढाई मारणें आवश्यक, त्यावेळीं तो विलासांत दंग असे.' यावरून त्याच्या स्वभावाचें मर्म लक्षांत येईल.

२. आरंभींच्या चुका व अडचणी :—तो राज्यावर आला त्यावेळीं त्याचें राज्य अगदींच लहान होतें. बंगाल, बिहार, राजपुताना वगैरे प्रांत पूर्णपणें त्याच्या ताब्यांत नव्हते. तेथील सुभेदार स्वतंत्र होऊं पहात होते. रजपूत केव्हां उठाव करतील याचा नेम नव्हता. अशा परिस्थितींत त्यानें बापाच्या इच्छेप्रमाणें काबूल व पंजाब हे प्रांत आपला सावत्र भाऊ कामरान याला दिले. हिंदालला संबळची सुभेदारी व मिर्झा अस्करीस मेवाडची जहागीर दिली. पुढें ते सर्वजण स्वतंत्र झाले. यामुळें हुमायुनाचें अत्यंत नुकसान झालें. काबूल व पंजाब गेल्यानें तिकडून येणारे काटक व शूर शिपाई हुमायुनास मिळेनासे झाले. त्यामुळें त्याला आपल्या जुन्या व पोशाखी सैन्यावर सर्व कामें सोपवावीं लागलीं. त्यावेळीं सर्व शत्रूंनीं उठाव केला. तेव्हां त्यांस ताब्यांत ठेवण्यासाठीं त्यानें आपलें सैन्य विभागून तें निरनिराळ्या ठिकाणीं ठेवून दिलें. यामुळें त्याचें लष्करी सामर्थ्य कमकुवत झालें. शिवाय एकदम सर्व शत्रूंशीं विरोध न करतां, एकाशीं पडतें घेण्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व दुसऱ्याचा बंदोबस्त करण्याचें धोरण त्यानें स्वीकारलें नाहीं. त्यामुळें त्याची फार धांदल उडाली. त्याचे भाऊही त्याच्यावर उलटले व त्याच्या संकटकाळीं त्यांनीं त्याला मदत केली नाहीं.

३. हुमायुनाचे शत्रू :—अशा प्रसंगीं हुमायुनास अनेक शत्रू उत्पन्न झाले. वायव्य सरहद्दीकडे त्याचा भाऊ कामरान, बिहारमध्यें लोदीवंशीय मोहंमद लोदी, बंगाल्यांत शेरखान पठाण व गुजराथेंत बहादुरशाह असे अनेक लोक दिल्लीचें राज्य मिळविण्यास टपले होते. हुमायून राज्यावर बसतांच सर्वांनीं एकदम उचल केली. त्या प्रसंगीं त्यानें प्रथम बिहार प्रांतांतील मोहंमदवर चाल केली व त्याचा पाडाव केला. इतक्यांत गुजराथेंत बंड झालें. तेव्हां बिहार प्रांत ताब्यांत आल्यावर बंगाल्यांतील शेरखानाचा बंदोबस्त करण्यापूर्वीच, तो बहादुरशहावर चालून गेला. त्यावेळीं बहादुरशाह चितोडास वेढा घालून बसला होता. परंतु हुमायून त्याच्यावर चाल करून गेला नाहीं. चितोडच्या कर्णावती राणीनें त्याच्या विनवण्या करून त्याची मदत मागितली. तरीही तो एकदम चाल करून गेला नाहीं. शेवटीं बहादुर-शहानें चितोड घेतलें, तेव्हां हुमायुनानें त्याच्यावर चाल केली. बहादुरशाह पळत सुटला. त्याचा पाठलाग करीत असतांच हुमायुनानें अहमदाबाद, खंबायत, चंपानेर वगैरे गुजराथी शहरें घेतलीं व अपार लूट मिळविली. इतकें झाल्यावर गुजराथचा कारभार आपला भाऊ मिर्झा अस्करी याच्याकडे सोंपवून तो माळव्यांत जाऊन चैन करीत बसला; व नंतर तो आग्र्यास गेला. हें वर्तमान समजतांच बहादुरशहानें दीव येथील पोर्तुगीजांची मदत घेऊन गुजराथ व माळवा पुन्हां जिंकून घेतला. त्यामुळें हुमायुनाची कामगिरी फुकट गेली.

४. शेरखानाशीं युद्ध (१५३९–४०) :—हुमायून आग्र्यास पोंचतो न पोंचतो तोंच बिहारमध्यें शेरखानानें उठावणी केली. तेव्हां हुमायून त्याच्यावर चालून गेला. शेरखानाची तयारी उत्तम होती. तरीही हुमायुनानें त्याच्या ताब्यांतील चुनारगड काबीज केला. त्यामुळें डगमगून न जातां शेरखान बंगाल्यांत मोठ्या तयारीनें राहिला. सुलतानपदही त्यानें त्यावेळीं धारण केलें होतें. पुढें हुमायून शेरखानाची वाट पाहत बसला. शेरखानासही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेंच पाहिजे होतें. कारण पावसाळा जवळ आला होता. तो सुरू झाला असता तर हुमायुनाच्या सैन्यास कैचींत पकडण्यास त्यास सोपें गेलें असतें. त्याच वेळीं शेरखानानें कनोजपर्यंतचा मुलूख काबीज केला होता. शेवटीं पावसाळा सुरू झाल्यावर हुमायुनानें शेरखानावर चाल केली. दोन्ही सैन्यांची गांठ बक्सारनजीक चौसा गांवीं पडली. त्यांत हुमायुनाचा पराभव होऊन त्याला पळतां भुई थोडी झाली! याच वेळीं गंगा तरून जात असतां एका भिस्त्यानें त्याचा जीव वांचविला. शेवटीं हुमायून कसाबसा आग्र्यास पोंचला. त्याची राणी शेरखानाच्या हातीं लागली होती. शेरखानानें तिला पुढें आदरानें वागवून हुमायुनाकडे रवाना केलें. मात्र बादशाही सैन्याचा त्यानें फडशा उडविला. त्यानंतर वर्षानें शेरखानानें हुमायुनाचा पाठलाग केला. तेव्हां कनोजजवळ बेलग्राम येथें लढाई होऊन हुमायून पळाला. त्यानंतर शेरखानानें दिल्ली काबीज करून सुलतानपद धारण केलें.

५. हुमायुनाचे हाल :—प्रथमतः हुमायून लाहोरास गेला. तेथें त्यानें आपल्या भावांची मदत मागितली. परंतु ती त्याला मिळाली नाहीं. तेव्हां तो उमरकोटास गेला. तेथें असतांनाच त्याची नवीन राणी हमीदा प्रसूत होऊन तिला मुलगा झाला (१५४२). तोच अकबर होय. नंतर हुमायून काबूल–कंदाहारकडे पळाला. तिकडेही त्याला त्याचा भाऊ कामरान यानें मदत केली नाहीं. तेव्हां तो इराणचा शहा तहमास्प याच्याकडे मदतीकरितां गेला. तो शहा शियापंथी होता. 'शियापंथाचा स्वीकार करशील तर मदत करीन ' असें शहानें त्याला सांगितलें. त्याचें म्हणणें मान्य करून हुमायुनानें त्याची मदत मिळविली. नंतर प्रथम त्यानें मिर्झा अस्करी व नंतर कामरान यांचा पाडाव करून कंदाहार व काबूल जिंकलें. त्या प्रांतांतच तो कांहीं दिवस होता. नंतर हिंदुस्थानांत बंडाळी माजलेली पाहतांच त्यानें हिंदुस्थानावर चाल करून सन १५५५ मध्यें दिल्लीचें राज्य परत मिळविलें. मात्र या परत मिळविलेल्या राज्याचा त्याला फार दिवस उपभोग घेतां आला नाहीं. कारण पुढच्याच वर्षी जिन्यावरून काठी टेकीत तो खालीं उतरत असतां पडला व त्यांतच त्याचा अंत झाला (१५५६).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. शेरशाह (१५४०-४५) :—हुमायुनाचा पराभव केल्यावर शेरखान पठाण दिल्लीचा सुलतान झाला. त्यानें 'शेरशहा' हें नांव धारण केलें होतें. त्याच्या घराण्याचें नांव 'सूर' असें होतें. तो अफगाण होता. त्याचें मूळचें नांव 'फरीदखान' होतें. तो बिहारचा लोदीवंशीय राजा मोहंमद याचा आश्रित होता. एका संकट प्रसंगीं एका वारासरशीं वाघास (शेरास) ठार मारून फरीदनें मोहंमदाचा प्राण वांचविला म्हणून त्याला 'शेरखान' असें नांव मिळालें. पुढें तो बाबरास मिळाला. कांहीं दिवसांनीं तो पुन्हां बिहारमध्यें गेला व तेथें त्यानें अफगाणांची संघटना करण्यास सुरवात केली. पुढें त्यानें लष्कराच्या जोरावर बिहारमध्यें आपलें वर्चस्व स्थापन केलें. हुमायून बादशाह झाला त्यावेळीं तो व त्याचा मुलगा जलालखान हे त्यास विरोधूं लागले. तेव्हां हुमायुनानें त्यांच्यावर चाल केली. त्यावेळीं शेरखानाचा चुनारगड हा किल्ला हुमायुनानें काबीज केला. त्यामुळें हुमायुनास तो शरण गेला. मोठ्या उदार अंतःकरणानें हुमायुनानें त्याला सोडून दिलें. हा उपकार न स्मरतां शेरखानानें हुमायुनास देशोधडीस कसें लावलें तें आपण मागें पाहिलेंच आहे !

७. शेरशहाची कामगिरी :—शेरशहानें फक्त पांच वर्षें राज्य केलें; तरी त्या काळांत त्यानें राज्यकारभाराची घडी उत्तम बसविली. प्रथमतः त्यानें रजपुतांचा बंदोबस्त केला. रतनभोर व रायसीन हे किल्ले त्यानें मोठ्या शिकस्तीनें जिंकून घेतले. रायसीन किल्ला त्यानें कपटानें घेतला व रजपुतांच्या बायकामुलांचा त्यानें अमानुषरीतीनें संहार केला. रजपुतांचा पराभव झाल्यानें ते त्यास शरण आले. पुढें त्यानें माळवा, पंजाब, काबूल, बंगाल वगैरे प्रांतांचा योग्य बंदोबस्त केला व तेथें स्वतंत्र अधिकारी नेमले. यामुळें काबूल ते बंगाल व दक्षिणेस माळव्यापर्यंत त्याचें राज्य झालें. या सर्व राज्याचा कारभार त्यानें मोठ्या दक्षतेनें केला. पुढें सन १५४५ मध्यें कलिंजर किल्ला घेत असतांच दारूखाना उडून शेरशहाचा अंत आकस्मिकपणें झाला. त्याच्यानंतर दिल्लीच्या गादीवर बसलेले सूर वंशांतील राजे दुर्बल निघाले. त्यामुळें राज्यांत अंदाधुंदी माजली. त्याचा फायदा घेऊनच मागें सांगितल्याप्रमाणें हुमायुनानें दिल्लीचें राज्य पुन्हां मिळविलें (१५५५).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. शेरशहाची राज्यव्यवस्था:—थोडीं वर्षें राज्य करूनही उत्तम राज्यकर्ता म्हणून शेरशहानें मोठें नांव मिळविलें. त्याचा बहुतेक काळ लढण्यामध्यें गेला असतांही त्यानें लोकहिताचीं अनेक कामें केलीं. हिंदु व मुसलमान यांस त्यानें समानतेनें वागवून त्यांची मर्जी संपादिली. राज्याला बळकटी आणण्याकरितां त्यानें प्रथमतः लष्कर सुधारलें. त्याच्या लष्करांत पायदळ, घोडदळ व तोफखाना असे. लष्करी अधिकाऱ्यांस जहागिरी देण्याचें धोरण त्यानें बंद केलें. सैन्यास कवायतीचें शिक्षण देऊन व त्यांचा पगार व भत्ता ठरवून त्यानें लष्कर सुसज्ज केलें. त्याच्या लष्करांत हिंदूंचाही भरणा होत असे. त्यानें जमिनीची पाहणी व मापणी करून सरकारसारा ठरवून दिला; तो एक चतुर्थांशापेक्षां जास्त नव्हता. राज्याच्या कारभाराकरितां त्यानें निरनिराळीं खातीं केलीं व त्याकरितां एक नोकरवर्गही निर्माण केला. हिशोब-खातेंही त्यानें स्थापिलें होतें. न्यायाकरितां त्यानें न्यायासनेंही निर्माण केलीं होतीं. राज्याचे निरनिराळे लहान-मोठे भाग पाडून प्रत्येकावर त्यानें एकेक अधिकारी नेमला होता. जनहिताच्या दृष्टीनें त्यानें खालील गोष्टी केल्या. बंगाल ते सिंधूनदापर्यंत त्यानें एक रस्ता तयार केला व त्याच्या दुतर्फा झाडें लाविलीं. दर दोन मैलांवर त्यानें विहिरी, धर्मशाळा व अन्नछत्रें स्थापिलीं. यामुळें वाटसरूंची व व्यापाराचीही चांगली सोय झाली. घोड्यावरून टपाल नेण्याचीही त्यानें पद्धत सुरू केली होती. अस्सल चांदीचें नाणें त्यानेंच प्रथम सुरू केलें. राज्यांतील वजनें-मापें एकाच पद्धतीचीं त्यानें चालू केलीं. या सर्व सुधारणांमुळें त्याच्या राज्यास चांगलीच बळकटी आली. यावरून राज्यकर्ता या नात्यानें त्याचा लौकिक मोठा कां झाला, हें समजून येण्यासारखें आहे. तो जास्त जगता, तर त्यानें पुष्कळ चांगलीं कामें केलीं असतीं.

९. शेरशहाची योग्यता:—शेरशहा मोठ्या योग्यतेचा राज्यकर्ता होऊन गेला यांत शंका नाहीं. त्याच्या राज्यांत त्यानें सर्वत्र शांतता निर्माण केली व देश भरभराटीस आणला. सेनापति या नात्यानें तो खात्रीनें सरस होता. धाडसी व पराक्रमी म्हणून तो प्रसिद्ध होता. आपल्या अधिकाऱ्यांस तो नेहमीं धाकांत ठेवी. तो मोठा धार्मिक होता, तरीही त्यानें हिंदूंवर जुलूम केला नाहीं. उलट तो त्यांस समानतेनें व उदारपणें वागवीत असे. न्यायाच्या बाबतींत तो अत्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांटेकोरपणें वागे. अविश्रांत श्रम करून त्यानें आपल्या राज्याची चांगली जोपासना केली. खाजगी आचरणांत मात्र तो अत्यंत स्वार्थी होता. स्वार्थाकरितां तो दिलेलें वचनही मोडीत असे. कांहीं कांहीं वेळां तो अत्यंत क्रूरपणें व कपटानें वागत असे. हातीं घेतलेलें काम मात्र तो नेहमीं तडीस नेत असे. एकंदरींत तो दूरदर्शी, परोपकारी, दयाळू व प्रजाहितदक्ष राजा होऊन गेला. त्यानंतर त्याचा मुलगा सलीमशाह यानें चार वर्षें राज्य केलें; परंतु पुढील राजे कर्तृत्वहीन निघाल्यानें सूरवंशाचा शेवट होऊन हुमायुनानें दिल्लीचें राज्य घेतलें (१५५५).

अ भ्या स

१. हुमायुनाचा स्वभाव वर्णा, त्याच्या अंगीं कोणते दोष होते ? त्याचा परिणाम काय झाला ?
२. राज्यावर आल्यावर हुमायुनानें कोणत्या चुका केल्या ? त्याचा परिणाम काय झाला ?
३. ' हुमायुनाचा स्वभावच त्याच्या नाशास कारणीभूत झाला,' हें म्हणणें सिद्ध करा.
४. शेरशहाचें पूर्वचरित्र वर्णा. त्यानें राज्य कसें मिळविलें ? त्याच्या सुधारणा सांगा.
५. व्यक्ति व राज्यकर्ता या नात्यानें शेरशहाची योग्यता सांगा.

उतारे

१. हुमायुनाची योग्यता

त्याची बुद्धि तीव्र असून अनिश्चय, धरसोड व विचारशून्यता हे दोष व औदार्य, ममताळूपणा व सौजन्य हे गुण स्वभावतःच त्याच्या अंगीं होते. परंतु हळूहळू औदार्याच्या ठिकाणीं उधळेपणा व सौजन्याच्या ठिकाणीं दुर्बलता त्याच्या स्वभावांत येत गेल्यानें, अखेरपर्यंत त्याजवळ खुषमस्करे व तोंडपुजे लोकांचा जमाव जमला. त्यास विद्येची अभिरुचि असून विद्वानांस तो चांगला आश्रय देई. त्याच्या आश्रयास कित्येक ज्योतिषी व इतिहासकार होते. वनवासांतसुद्धां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याजबरोबर पुस्तकांचे भारे असत. तो व त्याचा भाऊ हिंदाल हे स्वतः कविता करीत. गणित व ज्योतिषशास्त्रांचा हुमायुनानें बराच अभ्यास केला होता. एक वेधशाळा स्थापण्याचा त्याचा विचार होता. मुसलमानी धर्मावर त्याची श्रद्धा दृढ असून मंत्रतंत्रावर व शकुनांवर त्याचा भरंवसा होता. कोणत्याही गुणाचा अतिरेक म्हणजे दोषच होय. या नियमानुसार त्याचा प्रत्येक गुण अतिरेकाच्या योगानें दोष बनला व त्याची नानातऱ्हेनें खराबी झाली.

प्रश्न :—१ हुमायुनाच्या अंगीं कोणते दोष होते ? कोणत्या गुणांचा अतिरेक झाला ? त्याचा परिणाम काय झाला ?

२. शेरशहाचा कारभार—प्रवाशांची सोय.

शेरशहानें दानधर्म विपुल केला. गरीब प्रवाशांच्या सोयीसाठीं मोठ्या सडकांवर दर चार मैलांवर त्यानें निवासगृहें बांधलीं. अशा तऱ्हेच्या सडका त्यानें बंगाल ते पंजाब, आग्रा-बऱ्हाणपूर–चितोड व लाहोर–मुलतान या तयार केल्या होत्या. प्रत्येक निवासगृहांत हिंदु व मुसलमान यांची राहण्याची स्वतंत्र व्यवस्था असे. पाण्याचीं भांडीं, खाटा, अन्नसामुग्री व घोड्यांकरितां चंदीही प्रत्येक निवासगृहांत असे. तसेंच प्रत्येक निवासगृहांत दोन घोडे असत; उद्देश एवढाच कीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बातम्या लौकर पोंचवितां याव्या. 'हीं निवासगृहें मातीचीं आहेत, तीं विटांचीं बांधण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे' असें शेरशहा म्हणत असे. कोण्या गांवीं दरवडा पडला व दरवडेखोर पकडले गेले नाहींत, तर गांवाच्या पाटलास पकडण्याचा हुकूम होत असे. त्याच्या फुशीमुळेंच गांवावर दरवडे पडतात अशी त्यावेळीं समजूत असे. शेर-शहाच्या काळीं पाटील आपलीं कामें चोख करून प्रवाशांस उत्तमप्रकारें मदत करीत. सैनिकांनीं गांवाच्या शेतांस उपद्रव देऊं नये असा त्यांस सक्त हुकूम होता.

—तारीख इ. शेरशाहीवरून.

प्रश्न :—१. प्रवाशांच्या सोयीकरितां शेरशहानें कोणत्या गोष्टी केल्या ?
२. शेरशहानें बांधलेल्या निवासगृहाचें वर्णन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१५२६–१५५६.

हिंदुस्थान	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
पानिपतची लढाई.	१५२६		
बाबराकडून मोंगल-वंशाची स्थापना.	१५२६	आठवा हेन्री १५०९–४७	वूल्से
सिक्रीची लढाई	१५२७		
		इंग्लंडांत धर्मसुधारणा १५२९–३६	शेरखान
बाबराचा मृत्यु	१५३०		
		मठजप्ती १५३६–३९	
हुमायून-शेरखान युद्ध	१५३९–४०		क्रॅन्मर, क्रॉम्वेल
शेरशहा दिल्लीचा राजा	१५४०	जेसुइटपंथाची स्थापना	
अकबराचा जन्म	१५४२		एकनाथ
शेरशहाचा मृत्यु	१५४५		इग्नेशस लायोला
		आठव्या हेन्रीचा मृत्यु १५४७	सॉमरसेट
हुमायुनास दिल्लीचें राज्य	१५५५	सहावा एडवर्ड १५४७–१५५३	
हुमायुनाचा मृत्यु	१५५६	मेरी १५५३–१५५८	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२६. जलालुद्दीन मोहंमद अकबर (१५५६–१६०५)

१. अकबर-पूर्ववृत्त :—आपल्या नातेवाईकांच्या मनाविरुद्ध हुमायुनानें हमीदा नामक एका इराणी स्त्रीशीं लग्न केलें होतें. ती हुमायुनाच्या वनवासांतही त्याच्याबरोबर भटकत राहिली. तिलाच अकबर नांवाचा मुलगा उमरकोट येथें सन १५४२ सालीं झाला. अर्थात अकबराचें बालपण हालअपेष्टेंतच गेलें. अकबराच्या जन्माच्या वेळीं हुमायून आपल्या लोकांस म्हणाला कीं, 'कस्तुरीप्रमाणें याची कीर्ति जगभर पसरणार हें निश्चित.' आणि त्याचे हे शब्द यथार्थ ठरले. अकबर सन १५५६ मध्यें राज्यावर आला त्यावेळीं तो तेरा वर्षांचा होता. त्याला शिक्षण नव्हतेंच. अनुभवाच्या शाळेंत तो सर्व शिकला. तो राज्यावर आला त्यावेळीं त्याचें राज्य अत्यंत लहान होतें. सर्व शत्रू त्याच्याविरुद्ध उठलेले. खुद्द दिल्लीही सुरक्षित नव्हती. रजपूत राजे स्वतंत्र झाले होते. माळवा, गुजराथ, ओरिसा वगैरे राज्यें स्वतंत्र होतीं. दक्षिणेंतील ब्रहामनी राज्यें व विजयनगरचें राज्य आपला संसार सुखानें व ऐश्वर्यानें करीत होतीं. पोर्तुगीजांचा व्यापार पश्चिमेस धिमेपणानें चालला होता.

२. पानिपतची दुसरी लढाई (१५५६) :—दिल्ली सुरक्षित नसल्यानें अकबर व त्याचा पालक बैरमखान लाहोरास गेले. त्यावेळीं सूरवंशीय मोहंमदशहा याचा हिमू हा हिंदु दिवाण होता. त्यानें सैन्य व तोफखाना घेऊन दिल्लीवर चाल केली व तें शहर घेतलें. त्यानंतर तो अकबरावर चाल करून गेला. ही गोष्ट कळतांच अकबरानेंही लष्कराची जमवाजमव करून त्याच्यावर चाल केली. दोन्ही सैन्यांची गांठ पानिपत येथें पडली. तेथें दोन्ही सैन्यांत निकराची लढाई होऊन, हिमू जखमी होऊन पडला. तशाच स्थितींत हिमूला अकबराकडे नेण्यांत आलें. तेव्हां त्याचा शिरच्छेद करून गाझीपद मिळविण्याचें अकबरानें नाकारल्यानें बैरमखानानें त्याचा स्वतः वध केला. पानिपतच्या विजयानें अकबराचा मार्ग निष्कंटक होऊन दिल्ली व आग्रा हीं शहरें त्याच्या हातीं आलीं. ही पानिपतची दुसरी लढाई होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



मोंगलांचीं नाणीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. बैरमखान :—बाबर व हुमायून यांच्या तालमींत तयार झालेला बैरमखान हा अकबराचा राज्यपालक होता. अकबराच्या बाल्यावस्थेंत बैरमखानानेंच त्याचा प्रतिपाळ केला होता. बैरमखान कर्तबगार, हुषार व शूर योद्धा होता. त्याच्याच मदतीनें अकबराला पानिपतची दुसरी लढाई जिंकतां आली. ती जिंकल्यावर अकबरानें आपल्या राज्याचा कारभार बैरमखानास सांगितला. सन १५५८–६० पर्यंतच्या काळांत बैरमखानानें ग्वाल्हेर, अजमीर, जोनपूर वगैरे प्रांत मिळविले व अकबराच्या राज्याचा बराच विस्तार केला. सन १५६० मध्यें अकबर वयांत आला. तेव्हां त्यानें सर्व कारभार आपल्या हातीं घेतला व खानास मक्केस जाण्याची सूचना केली. मानी बैरमखानास तें आवडलें नाहीं. प्रथमतः अकबराच्या सूचनेप्रमाणें तो वागला व मक्केस जाण्यास निघालाही. परंतु वाटेंत त्याचें मन फिरलें व त्यानें बंड केलें. अकबरानें तें मोडून बैरमखानास मोठ्या मनानें माफी केली व त्यास मोठा हुद्दा देऊं केला. परंतु बैरमखानास तें पसंत पडलें नाहीं व तो मक्केस जाण्यास निघाला. वाटेंतच त्याचा सुरतेस सन १५६१ मध्यें खून झाला. बैरमखान कडक होता व त्याचा स्वभावही निष्ठुर होता. यामुळें त्याचा कारभार लोकांस पसंत पडला नाहीं. शिवाय अकबरास त्यानें आपणहून राज्यकारभार दिला नाहीं. त्याच्या मुलास मात्र अकबरानें मानानें वागविलें व त्यास खानखानान ही पदवी दिली.

४. अकबर व रजपूत :—अकबराचें राज्य अगदीं लहान होतें. त्याचा विस्तार करावयाचा झाल्यास त्याला अनेक युद्धें करणें जरूर होतें. प्रथमतः बैरमखानाच्या मदतीनें त्यानें पठाण व अफगाण लोकांचा बंदोबस्त करून जोनपूर, लखनौ, अजमीर, ग्वाल्हेर वगैरे टापू आपल्या राज्यांत सामील करून घेतले. तरीही अफगाणांचा पूर्णपणें मोड झालेला नव्हता. रजपुतांस वश करून घेतल्यास अफगाणांचा मोड करणें सोपें जाईल असें वाटल्यानें अकबर रजपुतांकडे वळला. सन १५६२ पर्यंत बहुतेक रजपूत राजांस त्यानें आपलेसें केलें होतें. जयपूरचा राजा बिहारीमल्ल यानें आपली मुलगी अकबरास दिली. त्याचा मुलगा भगवानदास याला अकबरानें आपल्या पदरीं सरदारी दिली. त्याचा पुतण्या राजा मानसिंह अकबराच्या सैन्यांत मनसबदार झाला. पुढें जोधपूरचा राजा मालदेव याच्यावर चालून जाऊन अकबरानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेडतें हें त्याचें ठाणें घेतलें व त्याचा पराभव केला. त्याचा मुलगा उदयसिंह अकबराचा मांडलिक झाला. मालदेवाची मुलगी जोधबाई हिच्याशीं अकबरानें लग्न केलें. सलीम ऊर्फ जहांगीर तिचाच मुलगा होय.

५. चितोडचा राणा प्रताप :—सन १५६७ मध्यें अकबरानें चितोडवर स्वारी केली. तेथील राणा उदयसिंह हा राणा संगाचा मुलगा होता. त्याचे सैनिक मोठ्या निकरानें लढले. परंतु आपला निभाव लागत नाहीं असें पाहून रजपुतांनीं 'जोहार' केला व ते सर्व अकबराच्या सैन्यावर तुटून पडले. त्या लढाईत तीस



हजार रजपूत कामास आले व चितोड अकबराच्या हातीं आलें. उदयसिंह मात्र त्याला शरण गेला नाहीं. तो सन १५७२ मध्यें मरण पावला. त्याचाच मुलगा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राणा प्रतापसिंह होय. तो स्वातंत्र्यवीर होता. हिंदुस्थान मुसलमानांच्या हातीं जाणार हें पाहून त्याला फार दुःख होई. आपलें स्वातंत्र्य कायम टिकविण्याचा त्यानें निर्धार केला होता. मोंगल सैन्याशीं समोरासमोर टक्कर देणें अशक्य आहे हें ओळखून तो अरवलीपर्वताच्या आश्रयास गेला. तेथेंच त्यानें उदेपूर या नव्या राजधानीची स्थापना केली व अकबराशीं गनीमी काव्यानें लढण्यास सुरुवात केली. चितोड पुन्हां हस्तगत केल्याशिवाय राजमुकुट धारण करणार नाहीं अशी त्यानें शपथ घेतली होती. अकबरानेंही त्याच्या स्वातंत्र्यप्रियतेचें कौतुक केलें. त्याच्यावर त्यानें अनेक वेळां सलीम व मानसिंह यांच्या नेतृत्वाखालीं सैन्य पाठविलें. परंतु प्रतापसिंहानें त्यांना दाद दिली नाहीं. चितोडशिवाय त्यानें आपलें बहुतेक सर्व राज्य परत मिळविलें. त्यानंतर तो सन १५९७ मध्यें मृत्यु पावला. तो अत्यंत शूर, निश्चयी, शाहणा, मानी, स्वातंत्र्यभक्त व खंदा वीर होता. आपल्या पूर्वजांचें नांव त्यानेंच राखलें. रजपुतांनीं आपल्या मुली मुसलमानांस दिल्या व कांहींनीं त्यांच्या धर्माचा स्वीकार केला हें प्रतापसिंहास कधींच पटलें नाहीं.

६. अकबराचें राजपुतांसंबंधीं धोरण :—अकबरानें रजपुतांशीं अत्यंत सलोख्याचें व ममतेचें धोरण स्वीकारलें होतें. त्यांच्यावर जुलूम न करतां त्यांच्याशीं आपण सामोपचारानें वागलों तर त्यांचीं मनें आपल्याकडे आकर्षिलीं जातील हें अकबरानें ओळखलें होतें. शिवाय अफगाण शत्रूंचा निःपात करावयाचा असेल तर रजपुतांची मदत मिळविणें त्याला अत्यावश्यक होतें. याकरितांच त्यानें रजपुतांना वश करून घेण्याचा उद्योग आरंभिला. त्याकरितां त्यानें खालील उपाय योजिले. (१) रजपुतांचीं राज्यें खालसा न करतां रजपूत राजांस त्यानें आपलें मांडलिकत्व स्वीकारण्यास लावलें. (२) रजपूत स्त्रियांशीं त्यानें लग्नें लावलीं. (३) रजपुतांस आपल्या पदरीं मानाच्या जागा दिल्या. शिवाय हिंदूंस खूष करण्याकरितां त्यानें जिझिया कर रद्द केला. यात्रेवरील कर रद्द केले. परधर्मसहिष्णुतेचें धोरण स्वीकारून त्यानें हिंदूंस आपले धार्मिक विधि करण्याची मुभा दिली व हिंदूंच्या लायकीप्रमाणें त्यांस लष्करांत व दरबारांत जागा दिल्या. या सर्व उपायांनीं त्यानें रजपूत व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदू यांचीं मनें पूर्णपणें आकर्षून घेतलीं. मध्यंतरीं त्यानें रतनभोर व कलिंजर हे महत्त्वाचे किल्ले घेतले व सर्व राजपुताना काबीज केला.



७. अकबराचा राज्यविस्तार:—राजपुताना आत्मसात केल्यावर अकबरानें सन १५७२ त गुजराथवर स्वारी करून तो प्रांत आपल्या राज्यास पुढें सन १५८४ मध्यें कायमचा जोडला. सन १५७६ मध्यें बंगाल प्रांत त्यानें जिंकला. सन १५८५ मध्यें काबूल व सन १५८७ मध्यें त्यानें काश्मीर जिंकलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १५९० मध्यें ओरिसा व सिंध व सन १५९२ मध्यें कंदाहार प्रांत त्यानें सर केला. त्याच्या या सर्व विजयानें काबूल-कंदाहार पासून बंगालपर्यंत सर्व उत्तर हिंदुस्थान अकबराच्या राज्यांत आला. त्यानंतर त्यानें दक्षिणेकडे आपला मोर्चा वळविला. अहमदनगरच्या राज्यांत त्यावेळीं फार घोटाळे माजले होते. तेथें चांदबिबी अहमदनगरचा कारभार पहात होती. दक्षिणेंतील खानदेश, अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा वगैरे ठिकाणच्या सुलतानांनीं आपलें मांडलिकत्व स्वीकारावें अशी अकबरानें इच्छा दर्शविली. खानदेशच्या सुलतानानेंच फक्त ती मान्य केली व इतरांनीं अमान्य केली. तेव्हां त्यांच्यावर अकबरानें स्वारी करण्याचें ठरविलें. प्रथमतः मोंगलांनीं अहमदनगरवर स्वारी केली. परंतु चांदबिबीच्या शौर्यामुळें मोंगली सैन्याचा पराभव होण्याची वेळ आली. तहाचीं बोलणींही सुरू झालीं.



चांदबिबी

परंतु सन १६०० मध्यें चांदबिबीचा खून झाल्यानें अहमदनगरचा पाडाव झाला. मात्र निजामशाही टिकली. नंतर अकबरानें खानदेश व अशीरगडचा किल्ला



किल्ले अशीरगड

जिंकला. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांनींही अकबराशीं मैत्री केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. सलीमचें बंड (१६००):—अशीरगडचा वेढा चालू असतांच सलीमनें बंड केलें. अकबराला सलीम, दानियाल व मुराद असे तीन मुलगे होते. दानियाल त्याचा लाडका होता. तेव्हां त्यालाच बापानंतर राज्य मिळेल असें सलीम ऊर्फ जहांगीर याला वाटून त्यानें बंड केलें. एवढेंच नव्हे तर त्यानें बादशाही चिन्हेंही धारण केलीं. तेव्हां त्याच्याकडे अकबरानें अबुल फज्ल याला पाठविलें. परंतु सलीमनें ओर्च्छा संस्थानचा राजा वीरसिंह याच्याकडून त्याचा खून करविला. हें वृत्त कळतांच अकबराला फार वाईट वाटलें. पुढें त्यानें सलीमला कसेंबसें काबूंत आणून त्याचा बंदोबस्त केला.

९. अकबराचा मृत्यु:—सलीमनें बंड केल्याचें वृत्त कळल्यापासूनच अकबराचें मानसिक स्वास्थ्य बिघडलें होतें. त्यांतच अबुल फज्ल या अक-



अकबराची छत्री–शिकंदरा

बराच्या थोर मित्राचा खून झाल्यानें त्याच्या मनानें फारच खंत घेतली. राजा तोडरमल, राजा बिरबल वगैरे त्याचे उत्तमोत्तम सरदारही मृत्यु पावल्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



अकबराच्या चरित्रांतील कांहीं महत्त्वाचे प्रसंग वरील चित्रांत दाखविले आहेत. ते ओळखा व वर्णा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या मनास फार दुःख होऊं लागलें. तशांतच त्याचा लाडका मुलगा दानियाल हाही सन १६०४ मध्यें मेला. त्यामुळें त्यानें फारच हाय खाल्ली. या सर्व गोष्टींचा त्याच्यावर फार परिणाम होऊन तो आजारी पडला. त्यावेळीं त्याची शुश्रूषा करण्याऐवजीं त्याच्या सरदारांनीं निरनिराळीं कारस्थानें सुरू केलीं. त्यामुळेंही त्याला फार वाईट वाटलें. शेवटीं सन १६०५ मध्यें हा थोर मोंगल बादशाह आपल्या वयाच्या बासष्टाव्या वर्षी आग्र्यास मरण पावला.

१०. अकबराची योग्यता :—जगांतील सर्व थोर राज्यकर्त्यांत अकबराची गणना होते. मोंगल बादशहांचा तो मुकुटमणीच होय. अत्यंत हालअपेष्टा भोगून त्यानें अफाट राज्य स्थापलें व त्याला मोठी बळकटी प्राप्त करून दिली. तो बांधेसूद व देखणा होता. त्याची दुसऱ्यावर सहज छाप पडे. त्याची जरबही विलक्षण असे. शौर्य, चातुर्य, धाडस, कामाचा उरक, अविश्रांत उद्योगाची आवड, कुशाग्र बुद्धि, औदार्य वगैरे त्याचे गुण अप्रतिम होते. माणसाची पारखही त्याला चांगली होती. शिक्षण नसलें तरी अनेक ग्रंथ दुसऱ्याकडून वाचवून घेऊन त्यानें बहुश्रुतपणा संपादिला होता. संगीत, चित्रकला, शिल्पकला, बागाईत वगैरेंची त्याला फार आवड होती. प्रसिद्ध गवयी तानसेन त्याचा आश्रित होता. त्याला अनेक भाषाही येत होत्या. अनेक परकीय ग्रंथ त्यानें भाषांतरून घेतले होते. अनेक खेळही त्याला आवडत. पोलो हा इंग्रजी खेळ त्याला आवडे. शास्त्रीय विषयांची आवडही त्याला होती. धार्मिक बाबतींत तो आग्रही नव्हता. सामोपचारानें व गोडीगुलाबीनें सर्वांशीं वागून त्यानें त्यांचें प्रेम व स्नेह संपादिला होता. राजकारणपटुत्व, वादविवादांतील त्याचें कौशल्य, समरांगणांतील त्याचें धाडस, शौर्य व उत्तम सेनानायकत्व, आपल्या प्रजेच्या सुखाकरितां त्याची तळमळ, धार्मिक बाबतींतील त्याचें सहिष्णुतेचें धोरण वगैरेंमुळें हिंदुस्थानच्या इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालेलें आहे. त्यानें आपलें राज्य वाढविलें, एवढेंच नव्हे तर त्याला भौगोलिक मर्यादाही मिळवून दिली व आपल्या राज्यांतील लोकांमध्यें ऐक्यभाव निर्माण केला ही त्याची सर्वोत्कृष्ट कामगिरी होय. या सर्व गोष्टींमुळें अकबरास महाप्रतापी अकबर हें नांव दिल्यास तें सार्थ कां होणार नाहीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. अकबराचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा. त्याच्या सुरवातीच्या अडचणी सांगा.

२. अकबरानें रजपुतांसंबंधीं कोणतें धोरण स्वीकारलें ? कां ? त्याचा परिणाम काय झाला.

३. बैरमखानाचें चरित्र सांगा. त्याची कामगिरी वर्णा.

४. हिंदुस्थानचा एक नकाशा काढा व त्यांत अकबराच्या राज्याचा विस्तार कसकसा झाला तें कालानुक्रमानें लिहा.

५. खालीलसंबंधीं माहिती द्या.

राणा प्रतापसिंह, हिंदूंसंबंधीं अकबराचें धोरण, चांदबिबी, हिमू.

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.

तोडरमल, तानसेन, सूरदास, तुळशीदास, बदाउनी, बिरबल.

उतारे

१. राणा प्रतापास पृथ्वीराजाचें पत्र.

महाराज प्रतापसिंह,

तुमच्या कुळाची आणि राजवंशीयांची आजतागाईत बेइज्जत झाली नाहीं, ती यापुढेंही होऊं नये, असें आम्ही सर्व इच्छितों. तुमच्या साभिमानी सैनिकांची आणि तुमच्या जयशाली तरवारीची तुम्हांस पूर्ण मदत आहे. त्यांच्या मदतीनें तुम्ही क्षत्रियांचें ब्रीद राखा. हा मोंगल बादशाह आमची अब्रू व आमच्या स्त्रियांचें पावित्र्य लुटीत आहे. त्याची भरभराट नेहमीं म्हणजे अखंड राहील असें नाहीं. माझी खात्री आहे कीं तुम्हांकडून आमची रजपूत जात पुन्हां सतेज होईल व सध्यांच्या वैराण व ओसाड रजपूतक्षेत्रांत निष्कलंक व पवित्र असें क्षात्रबीज पडून भ्रष्टबीज झालेला आमचा देश शुद्ध होईल. तेव्हां दिल्लीच्या बादशहास शरणागत होण्याचें कारण नाहीं. तुमच्या अभिमानास व यशसंपादनास ईश्वर साह्य आहे.

आपला,

पृथ्वीराज राठोड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न :—१ हें पत्र कोणीं लिहिलें ? कोणास लिहिलें ? कशाकरितां ? प्रतापलाच लिहिण्याचें कारण काय ?

२. अकबरचा स्वभाव

दिसण्यांत अकबर मध्यम उंचीचा दिसे. त्याचा रंग गव्हासारखा गोरा होता. त्याच्या भिंवया व डोळे काळे कुळकुळीत होते. तो पाणीदार व सुंदर दिसे. त्याची कंबर सिंहाप्रमाणें बारीक, छाती रुंद व हात व भुजा लांब सडक होत्या. त्याच्या डाव्या नाकपुडीवर एक लहान चामखीळ होती; परंतु त्यामुळेंही त्याचा चेहरा खुलून दिसत असे. वैभव व भरभराट यांची ती एक उत्तम खूण समजण्यांत येई. त्याचा आवाज मोठा भरदार होता; पण एखादी गोष्ट तो खुलवून सांगूं लागला म्हणजे तो मोठा मधुर भासे. त्याच्या चर्येत दिव्य तेज झळकत असे. एवढें राज्य, एवढी अपार संपत्ति, इतके लढाऊ हत्ती व घोडे वगैरे असूनही त्यानें आपला नम्रभाव व ईश्वरभक्ति रतिभरही ढळूं दिली नाहीं. त्याचें धैर्य इतकें अप्रतिम होतें कीं, मत्त झालेल्या हत्तीवर आरूढ होऊन त्यास तो वठणीवर आणीत असे. त्याला लिहितां वाचतां येत नसे; तरी तो सर्व प्रकारच्या विद्वान लोकांशीं संभाषण करी. नेहमीं चतुर व हुशार लोकांशीं सहवास घडल्यानें त्याची भाषा इतकी सुधारली होती, कीं त्याला विद्येचा गंध नव्हता हें कोणासही ओळखतां येत नसे.

—जहांगीरच्या आत्मवृत्तावरून.

प्रश्न :—१ अकबरच्या अंगचे गुण सांगा ? त्याचें वर्णन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२७. अकबराची राज्यव्यवस्था

१. राज्यकारभार :—अकबराचें राज्य फार मोठें होतें. त्यानें राज्यकारभाराच्या सोयीसाठीं त्याचे एकंदर अठरा विभाग पाडले होते. त्यांत मोटे पंधरा व छोटे तीन होते. प्रत्येकाला 'सुभा' असें म्हणत. प्रत्येक सुभ्यावर एकेक सुभेदार असे. प्रत्येक सुभ्यांत जिल्हे असत. जिल्ह्याच्या लहान विभागास महाल म्हणत. त्याच्यापेक्षां लहान विभागास दस्तुर असें म्हणत. काश्मीर, काबूल, मुलतान, अयोध्या, लाहोर, आग्रा, अलाहाबाद, अजमीर, गुजराथ, माळवा, बिहार, बंगाल, अहमदनगर, खानदेश, वऱ्हाड, ओरिसा, दिल्ली व सिंध हे त्याचे सुभे होत. या सर्व सुभ्यांतून जमीनमहसुलाचें व जकातीचें उत्पन्न मिळे. अकबराच्या राज्याचें उत्पन्न चाळीस कोट रुपये होतें. सर्व सत्ता त्याच्या हातीं होती व सर्व सुभेदार त्याला जबाबदार असत. आपल्या राज्याची व्यवस्था नीट व्हावी म्हणून त्यानें अनेक खातीं पाडून तीं निरनिराळ्या अधिकाऱ्यांकडे सोपविलीं होतीं. मुख्य प्रधान, फडणीस, बक्षी ऊर्फ लष्करी दिवाण, धर्ममंत्रि ऊर्फ सदर, काझी, कोतवाल व वाकनीस हे त्याचे मुख्य अधिकारी होते व प्रत्येकाकडे एकेक खातें सोपविलें होतें. त्यांच्या कामावर तो स्वतः देखरेख ठेवी.

२. मुलकी व्यवस्था :—शेरशहाची जमीनमहसुलाची पद्धति सुधारून ती अकबरानें आपल्या राज्यांत सुरू केली. त्या बाबतींतील त्याचा मुख्य अधिकारी राजा तोडरमल होता. तो शेरशहाच्या पदरीं जमीनमहसुलाच्या मंत्र्याचें काम करीत असे. त्यासच अकबरानें तें काम सांगितलें. तोडरमलानें राज्यांतील जमिनीची पहाणी व मापणी करून जमिनीच्या उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा प्रती ठरवून दिल्या व त्याप्रमाणें सरकारसारा ठरवून दिला. निव्वळ उत्पन्नाच्या $\frac{1}{3}$ सारा प्रत्येक शेतकऱ्यानें धान्याच्या रूपानें द्यावा असें ठरलें होतें. पैशाच्या रूपानेंही हा सारा पुढें अकबर घेऊं लागला. दर दहा वर्षांनीं पुन्हां सारा ठरविला जाई. वसुली अधिकारी नेमण्यांत आले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होते. त्यांच्या कामावर सक्त नजर असे. जमीन कोणाजवळ किती आहे, तिची प्रत कोणती आहे, सारा किती, आला किती, येणें किती वगैरेसंबंधीं पत्रकही ठेवलेलें असे. अवर्षण अगर दुष्काळ पडल्यास अकबर सारा-माफी देई व शेतकऱ्यांस तगाईही देत असे.

३. लष्करी व्यवस्था :— अकबराचें लष्कर व्यवस्थित होतें. अमीर, मनसबदार, आसामदार वगैरे लष्करी अधिकारी त्याच्या लष्करांत असत. अमीर हा सर्वांत मोठा लष्करी अधिकारी असून त्याच्या जवळ पांच हजारांपेक्षां जास्त सैन्य असे. अमिराची जागा शहाजाद्यांशिवाय इतरांस मिळत नसे. मनसबदाराजवळ ५००० पर्यंत सैन्य असे. ही जागा लायकीप्रमाणें कोणासही मिळे. आसामदाराजवळ एक हजारापेक्षां जास्त फौज असे. त्याच्याजवळ घोडदळ व पायदळही असे. अकबराचें घोडदळ व पायदळ नेहमीं तयार असे. सैनिकांचा पगार रोखीनें व वेळच्या वेळीं लष्करी अधिकाऱ्यांकडून मिळत असे. सैनिकांस जहागिरी देण्याची पद्धति अकबरानें बंद केली होती. रजपुतांस मात्र तो जहागिरी देई. लष्करभरतीच्या वेळीं हिंदु अगर मुसलमान असा तो भेदभाव ठेवीत नसे. दोघांसही तो लष्करांत घेत असे. प्रत्येक सुभेदाराच्या हाताखालीं लष्करी अधिकारी असत. लष्करांतील लोकांनीं उत्तम काम केलें तर त्यांस तो उमराव, अमीर, खानखानान वगैरे किताब देई.

अकबराची वाघाची शिकार

४. अकबराच्या सुधारणा :—सर्व राज्यांत त्यानें ठरीव वजनें व मापें सुरू केलीं. नाणीं पाडण्याकरितां त्यानें टांकसाळ घातली. दर दहा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मैलांवर त्यानें टपालाचे शिपाई ठेऊन टपालाची व्यवस्था केली. सतीची सक्ती कोणाही स्त्रीवर होऊं नये असा त्यानें नियम केला. विधवांस लग्नाची मोकळीक ठेविली. प्रौढविवाहास त्यानें उत्तेजन दिलें. माणसें व पशू बळी देण्याची चाल त्यानें बंद केली. लढाईंत पाडाव झालेल्यांची कत्तल करणें अगर त्यांस गुलाम म्हणून विकणें या गोष्टींस त्यानें बंदी केली. राज्यांत त्यानें अनेक पाठशाळा स्थापिल्या. न्यायाची सोयही त्यानें चांगली केली होती. त्याकरितां त्यानें मुसलमान काजी व हिंदु पंडित यांची न्यायाधीश म्हणून योजना केली होती. हिंदूंच्या कायद्याप्रमाणें हिंदूंस व मुसलमानी कायद्याप्रमाणें मुसलमानांस न्याय दिला जाई. मुख्य न्यायाधिशास मीर आदिल म्हणत. त्याच्या निकालाविरुद्ध अपील करावयाचें झाल्यास तें अकबर स्वतः ऐके व न्याय देई.

५. दिने इलाही :—अकबराचा मूळचा धर्म इस्लाम असला तरी पुढें पुढें त्याच्या धर्मविचारांत फार क्रांति झाली. पैगंबर, खिस्त, बुद्ध वगैरेप्रमाणें आपणही एखादा नवा धर्म स्थापावा असें त्याला वाटे. त्याकरितां दर गुरुवारीं तो धर्मविषयक चर्चा करीत असे. त्या चर्चेंत सर्व धर्मांचे पंडित भाग घेऊन मोकळ्या मनानें चर्चा करीत. अशी चर्चा सुमारें पंचवीस वर्षें चालली होती. शैक मुबारक हा फारशी पंडित अकबरास धर्ममतें समजावून सांगे. अबुल फज्लनें निरनिराळ्या धर्मांतील महत्त्वाचीं तत्त्वें एकत्र केलीं. त्यांच्या आधारावरच अकबराच्या नव्या धर्माची उभारणी झाली. 'दिने इलाही' हें त्याच्या नव्या धर्माचें नांव होय. त्या धर्माचा अकबर हा पहिला पैगंबर झाला; व अबुल फज्ल त्याचा पहिला शिष्य झाला. पारशांची अग्निपूजा, हिंदूंची सूर्योपासना वगैरे प्रकार त्याच्या धर्मांत होते. ईश्वर एक आहे हें तत्त्व त्याच्या धर्मानें मान्य केलें होतें. हिंदूंप्रमाणें तो गंधही लावीत असे. गोवध त्यानें बंद केला. नव्या मशिदी बांधूं नयेत व जुन्या दुरुस्त करूं नयेत असेंही त्यानें फर्मान काढलें. परंतु अकबराबरोबरच त्याचा धर्म लोप पावला. त्याच्या या सर्वसंग्रहात्मक धर्माचे अनुयायीही पुढें नष्ट झाले.

६. कला-कौशल्यासंबंधीं कामगिरी :—अकबर हा फार रसिक बादशाह होऊन गेला. निरनिराळ्या कलांसंबंधीं गुणग्राहकता व मार्मिकपणा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या ठिकाणीं उत्तम वसत होता. चित्रकला, संगीत, शिल्पकला व रंग-काम त्याला फार आवडे. या सर्व कलांना त्यानें फार उत्तेजन दिलें. अनेक उत्तमोत्तम चित्रकारांचीं चित्रें त्यानें विकत घेऊन तो त्यांचें प्रदर्शन करी. उत्तम चित्रकारास बक्षिसेंही तो देत असे. तो स्वतःही उत्तम चित्रें काढीत असे. संगीताचा तो फार शोकी होता. प्रसिद्ध गवयी तानसेन त्याचा आश्रित होता. अकबर स्वतःही संगीत जाणत असे. तानसेनाचें गाणें त्याला फार आवडे. शिक्री येथें त्यानें जो राजवाडा बांधला तो अप्रतिम आहे. तेथील शिल्प अजूनही फार वाखाणलें जातें. अनेक कुशल कारागीर त्यानें त्याकरितां अहर्निश राबवून घेतले. त्या राजवड्यांत त्यानें अनेक चित्रें चित्रकारांकडून काढवून घेतलेलीं आहेत.

अबुल फज्ल

७. वाङ्मयवृद्धि व ग्रंथकार :— अकबरानें वाङ्मयाची वृद्धि होईल असें धोरण ठेवल्याचें दिसतें. त्यामुळें अनेक उत्तमोत्तम ग्रंथ त्याच्या काळीं निर्माण झाले. निरनिराळ्या भाषांमधील उत्कृष्ट ग्रंथांचीं त्यानें फारशी भाषेंत भाषेंतरेंही करून घेतलीं. अबुल फज्ल यानें 'अकबरनामा' व 'आइने-अकबरी' हे ग्रंथ लिहिले. वस्तुतः आइने-अकबरी हा अकबरनाम्याचाच एक भाग होय. अकबरनाम्यावरून मोंगलांचा साद्यंत इतिहास कळतो. आइने अकबरीवरून त्या काळच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची माहिती आपल्याला कळते. आइने-अकबरी म्हणजे अकबराच्या राज्यकारभाराची हकीकत होय. सूरदास नांवाचा एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंध कवि अकबराचा आश्रित होता. तानसेनाचीं कवनें व त्याच्या संस्कृत व हिंदी चिजा फार प्रसिद्ध आहेत. प्रसिद्ध साधु तुळशीदास अकबराच्या वेळींच होऊन गेला. 'तुळसी रामायण' हा त्याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. बदाउनी नामक एक बुद्धिमान गृहस्थ अकबराजवळ होता. त्याच्याकडून अकबरानें महाभारत व रामायण या संस्कृत काव्यग्रंथांचें फारशींत भाषांतर करून घेतलें. अथर्ववेद व लीलावती या ग्रंथांचेंही भाषांतर त्यानें केलें होतें. 'तवारीख' हा त्याचा ग्रंथ अकबराच्या कारकीर्दीचा इतिहासच होय. अकबराचें ग्रंथालयही फार मोठें होतें व त्यांत अत्युत्कृष्ट असे सुमारें चोवीस हजार ग्रंथ होते.

८. अकबराचा नवरत्न दरबार:—अकबराजवळ अनेक गुणी व विद्वान लोक होते. गुणी माणसांचा सांठा करण्याचा त्याला जणूं हव्यासच लागलेला होता. तोडरमल, बिरबल, तानसेन, अबुल फज्ल, फैजी, मानसिंह, मुल्ला दोप्याजा, हकीम हुमान, बदाउनी वगैरे नररत्नें त्याच्या दरबारीं नेहमीं होतीं. त्यांसच 'नवरत्नें' असें म्हणत असत. त्या सर्वांत अबुल फज्ल हा फार श्रेष्ठ दर्जाचा होता. आग्र्याच्या पाठशाळेवरील शैख मुबारक याला दोन मुलगे होते. त्यांचीं नावें अबुल फज्ल व फैजी अशीं होत. अबुल फज्ल नामांकित सेनापति, जाडा पंडित, महत्त्वाकांक्षी, धोरणी व हुषार मुत्सद्दी होता. अकबरनामा व आइने-अकबरी हे ग्रंथ त्यानेंच लिहिले. अकबराच्या नव्या धर्माचा मुख्य प्राण तोच होता. राज्यांत अनेक सुधारणा त्यानें केल्या. तो तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी होता. सलीमनें त्याचा खून केला.


तानसेन

फैजी उत्तम कवि व तत्त्वज्ञानपारंगत होता. त्यानें फारशी भाषेंत अनेक कविता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केल्या. अकबरास त्याच्या कविता फार आवडत. तोडरमल अयोध्येचा रहिवासी. जमीनमहसुलाची व्यवस्था त्यानें उत्तमरीतीनें लाविली. थोर मुत्सद्दी व कर्तबगार सेनानी म्हणूनही तो प्रसिद्ध आहे. राजा बिरबल हिंदु ब्राह्मण होता. तो कविता करी. हिंदु धर्मांतील उत्तमोत्तम तत्त्वांचा सांठा त्याच्याकडूनच अकबराला मिळाला. त्याच्या विनोदी व मनोरंजक गोष्टी प्रसिद्ध आहेत. राजा मानसिंह उत्तम व कुशल सेनानी होता. त्यानेंच अनेक प्रांत अकबरास मिळवून दिले. तानसेन ब्राह्मण गवयी होता. बदाउनी इतिहासकार होता. संगीत, ज्योतिष, इतिहास, वाङ्मय व भाषाज्ञान यांत तो तरबेज होता. या सर्व रत्नांचा मुकुटमणी अकबर होय.

मुल्ला दोप्याजा

९. **अकबराची थोरवी :**—सर्व मोंगल बादशाहांत अकबर हाच सर्वश्रेष्ठ बादशाह ठरतो यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांत एकछत्री अंमल स्वपराक्रमानें स्थापन करून त्यानें महनीय कामगिरी केली. आपल्या प्रजेच्या सुखाकरितां झटणारा अकबर सर्वांशीं सामोपचारानें वागे. लष्कराच्या जोरावर त्यानें राज्य चालविलें नाहीं; लोकांचीं मनें जिंकून त्यानें राज्य केलें. यांतच त्याचा मोठेपणा दिसतो. हिंदु-मुसलमानांत एकी व्हावी याकरितां तो अहर्निश झटला. त्यांच्या एकीची त्याला अहर्निश तळमळ लागलेली होती. त्यावरच आपल्या राज्याची संघटनशक्ति व मजबुती आहे, हें त्यानें ओळखलें होतें. त्यांत त्याला पुष्कळ यश आलें. गुणांची परीक्षा करून तो लोकांस अधिकार व नोकऱ्या देई; धर्म व जात यांवर नाहीं. यांतच त्याच्या मनाचा उदारपणा दिसून येतो. परधर्मसहिष्णुतेचें धोरण त्यानें स्वीकारलें म्हणून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला यश लाभलें. एकंदरींत त्याची कारकीर्द उज्ज्वल झाली यांत शंका नाहीं. म्हणूनच त्याला जगाच्या इतिहासांत ' थोर ' म्हणून मान मिळतो.

अ भ्या स

१. व्यक्ति व राज्यकर्ता या नात्यानें अकबराची थोरवी वर्णा.

२. अकबराच्या सुधारणा सांगून त्यावरून त्याची थोरवी ठरवा.

३. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
अबुल फज्ल, दिने इलाही, अकबरनामा, नवरत्नदरबार.

उतारा

१. अकबराचे धार्मिक विचार

फत्तेपूर शिक्री येथील टोलेजंग वाड्यांत सुफी, वैद्य, कायदेपंडित, सुन्नी, शिया, संन्यासी, जैन, चार्वाक, ख्रिस्ती, ज्यू , झोरास्ट्रियन, ब्राह्मण वगैरे सर्व धर्मांचे व पंथांचे लोक एके दिवशीं एकत्र जमले होते. एका उच्चासनावर जगत्पिता अकबर बादशाह बसला होता. त्यावेळीं प्रत्येकानें आपल्या धर्माचीं सत्तत्त्वें अत्यंत निर्भीडपणें मांडण्यास सुरुवात केली. परंतु त्यांच्यांत कडाक्याचे भांडणतंटे माजूं लागले व जो तो भ्याडपणें वागूं लागला. त्यामुळें बादशाहास अतीव संताप आला व त्यानें खालील भाषण केलें. " अंतःकरणाची खात्री पटलेली असो किंवा नसो, केवळ बाह्य देखावा व कुराणाचें पठण यांमुळें प्रत्येकाचा फायदा होतो अशी सर्वांची कल्पना झालेली दिसते. आरंभीं आरंभीं सत्तेच्या जोरावर विसंबून मी अनेक हिंदूंना माझ्या पूर्वजांच्या धर्माची दीक्षा दिली. परंतु सत्याचा प्रकाश माझ्या अंतःकरणांत प्रदीप्त झाल्यावर माझी खात्री झाली कीं, या जगांत मतामतांचा गलबला माजलेला आहे. अशा स्थितींत गर्व व आत्मप्रौढी यांनीं भरलेल्या या जगांत सत्याच्या पुराव्याशिवाय आपल्याला एकही पाऊल पुढें टाकतां येणार नाहीं. सदूसद्विवेकबुद्धीस अनुसरून जी विचारसरणी आपण स्वीकारली तीच अंतीं फायद्याची होते. पुराणांच्या पारायणानें अगर केवळ सुंता केल्यानें वा राजसत्तेस नमून जमिनीवर लोळण घेतल्यानें देव प्रसन्न होत नसतो ! "

—अकबरनाम्यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न :—१. अकबरानें सर्व धर्मांचे लोक कशाकरितां एकत्र बोलावले ? त्यानें त्यावेळीं कोणते विचार लोकांस सांगितले ?

२. 'त्या विचाराप्रमाणें तो स्वतः वागला नाहीं' असें रा. ब. सरदेसाई म्हणतात. कां तें शोधून काढा.

२. जमिनधाऱ्याची दशवार्षिक योजना

अकबर बादशहाची संस्मरणीय कारकीर्द सुरू झाली तेव्हांपासून अनेक हुशार, बुद्धिवान व अनुभवी माणसांनीं सरकारी शेतसाऱ्याची स्थिति अवलोकिली व त्यासंबंधीं इतिवृत्तें बादशहाकडे सुपूर्त केलीं. शेतकऱ्यांचें निव्वळ उत्पन्न लक्षांत घेऊन त्यांनीं साऱ्याचा दर ठरवून दिला. परंतु ही पद्धति पुढें अत्यंत गैरसोयीची ठरली. कारण उत्पन्न अंदाजानें ठरविलें जाई व सारा लहरीप्रमाणें वाढविला जाई. यामुळें स्वार्थ व नफेबाजी यांस ऊत आला ! ही स्थिति लक्षांत घेऊन राजा तोडरमल व मुझफरखान यांनीं सन १५७० च्या सुमारास साम्राज्यांतील जमिनीचा सारा ठरवून दिला. त्यामुळें पुष्कळ फायदा झाला. तरीही अंदाजी उत्पन्न व निव्वळ उत्पन्न यांत महदंतर पडूं लागलें. साम्राज्याची जसजशी वाढ होऊं लागली तसतसा साऱ्याचा प्रश्न मोठा बिकट व त्रासदायक होऊन बसला. जबर खंडाबद्दल शेतकऱ्यांच्या तक्रारी येऊं लागल्या व खंड थकल्यामुळें जमिनदारही त्रासले. ही स्थिति सुधारण्याकरितां बादशहानें एक दशवार्षिक योजना आखली. त्याप्रमाणें दहा वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून त्याचा एकदशांश भाग दरसाल सारा म्हणून घेण्याचें ठरविण्यांत आलें.

—आइने अकबरीवरून

प्रश्न :—१. तोडरमलाच्या पूर्वी कोणती पद्धति होती ? ती कां निकामी ठरली ? त्यांत कोणी सुधारणा केली ? ती कोणती ? त्यांतील दोष कोणते ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१५५६–१६०५

हिंदुस्थान	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
अकबर १५५६–१६०५	१५५६	एलिझाबेथ १५५८–१६०३	बैरमखान, हिमू,
तालिकोटची लढाई	१५६५	ड्रेकचें पहिलें पर्यटन	हॉकिन्स, ड्रेक,
राणा उदयसिंहाचा मृत्यु	१५७२	ड्रेकची सफर–पनामा	राणा प्रताप,
	१५७७	ड्रेकची पृथ्वीप्रदक्षिणा	अबुल फज्ल,
नूरजहानचा जन्म	१५८१		
दिनेइलाही	१५८२		फ्रॉबिशर,
	१५८८	अजिंक्य आरमाराचा पराभव	मानसिंह, तोडरमल
तोडरमलाचा मृत्यु	१५८९		
	१५८७	राणी मेरीचा वध	बिरबल, तानसेन,
राणा प्रताप–मृत्यु	१५९७		
अहमदनगरचा पाडाव	१५९९	रामदासाचा जन्म १५९८	बदाउनी,
			स्कॉटलंडची मेरी,
सलीमचें बंड	१६००	ई. इं. कंपनीची स्थापना	स्पेन्सर,
चांदबिबीचा खून	१६००		
	१६०३	एलिझाबेथचा मृत्यु	शेक्सपियर,
			चांदबिबी,
अकबरचा मृत्यु	१६०५		बेकन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२८. विलासी जहांगीर

१. जहांगीर (सन १६०५–१६२७):—अकबरानंतर त्याचा थोरला मुलगा सलीम हा 'जहांगीर' म्हणजे 'जग जिंकणारा' अशी पदवी घेऊन राज्यावर आला. त्यावेळीं त्याचें वय सदतीस वर्षांचें होतें. आपल्या बापाप्रमाणें तो खंबीर मनाचा नव्हता. कामाचा उरकही त्याला फारसा नव्हता. अफू व दारू यांचें त्याला व्यसन होतें. ख्यालीखुशाली व विलास यांत दंग राहून सौख्य भोगावें असें त्याला नेहमीं वाटे. अकबरानें राज्याची घडी उत्तम घालून ठेविली होती. त्यामुळेंच त्याला स्वस्थता मिळाली. तो शूर नव्हता असें नाहीं; परंतु व्यसनापायीं त्याच्या गुणांचें तेज पडलें नाहीं. धार्मिक बाबतींत तो बापाप्रमाणेंच उदारमतवादी होता, आग्रही नव्हता. ईश्वरावर त्याची निष्ठा होती. राज्यावर आल्यावर त्यानें अकबराचे सर्व अधिकारी कायम केले व त्यामुळें त्याचा कारभार सुरळीत चालला. अगदीं प्रथम त्यानें अनेक चांगल्या सुधारणाही केल्या होत्या. त्यानें अनेक जकाती उठविल्या व आपल्या राज्यांत अनेक मशिदी, शाळा, रुग्णालयें व पथिकालयें बांधलीं. न्यायीपणाबद्दल त्याची फार ख्याति आहे.

२. शत्रूंचा बंदोबस्त:—जहांगीरच्या कारकीर्दींत लढाया फारशा झाल्या नाहींत; व झाल्या त्याही फारशा मोठ्या नव्हत्या. तो गादीवर आला त्याचवेळीं त्याचा मुलगा खुसरौ यानें बंड केलें होतें. त्याचा पाठलाग करून त्यानें त्यास कैदेंत ठेविलें. तेथून सुटका करून त्यानें पुन्हां बंड केलें. तेव्हां जहांगीरनें त्याचे डोळे शिवून त्याला पुन्हां कैदेंत टाकलें. पुढें सन १६२१ मध्यें त्याचा खून झाला. यावेळीं जहांगीरनें उदेपूरचा राणा अमरसिंह याला जिंकण्याचा उद्योग चालविला होता. तो राणा प्रतापचा पुत्र होय. चितोड घेण्याची आपल्या बापाची प्रतिज्ञा पुरी करण्याची त्यानें उमेद धरली होती. तेव्हां जहांगीर त्याच्यावर चालून गेला. त्याचा सेनापति महाबतखान यानें अमरसिंहास जेरीस आणून तह करण्यास भाग पाडलें. शेवटीं त्याचा मुलगा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्णसिंह जहांगीरचा मनसबदार बनला. या विजयानें जी गोष्ट अकबरास साध्य झालीं नाहीं, ती जहांगीरनें केली असें म्हणतां येईल. खुसरौनें बंड केलें होतें, त्यावेळीं त्याला शीख लोकांनीं मदत केली होती. ही गोष्ट जहांगीर विसरला नव्हता. तेव्हां जहांगीरनें शिखांचा त्यावेळचा गुरु अर्जुनसिंग याला पकडलें व ठार मारलें. या वेळेपासूनच शिखांनीं आपल्या धर्माच्या संरक्षणाकरितां हातीं शस्त्र धरण्याचें ठरविलें.

नूरजहान व शेर अफगान अकबरास नजर देत आहेत.

३. अहमदनगरवर स्वारी :— अकबरानें अहमदनगरचा पाडाव करण्याचा प्रयत्न केला; परंतु तें त्याला साधलें नाहीं. त्यानें जिंकलेला मुलूख शहाजीच्या मदतीनें, अहमदनगरचा वजीर मलिकंबर यानें जिंकून घेतला होता; व अनेक सुधारणा करून राज्यास त्यानें बळकटीही आणली होती. जहांगीरनें अबदुल्लाखान, खानजहान व राजा मानसिंह यांस सन १६१२ मध्यें अहमदनगरवर पाठविलें. परंतु मलिकंबरनें त्यांचा पराभव केला. पुढें सन १६१६ मध्यें जहांगीरचा मुलगा खुर्रम ऊर्फ शाहजहान यानें अहमदनगरवर स्वारी केली व मलिकंबरचा पराभव करून त्याच्याकडून १८ लाख रुपये खंडणी वसूल केली.

४. नूरजहान-पूर्ववृत्त :— गादीवर बसल्यापासून जहांगीरच्या ध्यानीं-मनीं नूरजहान ही स्त्री असे. तिचें मूळचें घराणें इराणांतलें. तेथें नीट चालेना म्हणून तिचा बाप गियासबेग हिंदुस्थानांत आला. प्रवासांतच त्याची बायको प्रसूत होऊन सन १५७९ मध्यें तिला एक मुलगी झाली. तीच नूरजहान होय. ती अत्यंत स्वरूपसुंदर व लावण्यवती होती. त्यावेळचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिचें नांव 'मेहेरनिसा' असें होतें. अकबराची व गियासबेगची पुढें ओळख होऊन बादशहानें त्याला मनसबदारी दिली. तो विद्वान होता. कविता करण्याचा त्याला नाद होता. त्याची बायको सद्गुणी होती. या दोघांनीं आपल्या मुलीला चांगलें शिक्षण दिलें. त्यामुळें मेहेरला कशिदा, चित्रकला, कविता करणें वगैरेंचा नाद लागला. पुढें सन १५९८ मध्यें गियासबेगनें आपल्या मुलीचें अलीकुलीखान नामक एका इराणी सरदाराशीं लग्न लावून दिलें. त्यालाच 'शेर अफगान' असेंही म्हणत. तो सलीमच्या सैन्यांत असे. सलीम बादशाह झाला तेव्हां तो बरद्वानला बदलून गेला होता. तेथील एका बंडांत तो सामील झाला असा संशय होता. तेव्हां त्याला पकडून आणण्याकरितां सलीमनें बंगालच्या सुभेदारास सांगितलें. सुभेदार त्याला पकडण्यास गेला असतां दोघेही झटापटींत मारले गेले. त्यामुळें मेहेर व तिची मुलगी लादिली बेगम आपल्या बापाकडे आग्र्यास गेली. मोठ्या खटपटीनें अकबराची राणी सलीमा हिच्या तैनातीचें काम मेहेरला मिळालें. त्यामुळें जहांगीरची व तिची भेट होऊं शकली. तिच्या सौंदर्यानें तो मोहित झाला; व पुढें मोठ्या मिनतवारीनें तिनें त्याच्याशीं सन १६११ मध्यें लग्न केलें. त्यावेळीं ती तेहतीस वर्षांची होती.

नूरजहान व जहांगीर यांचा शपथविधी

५. नूरजहानचा कारभार—लग्न झाल्यावर राज्यकारभार नूरजहानवर सोंपवून जहांगीर विलासांत दंग असे. नूरजहान हुशार, रसिक व गुणी होती. घोड्यावर बसणें व नेम मारणें यांत ती पटाईत होती. तिला फारशी भाषा चांगली अवगत होती. जहांगीर तिच्या अर्ध्या वचनांत असे. तिच्या सहवासानें त्याचीं व्यसनें बरींच मर्यादित राहिलीं. त्याचा लहरी व जुलमी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वभावही दाबांत राहूं शकला. तिच्या रसिकप्रियतेचा, धर्मशीलवृत्तीचा, विलासप्रियतेचा व गरिबांविषयींच्या तिच्या प्रेमाचा जहांगीरच्या आयुष्यावर मोठा परिणाम झाला व तो अधिक सुखी झाला. घरची व्यवस्था ती सुंदर ठेवी. गुलाबाच्या अत्तराचा उपयोग तिनेंच प्रथम सुरू केला. नूरजहान मोठी कारस्थानी, कर्तबगार व महत्त्वाकांक्षी स्त्री होती. आपल्या हातीं सत्ता येतांच तिनें आपल्या बापाला व भावाला मोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या. अनेक इराणी सरदारांचीही तिनें भरती केली. त्यामुळें मोंगल दरबारास इराणी वळण लागलें.


नूरजहान

६. परकीयांचा प्रवेश :— बाबराच्या पूर्वीच पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत स्थाइक झाले होते. दीव, दमण, गोवें, सुरत वगैरे ठिकाणीं त्यांनीं आपलीं ठाणींही स्थापिलीं होतीं. जहांगीरच्या वेळीं त्यांनीं मोंगलांच्या व्यापारी जहाजांस त्रास देण्यास सुरुवात केली होती. मोंगलांचीं बरींच जहाजें पकडून त्यांनीं अनेक मुसलमानांचा छळ आरंभिला. हें वृत्त कळतांच जहांगीरनें इंग्रजांच्या मदतीनें दमणवर हल्ला करून पोर्तुगीजांचा बंदोबस्त केला. त्यांना अनेक सवलती जहांगीरनें दिल्या होत्या. त्याही त्यानें काढून घेतल्या. पोर्तुगीजांप्रमाणेंच इंग्रजही हिंदुस्थानांत व्यापाराकरितां येऊं लागले होते. सन १६०८ मध्यें इंग्रजांचा वकील कॅप्टन हॉकिन्स व सन १६१५ मध्यें सर टॉमस रो हे इंग्रज वकील जहांगीरकडे व्यापारी सवलती मागण्यास आले होते. सन १६१२ मध्यें पोर्तुगीज व इंग्रज यांमध्यें वांकडें येऊन त्यांच्यामध्यें आरमारी युद्ध झालें. पोर्तुगीजांचा पराभव होऊन इंग्रजांस सुरतेस वखार घालतां आली. हॉकिन्स व टॉमस रो जहांगीरच्या दरबारीं होते. त्यांनीं आपल्या प्रवासांचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्णनें लिहून ठेविलीं आहेत. त्यावरून त्यावेळची बरीच उपयुक्त माहिती मिळते. रेव्हरेंड टेरी टॉमस रोच्या वकिलातीबरोबर पाद्री होता. तो तीन वर्षें हिंदुस्थानांत होता. त्याचें प्रवासवृत्त चांगलें वाचनीय आहे.

७. जहांगीरच्या आजार व बंडें:—जहांगीरचा मुलगा खुर्रम याचें व नूरजहानचें प्रथम चांगलें होतें. तिचा भाऊ आसफखान. त्याची मुलगी अर्जुमंद बानू हिचें लग्न तिनें खुर्रमशीं लावून दिलें होतें. खुर्रम व नूरजहान एकविचारानें वागत; परंतु खुर्रम पुढें तिच्या तंत्रानें वागेनासा झाला. तेव्हां नूरजहाननें जहांगीरचा धाकटा मुलगा शैहूयार यास हाताशीं धरून त्याचें लग्न तिनें आपल्या पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या लादिली बेगम या मुलीशीं लावून दिलें. एवढेंच नव्हे तर जहांगीरनंतर त्याला राज्यपद मिळवून देण्याचीही तिनें खटपट चालविली. तिचें हें कारस्थान आसफखान व खानखानान यांस पसंत नव्हतें. तेव्हां त्यांनीं खुर्रमचा पक्ष उचलला. दुसरा सरदार महाबतखान हा प्रथम नूरजहानचा पक्षपाती होता. मध्यंतरीं खुर्रमनें बंड केलें व दिल्ली घेण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु त्याचा पराभव झाला. त्याला वठणीवर आणावयाचें काम महाबतखानाकडे होतें. खानानें त्याचा अनेक वेळां पराभव केला. परंतु याच वेळीं महाबतखानास नूरजहाननें उत्तरेस बोलावून घेतलें. तेथें गेल्यावर त्याचा अपमान झाल्यानें त्यानें नूरजहान व जहांगीर यांस कैद केलें. त्यांतून आपली सुटका करून घेऊन तिनें महाबतखानास दक्षिणेंत पाठविलें. तेथें बंड करून तो खुर्रमला मिळाला. इकडे बादशाह आजारी पडला व तो हवा पालटण्याकरितां काश्मीरास गेला. तेथून परत येत असतां वाटेंतच जहांगीर वारला (१६२७). ही बातमी कळतांच खुर्रम महाबतखानासह दिल्लीकडे गेला. तो येतांच सर्व दरबारी मंडळी त्याच्या पक्षास मिळाली. नूरजहानचा भाऊ आसफखान इतके दिवस तिला मदत करीत होता. तोही आतां खुर्रमला मिळाला व त्यानें शैहूयारला कैद केलें. त्यामुळें खुर्रमचा मार्ग मोकळा होऊन त्याला दिल्लीची गादी मिळाली. पुढें आपलें कांहीं चालणार नाहीं हें ओळखून नूरजहाननें राजकारणांतून अंग काढून घेतलें. खुर्रमनें तिला चांगल्यारीतीनें वागविलें. ती सन १६४९ मध्यें मरण पावली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. जहांगीरची योग्यता :—जहांगीर आपल्या बापाप्रमाणें मोठा कर्तबगार नव्हता हें खरें, परंतु त्यानें आपल्या राज्यांत शांतता व उत्तम व्यवस्था ठेविली होती यांत शंका नाहीं. जहांगीर लहरी व व्यसनी होता. नूरजहानकडे राज्यकारभार सोपवून त्यानें जवळजवळ राजसंन्यास घेतला होता. न्यायदान योग्य व्हावें म्हणून त्यानें एक न्यायशृंखला आपल्या राजवाड्यांत ठेवली होती. तो राजा असतां उद्योगधंदे, व्यापार, शिल्पकला, संगीत, चित्रकला व शेतकी यांचा चांगलाच उत्कर्ष झाला होता. त्यानें विद्येस उत्तेजन दिलें. तो स्वतः चांगला लेखक होता. आपलें आत्मचरित्रही त्यानें लिहून ठेवलें होतें. तो ऐषारामी व विलासी होता. त्याच्या स्वारीचा थाट अपूर्व असे. तो मद्यपी होता, तरी दुसऱ्यानें मद्यप्राशन केल्यास तो त्यास कडक शिक्षा करीत असे !

अभ्यास

१. नूरजहानचें थोडक्यांत चरित्र सांगा.
२. जहांगीरच्या राज्यकारभाराचें वर्णन थोडक्यांत करा.
३. खालीलसंबंधीं टीपा लिहा.
सर टॉमस रो, शाहजहानचें बंड, मलिकंबर, खुसरौ, अमरसिंह.
४. जहांगीरनें रजपूत, पोर्तुगीज, शीख वगैरेसंबंधीं कोणतें धोरण स्वीकारलें होतें ?

उतारे

१. अधिकाऱ्यांकरितां कांहीं हुकूम

सरहद्दीवरील अमीर आपल्या अधिकारांचें अतिक्रमण करतात व कायद्याप्रमाणें वागत नाहींत, असें आढळून आल्यानें मी बक्षींकरितां खालील हुकूम सोडून अमिरांनीं त्यांचें अतिक्रमण करूं नये असें फर्माविलें; कारण तो फक्त राजाधिकारच होय. पहिलें म्हणजे अमिरांनीं झरोक्यांत बसूं नये व आपल्या अधिकाऱ्यांकडून मुजरे घेऊं नयेत. तसेंच त्यांनीं हत्तींची झुंज लावूं नये व गुन्हेगारांचे डोळे काढणें अगर त्यांचें नाक व कान तोडणें यांसारख्या शिक्षा त्यांस देऊं नयेत. कोणावरही इस्लामधर्माची जबरदस्ती करूं नये; किंवा कोणालाही पदव्या देऊन विभूषित करूं नये. आपल्या नोकरांकडून कुर्निसात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून घेऊं नये. दरबारांतील पद्धतीप्रमाणें गवयांवर गाण्याची सक्ति करूं नये. अश्वदान अगर गजदान करतेवेळीं अगर बाहेर जातेवेळीं नगारा वाजवूं नये. बादशाही नोकरांस त्यांनीं मिरवणूक प्रसंगीं पायीं चालण्याची सक्ति करतां कामा नये; किंवा त्यांस पत्रें लिहावयाचीं झाल्यास त्यांवर आपली मुद्रा करूं नये.

—जहांगीरच्या आत्मचरित्रावरून

प्रश्न :—१. वरील पत्रावरून बादशहाचे कोणते अधिकार स्पष्ट होतात ?

२. बादशाही स्वारीचा थाट

स्वारी सकाळीं निघावयाची होती. जहांगीर झरोक्यांत येऊन बसला. सर्व सरदार दरबारांत जमले. इकडे जनानखाना हत्तीवर चढत होता. त्याजकरितां पन्नास हत्ती राखून ठेवले होते. त्यांच्या पाठीवर मोठमोठे हौदे असून सभोंवार किनखापी पडदे होते. नंतर बादशाह निघाला. त्यावेळीं सर्व लोकांनीं मोठा जयघोष केला. त्यानें कानठळ्याच बसल्या. जिन्याच्या पायथ्याशीं बादशहाची दृष्ट काढण्यांत आली. त्याचा पोषाख फारच उंची होता. त्यानें अंगांत भरजरीचा झगा घातला असून, सर्वांगावर हिऱ्यामोत्यांची रेलचेल होती. नोकरांनीं येऊन त्याची ढालतरवार बांधली आणि धनुष्यबाण लटकावून दिले. नंतर तो चार घोड्यांच्या गाडींत बसला. त्याचा गाडीहांक्या इंग्रज होता. त्याचा पोषाखही रत्नखचित होता. बादशहाच्या दोन्ही बाजूंस दोन नोकर चवऱ्या वारीत होते. सर्वांपुढें वाद्यें चाललीं होतीं. भरगची सामान घातलेले नऊ घोडे रिकामे चालले होते. त्यांच्या पाठीमागें कांहीं सुंदर पालख्या होत्या. पालख्या गेल्यावर विलायती बगी आली. तींत नूरजहान बसली होती. तिच्यामागें बादशहाचे दोघे धाकटे मुलगे येत होते. मागाहून श्रृंगारलेले वीस हत्ती चालले होते. त्यांच्यामागें सरदार मंडळी पायीं चालली होती. सर्व रस्त्यावर सहाशें हत्तींचा पहारा लागला होता. प्रत्येक हत्तीवर निशाण व बंदुका होत्या. रस्ते पाण्यानें भिजविले होते. कोणास बादशहास भेटण्याचें असेल तर, फार लांबून पायीं चालत यावें लागे.

—सर टॉमस रोच्या डायरीवरून.

प्रश्न :—१. जहांगीरच्या स्वारीचा थाट नयनमनोहर कशावरून होता ? त्या वर्णनांत तुम्हांस कोणत्या गोष्टी आश्चर्यकारक वाटतात ? बादशाही वैभवाचें प्रदर्शन कशांत दिसतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२९. वैभवशाली शाहजहान

१. खुर्रम ऊर्फ शाहजहान १६२७–१६५८ :—जहांगीरला खुसरौ, पर्वेज, खुर्रम व शैहूयार असे चार मुलगे होते. त्या सर्वांत खुर्रम ऊर्फ शाहजहान हा पराक्रमी व कर्तबगार होता. त्यानेंच जहांगीरनंतर दिल्लीची गादी मिळविली. खुसरौ व पर्विज जहांगीर असतांच मरण पावले होते. राज्यावर आल्यावर शाहजहाननें आसफखानाकरवीं शैहूयारला मारून टाकलें. अशातऱ्हेनें गादी निष्कंटक झाल्यावर त्याला स्वास्थ्य लाभलें. आपल्या तारुण्याच्या भरांत असतांना त्यानें जो जोम दाखविला, जो पराक्रम गाजविला व जो शहाणपणा प्रदर्शिला, तो त्याच्या उतार वयांत मागें पडला; व तो ऐषारामी, सुस्त, केवळ विषयासक्त व विलासी बादशाह होऊन बसला. तो प्रेमळ राजा होता व आपल्या प्रजची तो दाद उत्तमप्रकारें घेई. धार्मिक बाबतींत तो उदार होता. भेदाभेद न करतां तो हिंदु-मुसलमानांस योग्यतेप्रमाणें वागवी. कलाकौशल्याची त्याला फार आवड होती. मोठा कर्तृत्ववान व न्यायी म्हणून त्याची ख्याति होती. त्याच्याच कारकीर्दीत मोंगल साम्राज्याचा ‘ सुवर्णकाळ ’ झाला असें समजतात. कारण बादशाहीचा दिमाख वाढून एकंदर काळ शांततेचा व भरभराटीचा गेला.



शाहजहान

२. दक्षिणेवर स्वारी :—शाहजहान राज्यावर आला त्यावेळीं खानजहान लोदीनें बंड केलें. तो दक्षिणचा सुभेदार होता. तेथें असतांच त्यानें अहमद-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नगरचा वजीर मलिकंबर याच्याशीं दोस्ती केली व मोंगलांनीं जिंकलेला बराच मुलूख त्यानें त्याला परत दिला. हें समजतांच शाहजहाननें त्याची माळव्याचा सुभेदार म्हणून बदली केली व त्याला आपल्या भेटीस बोलाविलें. तेव्हां त्यानें बंड पुकारलें. हें कळतांच शाहजहाननें त्याच्यावर स्वारी करून त्याचा मोड केला. लढत असतांच लोदी मारला गेला (१६२९). त्याच सुमारास अहमदनगरचा पाडाव करण्याचें ठरवून शाहजहान त्यावर चालून गेला. त्यावेळीं अहमदनगरचा मुत्सद्दी दिवाण मलिकंबर मेला होता (१६२६) व त्याचा मुलगा फत्तेखान दिवाण झाला होता. त्याला लांच भरून शाहजहाननें वश करून घेतलें व त्याच्याशीं तह केला. त्यानंतर त्यानें आसफखानास विजापुरावर पाठविलें. मोठ्या युद्धानंतर विजापुरच्या सुलतानानें शाहजहानचें मांडलिकत्व मान्य केलें. त्याच्यापूर्वीच गोवळकोंड्याच्या शहानेंही मोंगलांचें मांडलिकत्व मान्य केलें होतें. पुढें सन १६३६ मध्यें शाहजहाननें अहमदनगरवर पुन्हां हल्ला केला व तें राज्य जिंकून आपल्या राज्यास जोडलें. त्यामुळें निजामशाही नष्ट झाली (१६३७). त्यानंतर दक्षिणेंतील नव्या प्रांतावर शाहजहाननें आपला मुलगा औरंगजेब याची सुभेदार म्हणून नेमणूक केली.


खानजहान लोदी

३. इतर युद्धप्रसंग:—(१) उदेपूरचा राणा जगत्सिंह, जयपूरचा जयसिंह व जोधपूरचा गजसिंह यांचें शाहजहानशीं सख्य नव्हतें. त्यांच्याबरोबर शाहजहान बरींच वर्षें लढत होता. परंतु त्यांत त्याला फारसें यश लाभलें नाहीं. उलट रजपूत राज्यें स्वतंत्र होऊं लागलीं. (२) बादक्षान व बाल्क हे प्रांत पुन्हां मिळवून थेट समर्कंदपर्यंतचा मुलूख मिळविण्याची शाहजहानची महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळें अफगाणिस्थानांत बादशाही फौजा बरींच वर्षें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लढत होत्या. औरंगजेबास दक्षिणच्या सुभेदारीवरून बदलून या सुभेदारीवर त्यानें त्याला नेमलें. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. उलट इराणच्या शहानें मोंगलांच्या ताब्यांतील कंदाहार प्रांत सन १६४८ मध्यें जिंकून घेतला. तो परत घेण्याची कामगिरीच मुख्यतः औरंगजेबावर होती; परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. त्यानंतर दारालाही तेंच काम देण्यांत आलें. तोही अपेशी ठरला. या अपयशामुळें मोंगलांच्या हातून कंदाहार गेला तो कायमचाच. (३) यावेळीं पोर्तुगीजांचा बंगाल्यांत शिरकाव झाला होता. बंगालच्या उपसागरांतील चांचे लोकांचा उपद्रव कमी करण्याची त्यांच्यावर मुख्यतः कामगिरी होती; व त्याकरितां त्यांना कांहीं व्यापारी सवलती देण्यांत आल्या होत्या. पोर्तुगीजांनीं तें काम केलें नाहीं. उलट ते चांच्यांशीं स्नेहानें वागूं लागले. एवढेंच नव्हे तर ते तेथील जकाती घेऊं लागले, आपल्या ख्रिस्ती धर्माचा प्रसार करूं लागले, कित्येकांस गुलाम म्हणूनही विकूं लागले व एकदां तर त्यांनीं मुमताजमहलच्या दोन दासींसही अटक केली. शाहजहाननें बंड केलें होतें त्यावेळीं पोर्तुगीजांनीं त्याला मदत केली नव्हती. या सर्व कारणांकरितां शाहजहाननें त्यांच्यावर चाल केली, त्यांचीं ठाणीं उध्वस्त केलीं व पुष्कळांची कत्तल केली. यामुळें त्यांचा उपद्रव कमी झाला.

४. औरंगजेबाची दक्षिणची सुभेदारी:—औरंगजेब दक्षिणच्या सुभेदारीवर दोनदां होता. प्रथम सन १६३६–४४ व नंतर सन १६५४–५७. त्यानेंच खडकी या निजामशाही राज्याच्या राजधानीचें औरंगाबाद हें नवें नांव ठेवलें. बागलाण प्रांतही त्यानेंच जिंकला. मुर्शिदकुलीखान त्याचा वजीर होता. त्याच्या मदतीनें त्यानें दक्षिणेंत तोडरमलाची जमीनमहसुलाची पद्धति सुरू केली. त्यानंतर त्यानें गोवळकोंडा व विजापूर यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचा बेत केला. तीं राज्यें शियापंथी होतीं. औरंगजेब सुन्नीपंथी होता. ह्यामुळें औरंगजेब त्यांचा द्वेष करी. मीरजुम्ला नामक एक इराणी सरदार यावेळीं गोवळकोंड्याचा दिवाण होता. तो मोठा कर्तबगार मुत्सद्दी होता. त्याला फितवून औरंगजेबानें आपल्या बाजूस वळवून घेतलें होतें. पुढें त्यानें मीरजुम्लाच्या मदतीनें गोवळकोंड्यावर स्वारी केली. तेव्हां तेथील सुलतानानें शाहजहानला विनवून औरंगजेबाला तह करावयास लावलें. त्यानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें विजापुरावर चाल केली. व बेदर, कल्याणी वगैरे किल्ले काबीज करून मोठा विजय संपादिला. त्यामुळें औरंगजेबाचें सामर्थ्य वाढेल असें वाटून शाहजहाननें मनाई हुकूम पाठवून विजापुरकरांशीं चाललेलें युद्ध बंद केलें. मात्र औरंगजेबानें विजापुरकरांकडून खंडणीच्या रूपानें एक कोट रुपये घेतले. त्याच सुमारास शाहजहान आजारी पडल्याचें वृत्त त्याला कळलें व त्यामुळें औरंगजेब दिल्लीकडे गेला.

५. भावाभावांतील यादवी :—सन १६५७ मध्यें शाहजहान एकाएकीं आजारी पडला. त्याची लाडकी राणी अर्जुमंद बानू ऊर्फ मुमताजमहल ही सन १६३१ मध्येंच मरण पावली होती. त्यामुळें त्याला फार शोक झाला होता. तिच्यापासून त्याला चौदा मुलें झालीं होतीं. त्यापैकीं चार पुत्र व दोन मुलीच जिवंत होत्या. दारा हा सर्वांत वडील मुलगा बुद्धिवान व धर्मसहिष्णु होता. परंतु तो रागीट, गर्विष्ठ व उतावळा असल्यानें अप्रिय होता. मात्र शाहजहानचें त्याच्यावर प्रेम असल्यानें तो त्याच्याजवळ असे. दुसरा मुलगा शुजा हा बंगाल्यांत सुभेदार होता. तो शूर पण विलासी, आळसी व सुस्त होता. तिसरा मुलगा औरंगजेब कर्तबगार, निर्व्यसनी, धूर्त, कडवा, महत्त्वाकांक्षी पण कपटी व विश्वासघातकी होता. चौथा मुराद, गुजराथच्या सुभ्यावर होता. तो शूर पण भोळा व मूर्ख होता. बाप आजारी पडल्याचें वृत्त कळतांच सर्वजण गादी मिळविण्यास उत्सुक झाले. औरंगजेबानें मुरादला आपल्या बाजूस वळवून घेऊन, 'दिल्लीचें राज्य तुला मिळवून देतों' असें त्यास वचन दिलें.



दाराशेको

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भोळा मुराद फसला, व तो आपल्या सैन्यासह त्याला मिळाला. त्यानंतर त्या दोघांनीं दारावर स्वारी केली. सामुगड येथें लढाई होऊन दाराचा पराभव झाला. नंतर औरंगजेब मुरादसह आग्र्यास गेला व त्यानें विश्वासघातानें आपल्या बापास–शाहजहानास–कैद केलें. लौकरच त्यानें मुरादलाही कैद केलें, शुजास पळवून लावलें व दाराचा पाठलाग करून व विश्वासघातानें त्याला पकडून त्याचा खून करविला. त्यानंतर तो स्वतः बादशाह झाला (१६५८). मरेतोंपर्यंत शाहजहान औरंजेबाच्या कैदेंतच होता. सन १६६६ मध्यें तो मरण पावला. त्यामुळेंच तो औरंगजेबाच्या त्रासांतून सुटला. सन १६६१ मध्यें मुरादचा खून करण्यांत आला. शुजाही ब्रह्मदेशांत पळून गेला. तिकडेच तो मारला गेला.

६. शाहजहानची योग्यता :—शाहजहाननें तीस वर्षें राज्य केलें. त्यानें खरें बादशाही वैभव भोगलें. रंगेलपणा व विलासी आचरण यांत त्याचा हात धरणारा दुसरा मोंगल बादशाह झाला नाहीं. त्याच्या राज्याचे बावीस सुभे असून राज्याचें उत्पन्न छत्तीस कोट रुपयांपर्यंत होतें. पैशाचा तो लोभी होता. त्याचा खजिना संपत्तीनें भरलेला असे. सर्व प्रांतांतून त्यानें न्यायकोर्टें स्थापिलीं होतीं. मात्र त्यांच्याविरुद्ध अपीलें तो स्वतः ऐकत असे. जमीनमहसुलाची व्यवस्था त्यानें नीट चालू केली होती. विद्वानांस त्याच्या दरबारीं आश्रय मिळे. प्रसिद्ध हिंदी पंडित जगन्नाथ पंडित त्याचा आश्रित होता. शाहजहाननें उत्कृष्ट तोफखाना बाळगला होता व त्यावर युरोपियन अधिकारी ठेवले होते. त्याच्या कारकीर्दीत मोंगलसत्तेचा कळस झाला. शांतता, सुव्यवस्था व भरभराट यामुळें बादशाही अपूर्व वैभवानें नटली, व्यापार वाढला व



शाहजहान व शिक्षक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशांत अगणित संपत्ति येऊं लागली. आपल्या मुलाप्रमाणें बादशाह आपल्या प्रजेची काळजी घेत असे. त्याचें धार्मिक धोरण उदारपणाचें होतें. दरबारी डामडौल, भपका व वैभव यांत शाहजहानशीं बरोबरी करूं शकेल असा दुसरा मोंगल बादशाह झालाच नाहीं. ललितकलांचा तो भोक्ता होता. संगीत त्याला फार आवडे. तानसेनाचा नातजांवई लालखान त्याचा आश्रित होता. त्याचें गाणें त्यास फार आवडे. कलाकौशल्याचीं कामें त्यानें अनेक केलीं व त्याकरितां त्यानें पाण्यासारखा पैसा खर्च केला. त्यामुळें त्याची कीर्ति अजरामर झाली यांत शंका नाहीं. ताजमहालनें त्याची कीर्ति आजतागाईत कायम टिकविली आहे.

७. कलाकौशल्याचीं कामें :—शाहजहाननें शिल्पकलेस फार प्रोत्साहन दिलें. त्यानें दिल्ली व आग्रा हीं शहरें नटविलीं. त्याची साक्ष आजही आपल्याला तेथें मिळते. हल्लींचें दिल्ली शहर त्यानेंच वसविलें. जुम्मामशीद, मोतीमशीद,



ताजमहाल

दिवाण-ई-आम, दिवाण-ई-खास वगैरे सुंदर, भव्य व शोभिवंत इमारती त्यानें दिल्लीस बांधल्या. आपल्याकरितां त्यानें रत्नजडित मयूरसिंहासन तयार करविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याकरितां त्यानें सहाकोट रुपये खर्चिले. त्याची राणी मुमताजमहल हिला वचन दिल्याप्रमाणें त्यानें आमरण लग्न केलें नाहीं व तिचें स्मारक उभारलें. तें म्हणजे ताजमहाल ही संगमरवरी नयनमनोहर इमारत होय. तिच्याकरितां त्यानें तीन कोट रुपये खर्च केले. अनेक देशचे कारागीर बारा वर्षें सतत उद्योग करीत होते; व त्याचें फळ म्हणजे ताजमहाल होय. ही इमारत इतकी सुंदर आहे कीं जगांतील एक आश्चर्य म्हणून आजही सर्वजण तिचा उल्लेख करतात. शिल्पकलेचा उत्तम नमुना म्हणून युरोपियनही ताजमहालकडे बोट दाखवितात. चित्रकलेलाही शाहजहाननें प्रोत्साहन



दिवाण–इ-आम

दिलें होतें. त्याचप्रमाणें त्यानें लाहोरजवळ रावी नदीस व दिल्लीजवळ यमुना नदीस कालवे काढले होते. त्यांचा शेतीस फार उपयोग होत असे.

८. युरोपियन प्रवासी :—शाहजहानच्या कारकीर्दीत अनेक युरोपियन प्रवासी हिंदुस्थानांत आले होते. जॉन आल्बर्ट मंडेल्स्लो, बर्नियर व जॉन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टॅव्हर्नियर हे प्रमुख होत. **मंडेल्स्लो** हा जर्मन प्रवासी इराणमार्गें हिंदुस्थानांत सन १६३८ मध्यें सुरतेस आला. त्यानें अहमदाबाद, आग्रा वगैरे शहरें



दिवाण-इ-खास

पाहिलीं व तीं त्याला फार आवडलीं. 'बहुतेक देशांचा आग्र्याशीं व्यापार चालत असे. आयात व निर्यात मालावर दहा टक्के जकात घेण्याची वहिवाट होती. शहरचे रस्ते चांगले रुंद होते. प्रवाशांकरितां ऐशी धर्मशाळा होत्या' वगैरे आग्र्याचें त्यानें वर्णन केलें आहे. तो सन १६४० मध्यें परत गेला. **फ्रॅन्सिस बार्नियर** हा सन १६५५ च्या सुमारास हिंदुस्थानांत आला. तो येथें बारा वर्षें होता. त्यानें लिहून ठेवलेली हकीकत महत्त्वाची आहे. औरंगजेबानें राज्यप्राप्तीकरितां जीं कारस्थानें केलीं, त्यांचें हुबेहूब व चित्तवेधक वर्णन त्यानें केलें आहे. तो फ्रेंच गृहस्थ होता. तो १६६७ मध्यें युरोपांत परत गेला. **टॅव्हर्नियर** हा फ्रेंच जव्हेरी सन १६४१ मध्यें इकडे व्यापारानिमित्त आला. त्याचीं प्रवासवृत्तें व्यापारउदीम करणारांच्या फार उपयोगाचीं आहेत. त्यानें अनेक ठिकाणीं प्रवास केला. 'त्यावेळीं हिंदुस्थानांतला प्रवास जितका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोयीचा व सुखकर होता, तितका फ्रान्स व इटली या देशांतीलही नव्हता. येथें बैलगाडींत, पालखींत किंवा बैलावर बसून लोक प्रवास करीत. शिग्रामास दोन बैल जोडले जात व त्यांत दोन माणसें बसत. गाडी व बैल यांस सहाशें रुपये खर्च येई. रोज चाळीस मैल पळत जाऊन, सात आठ दिवस बैल एकसारखा प्रवास करीत. भाडें दिवसास एक रुपया पडे.' असें प्रवासाचें त्यानें वर्णन केलें आहे. पुढील काळांत थिवेनॉट, डॉ. फ्रायर, हॅमिल्टन, ऑर्म वगैरे युरोपियन प्रवासी हिंदुस्थानांत आले होते. त्यांचीं प्रवासवृत्तें वाचनीय आहेत.

अ भ्या स

१. 'शाहजहानचा काळ म्हणजे मोंगल बादशाहीचा सुवर्णकाळ होय' या म्हणण्याचें खंडण वा मंडण करा. उत्तराकरितां कारणें द्या.

२. शाहजहानचा स्वभाव वर्णा. त्यानें कोणाशीं युद्धें केलीं? कां? त्याचा परिणाम काय झाला?

३. शाहजहानच्या वेळीं कलाकौशल्याची भरभराट झाली असें कां म्हणतात? त्याचा कारभार वर्णा.

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
पोर्तुगीजांचा बंदोबस्त, अहमदनगरचा पाडाव, ताजमहाल, भावाभावांतील यादवी, युरोपियन प्रवासी.

उतारा

१. शाहजहानच्या वेळची भरभराट

आपल्या साम्राज्यांतील प्रजेच्या संरक्षणाची व पोषणाची तरतूद करण्याकरितां बादशहानें उत्तम उपायांची योजना केली होती. आपल्या प्रजेचें कल्याण कशांत आहे हें नेमकें हुडकण्यांत तो कुशल होता. त्याचे अधिकारी अत्यंत प्रामाणिक व हुशार होते. त्याच्या राज्याचा हिशोब दरसाल नीट काळजीपूर्वक तपासला जाई. बादशाही जमिनी व त्यावरील कुळें यांची काळजी घेण्यांत येई. शेतीला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तेजन उत्तम मिळे. सारा योग्य प्रमाणांत घेतला जाई. दुष्टांची कानउघाडणी व वेळेनुसार त्यांस दंडही होई. त्यामुळें छलकांस चांगलीच दहशत बसे. अकबराच्या वेळीं ज्या प्रांताचें उत्पन्न तीन लाखांचें होतें, तें शाहजहानच्या वेळीं दहा लाखांचें झालें. शेतकरी आपल्या शेतांत निरनिराळ्या सुधारणा करून शेतीचें उत्पन्न वाढवीत. त्याकरितां सरकारांतून त्यांस बक्षिशीही मिळे. शाहजहानच्या राज्याचा खर्च मागील कारकीर्दीच्या चौपटीनें होता; तरीही सरकारी खजिना नेहमीं भरलेलाच असे. राज्याचा विस्तार अफाट झालेला असतांही फिर्यादींची नोंद दर आठवड्यास फार तर वीसच होई. गुन्हेगार सांपडलेच तर अधिकारी त्यांचा निकाल ताबडतोब करीत.

—राय बिहारीमल्लचा वृत्तांत.

प्रश्न :—१. शाहजहानच्या वेळीं शेतीची व्यवस्था कशी होती? सरकारी उत्पन्न किती होतें? २. त्याच्या वेळच्या भरभराटीचीं प्रतीकें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालदर्श—१६०५-१६५८

हिंदुस्थान	महाराष्ट्र	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
जहांगीर १६०५-२७	जिजाबाई-शहाजी लग्न	१६०४	पहिला जेम्स १६०३-२५	गाय फॉक्स,
नूरजहानशीं लग्न		१६११	बायबलचें भाषांतर	बेटस्, खुश्रू,
		१६१५	सर टॉमस रो-जहांगीर भेट	हॉकिन्स, सर टॉमस रो,
		१६२०	मे फ्लॉवर-अमेरिकेकडे	बेकन,
खुसरौचा वध		१६२१		
मलिकंबरचा मृत्यु		१६२६	पहिला चार्ल्स १६२५-४९	
जहांगीरचा मृत्यु		१६२७		बकिंगहॅम,
शाहजहान १६२७-५८				ईलियट, दादाजी,
	शिवाजीचा जन्म	१६३०		
		१६३४	नौकाकर	हॅम्पडन,
अहमदनगरचा पाडाव		१६३७		स्ट्रॅफर्ड, लॉड,
	दादाजी कोंडदेव मृत्यु १६४७	१६४०	इंग्लंडांत यादवी	शिवाजी,
	स्वराज्याचें तोरण १६४६			मंडेलस्लो,
	चंद्रराव मोऱ्याचा खून १६५२	१६४९	चार्ल्सला फांशी	बर्नियर,
शाहजहानचा मृत्यु		१६५८	क्रॉमवेल १६४९-५८	टॅव्हर्नियर,
	अफजलखानाचा वध	१६५९		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३०. औरंगजेब (१६५८–१७०७)

१. औरंगजेब-स्वभाव :—आपल्या भावांचा नायनाट करून औरंगजेब आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षी 'आलमगीर' हें नांव धारण करून गादीवर बसला. सन १६१८ मध्यें त्याचा जन्म झाला होता. राज्यावर येण्यापूर्वी त्यानें मोठमोठीं जबाबदारीचीं कामें केलीं होतीं. त्यामुळें त्याला कामाचा चांगला अनुभव आलेला होता. शौर्य, दीर्घोद्योग, निश्चय, विद्वत्ता, धर्मनिष्ठा, साधेपणा वगैरे गुणांत तो सरस होता; परंतु जुलूम, कपट, विश्वासघात, दुराग्रह, संशय वगैरे दुर्गुणांमुळें त्याच्या गुणांची माती झाली. तो कडवा धर्मनिष्ठ होता. कुराणाच्या आज्ञेप्रमाणें वागून प्रार्थना, धर्मादाय, उपवास वगैरे नित्यनैमित्यिकें मोठ्या आस्थेनें तो करीत असे. अत्यंत विरक्त साधूप्रमाणें त्याची राहणी साधी होती. कुराणाच्या प्रती व टोप्या तयार करावयाच्या व त्या विकून आपला चरितार्थ चालवावयाचा ही त्याची वृत्ति होती. मद्य व मांस यांस तो शिवत नसे. कलाकौशल्याची वा संगीताची त्याला मुळींच आवड नव्हती. स्वामिनिष्ठ माणसांवरही तो विश्वास टाकीत नसे. प्रत्येक काम तो स्वतः करी. तो क्रूर व तापट होता. अन्याय झाल्यास तो कधींही क्षमा करीत नसे. इस्लाम धर्माच्या प्रसारार्थ त्यानें हाडांचीं काडें केलीं; मात्र त्यांत त्याला यश लाभलें नाहीं. त्याचें खासगी वर्तन चोख होतें.

२. मीरजुम्ला :—मीरजुम्ला इराणी व्यापारी होता. प्रथम दिल्लीस त्याचें न जमल्यानें तो गोवळकोंड्यास गेला व तेथें त्यानें नोकरी धरली. तेथें असतांच त्याला हिऱ्याची खाण सांपडली. त्यामुळें त्यानें हिऱ्यांच्या व्यापारांत अपार संपत्ति मिळविली. पुढें वाढतां वाढतां तो गोवळकोंड्याचा वजीर झाला. त्यानें आपल्या पदरीं फौजही ठेवली होती. औरंगजेब दक्षिणच्या सुभेदारीवर असतां त्यानें मीरजुम्लास आपल्याकडे वळवून घेतलें. त्याच्या मदतीनेंच औरंगजेबानें गोवळकोंडा व विजापूर या राज्यांवर हल्ला केला होता. दिल्लीचें राज्य मिळविण्याच्या कामांत त्यानें औरंगजेबाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अतिशय मदत केली होती. त्याकरितां मीरजुम्लास त्यानें बंगालची सुभेदारी दिली. औरंगजेबास मात्र त्याचा कधींच भरंवसा आला नाहीं. बंगालच्या सुभेदारीवर असतांच औरंगजेबानें त्याला आसामवर स्वारी करण्याची आज्ञा केली. तेथील हवा त्यास मानवली नाहीं. तरीही त्यानें आसाम जिंकला. तेव्हां चीन जिंकण्यास औरंगजेबानें त्यास फर्माविलें. त्यांतच त्याचा सन १६६३ मध्यें अंत झाला. मीरजुम्ला शूर, शाहणा व राजकारणांत मुरलेला मुत्सद्दी होता. त्याचें योग्य चीज झालें नाहीं. त्याच्यानंतर बंगालच्या सुभेदारीवर औरंगजेबानें आपला मामा शायिस्तेखान याची नेमणूक केली. तेथें तो वीस वर्षें होता. त्यानें आराकानप्रांत जिंकून घेतला व तेथील चांचे लोकांचा उपद्रव बंद केला.

३. हिंदूंचा छळः—इस्लामी धर्माचा प्रसार करावयाचें औरंगजेबाचें धोरण होतें. अर्थात हिंदूंचा तो द्वेष करीत असे. हिंदूंचा निःपात करण्याचा त्यानें जणूं निश्चयच केला होता ! गादीवर आल्याबरोबर त्यानें त्यांच्याविरुद्ध धोरण स्वीकारून त्यांचा छळ मांडला. जे हिंदू सरकारी नोकरींत होते त्यांस त्यानें कामावरून कमी केलें. कोणीही गंध लावून दरबारांत येऊं नये असें त्यानें फर्माविलें. हिंदूंनीं नवीं देवळें बांधूं नयेत व जुनीं दुरुस्त करूं नयेत असा कायदा केला. त्या कायद्याची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून त्यानें स्वतंत्र अधिकारी नेमला. हिंदूंचे सण व यात्रा त्यानें बंद करविल्या. मुसलमान व्यापाऱ्यांस जकाती माफ करून त्यानें हिंदू व्यापाऱ्यांवर पांच टक्के जास्त जकाती लादल्या. सर्व मुसलमानेतरांकडून त्यानें 'जिझिया' कर सक्तीनें वसूल करण्याचें फर्माविलें. हिंदु पंडितांजवळ कांहीं मुसलमान शिकण्यास जातात हें त्याला समजलें. तेव्हां त्यानें हिंदूंचीं देवळें, मठ व पाठशाळा पाडून टाकण्याचा हुकूम केला. त्या हुकुमाप्रमाणें काशी, मथुरा, सोमनाथ वगैरे ठिकाणचीं देवळें व मूर्ति उध्वस्त करण्यांत आल्या. या सर्व गोष्टींमुळें हिंदूंचीं मनें असंतुष्ट झालीं व तें बंडास प्रवृत्त झाले. अर्थात त्याच्या या धोरणानें एकजीव होण्याऐवजीं राज्यकर्ते व प्रजा दुरावले.

४. सतनामी व इतर लोकांचीं बंडें :—दिल्लीजवळ पतियाळा, मथुरा, दिल्ली वगैरे ठिकाणीं सतनामी पंथाचे बैरागी रहात होते. हिंदूंचा छळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्यानें पाहवेना तेव्हां त्यांनीं बंड पुकारलें. कांहीं क्षुल्लक कारणावरून त्यांचा कोतवालाशीं तंटा झाला. त्याचेंच रूपांतर बंडांत झालें (१६७२). कोतवालानें लष्कर बोलावून सर्वांची कत्तल केली. या बैराग्यांचा बंदोबस्त करण्यास बादशहास तीन चार वर्षें लागलीं. औरंगजेबानें अनेक देवळें पाडलीं, अनेक मूर्ति छिन्नविछिन्न केल्या. याचा जाट लोकांस फार राग आला. तेही रजपुतांप्रमाणें आर्यवंशीय असून शूर लढवय्ये होते. जाटांचा पुढारी गोकुळ जाट होता. त्यानें आग्रा-मथुरा विभागांत सैन्य जमा करून बंड उभारलें (१६६९). आग्रा येथील अकबराचें थडगें उकरून त्याच्या अस्थींस जाटांनीं अग्नि दिला. तेव्हां लष्कराच्या मदतीनें बादशहानें जाटांचा पराभव करून गोकुळास फाशीं दिलें.



मस्त हत्तीशीं औरंगजेबाची झुंज

५. शीख लोकांचा छळ :—नानकानें शीखधर्माची संस्थापना केली होती. हिंदु व मुसलमान धर्मांतील उच्चतत्त्वें निवडून त्यानें तीं आपल्या धर्मांत समाविष्ट केलीं होतीं. मनोभावें ईश्वरसेवा करावी, त्यानेंच ईश्वर प्रसन्न होतो, त्याबाबत कोणावरही जबरदस्ती करूं नये अशी त्याची शिकवणूक होती. त्याच्यानंतर शिखांचे नऊ-दहा गुरु झाले. गुरु अर्जुनसिंग अकबराचे वेळीं होता. त्यानेंच अमृतसरला शिखांचें सुवर्णमंदीर बांधलें. त्याचा जहांगीरनें वध केला होता. तेव्हांपासून शिखांनीं आपल्या धर्माच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रक्षणार्थ हातीं शस्त्र घेतलें होतें. औरंगजेबाच्या वेळीं तेजबहादूर हा नववा गुरु होता. त्यानें औरंगजेबास विरोध केला. तेव्हां औरंगजेबानें त्याला पकडून देहान्त शासन केलें (१६७५). त्याचा मुलगा गुरु गोविंदसिंग शिखांचा दहावा गुरु झाला. त्यानें शिखांस लष्करी पेशा दिला. केस न कापणें, कंगवा वापरणें, लोखंडी कडें हातांत घालणें, कच्छ घालणें व जवळ किरपाण बाळगणें हे त्यानें आपल्या लोकांस नियम करून दिले होते. त्यानें शिखांमध्यें उत्तम शिस्त निर्माण केली. गोवध बंद करून हिंदूंचें प्रेमही त्यानें संपादिलें.

गुरु तेजबहादूर

औरंगजेबाला त्याचा उत्कर्ष सहन झाला नाहीं. तेव्हां त्याचे मुलगे पकडून त्यानें त्यांस भिंतींत चिणून मारलें. पुढें गुरु गोविंदसिंगाचाही खून झाला (१७०८). गुरु गोविंदसिंग हाच शिखांचा शेवटचा गुरु. शिखांचा औरंगजेबानें छळ केला, त्याचें उट्टें त्यांनीं पुढें चांगलेंच काढलें.

६. रजपुतांशीं युद्धप्रसंग (१६७८–८१) :—औरंगजेबानें रजपुतांवरही जिझिया कर लादला होता. त्यामुळें रजपूत चिडले होते. जोधपूरचा जसवंतसिंह व जयपूरचा रामसिंह हे बादशाही नोकरींत होते. जसवंतसिंह मेल्यावर त्याच्या अल्पवयी मुलास–अजितसिंहास–औरंगजेबानें राज्य दिलें नाहीं. उलट त्यास नजरकैद केली व त्याला इस्लामी धर्माची दीक्षा देण्याचें ठरविलें. यामुळें सर्व रजपूत चवताळून उठले. अजितसिंह व त्याची आई यांस दुर्गादास राठोड या शूर स्वामिभक्त सरदारानें सोडवून आणलें व सर्व रजपुतांस एकत्र करून युद्धाचें रणशिंग फुंकलें. मेवाडचा राणा राजसिंह रजपुतांचा पुढारी झाला. कडेकोट तयारी करून रजपुतांवर औरंगजेब चालून गेला. कपटविद्येचाही त्यानें या युद्धांत भरपूर उपयोग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला. परंतु त्याला यश आलें नाहीं. रजपुतांनीं त्याला सळो कीं पळो करून सोडलें. एकदां बादशाह राजसिंहाच्या कचाटींतही सांपडला होता! परंतु त्यानें त्याला सोडून दिलें. पुढें औरंगजेबाचा मुलगा अकबर याला दुर्गादासानें वश करून घेतलें व त्याला बादशाहीपदावर बसविण्याचें आश्वासन दिलें. ही गोष्ट औरंगजेबास कळतांच 'रजपुतांस फसवून त्यांस येथवर आणलें हें ठीक केलें' अशा अर्थाचें त्यानें अकबरास एक खोटेंच पत्र लिहून तें दुर्गादासाच्या हातीं पडेल असें केलें. त्यामुळें दुर्गादासास अकबराचा संशय आला. तें अकबरास समजल्यावर तो रजपुतांचा आश्रय सोडून दक्षिणेंत मराठ्यांकडे गेला. शेवटीं जेरीस आल्यानें औरंगजेबानें हें युद्ध कसेंबसें संपवून राजसिंहाशीं तह केला. त्या तहानें रजपुतांवरील जिझिया रद्द झाला, रजपुतांचा मुलूख त्यांस परत मिळाला, अजितसिंहास त्याची गादी मिळाली व धर्माच्या बाबतींत बादशहानें हात घालूं नये असें ठरलें. रजपुतांनीं मोंगलांवर विजय मिळविल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. या युद्धानें बादशहाची पुष्कळ द्रव्यहानी झाली, त्याचा दरारा कमी झाला व रजपुतांस स्वातंत्र्यलाभ झाला.

७. बुंदेल्यांवर शस्त्र :—बुंदेलखंडाचा राजा चंपतराय यानें औरंगजेबास राज्य घेण्याचे वेळीं मदत केली होती. परंतु ती गोष्ट विसरून औरंगजेबानें त्याच्यावरही शस्त्र उपसलें. बुंदेले रजपूत होते. जहांगीरशीं त्यांचे स्नेहाचें संबंध होते. परंतु औरंगजेबानें पूर्वीचा स्नेह धुडकावून लावून त्यांच्याशीं लढाई सुरू केली. चंपतराय मारला गेला व त्याच्या मुलांस दुर्दशा प्राप्त झाली. मात्र त्याच्या मुलांपैकीं छत्रसाल यानें मिर्झा राजा जयसिंह याच्या लष्करांत दाखल होऊन दक्षिणेकडे प्रयाण केलें होतें. शिवाजीची व त्याची भेटही झाली होती. तेव्हां शिवाजीप्रमाणेंच आपणही बुंदेलखंडांत स्वराज्य स्थापन करावें असें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें बादशाही फौजांशीं सामने करून त्यानें आपलें सामर्थ्य वाढविलें; व बुंदेल्यांचें स्वातंत्र्य रक्षिलें.

८. जिझिया :—औरंगजेबानें सन १६७९ मध्यें मुसलमानांखेरीज इतर सर्वांवर जिझिया कर बसविला. हा कर प्रथम खलीफा उमर यानें बसविला होता. हिंदुस्थानांत हा कर प्रथमतः अलाउद्दीन खलजीनें बसविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अकबर, जहांगीर व शाहजहान या बादशाहांस त्याची कधींच आवश्यकता वाटली नाहीं. मुसलमानेतर काफर आहेत व त्यांस इस्लामची दीक्षा देणें जरूर आहे असें औरंगजेबाचें मत होतें. शिवाय काफरांचें संरक्षण करण्याकरितां लष्कर ठेवावें लागतें असेंही मुसलमानांचें म्हणणें होतें. हा कर आंधळे-पांगळे, गुलाम, वृद्ध, स्त्रिया, चौदा वर्षांखालील मुलें व सरकारी नोकर यांना माफ असे. श्रीमंतांस सालास एक मोहोर (मोहोर; रु. १३॥), मध्यमवर्गीयांस अर्धी मोहोर व गरिबांस पाव मोहोर जिझिया कर द्यावा लागे. औरंगजेबानें हा कर सर्वांवर बसविला. डच, इंग्रज वगैरे युरोपियनांसही तो द्यावा लागे. हा कर मोठा अपमानकारक व डोईजड होता. त्यामुळें प्रजेंत भेदभाव उत्पन्न होई व तो कर देणारास हलकें समजण्यांत येई. यामुळें हिंदूंचीं मनें कायमचीं असंतुष्ट झालीं.

९. मराठ्यांचा उदय:—औरंगजेब बादशाह झाला त्याच्या थोडें अगोदर शिवाजीनें मराठ्यांचें स्वतंत्र राज्य स्थापण्याचा उपक्रम सुरू केला होता; व हळू हळू त्यानें दक्षिणेंत आपल्या राज्याचा विस्तारही बराच केला होता. होतां होतां मोंगलांच्या मुलुखावरही त्याच्या स्वाऱ्या होऊं लागल्या. तेव्हां शिवाजीचा बंदोबस्त करण्याकरितां औरंगजेबानें प्रथमतः शायिस्तेखानास पाठविलें. पण त्याचा पराभव झाला. पुढें त्यानें दिलेरखान व मिर्झा राजा जयसिंह यांना त्याच्यावर पाठविलें. त्यांनीं शिवाजीशीं तह करून त्याला आग्र्यास पाठवून दिलें. तेथें औरंगजेबानें त्याला कैदेंत ठेवलें असतां मोठ्या हिंमतीनें शिवाजीनें आपली सुटका करून घेतली (१६६६). त्यानंतर त्यानें मोंगलांशीं पुन्हां सामना दिला. औरंगजेबाला त्याचा बंदोबस्त करतां आला नाहीं. सन १६८० मध्यें शिवाजी मृत्यु पावला व दक्षिणेकडे गोंधळ माजला. विजय मिळविण्यास ही संधि चांगली आहे असें वाटल्यावरून प्रचंड सेना बरोबर घेऊन औरंगजेब स्वतः दक्षिणेंत उतरला (१६८२). दक्षिण देश जिंकणें ही त्याची मोठी महत्त्वाकांक्षा होती. इस्लाम धर्माचा दक्षिणेंत त्याला प्रसारही करावयाचा होता. शिवाय दक्षिणेंतील विजापूर व गोवळकोंडा हीं जुनीं राज्यें बुडविण्याची त्याला तीव्र इच्छा होती. त्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



औरंगजेबाचा गोवळकोंड्याचा वेढा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलगा अकबर मराठ्यांचा राजा संभाजी याच्या आश्रयास राहिला होता. या सर्व कारणांकरितांच औरंगजेबानें दक्षिणेवर स्वारी केली.

१०. दक्षिणची स्वारी (१६८२–१७०७):—आपल्या बरोबर अवाढव्य लष्कर घेऊन सन १६८२ मध्यें औरंगजेब दक्षिणेंत उतरला. दक्षिणच्या सुभेदारीवर असतां त्याला तेथील सर्व माहिती झाली होती. दक्षिणेंत आल्याबरोबर त्यानें संभाजीच्या राज्यावर स्वारी केली. पण गनिमी काव्यानें लढून मराठ्यांनीं त्याला दाद दिली नाहीं. तेव्हां त्यांचा नाद तात्पुरता सोडून देऊन औरंगजेबानें अदिलशाही व कुतुबशाही राज्यांकडे आपला मोर्चा वळविला. सन १६८६ मध्यें विजापूरचें व सन १६८७ मध्यें गोवळकोंड्याचें राज्य बुडवून आपल्या राज्यांत तीं दोन्हीं राज्यें त्यानें सामील करून घेतलीं. त्यानंतर तो पुन्हां मराठ्यांकडे वळला. तेव्हांही मराठे त्याला पुरून उरले. परंतु गाफीलपणें रहात असतां त्यांचा राजा संभाजी औरंगजेबाच्या हातीं लागला. त्याचा औरंगजेबानें अत्यंत निर्दयपणें सन १६८९ मध्यें वध केला. यामुळें मराठे आपल्याला शरण येतील असें त्याला वाटलें; पण झालें उलटें ! मराठ्यांच्या राजाचा वध झाल्यानें ते जास्त चिडले व त्यांनीं मोंगलांस सतावून सोडलें. त्यावेळीं संभाजीचा भाऊ राजाराम मराठ्यांचा राजा झाला. धनाजी जाधव व संताजी घोरपडे हे सेनापति झाले. औरंगजेबानें मराठ्यांचे अनेक किल्ले काबीज करून घेतले. ते सर्व मराठ्यांनीं पुन्हां जिंकले. सन १७०० मध्यें राजाराम वारल्यानेंही मराठ्यांचा जोम कमी झाला नाहीं. गनिमी काव्यानें लढून त्यांनीं मोंगलांस भंडावून सोडलें. औरंगजेबही त्यामुळें त्रस्त झाला व तो टेकीस आला. अनेक वेळां त्यानें आपल्या छावण्या बदलल्या व मराठ्यांचा पराभव करण्याकरितां त्यानें जंगजंग पछाडले. परंतु त्याला यश आलें नाहीं. शेवटीं कंटाळून तो अहमदनगर येथें येऊन राहिला. त्याचे सर्व मनोरथ फसले. त्यामुळें त्याचें मन विषण्ण झालें. ही आपली स्थिति लक्षांत घेऊन आपले मुलगे भांडतील व आपल्या बापाची जी आपण अवस्था केली तशीच आपलीही ते करतील, अशी त्यास दहशत वाटूं लागली. त्यामुळें त्यानें त्यांस आपल्याजवळही येऊं दिलें नाहीं. शेवटीं वृद्धापकाळामुळें थकलेला व मराठ्यांच्या हल्ल्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंटाळून त्रस्त झालेला औरंगजेब सन १७०७ मध्यें, आपल्या वयाच्या एकुणनव्वदाव्या वर्षी, अहमदनगर येथें मृत्यु पावला. त्याची कबर पुढें औरंगाबाद येथें बांधण्यांत आली. (दक्षिणच्या युद्धांत त्याचा पराभव कां झाला तें मराठ्यांच्या विभागांत प्रकरण ३८ मध्यें पहा.)

११. औरंगजेबाची योग्यता:—व्यक्ति म्हणून औरंगजेब चांगला होता. परंतु राजा या नात्यानें त्याची योग्यता अत्यंत कमी आहे यांत शंका नाहीं. इस्लामधर्माचा प्रसार व दक्षिण काबीज करणें हीं त्याचीं मुख्य ध्येयें होतीं. त्याकरितां त्यानें आपल्या अवाढव्य राज्याची शक्ति व संपत्ति खर्च केली. त्याच्या धोरणानें राज्यांत फूट पडली व राज्याची बळकटी नष्ट झाली. आपल्या राज्याचा इतिहास ऊर्फ तवारीख लिहिण्याची पद्धति त्यानें बंद केली. फतवा-ए-आलमगिरी या नांवाचें त्यानें कायद्याचें एक कोड तयार केलें होतें. त्याच्या राज्याचें उत्पन्न तेहतीस कोटी रुपयांचें होतें. परंतु त्याचें राज्यकारभाराचें एकंदर धोरणच चुकीचें होतें. सामोपचाराचें धोरण त्यानें स्वीकारलें असतें व हिंदू, रजपूत, जाट, शियापंथी मुसलमान वगैरेंचा त्यानें छळ केला नसता तर त्याचें राज्य भरभराटलें असतें. परंतु त्यानें तसें केलें नाहीं. परधर्मसहिष्णुता त्याच्या गांवींही नव्हती! धर्माच्या बाबतींत कडवेपणा स्वीकारल्यानेंच त्याचा नाश झाला. एरवीं दीर्घोद्योग, कर्तबगारी, बुद्धिमत्ता, साधी राहणी, निर्व्यसनीपणा वगैरे बाबतींत तो कोणाही मोंगल बादशहास हार गेला नसता. राजकारण व धर्मकारण यांची फारकत करून त्यानें अकबराप्रमाणें राज्य केलें असतें, तर त्याला यश मिळालें असतें. पन्नास वर्षें राज्य करून त्यानें आपलें राज्य मोडकळीस आणलें. रजपूत, मराठे, जाट, शियापंथी मुसलमान या सर्वांचीं मनें त्यानें दुखवून त्यांस त्यानें आपले शत्रू केले. यामुळें त्याच्यानंतर मोंगल साम्राज्यास उतरती कळा लागून अखेरीस तें नष्ट झालें.

१२. कारकीर्दीचा परिणाम:—औरंगजेबाच्या राज्यास उतरती कळा लागण्यास तोच कारणीभूत झाला, हें वरील विवेचनावरून कळण्यासारखें आहे. तरीही त्याच्याशिवाय त्या गोष्टीस इतरही कांहीं कारणें घडलीं. त्याच्या मृत्यूनंतर त्याचे सरदार स्वतंत्र झाले. अर्थात् त्यामुळें मोंगल साम्राज्य विस्कळित झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांवर त्याचा विश्वास नव्हता. यामुळें त्याचे सरदार केवळ सांगकामे बनले व त्यामुळें त्यांच्या हातून मोठीं व मुत्सद्देगिरीचीं कामें होईनाशीं झालीं. रजपूत, जाट, मराठे, शीख वगैरेंच्या हल्ल्यामुळें त्याचें राज्य खिळखिळें झालें. दक्षिणच्या स्वारीकरितां त्यानें अफाट खर्च केला. त्यामुळें बादशाही खजिना रिता पडला. दक्षिणेंत पंचवीस वर्षें घालविल्यामुळें उत्तरेकडील राज्याची घडी विसकटली. त्यामुळें त्याच्यानंतर मोंगली राज्यांत यादवी व दंगे यांना ऊत आला; व मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यानें सरदारांचें फावलें. त्याचें धर्मवेडही त्याच्या राज्याच्या नाशास कारणीभूत झालें.

इतिहास व्यवसाय

अकबर व औरंगजेब यांची तुलना–स्वभाव व धोरण

अकबर	औरंगजेब (आलमगीर)
१. दिलदार, उदार व थोर मनाचा.	१. क्षुद्र व कोत्या मनाचा. संशयी.
२. परधर्मसहिष्णु–परधर्मीयांस ममतेनें वागविलें.	२. परधर्मअसहिष्णु. परधर्मीयांस क्रूरपणें वागविलें.
३. आपल्या हाताखालच्या लोकांवर विश्वास टाकला व त्यांच्याकडून मोठीं कामें करून घेतलीं.	३. आपल्या लोकांसंबंधीं अविश्वास दाखवून, त्यांना सांगकामे बनविलें.
४. राज्याची शक्ति व संपत्ति साम्राज्याच्या अभिवृद्धीकरितां खर्चिली.	४. राज्याची शक्ति व संपत्ति केवळ इस्लामाच्या वाढीकरितां खर्च केली.
५. सर्वांस समानतेनें वागवून एकी वाढविली.	५. बेकी निर्माण केली.
६. प्रजेच्या सुखाकरितां अनेक सुधारणा केल्या	६. प्रजेच्या सुखाकडे लक्षच दिलें नाहीं.
७. सामोपचाराचें धोरण स्वीकारून सर्वांस वश करून घेतलें.	७. आपल्या प्रजेचा छळ करून लोकांचीं मनें आपल्याविरुद्ध केलीं.
८. आपल्या राज्यास साम्राज्याचें स्वरूप मिळवून दिलें.	८. राज्य मोडकळीस आणलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. व्यक्ति व राज्यकर्ता या नात्यानें औरंगजेबाची योग्यता सांगा. त्याच्या कारकीर्दीचा परिणाम सांगा.

२. रजपूत व हिंदू यांच्यासंबंधीं औरंगजेबानें कोणतें धोरण स्वीकारलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

३. मराठे व रजपूत यांच्याशीं औरंगजेबानें युद्धें कां केलीं ? त्यांत त्याला अपयश कां आलें ? त्याचा त्याच्या राज्यावर काय परिणाम झाला ?

४. औरंगजेब व अकबर यांचा स्वभाव व धोरण यासंबंधीं तुलना करून त्यांच्यापैकीं तुम्हांस श्रेष्ठ कोण वाटतो तें सप्रमाण सांगा.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
जिझिया, सतनामींचें बंड, शिखांचा छळ, हिंदूंचा छळ, मीरजुम्ला, नानक.

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
शायिस्तेखान, गोकुळ जाट, सुवर्णमंदिर, तेजबहादूर, गोविंदसिंग, राजसिंह, दुर्गादास, शिवाजी, संभाजी, अकबर, राजा जयसिंह, छत्रसाल, चंपतराय, दिलेरखान.

७. औरंजेबानें दक्षिणेवर कां स्वारी केली ? त्या युद्धांत त्याला अपयश कां आलें ?

उतारे

१. औरंगजेबाचे अंतकाळचे विचार १७०७.

मीं केलेल्या पापकृत्यांचा वांटेकरी कोण होणार ? मीं आपला आत्मा अनेक दुष्कृत्यांनीं अत्यंत मलिन केला आहे. जिकडे जिकडे मीं पाहातों तिकडे तिकडे मला ईश्वरी साक्षात्कार दिसतात. माझ्या सैन्याचें, बाजारबुणग्यांचें आणि माझ्या पोटाचें आतां कसें होईल, ही जी मला चिंता आहे तिचा उपयोग काय ? हाय हाय ! कोण हा दुर्वह लोभ आणि मायापाश ! माझी दशा काय होईल तें मला कांहींच कळत नाहीं ! माझी कंबर जणूं काय मोडून गेली; माझे पाय केवळ तुटल्यासारखे होऊन मला चलनवलन करण्याचीदेखील शक्ति राहिली नाहीं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जो श्वास जातो तो बरा गेला, असें प्रतिनिश्वासाला वाटत आहे ! मीं बहुत पातकें व घोर कृत्यें केलीं; त्यांबद्दल ईश्वर मला काय शासन करील हें समजत नाहीं ! आतां माझे पश्चात् माझ्या सैन्य, शिबंदी वगैरेचा माझे मुलांनीं बंदोबस्त ठेवावा........आपल्या कुटुंबांतील किंवा दरबारांतील लोकांस वाईट रीतीनें वागवूं नकोस. आपले हेतु व उद्देश सिद्धीस न्यावयाचे म्हटले म्हणजे सभ्यता व युक्ति यांनींच तुझें काम होईल. अंथरूण पाहून पाय पसरावे. आपल्या शक्ती-प्रमाणेंच एखादें काम करण्यास हात घालावा......मजविषयीं तुझा भलताच कांहीं ग्रह होऊं देऊं नकोस. तुला मी जें दुःख दिलें, त्याचा आतां हिशेबच नाहीं.

—औरंगजेबाचें कामबक्षास पत्र.

प्रश्न :—१. कोणत्या गोष्टी औरंगजेबास असह्य होत होत्या ? कां ?

२. त्यानें कामबक्षास कोणता उपदेश केला ?

२. जिझिया न्याय्य आहे काय ?

...वस्तुतः पाहतां, आपण हिंदु लोकांवर जो कर बसवून त्यांजपासून पैसे उकळतां तो केवळ अन्याय आहे. खऱ्या राज्यकर्तृत्वाच्या आणि नीतीच्या बाहेर हें जुलमी कृत्य होत आहे. याच्या योगानें देशाला दारिद्र्य मात्र येण्याचें चिन्ह दिसत आहे. पूर्वीच्या या देशांतील बादशाहीचा लौकिक व न्यायानुवर्तन हीं सफै बुडविण्याचा आपला क्रम दिसत आहे. आपल्याला धर्माचा इतका अभिमान होता तर आपण अशा प्रकारचे कर प्रारंभापासूनच एकदम लोकांवर बसवायचे होते. मोठी आश्चर्याची गोष्ट कीं आपल्या दरबारांतील एकाही मंत्र्यानें आपल्याला योग्य मसलत दिली नाहीं. आतां आपले जे कोण हितेच्छु असतील त्यांना बरोबर घेऊन चला. म्हणजे एकट्या आपल्यावर आपल्याच या मनस्वी-पणाचीं संकटें कोसळणार नाहींत.........

—राजसिंहाचें औरंगजेबास पत्र.

प्रश्न :—१. जिझिया कर अन्याय्य होता, असें राजसिंह कां म्हणत होता ?

२. त्यापासून तोटा काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. शहाजादा अकबर याचें औरंगजेबास पत्र—१७०३.

बाबा, तुमचेंच उदाहरण मीं नेहमीं डोळ्यांपुढें ठेविलें आहे. ज्या रजपुतांनीं अकबर, जहांगीर, शहाजहान यांस मनापासून साह्य केलें त्यांचा आश्रय मीं केला यांत वाईट काय केलें ?...रजपूत लोक आपल्या राज्याचे खांब होते. पूर्वी फौजेंत रजपूत पाहिजे असले म्हणजे एकाचे ठिकाणीं शंभर उमेदवार येत. हल्लीं तुम्हीं तीन तीन वर्षें डांगोरा पिटूनसुद्धां दहापांच माणसें जमा होत नाहींत ! हा प्रभाव कशाचा ? आज तुमचे इतके अंमलदार आहेत, पण एकाची तरी तुमच्यावर खरी भक्ति आहे काय ? फौजेंतील लोक दरिद्री झाले आहेत. कोणापाशींही हत्यार नाहीं. एकही कवि-ग्रंथकार निपजत नाहीं. व्यापाऱ्यांची व धनिकांची लूट होते. रयत धुळीस मिळाली. (दक्षिणचा स्वर्गतुल्य प्रदेश) हल्लीं ओसाड, निर्जन व निर्धन झाला आहे. तुम्हीच सांगा ह्या सर्वांचें कारण काय ? तर तुमचा धर्मद्वेष. तुम्हीं हिंदूंवर जिझिया बसविला. त्यानें सर्व लोक तुमच्यावर उठले; जाळपोळ व लूट करूं लागले. त्यानेंच देश धुळीस मिळाला.

तुमच्या राज्यांत एक तरी असा प्रकार आहे काय कीं, त्याची मी तारीफ करावी ? थोर थोर पुरातन घराणीं धुळीस मिळालीं. सर्वत्र लुच्चांचा बाजार भरला आहे. राज्यकारभार सर्व हलकट लोकांच्या हातीं आहे. हातांत जपमाळ, काखेंत कुराण आणि डोक्यास मोठेंसें पागोटें असलें म्हणजे तुमचा त्याच्यावर पूर्ण भरंवसा. अशी मंडळी तुमच्या राज्याचे आधारस्तंभ !......मींच परत येऊन राज्य करावें म्हणतां, त्यास तुम्ही राज्य सोडून मक्केस चालते व्हा म्हणजे मी येऊन दाखवितों कसें राज्य करावयाचें तें. आजपर्यंत काय करामत करावयाची ती तुम्हीं करून दाखविलीत. आतां वृद्धापकाळीं परमार्थसाधनच तुम्हांस योग्य आहे.

प्रश्न :—१. अकबर आपल्या बापावर कां चिडला होता ? त्याला कशाचें वाईट वाटत होतें ? औरंगजेबाच्या कारभाराचा कोणता परिणाम झाला होता ?

४. औरंगजेबाचें धोरण

औरंगजेब कांहींएक तंत्रें मनीं धरून राज्य करतो. तो इराणी अगर मोंगल लोकांस सरदारक्या देऊन आपल्या विश्वासांत घेतो परंतु त्यांच्या जहागिरीपासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यंत दूर अशा प्रांतांवर त्यांची तो नेमणूक करतो. असें असलें तरी त्यांच्या-वर त्याचा नेहमीं विश्वास असेच असें नाहीं. कारण त्यांच्याजवळ फौज किंवा अमूप पैसा असल्यास त्यांची त्याला नेहमीं भीति वाटे. तेव्हां त्यांच्या जोरावर त्यांनीं जबरदस्त होऊन आपल्या नोकरींतून मुक्त होऊं नये, म्हणून तो त्यांच्या बायका-मुलांस आपल्या दरबारीं ओलीस म्हणून मुद्दाम ठेवून घेत असे. सरदार जहागिरीवर असोत, प्रांताचा कारभार चालवोत किंवा युद्धांत गुंतलेले असोत, त्यांचीं बायका-मुलें दरबारीं असावयाचीं. आपल्या कामांतून ते मुक्त होऊन आले तर त्यांचें स्वतःचें असें त्यांच्याजवळ कांहींच नसावयाचें. मात्र युद्धाच्या वेळीं शत्रुसैन्याला अगर लोकांना बुचाडून अगर खोटे हिशोब ठेऊन त्यांनीं जो कांहीं कुणगा केला असेल तो त्यांच्यापाशीं राही. दुर्दैवानें बादशहाच्या कानीं त्यासंबंधीं गोष्टी गेल्याच तर तो सर्व त्यांस बादशहास द्यावा लागे.

—डॉ. फ्रायरच्या वृत्तांतावरून.

प्रश्न :—१. औरंगजेब आपल्या सरदारांस कसें वागवी? त्यांच्यावर त्याचा विश्वास कां नसे? त्यांनीं आपल्यावर उलटूं नये म्हणून बादशाह कोणता उपाय योजी?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१६५८–१७०७.

हिंदुस्थान	महाराष्ट्र	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
औरंगजेब १६५८–१७०७	**शिवाजी** १६३०–८०		**दुसरा चार्ल्स** १६६०–८५	**चौदावा लुई** १६४३–१७१५ शहाजी, शिवाजी, बाजीप्रभू
मीरजुम्लाचा मृत्यु		१६६३		
	आग्र्याहून सुटका	१६६६		डॅन्बी
	सिंहगड काबीज	१६७०	डोव्हरचा तह	थोर पीटर
सतनामींचें बंड		१६७२		
	शिवाजीस राज्याभिषेक	१६७४	इंग्लंडच्या बँकेची स्थापना	मिल्टन
जिझिया बसविला		१६७९	व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा	
	शिवाजीचा मृत्यु	१६८०	व्हिग व टोरी	
दक्षिणेची स्वारी १६८२–१७०७	**संभाजी** १६८०–८९			
विजापूर गोवळकोंडा नष्ट		१६८६–८७	**दुसरा जेम्स** १६८५–८८	
	संभाजीचा वध	१६८९	उज्ज्वल राज्यक्रांति १६८८	संताजी
	राजाराम १६८९–१७००		**तिसरा विल्यम** १६८९–१७०२	धनाजी
जिंजी काबीज		१६९८		रामचंद्रपंत प्रल्हाद निराजी
	दुसरा शिवाजी १७००–१७०८		ॲन १७०२–१७१४	मॉटेग
औरंगजेबाचा मृत्यु		१७०७	इंग्लंड-स्कॉटलंड एकीकरण	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३१. बहादुरशाह ते मोहंमदशाह

१. बहादुरशहास राज्यप्राप्ति (१७०७) :—औरंगजेबाला मोअज्जम, आजम, अकबर व कामबक्ष असे चार पुत्र होते. त्यांपैकीं अकबर हा मराठ्यांची मदत न मिळाल्यानें इराणांत गेला होता. तेथेंच तो सन १७०४ मध्यें मरण पावला. राहिलेल्या तिघांनीं आपलें राज्य वांटून घ्यावें अशी औरंगजेबाची इच्छा होती. औरंगजेबाच्या मृत्यूसमयीं मोअज्जम काबुलास, कामबक्ष विजापुरास व आजम हा बादशहाजवळ होता. तेव्हां आजमनें बापाच्या मृत्यूनंतर आपल्या नांवानें द्वाही फिरवून जुल्फकारखानासह दिल्लीकडे कूच केलें. त्याचवेळीं मराठ्यांत भांडणें लावण्याकरितां बादशाही कैदेंत असलेल्या शाहूची सुटका करून त्याला त्यानें महाराष्ट्रांत पाठवून दिलें. पुढें तो दिल्लीकडे जात असतां मोअज्जम त्याच्यावर चाल करून आला. आग्र्याजवळ मोठें युद्ध होऊन आजम मारला गेला. तेव्हां मोअज्जमनें 'बहादुरशाह' हें नांव स्वीकारून बादशाही पद धारण केलें. पुढें सन १७०८ मध्यें त्यानें दक्षिणेंत असलेल्या कामबक्षावर चाल केली. लढाईंत कामबक्ष मेला. त्यामुळें बहादुरशहाची सत्ता स्थापन झाली. जुल्फकारखान त्यास शरण गेला. त्यास त्यानें स्नेहानें वागविलें. दाउदखान पन्नी यास त्यानें दक्षिणच्या सुभ्यावर नेमलें. बहादुरशाहनें रजपुतांशीं समेट करून त्यांस जिझिया कराची माफी केली.

२. शिखांशीं युद्ध :—बहादुरशहाच्या वेळीं बंदा हा शिखांचा पुढारी झाला. गुरु गोविंदसिंग याचा मोंगलांनीं छळ केला होता. त्याबद्दल शिखांनीं भयंकर सूड उगविण्याचें ठरवून शहरेंच्याशहरें कापून काढलीं, अनेक मशिदी फोडल्या, प्रेतें उकरून काढून तीं पशूंस खावयास दिलीं व अनेक मुल्लांस ठार केलें ! तेव्हां दक्षिणेंतून आल्यावर बहादुरशहानें शिखांवर चाल केली. बंदा याला त्यानें पिटाळून लावलें. तरीही शिखांचा उपद्रव थांबला नाहीं. त्यांचा मोड करीत असतांच बहादुरशहा सन १७१२ मध्यें मरण पावला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. जहांदरशाह (१७१२-१३):—बहादुरशहाच्या मृत्यूनंतर त्याच्या चार मुलांत गादीबद्दल पुन्हां यादवी माजली. जुल्फकारखान त्यावेळीं फार प्रबळ होता. त्याच्या मदतीनें सर्व भावांची वाट लावून मोहज्जुद्दीन हा 'जहांदरशाह' हें नांव धारण करून बादशाह झाला. मात्र तो नांवाचाच राहिला; कारण सर्व सत्ता जुल्फकारखान व त्याचा बाप सादतखान यांच्या हातीं होती. जहांदरशाह दुर्वर्तनी व क्रूर होता. त्यामुळें त्याचे सरदार असंतुष्ट होते. या गोष्टीचा फायदा घेऊन जहांदरशहाचा पुतण्या फर्रुखसियर यानें बिहारचा सुभेदार हुसैन व अलाहाबादचा अबदुल्ला या सय्येद बंधूंची मदत घेतली व तो आग्र्यावर चालून गेला. सन १७१२ मध्यें लढाई होऊन जहांदरशहाचा मोड झाला. तेव्हां तो पळून गेला. मात्र जुल्फकारखान फर्रुखसियरला मिळाला. त्यामुळें फर्रुखसियरनें बादशाही धारण केली. चिन्किलीजखानानें राज्यप्राप्तीच्या वेळीं त्याला फार मदत केली. म्हणून त्याला 'निजामुल्मुल्क' व 'आसफजाह' असे किताब त्यानें दिले. पुढें जहांदरशाह व जुल्फकारखान यांचा खून झाला (१७१३).

जहांदरशहाचा दरबार

४. फर्रुखसियर (१७१३-१९):—फर्रुखसियरनें प्रथमतः शिखांचा मोड करण्याचें ठरविलें. पंजाबांत शिखांनीं फारच धुमाकूळ माजविला होता. तेव्हां मोंगल सेनापति अब्दुस्समद यानें पंजाबांत जाऊन शिखांचा मोड केला व त्यांचा गुरु बंदा याला कैद केलें. पुढें बंदाच्या समक्ष त्याच्या सहकाऱ्यांची कत्तल करण्यांत आली व बंदासही हालहाल करून ठार मारण्यांत आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यामुळें शिखांची कंबर खचली व त्यांनीं पुढें बरींच वर्षें बादशहास त्रास दिला नाहीं. औरंगजेबाच्या वेळीं जाट लोकांचा उदय झाला होता. त्यावेळीं चूडामण जाट हा जाटांचा राजा होता. त्यानें आपली सत्ता बरीच वाढवून दिल्ली ते चंबळा नदीपर्यंत आपलें राज्य स्थापिलें. यामुळें रजपुतांशींही त्याचे झगडे होऊं लागले होते. फर्रुखसियरनें जयपूरचा राजा सवाई जयसिंह यास जाटांचा मोड करण्यास सांगितलें. तेव्हां चूडामणानें सय्येद बंधूंच्या मदतीनें जयसिंहास पिटाळून लावलें. सय्येद बंधूंनीं राज्य प्राप्तीच्या वेळीं फर्रुखसियरला मदत केली होती. त्यामुळें त्यांचें वजन पुष्कळच वाढलें होतें. सय्येद अबदुल्ला हा बादशहाचा वजीर व हुसैन सेनापति होता. ते दोघेही कर्तबगार असल्यानें बादशाह मात्र नामधारी बनला.

फर्रुखसियर

५. रजपुतांशीं युद्ध :—बहादुरशहानें रजपुतांशीं स्नेह केला होता. त्यावेळीं सर्व रजपूत राजांत एकोपा निर्माण करण्याचा प्रयत्न रजपुतांनीं केला. उदेपूर, जोधपूर, जयपूर वगैरेंच्या राजांनीं सन १७१० मध्यें एक तह करून मुसलमानांस आपल्या मुली देऊं नयेत व उदेपूरच्या घराण्यानें इतर रजपुतांस आपल्या मुली द्याव्या असें ठरविलें. यानंतर जोधपूरचा राणा अजितसिंह राठोड हा मोंगलांविरुद्ध उठला. तेव्हां हुसैनअल्ली रजपुतांवर चालून गेला. तेव्हां पडतें घेऊन अजितसिंहानें त्याच्याशीं मैत्री केली. एवढेंच नव्हे तर आपली मुलगी राणी इंद्रकुमारी ही बादशहास देऊं केली. त्यावेळीं फर्रुखसियर आजारी होता. त्याला इंग्रज वैद्य हॅमिल्टन यानें काळपु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ळीच्या आजारांतून बरें केलें. त्यामुळें खूष होऊन बादशहानें इंग्रजांच्या ई. इं. कंपनीस अनेक व्यापारी सवलती व बंगाल्यांतील ३८ गांवें दिलीं. दुखण्यांतून बरें झाल्यावर फर्रुखसियरनें अजितसिंहाच्या मुलीशीं मोठ्या थाटानें लग्न केलें.

६. फर्रुखसियरचा वध (१७१९):—हुसैन व अबदुल्ला या सय्येद बंधूंचा बादशहास फार कंटाळा येऊं लागला. तेव्हां त्यांच्या त्रासांतून मुक्त होण्याकरितां त्यानें हुसैनअलीस दक्षिणच्या सुभेदारीवर सन १७१५ मध्यें पाठविलें. दक्षिणेंत येतांच त्याचा मोड करावा असा दक्षिणचा सुभेदार दाऊदखान यास बादशहानें गुप्त निरोप पाठविला होता. त्याप्रमाणें त्या दोघांत गुजराथमध्यें लढाई झाली. त्यांत दाऊदखान पन्नी मारला गेला. त्यामुळें हुसैनअली दक्षिणचा सुभेदार झाला. खंडेराव दाभाडे हा मराठ्यांचा सेनापति खानदेशांत होता. त्याला बादशहानें हुसैनअलीविरुद्ध चिथावणी दिली. तेव्हां हुसैननें खुद्द शाहूशीं संगनमत केलें व मराठ्यांचा दक्षिणच्या सुभ्यावरील हक्क मान्य करून त्यांस संतुष्ट केलें. हें कळतांच बादशाह चिडून गेला; व तो उघडपणें सय्येद बंधूंस विरोधूं लागला. शिवाय त्यानें जयपूरचा राणा जयसिंह, निजामुल्मुल्क व बिहारचा सुभेदार सरबुलंदखान यांची मदत मिळविली. हें कळतांच अबदुल्लानें हुसैनास दक्षिणेंतून बोलाविलें. तेव्हां मराठ्यांचा पेशवा बाळाजी विश्वनाथ यास ससैन्य आपल्या बरोबर घेऊन हुसैनअली दिल्लीस गेला. लगेच सय्येद बंधूंनीं बादशहास पदच्युत केलें, त्याचे डोळे काढले व त्याला विष देऊन ठार मारलें!

सय्येद अब्दुल्ला

त्यानंतर त्यांनीं लागोपाठ दोन राजपुत्रांस गादीवर बसविलें; परंतु ते थोड्याच दिवसांत वारल्यानें त्यांनीं बहादुरशहाच्या नातवास 'मोहंमदशाह'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें नांव देऊन गादीवर बसविलें. या सर्व गोष्टींमुळें सय्येद बंनूंस 'राजे बनविणारे' असें लोक म्हणूं लागले.

मोहंमदशाह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. मोहंमदशाह (१७१९–४८):—मोहंमदशहाही नामधारी राजा होता. सय्येद बंधूंशीं तो नमून वागे. त्याच वेळीं सय्येद बंधूंनीं बाळाजी विश्वनाथास त्याच्या मदतीचा मोबदला म्हणून स्वराज्य व चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा दिल्या. सय्येद बंधूंनीं मराठ्यांस सनदा दिल्या हें अनेक मुसलमान सरदारांस पसंत पडलें नाहीं. त्यामुळें त्यांचा नक्षा उतरविण्याचा त्या सरदारांनीं घाट घातला. त्याचवेळीं निजामुल्मुल्क दक्षिणेंत स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या उद्योगास लागला होता. त्यानें सन १७२० मध्यें बाळापूरच्या लढाईत सय्येदांचा पुतण्या आलमअली याचा वध केला. हें समजतांच हुसैनअली बादशहासह त्याचा मोड करण्याकरितां निघाला. परंतु वाटेंतच त्याचा सन १७२० मध्यें वध झाला. तेव्हां अबदुल्ला बादशहावर चालून आला; परंतु त्याचा मोड होऊन जखमी स्थितींतच तो बादशहाच्या हातीं लागला. अशा रीतीनें सय्येदांचा मोड झाल्यावर त्या कामीं पुढाकार घेणारा मोहंमद अमीनखान बादशहाचा वजीर झाला. पुढें सन १७२२–२४ पर्यंत निजामुल्मुल्क दोन वर्षें बादशहाचा वजीर होता. परंतु बादशहाशीं त्याचें पटलें नाहीं. तेव्हां दक्षिणेंत येऊन सन १७२४ मध्यें त्यानें आपलें स्वतंत्र राज्य हैदराबाद येथें स्थापलें.

८. मराठ्यांची सरशी:—त्यावेळीं गुजराथची व माळव्याची सुभेदारी निजामाकडे होती. ती काढून घेऊन बादशहानें गुजराथेवर सरबुलंदखान व माळव्यावर राजा गिरिधरदास नागर यांची स्थापना केली. त्यावेळीं मराठ्यांच्या स्वाऱ्या त्या दोन्ही प्रांतांवर होऊं लागल्या होत्या. तेव्हां सरबुलंदखानानें गुजराथची चौथाई व सरदेशमुखी देण्याचें कबूल करून सन १७२४ मध्यें बाजीरावाशीं तह केला. या कामीं मराठ्यांचे सरदार कंठाजी कदमबांडे व पिलाजी गायकवाड यांनीं चांगली कामगिरी बजावली होती. परंतु सरबुलंदखानाची योजना बादशहास पसंत पडली नाहीं. तेव्हां त्याची उचलबांगडी होऊन सन १७३२ मध्यें जोधपूरचा अभयसिंह गुजराथचा सुभेदार झाला. परंतु त्याला मराठ्यांनीं नामोहरम करून गुजराथ प्रांत घेतला. त्याचवेळीं मराठ्यांनीं माळव्यावर स्वाऱ्या करून राजा गिरिधरदास यास हैराण करून टाकलें. तेव्हां त्याच्या जागीं मोहंमदखान बनगिश माळव्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुभेदार झाला. त्यानें बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याच्यावर स्वारी केली. तेव्हां त्याला मदत करण्याकरितां बाजीराव बनगिशावर चाल करून गेला; व त्याचा त्यानें पराभव केला. या मदतीकरितां छत्रसालानें बाजीरावास आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा दिला. माळव्याची चौथाईही मराठ्यांस मिळूं लागली. या सर्व गोष्टींमुळें बादशहास मराठ्यांचा फार धाक वाटूं लागला; व त्यामुळें त्यानें माळव्याची व्यवस्था मराठ्यांकडे सोंपविली. त्याकरितां शिंदे व होळकर हे मराठे सरदार अनुक्रमें उज्जयिनी व इंदूर येथें राहूं लागले.

९. मराठे व निजाम यांची स्पर्धा :—यानंतर खुद्द दिल्लीवर चाल करून जाण्याचें बाजीरावानें ठरविलें. त्याप्रमाणें मोठी तयारी करून तो ग्वाल्हेरपर्यंत गेला. त्याला तोंड देण्याकरितां खानदौरान, अयोध्येचा सुभेदार सादतखान वगैरेंनीं जूट केली. परंतु त्यान बाजीरावास पायबंद न बसतां तो आग्र्यापर्यंत गेला. मल्हारराव होळकर व सटवाजी जाधव हे यमुनेपार जाण्याकरितां प्रयत्न करीत होते. त्यांना सादतखानानें रोखलें. हें समजतांच बाजीरावानें जरा मागें हटल्यासारखें दाखविलें. तेव्हां बादशाही फौजा त्याच्यावर चालून आल्या. त्यांस जरा अंगावर घेऊन, बाजीरावानें त्यांस एकदम झुकांडी दिली व तो एकाएकीं दिल्लीवर चालून गेला. त्यामुळें दिल्ली शहरांत आकांत उडाला. मराठ्यांनीं मोंगलांस सतावून सोडलें व त्यांचे अनेक लोक कापून काढले. त्यामुळें बादशहानें बाजीरावाशीं तहाचें बोलणें सुरू केलें. माळव्याची सनद व दक्षिणेंतील निजामाच्या राज्याच्या वसुलावर दोन टक्के चौथाई देण्यास बादशाह कबूल झाला. परंतु बाजीराव तेवढ्यानें संतुष्ट झाला नाहीं. दिल्लीकडील या घडामोडी डोळ्यांत तेल घालून निजाम पहात होता. तेव्हां अशा आणीबाणीच्या प्रसंगीं निजाम बादशहास मदत करण्याकरितां मोठ्या सैन्यासह उत्तरेकडे निघाला. दरम्यान बाजीराव दक्षिणेकडे निघून आला होता. त्यावेळीं निजाम दिल्लीस पोंचला. तेथें त्याचा बादशहानें मोठा गौरव केला. त्यानंतर निजाम माळव्याकडे येऊं लागला. हें वृत्त कळतांच बाजीराव निजामाचें पारिपत्य करण्याकरितां उत्तरेंत निघाला. भोपाळ येथें निजाम व बाजीराव यांची गांठ पडून मोठी निकराची लढाई झाली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१७३८). त्यांत निजामाचा पूर्ण पराभव झाला. तेव्हां सिरोंज येथें निजामानें बाजीरावाशीं तह करून माळव्याची सनद व नर्मदा व चंबळा यांच्यामधील मुलूख बादशहाकडून मराठ्यांस देवविण्याचें आश्वासन दिलें.

१०. नादिरशहाची स्वारी (१७३९):—या सर्व घडामोडींमुळें बादशाही कमजोर झाली. हें समजतांच इराणचा शहा नादिरशहा यानें हिंदुस्थानावर सन १७३९ मध्यें स्वारी केली. नादिरशहा अत्यंत गरीब अशा धनगर घराण्यांत जन्मला होता. तो निधड्या छातीचा असल्यानें त्यानें इराणांत बंडाळी चालू असतांच शहास पदच्युत करून तेथील गादी बळकावली होती. सन १७३७ मध्यें अफगाणिस्थानांतही त्यानें आपली सत्ता स्थापिली होती. पुढें प्रसिद्धीस आलेला अहमदशहा अब्दाली त्याच्या पदरीं सैन्यांत होता. दिल्लीस अव्यवस्था माजल्याचें नादिरशहास कळलें होतें. तेव्हां दिल्लीची लूट करावी म्हणून त्यानें हिंदुस्थानावर चाल केली. तो थेट दिल्लीवर चालून गेला. त्यावेळीं निजामुल्मुल्क, अयोध्येचा सुभेदार सादतखान, खानदौरान वगैरे लोकांनीं नादिरशहास विरोध केला. परंतु खानदौरान मारला गेला, सादतखान शत्रूच्या हातीं लागला व इतरांची दाणादाण झाली. शेवटीं निजाम व बादशाह यांनीं नादिरशहाची भेट घेतली व ते सर्व दिल्लीस गेले. परंतु त्यानंतर दोन-तीन दिवसांनीं नादिरशहाच्या मृत्यूची हूल उठून दिल्लींत कापाकापी सुरू झाली. तेव्हां नादिरशहानें दिल्लीची लूट करण्याचा व त्या शहरांतील लोकांची कत्तल करण्याचा हुकूम सोडला. लगेच त्याच्या सैनि-

नादिरशहा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांनीं दिल्ली लुटून फस्त केली व असंख्य लोकांची अत्यंत क्रूरपणें कत्तल केली. त्यावेळीं तीस हजार लोक मारले गेले ! त्यामुळें दिल्लींत प्रेतांचे ढीग रचले गेले व रक्तांचे पाट वाहूं लागले !! ही बातमी कळतांच बादशाह नादिरशहास शरण गेला व ती कत्तल थांबविण्याची त्यानें त्याला विनंति केली. शेवटीं रत्नजडित सिंहासन, कोहिनूर हिरा, पंधरा कोट रुपये रोख व पन्नास कोटींचा ऐवज नादिरशहानें घेतला व मोहंमदशहास गादीवर बसवून तो आला तसा परत गेला. पुढें सन १७४७ मध्यें त्याचा खून झाला. त्याच्यानंतर अफगाणिस्थान प्रांत जिंकून घेऊन अहमदशहा अब्दाली अफगाणिस्थानचा अमीर झाला. नादिरशहाच्या स्वारीनें मोंगल बादशाही जास्तच कमजोर झाली व बादशाही सुभेदार स्वतंत्र होऊं लागले. मोंगल सरदारही बादशहाचें सार्वभौमत्व झुगारून देऊन स्वतंत्र झाले व गुजराथ, माळवा व वऱ्हाड या प्रांतांत मराठ्यांची सत्ता दृढमूल झाली.

११. अब्दालीची पहिली स्वारी (१७४८) :—नादिरशहाच्या स्वारीनंतर बंगाल, अयोध्या व दक्षिण येथील सुभेदार स्वतंत्रपणें राज्य करूं लागले होते. शिवाय मराठे, जाट, शीख वगैरेंच्या चढाईमुळेंही बादशाही कमजोर झाली होती. अशा संधीस सन १७४८ मध्यें अफगाणिस्थानचा नवा अमीर अब्दाली यानें हिंदुस्थानवर पहिली स्वारी केली. तेव्हां बादशहानें आपला मुलगा अहमद याला त्याच्यावर पाठविलें. सरहिंद येथें बादशाही फौजेनें अब्दालीचा पराभव केला. त्यामुळें अब्दालीला परत जावें लागलें. पुढें सरहिंदच्या लढाईत मेलेल्या कम्रुद्दीनखान वजीराचा मुलगा मीरमन्नू पंजाबचा सुभेदार झाला.

१२. मोहंमदशहाचा मृत्यु (१७४८) :—यानंतर सन १७४८ मध्यें बादशाह मोहंमदशाह मरण पावला. त्याच वर्षीं निजामुल्मुल्कही मरण पावला. मोहंमदशाह कर्तबगार नसल्यानें त्याच्या कारकीर्दींत मोंगल बादशाही अत्यंत कमजोर झाली. सन १७४८ हें साल हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें समजलें जातें. कारणें अशीं. (१) अहमदशहा अब्दालीच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या. (२) मराठ्यांचा राजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाहू सन १७४९ मध्यें वारल्यानें मराठेशाहीचा सर्वाधिकार पेशव्याकडे आला. त्यामुळें मराठेशाहीस नवें वळण लागूं लागलें. (३) इंग्रजांनीं कर्नाटक व बंगाल या प्रांतांत आपली सत्ता पसरण्यास सुरुवात केली. (४) निजामुल्मुल्क व मोहंमदशाह वारला. त्यामुळें मोंगलांचा ऱ्हास होऊं लागला; व मोंगल सरदार स्वतंत्र होऊं लागल्यानें बादशाहीचीं छकलें होऊं लागलीं.

अ भ्या स

१. मोंगल बादशाहीच्या पडत्या काळांत मराठ्यांनीं मोंगलांवर केलेल्या हल्ल्यांचें वर्णन करा.

२. सय्येद बंधू कोण होते ? त्यांचीं कारस्थानें सांगा. मराठ्यांनीं त्यांस केव्हां व कशाकरितां मदत केली ? सय्येदांचा मोड कसा झाला ?

३. नादिरशहा व अब्दाली यांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या कां केल्या ? त्यांच्या स्वाऱ्यांचा बादशाहीवर काय परिणाम झाला ?

४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—

सन १७४८, भोपाळची लढाई, अब्दालीची स्वारी, नादिरशहाची स्वारी, जुल्फकारखान.

५. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—

दाऊदखान पन्नी, मीरमन्नू, जुल्फकारखान, आसफजाह, बंदा, सरबुलंदखान, गिरिधरदास, चूडामण, हॅमिल्टन, खंडेराव, बाळाजी विश्वनाथ, छत्रसाल, इंद्रकुमारी, अमीनखान.

उतारे

१. नादिरशहाच्या स्वारीचा दिल्लीवर परिणाम

एकेकाळीं सर्व सुखानुभव घेणाऱ्या त्या दिल्ली शहराच्या लोकांच्या दुःखानुभवाची यावेळीं अगदीं कमाल झाली ! ह्या वेळेपर्यंत दिल्लींत चोहोंकडे कत्तली चालल्या होत्या ! परंतु आतां पृथक् पृथक् व्यक्तिसंहार सुरू झाला ! प्रत्येक घरीं दुःखाक्रोश व रडारड ऐकूं येई. पुष्कळांनीं विष प्राशन करून आपलें आयुष्य संपविलें ! अधिकारी लोकांची दैना आणि अपमान तर कांहीं विचारूंच नका. दिल्लीच्या मुख्य फौजदारास रस्त्यांत उभें करून फाड फाड जेरबंदाचे फटके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मारले; आणि इतर बादशाही अंमलदारांस निर्दयपणें वाटतील तसे चोप दिले. सर्व शहरांतील शांति व निद्रारूप विश्रांति नाहींशी झाली. शहरांत धान्याचा दुष्काळ पडला! जाडेभरडे तांदूळ रुपयास दोन शेर मिळण्याचीही पंचाईत पडूं लागली! तेव्हां ज्याला जसें मिळेल तसें त्यानें खावें असा क्रम सुरू झाला. त्यामुळें पटकीचा उपद्रव माजला. दररोज त्या आजारानें शहरच्या रस्त्यांतून मृत मनुष्यांची अगदीं दाटी दिसूं लागली. जिकडे तिकडे मनुष्यांच्या प्रेतांचे ढीग पडलेले दिसत. ज्या दिल्ली शहराच्या मोठमोठ्या राजवटींतून श्रीमान सौदागर, व्यापारी, धनिक व सावकार लोकांच्या रथांची व घोड्यांची गर्दी असल्यामुळें, जें शहर नेहमीं मनुष्यांनीं गजबजलेलें असावयाचें, त्या बादशाही राजधानीच्या नगरांत, भरदिवसां, कोल्हीं, कुत्रीं, काक, गृध्र यांनीं स्वस्थपणें मनुष्यांचीं प्रेतें फाडून कुजलेलें मांस खात बसावें! अशा स्थितींतही जे वांचले त्यांच्याकडून नादिरशहानें आणखी पांच कोट रुपये काढलेच!!

२. नादिरशहाचा जाहीरनामा—१७३९

आमचेमध्यें आणि आमचा प्रिय बांधव मोहंमदशाह यांच्यामध्यें समता झाली आहे. आम्ही दोघेही एकजीव—शरीरमात्र दोन—असे झालों आहोंत. आम्ही आपल्या प्रिय बांधवास त्याच्या विस्तृत राज्यावर पुन्हां संस्थापित करून, आम्ही दुसरे मुलूख जिंकण्यास जात आहोंत. तुम्हां सर्वांच्या पूर्वजांनीं ज्याप्रमाणें आमच्या या प्रिय बांधवाचे गादीला आजपर्यंत सर्व प्रकारचा मान दिला व त्या गादीची आज्ञा पाळिली, त्याचप्रमाणें ह्या तैमूरवंशीय आमच्या प्रियबांधवाचाही सर्वप्रकारें मान ठेवून त्याच्या आज्ञेंत तुम्ही असलें पाहिजे. यांत जर तुम्ही चुकाल किंवा हयगय कराल, आणि दंगा फिसाद केल्याबद्दलची बातमी आमचे कानांवर येईल, तर आम्ही सृष्टीच्या इतिहासाचे पत्रांतून तुमचें नांव खरवडून टाकण्यास कधींही कमी करणार नाहीं. म्हणजे तुम्ही जन्मास आलां होतां कीं नाहीं असें करून टाकूं.

प्रश्न :—१. नादिरशहाच्या स्वारीनंतर दिल्लीवर कोणत्या आपत्ति ओढवल्या?
२. नादिरशहानें जाहीरनामा कां लावला? कोणाकरितां?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३२. मोंगलशाहीची अखेर

१. अहमदशहा (१७४८–१७५४):—मोहंमदशहानंतर त्याचा मुलगा अहमदशहा बादशाह झाला. अयोध्येचा सुभेदार सफदरजंग हा त्याचा वजीर झाला व निजामाचा थोरला मुलगा गाजीउद्दीन सेनापति झाला. त्यावेळीं सफदरजंग व रोहिले यांच्यांत लढाई निर्माण झाली होती. रोहिले लोक मूळचे अफगाण होते. त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन लहान लहान राज्यें स्थापिलीं. ते कडवे सुन्नी पंथाचे होते. रोहिलखंड त्यांनींच स्थापिला. बरेली हें रोहिलखंडाचें मुख्य ठिकाण होतें. सन १७४४ मध्यें अली मोहंमद यानें सर्व राज्यें एकत्रित करून रोहिल्यांचें स्वतंत्र राज्य स्थापिलें. तो सन १७४९ मध्यें वारला. तेव्हां त्याचा अल्पवयी मुलगा राजा झाला. मात्र त्याचा कारभार दोंदेखान व हाफीज रहमतखान हे दोघे सरदार पहात. रोहिले लोक वजिराच्या अयोध्या प्रांतावर स्वाऱ्या करीत. तेव्हां सफदरजंगानें रोहिल्यांवर स्वारी केली. परंतु रोहिल्यांनीं त्याचा पराभव केला. तेव्हां सफदरजंगानें मराठे व जाट यांची मदत घेऊन रोहिल्यांचा पराभव केला. या मदतीबद्दल सफदरजंगानें मराठ्यांस दुआबांतील सोळा लक्षांचा मुलूख दिला व शिवाय जाट, रोहिले, अब्दाली वगैरे शत्रूंपासून बादशाहीचें संरक्षण करण्याकरितां मुलतान, पंजाब, राजपुताना व रोहिलखंड या प्रांतांच्या चौथाईची सनद दिली (१७५२). या करारामुळें मराठ्यांवर बादशाहीचें संरक्षण करण्याची जबाबदारी पडली. शिवाय रोहिले लोक त्यांचे कट्टे वैरी बनले.

२. अब्दालीची दुसरी स्वारी (१७५१):—रोहिल्यांशीं चाललेल्या युद्धांत सफदरजंग गुंतला असतांच अहमदशाह अब्दालीनें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली. त्यामुळें बादशाह मोठ्या पेचांत सांपडला. तेव्हां त्यानें लाहोर व मुलतान हे प्रांत अब्दालीस देऊन त्याचा स्नेह संपादन केला. आपल्या बादशहाचें हें कृत्य सफदरजंगास आवडलें नाहीं. पुढें त्याचें व सेनापति गाजीउद्दीन यांचें वाकडें आलें. त्यावेळीं दक्षिणेंतील निजामी मिळविण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां गाजीउद्दीन दक्षिणेंत जात असतां विषप्रयोग होऊन तो मरण पावला.

अहमदशाह दुराणी ऊर्फ अब्दाली

तेव्हां त्याचा मुलगा मीर-शेहाबुद्दीन ऊर्फ दुसरा गाजीउद्दीन बादशाहाचा सेनापति झाला. त्यानें मराठ्यांची मदत घेऊन सफदरजंगाचा पाडाव केला. तेव्हां वजिरी सोडून सफदरजंग अयोध्याप्रांतीं गेला. त्यामुळें मीरशेहा-बुद्दिनानें खानखानान यास वजिरी दिली.

३. जाट राजा सुर-जमल :—जाट राजा चूडामण यानें विषप्राशन करून सन १७२१ मध्यें प्राणत्याग केला होता. तेव्हां त्याचा पुतण्या बादनसिंह जाटांचा राजा झाला. त्यानें हिंदूंचा कैवार घेतला व आग्रा-मथुरा प्रांत आपल्या राज्यांत समाविष्ट केला. त्यानें सन १७५६ पर्यंत राज्य केलें. त्याचा पुत्र सुरजमल होय. तो शूर, धोरणी व कुशल होता. आपल्या बापाच्या वृद्धापकाळीं त्यानें सर्व राज्यकारभार चाल-विला होता. सन १७४९ मध्यें त्यानें मल्हारराव होळकर व मेवाडचा राणा यांचा पराभव केला होता. पुढें त्याचें व मल्हाररावाचें सूत जमलें. रोहिल्यां-विरुद्ध सफदरजंगास सुरजमलनें मदत केली होती. आपल्या बापाच्या मृत्यू-नंतर सुरजमल सन १७५६ मध्यें जाटांचा राजा झाला होता. अहमदशहाच्या वेळीं त्यानें अनेक उलाढाली केल्या. सफदरजंगानें त्याची अनेक वेळीं मदत घेतली होती. बादशाह जाटांस नेहमीं प्रोत्साहन देत असे; व मीरशेहाबुद्दि-नाविरुद्ध त्यांस चिथवी. हें कळतांच मीरशेहाबुद्दिनानें अहमदशहास पदच्युत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें व त्याचे डोळे काढले. तेव्हां त्यानें जहांदरशहाच्या एका मुलास 'दुसरा आलमगीर' हें नांव देऊन बादशाह केलें. त्याचवेळीं त्यानें बादशहाची वजिरीही आपल्याकडे घेतली. सन १७५४ मध्यें सफदरजंग वारला व त्याचा मुलगा सुजाउद्दौला अयोध्येचा सुभेदार झाला.

४. दुसरा आलमगीर (१७५४–१७५९) :—या सर्व घडामोडींत मीरशेहाबुद्दिनास दोंदेखान रोहिल्याचा जांवई नजीबखान रोहिला याची फार मदत झाली होती. शिवाय मराठेही त्यास मदत करीत. यामुळें सर्व उमरावांत व मोंगली फौजेंत असंतोष माजला होता. मीरशेहाबुद्दिनानें मराठ्यांची मदत घेतली हें मात्र नजीबखानास आवडलें नाहीं. तेव्हां त्यानें अब्दालीकडे संधान लावलें. सन १७५४ मध्यें मीरशेहाबुद्दिनानें पंजाबप्रांत जिंकून घेतला. हें शल्य अब्दालीस जाचत होतें. शिवाय दिल्लीसही मराठ्यांचें वर्चस्व वाढत होतें. ती गोष्ट अनेकांस पसंत न पडल्यानें दिल्लीस दोन तट पडले. मीरशेहाबुद्दीन व सुजाउद्दौला यांचा एक व दिल्लीचे मुसलमान व नजीबखान यांचा दुसरा. शेवटीं नजीबखानानें अब्दालीस बोलाविल्यानें त्यानें सन १७५७ मध्यें हिंदुस्थानावर तिसरी स्वारी केली. त्यावेळीं त्यानें बादशाह व मीरशेहाबुद्दीन यांस कैद केलें. हिंदूंचीं अनेक देवळें त्यानें उध्वस्त केलीं, नादिरशहापेक्षांही मोठी लूट जमा केली व लोकांचे अनन्वित छळ केले. यानंतर तैमूरशाह या आपल्या मुलास पंजाबचा कारभार सांगून तो स्वदेशीं परत गेला. यानंतर मीरशेहाबुद्दिनानें मराठ्यांची मदत घेऊन आपल्या विरोधकांचा नक्षा उतरविला. नजीबखानासही त्यानें बडतर्फ केलें. शेवटीं मराठ्यांचा पेशवा नानासाहेब यानें राघोबास त्याच्या मदतीकरितां पाठविलें. त्यानें मीरशेहाबुद्दिनाचा दिल्लीस जम बसवून दिला, तैमूरशहास पंजाबांतून घालवून देऊन अटकेपार मराठ्यांचे झेंडे रोविले व तो दक्षिणेंत परतला. राघोबाच्या विजयाची वार्ता कळतांच मुसलमानांचें धाबें दणाणलें. लगेच त्यांनीं अब्दालीस पुन्हां बोलाविलें. त्याप्रमाणें तो आला (१७५९). त्या वेळीं त्यानें दिल्ली घेतली. तेव्हां भांबावून जाऊन मीरशेहाबुद्दिनानें बादशाह दुसरा आलमगीर याचा खून केला (१७५९) व दुसऱ्या एका राजपुत्रास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गादीवर बसविलें. यानंतर तो स्वतः जाटांकडे पळून गेला. पुढें मराठ्यांनीं त्यास काल्पीस जहागीर दिली. तेथेंच तो सन १८०२ मध्यें मृत्यु पावला.

५. शाहआलम (१७५९–१८०६):—आलमगिराचा मुलगा अलीगोहर यानें 'शाहआलम' हें नांव घेतलें. आपल्या बापाच्या खुनाच्या वेळीं तो बिहारमध्यें होता. पुढें आपल्या बापाचा खून झाल्याचें वर्तमान त्याला कळलें. तेव्हां तो आपणास बादशाह म्हणवूं लागला (१७५९). इकडे मराठे व अब्दाली यांच्यांत पानिपत येथें मोठी लढाई होऊन मराठ्यांचा पराभव झाला (१७६१). या विजयानंतर अब्दाली परत गेला. मात्र शाहआलम यास त्यानें दिल्लीचें राज्य दिलें. सुजाउद्दौल्यास त्याचा वजीर व नजीबखानास सेनापति नेमलें. त्याचवेळीं प्लासीची क्रांतिकारक लढाई नुकतीच झाली होती (१७५७) व बंगाल्यांत इंग्रजांची सत्ता स्थापन झाली होती. पुढें मीरजाफर व मीरकासीम या बंगालच्या सुभेदारांस इंग्रजांनीं पदच्युत करून बंगाल प्रांतांत आपली सत्ता पूर्णपणें स्थापन केली होती. पदच्युत मीरकासीम इंग्रजांविरुद्ध मदत मिळविण्याकरितां सुजाउद्दौला व शाहआलम यांच्याकडे आला. तेव्हां त्या तिघांनीं इंग्रजांशीं बक्सार येथें लढाई दिली (१७६४). त्यांत इंग्रजांस विजय मिळाला. तेव्हां त्यांनीं सन १७६५ मध्यें अलाहाबाद येथें बादशहाशीं तह केला. त्या तहान्वयें बंगालची दिवाणी इंग्रजांस मिळून कोरा व अलाहाबाद हे अयोध्येच्या वजिराचे प्रांत बादशहास मिळाले. या सर्व उलाढाली चालल्या होत्या, तोंपर्यंत दिल्लीस जाण्यास बादशहास धीर झाला नाहीं. कारण तेथें नजीबखान रोहिला ठाणें मांडून बसला होता. त्याचा सुरजमल जाटानें एकदां पराभव केला होता. तेव्हां नजीबानें त्याच्यावर शस्त्र उपसून सुरजमलचा सन १७६३ मध्यें खून करविला.

६. मराठ्यांचा वरचष्मा :—पानिपतच्या युद्धांत मराठ्यांचा पराभव झाला तरी डगमगून न जातां त्यांनीं हळूहळू आपलें पूर्ववैभव गांठलें. त्यावेळीं महादजी शिंदे हा मराठ्यांचा मोठा मातबर सरदार उत्तरहिंदुस्थानच्या राजकारणांत भाग घेऊं लागला होता. त्यानें रोहिल्यांचा पाडाव केला; व दुआबांत मराठ्यांचा जम पुन्हां बसविला. फत्तेगड या किल्ल्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पानिपतवर सांपडलेली सर्व लूट नजीबखानानें सांठवून ठेवली होती. ही वार्ता कळतांच महादजीनें तो गड व ती लूट मिळविली. या कृत्यानें मराठ्यांची गेलेली अब्रू व त्यांचें वैभव त्यांस परत मिळालें. त्यानंतर महादजीनें दिल्लीवर स्वारी करून नजीबखानाचा पुरा सूड घेतला. यापूर्वींच सन १७७० मध्यें नजीबखान वारला. तेव्हां त्याचा मुलगा जाबेताखान दिल्लीचा कारभार पाहूं लागला होता. सन १७७१ मध्यें महादजी शिंद्याच्या मदतीनें शाहआलम बादशाह दिल्लीस गेला व तक्तावर विराजमान झाला. त्यामुळें सर्वांस आनंदीआनंद झाला. अशा तऱ्हेनें मराठ्यांचा अंमल दिल्लींत पुन्हां सुरू झाला. परंतु ही गोष्ट मुसलमानांस रुचली नाहीं. जाबेताखान बादशहाविरुद्ध दांडगाई करीतच होता. तेव्हां महादजी त्याच्यावर चालून गेला. पराभव झाल्यानें खान पळून गेला. मात्र त्याचा मुलगा गुलाम कादर व कुटुंबांतील इतर मंडळी बादशहाच्या हातीं लागली. पुढें मराठ्यांनीं जाबेताखानापासून दीड लक्ष रुपये खंडणी घेतली व ते स्वस्थ बसले.

७. महादजीस विरोध :— मध्यंतरीं नारायणराव पेशव्याचा वध झाल्यानें महादजी शिंदे पुण्यास आला. त्यावेळीं दिल्लींत अनंत घोटाळे माजले. बादशहाची बाजू अगदींच खचली. सन १७८२ मध्यें सालप्याच्या तहानंतर महादजी दिल्लीच्या राजकारणांत पुन्हां पडूं लागला. तेव्हां बादशहानें महादजीस दिल्लीचा कारभार सांगितला. तो त्यानें पेशव्याच्या नांवानें करण्यास सुरुवात केली. मात्र पेशव्यांकरितां त्यानें बादशहाकडून 'वकीले–मुत्लक' म्हणजे 'सर्वाधिकारी' हा किताब मिळविला. दिल्लीचा कारभार आपल्या हातीं येतांच महादजीनें अनेक मुसलमान सरदारांचे सरंजाम बंद केले. यामुळें ते त्याला विरोधूं लागले. रजपूतही त्यावर रुष्टच होते. त्यामुळें त्याला रजपुतांशीं युद्ध करावें लागलें. या युद्धाच्या वेळीं असंतुष्ट मुसलमान महादजीविरुद्ध उठले. तरीही तो डगमगला नाहीं. त्यानें ग्वाल्हेरचा किल्ला घेतला. पुढें बादशहाही त्याच्या विरोधी पक्षांत सामील झाला. हें कळतांच महादजीनें दिल्लीच्या कारभारांत तटस्थपणा स्वीकारला. त्यामुळें गुलाम कादरकडे बादशहानें दिल्लीची वजिरी व कारभार सोंपविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. गुलाम कादरचीं दुष्ट कृत्यें :—जाबेताखान रोहिला याचा गुलाम कादर हा मुलगा होय. तो अत्यंत क्रूर होता. बादशहाची गुप्त संपत्ति आपल्याला मिळावी म्हणून एक दिवस कांहीं पुंड व बदमाश यांसह तो राजवाड्यांत गेला; व बादशहाजवळ त्यानें पैशाची मागणी केली. बादशहाचें म्हणणें त्याला खरें वाटेना व तो मुद्दाम 'नाहीं' म्हणतों असें गुलामला वाटलें. तेव्हां त्यानें बादशाह, त्याच्या राण्या व राजपुत्र या सर्वांस कैदेंत टाकलें, त्यांचा अनेकप्रकारें छळ केला व शेवटीं बादशहाचे डोळेही फोडले! एवढेंच नव्हे तर तशाच स्थितींत फरफरा ओढीत नेऊन त्याला तुरुंगांत टाकलें! जनानखान्यांतील अनेक स्त्रियांचाही त्यानें छळ केला. अनेक सुंदर स्त्रियांस विवस्त्र करून त्यांची आपल्या लोकांकडून सर्वांसमक्ष विटंबना केली!! या दुष्ट कृत्यांची हकीकत कळतांच इस्माइल बेग याला गुलाम कादरचा वीट आला व त्या नराधमाचा सूड घेण्याकरितां महादजीचा सेनापति राणाखान याची मदत घेऊन त्यानें दिल्लींत प्रवेश केला. तेव्हां गुलाम कादर पळून गेला. परंतु पुढें तो हातीं लागला. तेव्हां महादजीनें हाल हाल करून अर्धमेल्या स्थितींत त्याला दिल्लीस पाठविलें. वाटेंतच गुलाम कादर या राक्षसी वृत्तीच्या माणसाचा शेवट झाला (१७८९).

९. महादजीचा मृत्यु (१७९४) :—यानंतर दिल्लीचा कारभार पुन्हां महादजी शिंद्याच्या हातीं आला. महादजीनें त्यावेळीं मेडतें येथें आपल्या रजपूत विरोधकांचा पाडाव केला. त्यामुळें शीख, रजपूत, मुसलमान व इंग्रज हे सर्व महादजीशीं नमून वागूं लागले. त्यावेळीं महादजीनें आपल्या सैन्या-करवीं दिल्लीचा बंदोबस्त उत्तम केला. या सर्व कामगिरीकरितां बादशहानें महादजीस 'अलीजाह बहाद्दर' हा किताब दिला. पुढें महादजी बादशहानें दिलेला 'वकीले-मुत्लक' हा किताब व बहुमानाचीं वस्त्रें पेशव्यास अर्पण करण्याकरितां तो पुण्यास आला. तेथेंच तो वानवडीस सन १७९४ मध्यें मृत्यु पावला. पुढें दिल्लीस शिंद्यांचें वर्चस्व सन १८०३ पर्यंत होतें. त्या सालीं इंग्रजांनीं शिंद्याच्या फौजेचा पराभव करून दिल्लीस आपलें वर्चस्व स्थापन केलें.

१०. मोंगल बादशाहीची अखेर :—सन १८०३ मध्यें इंग्रजांनीं दिल्लीचा ताबा घेतला. त्यावेळीं त्यांनीं बादशहाचें सर्व राज्य आपल्याकडे घेऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यास वार्षिक १० लक्षांची नेमणूक करून दिली. यामुळें बादशाह इंग्रजांचा ताबेदार झाला; व इंग्रजांच्या ताब्यांत मोंगलांचें राज्य गेलें. पुढें सन १८०६



मोंगल सत्तेचा उत्कर्ष व अपकर्ष.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें शाहआलम बादशाह वारला. त्यावेळीं तो ९२ वर्षांचा होता. त्याच्या नंतर त्याचा मुलगा अकबर याला इंग्रजांनीं नेमणूक दिली व तो 'दिल्लीचा बादशाह' हें नांव धारण करून दिल्लीस राहत होता. तो सन १८३७ मध्यें मेला. तेव्हां त्याची नेमणूक त्याचा मुलगा बहादुरशाह याला मिळाली. तो १८५७ च्या बंडांत इंग्रजांविरुद्ध सामील झाला. बंडवाल्यांनीं त्याच्या नांवानें एकदां द्वाहीहि फिरविली होती. परंतु अखेरीस बंडवाल्यांचा मोड झाला. तेव्हां इंग्रजांनीं त्याला ब्रह्मदेशांत हद्दपार केलें. बंडांतच त्याचे वंशज इंग्रजांकडून ठार झाले होते. रंगूनास बहादुरशाह पुढें वारला (१८६२). अशाप्रकारें मोंगलवंश कायमचा नामशेष झाला.

११. मोंगलांच्या नाशाचीं कारणें :—बाबरानें मोंगलांची सत्ता स्थापन केली व अकबरानें तिला सार्वभौमत्व प्राप्त करून दिलें. मात्र औरंगजेबानें मोंगलांच्या सत्तेस उतरती कळा प्राप्त करून देऊन मोंगलांचें राज्य अत्यंत विस्कळित केलें. ही ऱ्हासक्रिया सन १७०७ ते १८०६ पर्यंत अव्याहत शंभर वर्षें चालली होती. पुढें मोंगलांची सत्ता कायमची संपुष्टांत येऊन मोंगलांचा मागमूसही हिंदुस्थानांत राहिला नाहीं. मोंगलांच्या ऱ्हासाला अनेक कारणें झालीं. त्यांचें थोडक्यांत वर्णन असें करतां येईल. मोंगलांचा पहिला जोम त्यांच्यांत शेवटपर्यंत कायम राहिला नाहीं. ऐषारामाची व चैनीची चटक लागल्यानें राजे व राजपुत्र अत्यंत कमकुवत झाले. जी स्थिति राजघराण्यांतील लोकांची तीच मोंगल सरदारांची. त्यांच्यांत पिढीजादपणा नव्हता. त्यांच्या कुळांचा संहार वरचेवर होत गेल्यानें त्यांची परंपरा टिकली नाहीं. त्यामुळें त्यांच्यांतही हिणकसपणा उत्पन्न झाला. बादशाह मयत झाल्यावर गादीवर कोणीं बसावें याबद्दल कांहींही नियम ठरलेले नव्हते. त्यामुळें गृहकलह, रक्तपात व यादवी माजे. अर्थात सर्वत्र अराजकता माजून जोमदार सरदार कुळें नष्ट होत. मोंगल सैनिकही ऐषारामी बनले होते. अर्थात लढाईचें काम त्यांच्याकडून पूर्वीसारखें होईनासें झालें. राजाच कमजोर व तेजोहीन झाल्यावर राज्यांत तेज कोठलें राहणार? एकछत्री सत्ता असली तरी राजा कर्तृत्वहीन असल्यानें राज्याचा लौकर अधःपात झाला. राजा व प्रजा कधींच एकजीव झाले नाहींत. त्यांच्यांतील दुजाभावानें राज्य पोखरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघालें. मोंगलांनीं आरमार, शस्त्रास्त्रनिर्मिती व पाश्चात्य युद्धकला यांच्याकडे दुर्लक्ष केलें. मराठे, शीख, जाट, रोहिले, अफगाण, इंग्रज वगैरे उदयोन्मुख लोकांनीं लचके तोडून बादशाही खिळखिळी केली. तशांतच नादिरशहा, अब्दाली वगैरे परस्थ शत्रूंनीं स्वाऱ्या करून ती जास्तच कमजोर केली. मोंगल सुभेदारांवर मध्यवर्ती सत्तेचा असावा तितका दाब नसल्यानें ते स्वैरपणें वागूं लागले व पुढें स्वतंत्र झाले. यामुळें बादशाहीचीं छकलें झालीं. औरंगजेबानें केवळ धार्मिक प्रसारावर बादशाही सामर्थ्य व शक्ति खर्च केल्यानें राज्याचा नाश लौकर झाला. उत्तर हिंदुस्थान काबूंत न ठेवतां सर्व शक्ति त्यानें दक्षिण देश काबीज करण्याकरितां निरर्थक खर्च केली. यामुळें बादशाहीचें नुकसान झालें. औरंगजेबाचीं राज्यकारभाराचीं धोरणेंही बादशाहीच्या कमकुवतपणास कारणीभूत झालीं. कारण त्याचे सरदार सांगकामे बनले व त्यामुळें त्यांच्यांतील स्फूर्ति व शहाणपण अजीबात नष्ट झालें. औरंगजेबाचें दीर्घायुष्य व त्याचा संशयी कारभार यांमुळेंही मोंगलबादशाही कमकुवत झाली. औरंगजेबानंतरचे राजे कमकुवत, नालायक व कमजोर निघाले. सरदारही स्वतंत्रबुद्धीनें वागूं लागले. त्यामुळें मोंगल बादशाही मोडकळीस आली. या व इतर अनेक कारणांमुळें मोंगल बादशाही नष्ट झाली.

अभ्यास

१. वनवासी शाहआलम बादशहाचें चरित्र सांगा. त्याचे हाल होण्याचें खरें कारण काय ? त्या हालांतून त्याची कोणीं सुटका केली ?

२. खालीलसंबंधीं माहिती सांगा.
   महादजी शिंदे, नजीबखान, गुलाम कादर, अब्दाली, सुरजमल.

३. मोंगल बादशाही नष्ट होण्यास कोणतीं कारणें घडलीं ?

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
   राघोबा, सफदरजंग, गाजीउद्दीन, चूडामण, मल्हारराव, आलमगीर, तैमूरशहा, मीरजाफर, बक्सार, जाबेताखान, शेवटचा बहादुरशाह.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१७०७–१८०६.				
हिंदुस्थान	महाराष्ट्र	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
बहादुरशाह १७०८–१२	शाहू १७०८–४९		राणी ॲन १७०२–१४	
			पहिला जॉर्ज १७१४–२७	वॉलपोल,
फर्रुखसियर १७१३–१९	बाळाजी विश्वनाथ १७१४–२०			सय्येद बंधू,
		१७२०	साउथ सी कंपनीचा बोजवारा	
	निजामशाहीची स्थापना	१७२४		बोलिंगब्रोक,
			दुसरा जॉर्ज १७२७–६०	बाजीराव,
नादिरशहाची स्वारी	वसईची मोहीम	१७३९	स्पेनशीं युद्ध ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध १७४०–४८	चिमाजी, पिट, डुप्ले,
अब्दालीची १ ली स्वारी	निजामाचा मृत्यु	१७४८		
	मोठी सनद	१७५२		नानासाहेब, क्लाइव्ह,
पानिपतची ३ री लढाई		१७६१	तिसरा जॉर्ज १७६०–१८२०	वॉशिंग्टन,
इंग्रजांस दिवाणी	मल्हाररावाचा मृत्यु	१७६५	स्टँप ॲक्ट	हेस्टिंग्ज,
	महादजीचा मृत्यु	१७९४		
शाहआलमचा मृत्यु		१८०६		बर्क, शेरिडन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३३. मोंगलांच्या वेळचा हिंदुस्थान

१. प्रबळ राजसत्ता :—मोंगलांचें साम्राज्य अफाट होतें. मात्र तें सर्व बादशहाच्या हातांत होतें. तो अनियंत्रित होता. लोकांचें अंग राज्यकारभारांत नसे. नोकऱ्या देणें, मक्ते देणें, कर लादणें, लढाई अगर तह करणें, वसूल गोळा करणें, पदव्या देणें वगैरे कामें बादशहाच करीत. त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणासही जातां येत नसे. मात्र ही सर्व सत्ता त्यांच्या लष्करावर अवलंबून होती. लष्कर कमकुवत झालें कीं, बादशाही सत्ताही डळमळे. यामुळें बादशाह बंड अगर स्वतःचा खून याला भीत. प्रजेच्या सुखाची त्यांनीं फारशी काळजी वाहिली नाहीं. सर्व बादशाह स्वतः कुशल योद्धे व उत्तम सेनापति असल्यानें त्यांचा लष्करावर वचकही चांगला राही. सर्व मोठमोठ्या नोकऱ्याही लष्करांत नांव मिळविलेल्या माणसांस मिळत. प्रधानपद, वजिरी, सुभेदारी वगैरे जागा लष्करी पेशाच्या नामवंत पुरुषांसच मिळत. या सर्व कारणांमुळें मोंगलबादशाही मोठी प्रबळ झाली होती. मात्र परकीय अंमलाखालीं येथील लोकांचें तेज लोपलें.

२. मोंगलांचा निःपक्षपातीपणा :—सर्व मोंगल बादशाह बुद्धिमान, उद्योगी, राजनीतिनिपुण, महत्त्वाकांक्षी, कुशल सेनापति व उदारवृत्तीचे होते. प्रजेला न्यायही त्यांच्याकडून योग्य तोच मिळे. त्यांचा राज्यविस्तार, दरबारी डामडौल, अगणित सेना, तिची सामुग्री, तिचे मोठमोठे लष्करी अधिकारी वगैरेमुळें लोकांचे डोळे दिपत व ते नम्र होत. सामान्य जनताही राजकारणासंबंधीं उदासीन होती. असें असलें तरी मोंगल बादशाह राज्यांत शांतता राखून सर्वांस समतेनें वागवीत. हिंदु व मुसलमान हा भेदाभेद एकानेंच केला. तसेंच एकाशिवाय सर्वांनीं धर्मसहिष्णुतेचें धोरण स्वीकारून लोकांचीं मनें आकर्षून घेतलीं. यामुळेंही त्यांचा दबदबा राहिला. बादशहांनीं रजपूत हिंदु स्त्रियांशीं लग्नें केलीं. त्यामुळें त्यांच्या हिंदु राण्यांच्या वजनानेंही त्यांची द्वेषबुद्धि कमी झाली व त्यांच्या जुलुमास आळा बसला. शिवाय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समाजांतील दोन्ही पक्षांतील लोकांस एकमेकांविरुद्ध चिथावून देऊन राज्य रक्षिण्याची हातोटीही त्यांस साधली होती. प्रजेशीं एकरूप होऊन तिच्या खऱ्या उन्नतीकरितां एकही बादशाह खऱ्या अंतःकरणानें झटला नसला, तरी प्रजाही असंतुष्ट नव्हती. तिलाही बादशहाबद्दल आपलेपणा वाटे. थोडक्यांत म्हणजे मोंगल बादशाह लष्कराचा नायक, लष्करावर भिस्त ठेवून राज्यकारभार करणारा समाजसंरक्षक, न्यायी, राजकारणनिपुण व उदार राज्यकर्ता होता यांत शंका नाहीं.


मयूरसिंहासन

३. मोंगल बादशहांचा सुशिक्षितपणा:—अकबराशिवाय सर्व मोंगल बादशाह हुषार व शिकलेले होते. शिक्षण नसलें तरी अकबरही मोठा बहुश्रुत व विद्वान झाला होता. त्यांस अनेक भाषा येत. बाबर, जहांगीर वगैरेनीं आपलीं आत्मचरित्रेंही लिहिलेलीं आहेत. गणित, काव्य, ज्योतिष, संगीत, मुसलमानी धर्मशास्त्र, फारशी, अरबी, तुर्की, हिंदी वगैरे भाषांचा अभ्यास वगैरेमध्यें कोणी ना कोणी तज्ञ असे. अर्थात त्यांस विद्या व कला यांचा नाद व अभिमान असल्यानें त्यांची उन्नति झाली. हिंदी व फारशी पंडितांचा ते चांगला परामर्ष घेत. संगीत, काव्य, शिल्पकला, चित्रकला, बांधकाम वगैरेंची त्यांच्या काळांत फार भरभराट झाली. अर्थात त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांच्या शिक्षणाकरितां थोडी फार काळजी वाहिली. प्रत्येक खेड्यांत त्यावेळीं पाठशाळा असे. मात्र तेथें फारशी भाषेचें व मुसलमानी धर्माचें शिक्षण मिळे. हिंदुधर्मशास्त्र व संस्कृत भाषेचा अभ्यास यांची मात्र त्यांच्या-कडून हेळसांड झाली.

४. मोंगलांचा राज्यकारभार :—बादशाह अनियंत्रित होता, तरी त्याला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां मंत्रिमंडळ असे. त्यांत वजीर, सेनापति, दिवाण ऊर्फ फडणीस व कोतवाल हे त्याचे सल्लागार असत. त्यांचा तो सल्ला घेई. मात्र त्याप्रमाणें तो वागेच असें नाहीं. बादशहाच कमकुवत असला तर त्यांचें फावे. ह्या मंत्रिमंडळास संघटितपणा कधींच प्राप्त झाला नाहीं. सुभ्याचा कारभार सुभेदाराकडे असे. तोही लष्करीतज्ञ असे. ग्रामपंचायतीकडे गांवच्या कारभाराची जबाबदारी असे. वेळेवर वसूल दिला कीं, बादशाह त्यांच्या कारभारावर खूष असे. न्यायदानाकरितां प्रांतांतून न्यायकचेऱ्या होत्या; खेड्यांतून नसत. तेथें पंचायतीमार्फतच खटल्यांचा निकाल लागे. प्रांतिक कचेऱ्यांविरुद्ध अपील करतां येई, तें बादशहाकडे. त्याच्या निकाला-विरुद्ध अपील नसे. कुराणास धरून कायदे केले जात. त्याच्याविरुद्ध कायदे केल्यास उलेमा लोक कागूर करीत, बादशहाचे हुकूम प्रत्येक प्रांतांत वाचण्यांत येत. त्यांची अंमलबजावणी होते किंवा नाहीं हें पहाणें जिकीरीचें काम होतें. एकंदरींत मोंगलांची राज्यपद्धति ठरीव नव्हती. त्यामुळें तिला वळणदारपणा आला नाहीं व त्यामुळें ती टिकलीही नाहीं. जमीनमहसूल व जकाती याच उत्पन्नाच्या मुख्य बाबी होत्या.



मोंगलाईतील भालाईत

५. फारशी भाषा :—मोंगलांच्या दरबाराचा डामडौल फार भपकेदार असे. त्यांत इराणी संस्कृति फार दिसे. इराणांतून आलेल्या अनेक स्त्रीपुरुषांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दरबाराला इराणी वळण दिलेलें होतें. अर्थात सरदारांची दरबारी डौलदार वागणूक, भाषेचा नखरा, पोषाखाचा दिमाख, श्रीमंती, वगैरेंमुळें लोकांचे डोळे दिपून जात. याबरोबरच फारशी भाषेला दरबारांत स्थान मिळाल्यानें तिचें वैभवही फार वाढलें होतें. राज्याचें सर्व दप्तर, हिशोब, दररोजचा व्यवहार फारशीमध्यें चाले. त्यामुळें त्या भाषेला फार प्राधान्य मिळालें. अर्थात ती भाषा शिकण्याकरितां जो तो झटे. फारशी भाषा ज्याला येई त्याला मानही मिळे. त्यामुळें अनेक हिंदूही ती भाषा शिकूं लागले व तींत पारंगतता मिळवूं लागले. इतकी कीं अनेक हिंदूंनीं त्या भाषेंत ग्रंथरचनाही केली. मिर्झा मनोहर, रायरघुनाथ, ईश्वरदास नागर, भीमसेन, चंद्रभान, तोडरमल वगैरे हिंदु लोकांनीं त्या भाषेंत इतकें प्राविण्य मिळविलें कीं त्यांच्यावांचून बादशाही पत्रव्यवहार अडूं लागला. अनेक हिंदूंनीं फारशी कोश, व्याकरण, वगैरेसंबंधीं ग्रंथ लिहिले; त्यामुळें अनेक मुसलमानांसही हिंदूंकडून फारशी भाषा शिकावी लागली. उलट कांहीं मुसलमान संस्कृत भाषाही शिकले; व त्यांनीं रामायण, महाभारत वगैरे संस्कृत ग्रंथांचें फारशींत भाषांतर केलें.

६. हिंदु व मुसलमान :—राजे मुसलमान होते तरीही त्यांचें हिंदूं-वांचून अडे. हिंदूंचा निःपात करणें अशक्यच होतें. मुसलमान येथें स्थाइक झाल्यावर प्रत्येक बाबतींत त्यांना हिंदूंवर अवलंबून रहावें लागे. शेती, कसबाचीं कामें, वसूल गोळा करणें, हिशोब ठेवणें, मुसलमानांच्या जहा-गिरीची व्यवस्था पहाणें वगैरे अनेक कामें हिंदूच करीत. मोठ्या मानाच्या जागा हिंदूंना न मिळतां त्या इराणांतून आलेल्या मुसलमानांसच मिळत हें खरें. तथापि लहानसहान सर्व नोकऱ्या हिंदूंनीं काबीज केल्या होत्या. पुढें पुढें लष्करांतही त्यांचा प्रवेश झाला. फडणिशीखातें, हिशोबखातें व वसूलखातें हीं खातींही हिंदूंनीं काबीज केलीं. हिंदु लोक आपल्या बरोबरीस आले, ही गोष्ट मुसलमानांस आवडली नाहीं. तरीही पावलोपावलीं त्यांचें हिंदूंशिवाय अडे; त्यामुळें त्यांस पडतें घ्यावें लागे. त्यावेळचा बहुतेक व्यापारही हिंदूंच्याच हातीं असे. विशिष्ट कारणांकरितां हिंदुमुसलमानांत तंटे व झगडे होत. ते सोडल्यास हिंदूंच्या धर्माचरणास मुसलमानांचा फारसा उपद्रव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला नाहीं. हिंदूंचीं देवळें, त्यांच्या मूर्ति, पूजा-अर्चा यांचा मुसलमानांनीं प्रथमतः उच्छेद केला. तरी तें धोरण त्यांस पुढें सोडून देणें भाग पडलें.

७. भिन्न जमातींचा एकमेकांवर परिणाम :— हिंदुमुसलमान एकजीव झाले नाहींत. तरीही परस्परांचा एकमेकांवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. मुसलमानांनीं हिंदूंच्या अनेक रीतीभाती, पोषाख, भाषा व चालीरीति उचलल्या. पोषाखाच्या बाबतींत मुसलमानांनीं हिंदूंचें पागोटें व अंगरखा स्वीकारला. त्यांच्या स्त्रियांनीं टोपी-तुमानी टाकल्या व साडी-चोळीचा स्वीकार केला. हिंदूंचे वंदनाचे कांहीं प्रकार, लग्नांतील चालीरिती, मुंडावळ्या बांधण्याची पद्धति, एकमेकांस भाई म्हणण्याची रीत, देवास प्रभू म्हणून आळविण्याची पद्धति, बादशहाची सुवर्णतुला करणें, दीपावलि साजरी करणें, राखीबंधन वगैरे गोष्टीही मुसलमानांनीं स्वीकारल्या. अनेक हिंदू बाटून मुसलमान झाले होते. त्यांनीं आपले पूर्वीचे हिंदु रीतिरिवाज सोडले नाहींत. त्यामुळें जत्रा, सार्वजनिक उत्सव, समारंभ, दररोजची घरची राहणी, संतांची भक्ति वगैरे गोष्टी मुसलमान हिंदूंप्रमाणें करीत. उलट मुसलमानांकडूनही हिंदू अनेक गोष्टी शिकले. मुसलमानांची लष्करी व्यवस्था, वसुलाची पद्धति, ऐषारामी राहणी, डामडौल, अन्नाचे निरनिराळे रुचिकर प्रकार, करमणुकीचीं नवीं साधनें, पोषाखाच्या तऱ्हा वगैरे अनेक गोष्टी हिंदू लोकांनीं मुसलमानांपासून उचलल्या. मांसाचे पदार्थ, जिलेबी, गुलाबजांब, रसगुल्ले वगैरे पदार्थ मुसलमानांकडून हिंदूंनीं उचलले असें म्हणतात. नखरेल दरबारी शिष्टाचाराचे प्रकारही मुसलमानांपासून हिंदूंनीं उचलले. मुसलमानांच्या संपर्कानें धाडसीपणा, बेडरपणा, प्रवासाची आवड, समाजांत मिळूनमिसळून वागण्याची कला वगैरे गुण हिंदूंमध्यें आले.

८. धर्मांचा एकमेकांवर परिणाम :— हिंदु व मुसलमान जसजसे एका ठिकाणीं राहूं लागले, तसतसें त्यांच्यांतील वैर कमी होऊं लागलें व त्यांच्यांत आदरबुद्धि वाढूं लागली. हिंदुधर्मांतील अनेक चांगलीं तत्त्वें मुसलमानांस मान्य होतीं. त्यांचा त्यांनीं आपल्या धर्मांत अंतर्भाव केला नाहीं. तरी साधू-संतांचे उत्सव, ब्रह्मचर्य पाळणें, भगवीं वस्त्रें नेसणें, जातिभेद मानणें, देवास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवस करणें वगैरे अनेक गोष्टी मुसलमानांनीं हिंदूपासून उचलल्या. मुसलमानांचे उरूस, ताबुतांची पूजा-अर्चा व मिरवणूक, वगैरे गोष्टी हिंदु करूं लागले. दोन्ही धर्मांची एकी करण्याचाही अकबर, खुसरौ, दाराशेको, कबीर, नानक वगैरेनीं प्रयत्न केला. 'देव एक आहे' असें ते सर्वांस सांगत. परंतु त्यांना फारसें यश आलें नाहीं. नानकानें स्थापलेला शीखधर्म मात्र पुढें फार फोफावला. परंतु त्यामुळें हिंदुमुसलमानांमध्यें एकी निर्माण होण्याऐवजीं त्यांच्यांत कायमचें वैर निर्माण झालें.



मोंगलाईतील शिकार

९. व्यापार व उद्योगधंदे :— मोंगलांच्या काळीं व्यापार फार भरभराटलेला होता. दूरदूरच्या देशांशींही व्यापार चाले. इंग्लंड, पोर्तुगाल, ॲबिसीनिया, इराण, तुर्कस्थान, जावा, सुमात्रा, चीन, सयाम, हॉलंड वगैरे देशांत हिंदुस्थानांतून अनेक प्रकारचा माल जात असे. पश्चिमेचीं ठठ्ठा, भडोच, सुरत, चौल, गोवें, कारवार, राजापूर वगैरे बंदरें व पूर्वेकडील मच्छलीपट्टण, कलकत्ता वगैरे बंदरें परराष्ट्रीय व्यापाराकरितां प्रसिद्ध होतीं. हिंदुस्थानांत अनेक शहरें व्यापाराकरितां प्रसिद्ध होतीं. अहमदाबादेस किनखापाचें कापड होई. शाली, गालिचे काश्मिरांत होत. डाक्क्याची मलमल प्रसिद्ध होती. काशीस रेशमी कापड व कपडे उत्तम होत. याशिवाय दगड, धातु, लाकूड यांवरील नकशीचीं कामें, कशिदा काढणें, मुलामा देणें वगैरे कामें फार प्रसिद्ध होतीं. लोखंड, सोनें, हिरे-माणकें, मोतीं, कथिल, शिसें, गंधक, मीठ, सोडा वगैरे खनिज पदार्थ हिंदुस्थानांत विपुल असल्यानें परदेशी व्यापाऱ्यांच्या हिंदी मालावर नेहमीं उड्या पडत. अर्थात हिंदुस्थान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही जगांतील एक मोठी बाजारपेठ त्याकाळीं समजली जाई. मात्र कारखाने सरकारच्या ताब्यांत असत व सरकारला नको असेल तोच माल बाजारांत विकला जाई. त्यामुळें उंची माल फारकरून परदेशीं जात नसे. इंग्लंडमध्यें रेशमी व इतर कापड फार जाई.

१०. दळणवळण व प्रवास :— त्यावेळीं मोंगलांनीं उत्तम रस्ते तयार केले होते. तसे भक्कम रस्ते त्यावेळीं इंग्लंडांतही नव्हते. काबूल–लाहोर–आग्रा–अलाहाबाद–डाक्का हा रस्ता राजमार्ग समजला जाई. आग्रा ते बऱ्हाणपूर व आग्रा-अहमदाबाद–सुरत हे रस्ते त्यावेळीं प्रसिद्ध असत. या



मोंगलकालीन गजरथ

रस्त्यांवर धर्मशाळा, अन्नछत्रें, सराया, दुतर्फा झाडी, विहीरी वगैरे सोयी असल्यानें प्रवास सुखकर होई. प्रवास सोईचा असला तरी कधींकधीं तो त्रासाचा असे. वाटेवर वाटमाऱ्या चालत. त्यामुळें प्रवासाच्या वेळीं बंदोबस्त ठेवावा लागे. प्रवास पायीं, पालखींतून, बैलगाड्यांतून, मेण्यांतून अगर बैलाच्या पाठीवरून होई. बैलगाड्यांस दोन बैल जोडलेले असत व एका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाडींत फक्त दोघेच बसत. या गाड्या दररोज साठसाठ मैलही प्रवास करीत. या गाड्यांचें दररोजचें भाडें फक्त एक रुपया पडे. व्यापारी आपला माल बैलावरून अगर उंटावरून नेत.

११. खेळ-करमणूक :—त्यावेळीं देशांत शांतता होती. त्यामुळें अनेक प्रकारचे खेळ व उत्सव चालत. हत्तींची साठमारी, बैलांच्या टकरा, क्रूर जनावरांचीं द्वंद्वें वगैरे गोष्टी नेहमीं चालत. द्वंद्वयुद्धेंहीं प्रचलित होतीं.



उंटांची झुंज

मोंगलांना शिकारीचा नाद फार असे. नाचरंग तमाशे, नाटकें वगैरेही चालत. संगीतश्रवणाची आवड सर्वांस होती. निरनिराळीं वाद्येंही त्या काळीं प्रचलित होतीं. जत्रा प्रत्येक गांवीं भरे. तेथील बाजार व कुस्त्यांचे फड प्रसिद्ध असत. मिरवणुकाही निरनिराळ्याप्रकारें निघत. सणावारीं उत्सव होत. राजाची अगर सुभेदाराची स्वारी डामडौलाची निघे. अशावेळीं आनंदास ऊत येई. अशा प्रसंगीं मोंगल बादशाह आपल्यावरून मोतीं, नाणीं, माणकें वगैरे उधळून घेत.

१२. शिक्षण-शाळा :—लोकांच्या शिक्षणाची मात्र मोंगलांनीं आबाळ केली. फारशी, अरबी, उर्दू वगैरे भाषा व हिशोबापुरतें गणित शिकविण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां त्यावेळीं सर्वत्र शाळा होत्या. परंतु संस्कृत भाषा व संस्कृत ग्रंथांचें अध्ययनअध्यापन यांना मोंगलांनीं उत्तेजन दिलें नाहीं. श्रीमंतांच्या मदतीनें अनेक आस्थेवाईक हिंदूंनीं स्वखर्चानें शाळा चालविल्या होत्या. त्यांस सरकारी आश्रय नसे. तेथें संस्कृत भाषा, व्याकरण, न्याय, ज्योतिष वगैरे विषय शिकविले जात. त्यावेळीं पुस्तकें छापण्याची कला नव्हती. त्यामुळें हस्तलिखित पुस्तकें तयार होत. त्यांची बांधणीही मोठी मजबूत, मोहक व चित्ताकर्षक होई. कागद तयार करण्याचे कारखाने पुष्कळ होते. हा कागद हातानें तयार केला जाई व तो उत्तम असे. अनेक ग्रंथकारही त्यावेळीं उदयास आले. फारशी भाषेला महत्त्व असल्यानें ती भाषाही हिंदूंनीं आत्मसात करून दरबारीं मोठमोठ्या जागा मिळविल्या, फारशींत काव्यें रचिलीं, ग्रंथरचना केली व आपलें श्रेष्ठत्व सिद्ध केलें.

१३. टपालाची व्यवस्था :—मोंगलांनीं टपालाची व्यवस्था आपल्याकरितां केली होती. ती सार्वत्रिक नव्हती. बांबूच्या नळकांड्यांतून पत्रें पाठविलीं जात. टपाल घोड्यावरून अगर उंटावरूनही पाठविलें जाई. डांकेची चोरी करणारास कडक शिक्षा होत असे. थैलींतून टपाल पाठविण्याचीही पुढें कधीं कधीं सोय होई. मात्र असें खाजगी टपाल पाठविणें सर्व दृष्टींनीं महाग व गैरसोईचें होई. टप्याटप्यानें पळून टपाल पोंचविणारे लोकही होते व ते पटाईत होते. त्यांचें काम फार जलद होई.

वृत्त नेणारा ससाणा

१४. लोकस्थिति :—त्यावेळीं लोक शहरांपेक्षां खेड्यांतच विशेष रहात असत. खेड्यांत दरवडे फार पडत असल्यानें गांवाभोंवतीं कोट बांधण्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रीत होती. रात्रींच्या वेळीं या कोटाचीं दारें बंद करण्यांत येत व बाहेरच्या लोकांस बाहेरच रहावें लागे. गांवांतील घरें सुंदर व मजबूत असत. मोठमोठे वाडे चौकटी असत. लोक एकंदरींत सधन होते. तरी चोरांचा उपद्रव फार होत असल्यानें लोक आपल्या संपत्तीचें प्रदर्शन कधींही करीत नसत. खेड्यांतील लोकांचा शेती हा मुख्य धंदा होता. कांहीं ठिकाणीं इतर जोडधंदेही करण्यांत येत. मद्य, मांस, मासे, फळें, दूध, साखर, गव्हाच्या रोट्या यांच्यावर मुसल-



हत्तींची झुंज

मान गुजराण करीत. हिंदु मात्र मद्य व मांस यांस शिवत नसत. त्यांची राहणी साधी असे. मुसलमान ऐटींत व ऐषारामांत रहात. निरनिराळ्या प्रकारचे उत्सव, जत्रा, समारंभ, मिरवणुका व इतर करमणुकीचे कार्यक्रम खेड्यांतून नेहमीं चालत. खेड्याचा कारभार पंचायतीमार्फत चाले. न्यायनिवाडाही पंचायत करी व शिक्षा देई. सरकारदेणें दिलें म्हणजे गांवांतील लोक निर्धास्त असत. राज्यांत अनेक उलथापालथी झाल्या तरी त्यांचा दररोजचा व्यवहार सुरळीत चाले. शिक्षणाचें प्रमाण कमी असे. शब्दावर विश्वास टाकूनच सर्व व्यवहार होत असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. मोंगलांचा राज्यकारभार कसा होता ? ते आपल्या प्रजेच्या सुखाकरितां झटत ? कां नाहीं ?

२. मोंगलांच्या वेळची लोकस्थिति कशी होती ? लोक कोणते उद्योगधंदे करीत ? त्यांच्या करमणुकीचीं साधनें कोणतीं होतीं ?

३. भिन्नधर्मीयांची एकी होती ? बादशाह हिंदूंस कसें वागवीत ? भिन्न-धर्मीयांचा एकमेकांवर काय परिणाम झाला ?

४. खालीलसंबंधीं माहिती द्या.
टपालाची व्यवस्था, प्रवास, शिक्षण-शाळा, फारशी भाषा.

५. मोंगल अंमलामुळें हिंदुस्थानचा कोणता फायदा झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्वाचीन काळ–मराठी अंमल

३४. शिवाजीच्या पूर्वींचा महाराष्ट्र

१. महाराष्ट्र देश:—आपला महाराष्ट्र देश पूर्वी 'दंडकारण्य' या नांवानें प्रसिद्ध होता. महाराष्ट्र त्रिकोणाकृति आहे. त्यांत पश्चिमेस दमणपासून कारवारपर्यंतचा प्रदेश आहे. उत्तरेस दमणपासून नागपूरच्या थोडें पलीकडे या देशाची व्याप्ती आहे. नागपूर ते कारवार यांना सांधणारी एक वांकडी-तिकडी रेषा महाराष्ट्राची पूर्वेकडील सीमा दर्शविते. हा देश डोंगराळ आहे. तापी, गोदावरी, कृष्णा, भीमा, वेण्णा, वगैरे नद्या येथील जमीन भिजवितात. त्यामुळें महाराष्ट्राच्या दऱ्यांखोऱ्यांतून पीकपाणी व दूध-दुभतें चांगलें होतें. महाराष्ट्र देश संपन्न व सुपीक नाहीं; परंतु त्यांतील लोकांस कमतरता कशाचीही भासत नाहीं. अगस्तिऋषींनीं महाराष्ट्रांत प्रथम वसाहत स्थापन केली. उत्तरेंत पराभूत झालेले अनेक नाग लोक, त्यानंतर अनेक वर्षांनीं, महाराष्ट्रांत येऊन राहिले. पुढें मगधराज्यांत बौद्धधर्माचा फैलाव झाला, त्यावेळीं तेथील रट्ठे ऊर्फ राष्ट्रिक लोक महाराष्ट्रांत येऊन राहिले. तेच आपल्याला 'महारट्ठे' असें म्हणवूं लागले. हेच लोक मराठ्यांचे पूर्वज होत. महारट्ठे व नागलोक आपापसांत रोटी-बेटी व्यवहार करीत. त्यामुळें महाराष्ट्रांतील लोकांत आर्यांचें शुद्ध रक्त दिसत नाहीं. मात्र आर्य संस्कृतीचा त्यांच्यावर ठसा कायम राहिला. मराठी ही त्यांची मायबोली ठरून गेली.

२. महाराष्ट्रांतील मराठे:—पुढें शालिवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव वगैरे रजपूत वंशातील राजांनीं महाराष्ट्रांत राज्य केलें. त्याचें वर्णन मागें आलेंच आहे (पहा, पानें १००–१०७). हे सर्व लोक आर्यवंशीय क्षत्रिय होते. त्यांच्याशींही मराठ्यांचा रोटी-बेटी व्यवहार होत असे. त्यामुळें क्षत्रिय मराठे व कुणबी मराठे असे मराठ्यांत भेद निर्माण झाले. मराठे लोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथमतः गांवांच्या पाटिलक्या स्वीकारून राहिले होते. मराठे क्षत्रियांनीं ठिकठिकाणच्या देशमुखी हक्कांची संपादणी केली व जवळ फौजफांटा बाळगून ते आपला उदरनिर्वाह करूं लागले. यादवांचा पाडाव झाल्यावर महाराष्ट्रांत मुसलमानांचें राज्य स्थापन झालें. त्या राज्यांत क्षत्रिय मराठे आपल्या कर्तृत्वानें चांगले पुढें सरसावले; व ते चांगले कर्तृत्ववान होऊन महत्पदास चढले. मात्र त्यांनीं आपले देशमुखी हक्क कधींही सोडले नाहींत. या क्षत्रिय मराठ्यांबरोबर जे ब्राह्मण आले त्यांनीं रामायण, महाभारत व इतर संस्कृत ग्रंथ यांचें मराठींत रूपांतर करून येथील लोकांस धर्माचें ज्ञान करून दिलें व आपल्या धर्माबद्दल त्यांच्यांत अभिमान उत्पन्न केला. त्यांच्या मदतीनेंच क्षत्रिय मराठ्यांनीं मराठा समाजाची उन्नति केली.

३. मराठे लोकः—मराठे लोकांसंबंधीं खुद्द एल्फिन्स्टननें खालील अभिप्राय व्यक्त केला आहे. “ मराठे लोक सुंदर नसले तरी काटक व सुदृढ आहेत. उद्योगी, मेहेनती, चपळ व मजबूत बांध्याचे मराठे मोठे व्यवहार-चतुर आहेत. गर्व व ताठा त्यांना कधींच शिवत नाहीं. परिणामाकडे नेहमीं लक्ष ठेवून ते आपला उद्योग नेहमीं चालवितात. वाटेल ते उपाय योजून ते जय मिळवितील व त्याकरितां ते आपली बुद्धि ताणतील, सुखांचा त्याग करतील व बेडरवृत्तीनें संकटांशीं झुंजतील. मात्र स्वतःचा मान, स्वार्थ, वतनें यांचा त्याग करण्यास ते कधींही तयार होणार नाहींत. त्यांच्या ठिकाणीं आळस नाहीं. ते चलाख, कष्टाळू, सोशिक, मितव्ययी व सततोद्योगी आहेत. बाणेदारपणा त्यांच्या अंगीं उत्कटत्वानें दिसून येतो. ” अशा तऱ्हेचे मराठे दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत मोठ्या अभिमानानें वागत असत. त्यांना तेथील राज्यकारभार व वसुली यासंबंधीं उत्कृष्ट ज्ञान प्राप्त झालें होतें.

४. मराठे सरदारांचीं घराणीं:—दक्षिणेंतील देवगिरीच्या यादवांच्या राज्याचा नाश झाल्यावर, तेथें मुसलमानांचें बहामनी राज्य स्थापन झालें. पुढें त्या राज्याचीं पांच राज्यें होऊन, त्यांपैकीं अहमदनगर, विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यें टिकलीं. या तिन्ही राज्यांत आपापसांत चुरस होती. त्यामुळें युद्धप्रसंगही निर्माण होत. प्रथमतः त्या राज्यांतील मुलकी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व लष्करी अधिकार मुसलमानांच्या हातीं असत. परंतु पुढें पुढें हे सुलतान फौजबंद मराठे सरदार आपल्या पदरीं बाळगूं लागले. त्यामुळें शिर्के, घाटगे, घोरपडे, मोहिते, महाडिक, मोरे, जाधव, निंबाळकर, माने, भोसले वगैरे सरदार निर्माण झाले. अर्थात त्यांना लष्करी व मुलकी अधिकार मिळूं लागून, राज्यकारभाराचा अनुभवही प्राप्त मिळूं लागला. सुलतानांच्या दरबारीं परदेशी मुसलमान व दक्षिणी मुसलमान असे दोन पक्ष असत. ते आपापसांत भांडत व सुलतानावरही कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत. तेव्हां त्यांच्या भांडणांस पायबंद घालण्यास सुलतानांस फौजबंद मराठे सरदारांचें साहाय्य मिळे. असें असलें तरी या मराठे सरदारांस मुसलमानांची ताबेदारी स्वीकारण्यांत भूषण वाटे. स्वराज्य व स्वातंत्र्य यांस ते थोडे फार पारखेच झालेले होते.

५. मुसलमानी अंमलांतील महाराष्ट्राची स्थिति :—मुसलमानी राज्यांत अनेक मराठे सरदार उत्पन्न झाले व मुसलमानांची चाकरी मोठ्या इमानेंइतबारें करण्यांत ते धन्यता मानीत. देशमुखी, पाटीलकी वगैरे आपलीं वतनें सांभाळण्याची ते कसोशी बाळगीत. तरीपण कालांतरानें त्यांच्यांत स्वातंत्र्याची इच्छा बळावूं लागली. राक्षसतागडीच्या लढाईनंतर (१५६५) दक्षिणेंतील हिंदूंचें राज्य नष्ट झाल्यानें हिंदूंचा व त्यांच्या धर्माचा पाठिराखा दक्षिणेंत उरलाच नाहीं. त्यामुळें आपल्या हीन स्थितीची उमज मराठ्यांस होऊं लागली. मुसलमानी राज्यांतही हिंदूंचें स्वत्व नाहींसें झालेलें नव्हतें. त्यामुळेंच मुसलमानी सुलतानांना मराठ्यांस मोठमोठ्या मनसबदाऱ्या, सरदारक्या, वतनें, देणग्या वगैरे देऊन खूष ठेवावें लागे. अनेक मुसलमान हिंदु स्त्रियांशीं लग्नें लावीत. अर्थात त्यांचा ओढा हिंदूंकडे विशेष असे. त्यावेळीं ग्रामसंस्था कायम होत्या; व त्या आपल्या गांवांचा कारभार अत्यंत स्वतंत्रपणें करीत. त्या संस्था मुसलमानांस नष्ट करतां आल्या नाहींत. वसूल गोळा करण्यासही त्यांना हिंदूंची मदत घ्यावी लागे. डोंगरी मुलखावर मुसलमानांस हिंदूंच्या मदतीनेंच राज्य चालविणें शक्य होतें. हिंदूंची धार्मिक अवनति होत होती. धार्मिक छळही होत होता; व हिंदूंचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक वेळां अपमान होत असे. अशा स्थितींत परचक्र, राज्यक्रांत्या, दुष्काळ, अंदाधुंदी, धार्मिक अवनति वगैरेंमुळें एकंदर प्रजा त्रस्त होऊन गेली होती.



ज्ञानेश्वर

६. साधुसंतांची कामगिरी :— राज्यकारभार, लष्कर व वसुली कारभार वगैरे बाबतींत मराठ्यांना योग्य तें शिक्षण मिळत असतांच त्यांना आपल्या धर्माकडे खेंचून घेण्याचें काम त्यावेळच्या साधुसंतांनीं उत्तमरीतीनें केलें. देवांचा व देवळांचा विध्वंस झालेला पाहून व एकंदर हिंदूंची धार्मिक अवनत स्थिति पाहून या साधुसंतांस फार विषाद वाटे. अर्थात ही स्थिति सुधारून मराठ्यांच्या अंतःकरणांत स्वधर्माबद्दल अभिमान उत्पन्न करण्याची बहुमोल कामगिरी त्यावेळच्या साधुसंतांनीं केली.

तुकाराम

त्या साधुसंतांत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, श्रीगोंद्याचे महमदबुवा वगैरे महाराष्ट्रीय संत प्रमुख होते. समाजाचे खरे शिक्षक व खरे उपदेशक हे संतच होत. महाराष्ट्रांत धर्मसुधारणा घडवून आणण्यांत त्यांनीं प्रमुख भाग घेतला होता. इतिहासपुराणें व इतर धर्मग्रंथ यांचें संस्कृतांतील ज्ञानभांडार त्यांनीं मराठींत आणून तें सर्वांस खुलें केलें होतें. धर्मास अवनति प्राप्त झालेली होती, ती नष्ट करण्याचा प्रयत्न संतांनीं केला. त्यावेळच्या संतमालिकेंत ब्राह्मण, वाणी, शिंपी, माळी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुंभार, महार वगैरे सर्व जातींचे लोक होते. त्यांनीं आपल्या कृतींनीं व उक्तींनीं महाराष्ट्रांत जातिद्वेष कमी केला. शुद्ध अंतःकरणानें परमेश्वराची भक्ति केली तर तो पावतो, असा त्यांनीं ठाम सिद्धांत मांडला. त्याला जातीचें बंधन नाहीं, जपजाप्य, व्रतेंवैकल्यें वगैरेंची जरुरी नाहीं असेंही ते प्रतिपादूं लागले. यामुळें त्यावेळच्या लोकांत एकोपा निर्माण झाला. भक्तिमार्गाच्या या नव्या विचारसरणीनें लोकांत नवी चेतना निर्माण झाली. याचा कांहींसा फायदा रामदासस्वमींनीं घेऊन लोकांची दृष्टि राष्ट्रहिताकडे, स्वदेशसेवेकडे व स्वधर्मसंरक्षणाकडे वळविली. रामदासस्वामींनीं लोकांस स्वार्थत्यागी बनविलें. त्यांनीं स्थापन केलेला 'महाराष्ट्रधर्म' ज्ञानेश्वरादि संतांचा भक्तिमार्ग व भागवतधर्म यांच्या विरुद्ध होता. परंतु त्यांच्या महाराष्ट्रधर्माच्या' शिकवणुकीनेंच लोकांत चेतना उत्पन्न झाली व मराठे लोक स्वराज्य व स्वधर्मसंरक्षण यांच्या संपादनास उत्सुक झाले. त्यांतच त्यांस शिवाजीसारखा पुढारी लाभल्यानें त्यांचें इच्छित साध्य होण्यास फारसा अवधि लागला नाहीं.



रामदास

७. भोसल्यांचें कुलवृत्त :—स्वराज्यसंस्थापक शिवाजी भोसलेकुळांत जन्मला. भोसल्यांचें घराणें चितोडच्या शिसोदे नांवाच्या रजपूत कुळापासून उत्पन्न झालें होतें. त्यांचा देवराजजी नामक एक वंशज सन १४१५ च्या सुमारास दक्षिणेंत आला. त्याच्या कुळांतच भोसाजी म्हणून एक पुरुष होऊन गेला. त्याच्यावरूनच त्याच्या कुळास 'भोसले' हें नांव मिळालें. या घराण्यांतील पुरुषांनीं शिंगणापूर, हिंगणी, बेरडी, देऊळगांव, वेरूळ, घृष्णेश्वर वगैरे गांवांच्या पाटिलक्या मिळविल्या. पुढें सन १५३६ च्या सुमारास बाबाजीराजे भोसले हा पराक्रमी सरदार त्या कुळांत निर्माण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला. त्यालाच प्रथम निजामशाहींत मोठी जहागीर मिळाली. त्याचा मुलगा मालोजी भोसले होय. तो सन १५५० मध्यें जन्मला. स्वतःच्या कर्तबगारीनें निजामशाहींत तो मोठा मातबर सरदार झाला. त्याला शहाजी व शरीफजी असे दोन पुत्र होते. निजामशाहींत लखुजी जाधव म्हणून एक मोठा वाकबगार मराठा सरदार होता. त्याची कन्या जिजाबाई होय. तिच्याशीं शहाजीचें लग्न मालोजीनें मोठ्या हिंमतीनें लावलें (१६०४). पुढें सन १६२० मध्यें मालोजी मृत्यु पावला.

८. शहाजीची कामगिरी :—शहाजीचा जन्म सन १५९४ मध्यें झाला. तो मोठा बुद्धिमान व देखणा होता. बापाच्या मृत्यूनंतर त्याच्यावर मोठीच जबाबदारी पडलेली होती. त्यावेळीं तो पंचवीस वर्षांचा होता. निजामशहाचा वजीर मलिकंबर शहाजीची योग्यता जाणून होता. त्याच्या मदतीनेंच मलिकंबरनें मोंगलांचा पराभव केला होता. पुढें सन १६२६ मध्यें मलिकंबर मृत्यु पावला. तेव्हां शहाजीनें विजापुरकरांची मदत मिळवून निजामशाही मोंगलांच्या तडाख्यांतून वांचविण्याचा उद्योग आरंभिला. त्याचवेळीं पुणें प्रांताचा मोकासा शहाजीस निजामाकडून जहागीर मिळालेला होता. सन १६२८ मध्यें मोंगल निजामशाहीवर चालून आले. तेव्हां शहाजीनें त्यांची मनसबदारी पत्करली होती. परंतु पुढें शहाजीचें मोंगलांशीं वांकडें आलें. तेव्हां निजामशाही तारण्याच्या उद्योगास तो लागला. शाहजहानची फौज उत्तरेकडे गेल्यावर शहाजीनें विजापुरकरांच्या मदतीनें मोंगलांकडून बहुतेक सर्व निजामी राज्य परत मिळवून घेतलें. शहाजीनें मूर्तजा ह्यास निजामशाहीच्या गादीवर बसविलें व तो स्वतः त्याचा वजीर झाला. त्यानंतरही तो मोंगलांशीं झुंजत होताच. थोड्याच दिवसांत शहाजीनें आपली सत्ता पुष्कळच वाढविली. हें वृत्त कळतांच सन १६३५ मध्यें शाहजहान पुन्हां दक्षिणेंत आला. त्यानें शहाजीस माहुलीच्या किल्ल्यांत वेढून त्यास शरण येण्यास भाग पाडलें. शहाजी मोंगलांस शरण गेल्यानें शाहजहाननें निजामशाही नष्ट केली (१६३७). तेव्हां शहाजी विजापुरकरांच्या आश्रयास गेला. पुणें व सुपें प्रांताची जहागीर विजापुरच्या अदिलशहानें शहाजीकडेच ठेवली होती. शिवाय शहाजीला मनसबदारी देऊन त्याला कर्नाटकच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामगिरीवर पाठवून दिलें. तेथील कामगिरीही त्यानें फत्ते केली. त्यामुळें त्याच्यावर खूष होऊन अदिलशहानें कर्नाटकांत मोठी जहागीर व कऱ्हाड प्रांतांतील बावीस गांवांची देशमुखी व मावळची जहागीर त्याला दिली. शहाजीचा पराक्रम, त्याची धडाडी व मुत्सद्देगिरी मोठी होती. तो एक मोठा राजकार्यधुरंधर पुरुष होता. मराठ्यांचें स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याची त्याची इच्छा होती व त्यास त्यानें थोडाफार आरंभही केला होता. अर्थात या कामीं त्याला जे अनुभव आले त्याचा फायदा त्याच्या मुलाला चांगलाच लाभला.

९. मराठ्यांच्या उदयाचीं कारणें :—(१) दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत दुफळी होती व मोंगलांच्या स्वाऱ्यांमुळें तीं कमकुवत व दुर्बळ झालीं होतीं. (२) त्यामुळें त्यांच्या पदरीं असलेले मराठे सरदार पुढें आले व त्यांनीं लष्करी व्यवस्था, वसुली व जमाखर्च व राज्यकारभार यांत उत्तम अनुभव मिळविला. (३) मराठ्यांचें नवें व स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचें कार्य शहाजीनें केलें व आपल्या अनुभवाचा फायदा आपल्या मुलास व मराठे सरदारांस दिला. (४) हिंदूंचा धर्मछळ व त्यांवरील जुलूम यांमुळें मराठ्यांत प्रतिकार करण्याची बुद्धि बळावली व लढावयाचें तें मुसलमानां-करितां नव्हे तर 'स्वराज्य व स्वधर्म या यांकरितांच' अशी त्यांच्यांत भावना जागृत झाली. (५) महाराष्ट्राचा डोंगराळ प्रदेश व तेथील किल्ले व मराठ्यांतील लष्करी गुण यांचा मराठ्यांस फायदा मिळाला. (६) जुन्या ग्रामसंस्था सुव्यवस्थित चालू होत्या. त्यांचा स्वराज्यस्थापनेच्या कामीं मराठ्यांस फार उपयोग झाला. (७) महाराष्ट्रांत मुसलमानांचा अंमल उत्तम बसलेला नव्हता. त्यांस प्रत्येक बाबतींत मराठ्यांची मदत घ्यावीच लागे. उद्योगधंदे, लष्कर, जमाखर्च वगैरे बाबतींत हिंदूंशिवाय त्यांचें अडेच. (८) महाराष्ट्रीय संतांनीं आपल्या शुद्ध व पवित्र वर्तनानें व प्रेमळ उपदेशानें महाराष्ट्रांतील मराठ्यांत स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांबद्दल तीव्र अभिमान जागृत केला व स्वराज्यस्थापनेस त्यांना त्यांनीं उद्युक्त केलें. (९) सुदैवानें शिवाजीसारखा चतुरस्र पुढारी त्यांस लाभला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. मराठे लोकांसंबंधीं व त्यांच्या देशासंबंधीं माहिती सांगा. मराठ्यांचा उदय कां झाला ?

२. भोसल्यांच्या कुळाची हकीकत सांगा. भोसले महाराष्ट्रांत कां आले ? येथें आल्यावर त्यांनीं काय केलें ?

३. शहाजीचें चरित्र थोडक्यांत वर्णा.

४. खालीलसंबंधीं माहिती द्या.

महारट्ठे, मुसलमानांच्या दरबारीं मराठ्यांचें वजन, संतांची कामगिरी.

५. पांगारकरकृत-तुकाराम व रामदास यांचीं चरित्रें, सरदेसाईकृत–शहाजी, रामदासस्वामींचा दासबोध, आपटेकृत 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' व खरेकृत 'मालोजी व शहाजी' हीं पुस्तकें वाचा.

उतारे

१. धर्मग्लानी

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले । गुरुत्व सांडून झाले । शिष्य शिष्याचे ॥ ३१ ॥ कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पिरासी भजती । कित्येक तुरुक होती । आपुले इच्छेनें ॥ ३२ ॥ ऐसा कलियुगीं आचार । कोठ राहिला विचार । पुढें पुढें वर्णसंकर । होणार आहे ॥ ३३ ॥ राज्य नेलें म्लेंच्छ-क्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं । आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥ ३६ ॥ आतांच्या ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें झालें । तुम्हां बहुतांचे प्रचीतीस आलें । किंवा नाहीं ॥ ३९ ॥

—दासबोध १४–७.

२. मतांचा गलबला

पृथ्वीचा झाला गळाठा । एक लहान एक मोठा । कोण खरा कोण खोटा । कोण जाणें ॥ १८ ॥ आचार बहुचकीत पडिला । कित्येक पोटासाठीं बुडाला । अवघा वरपंगचि झाला । साभिमानें ॥ १९ ॥ देव झाले उदंड । देवांचें मांडिलें भंड । भूतां देवतांचें थोतांड । एकच जाहलें ॥ २० ॥ शास्त्रांचा बाजार भरला ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवांचा गलबला झाला। लोक कामनेच्या व्रताला। झोंबोन पडती ॥ २३ ॥ ऐसें अवघें नासलें। सत्यासत्य हारपलें। अवघें अनायक झालें। चहूंकडे ॥ २४ ॥ मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला। जो जे मतीं सांपडला। तयासी तेंचि थोर ॥ २५ ॥

—दासबोध ११-२

३. हिंदूंची दुरवस्था

पदार्थ मात्र तितुका गेला। नुस्ता देशचि उरला। येणें करितां बहुताला। संकट आलें ॥ १ ॥ लोकें स्थानभ्रष्ट जालीं। कितेक तेथेंचि मेलीं। उरलीं तें मराया आलीं। गांवावरी ॥ २ ॥ माणसा खावया धान्य नाहीं। आंथरूण पांघरूण तेंही नाहीं। घर कराया सामग्री नाहीं। काये करिती ॥ ३ ॥ कितेक अनाचारी पडिलीं। कितेक यातिभ्रष्ट जालीं। कितेक ते आक्रंदलीं। मुलें बाळें ॥ ४ ॥ कांहींच पाहतां धड नाहीं। विचार सुचेना कांहीं। अखंड चिंतेचा प्रवाहीं। पडिले लोक ॥ ५ ॥ येक म्हणती कोठें जावें। येक म्हणती काय करावें। विदेशा जाऊनी काये खावें। वेच नाहीं ॥ ६ ॥ प्राणीमात्र जाले दुखी। पाहतां कोणी नाहीं सुखी। कठिण काळ वोळखी। धरीनात कोण्ही ॥ ७ ॥

प्रश्न:—१. वरील उताऱ्यांवरून त्यावेळची महाराष्ट्राची स्थिति कशी होती तें सांगा.

२. धर्माला ग्लानी आल्यानें काय गोष्टी घडल्या?

३. स्वधर्मासंबंधीं रामदासास कळकळ होती, हें कशावरून?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३५. स्वराज्याची संस्थापना

१. शिवाजीचें बालपण व शिक्षण:—सन १६३० मध्यें शिवनेरी किल्ल्यांत, शहाजीराजांची राणी जिजाबाई हिचे पोटीं, शिवाजीचा जन्म झाला. त्यावेळीं शहाजी निजामशाहीच्या संरक्षणार्थ झगडत होता. पुढें तो विजापूरकरांच्या आश्रयार्थ गेला. तेव्हां शिवाजी शहाजीबरोबर बंगळूरास पांचसहा वर्षें होता. नंतर सन १६४१ च्या सुमारास शहाजीनें शिवाजी व जिजाबाई यांना पुणें प्रांतांत पाठविलें. तेथें दादाजी कोंडदेव मलठणकर हा शहाजीच्या जहागिरीचा कारभारी होता. शिवाजीच्या शिक्षणाची जबाबदारी जिजाबाई व दादाजी कोंडदेव यांवरच पडली. जिजाबाईनें शिवाजीस

शिवाजीचें जन्मस्थान—शिवनेरी

रामायण-महाभारतांतील गोष्टी व आपल्या पूर्वजांच्या शौर्याच्या व वैभवाच्या गोष्टी सांगून त्याच्या मनांत शौर्याचीं व हिंमतीचीं कामें करण्यास हुरूप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्पन्न केला. देशाच्या स्थितीचीही तिनें त्याला ओळख-करून दिली. दादाजी कोंडदेव मोठा करारी, हुषार व उत्तम व्यवस्थापक होता. त्यानेंही शिवाजीच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था ठेवून नेमबाजी, दांडपट्टा, घोड्यावर बसणें वगैरेसंबंधींचें लष्करी शिक्षण त्यास दिलें. त्याचप्रमाणें त्याला लिहिणें, वाचणें, हिशेब ठेवणें वगैरे शिक्षण देऊन जहागिरीच्या कारभाराचीही त्यास माहिती दिली. आपल्याबरोबर दादाजीनें शिवाजीस गांवोगांव हिंडवून जमिनीची पहाणी करणें, शेतीस उत्तेजन देणें, वसूल ठरवून देणें, लोकस्थिति सुधारणें, गांवांतील तंटे मिटविणें वगैरेसंबंधीं प्रत्यक्ष माहिती दिली. या सर्व गोष्टींमुळें शिवाजी मोठा अनुभवी व वाकबगार झाला. आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच तो आपल्या जहागिरीची व्यवस्था पाहूं लागला. सन १६४४ मध्येंच निंबाळकरांच्या सईबाईशीं व शिर्क्यांच्या सोयराबाईशीं शिवाजीचीं लग्नें, शहाजीनें स्वतः पुण्यास येऊन, लावून दिलीं होतीं.

२. प्रारंभींची कामगिरी :—जिजाबाई व दादाजी कोंडदेव यांच्या तालमींत तयार झाल्यावर शिवाजी मोठीं धाडसाचीं व जोखमीचीं कामें करूं लागला. गांवोगांव हिंडावें, आपल्याबरोबर जिवलग स्नेही जमवावे, स्वारी-शिकारीच्या निमित्तानें डोंगरी मुलुख पायीं तुडवावा, किल्ल्यांच्या चोरवाटा माहीत करून घ्याव्या, लोकांची स्थिति अजमावावी व एकंदर परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करावें हा शिवाजीचा नित्याचाच क्रम होऊन बसला. त्यामुळें थोड्याच दिवसांत त्याला येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी पासलकर वगैरे जिवास जीव देणारे सोबती मिळाले. मावळ प्रांताची पहाणी करून त्या सर्वांनीं आपले पुढील बेत आंखून ठेवले. शिवाजीच्या या उद्योगांत दादाजीची त्यास प्रच्छन्न सहानुभूति होतीच. शिवाय त्याच्या हाताखालीं तरबेज झालेले मोरोपंत पिंगळे, आनाजी दत्तो, निळाजी पंडित वगैरे मंडळी व जिजाबाईच्या माहेरची आबाजी सोनदेव, रघुनाथ बल्लाळ कोरडे, पानसंबळ, बाळकृष्णपंत मुजुमदार वगैरे मंडळीही शिवाजीस मदत करूं लागली. दादाजी सन १६४७ मध्यें वारला. त्याच्या आदल्याच वर्षी शिवाजीनें तोरण्यावर ‘ स्वराज्याचें तोरण ’ उभारलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोरणा किल्ला घेतल्यावर शिवाजी त्याची डागडुजी करूं लागला. तेव्हां त्याला तेथें मोहोरांचा एक हंडा सांपडला. त्याच्या जोरावरच त्यानें नवी



कल्याण–खजिना

सैन्यभरती केली व राजगड नांवाचा नवा किल्ला बांधला. नंतर त्यानें चाकण, कोंडाणें (ऊर्फ सिंहगड), पुरंदर व रोहिडा हे किल्ले घेतले. त्याच-वेळीं कल्याणचा सुभेदार मुल्लाना अहमद हा विजापुरास खजिना पाठवीत असतां आबाजी सोनदेव याला त्याच्यावर पाठवून तो खजिना व कल्याणप्रांत शिवाजीनें घेतला. त्यानंतर त्यानें लोहगड व राजमाची हे किल्ले घेऊन व राजापुरापर्यंत स्वारी करून बरीच लूट जमविली. बाजी मोहिते हा शहाजीच्या दुसऱ्या बायकोचा भाऊ. तो सुपें येथें होता. तो शिवाजीस विरोध करी–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां शिवाजीनें त्याच्यावर छापा घालून त्याला कैद केलें व शहाजीकडे पाठवून दिलें. त्यानंतर त्यानें जंजिऱ्याच्या सिद्दीच्या प्रांतावर स्वारी करून त्या प्रांतांतील कित्येक किल्ले हस्तगत केले. त्यांतच रायगड किल्लाही होता. त्याची डागडुजी करून त्याचा शिवाजीनें चांगलाच बंदोबस्त केला. शिवाजीच्या या सर्व उपक्रमांमुळें थोड्याच काळांत कल्याणपासून राजापूर-पर्यंतचा मुलूख त्याच्या ताब्यांत आला. त्याचा त्यानें उत्तम बंदोबस्त ठेवून फौजफांटा जमविला व सर्वत्र आपली जरब बसविली.

३. शहाजीची कैद (१६४८):—शिवाजीच्या या उपक्रमाची हकीकत विजापुरास कळली. त्याच्या या कृत्यांस शहाजीची फूस असावी असा विजापुरकरांस संशय आला. तेव्हां बाजी घोरपडे याच्याकरवीं दगा करून शहाजीस कैद करण्यांत आलें. ही बातमी शिवाजीस समजल्यावर त्याला वाईट वाटलें. शिवाजीचा पाडाव करण्याकरितां मुसेखान नामक सरदारही पाठविण्यांत आला. परंतु शिवाजीनें न डगमगतां मुसेखानाचा पुरंदरनजीक पराभव करून त्यास ठार मारलें. त्यावेळीं शिवाजीनें अत्यंत चातुर्यानें व धूर्ततेनें वागून शहाजीच्या सुटकेकरितां दिल्लीच्या शाहजहान बादशहाकडे आपले वकील पाठवून त्याची नोकरी करण्याची तयारी दर्शविली. मराठे वश झाल्यास विजापुरचें राज्य जिंकण्यास सोपें जाईल असें शाहजहानासही वाटलें. शहाजी व शिवाजी यांची योग्यताही तो जाणून होता. तेव्हां त्यानें विजापुरकरांस पत्र पाठवून शहाजीस सोडून देण्यास सांगितलें. अर्थात विजापुरच्या अदिलशहास मोंगल बादशहाचा हुकूम मानणें भाग पडलें. त्याप्रमाणें शहाजीची सुटका झाली; मात्र त्यास विजापुरींच ठेवून घेण्यांत आलें. पुढें विजापुरकरांस न दुखवितां आपल्या छोट्या राज्याची स्थिर-स्थावर करण्यांतच शिवाजीनें पांचसहा वर्षें घालविलीं.

४. जावळीचे चंद्रराव मोरे:—चंद्रराव मोरे हा जावळी प्रांतांत विजापुरकरांचा जहागिरदार होता. स्वराज्यस्थापनेच्या कामीं शिवाजीस मदत करण्याऐवजीं तो त्यास अडथळे करी. ही गोष्ट शिवाजीस आवडत नसे. सन १६५२ च्या सुमारास शिवाजीचा बंदोबस्त करण्याकरितां विजापुरकरांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजी शामराज याला सैन्यासह पाठविलें होतें. त्याला चंद्ररावाची मदत होती. पुढें शिवाजीनें शामराजास गांठून त्याची दाणादाण केली व त्याला पळवून लावलें. त्यानंतर त्यानें चंद्ररावावर स्वारी केली. चंद्रराव शिवाजीस शरण आला; परंतु विजापुरकरांशीं त्याचे चालू असलेले गुप्त बेत कळून आल्यावर शिवाजीनें त्याला व त्याच्या दोन मुलांस ठार मारून त्याचा जावळी प्रांत हस्तगत केला (१६५५). त्या प्रांताच्या रक्षणाकरितां त्यानें प्रतापगड नांवाचा एक किल्ला महाबळेश्वराजवळ बांधून तेथें आपल्या कुलस्वामिनीची–भवानी देवीची–स्थापना केली.

५. प्रतापगडचें युद्ध:—यावेळीं मोंगलांचा दक्षिणेचा सुभेदार औरंगजेब विजापूर व गोवळकोंडा हीं राज्यें जिंकण्यास पुढें सरसावला होता. त्याच्याशीं विजापुरकरांचा झगडा चालू होता. त्यावेळीं शिवाजीनें विजापुरकरांस मदत करण्याचें ठरवून मोंगलांचें जुन्नर शहर लुटलें. पुढें मोंगल व विजापुरकर यांच्यांत तह झाला व औरंगजेब दिल्लीचें राज्य मिळविण्याकरितां उत्तरेस निघून गेला. मात्र जातांना त्यानें शिवाजीशीं वरवर सख्य केलें. त्यानंतर शिवाजीनें विजापुरकरांच्या मुलुखावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्याकरितां विजापुरकरांनीं अफजलखान हा शूर व पराक्रमी सरदार शिवाजीवर पाठविला. ‘शिवाजीस पकडून आणावें किंवा त्यास ठार मारावें’ असा अफजलखानास हुकूम होता. अफजलखान चाल करून येतो आहे असें पाहून शिवाजी प्रतापगडावर



अफजलखान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाऊन राहिला. ही बातमी कळतांच अफजलखान वांई प्रांतांत तळ देऊन राहिला. तेथून शिवाजीशीं बोलणें करण्याकरितां त्यानें आपला वकील



किल्ले प्रतापगड

कृष्णाजी भास्कर कुळकर्णी यास पाठविलें. खानाशीं उघड सामना देणें शक्य नाहीं अशी शिवाजीचीही खात्री होती. तेव्हां त्यानें पंताजी गोपीनाथ याला खानाकडे पाठवून भेटीची इच्छा दर्शविली. त्यावेळीं तह करण्यास मी तयार आहें असेंही त्यानें कळविलें. त्याप्रमाणें दिवस ठरला. प्रतापगडाच्या खालीं भेटीकरितां मंडप उभारण्यांत आला. ठरलेल्या वेळीं खानाची भेट घेण्यास शिवाजी आला असतां खानानें शिवाजीवर हत्यार चालविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां शिवाजीनें खानावर उलट हल्ला करून त्याचा वध केला (१६५९). खानाचा वध झाल्याबरोबर प्रतापगडच्या झाडींत आधींच लपवून ठेवलेली मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर यांच्या नेतृत्वाखालीं असलेली शिवाजीची फौज खानाच्या सैन्यावर चालून गेली. तिनें खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. शिवाजीच्या या धाडसी कृत्यामुळें विजापुरकरांस चांगलाच धक्का

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बसला. यामुळें शिवाजीची स्वकीय व परकीय लोकांवर छाप बसली व त्याचें वैभव वाढलें. या युद्धाच्या वेळीं शिवाजीस भारी लूट मिळाली ती निराळीच.

६. **पन्हाळगडचा सामना** :—नेताजी पालकर व मोरोपंत पिंगळे यांनीं खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली होती. तेव्हां त्यांना शिवाजीनें पन्हाळगडाकडे मोहीम काढण्यास सुचविलें. प्रथम त्यांनीं वांई-सातारा प्रांत हस्तगत केला व नंतर पन्हाळगडही घेतला. तेव्हां शिवाजीवर रुस्तुमजमानखानास पाठविण्यांत आलें. अफजलखानाचा मुलगा फाजलखान हाही त्याच्याबरोबर होता. परंतु त्यांचा शिवाजीनें पराभव करून त्यांस पिटाळून लावलें. पुढें सिद्दी जौहर या सरदाराची फाजलखानासह शिवाजीवर रवानगी



शिवाजी–रुस्तुमजमान युद्ध

करण्यांत आली. त्यानें शिवाजीस पन्हाळगडावर कोंडून टाकलें. तेव्हां तह करण्याचें आमिष शिवाजीनें दाखविलें. एके रात्रीं शत्रू बेसावध आहे असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहून शत्रूची फळी फोडून पन्हाळ्याहून शिवाजी निसटला व विशाळगडीं निघाला. ती बातमी कळतांच फाजलखानानें त्याचा पाठलाग केला. परंतु विशाळगडाच्या खिंडींत बाजी प्रभु देशपांडे यानें निकरानें लढून त्याला पुढें जाऊं दिलें नाहीं. मात्र तसें करण्यांत त्या स्वामिनिष्ठ सरदारास आपल्या प्राणांस मुकावें लागलें. या पराभवामुळें सिद्दी जौहरवर विजापुरकरांची इतराजी होऊन त्याला परत बोलावण्यांत आलें. यानंतर विजापुरकरांनीं शिवाजीशीं तह केला. या तहानें पन्हाळगड विजापुरकरांस देण्याचें शिवाजीनें कबूल केलें (१६६२).

७. इतर युद्धप्रसंग :—याच सुमारास वाडीचे कुडाळकर सावंत शिवाजीस विरोधूं लागले. सन १६५९ मध्यें त्यांच्याशीं त्यानें तह केला होता; परंतु तो तह मोडून ते शिवाजीस अडथळा करूं लागले. तेव्हां त्यानें त्यांच्यावर स्वारी करून त्यांचा पराभव केला; व त्यांचा प्रांत हस्तगत केला. त्याचवेळीं जंजिऱ्याच्या सिद्दीशींही त्याचा खटका उडाला. तेव्हां आरमार व सैन्य यांच्यासह शिवाजीनें निळोपंत व रघुनाथपंत यांस सिद्दीवर पाठविलें. त्यांनीं दंडाराजपुरीपर्यंतचा मुलूख जिंकला. सिद्दीला शह देण्याकरितां सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग वगैरे किल्लेही शिवाजीनें बांधले व उत्कृष्ट आरमार तयार केलें. सन १६६२ मध्यें सिद्दीचा पराभव झाल्यानें त्यानें शिवाजीशीं तह केला. पुढें मुधोळचा बाजी घोरपडे यावर शिवाजीनें स्वारी केली. त्यानेंच मागें दगा करून शहाजीस पकडून विजापुरकरांच्या ताब्यांत दिलें होतें. मुधोळास बाजी बेसावध असतांच शिवाजीनें त्याला पकडून ठार मारलें (१६६४).

८. शहाजीचा मृत्यु (१६६४) :—विजापुरकरांशीं तह झाला तो शहाजीच्या मध्यस्थीनेंच झाला होता. त्यावेळीं तो तह घडवून आणण्याकरितां शहाजी मुद्दाम पुणें प्रांतीं आला होता. जेजुरीस पितापुत्रांची मोठ्या समारंभानें भेट झाली. शिवाजीच्या कर्तृत्वाबद्दल धन्योद्गार काढून 'आम्ही जिवंत आहोंत, तोंपर्यंत विजापुरकरांशीं झगडूं नये' अशी कबुली शहाजीनें मुलाकडून घेतली होती व सन १६६२ चा तह घडवून आणला होता. पुढें कर्नाटकांत गेल्यावर सन १६६४ मध्यें शहाजी एकाएकी, शिकार करीत असतां, मरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पावला. शौर्य, उत्साह, इमान, पराक्रम, मुत्सद्देगिरी वगैरे गुणांत त्याचा हात धरणारा त्याच्या वेळीं दुसरा कोणी नव्हता. शिवाजीच्या पराक्रमामुळें त्याची कर्तबगारी लोपल्यासारखी दिसत असली, तरी स्वराज्याची मूळ कल्पना त्याचीच होती व त्याची तयारीही त्यानें केली होती यांत शंका नाहीं. त्यानें शिवाजीच्या अचाट उद्योगास पायबंद घातल्याचें उदाहरण नाहीं. यामुळें शिवाजी मराठ्यांच्या स्वातंत्र्याचा संस्थापक ठरत असला तरी शहाजी संकल्पक होता असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. शहाजीच्या मृत्यूनंतरच शिवाजीनें 'राजा' हें पद धारण केलें व आपल्या नांवाचें नाणें पाडलें.

अभ्यास

१. शिवाजीच्या बाळपणीं त्याला कोणीं व कशाप्रकारचें शिक्षण दिलें ? त्याचा शिवाजीला काय उपयोग झाला ?
२. स्वराज्य स्थापण्याकरितां शिवाजीनें प्रथम कोणती कामगिरी बजावली ? त्याला कोणकोण साथीदार मिळाले ? त्यांच्याकरवीं त्यानें कोणते पराक्रम गाजविले ?
३. शिवाजीनें अफजलखान, बाजी घोरपडे व मोरे यांचा वध कां केला ?
४. शहाजीचें चरित्र व योग्यता वर्णा.
५. खालीलसंबंधीं टीपा लिहा.
प्रतापगडचें युद्ध, कल्याणचा खजिना, पन्हाळगडचा वेढा, सिद्दीचा पराभव, शहाजीची कैद.
६. सरदेसाई, चिं. वि. वैद्य यांचीं शिवाजीचीं चरित्रें वाचा. कॅ. मोडक-कृत–प्रतापगडचें युद्ध, कुंटेकृत–राजा शिवाजी, ह. ना. आपटेकृत–उषःकाल हीं पुस्तकें वाचा.

उतारे

१. राज्यस्थापनेची पूर्वतयारी

अवघे मावळचे देशमुख येके जागा बैसले, तेव्हां अवघे देशमुख बोलिले कीं तुमचा विचार काये तो सांगणें. तेव्हां बोलले कीं आम्ही राजश्री स्वामीच्या पायांसी इमान धरून वतनास देखील पाणी सोडलें. आम्ही व आपले लेक देखील राजश्री स्वामी पुढें खस्त होवे (खर्चीं पडावे) यैसा आमचा दृढ विचार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. तुमचा मुदा (मुद्दा) काय तो बोलणें. मुसलमान बेइमान आहे. कार्य जालियावरि नस्ते निमित्य ठेऊन नाश करील. हें मऱ्हष्टराज्य आहे. अवघियांनीं हिंमत धरून जमाव घेऊन राजश्री स्वामी संनिध राहोन येकनिष्ठेनें शेवा करावी. यैश्या हिंमतीच्या गोष्टी सांगितल्या तेव्हां अवघे देशमुख बोलिले कीं तुमचा विचार तोच आमचा विचार. इमानपुस्कर आहे. तेव्हां अवघे देशमुख घेऊन राजश्री स्वामी संनिध आले. अवघ्यांनीं शफत केली. मग अवघ्यास भोजनास घातले. त्यावरी अगदी मावळचा जमाव केला.

प्रश्न :—१. ही मजलस कोणाकोणांमध्यें झाली ? त्यांत काय ठरलें ? शिवाजीनें काय सांगितलें ? लोकांनीं कसल्या शपथा घेतल्या ? कशाकरितां ?

२. शिवाजीची मुद्रा

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥

शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥ १ ॥

प्रश्न :—१. शिवाजीनें ही मुद्रा केव्हां तयार केली ? तिचा अर्थ काय ?

३. प्रतापगडाच्या युद्धाच्या वेळची सावधगिरी—१६५९

कार्तिकमासी अफजलखानानें प्रतापगडास कृष्णराव हेजीब राजश्री स्वामीकडे पाठविला. त्यांस वस्त्रें देऊन प्रतापगडाखालीं भेट व्हावी हा निश्चय करून मागते पाठविले. तेव्हां अंतस्थे विचार कान्होजी जेधे व सरकारकून बैसोन राजश्री स्वामीनीं विचार केला कीं, ' मुसलमान बेमान आहे. बांदलाचा जमाव जाउलीस व दराच्या रानांत रहाणें. कदाचित भेटीचे समयीं त्यानें बेइमानी केली तरी त्याचें लष्कर पायथ्यास आहे, तें डोंगरास चढूं न देणें. आणि निवडक माणूस घेऊन आपली मदत करणें. कदाचित श्री अंबेच्या वरदे अफजलखान मृत्यु पावला तरी इशारतीचे आवाज गडावरी होतील. तेव्हां पायथ्यावरील लष्करावर चालून घेऊन अगदीं लष्कर बुडविणें. हैबतराऊ व बाळाजी नाईक सिलीमकर जमावानिसी बोचे घोळीचे घाटीं ठेविले आहेत. ते लष्करास घाट चढूं देणार नाहींत.' यैसा अंतस्थ विचार जाला आणि बंदोबस्ती केली.

—जेधे शकावलीवरून.

प्रश्न :—१. शिवाजीनें कोणता बंदोबस्त केला होता ? तो कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६. मोंगलांशीं सामना व राज्याभिषेक

१. मोगलांशीं सामना (१६६२) :—विजापुरकरांशीं शिवाजीचें युद्ध चालू असतांच औरंगजेबानें आपला मामा शायिस्तेखान यास शिवाजीवर पाठविलें होतें. त्यावेळीं तो दक्षिणेचा सुभेदार होता. तेव्हां औरंजेबाच्या हुकुमाप्रमाणें शायिस्तेखान शिवाजीवर चालून आला. त्यावेळीं शिवाजी पन्हाळगडावर अडकून पडला होता. तेव्हां विजापुरकरांशीं तह करून तो मोंगलांशीं लढण्यास तयार झाला. मध्यंतरींच्या वेळांत शायिस्तेखान पुणें, सुपें, बारामती, चाकण वगैरे टापू काबीज करून पुण्यास खुद्द शिवाजीच्या वाड्यांत ठाण देऊन बसला. तेथें तो दोन वर्षें स्वस्थ होता. त्या काळांत शिवाजीनें राजापुरावर हल्ला केला. तेथील इंग्रजांची वखार लुटण्याचा धाक घालून त्यांच्याकडून पुष्कळ खंडणी वसूल केली. त्याचवेळीं शायिस्तेखानाच्या हुकुमानें करतलबखानानें शिवाजीच्या कोंकण प्रांतावर हल्ला चढविण्याची तयारी केली. परंतु शिवाजीनें लोहगडाजवळ उंबरखिंडींत त्याला गांठून त्याच्या सर्व सैन्याची कत्तल करण्याची वेळ आणली. तेव्हां खान शिवाजीस शरण गेला. त्यानंतर एके रात्रीं शिवाजीनें शायिस्तेखानावर अचानक छापा घालून त्याच्या मुलास ठार मारलें. खानाचीही तीच गत व्हावयाची; परंतु वाड्याच्या खिडकींतून पळून जात असतां बोटांवरच निभावलें. यावेळीं शिवाजीनें ज्या धाडसी युक्तीचा अवलंब केला त्यावरून त्याच्या चातुर्याची प्रशंसा होते. या प्रसंगानंतर शायिस्तेखान पळून औरंगाबादेस गेला. सर्व हकीकत कळल्यावर औरंगजेबाला खानाचा राग आला व त्यानें त्याची बंगाल प्रांतावर नेमणूक केली. शायिस्तेखानाच्या पराभवानें शिवाजीचा दरारा अधिकच वाढला.

२. सुरतेवर स्वारी (१६६४) :—शायिस्तेखानाच्या पराभवानंतर शिवाजीनें मोंगली मुलुखावर आक्रमण सुरू केलें. सन १६६४ मध्यें त्यानें सुरत हें धनाढ्य व्यापारी शहर लुटलें. तेथील इंग्रजांनीं आपल्या वखारींचें संरक्षण केलें असें म्हणतात. या लुटींत शिवाजीला अगणित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपत्ति मिळाली. त्यानंतर त्यानें मोंगली मुलुखांत धुमाकूळ मांडून अहमदनगर-पर्यंतचा मुलूख लुटला. सुरतेची हकीकत कळल्यावर औरंगजेब फारच रागावला. तेव्हां शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां त्यानें सन १६६५ मध्यें राजा जयसिंह व दिलेरखान यांस मोठ्या सैन्यानिशीं शिवाजीवर पाठविलें. ते दोघे सरदार पुण्यापर्यंत आले. तेव्हां जयसिंहानें सिंहगडास व दिलेरखानानें पुरंदरास वेढा दिला. ते दोन्ही सरदार मोठे अनुभवी, हिकमती व तडफदार होते.



२. पुरंदरचा वेढा व तह (१६६५):—जयसिंह व दिलेरखान यांच्या सैन्याशीं आपल्याला योग्य ती टक्कर देतां येणार नाहीं हें शिवाजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओळखून होता. पुरंदरच्या वेढ्यांत शिवाजीचा अत्यंत विश्वासू, शूर व पराक्रमी सरदार मुरारबाजी हा लढत असतां पडला. मोंगल सैन्यानें इतरत्रही मोठा जोर केला. हें पाहून शिवाजीनें जयसिंहाची भेट घेऊन तहाचें बोलणें



सुरू केलें. शेवटीं तह ठरला. आपल्याकडे फक्त बारा किल्ले ठेवून मोंगलांस बावीस किल्ले शिवाजीनें द्यावे, त्यानें मोंगलांचें मांडलिकत्व पत्करावें व विजापुरकरांविरुद्ध त्यानें मोंगलांस मदत करावी अशीं कलमें त्या तहांत ठरलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचप्रमाणें शिवाजीनें बादशहाच्या भेटीकरितां दिल्लीस जावें व संभाजीनें बादशाही फौजेंत नोकरी स्वीकारावी असेंही ठरलें. या तहासच 'पुरंदरचा तह' असें म्हणतात. तो सन १६६५ मध्यें झाला. मात्र विजापुरकरांच्या ताब्यांतील कोंकण प्रांत जिंकण्याची शिवाजीस बादशहानें परवानगी दिली.

४. आग्र्याहून सुटका (१६६६) :—पुरंदरच्या तहांत ठरल्याप्रमाणें सन १६६६ मध्यें शिवाजी आग्र्यास गेला. आपल्या जिवास अपाय होणार नाहीं अशी जयसिंहाकडून त्यानें हमी घेतली होती. आपला मुलगा रामसिंह यास पत्र लिहून शिवाजीची उत्तम बडदास्त ठेवण्यास जयसिंहानें कळविलें होतें. शिवाजीबरोबर त्याचा मुलगा संभाजी, तानाजी, येसाजी, बाळाजी आवजी, प्रतापराव गुजर, हिरोजी फर्जंद, सर्जेराव जेधे वगैरे मंडळी गेली होती. ता. १२–५–६६ रोजीं औरंगजेबानें आपल्या पन्नासाव्या वाढदिवशीं दिवाण-इ-खास-मध्यें मोठा दरबार भरवून शिवाजीची भेट घेतली. तेथें शिवाजीचा अपमान झाला. त्यामुळें राग अनावर होऊन तो बेशुद्ध पडला. पुढें त्याला त्याच्या राहत्या घरीं नेण्यांत आलें. तेथेंच बादशहानें त्याला नजरकैद केलें. तेथें तो तीन महिने होता. त्यावेळीं आपल्या सुटकेकरितां शिवाजीनें एक अजब युक्ति लढविली. अमीर-उमरावांस भेटीदाखल त्यानें मेवामिठाईच्या टोपल्या पाठविण्याचा प्रघात पाडला. पुढें त्यानें आजारीपणाची हूल उठविली. एके दिवशीं हिरोजी फर्जंदला आपल्या जागीं निजवून तो व पुत्र संभाजी दोन पेटाऱ्यांत बसले व ते आग्र्याबाहेर निसटले. थोड्या वेळानें फर्जंदही तेथून निसटला. त्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत बैराग्याच्या वेशानें दोन महिने हिंडून सर्व मंडळी महाराष्ट्रांत रायगडीं सुखरूप आली. त्यामुळें सर्वत्र आनंदीआनंद झाला. औरंगजेबानें त्यांचा पुष्कळ शोध करविला; पण व्यर्थ !

५. मोंगलांशीं पुन्हां युद्ध (१६६७) :—सुटून येतांच शिवाजीनें मोंगलांच्या मुलखावर चढाई केली व त्यानें आपले गेलेले सर्व किल्ले भराभर परत घेण्यास सुरुवात केली. त्यामुळें जयसिंहालाही माघार घ्यावी लागली. तो सन १६६७ मध्यें दिल्लीस परत जात असतांच बऱ्हाणपूर येथें मरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पावला. त्यानंतर मोंगलांस युद्धाचा कंटाळा आला. तेव्हां दक्षिणचा सुभेदार मुअज्जम यानें मराठ्यांशीं तह केला (१६६८). त्या तहानें शिवाजीस 'राजा' म्हणून मोंगलांनीं मान्य केलें व वऱ्हाड-खानदेशाची जहागीर त्याला दिली. मात्र पुरंदर व सिंहगड हे किल्ले मोंगलांकडे ठेवण्याचें शिवाजीनें कबूल केलें. यानंतर अदिलशाह व कुतुबशाह यांनींही शिवाजीशीं तह करून ठराविक खंडणी देण्याचें मान्य केलें. तशाच तऱ्हेचा तह पोर्तुगीजांनींही शिवाजीशीं केला.

६. सिंहगड व साल्हेर येथील युद्धें :—सिंहगड आपल्या ताब्यांतून गेला ही गोष्ट शिवाजीस फार डाचत होती. तेव्हां सन १६७० मध्यें त्यानें तानाजी मालुसऱ्यास तो घेण्यास सांगितलें. पराक्रमाची मोठी शर्थ करून तानाजीनें तो किल्ला घेतला. मात्र त्याला त्याकरितां आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. गड हातीं आल्यामुळें शिवाजीला आनंद झाला खरा; पण तानाजीसारखा सिंह गेल्यानें त्याला अत्यंत शोक झाला. त्यामुळेंच शिवाजीनें त्या गडाला–कोंडाणें गडाला–'सिंहगड' हें नांव दिलें. त्यानंतर शिवाजीनें सन १६७० मध्यें सुरत शहर पुन्हां लुटलें. ती लूट परत आणीत असतांच नाशिक जिल्ह्यांत शिरून त्यानें तेथील दाऊदखानाचा पराभव केला. तेव्हां शिवाजीचा पराभव करण्याकरितां इखलासखान व बोहलूलखान हे मोंगल सरदार त्याच्यावर चालून आले. साल्हेर येथें अगदीं समोरासमोर असें पहिलेंच मोठें धुमश्चक्री युद्ध झालें (१६७२). मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांनीं पराक्रमाची शर्थ करून त्या लढाईत मोंगलांचा संपूर्ण पराभव केला. यानंतर शिवाजीच्या स्वतंत्र राज्यास बादशहानें कबुली दिली व संभाजीस पांच हजारांची मनसब दिली.

७. विजापुरकरांशीं युद्ध (१६७२–७३) :—ह्या युद्धानंतर बहादुरखान हा मोंगल सरदार भीमेच्या कांठीं तळ देऊन बसला. त्याचवेळीं विजापुरीं अलीअदिलशहाच्या मृत्यूनें दुफळी माजली होती. तेव्हां त्याचा फायदा घेऊन विजापुरच्या मुलुखावर शिवाजी चालून गेला. पन्हाळा किल्ला त्यानें काबीज करून प्रतापराव गुजराकडून हुबळी शहर लुटविलें. त्यानंतर परळी, सातारा वगैरे किल्ले त्यानें जिंकून घेतले. त्याचवेळीं उंबराणी व जेसरी या ठिकाणीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठ्या निकराच्या लढाया होऊन विजापुरकरांचा पराभव झाला. या मोहिमांतच धनाजी जाधव, संताजी घोरपडे, हंबीरराव मोहिते हे सरदार प्रसिद्धी पावले. मात्र प्रतापराव गुजर कामास आला. या विजयानंतर विजापुरकरांनीं शिवाजीशीं तह केला.

८. राज्याभिषेक (१६७४):—गेलीं तीस वर्षें शिवाजीनें अहर्निश खटपट करून मोठें राज्य स्थापन केलें. मोंगलांचा पराभव करून त्यांस



शिवाजी-राज्याभिषेक दरबार

आपल्या शक्तीची चुणूक दाखविली. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांस आपलें मांडलिकत्व पत्करण्यास भाग पाडलें. मराठ्यांच्या ठिकाणीं अपूर्व जोम, जागृति व हुरूप उत्पन्न करून त्यांच्या स्वतंत्र राष्ट्राची त्यानें उभारणी केली. तेव्हां आपलें स्वतंत्र राज्य सर्वांस जाहीर करणें त्यास भाग होतें. त्याकरितांच त्यानें स्वतःस राज्याभिषेक करून घेण्याचें ठरविलें. हा धार्मिक विधि मोठ्या समारंभानें ता. ६ जून, १६७४ रोजीं रायगड या आपल्या राजधानीच्या ठिकाणीं त्यानें घडवून आणला. प्रसिद्ध काशीकर पंडित गागाभट्ट यानें निरनिराळ्या ठिकाणचीं तीर्थोदकें आणून शिवाजीस विधिपूर्वक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्याभिषेक केला. हा अपूर्व सोहळा पाहण्याकरितां अनेक लोक रायगडीं जमा झाले होते. इंग्रज, पोर्तुगीज, विजापुरकर वगैरे सर्वांनीं त्याप्रसंगीं शिवाजीस मोठमोठे नजराणे दिले. हा एकंदर समारंभ पाहून जिजाबाईस अत्यंत धन्यता वाटली. मात्र त्यानंतर फक्त बारा दिवसांनींच ती मृत झाली.

९. **महत्त्वाचीं कृत्यें :**—राज्याभिषेकाच्या वेळींच शिवाजीनें 'छत्रपति' हा किताब धारण केला, 'भगवा झेंडा' हें आपलें राष्ट्रीय निशाण ठरविलें, 'राज्याभिषेक शक' म्हणून नवा शक सुरू केला, अष्टप्रधानांची नेमणूक केली, आपली सुवर्णतुला करून अगणित दानधर्म केला व देवस्थानांस वार्षिक उत्पन्नें बांधून दिलीं. या समारंभास सुमारें पांच कोटी रुपये खर्च झाला. गोब्राह्मणप्रतिपालन, स्वधर्मसंरक्षण व स्वराष्ट्रसंवर्धन हें शिवाजीच्या राज्याचें



शिवाजीची रायगडावरील छत्री

ब्रीद होतें. अर्थात या समारंभामुळें शिवाजीचा दरारा वाढला व हिंदवी स्वराज्याला मूर्तस्वरूप आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. कर्नाटकची स्वारी व अखेर :—राज्याभिषेकानंतर शिवाजीनें दोन-तीन वर्षें राज्याची व्यवस्था करण्यांत खर्च केलीं. त्याचवेळीं त्यानें रघुनाथपंत हणमंते याच्या सूचनेवरून कर्नाटकवर स्वारी करण्याचा बेत केला. सन १६७७ मध्यें शिवाजी त्या स्वारीवर निघाला. प्रथम गोवळकोंड्याच्या सुलतानाकडून खंडणी वसूल करून त्यानें मद्रासपर्यंतचा कर्नाटकांतील मुलूख जिंकला. जिंजीचा किल्लाही त्यानें काबीज केला. या सर्व उद्योगांत तो असतां त्याचा सावत्र भाऊ व्यंकोजी ऊर्फ एकोजी याचें त्याला साहाय्य झालें नाहीं. तेव्हां त्यानें त्याजपाशीं दक्षिणेंतील आपला हिस्सा म्हणून अर्ध्या राज्याची मागणी केली. ती एकोजीनें नाकारली. तेव्हां त्याचा पराभव करून शिवाजीनें त्याला तह करावयास लावलें. मात्र एकोजीकडे तंजावरचें सर्व राज्य सोंपवून शिवाजी सन १६७८ मध्यें रायगडीं परत आला. त्याचवेळीं मोंगलांनीं विजापुरकरांवर स्वारी केली असतां शिवाजीनें विजापुरकरांस मदत केली. त्या युद्धांत मोंगलांचा पुन्हां पराभव झाला. या युद्धांत शिवाजीला अतिशय दगदग झाली व त्यांतच तो आजारी पडून सन १६८० मध्यें रायगडीं मृत्यु पावला. त्यावेळीं त्याचें वय पन्नास होतें.

अभ्यास

१. शिवाजीनें मोगलांशीं केलेल्या सामन्याचें थोडक्यांत वर्णन करा.

२. खालील प्रश्नांचीं उत्तरें सांगा.

(अ) शिवाजीनें स्वतःस राज्याभिषेक कां करून घेतला ? त्यानंतर त्यानें कोणतीं महत्त्वाचीं कृत्यें केलीं ?

(आ) दक्षिणेंत कर्नाटकावर स्वारी करण्यांत शिवाजीचा हेतु कोणता ? तो साधला ?

(इ) मोगलांशीं त्यानें सन १६६५ मध्यें तह कां केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

(ई) शिवाजीनें आग्र्याहून सुटका कशी करून घेतली ?

३. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
राजा जयसिंह, दिलेरखान, रामसिंह, साल्हेर, सिंहगड, हिरोजी फर्जंद, उंबरखिंड, सुराखाजी, एकोजी, भगवा झेंडा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. शिवाजीच्या चरित्रांतील बहारदार प्रसंग घेऊन त्यांची माहिती सांगा.
५. चंद्रराव मोरे, अफजलखान व बाजी घोरपडे यांना शिवाजीनें ठार केलें. त्या प्रत्येक प्रसंगासंबंधीं साधकबाधक माहिती मिळवून तुमच्या वादविवाद सभेंत चर्चा करा.
६. 'शिवाजीचा जन्मशक कोणता' या विषयावर ५० ओळी निबंध लिहा.
७. ह. ना. आपटेकृत–गड आला पण सिंह गेला, यदुनाथ सरकारकृत–शिवाजी व शिवकाल हीं पुस्तकें वाचा.

उतारे

१. शिवाजीचें जयसिंहास पत्र—थोडा भाग.

हा प्रसंग आम्हीं लोकांनीं आपापसांत लढण्याचा नाहीं. कारण हिंदूंवर या वेळीं मोठें कठिण कार्य येऊन पडलें आहे. आमचीं पोरेंबाळें, देश, धन व पवित्र देवपूजक या सर्वांवर त्याच्यामुळें पराकाष्ठेचें दुःख कोसळलें आहे आणि हाच क्रम आणखी कांहीं दिवस चालेल तर आम्हां हिंदूंचें चिन्हही पृथ्वीवर राहणार नाहीं. मूठभर मुसलमानांनीं आमच्या एवढ्या देशावर प्रभुत्व गाजवावें ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. पण हें प्रभुत्व त्यांच्या पराक्रमाचें फळ नाहीं. जर तुला अकलेचे डोळे असतील तर पहा. आम्हीं लोकांनीं या वेळीं हिंदु, हिंदुस्थान व हिंदुधर्म यांच्या संरक्षणार्थ फार जोराचे प्रयत्न केले पाहिजेत. चोहोंकडून उठावणी करून व भयंकर युद्ध उपस्थित करून रणांगणांत दंगल माजवून आम्हीं लोक आमच्या सेनेच्या लौंटा दिल्ली येथील औरंगजेबाच्या जर्जर झालेल्या घरांत पोहोचवूं; म्हणजे त्याच्या नांवाचें औरंग (राजसिंहासन) राहणार नाहीं व जेब (शोभा) ही राहणार नाहीं. तसेंच त्याची अत्याचारी तरवार राहणार नाहीं. तुम्ही रजपूत उत्तरेंत चोहोंकडून उठावणी करा व मीं व माझे भालेबहाद्दर वीर विजापूर व गोवळकोंडा येथील बादशहांना जिंकतों. अशानें सर्व हिंदुस्थान आपला होईल.

प्रश्न :—१. पत्रावरून शिवाजीचें ध्येय कोणतें ठरतें? त्याला कोणाची मदत पाहिजे होती? २. हें पत्र बनावट असावें असें म्हणतात. कसेंही असलें तरी तें एका समकालीन माणसानें लिहिलेलें आहे. त्याचें महत्त्व कोणतें तें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. शिवाजीचें एकोजीस पत्र—१६७६–७७.

...दुर्योधनासारखी बुधी धरून युद्ध केलें आणि लोक मारविले. जे जाले ते जाले. पुढें तरी हट न करणें. तेरा वर्षे तुम्ही सारे राज्य खादलें तें खादलें. याउपरी कितेक आमचे आम्ही घेतले असे. अरणी, बेंगलूर, कोल्हार, होसकोट, सिरलकटे व किरकोल जागे व चंजाऊर यैसे जे जागे तुमचे हातीं उरले आहेती ते आमचे लोकांचे हातीं देणें. आणि नकद पैके व जडाव व हाती व घोडे यांचा अरधा वाटा देणें. यैसा विचार करून आम्हासी संधी करणें. तुम्ही यैसा संधी निर्मलपणें केलिया आम्ही आपणापासून तुम्हाला तुंगभद्रे आलाड पनालेप्रांते तीन्ही लक्ष होनांची दौलत देऊन; अथवा आम्हाजवळील दौलत तुम्हाला मानेना तरी कुतुबशहास अर्ज करून त्यापासून तुम्हाला तीन लक्षांची दौलत देवऊनु. यैसे दोन्ही विचार तुम्हाला लिहिले आहेत. या दोन्हीमधील एक मनीं धरून मान्य करणें. हटाचे हातीं न देणें. आपल्यांत आपण गृहकलह करावा व कस्टी व्हावें यैसी बुधी मनीं धरून वांटियाचा वेव्हार निर्गमून टाकणें. सुखें असणें. गृहकलह बरा नव्हे.

प्रश्न :—१. शिवाजीनें कर्नाटकांतील कोणता मुलूख मागितला? व्यंकोजीस त्यानें कोणता उपदेश केला? असें करण्यांत त्याचा हेतु काय होता?

३. शिवाजीचें औरंगजेबास पत्र—१६७९.

......सौदागर पुकारा करितात कीं हरएक महालाचें उत्पन्न लाखास एक हजार येणें कठिण जाहलें आहे. पादशाहाचे घरीं दरिद्राचा वास जाहला. तेव्हां पदरचे मंडळीची अवस्था कळतच आहे कीं कितीएक लोकांस पोटास मिळत नाहीं. त्यांजवर जेजिया पट्टी म्हणोन हिंदू लोकांवर आपण कर बसविला, तो मुलगा जाहला म्हणजे दहा रुपये व मुलगी जाहली म्हणजे पांच रुपये. या प्रकारचे करण्यांतच पुरुषार्थ पादशाहा समजतात व तैमूर पादशाहाचें नांव बुडवितात असें जाहलें आहे. न्यायाचे मार्गानें जेजिया पट्टीचा फायदा केवळ गैर. ज्यावर जुलूम जाहला, त्याणें खेद करोन 'हाय हाय' म्हणोन मुखानें धूर काढिल्यास त्या धुरानें जितके लौकर जळेल तितके अग्नीनें जलदी जळतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जळणार नाहीं. याजवर हिंदुलोकांस पीडा करण्यांतच धर्म असेल तर राजा राजसिंह याजपासून जेजिया पट्टी अगोदर घ्यावी.

प्रश्न :—१. शिवाजीनें जिझियाचा निषेध कां केला ? त्यानें तो कर अगोदर कोणापासून घेण्यास सांगितलें ? कां ? बादशहानें हा कां बसविला ? त्याचें प्रमाण किती होतें ?

४. आग्र्याहून सुटका—१६६६.

शिवाजी अखेरीला त्याच्यासारखींच मोठीं वचनें देऊन घात करणाऱ्या बादशहाच्या कचाटींत सांपडला !......बादशहानें वारंवार आमंत्रण केल्यामुळें भाळून गेलेला शिवाजी स्वतःला सुरक्षित समजून...राजनिष्ठा व्यक्त करण्याकरितां म्हणून गेला. परंतु दरबारांत गेल्यावर आपल्यापेक्षां कमी दर्जाचे उमरावांचे खालीं उभें केल्यामुळें, बादशहाची पर्वा न करितां तो निधड्या छातीचा वीर संतापून तिरस्कारानें दरबारचा त्याग करून निघून गेला. बादशहानें त्याच्या समाधानाकरितां अनेक सरदार पाठविले, तरी तो परत येईना. ' आपण युद्धांत जिंकलेले कैदी नाहीं ! तह होऊन भेटीस आलों आहों ' असें तो म्हणाला. बादशहानें नंतर शिवाजीनें बरोबर आणलेल्या सर्व लोकांस रजा देऊन, त्याला फक्त हालचालीची मोकळीक ठेवून त्याच्या घरावर आपल्या लोकांचा इतका कडक पहारा ठेविला कीं बहुतेकांच्या मतानें त्याची तेथून सुटका होणार नाहीं, ' शिवाजीपासून आपली आतां मुक्तता झाली ' असेंच सर्वजण समजत होते.

[थोड्या दिवसांनीं खालील दुसरें पत्र गेलें]

शिवाजीवर इतका कडक पहारा ठेवूनही अखेरीस तो आणि त्याचा मुलगा असे दोघे दोन पेटाऱ्यांत बसून निसटून गेले अशी खात्रीलायक बातमी नुकतीच आली आहे. त्याचा कोठेंच तपास लागत नाहीं. या बाजूच्या प्रांतांत (शिवाजीच्या सुटकेमुळें) सर्वत्र भीति आणि संशय यांचें साम्राज्य पसरलें आहे.

—सुरतकर इंग्रजांचें इंग्लंडला पत्र.

प्रश्न :—१. शिवाजी आग्र्यास कां गेला ? तेथें त्याचा अपमान कोणता झाला ? तेथून तो कसा सुटून आला ? इंग्रजांचें त्याच्यासंबंधीं मत काय होतें ? त्यांस त्याचें भय कां वाटत होतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१६३०–१६८०.

मराठे	इंग्रज	वर्ष	मोंगल	इंग्लंड
			शहाजहान १६२७–५८	पहिला चार्ल्स १६२५–४९
शिवाजीचा जन्म		१६३०		नौकाकर १६३४
				चार्ल्सला फांशी १६४९
	मद्रासेस ठाणें	१६३९		
स्वराज्याचें तोरण		१६४६		क्रॉमवेल १६४९–५८
चंद्रराव मोऱ्याचा वध		१६५५		
			औरंगजेब १६५८–१७०७	
अफजलखान वध		१६५९		दुसरा चार्ल्स १६६०–८५
विजापुरशीं तह		१६६२		
शायिस्तेखानाचा पराभव		१६६३		डंकर्क विकलें
शहाजीचा मृत्यु	सुरतेची लूट	१६६४		
			जयसिंह-दिलेरखान रवानगी १६६५	हॉलंडशीं युद्ध
आग्र्याहून सुटका		१६६६		अग्निप्रलय
	मुंबई बेट मिळालें	१६६८	हिंदूंचीं देवळें पाडण्याचा हुकूम	
सिंहगड काबीज		१६७०		डोव्हरचा तह
राज्याभिषेक		१६७४	रजपुतांशीं युद्ध १६७८	मिल्टनचा मृत्यु
दक्षिण-दिग्विजय		१६७७		
शिवाजीचा मृत्यु		१६८०		व्हिग व टोरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३७. शिवाजीची राज्यव्यवस्था

१. शिवाजीची राज्यव्यवस्था :— शिवाजीनें आपल्या राज्याचे स्वराज्य व मोंगलाई असे दोन भाग पाडले होते. त्याच्या राज्यांत पूर्णपणें मोडणारा मुलूख म्हणजे 'स्वराज्य' होय. मोंगलाई हा परकीयांचा मुलूख

शिवाजी महाराज व त्यांचें हस्ताक्षर

(हस्ताक्षराचा नमुना पुण्याच्या 'आनंदवन भुवन'या कार्यकर्त्यांच्या कृपेनें मिळाला आहे.)

असून त्यांतून तो खंडणी वसूल करीत असे. त्याच्या राज्याचे एकंदर बारा सुभे होते. त्याच्या पोटविभागास 'महाल' अशी संज्ञा होती. खेड्यांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रामपंचायती होत्या. तंट्यांचा निकाल करणें व न्यायदान करणें हें पंचायतींचें मुख्य काम होतें. सुभेदार, महालकरी व कमाविसदार या पगारी अधिकाऱ्यांचें, वसूल करणें हें मुख्य काम होतें. उत्पन्नाच्या दोन पंचमांश शिवाजी सारा घेई. आपत्काळीं तो तगाईही देई. त्याच्या राज्याचें उत्पन्न नऊ कोटी रुपयांचें होतें. तो जहागीर कोणासही देत नसे. पराक्रम गाजविणारांस व देवस्थानांस तो इनाम जमिनी देत असे. मुसलमान अगर हिंदु देवस्थानांचीं उत्पन्नें त्यानें बंद केलीं नाहींत.

२. अष्टप्रधानमंडळ :—आपल्या राज्याची व्यवस्था नीट रहावी म्हणून त्यानें अष्टप्रधानमंडळाची स्थापना केली. राज्याचीं निरनिराळीं कामें त्यानें आठ मंत्र्यांकडे सोंपवून दिलीं होतीं. हे सर्व प्रधान त्यांच्या लायकीवरून निवडले जात. त्यांच्या नेमणुका वंशपरंपरेनें होत नसत. त्यांस नक्त पगार असे. हे सर्व प्रधान लष्करी विद्येंत प्रवीण असत. मुतालिक नामक अधिकारी त्या त्या प्रधानाच्या गैरहजेरींत त्या त्या खात्याचें काम पहात असत. सर्व प्रधान राजाला जबाबदार असत. त्यामुळें शिवाजीनें नियंत्रित राजसत्ता स्थापिली असें म्हणतां येईल. पंतप्रधान ऊर्फ पेशवा, पंत अमात्य ऊर्फ मुजुमदार, पंतसचीव ऊर्फ सुरनीस, मंत्री ऊर्फ वाकनीस, सेनापति ऊर्फ सरनोबत, सुमंत ऊर्फ डबीर, न्यायाधीश व पंडितराव हे अधिकारी त्याच्या अष्टप्रधानमंडळांत होते. मोरोपंत पिंगळे, निळो सोनदेव, अन्नाजी दत्तो, दत्ताजी वोकील, हंबीरराव मोहिते, सोमनाथपंत, निराजी रावजी व रघुनाथपंत हे अनुक्रमें त्याच्या प्रधानमंडळांत अधिकारावर होते. पंतप्रधानास पंधराशें होन पगार होता. पंत अमात्यास बाराशें व इतरांस दहा हजार होन वार्षिक पगार होता.

३. लष्कराची व्यवस्था :—पायदळ व घोडेस्वार हे शिवाजीच्या लष्कराचे दोन भाग होते. पायदळाचा भरणा त्याच्या लष्करांत पुष्कळ होता. त्यांत हेटकरी व मावळे यांची संख्या फार होती. दहा पायदळावर एक नाईक, पांच नाइकांवर एक हवालदार, दोन हवालदारांवर एक जुमलेदार व दहा जुमलेदारांवर 'एकहजारी' अशी त्याची पायदळ–लष्कराची यवस्था होती. पांच हजारीवर सरनोबत असे. सर्वांस पगार वेळेवर व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठराविक मिळे. त्याच्या घोडदळांत बारगीर व शिलेदार असे दोन वर्ग होते. बारगीर पगारी नोकर असत. शिलेदार नक्त नेमणूक घेऊन स्वतःचे घोडे व हत्यारें वापरीत व लष्करांत काम करीत. घोडदळांतही हवालदार, जुमलेदार, सुभेदार व पंचहजारी असे अधिकारी असत. दर पंचवीस घोड्यांसाठीं एक नालबंद व भिस्ती असे. शिवाजीचें पायदळ एक लाख व घोडदळ साठ हजार होते. सैन्याची शिस्त कडक होती. कलालांस व स्त्रियांस लष्करी छावणींत बंदी होती. फौजेंत हेर, सबनीस, कारकून, कारखाननीस वगैरे लोक असत. नोकरींत नवीन इसम घेतांना जुन्या मंडळीकडून त्याचा जामीन घेण्यांत येई. लूट सरकारजमा झाली पाहिजे असा नियम होता. शिवाजीजवळ तोफखाना नव्हता.

४. आरमाराची व्यवस्था :—शिवाजीनें आरमाराकडे दुर्लक्ष केलेलें नव्हतें. कोकण प्रांताच्या संरक्षणाकरितां व सिद्दीचा पाडाव करण्याकरितां



किल्ले विजयदुर्ग

त्यानें आरमाराची उभारणी केली. कुलाबा हें त्याच्या आरमाराचें मुख्य ठिकाण होतें. पश्चिम किनाऱ्याचा बंदोबस्त योग्य व्हावा म्हणून त्यानें विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग वगैरे नवीन किल्ले बांधले. त्याच्या आरमारांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथमतः ८५ जहाजें होतीं; तीं पुढें १६० पर्यंत वाढलीं. मायनाक भंडारी, दौलतखान व सिद्दी मिस्त्री हे त्याच्या आरमारांतील प्रमुख अधिकारी होते. पुढें प्रसिद्धीस आलेला कान्होजी आंग्रे हा प्रथम शिवाजीच्याच आरमारांत होता.

५. किल्ले व त्यांची व्यवस्था :—शिवाजीच्या ताब्यांत एकंदर तीनशें किल्ले होते. प्रत्येक किल्ला लढाऊ दृष्टीनें त्यानें परिपूर्ण ठेवलेला होता. दरेक किल्ल्यावर दारुगोळा, दाणागोटा व भरपूर सैन्य असे. मराठा हवालदार, ब्राह्मण सबनीस व प्रभु कारखाननीस असे तीन अधिकारी प्रत्येक किल्ल्यावर असत. निरनिराळ्या तटांचें संरक्षण, सभोंवतालच्या क्षेत्राचें रक्षण व शिबंदीची व्यवस्था हें काम हवालदाराकडे होतें. वसुलाचें व हिशोबाचें काम सबनिसाचें होतें. धान्याचा व युद्धसामुग्रीचा संचय करणें व किल्ल्याची डागडुजी करणें हें काम कारखाननिसाचें होतें. तिन्ही जातीच्या लोकांकडे निरनिराळीं कामें दिल्यानें मत्सरास जागा नसे. किल्ल्याच्या पायथ्याकडील भागाचें रक्षण करण्याचें काम रामोशी करीत. किल्ल्याच्या आजूबाजूच्या प्रदेशावर अंमल गाजविण्याकरितां किल्ल्याचा उपयोग फार होई. योग्य फौजेच्या मदतीनेंही राज्याचा बचाव करणें किल्ल्यांमुळें शक्य होत असे. या सर्व व्यवस्थेमुळें राज्याचें संरक्षण उत्तम होत असे. त्याकरितां शिवाजी किल्ल्यास फार महत्त्व देत असे.

६. चौथाई व सरदेशमुखी :—आपल्या राज्याच्या प्रसारार्थ शिवाजीनें चौथाई व सरदेशमुखी या हक्कांचा उपयोग फार केला. किंबहुना त्यांच्याच जोरावर त्यानें आपल्या राज्याचा विस्तार केला असें म्हणतां येईल. चौथाई म्हणजे उत्पन्नाच्या एकचतुर्थांश भाग. जिंकलेल्या लोकांकडून हा खंड घेण्यांत येई. मात्र तो देणारांचें शत्रूंकडून संरक्षण करण्याची हमी शिवाजी घेत असे. चौथाई दिली कीं, ती देणाऱ्या गांवाची लूट होत नसे. हा कर शिवाजीस अनायासें मिळत नसे. तो त्याला वसूल करून घ्यावा लागे. तो वसूल करण्याकरितां त्याला थोडा खर्च पडे. तो भागविण्याकरितां एकंदर उत्पन्नाचा दहावा हिस्सा 'सरदेशमुखी' म्हणून चौथाईबरोबर वसूल करण्याची पद्धति शिवाजीनें पुढें पाडली होती. पुढें सरदेशमुखी एक वतनच होऊन बसलें.

७. शिवाजीची योग्यता :—शिवाजीचा चेहेरा सुंदर व पाणीदार होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा गौरवर्ण, तीक्ष्ण व भेदक नजर, लांब व बांकदार नासिका व टोकदार दाढी यामुळें त्याची दुसऱ्यावर विलक्षण छाप पडे. त्याच्या मुद्रेंत त्वरा, निश्चय, करारीपणा, आत्मविश्वास, जागरूकता वगैरे गुण प्रतीत होत असत. तो मध्यम उंचीचा, रेखीव बांध्याचा व सडपातळ होता. त्याची बुद्धि अत्यंत तीव्र होती. संभाषणांत तो इतका कुशल होता कीं, पाहिजे त्याच्यावर त्याची एकदम छाप पडे. त्याची राहाणी साधी होती. नानाविध गोष्टींची त्याला संपूर्ण माहिती होती. मनमिळाऊ व स्वार्थत्यागी असल्यानें त्यानें अनेक लोक जोडले व नानाप्रकारच्या संकटांस निर्भयपणें तोंड दिलें. त्यामुळें त्याला जगाचा उत्तम अनुभव आला होता. अनेक हाल व संकटें त्यानें सोसलीं होतीं. तो जे नियम घालून देई ते तो स्वतः कसोशीनें पाळीत असे व दुसरे पाळतात किंवा नाहीं हें तो दक्षतेनें पाही. ते मोडणारास तो योग्य तें शासन करण्यास कधींही डगमगला नाहीं. सर्व अंमलदार त्यास चळचळा कांपत. हिंदु धर्माचें त्यानें संरक्षण, संवर्धन व पुनरुज्जीवन केलें. तरी मुसलमानांसंबंधीं त्यानें सहिष्णुवृत्तीच धारण केली होती. अनेक मुसलमानांस त्यानें आपल्या पदरीं नोकऱ्या दिल्या, त्यांच्या देवस्थानांस इनामें व नेमणुका दिल्या व अनेकांस आपल्या राज्यांत मानाच्या जागा दिल्या. त्यांचा त्यानें कधींच द्वेष केला नाहीं. त्याचें आचरण अत्यंत शुद्ध व पवित्र असे. त्यास लिहितां-वाचतां येत असे. विद्वानांचा सहवास त्याला आवडे. अनेकांस हातीं धरून त्यांच्याकडून त्यानें ग्रंथ लिहून घेतले होते. मुत्सद्देगिरींत तो कोणासही हार गेला नाहीं. अडचणींच्या व संकटांच्या प्रसंगीं युक्तीनें वाट काढून त्यांतून तो मोठ्या कौशल्यानें यशस्वी होऊन बाहेर पडे. गनिमी काव्यानें लढण्याची प्रथा त्यानेंच पाडली. मराठ्यांमध्यें आवेश व नवचैतन्य उत्पन्न करून व तें नव्या साम्राज्याच्या उभारणीच्या कामीं लावून हिंदुपतपातशाहीची त्यानें स्थापना केली. हीच त्याची बहुमोल कामगिरी होय. या कामीं त्याची आई जिजाबाई व श्रीरामदासस्वामी यांची त्याला बहुमोल मदत झाली. आपल्या लोकांचा तो प्राण होता व म्हणून तेही त्याच्याकरितां स्वतःच्या प्राणांची तिलांजली वाहण्यास सदैव तत्पर असत. कोणत्याही दृष्टीनें पाहतां शिवाजी एक लोकोत्तर व थोर पुरुष होऊन गेला यांत शंका नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. शिवाजीचें कुटुंब व स्त्रीदाक्षिण्य :—शिवाजीला आठ बायका होत्या. निंबाळकरांची मुलगी सईबाई ही त्याची पट्टराणी होय. तिच्यापासून त्याला संभाजी हा पुत्र सन १६५७ मध्यें झाला होता. शिर्के घराण्यांतील सोयराबाई ही त्याची दुसरी बायको. तिच्यापासून त्याला सन १६६१ मध्यें राजाराम नांवाचा मुलगा झाला. मोहित्यांची मुलगी पुतळाबाई ही त्याची तिसरी बायको. ती त्याच्याबरोबर सती गेली. सखूबाई नांवाची एक मुलगी शिवाजीस होती. तिचें लग्न महादजी निंबाळकराबरोबर झालें होतें. त्याचा बाप बजाजी एके काळीं आपल्या वतनाच्या रक्षणार्थ मुसलमान झाला होता. परंतु शिवाजीनें त्याला शुद्ध करून घेऊन त्याच्या मुलास आपली मुलगी दिली. शुद्धीकरणासंबंधींचें हें उदाहरण राजानें घालून दिलें, हें लक्षांत धरण्यासारखें आहे. शिवाजीस स्त्रियांबद्दल फार आदर होता. त्यांचा अवमान केलेला त्याला खपत नसे. कल्याणचा खजिना जिंकला त्यावेळीं त्याच्या लोकांनीं त्याला एक सुंदर स्त्री नजर केली होती. त्यावेळीं 'हिच्या पोटीं मी जन्मलों असतों तर मीही सुंदर निपजलों असतों' असें तो म्हणाला. त्यावरून स्त्रियांसंबंधींचें त्याचें धोरण लक्षांत घेण्यासारखें आहे.

अभ्यास

१. शिवाजीची राज्यव्यवस्था वर्णन करा.
२. व्यक्ति व राज्यकर्ता या नात्यानें शिवाजीची योग्यता सांगा.
३. शिवाजीच्या अष्टप्रधानमंडळासंबंधीं माहिती वर्णा.
४. शिवाजीनें किल्ल्यांची व्यवस्था कशी ठेवली होती ? त्याला किल्ल्यांचें महत्त्व कां वाटे ?
५. टिपणें करा—चौथाई व सरदेशमुखी, शिवाजीचें आरमार, अष्ट-प्रधानमंडळ, शिवाजीचें लष्कर.

उतारे

१. शिवाजीचा राज्याभिषेक—१६७४.

ता. ६ जून रोजीं ७/८ वाजतां सिंहासनारूढ (शिवाजी) राजाला मुजरा व नजर करण्याकरितां मी गेलों. त्यावेळीं राजा भव्य सिंहासनावर आरूढ झालेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



शिवचरित्रांतील महत्त्वाचे प्रसंग वरील चित्रांत चित्रित केले आहेत, ते ओळखा व प्रत्येकासंबंधीं थोडक्यांत माहिती लिहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व मूल्यवान पोषाख केलेल्या प्रधानांनीं वेष्टिलेला दिसला. संभाजी राजे, पेशवा मोरोपंत व एक श्रेष्ठ ब्राह्मण हे सिंहासनाखालीं बसले होते. राहिलेले सेनाध्यक्ष व इतर अंमलदार आदरानें उभे होते. मीं मुजरा केला व नारायण शेणव्यानें नजरेची आंगठी वर धरली. शिवाजीचें आमच्याकडे लक्ष जातांच त्यानें अगदीं सिंहासनाच्या पायरीजवळ येण्यास आम्हांस हुकूम केला व पोशाख देऊन आम्हांस तत्काळ रजा दिली. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंला सुवर्णांकित भाल्याच्या टोंकावर अनेक अधिकारदर्शक व राजसत्तेचीं चिन्हें असल्याचें आम्हीं पाहिलें. उजव्या हाताला दोन मोठ्या दातांच्या मत्स्यांचीं सुवर्णाचीं शिरें होतीं. डाव्या हाताला अनेक अश्वपुच्छें व एका मूल्यवान भाल्याच्या टोंकावर समपातळींत लोंबणारीं सोन्याच्या तराजूचीं पारडीं, न्यायचिन्ह म्हणून तळपत होतीं. (राजवाड्याच्या) द्वारीं दोन लहान हत्ती व सुंदर पांढरे घोडे शृंगारून आणलेले दिसले. गडाचा मार्ग बिकट असतां हे पशु कोठून वर आले याचा आम्हांस तर्कच करवेना ! — हेन्री ऑक्झेंडननें केलेलें वर्णन

प्रश्न :—१. हें पत्र कोणीं लिहिलें ? तो तेथें कशाकरितां गेला होता ? त्यानें नजराणा कोणता व कां दिला ? त्याला कोणत्या विशेष गोष्टी दिसल्या ?

२. शिवाजी व गोवळकोंड्याचा कुतुबशाह-भेट.—१७७७.

पादशाह तिकडून आले; आम्ही इकडून गेलों. पादशाहांनीं बहुतच इज्जती होऊन, गळ्यास गळा लावून भेटले. आम्हांस हातीं धरून नेऊन जवळ बैसविलें......आणि बरेपणा करून घेतला......ऐसा तह केला कीं उभयवर्गी तह द्यावा तो आपण कबूल करावाच ऐसा कुल मनसुबा व मदार आम्हांवरि टाकिला आहे, कीं ' आपली पातशाही जितकी वाढवूं ये तितकी वाढविणें. पठाणाची नस्तनाबूद करणें. दक्षिणची पादशाही आम्हां दक्षणि यांच्या हातीं राहे तें करावें ' म्हणून. त्यास हा मनसुबा ये प्रसंगीं आमचे हातास आलिया विचार केला कीं जे कांहीं आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपल्या कटांत घेऊन कुतुबशहासी त्यांची रुजुवात करावी. दौलत देवावी; त्यांचे हातें पादशाही काम घेऊन पादशाहाची दराज करावी. आणि तुम्हां लोकांच्या दौलताही चालेत, घरें राहेत, तें करावें. आपल्या जातीच्या मराठिया लोकांचें बरें करावें हें आपणास उचित आहे ऐसें मनावरी आणून, तुमच्या आमच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वडिलापासून दावा वाढत आला तो मनांतून टाकून, निःकपट होऊन तुम्ही मराठे लोक, कामाचे, तुमचें बरें करावें ऐसें मनीं धरून......फर्मान पाठविला आहे......तुम्ही मराठे लोक आपले आहा. तुमचें गोमटें व्हावें म्हणून पष्टच लिहिलें असे.......

—शिवाजीचें मालोजी घोरपड्यास पत्र.

प्रश्न :—१. हें पत्र कोणीं कोणास लिहिलें? शिवाजीच्या राज्यस्थापनेचा हेतु त्यावरून स्पष्ट होतो का? कशावरून? मालोजीचें व शिवाजीचें वाकडें कां आलें होतें? तें विसरण्यास तो तयार कां झाला? बादशहानें शिवाजीशीं सलगी कां केली?

३. लष्करी अधिकाऱ्यांस इषारा—१६७४.

वैशाखाचे दिवस, उन्हाळा...जरूर जालें त्याकरितां कारकुनाकडून...पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास माने ऐसा दाणा, रतीब, गवत, मागाल. असेल तोंवरी धुंदी करून चाराल. नाहींसें जालें म्हणजे मग कांहीं पडत्या पावसांत मिळणार नाहीं. उपास पडतील, घोडीं मरावयास लागतील. म्हणजे घोडीं तुम्हींच मारलीं ऐसें होईल. व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास, लोक जातील, कोण्ही कुणब्याचे एथील दाणे आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फोट, कोण्ही भाजी, कोण्ही पाले, ऐसे करूं लागलेत म्हणजे जीं कुणबीं घरें धरून जीवमात्र घेऊन राहिलीं आहेत तेही जाऊं लागतील. कितेक उपाशी मरायला लागतील. म्हणजे त्यांस ऐसें होईल कीं मोगल मुलकांत आले त्याहूनही तुम्ही! ऐसा तळतळाट होईल! तेव्हां रयतीची व घोड्यांची सारी बदनामी तुम्हांवर येईल. हें तुम्हीं बरें जाणून सिपाई हो...वर्तणूक करणें.

प्रश्न :—१. 'शिवाजी रयतेस जपत असे,' हें वरील उताऱ्यावरून कसें सिद्ध कराल?

२. शिपायांस त्यानें कोणता इषारा दिला होता? कां?

४. अष्टप्रधानांचीं कामें—१६७३.

१. मुख्य प्रधान यांणीं सर्व राजकार्य करावें. राजपत्रावर शिक्का करावा. सेना घेऊन युद्धप्रसंग व स्वारी करावी व तालुका ताबिनांत स्वाधीन होईल त्याचा रक्षून बंदोबस्त करून आज्ञेंत वर्तावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. अमात्य यांणीं सर्व राज्यांतील जमाखर्च चौकशी करून दप्तरदार, फडणीस यांचे स्वाधीन असावें. लिहिणें चौकशीनें करावें. फडणीसी, चिटणिसी पत्रांवर निशाण करावें. युद्धप्रसंग करावे. तालुका जतन करून आज्ञेंत चालावें.

३. सचीव यांणीं राजपत्रें शोध करून अधिक उणें अक्षर मजकूर शुद्ध करावा. युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेंत वर्तावें. राजपत्रांवरी राजचिन्ह करावें.

४. मंत्री यांणीं सर्व मंत्रविचार राज्यकारणें करावें. युद्धप्रसंग करावें. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें. आमंत्रण, वांकनिसी त्यांच्या स्वाधीन. तालुका जतन करावा.

५. सुमंत यांणीं परराज्यांतील विचार करावा. ज्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावे. युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर चिन्ह करावें.

६. सेनापति यांणीं सर्व सैन्य संरक्षण करून युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेंत असावें. फौजेच्या लोकांचें बोलणें बोलावें. सर्व फौजेचे सरदार यांणीं त्याजबरोबर चालावें.

७. पंडितराव यांणीं सर्व धर्माधिकार, धर्म, अधर्म पाहून शिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त पत्रें होतील त्यांजवर संमत चिन्ह करावें. दानप्रसंग, शांति, अनुष्टान तात्काल करावें.

८. न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय, अन्याय मनास आणून बहुत धर्म करून न्याय करावे. न्यायाचीं निवाडपत्रें यांजवर संमत चिन्ह करावें.

९. चिटणीस यांणीं सर्व राज्यांतील राजपत्रें लिहावीं. राजकारणपत्रें उत्तरें लिहावीं. सनदा, दानपत्रें वगैरे महाली हुकुमी यांचा जाबता फडणिसी अलाहिदा त्याप्रमाणें लिहावीं. हातरोखे नाजूक पत्रें यांजवर मोर्तब करावें.

१०. फौजेचे बक्षी यांणीं सर्व फौजेची हजेरी चौकशी करावी. यादी करून समजवावें. रोजमुरा वाटणें, सत्कार करावा, युद्धादि प्रसंग करावा.

११. सेनाधुरंधर यांणीं बिनी करावी, आघाडीस जावें, लूट करणें, मना करणें, चौकशी, ताकीद त्यांजकडे, पुढें असोन सेना रक्षण करावी.

प्रश्न :—१. वरील यादी वाचून शिवाजीनें खातेवार वांटणी केली असें तुम्हांस वाटतें ? कां ? सर्व प्रधान स्वतंत्र आहेत का ? कशावरून नाहींत ? ते परस्परावलंबी कशावरून आहेत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३८. मराठ्यांचें स्वातंत्र्ययुद्ध

१. छत्रपति संभाजी (१६८०-१६८९) :—शिवाजीला दोन मुलगे होते. संभाजी व राजाराम. शिवाजीनंतर संभाजीस गादी न देतां ती राजारामास द्यावी असा राजारामाची आई सोयराबाई हिनें कट रचला होता. तो पन्हाळगडीं कैदेंत असलेल्या संभाजीस समजला. तेव्हां सेनापति हंबीरराव मोहिते याच्या मदतीनें स्वतःची तेथून सुटका करून घेऊन तो रायगडीं आला. नंतर कटांतील सर्व लोकांस त्यानें कैद करून स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. बापाप्रमाणेंच तोही शूर, धाडसी व पराक्रमी होता. परंतु विलास व अविचारीपणा हे दुर्गुण त्याच्या अंगीं चांगलेच मुरले होते. त्यामुळें त्याची कारकीर्द वाईट झाली. हेकट, क्रूर व लहरी असल्यामुळें त्यानें अनेकांचीं मनें दुखविलीं होतीं. सन १६७९ मध्यें मोंगलांस मिळालेल्या संभाजीची समजूत करून शिवाजीनें त्याला पन्हाळगडीं नजरकैदेंत ठेवलें होतें. तेथेंच तो शिवाजीच्या मृत्यूपर्यंत होता. त्याला दूरदृष्टि व माणसाची पारख नव्हती. त्याला लिहितां-वाचतां येत असे. त्याचा चेहरा मोठा राजबिंडा दिसे व तो धिप्पाड पुरुष वाटे.

२. पहिलीं क्रूर कृत्यें :—आपल्याविरुद्ध झालेल्या कटाची माहिती त्यानें हळूहळू मिळवून घेतली होती. त्याच वेळीं औरंगजेबाचा मुलगा अकबर बंड करून संभाजीच्या आश्रयास आला होता. त्यानेंही संभाजीस त्या कटाची इत्थंभूत हकीकत सांगितली. त्यामुळें संभाजीचा क्रोध अनावर झाला व त्यानें अनेक कर्त्या पुरुषांचा वध करविला. त्यावेळीं अन्नाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद वगैरे अनेक थोर कार्यकर्ते मृत्युमुखीं पडले. सोयराबाईसही त्यानें भिंतींत चिणून ठार केलें असा लोकापवाद आहे! एवढेंच नव्हे तर तिच्या माहेरच्या शिर्के लोकांचा त्यानें भयंकर निःष्पात केला. तो प्रकार 'शिरकाण' या नांवानें अजूनही इतिहासांत प्रसिद्ध आहे. येसूबाई ही संभाजीची बायको होती. तिनें त्याच्या क्रौर्यास आळा घालून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेकांस वांचविलें. त्यांतच बाळाजी आवजीचा मुलगा खंडो बल्लाळ चिटणीस हा होता. संभाजीची ही वागणूक श्रीसमर्थ रामदासस्वामींस व रघुनाथपंत हणमंते यांस पसंत पडली नाहीं. त्यांनीं त्याचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण तो सर्व व्यर्थ गेला. शेवटीं संभाजीनें 'कवि कलश' ऊर्फ कलुशा या एका नालायक कनोजी ब्राह्मणाच्या मदतीनें राज्यकारभार करण्यास सुरुवात केली.

३. संभाजीचे युद्धप्रसंग :—शिवाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राज्यावर आघात केल्यास तें राज्य आपल्याला लौकर घेतां येईल असें औरंगजेबास वाटलें; व त्यामुळें तो मोठी फौज घेऊन दक्षिणेंत उतरला होता. मराठे व मोंगल यांजमध्यें यावेळीं जें युद्ध सुरू झालें तें सुमारें तीस वर्षें चाललें. त्याला 'मराठ्यांचें स्वातंत्र्ययुद्ध' असें म्हणतात. औरंगजेबाचा मुलगा अकबर संभाजीच्या आश्रयास गेला होता. तेव्हां संभाजीस नामोहरम करण्याकरितां औरंगजेबानें त्याच्याविरुद्ध पोर्तुगीज व जंजिऱ्याचे सिद्दी यांसही उठविलें. परंतु अशा संकटकाळीं संभाजी मोठ्या हुशारीनें व हिंमतीनें वागला. प्रथमतः सिद्दीचा पराभव करण्याकरितां तो त्याच्यावर चालून गेला. परंतु त्यांत त्याला फारसें यश लाभलें नाहीं. पुढें तो पोर्तुगीजांवर चालून गेला. खुद्द गोव्यावर संभाजी चालून गेला व अपूर्व पराक्रम करून त्यानें पोर्तुगीजांचा पराभव केला. वसईकडच्या मोहिमेंतही मराठ्यांनीं पोर्तुगीजांचा पराभव केला (१६८३). त्याच वेळीं मोंगलांची फौज संभाजीवर चालून आली. तेव्हां पोर्तुगीजांवरील स्वारी अर्धवट टाकून तो मोंगलांवर चालून गेला. सुमारें दोन वर्षें संभाजी मोगलांशीं झुंजत होता. मोंगलांचा अनेक वेळां त्यानें पराभव करून त्यांस त्यानें आपल्या तरवारीचें पाणी चांगलेंच दाखविलें. तेव्हां मराठे हार जात नाहींत असें पाहून औरंगजेब विजापूर व गोवळकोंडा या राज्यांवर चालून गेला. तीं राज्यें जिंकल्यावर मराठ्यांचा निःपात करतां येईल असें त्यानें ठरविलें होतें. त्याप्रमाणें अदिलशाही सन १६८६ मध्यें व कुतुबशाही सन १६८७ मध्यें नष्ट करून औरंगजेब संभाजीकडे पुन्हां वळला.

४. संभाजीचा वध (१६८९) :—यावेळीं संभाजीला जी संधि मिळाली तिचा त्यानें उपयोग करून घेतला नाहीं. तो विलासांत दंग होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिला होता. याच वेळीं मराठ्यांचा सेनापति हंबीरराव मोहिते यानें मोंगलांवर वांईजवळ एक मोठा विजय मिळविला. मात्र त्या लढाईंत तो स्वतः मारला गेला. त्यामुळें संभाजीची बाजू बरीच लंगडी पडली. परंतु त्याचा संभाजीच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. शेवटीं तशा स्थितींतच मोंगलांनीं घेरून संगमेश्वरीं त्याला व कलुशाला पकडलें व बादशहाकडे त्यांची रवानगी केली. संभाजीला मुसलमान करावें अशी औरंगजेबाची इच्छा होती. परंतु संभाजीनें 'तुझी मुलगी देत असशील तर मुसलमान होतों' असा त्याला खडखडीत जबाब दिला. त्यामुळें क्रुद्ध होऊन औरंगजेबानें संभाजीचा तुळापुराजवळ व पुण्यापासून बारा मैलांवर असलेल्या वढू बुद्रुक या गांवीं क्रूरपणें वध करविला (१६८९). कलुशाचीही तीच गत झाली. संभाजीच्या वधानें मराठ्यांचें राज्य आपल्या हातीं लौकर येईल असा जो औरंगजेबाचा समज होता तो मात्र सफळ झाला नाहीं. उलट नव्या जोमानें मोंगलांवर सूड उगविण्यास मराठे उद्युक्त झाले.

५. छत्रपति राजाराम (१६८९-१७००) :— संभाजीचा वध झाला त्यावेळीं त्याची बायको येसूबाई, मुलगा शिवाजी, भाऊ राजाराम व इतर सर्व मुत्सद्दी रायगडीं होते. ही बातमी कळतांच बादशाही फौजेनें रायगडास वेढा देण्याचें ठरविलें. अर्थात मोंगलांचा हेतु रायगडीं कळला. तेव्हां सर्वांनीं एकत्र अडकून पडणें चांगलें नव्हे असें जाणून, राजाराम, रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ, प्रल्हाद निराजी वगैरे मंडळी रायगडीं येसूबाई व शिवाजी यांस ठेवून बाहेर पडली. मागें मोंगलांचा सेनापति जुल्फकारखान यानें रायगड किल्ला फितुरीनें घेतला व येसूबाईस तिच्या मुलासह कैद केलें. तीं दोघें पुढें सतरा वर्षें बादशाही कैदेंत होतीं. औरंगजेबाची मुलगी झीनतुन्निसा हिनें त्यांची फार निगा राखली. संभाजीच्या वेळीं राज्यांतील शिस्त रद्द झाली, कारभाराचे नियम बंद झाले. सर्वत्र अंदाधुंदी माजली, खजिना रिता पडला, वसूल होईनासा झाला व त्यांतच औरंगजेबासारखा बलाढ्य शत्रू दारीं येऊन बसलेला! अशा स्थितींत मराठ्यांच्या राज्याचें काय होणार हा प्रश्न प्रत्येकास भेडसावीतच होता. त्यांतच संभाजीच्या वधानंतर मोंगलांनीं मराठ्यांचे एकामागून एक किल्ले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेण्यास सुरुवात केली व महाराष्ट्रांतून मराठ्यांची कायमची उठावणी करण्यास चंग बांधला. अशा संकटकाळीं छत्रपति राजाराम व इतर मराठे सरदार यांनीं जो जोम, जो उत्साह व जें तेज प्रकटविलें तें अपूर्व होय. रायगडावरून निसटल्यावर राजाराम जिंजीकडे गेला व तेथें त्यानें अष्टप्रधानांची नेमणूक करून सर्व राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. विशाळगड व पन्हाळा यांच्या दरम्यान रामचंद्रपंतानें फिरतें राहून महाराष्ट्राचा बचाव करावा व शंकराजी नारायण सचीव व परशुराम त्रिंबक कुळकर्णी यांनीं त्याला मदत करावी असें त्यानें ठरवून दिलें. संताजी घोरपडे यास त्यानें सेनापतिपद दिलें व त्यानें व धनाजी जाधवानें जिंजी व महाराष्ट्र यांचे दरम्यान फिरतें राहून बादशहाचा पिच्छा पुरवावा असें ठरलें.

६. राजारामाचें नवें धोरण :—मराठेशाहीवरील संकट दूर करण्याकरितां व मराठ्यांमध्यें उत्साह व जोम उत्पन्न करण्याकरितां राजारामानें अनेक उपाय योजले. त्यांपैकीं कांहीं खालील होत. (१) स्वतःस त्यानें राज्याभिषेक करून घेतला नाहीं; परंतु सर्व राज्यकारभार त्यानें स्वतःच्या हातीं घेतला. (२) अष्टप्रधान नेमले. 'प्रतिनिधी' हें नवें पद निर्माण करून तें प्रल्हाद निराजी या शहाण्या व कर्त्या मुत्सद्यास देऊन त्यास भूषविलें. (३) जो कोणी पराक्रम करून शत्रूस जेरीस आणील त्यास बक्षीस, पदवी, इनाम, सरंजाम वगैरे देऊन संतुष्ट करण्यांत येईल असें त्यानें जाहीर केलें. राजारामाच्या या धोरणानें मराठ्यांमध्यें अपूर्व उत्साह निर्माण झाला व लोकांच्या ठिकाणीं मोठा आवेश उत्पन्न होऊन, प्रत्येकजण स्वदेशसंरक्षणार्थ प्राण देण्यासही तयार झाला.

७. जिंजीचा वेढा (१६९१–९८) :—बादशाही फौजेशीं समोरासमोर टक्कर देणें मराठ्यांस शक्य नव्हतें. बादशहाचें लष्कर ऐदी व ऐषारामी होतें. त्यास बोजड व अवजड सामानासह महाराष्ट्राच्या डोंगराळ भागांतून सहजासहजीं हालचाली करणें अशक्य होतें. अर्थात् अशा सैन्याशीं समोरासमोर लढण्यापेक्षां गनिमी काव्यानें लढणेंच मराठ्यांच्या पथ्यावर होतें. त्यांतच मराठे चपळ, काटक व लहानशा घोड्यावर बसून मिळेल त्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुजराण करणारे असल्यानें त्यांस मोंगली फौजेवर छापे घालून लुटालूट करतां येई. अर्थात या सर्व गोष्टींचा मराठ्यांनीं पुरेपूर फायदा करून घेतला व मोंगलांस सतावून सोडलें. संताजी व धनाजी हे महाराष्ट्रांत आल्यावर तर मराठ्यांच्या धुमाकुळास अतिशयच जोर चढला व त्यांनीं कर्नाटकापासून खानदेशापर्यंतच्या मुलुखांत मोंगलांस जेरीस आणलें. मराठे ऐकत नाहींत असें पाहून औरंगजेबानें सन १६९१ मध्यें जुल्फिकारखानास जिंजीस वेढा घालण्यास सांगितलें. तेथें राजारामादि मंडळी होती. हा वेढा सात वर्षं चालू होता. पुढें युक्तीनें सर्व मंडळी त्यांतून निसटली व मगच खानानें तो किल्ला घेतला. परंतु त्यानें मराठ्यांचें कांहींही नुकसान झालें नाहीं.

८. संताजी व धनाजी :—जिंजीहून निसटल्यावर राजाराम महाराष्ट्रांत आला व त्यानें सातारा येथें आपली राजधानी स्थापन केली. त्यापूर्वी संताजी व धनाजी यांनीं मोंगली फौजेस ' त्राही भगवन् ' करून सोडलें होतें. मी मी म्हणणारे मुसलमान योद्धे त्यांच्यापुढें जाण्यास कांपत. धनाजीस तर मोंगल इतके भीत कीं त्यांचा घोडा पाणी पिईनासा झाल्यास ' पाण्यांत धनाजी दिसतो का ? ' असें ते त्याला विचारीत. एकदां प्रत्यक्ष बादशहाच्या तंबूचे सोन्याचे कळसही संताजीनें कापून आणले होते. संताजी व धनाजी या दोघां वीरांच्या जोडगोळीनें अपूर्व पराक्रम करून मोंगलांनीं घेतलेले सर्व किल्ले परत जिंकून घेतले व बादशहास सतावून सोडलें. परंतु संताजी व धनाजी यांचें ठीक नव्हतें. धनाजी संताजीस पाण्यांत पाही. त्यांच्यांत वैर व द्वेष उत्पन्न झाला ही दुर्दैवाची गोष्ट होय. त्याचेंच पर्यवसान म्हणजे सन १६९७ मध्यें संताजीचा वध झाला. त्यानंतर धनाजीकडे सेनापतिपद आलें. साताऱ्यास राजधानी स्थापल्यावर राजारामानें नव्या नेमणुका केल्या व स्वतःबरोबर फौज घेऊन तो मोंगलांच्या मुलुखांत चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करूं लागला.

९. राजारामाचा मृत्यु (१७००) :—राजारामानें स्वारीचें काम हातीं घेतल्यावर त्यानें खानदेशापर्यंत मोठी मोहीम काढली. त्याच वेळीं त्यानें खंडेराव दाभाडे यास बागलाणांत, परसोजी भोसले यास वऱ्हाडांत, नेमाजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिंदे यास खानदेशांत व हैबतराव निंबाळकर यास नाशिक जिल्ह्यांत मोहिमेवर पाठविलें. राजारामानें खानदेश-वऱ्हाडकडे मोठी मर्दुमकी गाजवून जालना शहर लुटलें. त्यांत त्याला फार त्रास झाला. तेव्हां तो तातडीनें सिंहगडास परत आला. वाटेंतच त्याला ताप आला. सिंहगडीं पोंचल्यावर त्याला सन १७०० मध्यें रक्ताच्या गुळण्या होऊन मृत्यु आला. राजारामाच्या अंगीं फारसे गुण नव्हते. समंजसपणा, शांत वृत्ति, मनमिळाऊपणा वगैरे त्याच्या गुणांमुळें तो लोकप्रिय झाला होता. मराठी राज्यावर भयंकर संकट आलें असतां लोकांमध्यें त्यानें जें चैतन्य व जो आत्मविश्वास प्रगट केला तो अपूर्व होता. अशा आपत्काळीं त्यानें राज्याचें रक्षण केलें हीच त्याची मोठी कामगिरी होय. ताराबाई व राजसबाई या त्याच्या दोन बायका होत्या. ताराबाईचा मुलगा शिवाजी व राजसबाईचा मुलगा संभाजी होय. आपला पुतण्या शाहू याचा मराठ्यांच्या गादीवरील हक्क राजारामानें बुडविला नाहीं. त्याचा मुखत्यार म्हणूनच त्यानें, राजचिन्हें धारण करून, राज्य केलें.

१०. छत्रपति दुसरा शिवाजी (१७००-१७०८):—राजाराम मेला ही वार्ता कळतांच मोंगलांस फार आनंद झाला. आतां मराठ्यांस सहज जिंकतां येईल असें त्यांस पुन्हां वाटलें. परंतु मराठ्यांचा जोम मुळींच कमी झाला नाहीं. राजारामानंतर शिवाजीस राज्यावर बसवावें असा ताराबाईनें आग्रह धरला. तो मुत्सद्यांस रुचला नाहीं. शाहूस सोडवून आणून त्यास गादीवर बसवावें असें त्यांचें मत होतें. परंतु ताराबाईस तें रुचलें नाहीं. तेव्हां तिच्या मुलास गादीवर बसवून मुत्सद्यांनीं मोंगलांशीं चालू असलेला लढा पुढें चालविला. त्यावेळीं औरंगजेबानें मराठ्यांवर जोमानें मोहीम चढविली. तो जेथें जाई तेथें त्याची फत्ते होऊं लागली. कोल्हापूर, पन्हाळा, अजीमतारा, परळी, चंदन-वंदन, विशाळगड, खेळणा, सिंहगड, राजगड, तोरणा वगैरे मराठ्यांचे किल्ले त्यानें भराभर एकामागून एक घेतले. परंतु त्याची पाठ फिरते न फिरते तोंच ते सर्व किल्ले मराठ्यांनीं एकामागून एक सर्व परत जिंकून घेतले ! त्यामुळें बादशाह अगदीं टेकीस आला. मराठ्यांच्या कचाट्यांतून आपण जिवंतपणीं सुटतों कसें, असें त्यांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन गेलें. शेवटीं निराशा, उद्वेग व काळजी यांनीं त्रस्त झालेला ८८ वर्षांचा वृद्ध औरंगजेब अहमदनगरास आला व तेथेंच तो सन १७०७ मध्यें मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूनें युद्धास निराळेंच स्वरूप प्राप्त झालें. मराठे विजयी ठरून मोंगलांचा पराभव झाला.

११. स्वातंत्र्ययुद्धाचे परिणाम :—शिवाजीच्या हयातींतच हें युद्ध सन १६७७ पासून सुरू झालें असें मानण्यांत येतें; व तें औरंगजेबाच्या मृत्यूनंतर थांबलें. म्हणजे हें स्वातंत्र्ययुद्ध सुमारें तीस वर्षें चाललें होतें. त्यांत मराठ्यांच्या आत्मविश्वास, चिकाटी, धैर्य, शौर्य, वीर्य वगैरे गुणांस चांगली कसोटी लागली. मात्र त्याकाळीं शिवाजीची शिस्त मागें पडून प्रत्येकजण स्वार्थाकरितां धडपडूं लागला. इनाम, वतन व जहागीर यांच्या आमिषानें मराठे लढण्यास उद्युक्त होत. हे प्रकार सोडल्यास स्वाभिमान, राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्यलालसा इत्यादि गुणांनीं प्रेरित होऊन मराठ्यांनीं लोकोत्तर कामगिरी केली यांत शंका नाहीं. त्या युद्धामुळेंच मराठ्यांच्या राज्याचा विस्तार होण्यास व त्यांची शक्ति वाढण्यास मदत झाली. याच्या उलट मोंगलांचें अति नुकसान झालें. त्यांचा खजिना रिता पडला, असंख्य सैनिक मारले गेले व उत्तरेंकडील राज्याची घडी बिघडून गेली. त्यामुळें मोंगलांच्या राज्यास उतरती कळा लागून तें मोडकळीस आलें.

१२. औरंगजेबाच्या पराभवाचीं कारणें :—(१) मोंगल सैनिक आळशी, मिजाशी व हतवीर्य होते. त्यामुळें त्यांच्या हातून साहसाचीं व लढाईचीं कामें झालीं नाहींत. (२) अवाढव्य मोंगली लष्कराच्या हालचाली लौकर होत नसत. त्यामुळें त्यांचे कित्येक बेत फसत. (३) मोंगलांस परमुलखांत लढाई करावी लागली. (४) मोंगलांचा उत्तरेकडील संबंध तुटल्यानें त्यांना आपल्या लष्करांत नवी भरती करतां आली नाहीं. (५) मराठे स्वाभिमानानें लढत. त्यामुळें त्यांच्या हातून धाडसाचीं व साहसाचीं अचाट कामें होत. आळस, मिजास व ऐषाराम त्यांस माहीत नव्हता. (६) त्यांच्या हालचाली जलद होत. (७) संभाजीच्या वधानें मराठे चेवले व आपल्या राजाच्या वधाचा सूड घेण्यास ते उद्युक्त झाले. (८) मराठे गनिमी काव्यानें लढत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(९) नद्यांचे पूर, निरनिराळ्या सांथी, पाऊस वगैरेमुळेंही बादशहाचें फार नुकसान झालें. (१०) विजापूर व गोवळकोंडा हीं राज्यें अगोदरच नष्ट करून बादशहानें मोठी चूक केली. त्यामुळें त्या त्या राज्यांतून मोकळे झालेले मराठे सरदार व वीर मराठ्यांस येऊन मिळाले.

१३. कांहीं ठळक व्यक्ति :—स्वातंत्र्ययुद्धाच्यावेळीं अनेक व्यक्ति उदयास आल्या व त्यांनीं मोठीं बहादुरीचीं कामें केलीं. त्यांत खालील फार प्रसिद्ध आहेत. (१) **संताजी घोरपडे**—शिवाजीच्या कारकीर्दींतच जेसरी व उंबराणी येथें सन १६७४ मध्यें विजापुरकरांविरुद्ध झालेल्या लढाईत त्यानें पराक्रम गाजवून कीर्ति मिळविली. पुढें सन १६७८ मध्यें त्यानें कर्नाटकांत पराक्रम करून गजेंद्रगडची जहागीर मिळविली. स्वातंत्र्ययुद्धाच्यावेळीं राजारामानें त्याला मराठ्यांचें सेनापतिपद सन १६९१ मध्यें दिलें. त्यामुळें त्यानें मोठ्या उत्साहानें आपल्या पराक्रमाची शर्थ करून औरंगजेबास सतावून सोडलें. मराठ्यांच्या गनिमी काव्यानें लढण्याच्या पद्धतींत तो पूर्ण तरबेज होता. मोंगलांवर त्याचा उत्तम वचक होता. त्यानें एकदां बादशहाच्या छावणीवर हल्ला करून त्याच्या तंबूचे कळस कापून आणले होते. तो शिस्तीचा भोक्ता होता. त्यामुळेंच त्याच्या सैन्यांत उत्तम शिस्त होती. शिस्त मोडणारांस तो कडक शिक्षा करीत असे. धनाजीशीं त्याचें पटत नसे. त्यांच्यांतील वितुष्टामुळें धनाजीनें संताजीचा सन १६९८ मध्यें खून करविला. त्याचे वंशज पुढें कर्नाटकांत स्थाइक झाले व त्यांस पुढें मुधोळची जहागीर मिळाली. (२) **धनाजी जाधव**—संताजीचा हाडवैरी व त्याच्यानंतर मराठ्यांचें सेनापतिपद ज्याला लाभलें तो धनाजी सन १६५० च्या सुमारास जन्मास आला. प्रतापराव गुजराच्या नेतृत्वाखालीं त्याला लष्करी शिक्षण मिळालें होतें. संताजीप्रमाणेंच उंबराणी व जेसरी येथील युद्धांत तो उदयास आला. स्वातंत्र्ययुद्धांत तो चांगलाच चमकला. जिंजीस वेढा घालून बसलेल्या जुल्फिकारखानावर त्यानें अचानक छापा घालून त्याची धूळधाण उडविली होती. सेनापतिपद त्याला सन १६९८ मध्यें मिळालें. मोंगल सैनिकांवर त्याचा चांगलाच वचक होता. सन १७०७ मध्यें तो शाहूच्या पक्षास मिळाला. शाहूनें त्याच्याकडे सेनापतीचें व वसुलाचें अशीं दोन्हीं कामें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोपविलीं होतीं. या कामीं त्याला बाळजी विश्वनाथाची चांगली मदत झाली. धनाजी जाधव सन १७१० मध्यें मरण पावला. (३) **ताराबाई**—छत्रपति राजाराम याची ताराबाई बायको होय. नवऱ्याच्या मृत्यूनंतर ताराबाईनें आपल्या मुलास मराठ्यांच्या गादीवर बसवून मोंगलांपासून मराठी राज्याचें संरक्षण उत्तमप्रकारें केलें. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहू सुटून आला. तेव्हां मराठ्यांच्या गादीवरील त्याचा हक्क तिनें अमान्य केला व आपल्या मुलाकडेच ती गादी रहावी असा तिनें आग्रह धरला. त्यामुळें शाहूस तिनें विरोध करण्याचें ठरविलें. परंतु त्यांत तिचा पराभव झाल्यानें सन १७०८ मध्यें कोल्हापुरास तिनें एक स्वतंत्र राज्य स्थापलें. तिचें संभाजीशीं पुढें पटलें नाहीं. तेव्हां त्यानें तिला व दुसऱ्या शिवाजीला शाहूच्या मदतीनें पकडून कैदेंत टाकलें. सन १७३० मध्यें ती शाहूच्या हातीं सापडली. तेव्हां त्यानें तिला साताऱ्याच्या किल्ल्यावर कैदेंत टाकलें. शाहूच्या मरणसमयीं आपल्या नातवास–रामराजास–दत्तक घेण्याचा सल्ला तिनें दिला. तो शाहूनें मान्य केला व रामराजास दत्तक घेतलें; मात्र सर्वाधिकार त्यानें पेशव्यांस दिला. या योजनेमुळें या महत्त्वाकांक्षी स्त्रीची अधिकार गाजविण्याची इच्छा अपुरी राहिली. तशा स्थितींतही पेशव्यास हाणून पाडण्याकरितां तिनें अनेक कारस्थानें केलीं; परंतु तीं सर्व फसलीं. अखेर ती सन १७६१ च्या सुमारास मृत्यु पावली. (४) **रामचंद्रपंत अमात्य**—शिवाजीचा अमात्य निळो सोनदेव याचा मुलगा रामचंद्र निळकंठ सन १६६० च्या सुमारास जन्मला. त्याला राजकारणाचें ज्ञान चांगलें झालेलें होतें. जमाबंदी व हिशेब यांत तो चांगला तरबेज होता. स्वातंत्र्ययुद्धांत त्यानें उत्तम कामगिरी बजावली. महाराष्ट्रांतील कारभाराची सर्व व्यवस्था राजारामानें त्याच्यावर सोंपविली व तो जिंजीस गेला. ती कामगिरी त्यानें उत्तम बजावली म्हणून राजारामानें त्याला 'हुकमतपन्हा' हा किताब दिला. रामचंद्रपंत शांत, निगर्वी व निरपेक्ष वृत्तीचा, वाकबगार, मुत्सद्दी व लायक अधिकारी होता. त्याची सर्वांवर विलक्षण छाप होती. राजारामाच्या मृत्यूनंतरही त्यानें मोठ्या नेटानें मोंगलांशीं युद्ध चालवून महाराष्ट्राचें संरक्षण केलें. शाहूच्या सुटकेनंतर तो ताराबाईच्या पक्षास मिळाला होता. 'आज्ञापत्र' या नांवाचें त्यानें लिहिलेलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजनीतिविषयक पुस्तक वाचनीय आहे. त्यावरून त्याचे दूरदर्शीपणा, मुत्सद्दीपणा, चाणाक्षपणा वगैरे गुण प्रत्ययास येतात. (५) **खंडो बल्लाळ चिटणीस**–शिवाजीचा चिटणीस बाळाजी आवजी याचा मुलगा खंडो बल्लाळ सन १६६८ मध्यें जन्मला. संभाजीनें बाळाजीची सर्व जिंदगी जप्त केल्यानें त्याच्या मुलांस अन्नान्नदशा प्राप्त झाली होती. अशा स्थितींत येसूबाईनें त्यांच्यावर कृपा केली. तशाही स्थितींत खंडोबानें आपली स्वामिनिष्ठा सोडली नाहीं. पुढें संभाजीची मर्जी संपादून त्यानें महत्पद व गेलेली चिटणिशीही मिळविली. पुढें संभाजीच्या मृत्यूनंतर खंडो बल्लाळानें राष्ट्रकार्य व स्वामिकार्य यांसाठीं स्वप्राणांचीही कधीं तमा न धरतां, वाटेल त्या संकटास तोंड दिलें. रायगड मोंगलांनीं घेतल्यावर राजारामास जिंजीस मिळण्याकरितां तो जात असतां, त्यानें राखेचे तोबरेही खाल्ले; पण स्वराष्ट्रद्रोह केला नाहीं. त्यामुळें राजारामही त्याच्यावर प्रसन्न असे. त्यास राजारामानें पुढें वतनेंही करून दिलीं. (६) **शंकराजी नारायण**—प्रथमतः तो मोरोपंत पिंगळ्याचा कारकून होता. पुढें रामचंद्रपंताचा तो कारकून झाला. तो मोठा हिंमती व कर्तबगार होता. पुढें स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळीं त्यानें अतुल पराक्रम करून राजगड, तोरणा, रोहिडा वगैरे किल्ले मोंगलांकडून घेतले व परळी व सातारचा अजिमतारा या किल्ल्यांचें संरक्षण केलें. त्यानंतर तो वाईचा ठाणेदार झाला. पुढें स्वपराक्रमानें वाढत वाढत सन १६९८ मध्यें तो सचीवपदावर अधिष्ठित झाला. राजारामाच्या मृत्यूनंतर तो ताराबाईच्या पक्षास मिळाला. सन १७०७ मध्यें तो मृत्यु पावला. भोरच्या सचीव घराण्याचा तोच संस्थापक समजला जातो.

अभ्यास

१. मराठ्यांचें स्वातंत्र्ययुद्ध केव्हां सुरू झालें? त्याला स्वातंत्र्ययुद्ध असें कां म्हणतात? त्यांत मराठ्यांनीं कोणती कामगिरी केली? त्याचे परिणाम काय झाले?
२. या युद्धांत औरंगजेबाचा पराभव कां झाला? मराठ्यांस यश कां मिळालें?
३. संभाजीचा स्वभाव वर्णा. त्याच्या चरित्राचें थोडक्यांत वर्णन करा. त्याची राजारामाशीं तुलना करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. राजारामानें स्वराज्य-रक्षणार्थ कोणत्या गोष्टी केल्या ? त्यानें मराठ्यांमध्यें कोणते गुण उत्पन्न केले ? त्याची कामगिरी वर्णा.

५. खालीलसंबंधीं टीपा करा.

संताजी, धनाजी, खंडो बल्लाळ, रामचंद्रपंत अमात्य, ताराबाई, जिंजीचा वेढा, रायगडचा वेढा.

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
हंबीरराव मोहिते, सोयराबाई, शिरकाण, कवि कलश, रामदास, वढू बुद्रुक, झीनतुन्निसा, जुल्फिकारखान, सातारा, सरंजामी, प्रतिनिधि.

७. सरदेसाईकृत—उग्रप्रकृति संभाजी व राजाराम, ह. ना. आपटेकृत केवळ स्वराज्यासाठीं, काळेकृत—जिंजीवास, हीं पुस्तकें वाचा.

उतारे

१. [राजाराम सहकाऱ्यांसह जिंजीकडे गेला, त्यावेळीं महाराष्ट्राची व्यवस्था त्यानें रामचंद्रपंत व शंकराजी नारायण यांजकडे सोंपविली. त्यासंबंधाचा शंकराजीनें काढलेला हा जाहीरनामा आहे]—१६९०.

राजश्री स्वामीनें आमच्या स्वाधीन राज्यकारभार केलाच आहे. सांप्रत राजश्री स्वामी कृपाळू होऊन आम्हांस सुरनिशीचा कार्यभाग सांगितला. रायेगडापासून कोंकणपट्टीही स्वाधीन केली. सनदा व वस्त्रें व अलंकारभूषणें पाठविलीं. राजश्री रामचंद्रपंतास मजमूच्या कार्यभाग सांगोन त्याच्या स्वाधीन करहाडापासून पलीकडे वरघाट रायेगडापासून अलीकडील कोकण गोकर्ण–पावेतो केली....... राजश्री धनाजी जाधव यांणीं आम्हाकडे असावे. रा. संताजी घोरपडे यांणीं रा. रामचंद्रपंताकडे असावे ऐसा तह केला असें हें वर्तमान तुम्हां वतनदारांस कळावें याकरितां लिहिले असे.......हुजूरच्या हुकमांखेरीज वर्तणुक केलीयास तुमचें बरें होणार नाहीं, टकापैका घ्याल तो गैरमजुरा निघेल. हें बरें समजोन हुजूरच्या हुक्माप्रमाणें राहाटी करीत जाणें. जाणिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न :—१. हा जाहीरनामा कोणीं लाविला ? त्याचा मतलब काय होता ? राज्यकारभाराची वांटणी कां करण्यांत आली ? कोणांमध्यें झाली ?

२. मराठी सैन्यास उत्तेजन

तुम्ही आपली खातरनिशा राखोन स्वामीच्या पायासी एकनिस्टता धरून स्वामीकार्य साध्य होए ते गोष्टी करणें. गनिमाचा हिसाब काय ? तुम्ही लोक जेव्हां मनावरी धरितां तेव्हां गनीम तो काय आहे ? ते तुम्हीच लोक या राज्याची पोटतिडीक धरितां ! तेव्हां औरंगजेबाचा हिसाब धरीत नाहीं........ ईस्वर करितो तरी फत्तेच आहे.

—राजारामाच्या वेळीं—१६९०

प्रस्तुत स्वामींचा मुक्काम प्रतापगडीं जाला. बलकुबलीच्या (वाईट) प्रसंगास स्वामींचे तोलदार फौज असली पाहिजे.......आजीचे प्रसंगीं भरंवसा तुम्हां लोकांचा आहे, व स्वामींचे मायेचे आहां. याकरितां ये गोष्टीचे अगत्य धरून फौजेनिशीं या तोंडें राहोन, औरंगजेबाचा कबिला बाड मारून हैराण करणें, तो विशालगडाचा ख्याल (नाद) सोडी, तुम्हां लोकांच्या कीर्ति होऊन स्वामी समाधान पावेत ऐशी गोष्ट करणें......औरंगजेबास सोडून दुसरे सर्वथा नच जाणें. समीपच राहोन स्वामी खुशाल या जागां रहात तें करणें. राज्य रक्षणें. तुमचें सेवेचा मजरा (चीज) होय अशी गोष्ट करणें. जाणिजे.

—दुसऱ्या शिवाजीच्या वेळीं. १७०१

प्रश्न :—१. मराठ्यांस कोणीं उत्तेजन दिलें ? कशाकरितां ? औरंगजेबास विशाळगडीं डांबून ठेवल्यानें मराठ्यांचा कोणता फायदा होणार होता ?

३. रामचंद्रपंत अमात्य बावडेकरांचा इंग्रजांबद्दल अभिप्राय

सावकारांमध्यें फिरंगी व इंग्रज......टोपीकर हेही लोक साहुकारी करतात. परंतु ते वरकड सावकारासारखे नाहींत. टोपीकरांस या प्रांतीं प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्टावीं हा पूर्णाभिमान. तदनुरूप स्थळीस्थळीं कृतकार्यही जाले आहेत. त्यास ही हट्टी जात. हातास आलें स्थळ, मेल्यानें सोडावयाचें नव्हेत. यांची आमदरफ्ती आले गेले इतकीच असूं द्यावी. त्यांस केवळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेहमीं जागा कधींही देऊं नये.......नाहीं ते समयीं आरमार, तोफा, दारू-गोळा हेंच त्यांचें बळ......त्यांस इमारतीचें घर बांधूं देऊं नये. याप्रकारें राहिलें तर बरें.

—आज्ञापत्रावरून.

प्रश्न :—रामचंद्रपंतानें इंग्रजांचे कोणते गुणावगुण हेरले होते ?

४. राजारामाचें वतनदारांस वचन

हे मराठे लोक या प्रांतीचे वतनदार होत. यांणीं वतनावरी राहोन स्वामि-सेवा एकनिष्ठपणें केली व पुढेंही करतील. हें महाराष्ट्र राज्य आहे. तुम्ही या राज्याची पोटतिडीक धरतां, तरी राज्यकारणाची चालना करून जमाव करून सावध राहून स्वामिकार्य दृष्टीस पडलें तें मनास आणून लिहून पाठविणें. तुमची सरंजामी चालवूं. स्वामीच्या पायांशीं एकनिष्ठा धरून स्वामीकार्य करणें....... फार मर्दुम्या करून राज्य मिळविलें, स्वामीकरितां खराब जाले व मारले गेले. हल्लीं जे कोणी वतनदार एकनिष्ठा धरून स्वामिकार्य करून देईल, त्यास इसा-फती व वतनभाग चालला असेल तेणेंप्रमाणें मजरा (चालू) करूं.......तुमची सरंजामी चालवूं.

प्रश्न :—राजारामानें वतनदारांस कोणतें वचन दिलें ? कशाकरितां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३९. छत्रपति शाहू—पेशवा बाळाजी विश्वनाथ

१. शाहूची सुटका (१७०८):—औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्लीच्या गादीबद्दल त्याच्या मुलांत तंटे माजले. अजमशहा यानें जुल्फिकारखानाच्या मदतीनें दिल्लीकडे कूच केलें. तो दिल्लीकडे जात असतांच त्यानें भोपाळ-जवळ शाहूची मुक्तता केली. असें केल्यानें मराठ्यांमध्यें पक्षभेद निर्माण होऊन त्यांच्यांत कलह माजतील, अशी त्याची अपेक्षा होती. ती खरी ठरली. मात्र शाहूस सोडतांना 'मोंगलांचा मांडलिक म्हणून मी राज्य करीन व मोंगली राज्यांत बखेडा निर्माण करणार नाहीं' असें त्यानें कबूल केलें होतें. येसूबाई व आपल्या राण्या यांस शाहूनें ओलीस ठेवलें होतें. यापूर्वी शाहू व येसूबाई यांच्या सुटकेचे मराठ्यांनीं अनेक वेळां प्रयत्न केले होते पण ते फसले. सुटका झाल्यावर शाहूस खानदेशांत परसोजी भोसले मिळाला. तेथून गोदावरीच्या तीरावर आल्यावर त्यानें ताराबाईस 'मी येत आहें. तरी आपण माझें राज्य माझ्या स्वाधीन करावें,' असा निरोप पाठविला. तें ताराबाईस रुचलें नाहीं; व तिनें धनाजी जाधव, परशुराम त्रिंबक, खंडो बल्लाळ वगैरेस सैन्यासह शाहूवर पाठविलें. पैकीं धनाजी व खंडो बल्लाळ शाहूस मिळाले. परशुराम त्रिंबकनें खेड मुक्कामीं शाहूशीं सामना दिला (१७०७); परंतु त्यांत त्याचा पराभव झाला. पुढें शाहूनें सातारा घेऊन स्वतःस राज्याभिषेक करून घेतला (१७०८). तेव्हां ताराबाईनें कोल्हापुरास जाऊन स्वतंत्र गादीची स्थापना केली.

२. मराठ्यांतील दुही:—शाहूनें राज्य मिळविलें परंतु त्यावेळीं त्याची स्थिति अत्यंत अडचणीची होती. अनेक मातब्बर सरदार ताराबाईच्या पक्षाकडे होते. ते शाहूस त्रास देत. तेव्हां त्यांचा बंदोबस्त करणें हें शाहूचें मुख्य काम होऊन बसलें. ताराबाईच्या पक्षांत दमाजी थोरात, रामचंद्रपंत अमात्य, उदाजी चव्हाण, कान्होजी आंग्रे, शंकराजी नारायण सचीव, परशुरामपंत प्रतिनिधि, खेम सावंत वगैरे मुत्सद्दी होते. शाहूच्या पक्षांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हैबतराव निंबाळकर, खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ वगैरे मंडळी होती. अर्थात या दोन्ही पक्षांत यादवी सुरू होऊन लढायाही सुरू झाल्या. शेवटीं कंटाळून शाहूनें कोल्हापुरचें राज्य ताराबाईकडे राहूं दिलें. या यादवीच्या प्रसंगीं आपापसांतील दंगे मोडून शाहूचा जम बसविण्यांत त्याला बाळाजी विश्वनाथानें चांगली मदत केली.

३. बाळाजी विश्वनाथ भट :—कोकणांत जंजिऱ्याच्या सिद्दीच्या हद्दींत श्रीवर्धन नांवाचें एक गांव होतें. त्या गांवचा देशमुख बाळाजी विश्वनाथ भट हा ब्राह्मण होय. कांहीं कारणानें सिद्दीशीं बेबनाव होऊन सन १६७९ च्या सुमारास बाळाजी देशावर आला. त्याच्याबरोबर वेळासच्या भानूंचेंही घराणें देशावर आलें. देशावर आल्यावर बाळाजीनें धनाजीच्या पदरीं नोकरी धरली. आपल्या अंगच्या गुणांच्या जोरावरच पुढें त्याला पुणें व दौलताबाद येथील सरदेशमुखी मिळाली. भोरच्या पंतसचिवाच्या मुतालिकाचेंही त्यानें काम केलें. पुढें खंडो बल्लाळ, आबाजीपंत पुरंदरे वगैरे थोर पुरुषांशीं त्याचा स्नेह जमून, त्यांच्या वतनांच्या वसुलाचेंही काम त्यानें चोखपणें केलें. तेव्हां धनाजीच्या मृत्यूनंतर राज्याच्या वसुलाचेंही काम त्याच्याकडेच शाहूनें सोंपविलें.

४. बाळाजीची आरंभींची कामगिरी :—धनाजी जाधव सन १७१० मध्यें मृत्यु पावला. राज्याच्या वसुलीचें काम शाहूनें बाळाजीस दिलें. तें न साहून धनाजीचा मुलगा चंद्रसेन जाधव बाळाजीवर व शाहूवर रागावून ताराबाईस मिळाला. त्यामुळें शाहूची स्थिति फारच बिकट झाली. तेव्हां त्याला बाळाजीनें मदत करून त्याचा पक्ष जोरदार केला. त्या कामीं त्यानें जे उपाय केले ते असे. (१) त्यानें नव्या सैन्याची उभारणी करून आपलें लष्कर योग्य व सुसज्ज केलें. याकरितां शाहूनें त्याला 'सेनाकर्ते' ही पदवी दिली. (२) परशुराम त्रिंबक यास शाहूच्या पक्षाकडे त्यानें वळविलें. (३) भोरचा सचीव शंकराजी नारायण वारला. तेव्हां त्याच्या मुलासही त्यानें शाहूकडे वळवून घेतलें. (४) आपल्या नव्या सैन्याच्या जोरावर त्यानें दमाजी थोरात, कृष्णराव खटावकर, उदाजी चव्हाण वगैरे ताराबाईच्या बाजूनें पुंडावा करणाऱ्या सरदारांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोड केला. (५) कान्होजी आंग्रे हा मराठ्यांच्या आरमाराचा मुख्य होता. तो शाहूस उपद्रव देत असे. त्यावर शाहूनें पेशवा बहिरोपंत पिंगळे, यास पाठविलें होतें. परंतु आंग्र्यानें त्याचा पराभव करून त्यास कैदेंत टाकलें. तेव्हां शाहूनें बाळाजीस ती कामगिरी सांगितली. कान्होजी मोठा मातबर सरदार आहे असें ओळखून त्याच्याशीं बाळाजीनें तह केला. त्यावेळीं त्याला कोकणांतील कांहीं किल्ले देऊन बाळाजीनें खूष केलें व शाहूच्या पक्षांत त्याला सामील केलें. या सर्व कृत्यांमुळें शाहूचा पक्ष जोरदार झाला. बाळाजीच्या या कामगिरीमुळें शाहूनें बाळाजीस आपला पेशवा केलें (१७१३).

५. कोल्हापुरांत क्रांति :—त्याच सुमारास ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांस राजसबाईनें कैद केलें; व आपला मुलगा संभाजी यास कोल्हापुरच्या गादीवर बसविलें. त्या कामीं बाळाजीनें राजसबाईस साहाय्य केलें होतें. सरदारांचीही राजसबाईस मदत मिळाली होती. शेवटीं ताराबाई व शिवाजी यांस राजसबाईनें पन्हाळगडावर कैदेंत टाकलें. तेथेंच शिवाजी सन १७२६ मध्यें मरण पावला. पुढें संभाजी व शाहू यांच्यामध्यें तह होऊन शाहूनें संभाजीस स्वतंत्र मुलूख तोडून दिला. याप्रमाणें मराठ्यांतील हें दुहीचें प्रकरण सामोपचारानें मिटलें.

६. हिंदुपदपातशाहीची उभारणी :—मोंगल साम्राज्य मोडकळीस येऊन त्याचीं छकलें होऊं लागलीं होतीं. अनेक मोंगल सरदार स्वतंत्र होऊं लागले होते. अशा प्रसंगीं महाराष्ट्रांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत आपल्याला मराठ्यांचें साम्राज्य उभारतां येईल अशी बाळाजीची कल्पना होती. हीच कल्पना मूळ शिवाजीची होती. परंतु ती मध्यन्तरीं मागें पडली. आतां त्या कल्पनेस मूर्तस्वरूप देण्यास उत्तम संधि प्राप्त झाली असें बाळाजीस वाटलें; व त्याप्रमाणें तो उद्योगास लागला. त्यावेळच्या फौजा उत्तम तयार झाल्या होत्या. त्यांस नवें क्षेत्र निर्माण करून दिल्यास मराठी राज्य वाढीस लागेल असा बाळाजीचा कयास होता. त्याच सुमारास त्याला एक सुवर्णसंधि मिळाली. दिल्लीला बादशाह व सय्येदबंधू यांच्यामध्यें तंटे लागून सय्येदांनीं बाळाजीची मदत मागितली. शाहूच्या संमतीनें बाळाजीनें सय्येदांस मदतीचें आश्वासन दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याप्रमाणें तो स्वतः व खंडेराव दाभाडे फौज घेऊन दिल्लीस गेले व त्यांनीं सय्येदांस पाहिजे असलेली मदत देऊन त्याबद्दल त्यांच्याकडून स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा मिळवून आणल्या (१७१९). त्यामुळें बाळाजीचें शाहूपाशीं वजन जास्तच वाढलें.

७. चौथाई व सरदेशमुखी :—बाळाजीनें सय्येदांशीं करार करून जे हक्क मिळविले होते ते खालील प्रमाणें होत. (१) शिवाजीचें राज्य शाहूच्या ताब्यांत रहावें. (२) खानदेश, वऱ्हाड, कर्नाटक, हैदराबाद वगैरे जिंकलेले प्रांत स्वराज्यांत यावेत. (३) मोंगलांच्या दक्षिणेंतील सहा सुभ्यांवर मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार असावा. (४) चौथाईच्या उत्पन्नांतून मराठ्यांनीं पंधरा हजार फौज ठेवून बादशहास मदत करावी. (५) मराठ्यांनीं दहा लक्ष रुपये वार्षिक खंडणी बादशहास द्यावी. (६) येसूबाई व इतरांची सुटका व्हावी. हा करार अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्यांतच मराठ्यांच्या भावी साम्राज्याचें बीज सामावलेलें दिसून येतें.

८. सरंजामी पद्धति :—दिल्लीहून बाळाजीनें स्वराज्याच्या सनदा आणल्या. येसूबाईसही त्यानें आपल्याबरोबर साताऱ्यास आणलें. इतके दिवस मराठ्यांमध्यें दुहीची भावना बळावत चालली होती; व मध्यवर्ती सत्तेशीं फटकून वागण्याचा जो तो प्रयत्न करूं लागला होता. ही वृत्ति नष्ट करून सर्व मराठे सरदारांत एकी निर्माण करावी म्हणून बाळाजीनें 'सरंजामी पद्धति' सुरू केली. इनामांचें आमिष असल्यास मराठे सरदार राष्ट्राचें रक्षण करण्यास पुढें येतील व मध्यवर्ती सत्तेशीं ते नम्रपणें वागतील हें त्यानें ओळखलें होतें. त्याकरितांच त्यानें अनेक नवीन नियम केले. ते असे. (१) सरदारांनीं आपल्या मुलुखांत मुलकी व लष्करी अंमल चालवावा. (२) छत्रपति व पेशवा यांच्या परवानगीशिवाय दुसऱ्याशीं युद्ध अगर तह करूं नये. ठरीव फौजेसह वेळोवेळीं स्वारीवर हजर रहावें. (३) सरकारांत ठरीव खंडणी भरावी. (४) जहागिरीचे हिशेब सरकारी दरकदारांस दाखवावे. या सरंजामी पद्धतीचा राज्यविस्ताराच्या कामीं फार उपयोग झाला. कारण सरदारांचीं वतनें दुसऱ्याच्या हद्दींत असत; व तीं मिळवून घेण्याकरितां सरदार झटत. त्यामुळें राज्यविस्तार आपोआप होऊं लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवाय कांहीं वतनें छत्रपतीच्या हद्दींत असल्यानें मराठे सरदार त्याला नमून वागूं लागले.

९. वसुलाची व्यवस्था :—स्वराज्याच्या सनदा मिळाल्यावर बाळाजीनें सर्व सरंजामी सरदारांत वसुलाची वांटणी केली. ती अशी (१) सरदेशमुखी–भोंसल्याचें खाजगी वतन–सबब तें छत्रपतींस मिळावें. (२) स्वराज्याचा वसूल व मोंगलाईतील सुभ्यांची चौथाई मिळून राज्याचा वसूल होई. वसुलाचा $\frac{1}{4}$ भाग 'राजबाबत' होय. तो भाग राजास मिळावा. (३) राहिलेल्या पंच्याहत्तर टक्क्यांपैकीं 'साहोत्रा' (शेंकडा ६ टक्के) व 'नाडगौडा' (शेंकडा तीन) हें उत्पन्न राजानें कोणासही द्यावें. राजबाबत, साहोत्रा व नाडगौडा मिळून चौतीस टक्के वजा जातां ६६ टक्के राहात. ते छत्रपतीनें निरनिराळ्या सरदारांस जहागीर म्हणून वांटून द्यावे. त्याला 'मोकासा' म्हणत. या व्यवस्थेनें मराठे सरदार खूष झाले व त्यांच्यांतील तंटे नामशेष झाले.

१०. बाळाजीची योग्यता :—वसुलाची व्यवस्था केल्यानंतर सन १७२० मध्यें बाळाजी एकाएकीं सासवडीं मृत्यु पावला. बाळाजी बुद्धिमान, उत्तम सेनानी, मुत्सद्दी व धोरणी होता. मराठ्यांतील दुही नष्ट करण्याचा त्यानें यशस्वी प्रयत्न केला. दिल्लीहून सनदा आणून त्यानें मराठ्यांस नवें व मोठें कार्यक्षेत्र निर्माण करून दिलें. शिवाजीचें हिंदुपदपादशाही स्थापण्याचें धोरण उचलून धरून सर्व मराठे सरदारांस तें गांठण्यास त्यानें उद्युक्त केलें. सरंजामी पद्धति सुरू करून त्यानें अनहित केलें असें कांहीं समजतात. कारण त्यामुळें सरदार स्वार्थी बनून मध्यवर्ती सत्तेशीं फटकून वागूं लागले.

अभ्यास

१. 'शाहूची सुटका झाल्यानें मराठ्यांत दुही माजली,' हें म्हणणें खरें आहे काय ? कशावरून ? ती दुही कोणी व कशी मिटविली ?
२. बाळाजी विश्वनाथाचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा.
३. शाहूनें बाळाजी विश्वनाथास आपला पेशवा कां केलें ? पेशवेपद मिळाल्यावर बाळाजीनें कोणती कामगिरी बजावली ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. खालीलसंबंधीं टीपा लिहा.

सरंजामी पद्धति, स्वराज्याची सनद, हिंदुपदपातशाही, वसुलाची व्यवस्था, कोल्हापुरची गादी, कान्होजी आंग्रे.

उतारे

१. कान्होजी आंगऱ्याशीं तह—१७१४.

शाहू राजाच्या पायांशीं पूर्वी अंतर न जालें, यापुढेंही करणार नाहीं. पेशव्यांनीं थोरातांशीं अवक्रिया करूं नये. भाकर दिली आहे, ते त्यांनीं खावी. सनदी पत्रांखेरीज कोठें त्यांनीं उपसर्ग न करावा. वरघाटचे किल्ले आंगऱ्यानें घेतले असतील ते स्वाधीन करावे. तळघाटचे पेशव्यांनीं घेतले असतील ते आंगऱ्यांस द्यावे. प्रतिवर्षी दसऱ्यापासून मार्गशीर्षपर्यंत कोंकणची मसलत पेशव्यांनीं करावी, हबशी फिरंगी मारून गर्देस मिळवावे. रायगड आंगऱ्यांनीं घेतला तर छत्रपतीस द्यावा. लोहगड, तुंग, तिकोना, कोरगड, धनगड सामानासहित पेशव्यांकडे द्यावा. राजमाची वगैरे कित्येक आंगऱ्याकडे द्यावे.

प्रश्न :—१. हा तह कोणामध्यें झाला ? यामुळें कान्होजीस कोणता मुलूख मिळाला ? शाहूचा फायदा काय झाला ?

२. सरदेशमुखांचीं कामें

यजमान खिदमतीच्या लाजिम्याविशीं कायावाचामनें सादर राहून, रयतीस आबादी विशेष होय व सरकारची दौलत व गुन्हेगारांचें पारिपत्य घडें ते करतील व पंधरा हजार फौजा सुभेदाराच्या समागमें चाकरीस ठेवून रयतीस आपल्याकडोन राजी राखतील व उजाड गांवांची लावणी तीन सालांत करोन, ऐसा बंदोबस्त करतील जे दुष्टांचा उपद्रव होणार नाहीं. कदाचित् कोणाचे घरीं चोरी जाली किंवा कोणाचा माल चोरीस गेला, तरी चोरास शिक्षा व ज्याचा माल त्यास देतील. कदाचित् चोरास शिक्षा करोन चोरीचे ठिकाण न लागे, तरी चोराचे मालाची निशा आपण करतील. शिवाय चवथ व सरदेशमुखींत अधिक लोभ धरणार नाहींत. अगर जाहीर जाल्यास जे रुपये जादा घेतील, ते सरकार–आलींत दाखल करतील ?

प्रश्न :—१. सरदेशमुखांचीं मुख्य कामें कोणतीं ?

१५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४०. छत्रपति शाहू–पेशवा बाजीराव

१. पहिला बाजीराव (१७२०–१७४०) :—बाळाजी विश्वनाथानंतर शाहूनें त्याचा मुलगा बाजीराव यास पेशवेपद दिलें. बाजीरावास पेशवेपद देऊं नये असें अनेकांस वाटत होतें; परंतु शाहूनें तें न ऐकतां बाजीरावाची हुशारी व शौर्य लक्षांत घेऊन त्यालाच पेशवा नेमलें. त्याचा भाऊ चिमाजी अप्पा हा मोठा व्यवहारकुशल व कर्तृत्ववान होता. बाजीरावाला उत्तम शिक्षण मिळालेलें होतें. शिवाय निशाणबाजी, दांडपट्टा, घोडाफेक वगैरे क्षात्र शिक्षण धनाजीच्या हाताखालीं त्यानें संपादिलें होतें. बाळाजीच्या बरोबर तो नेहमीं लढाईवर जात–येत असे. राज्यकारभाराचा त्याला चांगलाच अनुभव मिळालेला होता. धडाडी, सेनानायकत्व, शौर्य वगैरे उत्तम गुण त्याचे ठिकाणीं होते. पेशवा झाला त्यावेळीं त्याचें वय अवघें वीस वर्षांचें होतें.

२. नवें धोरण :—बाजीरावाला राजकारणाची व देशांतील परिस्थितीची चांगली माहिती झाली होती. तो बापाबरोबर दिल्लीस गेला होता. त्यामुळें मोंगल बादशाहीचें सामर्थ्य त्याला पूर्णपणें अजमावतां आलें होतें. मोंगल सुभेदार स्वतंत्र होऊं लागल्यानें मोंगल बादशाही खुरटूं लागून तिचा ऱ्हास होऊं लागला होता, हें तो जाणून होता. तेव्हां ‘ मोंगल बादशाहीच्या वठलेल्या वृक्षाच्या मुळाशींच घाव घातला तर फांद्या आपोआप खालीं पडतील ’ असा त्यानें युक्तिवाद केला व त्याला शाहूचीही संमति मिळविली. या धोरणाच्या बुडाशींच हिंदुपदपातशाही स्थापन करण्याचें शिवाजीचें ध्येय होतें. अर्थात बाजीरावानें तें ध्येय उचलून धरलें. त्याच्या सिद्धीकरितां परमुलुखांत युद्ध चालवून शत्रूला हैराण करावयाचें असें त्यानें ठरविलें होतें. अर्थात त्याकरितां त्याला चढाईच्या धोरणाचा अवलंब करावा लागला.

३. बाजीरावाच्या अडचणी :—हिंदुपदपादशाही स्थापण्याचें कार्य तडीस न्यावयाचें झाल्यास बाजीरावाला स्वकीय व परकीय शत्रूंशीं लढावें लागणार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. श्रीपतराव प्रतिनिधि, त्रिंबक दाभाडे व कोल्हापुरकर संभाजी हे त्याचे स्वकीय शत्रू असून दिल्लीचे मोंगल, दक्षिण हैदराबादेंत नुकतेंच ठाण मांडून बसलेला निजामुल्मुल्क, पोर्तुगीज व सिद्दी हे त्याचे परकीय शत्रू होत. त्या सर्वांत निजाम हा त्याचा खरा शत्रू होय. त्यानें दाभाडे, कोल्हापुरकर संभाजी वगैरेस अनेक वेळां फूस देऊन बाजीरावाचा पिच्छा पुरविला. अर्थात त्या सर्वांचें पारिपत्य करण्यामध्यें बाजीरावाला आपलीं पहिलीं दहा वर्षें मोडावीं लागलीं.

बाजीराव

४. निजामुल्मुल्क :—कमरुद्दीनखान, चिन्किलीजखान, निमामुल्मुल्क, आसफजाह वगैरे नांवानें ओळखला जाणारा पुरुष बाजीरावाचा मुख्य शत्रू होता. तो औरंगजेबाच्या तालमींत तयार झालेला होता. जुल्फिकारखानाचें व त्याचें पटत नसे. प्रथम तो सय्येदबंधूंच्या मागें असे. पुढें त्याचें त्यांच्याशीं जमेनासें झालें. सन १७१३–१५ पर्यंत तो दक्षिणच्या सुभ्यावर होता. त्यानें सन १७२४ मध्यें हैदराबादेस स्वतंत्र राज्य स्थापलें. बाळाजीनें दिल्लीहून स्वराज्याच्या सनदा आणल्या ही गोष्ट त्याला पसंत पडली नाहीं. त्यामुळेंच तो मराठ्यांचा द्वेष करूं लागला व त्यानें मराठ्यांच्या वरील हक्कांस विरोध केला. मराठ्यांकडून चौथाईची मागणी येतांच, कोल्हापुरकर व सातारकर भोसले यांजमधील भांडणें मिटेपर्यंत कोणासच चौथाई हक्क वसूल करतां येणार नाहींत असें त्यानें बजावलें. त्यामुळें मराठे व निजाम यांच्यांत एकसारखे खटके उडूं लागले. तो मोठा धोरणी होता. सन १७२०–२४ पर्यंत तो बाजीरावाशीं नमून वागे. कारण त्यावेळीं त्याला दक्षिणेंत आपला जम बसवावयाचा होता. तो बसल्यावर मराठ्यांत दुही माजवून बाजीरावाला विरोध करण्यास त्यानें सुरुवात केली.

५. पालखेडची लढाई (१७२८) :—प्रथमतः शाहू व संभाजी यांच्यांत दुही माजविण्याचा निजामानें व्यूह रचला. एवढेंच नव्हे तर शाहूच्या राज्यावरही त्यानें आघात केला. तेव्हां बाजीरावानें निजामावर स्वारी करून सन १७२८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें पालखेड येथें त्याचा मोड केला. तेव्हां मुंगी-शेवगांव येथें पुढीलप्रमाणें तह ठरला. (१) निजामानें संभाजीचा पक्ष सोडावा. (२) मोंगलांच्या दक्षिणच्या साही सुभ्यांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क शाहूस असावा. हा विजय मिळाल्यानें बाजीरावाचें बस्तान सातारच्या दरबारांत चांगलें बसलें. पुढें सन १७३१ मध्यें शाहू व संभाजी यांच्यामध्यें समेट होऊन त्यांच्यांतील वाद कायमचा मिटला. त्याच वेळीं दोघांच्याही राज्याची वारणा नदी ही सरहद्द ठरली.

६. **डभईची लढाई** (१७३१):—खंडेराव दाभाडे सन १७२९ मध्यें वारला. त्याचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे बाजीरावास मानीना. एवढेंच नव्हे तर निजामाच्या फुशीमुळें तो बाजीरावाविरुद्ध कारस्थानें रचूं लागला. तेव्हां बाजीराव त्याजवर चालून गेला. डभई येथें लढाई होऊन त्यांत त्रिंबकराव मारला गेला (१७३१). दाभाडे हा छत्रपतीचा सेनापति होता. अर्थात अशा प्रबळ मराठे सरदारास वठणीवर आणण्याचें सामर्थ्य पेशव्यामध्यें आहे असें डभईच्या लढाईनें सिद्ध केलें. त्यामुळें निजाम व इतर मराठे सरदार पेशव्यास वचकून राहूं लागले. त्रिंबकरावानंतर त्याचा भाऊ यशवंतराव हा सेनापति झाला. परंतु तो कर्तृत्ववान नसल्यानें त्याचा कारभार त्याचा मुतालिक पिलाजी गायकवाड याच्या हातीं आला. पुढें सेनापतीचें महत्त्व लयास जाऊन त्याचे मुतालिक, गायकवाड, हेच गुजराथेंत सर्व सत्ता चालवूं लागले. मात्र त्यामुळें दाभाड्यांची सत्ता नामशेष होऊन त्यांस आपल्या जहागिरीच्या गांवीं—तळेगांव-दाभाडे येथें—रहावें लागलें.

७. **माळव्यावर मोहीम** (१७२८–२९):—सन १७१९ च्या सनदेप्रमाणें चौथाईच्या हक्कांची अंमलबजावणी करण्यास बाजीरावानें सुरुवात केली. त्याप्रमाणें सन १७२२ पासून मराठे सरदार माळवा-गुजराथमध्यें मुलुखगिरी करूं लागले; व त्या प्रांतांतही चौथाई-सरदेशमुखीचे हक्क सांगूं लागले. त्यावेळीं बादशहातर्फें सरबुलंदखान व राजा गिरिधरलाल यांच्या गुजराथच्या सुभ्यावर नेमणुका झाल्यानें मराठ्यांच्या मुलुखगिरीस जास्त आडकाठी होऊं लागली. तेव्हां बाजीरावानें उदाजी पवारास माळव्यावर पाठविलें. त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गिरिधरलालचा वध केला. तेव्हां त्याचा चुलतभाऊ दयाबहादूर तेथील अधिकारी झाला. तेव्हां बाजीरावानें चिमाजीस माळव्यावर पाठविलें. शिंदे, होळकर व पवार यांच्यासमवेत चिमाजी दयाबहादुरवर चालून गेला (१७२८). त्यानीं दयाबहादुरास ठार करून माळवा प्रांतीं आपला वचक बसविला व चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मान्य करून घेतले.

८. **बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल :**—माळव्यावर मराठ्यांचा वचक बसला तेव्हां बादशहाचा तेथील सुभेदार मोहंमदखान बनगिश, बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याच्यावर चालून गेला. तेव्हां वृद्ध छत्रसालानें बाजीरावाजवळ मदतीची याचना केली. शनिवारवाड्याच्या बांधणीचें हातीं धरलेलें काम तसेंच सोडून बाजीराव त्याच्या मदतीस तावडतोब धांवला. छत्रसाल व त्याचे पुत्र यांच्या गांठी घेऊन बाजीरावानें जैतपूर मुक्कामीं बनगिशाशीं निकाराचा सामना देऊन त्याचा पराभव केला व बुंदेलखंडांतून त्याची हकालपट्टी केली (१७२९). या मदतीकरितां छत्रसालानें खूष होऊन झांशीची तीन लाखांची जहागीर बाजीरावास दिली. पुढें १७३१ मध्यें छत्रसाल मरण पावला. त्यावेळीं त्यानें झांशीजवळचा सुमारें ५० लाखांचा मुलूख बाजीरावास दिला. तेव्हां त्या प्रांतावर गोविंदपंत बुंदेले याची बाजीरावानें नेमणूक केली.

राजा छत्रसाल

९. **सिद्दीशीं युद्ध** (१७३३–३६) :—कान्होजी आंग्रे सन १७२९ मध्यें वारला. तेव्हां त्याच्या मुलांत तंटे लागले. त्यामुळें जंजिऱ्याच्या सिद्दीस जोर चढून तो मराठ्यांस त्रास देऊं लागला. तेव्हां शाहूनें श्रीपतराव प्रतिनिधि याला सिद्दीवर पाठविलें. परंतु त्याचा पराभव झाला. तेव्हां त्या मोहिमेवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजीरावाची नेमणूक झाली. त्यावेळीं त्यानें सिद्दी सरदारांचा पराभव करून त्यांच्यापासून रायगड, तळें, घोसाळें वगैरे किल्ले घेतले. पुढें आंग्रे सरदार संभाजी व मानाजी यांच्यामध्यें तंटा लागला. तेव्हां बाजीरावानें कोंकणांत जाऊन त्यांच्यांत सलोखा निर्माण केला. त्यानंतर बाजीराव बुंदेलखंडांत असतां सिद्दीनें पुन्हां डोकें वर केलें. तेव्हां चिमाजीनें त्याचा मोड करून त्याला आपलें मांडलिकत्व स्वीकारण्यास भाग पाडलें.


जंजिऱ्याचा किल्ला

१०. भोपाळची लढाई (१७३८) :— सन १७३६ मध्यें बाजीराव माळव्यामध्यें उतरला; व माळव्याची सनद आपल्याला मिळावी अशी त्यानें खटपट चालविली. पुढें बादशाही फौजेचा मोठ्या हिमतीनें पराभव करून व मोंगलांस मोठी दहशत बसवून तो उत्तर हिंदुस्थतानांतून तडक दक्षिणेंत परतला. बाजीरावास माळव्याची सनद मिळूं नये असें निजामास वाटत होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां मोठी फौज बरोबर घेऊन तो बादशहाच्या भेटीकरितां दिल्लीस गेला; व बादशहाचें मन वळविण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. ही बातमी कळतांच सर्व मराठे सरदारांस एकत्र करून बाजीराव निजामाचा पराभव करण्या-करितां उत्तरेकडे निघाला. भोपाळ येथें निजाम व बाजीराव यांची गांठ पडून भयंकर युद्ध झालें. त्यांत निजामाचा पूर्ण पराभव झाला. तेव्हां माळव्याची सनद व युद्धखर्चाकरितां ५० लक्ष रुपये बादशहाकडून मिळवून देण्याचें निजामानें बाजीरावाला वचन दिलें.

११. वसईची मोहीम (१७३९) :—गोवें प्रांत व ठाणें जिल्हा यांत पोर्तुगीजांचा अंमल चालू होता. त्यांतील हिंदु लोकांस ख्रिस्तीधर्माची दीक्षा देण्याचा व हिंदूंचा छळ करण्याचा पोर्तुगीजांनीं सपाटा चालविला होता. ठाणें जिल्ह्यांतून पोर्तुगीजांच्या धार्मिक छळाविरुद्ध अनेक तक्रारी पेशव्याकडे येत होत्या. तेव्हां बाजीरावानें चिमाजीस पोर्तुगीजांवर पाठविलें. चिमाजीनें पराक्रमाची शर्थ करून डहाणू, तारापूर वगैरे ठाणीं सर केलीं व वसईचा अभेद्य किल्लाही सर करून घेतला. चिमाजीची ही कामगिरी अपूर्व होय यांत शंका नाहीं. या मोहिमेंत चिमाजीच्या अंगचे धडाडी, चिकाटी, शौर्य, सेनानायकत्व वगैरे गुण निदर्शनास आले. वसईच्या विजयानें पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीज सत्ता जवळ जवळ नामशेष झाली.

१२. बाजीरावाचा मृत्यु (१७४०) व योग्यता :—सन १७३९ मध्यें नादीरशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली. तेव्हां त्याचा बंदोबस्त करावा या हेतूनें बाजीरावानें उत्तर हिंदुस्थानांत मोहीम काढली. परंतु वाटेंतच नर्मदातीरीं तो रावेर येथें सन १७४० मध्यें मृत्यु पावला. बाजीराव उत्तम योद्धा व कसलेला सेनानायक होता यांत शंका नाहीं. दिल्लीचें राज्य नामशेष करून हिंदुपदपातशाहीचें ध्येय त्यानें अखंड डोळ्यांपुढें ठेवून आपल्या कामाचा पसारा मांडला होता. मराठी स्वराज्यास साम्राज्याचें स्वरूप देण्याची त्यानें मोठी कामगिरी बजावली. मात्र मराठी सत्ता विस्कळित झाली होती, तिला त्यानें संघटित स्वरूप देण्याचा प्रयत्न केला नाहीं. बापाप्रमाणें तो मुत्सद्दी असता तर त्याला जास्त श्रेय मिळालें असतें. बापाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दूरदर्शीपणाही त्याच्या अंगीं नव्हता. निजामाचा पुरता मोड करून उत्तरेकडे त्यानें आपलें प्रस्थान ठेवलें असतें तर त्याला जास्त यश मिळालें असतें व



वसईच्या किल्ल्याचा दर्शनी भाग

मराठी साम्राज्याची भक्कम पायावर उभारणी करतां आली असती. तो देखणा व उमदा होता. त्याच्या गुणग्राहकतेमुळेंच शिंदे, होळकर, पवार,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुंदेले वगैरे सरदार निर्माण झाले. मस्तानी या नांवाची त्याची एक अत्यंत स्वरूपसुंदर रखेली होती. तिच्यावर त्याचें भारी प्रेम होतें. समशेरबहाद्दर हा तिच्यापासून त्याला पुत्र झाला होता.

१३. नव्या घराण्यांचा उदय :—बाजीरावाच्या कारकीर्दींतच अनेक मराठा कुटुंबांचा उदय झाला. त्यांत खालील विशेष प्रसिद्ध आहेत. (१) **शिंदे :**—राणोजी शिंदे हा या घराण्याचा मूळ संस्थापक. शिंदे कण्हेरखेडचे पाटील होते. राणोजी प्रथम बाळाजीच्या पथकांत बारगीर होता. पुढें तो बाजीरावाचा हुजऱ्या झाला. त्याची एकनिष्ठा पाहून बाजीरावानें त्याला पागेवर मुख्य नेमला. माळव्यांत झालेल्या लढाईत (१७२९) त्यानें मोठा पराक्रम गाजविला म्हणून त्याला सरदारकी मिळाली. पुढें हें घराणें अत्यंत स्वामिनिष्ठ राहिलें. सन १७४५ मध्यें राणोजी वारला. (२) **होळकर :**–पुणें जिल्ह्यांत नीरा नदीच्या कांठीं मुसम-होळ येथें मल्हारराव होळकराचा सन १६९३ मध्यें जन्म झाला. तोच होळकर घराण्यांतील पहिला प्रसिद्ध पुरुष होय. खानदेशांत कदम बांडे याच्या पथकांत तो प्रथम होता. त्याचें धाडस पाहून बाजीरावानें त्याला आपल्या नोकरींत घेतलें. बाळापूरच्या लढाईत त्याची धमक प्रथम निदर्शनास आली. त्यानंतर अनेक लढायांत त्यानें मर्दुमकी गाजविली. सन १७३२ सालच्या माळव्यावरील स्वारींत त्यानें मोठी कामगिरी बजाविली, म्हणून बाजीरावानें त्याला इंदूरप्रांतीं मोठा सरंजाम व सरदारी दिली. (३) **पवार :**–उदाजी पवार हा या घराण्याचा संस्थापक. तो बाळाजीबरोबर स्वराज्याच्या सनदा आणण्याकरितां दिल्लीस गेला होता. गुजराथ व माळवा येथें मुलुखगिरी करून त्यानें आपला जम बसविला. सन १७२४ मध्यें धार येथें त्यानें आपलें ठाणें वसविलें. माळवा व गुजराथ येथें त्यानें आपला जम चांगला बसविला होता. बाजीरावाचें उठावणीचें धोरण त्यानें चांगल्याप्रकारें अंमलांत आणलें होतें. (४) **गायकवाड :**—दमाजी गायकवाड हा या घराण्याचा संस्थापक. बाळापूरच्या लढाईत त्यानें पराक्रम गाजवून 'समशेरबहाद्दर' हा किताब मिळविला होता. तो सन १७२१ मध्यें मेला. त्यानंतर त्याचा मुलगा पिलाजी यास त्याची सरदारी मिळाली. पुढें स्वपराक्रमानें पिलाजीनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुजराथेंत आपला जम बसविला. दमाजी गायकवाड प्रथम सेनापतीचा मुतालिक होता. परंतु पुढें सेनापति दाभाडे तेजोहीन झाल्यावर गायकवाडच गुजराथेंत श्रेष्ठ झाले. (५) **बुंदेले**:—सन १७२९ मध्यें बाजीरावास झांशीची जहागीर व बुंदेलखंडांतील सुमारें ५० लक्षांचा मुलूख छत्रसालाकडून मिळाला. त्याचा कारभार गोविंदपंत खेर याजकडे बाजीरावानें सोंपविला. त्याला पुढें सरदारी मिळाली. बुंदेले घराण्याचा तोच संस्थापक होय. गोविंदपंत हुशार व धोरणी होता. तिसऱ्या पानिपतच्या युद्धाच्या वेळीं मराठ्यांची बाजू ढांसळण्यास तोच कारणीभूत झाला असें कांहीं समजतात.

अभ्यास

१. 'शिवाजीचें ध्येय व धोरण बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनीं स्वीकारून हिंदुपदपातशाही स्थापिली' हें म्हणणें कितपत खरें आहे? उदाहरणें देऊन सिद्ध करा.

२. बाजीरावाचें ध्येय व धोरण सांगा. तें ध्येय गांठण्याकरितां त्यानें कोणत्या शत्रूंशीं सामने केले? त्याचा परिणाम काय झाला? त्यानें कोणतीं सरदार घराणीं पुढें आणलीं?

३. बाजीराव पेशवा झाला त्या वेळची परिस्थिति वर्णा. त्या परिस्थितींतून त्यानें आपला निभाव कसा लावला? त्या बाबतींत त्याला कोणाचें साहाय्य झालें?

४. टीपा करा.

वसईचा पाडाव, भोपाळची लढाई, डभईची लढाई, निजामुल्मुल्क.

५. बाजीरावाचा स्वभाव व योग्यता सांगा. त्याची कामगिरी थोडक्यांत सांगा.

६. सरदेसाई, वेहेरे, बापट यांचीं बाजीरावाचीं चरित्रें वाचा. केळकरकृत वसईची मोहीम, पारसनीसकृत–ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व साने यांचें 'थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र' हीं पुस्तकें वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारे

१. वसईवरील हल्ला—१७३९

आम्ही मोर्चे चालविले व धमधमे (तोफांकरितां धक्के) चार पांच बांधले. सुरंग चालविले. जे जे उपाय स्थळ हस्तगत करण्याचे ते केले. फिरंगी याणीं निराकरणाचे करितां सुरंगावर व धमधम्यांवर गरनाळा लाविल्या. सुरंग विच्छिन्न केले. पन्हाळे लावून पाणी सोडिलें. आगीचे बोंडे जळके टाकून त्यावर तेल, दारू, राळ टाकून चार चार रोज डोंब राहीसारखा कहरी (नाशकारक) व बरकंदाजी (भडिमार) व तोफांनीं (मारगिरी) म्हणावी तैशी केली. (स्वामींच्या आशिर्वादें) फिरंग्यांच्या तोफा मना केल्या. वसई जागा बाकाबुलंद (दुर्घट) पश्चिमेस समुद्र, दक्षिणेस खाडी. पूर्वेस खाजणें चिखल. तिहींकडून किमपि उपाय नाहीं. एक उत्तरेकडून उपाय. तिकडेही रेती व धर नाहीं. सुरंगाचा उपाय नाहीं. परंतु स्वामीच्या कृपाकटाक्षें सुरंग चालवून दोन्हीं बाजूंनीं दहा सुरंग नेऊन पोचविले. सकल सिद्धता करून लोकांस बाजूस वांटून देऊन नगाऱ्याची इशारत करून, सुरंग उडतांच सर्वांनीं एलगारास (निकराचा हल्ला) उठावें, बुरजावर शिड्या टेंकून चढावें, ऐसा करार करून बुधवारीं प्रात:कालीं सुरंगास बत्त्या दिल्या.......या लढाईस जोड नाहीं, सर्व स्वामींचा आशीर्वाद! लोक बुरुज सोडिनातसे जाहले. तेव्हां स्वामींच्या दंडप्रहारें करून फिरंगी धर्म-द्वेष्टे बहि:पंथ होऊन अष्टमीस प्रहर दिवसास सलोख्यास आले. कौल घेतला. आठां दिवसांत कबिलेसुद्धां झाडून (सर्व) जातोसे करार केले. काल पौर्णिमेस फिरंगी झाडून गेले. लष्करचे हशमाचे (नोकरचाकर) लोक सुरंगानें उडाले व जाया व ठार अदमासें पांच हजार, किंबहुना विशेष होतील. तैसेंच फिरंग्याचें सात-आठशें माणूस ठार व जाया जखमी जाहले.—चिमाजीचें ब्रह्मेंद्रस्वामींस पत्र.

प्रश्न :—१. मराठ्यांचा हल्ला परतविण्याकरितां पोर्तुगीजांनीं कोणते उपाय योजिले? त्याचा परिणाम काय झाला?

२. मराठ्यांची हानी किती झाली? त्यांनीं किल्ला कसा घेतला?

२. बाजीरावाचें धोरण.

बाजीराव बल्लाळ व चिमणाजी बल्लाळ राज्यवृद्धीची उमेद धरून बहुत पराक्रम करून दाखवावा, महाराजांची कृपा संपादावी म्हणोन "आपणास हिंदुस्थानची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चौथाई सरदेशमुखी साधण्याचा सुभा सांगावा " म्हणोन विनंति केली. महाराज यांजवर बहुत संतोषी जाहले. मुत्सद्दी जमा करून विचार पुसला. तेव्हां



श्रीपतराव प्रतिनिधी यांणीं " पातशहाचा तह जाला आहे......आधीं कर्नाटक प्रांत......साध्य सर्व फौज पाठवून करावा. नंतर ही मसलत करावी " बोलले. यावरी बाजीराव याणीं उत्तर केलें कीं, " प्रतिनिधी अशी मसलत काय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देतात ? पातशाही कमजोर जाहली. कांहीं जीव राहिला नाहीं. बखेडे बहुत जाले आहेत. पातशहा आमच्या कुमकेनें पातशाही रक्षावी असें इच्छून आहे. पूर्वीं मोठीं मोठीं कार्यें वडिलीं केलीं तशीं न करावीं तरी मोठीं पदें कशास धरावीं ? आम्हांस सनदा मात्र द्याव्या. फौज, खजीना सर्व स्वामीचे चरणाचे प्रतापेंकरून सिद्ध करतों. दोन्हीं आम्ही आटोपतों. किलिजखान याचाही शह राखून हिंदुस्थानची मसलत करतों. (कर्नाटकची मसलत) घरांतील आहे. हे प्रतिनिधींनीं सांभाळावी. थोरले महाराजांचा संकल्प हिंदुस्थान काबीज करावा ऐसा राहिला. यास्तव आधीं हें साध्य करावें आणि संकल्प शेवटास न्यावा. महाराजांचा प्रताप जें कार्य मनीं धरिलें तें घडोन यावें ऐसा आहे. यास्तव या समयीं हा उद्योग करावा हें उत्तम आहे." यावरून महाराज बहुत संतुष्ट होऊन बाजीराव यास वस्त्रें, बहुमान व सनदा देऊन निरोप दिल्हा. —मल्हाररामरावकृत शाहू महाराजांचें चरित्रावरून.

प्रश्न :—१. बाजीरावानें कोणतें धोरण पुरस्कारिलें ? प्रतिनिधीनें कोणता सल्ला दिला ?

२. बाजीरावानें कोणता युक्तिवाद केला ? त्याच्याप्रमाणें दुसऱ्या कोणाचें धोरण होतें ?

३. बाजीरावाचा कर्जबाजारीपणा—१७३४ ?

तुम्ही जालेत गोसावी आणि आम्हांकडे प्रपंच लाविला. त्या प्रपंचामुळें आम्ही जोड इतकीच केली कीं वीस लाख रुपये कर्जदार जालों. कर्जदारांचें नरकांत कुजतों इतकेंच मेळविलें......आम्ही तो कर्जदारांचे नरकांत बुडालों. तुमचे वचनावर अवंदाचे सालीं जर मला कर्ज व राजा व लोक यांचे देणियापासून मुक्त करशील यास्तव देवाजवळ आमचा प्राण देऊं. आम्हां लेंकरास मुक्त कराल ऐसें वचन अभयपूर्वक आलिया एवढे आठ महिने आणीक जीव धरून पाहूं. काय तें उत्तर लवकर पाठवावें. आज दाभाडे, गायकवाड, बांडे कोटी कोटी रुपये खजिने आणि आम्ही तुझे पायांपाशीं व धन्याचे पायाशीं निष्ठेनें वर्ततों. ते अन्नास महाग जालों. —बाजीरावाचें ब्रह्मेंद्रस्वामीस पत्र.

प्रश्न :—१. बाजीरावास किती कर्ज झालें ? कशामुळें ? त्यास वाईट कशाचें वाटत होतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१६८०–१७४०.

मराठे	इंग्रज	वर्ष	मोंगल	इंग्लंड
संभाजी १६८०–८९			औरंगजेब १६५८–१७०७	दुसरा चार्ल्स १६६०–८५
				दुसरा जेम्स (१६८५–८८)
कुतुबशाहीची अखेर	मुंबईस ठाणें	१६८७		
	मोगलांशीं युद्ध	१६८८		उज्ज्वल राज्यक्रांति
संभाजीचा वध.		१६८९		हक्कांचा कायदा
राजाराम १६८९–१७००				तिसरा विल्यम (१६८९–१७०२)
		१६९१	जिंजीस वेढा	
संताजीचा वध		१६९७		रिसविकचा तह
राजारामाचा मृत्यु		१७००		ॲन(१७०२–१४)
दुसरा शिवाजी १७००–१७०८				
		१७०७	औरंगजेबाचा मृत्यु	इं. स्कॉ. एकीकरण
शाहू १७०८–४९	कंपन्यांचें एकीकरण	१७०८		
			बहादुरशाह १७०७–१२	
बाळाजीस पेशवाई		१७१३		पहिला जॉर्ज १७१४–२७
			फर्रुखसियर १७१२–१९	
स्वराज्याच्या सनदा		१७१९	मोहंमदशाह १७१९–४८	वॉलपोल १७२१–४२
बाजीराव १७२०–४०		१७२०		
डभईची लढाई		१७३१		
		१७३८	भोपाळची लढाई	
वसई काबीज		१७३९	नादीरशहाची स्वारी	ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध
बाजीरावाचा मृत्यु		१७४०		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४१. छत्रपति शाहू व रामराजा

पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब

१. पेशवा नानासाहेब (१७४०-६१) :—बाजीरावाच्या मृत्यूनंतर शाहूनें त्याचा थोरला मुलगा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यास पेशवे-पद दिलें. नानासाहेबास तें पद न देतां बाबूजी नाईक बारामतीकर यांस तें देण्यांत यावें असें नागपुरकर रघूजी भोसले यानें कारस्थान रचलें होतें. परंतु त्याच्या खटपटीस यश आलें नाहीं. पेशवाई मिळाली तेव्हां नानासाहेब अठरा वर्षांचा होता. त्याचा स्वभाव गोड होता. लिहिण्यांत कुशल, व्यवहा-रांत धोरणी व संभाषणांत कुशल असा नानासाहेब मोठा पराक्रमी होता. दुसऱ्या-वर त्याची छाप चटकन पडत असे. बाजीरावाबरोबर त्यानें अनेक लढाया पाहिल्या व मारल्या होत्या. त्याच्यावेळीं मोंगल सत्ता फारच कमजोर झाली होती. सर्वत्र मराठ्यांची सरशी होऊं लागल्यानें हिंदुपदपातशाहीचें ध्येय गांठणें मराठ्यांच्या आटोक्यांतील काम होतें. तेव्हां नानासाहेबानें तें ध्येय गांठण्याचें ठरवून आपल्या उद्योगास सुरुवात केली.

२. रघूजी भोसले :—बाजीरावाच्या वेळेसच रघूजी भोसले हा फार मातब्बर मराठा सरदार नागपुरीं होता. त्यानें अलाहाबाद, बंगाल, ओरिसा, कर्नाटक वगैरे प्रांतांत मोठी मर्दुमकी गाजवून मराठी साम्राज्याचा फैलाव केला होता. बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान यास त्यानें जेरीस आणून बंगाल प्रांतांत मराठ्यांचा दरारा निर्माण केला होता. मात्र तो मध्यवर्ती सत्तेशीं नेहमीं फटकून वागत असे. कर्नाटकांतही त्यानें पराक्रम करून त्रिचनापल्ली हस्तगत केली होती. तंजावरच्या राजास त्रास देणारा कर्नाटकचा नबाब दोस्तअली यास ठार मारून, त्याचा जांवई चंदासाहेब यास त्यानें सातारच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें होतें. अशा या पराक्रमी सरदारास काबूंत ठेवणें नानासाहेबास जड गेलें असतें. सन १७४२ मध्यें रघूजीचा सेनापति भास्करराम कोल्हटकर यानें बंगाल, ओरिसा वगैरे प्रांतांवर पुन्हां स्वाऱ्या करून अलिवर्दीखानास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पराभूत केलें. तेव्हां नानासाहेबानें बादशहाच्या बोलावण्यावरून बुंदेलखंड, प्रयाग, काशी या मार्गानें जाऊन मुर्शिदाबादेवर स्वारी केली. त्यामुळें रघूजीस राग आला. तेव्हां त्याचेंही पारिपत्य नानासाहेबानें केलें. त्यानंतर बादशहानें त्याला माळव्याची सनद दिली. रघूजी व नानासाहेब यांच्यांत धुसफूस राहणें योग्य नाहीं हें जाणून शेवटीं शाहूनें त्यांच्यांत समेट घडवून आणला. बाळाजीनें नर्मदेपलीकडील उत्तर हिंदुस्थानांत व रघूजीनें पूर्वेकडील उत्तर हिंदुस्थानांत खंडणी वसूल करावी असें त्या समेटानें ठरलें (१७४३). त्यामुळें त्या दोघांच्या पराक्रमांस स्वतंत्र क्षेत्रें मिळालीं.

३. रजपुतांचा रोष :—मराठ्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत अनेक विजय मिळविल्यानें रजपुतांस त्यांच्याबद्दल कौतुक वाटे. त्यामुळें अनेक रजपूत मराठ्यांचे स्नेही झाले होते. जयपूरचा सवाई जयसिंह मराठ्यांचा स्नेही होता. तो सन १७४३ मध्यें वारला. तेव्हां त्याच्या ईश्वरसिंह व माधवसिंह या दोन्ही मुलांत गादीबद्दल भांडणें माजलीं. ईश्वरसिंह यानें शिंदे-होळकरांची मदत घेतली व आपला भाऊ माधवसिंह याचा पराभव केला. त्यावेळीं शिंदे-होळकरांनीं राजपुतान्यांत खूप लुटालूट केली. पुढें माधवसिंहानें होळकरास पैसे देऊन वश करून घेतलें. तें शिंद्यांस खपलें नाहीं. त्यामुळें शिंदे व होळकर यांच्यांत तेढ उत्पन्न झाली. माधवसिंह व ईश्वरसिंह यांच्यांतील तंटा नष्ट करण्याचें काम पेशव्याकडे आलें. तेव्हां माधवसिंहाच्या बाजूनें पेशव्यानें निकाल दिला. त्यामुळें ईश्वरसिंहानें आत्महत्या केली. या सर्व प्रकारानें रजपुतांचीं मनें मराठ्यांविषयीं अगदीं कलुषित झालीं. या वेळेपासूनच शिंदे व होळकर यांच्यांत वैमनस्य माजलें. पुढें सन १७४५ मध्यें राणोजी शिंदे मरण पावला.

४. शाहूचा मृत्यु (१७४९) :—सन १७४९ मध्यें शाहू मृत्यु पावला. तो आळशी व ऐषारामी होता, तरी सर्व सरदार त्याला वचकून रहात असत. त्याच्या कारकीर्दीतच मराठी राज्याचा विस्तार झाला. त्याचें आचरण साधें व पवित्र होतें. स्वभावानें तो शांत व न्यायी होता. त्याला पुत्रसंतान नसल्यानें दत्तकाचा प्रश्न निघाला. रघूजी भोसले याजकडे राज्याचा वारसा द्यावा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें एकदां त्याला वाटलें; परंतु त्याची छाप सरदारांवर पडणार नाहीं असें त्याला वाटल्यानें त्यानें तो नाद सोडून दिला. कोल्हापुरच्या संभाजीसही वारसा देण्याचा त्याचा विचार होता. परंतु ताराबाईनें आपला नातु रामराजा यास दत्तक घेण्यास सुचविलें. शाहूस ती गोष्ट पटल्यावरून त्यानें रामराजास दत्तक घेऊन आपला वारस ठरविलें. त्याप्रमाणें शाहूच्या मृत्यूनंतर नानासाहेबानें रामराजास साताऱ्यास अभिषेक करून गादीवर बसविलें.

५. मराठी राज्यांत स्थित्यंतर :—पेशव्यानें रामराजास गादीवर बसवून राज्यकारभारासंबंधीं सर्वाधिकार आपल्या हातीं वंशपरंपरा घ्यावा असें शाहूनें मृत्युसमयीं लिहून ठेवलें होतें. रामराजाही नालायख निघाल्यानें सर्व सूत्रचालकत्व पेशव्यांकडे येऊन ते सर्व सत्ताधारी बनले. आजपर्यंत पेशवा म्हणजे सेनापति, प्रतिनिधि वगैरे सरदारांसारखाच एक सरदार होता. परंतु आतां तो राजाज्ञेमुळें सर्व मराठे सरदारांत श्रेष्ठ होऊन त्याचे हुकूम सर्वांस मानावे लागणार होते. शाहूच्या मृत्यूनंतर पेशवे पुण्यास कायमचे राहूं लागले. तेव्हां राज्याचीं सर्व सूत्रें पुण्याच्या दरबारांतूनच हालूं लागलीं. यामुळें साताऱ्च्या छत्रपतीचें व सातारा या राजधानीचें महत्त्व कमी झालें. यामुळें पृथक् उद्योग करण्याची प्रथा मराठे सरदारांत निर्माण झाली. शिवाय त्यांच्यांत आजवर नांदत असलेली एकी नष्ट होऊं लागून त्यांच्यांत फूट पडूं लागली. शाहूच्या वरील योजनेनें ताराबाईचे हेतु साध्य झाले नाहींत. रामराजा आपल्या तंत्रानें वागेल व त्यामुळें सर्व राज्यकारभार आपल्या म्हणण्याप्रमाणें चालेल अशी तिची अटकळ होती. परंतु तिचें व पेशव्याचें पटलें नाहीं. त्यामुळें तिनें दमाजी गायकवाड याला साताऱ्यास बोलाविलें. पेशव्यानें त्याचा मोड करून त्याला पुण्यास कैदेंत टाकलें. यामुळें पेशव्याचें वजन वाढलें. पुढें सन १७६१ मध्यें पानिपतच्या लढाईनंतर ताराबाई वारली.

६. दक्षिणेंतील उद्योग :—वर सांगितल्याप्रमाणें अंतस्थ शत्रूंचा परामर्ष घेतल्यावर नानासाहेबानें आपल्या ध्येयाच्या सिध्यर्थ खटपट चालविली. प्रथम आपण त्याच्या दक्षिणेंतील कामगिरीकडे वळूं. (१) **निजामाचा मोड :**—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १७४८ मध्यें निजामुल्मुल्क मृत्यु पावल्यानें त्याच्या राज्यांत कलह माजले होते. त्यांत फ्रेंचांच्या मदतीनें सलाबतजंग हा निजाम झाला होता. तेव्हां निजामाचा थोरला मुलगा गाजीउद्दीन यास निजामी देण्याचें ठरवून नानासाहेबानें त्याला शिंदे-होळकरांच्या मदतीनें दिल्लीहून आणवून हैदराबादकडे चालविलें. परंतु तो वाटेंतच विषप्रयोगानें मेला. त्यावेळीं सलाबतजंगानें फ्रेंचांच्या मदतीनें मराठ्यांशीं घोडनदीजवळ लढाई दिली. तींत दोघांची बरोबरी झाली. पुढें सलाबतजंगानें भालकी येथें तह करून तापी व गोदावरी यांच्यामधील मुलूख पेशव्यास दिला. सन १७५५ मध्यें पुन्हां कटकटी उत्पन्न झाल्या. तेव्हां पेशव्यानें सिंदखेड येथें निजामाचा पराभव करून त्याजकडून २५ लाखांचा मुलूख घेतला. सन १७५८ मध्यें पेशवा व निजाम यांच्यांत पुन्हां तेढ उत्पन्न झाली. तेव्हां नानासाहेबानें आपला पुत्र विश्वासराव व चुलतभाऊ सदाशिवराव यांस इब्राहिमखानाच्या तोफखान्यासह निजामावर पाठविलें. उदगीर येथें सन १७६० मध्यें तुंबळ युद्ध होऊन निजामाचा मोड झाला. या विजयानें निजामाची सत्ता बहुतेक संपुष्टांत आली. अहमदनगर, दौलताबाद, अशीरगड, बऱ्हाणपूर, विजापूर वगैरे किल्ले व बासष्ट लक्षांचा मुलूख निजामानें मराठ्यांस देऊन त्यांचें समाधान केलें. या विजयानें मराठ्यांच्या कर्तबगारीचा कळस झाला. (२) **कर्नाटक:** कर्नाटकच्या नबाबानें नानासाहेबास विरोध केला. तेव्हां त्याच्यावरही मराठ्यांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या. सन १७५६ मध्यें सावनूरवर मराठ्यांनीं कर्नाटकवर स्वारी केली व तुंगभद्रेपर्यंतचा मुलूख मिळविला. त्याचवेळीं म्हैसूरवर मराठ्यांनीं स्वारी करून श्रीरंगपट्टणवर चाल केली. त्यावेळचा म्हैसूरचा राजा नंदराज हा शरण आला व त्यानें मराठ्यांस बत्तीस लक्ष रुपयांची खंडणी देण्याचें कबूल केलें.

७. आंग्र्यांशीं बेबनाव :—सन १७४१ मध्यें तुळाजी हा कान्होजी आंग्र्याचा अनौरस पुत्र आंग्रे घराण्याचा मुख्य झाला. तो पेशव्यास जुमानीत नसे. पश्चिम किनाऱ्यावर त्यानें आपलें सामर्थ्य इतकें वाढविलें होतें, कीं इंग्रजांसही त्याचा दरारा वाटे. त्यामुळें बंगाल व मद्रास या प्रांतांमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रजांची सत्ता दृढमूल होत असतांही, त्यांस मुंबईच्या बाजूस कांहीं करतां आलें नाहीं. त्याला कारण म्हणजे तुळाजी आंग्रे व त्याचें आरमार. परंतु तो डोईजड होईल ही गोष्ट नानासाहेबास डाचत होती. तेव्हां त्यानें इंग्रजांची मदत घेऊन तुळाजीचें पारिपत्य केलें (१७५६). त्यानंतर तुळाजीस सोलापुरास तुरुंगांत ठेवण्यांत आलें. या लढाईत तुळाजीच्या आरमाराचा नाश झाला. आंग्र्यांचें आरमार नष्ट करण्यांत नानासाहेबानें फार मोठी चूक केली. कारण त्यामुळें पश्चिम किनारा इंग्रजांस मोकळा झाला. शिवाय आरमार नष्ट झाल्यानें मराठ्यांची सत्ताही कमजोर झाली व त्यामुळें इंग्रजांच्या आरमाराचा जोर वाढला.

८. बंगाल्यांतील विजय :—रघूजी व नानासाहेब यांच्यांत समेट झाल्यावर भोसल्यानें बंगाल्यावर पुन्हां स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. सन १७४८ मध्यें रघूजीचा मुलगा जानोजी यानें बंगालवर स्वारी केली. प्रथम कटक प्रांत काबीज करून त्यानें थेट हुगळीपर्यंत स्वाऱ्या करून खंडणी वसूल केली. त्यामुळें बंगाल्यांतील लोकांस फारच धास्ती बसली. इंग्रजांनीं आपल्या संरक्षणार्थ एक खंदक खणला, तो 'मराठा खंदक' या नांवानें अजूनही ओळखला जातो. शेवटीं बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान जेरीस येऊन त्यानें मराठ्यांशीं सन १७५१ मध्यें तह केला. त्या तहाप्रमाणें मराठ्यांस कटक प्रांत मिळाला व बंगालच्या चौथाईबद्दल दरसाल बारा लक्ष रुपये देण्याचें अलिवर्दीखानानें कबूल केलें.

९. उत्तरेकडील पसारा :—उत्तरेकडील राजकारणांत हात घालण्यास बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनीं सुरुवात केली होती. बाळाजी बाजीरावानें त्यांचेंच धोरण पुढें चालवून मोठेंच यश मिळविलें. सन १७४८ पासून अफगाणिस्थानचा अमीर अहमदशाह अब्दाली यानें हिंदुस्थानावर स्वाऱ्या करावयास सुरुवात केली होती. त्या वर्षीच्या स्वारींत त्याचा पराभव झाला. तरी रोहिले नामक अफगाण त्यास मदत करूं लागले. त्यावेळीं अहमदशाह दिल्लीच्या गादीवर होता. त्यानें अयोध्येचा सुभेदार सफदरजंग याला आपला वजीर नेमलें होतें. त्याचें व रोहिल्यांचें हाडवैर होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां रोहिले अयोध्या प्रांतावर हल्ले करूं लागले. या प्रसंगीं सफदरजंगानें शिंदे-होळकरांची मदत घेऊन रोहिल्यांचा मोड केला (१७५०). या



मदतीबद्दल सफदरजंगानें गंगा व यमुना यांच्या दुआबांतील सोळा लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख मराठ्यांस दिला. शिवाय अब्दाली, मराठे, जाट, रोहिले, अफगाण यांच्यापासून बादशाहीचें संरक्षण करणें जरूर होतें. या शत्रूंपासून बादशाहीचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य बादशाहींत नव्हतें. तेव्हां सन १७५२ मध्यें बादशहानें मराठ्यांशीं एक अत्यंत महत्त्वाचा करार केला. त्या करारां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तील शर्ती अशा. (१) मुलतान, पंजाब, राजपुताना व रोहिलखंड या प्रदेशांची चौथाई मराठ्यांस मिळावी. (२) अफगाण, जाट, रोहिले वगैरे शत्रूंपासून मराठ्यांनीं बादशाहीचें रक्षण करावें. हा करार अत्यंत महत्त्वाचा होता. 'चौथाईची मोठी सनद' असेंही त्याला म्हणतात. पेशव्यांच्या नांवानें शिंदे-होळकरांनीं हा करार केला होता. त्या करारानें मराठ्यांनीं आपल्यावर फार मोठी जबाबदारी घेतली. इतक्या मोठ्या प्रांताचें संरक्षण करणें मराठ्यांच्या आवांक्याबाहेरचें होतें. अर्थात ती चूक झाली.

१०. रघुनाथरावाची पहिली स्वारी:—वरील करारामुळें अब्दाली फार चिडून गेला व मराठे निजामाच्या स्वारींत गुंतले आहेत असें पाहून त्यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली (१७५२). यावेळीं त्यानें मुलतान व लाहोर प्रांत काबीज केले. हें वृत्त कळतांच वरील करारांत ठरल्याप्रमाणें नानासाहेबानें आपला भाऊ रघुनाथराव याला बादशाहीच्या रक्षणार्थ उत्तरेस पाठविलें. त्यावेळीं तो अवघा वीस वर्षांचा होता. प्रथम अहमदाबाद जिंकून घेऊन तो जाटांच्या राज्यांत शिरला. जाट बादशहास नेहमीं त्रास देत. तेव्हां त्यांस शरण आणणें जरूर होतें. तेव्हां रघुनाथरावानें जाटांच्या राजधानीस—कुंभेरीस—वेढा घातला. यावेळीं मल्हाररावाचा मुलगा व अहिल्याबाईचा नवरा खंडेराव हा गोळी लागून मेला. तेव्हां जाटांचा निःपात करण्याची शपथ मल्हाररावानें घेतली. त्यामुळें जाटांचा राजा सुरजमल घाबरून शिंद्यास शरण गेला. शिंद्यानें त्याला अभय दिलें. ही गोष्ट कळतांच मल्हाररावाला राग आला. त्यामुळें शिंदे व होळकर यांच्यामध्यें असलेल्या आधींच्या वितुष्टांत आणखी भर पडली. मात्र तें पुढें केव्हांही नष्ट झालें नाहीं. शिंदे पुढें जोधपुरास निघून गेला. रघुनाथरावानें जाटांशीं तह करून त्याजकडून ५० लक्ष रुपयांची खंडणी घेतली. यानंतर राघोबानें मथुरा, वृंदावन वगैरे स्थळें काबीज करून रोहिलखंडांत व दुआबांत मराठ्यांची सत्ता बसविली व तो दक्षिणेंत आला. यामुळें रोहिले व मराठे यांच्यांत वैमनस्य माजलें.

११. रघुनाथरावाची दुसरी मोहीम:—रघुनाथराव दक्षिणेंत गेल्यावर नजीबखानाच्या बोलावण्यावरून अब्दालीनें सन १७५६ मध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानावर तिसरी स्वारी केली. त्यावेळीं त्यानें मुलतान व लाहोर प्रांत घेऊन दिल्लींत प्रवेश मिळविला. दिल्ली लुटून त्यानें मथुरा, वृंदावन घेतलें व आपला मुलगा तेमूरशाह यास पंजाबचा कारभार सांगून तो परतला. तेव्हां रघुनाथराव यानें उत्तरेंत पुन्हां स्वारी केली. रघुनाथरावानें प्रथम दिल्ली हस्तगत करून पंजाबवर तो चालून गेला. तेमूरशहास त्यानें पंजाबांतून हांकून लावून अटकेपर्यंत त्याचा पाठलाग केला. अटकेवर त्यानें त्यावेळीं मराठ्यांचे झेंडे रोविले. परंतु पंजाबचा पक्का बंदोबस्त न करतांच राघोबा परतला. फक्त दत्ताजी शिंदे यास त्यानें तेथें ठेवून दिलें.



१२. अब्दालीची चौथी स्वारी :—या व्यवस्थेनंतर नजीबखान रोहिल्यानें अब्दालीस पुन्हां बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें तो सन १७५९ मध्यें हिंदुस्थानांत पुन्हां आला. प्रथमतः त्यानें दत्ताजी शिंदे याचा सन १७६०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें यमुनेच्या तीरावर बदाऊनच्या घाटावर पराभव केला. दत्ताजीनें मल्हाररावास मदतीकरितां बोलाविलें असतांही, तो गेला नाहीं. त्या युद्धांत दत्ताजी पडला. त्यानंतर अब्दाली दिल्लीकडे गेला. दत्ताजीच्या वधाची बातमी पेशव्यास कळतांच, उदगीरच्या लढाईत विजयी झालेल्या सदाशिवरावास नानासाहेबानें पन्नास हजार सैन्यासह अब्दालीच्या पारिपत्यासाठीं पाठविलें. सदाशिवराव धिमा, निश्चयी, रुबाबदार व व्यवहारदक्ष होता. उत्तम सेनापति म्हणून त्यानें नुकतीच कीर्ति मिळविली होती. त्याच्याबरोबर विश्वासराव, इब्राहीमखान गारदी व त्याचा तोफखाना, बळवंतराव मेहेंदळे, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, समशेर बहाद्दर, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार वगैरे सरदार होते.

१३. पानिपतची तिसरी लढाई (१७६१):—सदाशिवरावानें प्रथमतः दिल्ली काबीज केली. त्यावेळीं अब्दालीचें लष्करी ठाणें कुंजपुऱ्यास होतें. तेव्हां सदाशिवरावानें कुंजपुऱ्याकडे मोर्चा फिरविला. भाऊनें कुंजपुरा काबीज केला. तेव्हां दिल्ली व कुंजपुरा यांच्या दरम्यान बागपत येथें अब्दालीस उतार मिळून तो यमुनापार झाला व तेथेंच तळ देऊन बसला. त्यानंतर तो पानिपतच्या रोखानें जाऊं लागला. त्याचवेळीं भाऊही कुंजपुऱ्याहून दक्षिणेस पानिपतकडे निघाला. यावेळीं अब्दालीचें सैन्य दिल्ली व मराठ्यांचें सैन्य यांच्यामध्यें आलें. त्यामुळें मराठ्यांचें दिल्लीशीं असलेलें दळणवळण तुटलें व त्यांस रसद मिळेनाशी झाली. उपासमारीनें मराठा सैन्याची फारच कुचंबणा झाली. तेव्हां युद्धाशिवाय भाऊपुढें दुसरा मार्गच उरला नाहीं. शेवटीं तो अब्दालीच्या सैन्यावर तुटून पडला. दुपारपर्यंत मराठ्यांची सरशी होती. परंतु त्यावेळीं विश्वासराव एकाएकीं गोळी लागून पडला. ही बातमी कळतांच मराठी सैन्यांत गोंधळ माजला. त्यावेळीं सेनानायकास अनुचित असें धोरण स्वीकारून भाऊ एकदम गर्दीत शिरून बेपत्ता झाला. त्यानंतर अफगाणांनीं जोर करून मराठ्यांचा संहार केला व त्यांनीं विजय मिळविला. अनेक नामांकित मराठे वीर या युद्धांत धारातीर्थीं पडले. हें पानिपतचें तिसरें युद्ध होय.

१४. युद्धाचे परिणाम:—(१) महाराष्ट्रांत आकांत माजला. मराठ्यांची कर्त्या पुरुषांची एक सबंध पिढी कापली गेली. (२) मराठ्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तरेकडील उद्योगास थोडा पायबंद बसला. (३) मराठ्यांच्या पराभवानें इंग्रज, हैदर, निजाम वगैरे त्यांच्या शत्रूंस पुढें सरसावण्यास वाव मिळाला.



पानिपतचा सामरिक नकाशा

(४) मराठ्यांमध्यें पूर्वींचा जोम व संघशक्ति राहिली नाहीं व त्यांच्या वैभवास उतरती कळा लागली. (५) मुसलमानांचाही फायदा झाला नाहीं. बादशाही दुर्बलच राहिली. अब्दालीही हिंदुस्थानावर पुन्हां चालून आला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. (६) पेशव्यांच्या मध्यवर्ती सत्तेला क्षीणता प्राप्त होऊन मराठमंडळांतील सरदार स्वतंत्रपणें वावरण्यास सुरुवात झाली.

१५. पराभवाचीं कारणें :—पानिपतच्या तिसऱ्या युद्धांत मराठ्यांचा पराभव होण्यास खालील कारणें झालीं. (१) मराठे सरदारांची स्वार्थी कुचराई त्यांच्या पराभवास कारणीभूत झाली. मल्हारराव व गोविंदपंत बुंदेले यांचीं उदाहरणें या बाबतींत ठळक होत. (२) भाऊनें अविचारानें वागून स्वतःवर आपत्ति ओढवून घेतली. (३) गोविंदपंत बुंदेले यानें त्याला योग्य वेळीं रसद पोंचविली नाहीं. (४) अब्दालीनें आयत्या वेळीं ताज्या दमाची फौज आणल्यानें मराठ्यांचा निभाव लागला नाहीं. (५) नानासाहेबानें भाऊंस पाहिजे तेव्हां मदत पाठविली नाहीं. वेळेचें महत्त्व न ओळखतांच तो स्वतःच्या लग्नसोहळ्यांत रमला होता.

१६. नानासाहेबाचा मृत्यु :—पानिपतच्या लढाईत वांचून परत आलेले वीर फारच थोडे होते. मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, नाना फडणीस, दमाजी गायकवाड वगैरे अगदीं थोडे अनुभविक लोक त्या युद्धांत वांचले. मदतीकरितां उत्तरेस जात असतांच नानासाहेबास पराभवाची बातमी कळली. तेव्हां त्याला चित्तभ्रम होऊन तो पुण्यास परतला. पुण्यास आल्यावर सन १७६१ मध्यें तो आपल्या वयाच्या चाळिसाव्या वर्षी मृत्यु पावला. नानासाहेब कर्तृत्ववान, विचारी व शांतवृत्तीचा होता. बापाचें शौर्य व आजाची मुत्सद्देगिरी त्याच्या ठिकाणीं वसत होती. मराठी राज्यास साम्राज्याचें स्वरूप देण्याचें आपल्या आजाचें व बापाचें ध्येय त्यानें गांठलें यांत शंका नाहीं. आरमाराकडे त्यानें दुर्लक्ष केलें व इंग्रजांस त्यानें पश्चिमेकडे मुभा करून दिली. ही त्याची फार मोठी चूक झाली. पुण्यास त्यानें एक फडणिशी कचेरी निर्माण करून राज्यांतील जमाबंदी-वसुलीचें काम चोखपणें सुरू केलें. तसेंच पुण्यास न्यायकचेरी स्थापून न्यायदानाची सोय त्यानें उत्तम केली. त्याच्या अकालीं मृत्यूमुळें मराठेशाहीचें फारच नुकसान झालें. त्याला विश्वासराव, माधवराव व नारायणराव असे तीन पुत्र होते. विश्वासराव पानिपतीं मेल्यानें नानासाहेबानंतर माधवरावास पेशवाई मिळाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. नानासाहेबाचें ध्येय व धोरण सांगा. त्याप्रमाणें त्यानें कामगिरी बजावली ? त्याची योग्यता सांगा.

२. नानासाहेब पेशव्यास कोणाकोणाशीं झगडावें लागलें ? कशाकरितां ? त्याचा परिणाम काय झाला ?

३. तिसऱ्या पानिपतच्या युद्धाचीं कारणें व परिणाम सांगा. त्या युद्धांत मराठ्यांचा पराभव कां झाला ?

४. सन १७५२ च्या करारांचें महत्त्व सांगा. त्या कराराप्रमाणें मराठ्यांनीं आपली जबाबदारी पार पाडली का ? त्यामुळें त्यांच्यावर कोणती आपत्ति ओढवली ? त्याचा परिणाम सांगा.

५. टीपा करा–अब्दाली, उदगीरची लढाई, पानिपतची लढाई, आंग्र्याशीं वेबनाव, रघूजी भोसले, सदाशिवराव.

६. शाहूच्या मृत्यूनें मराठी राज्यांत कोणतें स्थित्यंतर घडून आलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
भास्करराम कोल्हटकर, अलिवर्दीखान, चंदासाहेब, ताराबाई, रामराजा, दमाजी गायकवाड, कुंभेरी, सावनूरकर, तुळाजी आंग्रे, मराठा खंदक, तेमूरशाह, बदाऊन, विश्वासराव, दत्ताजी.

८. सरदेसाईकृत–नानासाहेब, सानेकृत–पेशव्यांची बखर, गोगटेकृत–शाहूमहाराजांचें चरित्र, वैद्यकृत–दुर्दैवी रंगू, सानेकृत–भाऊसाहेबांची बखर, हीं पुस्तकें वाचा.

उतारे

१. चौथाईची मोठी सनद—१७५२

प्रस्तुत राजश्री मल्हारराव होळकर व पातशहाचे दोस्त आणि वीरशिरोमणी जयाजीराव शिंदे यांच्याशीं तह येणेंप्रमाणें–आम्हीं आमरणांत तुमची आज्ञा, सेवा व चाकरी व तुमच्या शत्रूचें पारिपत्य करण्याचा मनापासून प्रयत्न करूं–मग तो शत्रू अबदाली असो किंवा दुसरा कोणी राजा असो अथवा एखादा लहान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठा जमीनदार असो–जेणेंकरून आपल्या अखंड राज्याचें व खुद्द हुजूरचें कल्याण होईल अशीच तजवीज करूं–पन्नास लक्ष रुपयांपैकीं अबदालीच्या पारिपत्याकरितां तीस लक्ष रुपये आम्हांस पावते झाले व मुलतान, पंजाब, थटा (ठठ्ठा), भकर (बक्कर) या सुभ्यांची व त्यांच्या फौजदारीची व चार महालाच्या साऱ्याची व हिसार, संबळ, मुरादाबाद व बदाऊचे फौजदारीची चौथ आमच्या सैन्याच्या खर्चाकडे लावून दिली आहे. आणि दोन भाग हुजूरच्या खालसाकडे लावून दिली आहे. आणि एक हिस्सा वजीरबहादूर व नबाबबहादराजवळ असणाऱ्या पातशाही सैन्याच्या खर्चाकडे लावून दिली आहे. येणेंप्रमाणें करार झाला आहे. आणि पवित्र अजमीर सुभ्याची सुभेदारी व नारनोल व सांभर वगैरेंची फौजदारी व त्यांच्या मुतालिकी आणि अकबराबादेची सुभेदारी व मथुरा वगैरेंची फौजदारी व मुतालिकी सेवकास मुकरर केले आहेत व बक्षिस दिले आहेत.

—मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १ ला.

प्रश्न :—१. हा करार कोणीं, कोणातर्फे व कोणाशीं केला? त्या करारान्वयें कोणत्या कोणत्या गोष्टी ठरल्या? मराठ्यांचा कोणता फायदा झाला?

२. शाबास तुमच्या हिंमतीची—१७५१

(महंमदखा बंगसाचा पराभव जाला) म्हणोन लिहिलें, ते श्रवण होऊन संतोषाच्या कोटी जाहल्या. शाबास तुमच्या हिंमतीची व दिलेरी रुस्तुमीची (पराक्रमाची) व शाबास लोकांची. आमच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुना गंगापार होऊन रोहिले पठाणांसीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न जालें! तुम्ही एकनिष्ट, कृतकर्मे सेवक, या दौलतीचे स्तंब आहां! जे चित्तावर धरीतां ते घडून येतात. पहिलीं यशावह कर्मे संपादिलींत ततोभ्यदिक हें यश संपादिलेंत. या यशास जोडाच नाहीं.

—नानासाहेबाचें शिंदे–होळकरांस पत्र

३. नानासाहेबाची सरदारांस जरब—१७६०

वारंवार लिहितां कीं 'हीं स्थळें दुर्घट आहेत, शहरास गुंततां येत नाहीं, विचारें कार्यसिद्धी करावी लागत्ये; यास्तव हल्ला राहविला.' हें अपूर्व वाटतें!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विचार दूरदेशी (दूरदर्शी) तुम्हांसच कळतें हें पूर्ण प्रत्ययास येऊन गेलें ! परंतु हें राजकारण प्रथम नरम धरलेत, रस्त बंद न केली. सर्व शहाणे तुमची फार तारीफ करीत. तुम्हांस स्थळें अवघड वाटतात, परंतु श्रीकृपेनें तृणप्राय आहेत... तुम्ही सरवत् जलद शिपाई असें जाणून मी तुम्हांस पाठविलें होतें. तुम्हीच आम्हांस विचार लिहिणार. इतकें कळलें असतें तर एखादें लहान सहान पथके पाठविले असते. तो प्रथम दिवशींच रस्त (रसद) बंद करता. तुम्ही मातबर तुम्हांस कार्य जाहल्यावाचून आणतां न ये, यास्तव तुम्हांस यश यावें म्हणून तुम्हासच आज्ञा करतों, तें तुम्ही करीत नाहीं, ये गोष्टीस इलाज कोणता करावा ! गोपाळरावजी ! हे दौलताबाद (किल्ला) दुर्घट वाटावे, परंतु दो महिन्यांत सस्तीनें वेढा घालून एक रुपया न देतां घेऊं ! कां कीं त्याची कुमक कोणी करीत नाहीं. मोगल दक्षिणेंत होता कीं नव्हतासा करूं ! हें मोगल समजले आहेत, तुम्ही समजत नाहीं......तुम्ही राजकारणें करतां तों तों काम नासतें ! या पत्रावरून जितका राग येईल तितका मोंगलावर काढणें (व काम फत्ते करणें).

—गोपाळराव पटवर्धनास नानासाहेबाचें पत्र.

प्रश्न :—१. वरील दोन्ही पत्रांवरून नानासाहेब आपल्या सरदारांस कसें वागवी ? त्यांस उत्तेजन केव्हां देई व त्यांस जरबेंत कां ठेवी ? त्याचा उपयोग काय होत असे ?

४. उदगीरची लढाई—१७६०

तेव्हां मोंगल जेर होऊन जागीर व अशर, ब-हानपूर, दौलताबाद, विजापूर, मुल्हेर किल्ला याप्रमाणें तह केला.......मोंगल फार तरतुदीनें झुंझला. बहुताप्रकारें त्यांस झुंझावयाची गांठ घालितां छातीचा कोट करून चांडोलावर फौजा उडविल्या. चारसा घटका तीर, तरवार, गोळागोळी, बाण, हात, धोंडा याप्रमाणें मारीत मारीत खासियाचे अंबारीपर्यंत मोकळा केला.......तीर्थरूपाच्या पुण्येंकरून मोठी फत्ते झाली. या झुंझानें मोंगलांत बाकी न रहातां साठ लक्षांची जागीर व सदरहूप्रमाणें स्थळें घेतलीं.

प्रश्न :—१. उदगीरच्या लढाईनें मराठ्यांस कोणता प्रांत मिळाला ? पैसा किती मिळाला ? निजामाकडील मोंगल कसे लढले ? त्यावेळीं कोणतीं हत्यारें वापरीत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. पानिपतची लढाई—१७६१

प्रातःकाळचे दोन घटिका दिवसास युद्धास गोळागोळीचा प्रारंभ जाहला. श्रीमंत अति बुद्धिवान, धैर्यवान, शूर, कृतकर्मे; गर्व मात्र विशिष्ट. परंतु तर्तुद फारच सैन्याची वगैरे केली. शेवटीं निशाणाजवळील तर्तुद एकीकडे जाऊन शत्रूची मुख्य स्थानीं गांठ पडली. मी श्रीमंतासंनिध......असे. तों विश्वासराव यांस गोळी लागली. पडले. ते हत्तीवर श्रीमंतांनीं घालून उभेच राहिले. तो पठाण पायउतारा आंत येऊन मिसळले. तोंडातोंडी होऊं लागली. आणि डावे बाजूचे मातबर सरदार, चौघड्याचे धनी देखील, पूर्वींच पळाले. उजवे बाजूचेही होळकर, शिंदे निघोण निशाण निघालें. दोन तीन शत पायदळ होतें. श्रीमंत दिसेनासे जहाले. तेव्हां ईश्वरें बुद्धि दिली. माघारे फिरलों. लक्ष सैन्य, त्यांत मोठमोठे सरदार असतां एकही त्या समयीं श्रीमंतास आप्त न जाहला.......सर्व सुखाचे सोबती......वस्त्रें, जवाहीर, जागिरा द्याव्या. अखेरीस त्यांचें देहाचें ठिकाण कोणास ठाऊक नाहीं. सर्व वाताहत जहालें.

—नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांतून

प्रश्न :—१. भाऊच्या ठिकाणीं कोणते गुणावगुण होते? सरदार त्याला सोडून कां पळाले? अवदालीनें हल्ला कोठें केला? भाऊच्या मतें कोठें होणार होता? पळ कोणी काढला?

६. पानिपतावरील नुकसान

पानिपतच्या युद्धांत ‘दोन मोतीं गळालीं, सत्तावीस मोहरा हरपल्या आणि रुपये व खुर्दा इतका नष्ट झाला कीं त्यामुळें दक्षिणेंतील मराठा स्त्रियांची नऊ लाख बांगडी वाढविली गेली.’ या वाक्याचा सरळ व स्पष्ट मराठींत अर्थ लिहा. विशेषतः ‘मोतीं’ व ‘मोहरा’ या शब्दांचे अर्थ स्पष्ट करा व त्यांचीं नांवें कोणतीं तें इतिहास शिक्षकांकडून समजावून घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४२. छत्रपति रामराजा व पेशवा पहिला माधवराव

१. राजकीय परिस्थिति :—पानिपतच्या पराभवानें मराठ्यांच्या राज्यास मोठाच धक्का बसला होता. त्यांचा दरारा कमी झाला व त्यांच्या वैभवास उतरती कळा लागली. दिल्ली दरबारीं मराठ्यांचा बोज नष्ट झाल्यानें, तेथील सर्व कारभार नजीबखान रोहिला पहात होता. अंतर्वेदींतील मराठ्यांची सत्ता नष्ट झाली होती. मराठ्यांच्या अनेक शत्रूंनीं उठाव केला होता. जाट, रोहिले, रजपूत वगैरे शत्रूंनीं आपले गेलेले प्रांत मराठ्यांपासून परत घेतले होते. निजाम मराठ्यांवर चालून आला. म्हैसूरची गादी बळकावून घेणारा व म्हैसूरचा राजा झालेला हैदरखान कृष्णा नदीपर्यंतच्या मराठ्यांच्या मुलुखांत शिरला होता व तेथें त्यानें जाळपोळ व लुटालूट सुरू केली होती. नागपूरकर रघूजी भोसल्याचा मुलगा जानोजी निजामाशीं संधान बांधून बंडाळी माजवीत होता. इंग्रजांनीं प्लासीची लढाई व वांदिवॉशची लढाई जिंकून अनुक्रमें बंगाल व कर्नाटक येथें आपली सत्ता दृढमूल केली होती. अशा बिकट परिस्थितींत माधवराव पेशवा झाला.

२. पेशवा माधवराव (१७६१–१७७२) :—नानासाहेबाच्या मृत्यूनंतर माधवराव हा त्याचा दुसरा मुलगा पेशवा झाला. त्यावेळीं त्याचें वय अवघें सोळा वर्षांचें होतें. वडिलकीमुळें पेशवाईचीं वस्त्रें आपल्याला मिळावीं असा राघोबानें त्यावेळीं हट्ट धरला होता. परंतु रामराजानें त्याचें ऐकलें नाहीं. मात्र माधवराव लहान असल्यानें पेशवाईचा प्रत्यक्ष कारभार राघोबा करूं लागला. माधवराव अल्पवयी होता, तरी तो हुषार, शूर, धडाडीचा व कर्तबगार असल्यानें मोठ्या हिंमतीनें वागून त्यानें मोठें नांव कमाविलें. पानिपतीं जुन्या पिढींतील अनेक नामांकित मुत्सद्यांची एक पिढीच्या पिढी कापली गेली होती. त्यामुळें डगमगून न जातां त्यानें नव्या पिढींतील महादजी शिंदे, आनंदराव धुळप, सखारामबापू, मोरोबा, नाना फडणवीस, हरिपंत फडके, पटवर्धन सरदार वगैरे नव्या मुत्सद्यांस व सरदारांस हातीं धरून त्यांच्या मदतीनें त्यानें मराठ्यांची विस्कटलेली घडी पुन्हां बसविली, पानिपतचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपयश धुऊन काढलें, मराठ्यांचा दरारा पुन्हां पूर्ववत् प्रस्थापित केला व राज्याची इभ्रत वाढविली.

३. राघोबाची भाऊबंदकी :—राघोबाच्या हातीं कारभार येतांच त्यानें आपल्या पक्षाचीं माणसें अधिकाराच्या जागांवर नेमण्यास सुरुवात केली. तशांतच त्यानें गोपाळराव पटवर्धनाची जहागीर काढून घेतली; त्यामुळें तो नाराज झाला व निजाम सलाबतजंग याला मिळाला. तसेंच प्रतिनिधीही चिडून निजामास मिळाला. त्या दोघांसही निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर यानें आश्रय दिला. नागपूरकर रघोजीचा मुलगा जानोजी भोसले याला 'तुला छत्रपतीपद देतो' असें आमिष दाखवून राघोबानें आपल्या पक्षाकडे ओढलें. जानोजी निजामाचा पक्षपाती होता. या सर्व जमावामुळें निजामाचें पारडें जड होऊं लागलें. खुद्द मराठ्यांमध्येंही राघोबानें दुफळी माजविली. मल्हारराव होळकर व दमाजी गायकवाड यांचा ओढा राघोबाकडे होता. महादजी शिंदे माधवरावास सामील होता. पुण्याच्या मुत्सद्दीमंडळीपैकीं सखारामबापू बोकील राघोबाचा पक्षपाती, तर नाना फडणवीस व त्रिंबकराव मामा पेठे माधवरावाचे पक्षपाती होते. अशा परिस्थितींत राज्यलोभानें राघोबानें राज्यांत भाऊबंदकी माजविण्यास सुरुवात केली.

४. घोडनदीची लढाई (१७६२):—आपल्याला पांच किल्ले व दहा लक्षांची जहागीर मिळाली पाहिजे असा राघोबानें हट्ट धरला. तेव्हां माधवराव मोठ्या पेचांत पडला. आपल्या पक्षास निजामाची मदतही राघोबानें मिळविली. त्याचवेळीं निजामही मराठ्यांवर चाल करून, खुद्द पुण्यापर्यंत जाळपोळ व लुटालूट करीत तो आला. तेव्हां राघोबानें उदगीरच्या लढाईनंतर मराठ्यांस मिळालेला साठ लक्षांचा मुलूख त्यास परत करण्याचें कबूल केलें. त्यामुळें सर्व मराठे अत्यंत नाराज झाले. पुढें भोसले व निजाम यांची मदत घेऊन राघोबा माधवरावावर चाल करून आला. घोडनदी येथें लढाई होऊन माधवराव राघोबाच्या हातीं लागला. तेव्हां त्याला कैद करून राघोबा स्वच्छंदपणें कारभार करूं लागला.

५. राक्षसभुवनची लढाई (१७६३):—वरील परिस्थिति असतांच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निजाम, जानोजी भोसले व प्रतिनिधि यांनीं छत्रपति व पेशवे यांस कारभारावरून काढण्याचा कट केला; व त्या तिघांनीं महाराष्ट्रांत जाळपोळ व लुटालूट आरंभिली. तेव्हां माधवरावानें राघोबाशीं मिटतें घेतलें. नंतर मल्हारराव होळकराच्या हट्टाप्रमाणें त्याला दहा लक्षांची नवी जहागीर देऊन त्याला माधवरावानें आपल्या पक्षाकडे ओढून घेतलें. जानोजीचेंही त्यानें समाधान करून त्यास निजामाच्या कटांतून फोडलें. पटवर्धन व प्रतिनिधि यांची समजूत घालून त्यांसही त्यानें आपल्याकडे वळविलें. महादजी शिंदे त्याच्याकडे होताच. अशा सर्व जमावानंतर माधवराव निजामावर चालून गेला. गोदावरीच्या कांठीं पैठणजवळ राक्षसभुवन येथें मोठी चुरशीची लढाई सन १७६३ मध्यें झाली. त्या लढाईत स्वतः माधवरावानें मोठा पराक्रम करून विजय मिळविला. या लढाईत निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर मारला गेला. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकीं तो एक होता. वरील विजयानें मराठ्यांस ब्यायशीं लक्षांचा मुलूख निजामानें दिला. शिवाय माधवरावाचा वचक शत्रूंवर बसून त्याच्या स्वतंत्र कारभारास सुरुवात झाली.

६. मल्हाररावाचा मृत्यु (१७६५):—इंदूरच्या होळकर घराण्याचा संस्थापक मल्हारराव होळकर सन १७६५ मध्यें वारला. बाजीरावांच्या वेळीं जें मराठा सरदारपंचायतन निर्माण झालें, त्यापैकीं मल्हारराव हा एक प्रमुख होता. सन १७२८ मध्यें बाजीरावानें त्याला पहिली जहागीर दिली व सन १७३२ मध्यें इंदूर वगैरे भागाचा सरंजाम दिला. भोपाळ, वसई वगैरे लढायांच्या वेळीं तो हजर होता. दिल्लीच्या राजकारणांत त्यानें शिंद्यांच्याबरोबर बराच भाग घेतला होता. अब्दालीविरुद्ध त्यानें दत्ताजीस मदत केली नाहीं. शिवाय नजीबखानाचाही त्यानें पाठपुरावा करून त्याला वांचविलें होतें. पानिपतच्या प्रसंगीं त्यानें कुचराई केली होती. त्यावेळीं स्वार्थांध होऊन तो पळून गेला होता. गनिमी काव्यानें लढण्यांत तो तरबेज होता. प्रथम स्वार्थ व मग राज्याचें कल्याण असा त्याचा बाणा होता! मसलत, दूरदृष्टि व सावधपणा हे त्याचे उत्तम गुण होते. त्याच्यानंतर माधवरावानें त्याची सून अहिल्याबाई हिला इंदूरच्या दौलतीवर नेमून तिचा कारभार तुकोजी होळकर यास पाहण्यास सांगितलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. हैदरचा मोड :—मराठ्यांचा पानिपतीं पराभव झाल्यानें म्हैसूरचा हैदरअल्ली मराठ्यांच्या मुलुखावर आक्रमण करूं लागला होता. तेव्हां त्याचा पाडाव करण्याकरितां माधवरावानें त्याच्यावर स्वारी केली (१७६४–६५). गोपाळराव पटवर्धन व त्रिंबकमामा पेठे यांनीं बिदनूरनजीक हैदरवर जोराचा हल्ला केला. त्यावेळीं हैदरचा पराभव झाल्यानें तो शरण आला. तेव्हां त्यानें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील मुलूख व ३२ लक्ष रुपयांची खंडणी देऊन मराठ्यांशीं तह केला. त्या तहानें मराठ्यांचा हैदरनें घेतलेला सर्व मुलूख त्यांस परत मिळाला.

८. राघोबादादास अटक :—हैदरविरुद्ध माधवराव लढत असतां राघोबा उत्तरेच्या स्वारींत गुंतला होता. तींत त्याला फारसें यश न लाभल्यानें तो परत आला होता. तेव्हां तो माधवरावाजवळ राज्याचा हिस्सा मागूं लागला. तेव्हां 'राज्य वांटतां येत नाहीं; वाटल्यास तुम्हीच राज्यकारभार पहा' असा रोखठोक जबाब माधवरावानें दिला. त्यामुळें राघोबा चिडून गेला. त्यावेळीं त्याला मुलगा नव्हता. तेव्हां राज्याचा वांटा मिळाल्यास त्याला वारस असावा म्हणून, माधवरावाची संमति नसतांही, राघोबानें अमृतरावास नाशिकजवळ आनंदवल्लीस दत्तक घेतलें. यापुढें राघोबा व माधवराव यांच्यांतील भाऊबंदकी जास्तच वाढली. त्याचें पर्यवसान युद्धांत होऊन माधवरावानें नाशिकजवळ घोडपच्या किल्ल्यानजीक राघोबाचा पराभव केला. त्यावेळीं माधवरावानें त्याला कैद करून शनिवारवाड्यांत कैदेंत ठेवलें. त्यानंतर माधवरावाचा कारभार निर्धोरपणें चालू झाला. नानाची राघोबावर नजर होती. तरीही त्यानें तेथूनच सखारामबापूच्या मदतीनें कारस्थानें चालविलीं.

९. जानोजी भोसल्याचें पारिपत्य :—जानोजी भोसले माधवरावाशीं नीटपणें वागत नव्हता. राघोबाचा तो पक्षपाती होता. अनेकदां तो पेशव्याच्या मुलुखावर चालून आला होता. निजामाशींही तो संगनमत करी व स्वतंत्रपणें वागून पेशव्यास तुच्छ मानी. अर्थात त्याचें पारिपत्य करणें माधवरावास जरूरीचें वाटलें. तेव्हां माधवरावानें नागपूरवर स्वारी केली व त्याच्या राज्यांत धुमाकूळ मांडला. त्यामुळें जानोजी माधवरावास शरण आला. शेवटीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भीमेच्या कांठीं कनकापूर येथें त्या दोघांत तह होऊन (१७६९) आठ लाखांचा मुलूख जानोजीनें पेशव्यास दिला. एवढेंच नव्हे तर, पेशव्याच्या हुकमतींत राहण्याचेंही त्यानें कबूल केलें. याचवेळीं दमाजी गायकवाड मरण पावला (१७६८). तोही राघोबाचा पक्षपाती होता. तेव्हां त्याचा मुलगा गोविंदराव याजकडून जबर दंड घेऊन माधवरावानें त्याला त्याच्या दौलतीवर स्थापून जरबेंत ठेवलें.

१०. हैदरवर दुसरी स्वारी (१७६९–७२):—याप्रमाणें राघोबाच्या पक्षांतील मोठमोठ्या सरदारांचें पारिपत्य केल्यावर माधवराव हैदरवर पुन्हां चालून गेला. गोपाळराव पटवर्धन, त्रिंबकराव पेठे व स्वतः माधवराव मोठ्या सैन्यासह त्या मोहिमेंत सामील झाले होते. त्यावेळीं त्यांनीं श्रीरंग-पट्टणवर स्वारी केली व त्या शहरास वेढा घालून थेट तंजावरपर्यंत मराठ्यांनीं मोहीम केली. या स्वारींत माधवराव स्वतः होता. परंतु प्रकृति बिघडल्यानें तो परतला. पुढें त्याच्या सरदारांनीं लढाईचें काम पुढें चालू केलें. परंतु त्यावेळीं माधवरावाची प्रकृति फारच बिघडल्याचें वृत्त त्यांस कळल्यानें हैदरशीं तह करून ते पुण्याकडे परतले (१७७२). त्या तहानें (१) शिवाजीनें मिळविलेला कर्नाटकांतील स्वराज्याचा सर्व प्रदेश मराठ्यांस परत मिळाला, (२) युद्धखर्चाकरितां हैदरनें ५० लक्ष रुपये दिले व (३) सालीना चौदा लक्षांची खंडणी देण्याचेंही त्यानें कबूल केलें.

११. उत्तरेकडील मोहीमाः—कारभार हातीं घेतांच माधवरावानें शिंद्यांच्या दौलतीवर महादजी शिंद्याची नेमणूक केली होती. जानोजी भोसल्याच्या पराभवानंतर महादजीस मदत करण्याकरितां तुकोजी होळकर, रामचंद्रपंत कानडे, विसाजी कृष्ण बिनीवाले वगैरे मराठे सरदारांस पाठवून उत्तरेची मोहीम करण्यास सांगितलें. त्याचप्रमाणें दिल्ली दरबारीं मराठ्यांचा पूर्वींप्रमाणें जम बसवावा, बादशहाकडून पूर्वींचे करारमदार पुन्हां करून घ्यावे व मराठ्यांचें वैभव पूर्वींप्रमाणें उत्तरेंत वाढवावें अशी त्रिविध कामगिरी माधवरावानें त्यांच्याकडे सोंपविली होती. प्रथमतः त्यांनीं रजपुतांपासून खंडणी वसूल केली व जाटांपासून पांसष्ट लक्षांचा मुलूख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेतला. पुढें मराठे नजीबखानावर चालून गेले. तेव्हां नजीबखान त्यांस शरण आला. मराठ्यांनीं पुढें शाहाआलम बादशहास मदत करून सन १७७१ मध्यें दिल्लीच्या गादीवर नेऊन बसविलें. नजीबखान सन १७७० मध्यें वारला होता. त्याचा मुलगा जाबेताखान याला मराठ्यांचा फार राग आला. तेव्हां त्यानें मराठ्यांवर चाल केली. तेव्हां महादजीनें त्याचा पराभव करून पानिपतच्या पराभवाचा पुरेपूर सूड घेतला. या सर्व उद्योगानें मराठ्यांचें पानिपतामुळें झालेलें नुकसान भरून निघालें, त्यांची प्रतिष्ठा वाढली व दिल्लींत मराठ्यांचा जम बसून मराठे मातब्बर ठरले.

१२. माधवरावाचा मृत्यु (१७७२) :—माधवरावानें अल्प वयांत ज्या उलाढाली केल्या त्यानें त्याच्या प्रकृतीवर मोठाच ताण पडला. त्यामुळें त्याला क्षयाची भावना झाली. त्यांतच त्याचा थेऊर येथें सन १७७२ मध्यें अंत झाला. त्यावेळीं त्याचें वय फक्त २८ वर्षांचें होतें. त्याची बायको रमाबाई त्याच्याबरोबर सती गेली. माधवराव निपुत्रिक होता. त्याचा अंतही अकालीं झाला. त्यामुळें त्याची आई गोपिकाबाई हिला फार दुःख झालें. पुढें ती नाशिकास राहूं लागली. माधवराव शूर, तडफदार, न्यायी, निःपक्षपाती, बुद्धिवान व तेजस्वी पुरुष होता. त्याचें वर्तन शुद्ध व वागणें सडेतोड होतें. त्यामुळें सर्व सरदारांवर त्याचा वचक फार असे. तो जास्त जगता तर त्याच्या हातून जास्त चांगली कामगिरी झाली असती. त्याचा अंमल करडा होता. पराक्रम, शिस्त, कामाचा उरक वगैरे त्याचे गुण नांवाजण्यासारखे होते. सर्व खात्यांची त्यानें उत्तम व्यवस्था लावून दिली होती. त्याचप्रमाणें त्यांच्या हिशोबाची व्यवस्थाही त्यानें चोख ठेविली. राज्यांतील मनुष्यास वेठीस धरून त्याजकडून काम करून घेण्याची पद्धति त्यानें बंद केली. लांच खाणाऱ्या अधिकाऱ्यांस तो कडक शासन करी. न्यायदान योग्य व्हावें म्हणून तो दक्षता बाळगी. रामशास्त्री प्रभुणे हा त्याचा न्यायधीश होता. तो अत्यंत निःस्पृह असल्यानें न्याय चोख देई. माधवरावाच्या मृत्यूनें मराठेशाहीचें फार नुकसान झालें. प्रतिकूल परिस्थितींतही त्यानें पानिपतचें नुकसान भरून काढलें व मराठ्यांची प्रतिष्ठा वाढविली हीच त्याची सर्वोत्कृष्ठ कामगिरी होय. त्यामुळेंच सर्व पेशव्यांत त्याला श्रेष्ठ पेशवा म्हणतात. पानि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पतमुळें मराठ्यांचें जेवढें नुकसान झालें त्यापेक्षांही जास्त नुकसान माधवरावाच्या मृत्यूनें झालें.

अ भ्या स

१. माधवराव पेशवा झाला त्यावेळची मराठी राज्याची परिस्थिति कशी होती ? अशाही अडचणींत माधवरावानें कोणती कामगिरी केली ?

२. माधवरावाचा स्वभाव व त्याची योग्यता वर्णा.

३. 'पानिपतमुळें मराठ्यांचें जें नुकसान झालें त्यापेक्षांही जास्त नुकसान माधवरावाच्या मृत्यूनें झालें' हें विधान सिद्ध करा.

४. माधवरावानें पानिपतचें नुकसान कसें भरून काढलें ? त्या कामीं त्याला कोणीं मदत केली ? त्याच्या सुधारणा सांगा.

५. खालील गोष्टींसंबंधीं टीपा करा.
भाऊबंदकी, जानोजीचें पारिपत्य, राक्षसभुवनची लढाई, हैदरचें पारिपत्य, मल्हाररावाची योग्यता, रामशास्त्री, नजीबखान.

६. 'मल्हारराव होळकर' यांचें मु. म. अत्रेकृत चरित्र वाचा. श्री. य. गो. कानेटकरकृत सखाराम बापूचें चरित्र वाचा.

उतारे

१. राक्षसभुवनची लढाई—१७६३.

प्रातःकाळीं मुकाबल्यास फौज तयार करून गेलों. निजाम गंगापार होते. वरकड कुल सरदार अलीकडे होते. त्यांचें आमचें झुंज झालें. फार निकडीचें हत्यार झालें. त्यांचा मोड झाला, आमची फत्ते जाहली. विठ्ठल सुंदर यांचें डोचकें कापून आणिलें. त्यांचे पुतणे विनायकदास व खंदारचा राजा गोपाळसिंग ठार झाले. मुरादखान वगैरे सोळा सरदार पाडाव सांपडले. गंगेनें (गोदावरी) नबाबाची मोठी कुम्मक केली. चार सहा घटका लढाई मातबर झाली. त्यांची निम्मी फौज सात आठ हजार व चारपांच हजार गाडदी इतकी अलीकडे होती. मोठें यश आलें. निजामअली मोठी दहशत पावून गंगा उतरूं लागला, हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्तमान जानोजीनें दादास कळविलें आणि सांगितलें, ' जलदी येऊन पोचावें. ' त्याप्रमाणें हल्ला होतांच एकटा नबाब पलीकडे होता तो कायम राहून तोफांची व बाणांची मारगिरी करील असें वाटत होतें. परंतु तो......अर्धरात्रीं बुणगे व डेरे टाकून औरंगाबादेस गेला. पंधरा हत्ती व पंचवीस तोफा व गोळे, दारू, डेरे, दांडे राहिले ते व घोडीं, उंट. बैल वगैरे लूट बहुत आली. पूर्वीं तीन लढाया झाल्या परंतु अशी जरब कधींच बसली नाहीं. —माधवरावानें केलेलें वर्णन.

प्रश्न :—१. निजामाचें कोणतें नुकसान झालें ? मराठ्यांस कोणती लूट मिळाली ?

२. माधवरावाची हिशेबावर नजर

' आतां कागदपत्रांस फार भ्यावें. तमाम रुमाल आणूं लागले. आम्हांकडील पत्रें निराळीं ठेवावीं. केवळ कलमदानांत न ठेवावीं. आम्हीं आपल्यातर्फेनें ममता संपादण्यास चुकत नाहीं. परंतु मर्जी फारच नाजूक झाली आहे. पेशव्याचे मामा रास्ते-बंधू पुण्यांतच आहेत, त्यांचेकडील चौथाई सरंजाम घेण्याची घालमेल फार पडली होती. फारच ओढून पाहिलें. न चालेसें झालें तेव्हां चौथाई सरंजाम सरकारांत घेतला. गेल्या स्वारींत सामील व्हावयास दिवसगत झाली, म्हणून रागें भरले.' ' हिशेबांचा जाबसाल होऊं लागला म्हणजे कामाची जलदी फार होते. बोलावणें गेल्यावर न आल्यानें रागें फार भरतात. कागद कोणी माघारे टाकले तर फारच बेमर्जी होते. मग कोणाचेंही ऐकत नाहींत. समंजसांशीं गांठ आहे. कागदपत्र चांगले असले म्हणजे काय चिंता आहे ? '

प्रश्न :—१ माधवराव हिशेब तपासूं लागल्यानें सरदारांची स्थिति कशी झाली ? कां ?

३. माधवरावाची जरब

घरीं गेल्यास साफ सांगत कीं आम्हांस अनुकूल नाहीं. तेव्हां वेडेंवांकडें पुष्कळ बोलोन पागा हिरून आणीन, लुटून टाकीन अशीं भयवाक्यें बोलिले... झुंजाचे अलिकडे क्रूरता फारच धरिली आहे. नित्य एक दोन हात तोडितात; डोकीं मारतात. रदबदल कोणाची चालत नाहीं. जें करतील तें प्रमाण. इजत जतन होऊन पुण्यास येईल तो प्रारब्धाचा.

प्रश्न :—१. माधवरावानें जरब कशी राखली ? तसें करणें योग्य होतें ? कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. माधवरावाचें ध्येय—१७६३.

आमचे दौलतेच्या तणावा तुटत चालल्या. पहिल्यापासून राखिलें असतें तर सर्वही आपआपला कारभार करून लगामीं राहते. तें न झाल्यानें सर्व मुलूख बुडाला. लोक फितूर फार झाले. धन्याचें वजन राहिलें नाहीं. शत्रू बलवत्तर झाले. तथापि पैसा असता तरी ही गोष्ट इतकेही पेच संभाळून नीट होत्या. पैसा नाहीं. तेव्हां फौज कशावर ठेवावी ? फौज नाहीं दौलत कशी राहणार ?... सारें अवघडच आहे. प्रस्तुत दादासाहेब व आम्ही एक झालों हीच गोष्ट एका करोडीची जाहली. कारभारीही लगामीं उत्तमप्रकारें लागले. आमची दौलत पूर्वीप्रमाणें करावी हेंच मानस अंतर्यामापासून आहे......दौलतीस ज्या गोष्टीनें कल्याण तीच गोष्ट साऱ्यांनीं करावी. हीच बुद्धि आहे व प्रस्तुत याप्रमाणें चालत आहे.

—माधवरावाचें गोपिकाबाईस पत्र.

प्रश्न:—१. माधवरावाच्या अडचणी कोणत्या ? त्यांपैकीं कोणती अडचण त्यानें निकालांत काढली ? कशी ? त्याचें मुख्य ध्येय कोणतें ?

५. माधवराव व इंग्रज—१७७२.

इंग्रजांचें पातशहाजवळ प्राबल्य. त्यास दिल्लीस स्थापावें हा हेत पांचसात वर्षें इंग्रजांनीं केला आहे. ते पातशहास दिल्लीस आणते तर त्यांचें सामर्थ्य नव्हतें असें नाहीं, आणितेच; परंतु ते पाण्यांतील पावप्यादे. इतकी हिंमत त्यांची नाहीं.........इंग्रजांचा प्रवेश दिल्लींत होऊं देऊं नये. दिल्लींत प्रवेश जालिया उखळणार नाहींत. टोपीकरांत इंग्रजांनीं डोई उचलली आहे.... दिल्लींत प्रवेश त्यांचा जाल्यास पातशहा जेरबस्त त्याचा होईल, फार अवघड पडेल. इंग्रज चढीं लागला आहे. त्याचें सुख सुजाउद्दौला आदिकरून कोणास नाहीं. तरी अमीर सर्व आपले करून, सरदारांची फूट मोडून, एक होऊन इंग्रेज माघारे जात तें करावें. इंग्रेजांनीं बंगाला पातशहाकडून लिहून घेतला, तोही तजविजीनें सुटे तें पुढें केल्यास होईल. तूर्त पातशहा आपला एहसानमंद होऊन, बंदोबस्त आपले हातून करून घेईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐशी कारस्ती जी होईल ती करावीच करावी. मनसुबेबाजपणाचा प्रकार हरहुन्नरें, एकास बैसवावें, एकास ऊठ म्हणावें, आपलें वजन त्यावर पुरें वाढावें ऐसा समय आहे. यांत जो फैल मजबुद्धीनें कर्तव्य तो करणें.

प्रश्न :—१. इंग्रजांचा प्रवेश दिल्लींत होऊं नये असें माधवरावास कां वाटत होतें ? ' दिल्लीचें महत्त्व त्यास पटलें होतें व इंग्रजांस तो ओळखून होता ' हें वरील पत्रावरून तुम्ही कसें सिद्ध कराल ? वरील पत्रांत त्याचा दूरदर्शीपणा व धोरणीपणा कसा दिसतो ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४३. माधवरावाच्या वेळची कांहीं ठळक मंडळी

१. आनंदराव धुळप :—आंग्र्यांचा नाश झाल्यावर 'सुभा आरमार' या अंमलदारीवर आनंदराव धुळप ऊर्फ मोरे याची विजयदुर्गच्या आरमारावर सन १७६४ मध्यें माधवरावानें नेमणूक केली. त्यानें १७९४ पर्यंत तो कारभार पाहिला. आनंदराव मोठा दर्यावर्दी होता. माधवरावाच्या प्रोत्साहनानें त्यानें अनेक आरमारी लोकांस बक्षिसें दिलीं व त्यांच्याकडून चांगलीं कामें करून घेतलीं. आंग्र्यानंतर उत्तम व कसबी दर्यावर्दी म्हणून आनंदराव धुळप ओळखला जातो. त्यानें आरमाराची उत्तम व्यवस्था ठेवून मराठ्यांच्या आरमाराचा चांगलाच वचक बसविला होता.

२. विसाजी कृष्ण बिनीवाले—याचें मूळ ठिकाण राजापुराजवळील तरवण हें होय. तो जातीचा कऱ्हाडा ब्राह्मण. त्यानें प्रथमतः पागेंत नोकरी करून पुढें बळवंतराव मेहेंदळे याच्याबरोबर कर्नाटकांतील युद्धांत नांव मिळविलें. पुढें रामचंद्र गणेश कानडे याच्या हाताखालीं लष्करांत नोकरी करून उत्तम व वरिष्ठ दर्ज्याचा सेनापति म्हणून त्यानें कीर्ति मिळविली. पुढें माधवरावानें कानड्यानंतर त्याला उत्तरेकडील स्वारीचें कार्य सांगितलें. तेथें त्यानें उत्कृष्ठ कामगिरी बजावून मराठ्यांचा दरारा उत्तरेंत पुन्हां स्थापन करण्यांत मोठा भाग उचलला. तो सन १७८५ मध्यें मृत्यु पावला.

३. रामशास्त्री प्रभुणे—सातार्‍याजवळ माहुली या क्षेत्राचा ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण. सातारच्या अनगल सावकारांच्या घरीं तो प्रथम शागीर्द होता. तेथें उपरति होऊन तो काशीस गेला व मोठी विद्या संपादन करून तो सन १७५१ च्या सुमारास पुण्यास आला व तेथें नानासाहेबाच्या आश्रयास शास्त्री म्हणून राहिला. पुढें माधवरावानें त्याला पुण्याच्या मुख्य न्यायाधिशाचें काम सांगितलें. तें त्यानें मरेपर्यंत–सन १७८९ पर्यंत–केलें. नारायणरावाच्या खुनाच्या वेळीं त्यानें दाखविलेला स्पष्टवक्तेपणा व निःस्पृहपणा कमालीचा होता. नाना फडणिसानें त्यास पुन्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १७७७ मध्यें न्यायाधिशी दिली. रामशास्त्री धार्मिक व्यवहारांत कालमान व परिस्थिति पाहून निःस्पृहपणें चोख न्याय देत असे. मराठी राज्याबद्दल तो अत्यंत निष्ठा बाळगी. तो अद्वितीय न्यायाधीश होता अशी सर्वांनीं त्याची स्तुती केलेली आढळते.

४. सखारामबापू बोकील—सखारामबापू बोकिलाचा जन्म सन १७१६ मध्यें झाला. तो मूळचा हिवरें गांवचा कुलकर्णी. नानासाहेब पेशवे व सखारामबापू समवयस्क असून लहानपणीं एकत्र वाढले होते. त्यामुळें बापू व्यवहारकुशल, धोरणी व राजकारणांत कुशल झाला. बापूचा ओढा पहिल्यापासूनच सदाशिवरावापेक्षां रघुनाथरावाकडे विशेष होता. बापू बुद्धीनें चलाख, प्रसंग पाहून वागणारा, धोरणी, कारस्थानी धूर्त व दूरदृष्टीनें वागणारा होता. राज्याच्या घडामोडी आरंभापासून पाहिलेल्या असल्यानें पेशवाईच्या उत्तरकाळांत त्याला महत्त्व प्राप्त झालें. तो सहसा लेखांत गुंतत नसे. त्याच्या अंतःकरणाचा ठाव कधींही लागत नसे. नानाचें व त्याचें कधींच पटलें नाहीं. रघुनाथरावाबरोबर तो उत्तरेच्या स्वाऱ्यांत नेहमीं असे. त्यामुळें बापूवरही त्याचा विश्वास बसला. माधवराव बापूस पूर्णपणें ओळखून होता व म्हणूनच आपल्या मरणकाळीं त्यानें बापूकडून 'नारायण-रावास अंतर देणार नाहीं' असें वदवून घेतलें होतें. परंतु नारायणरावानें त्याचा अपमान केल्यानें तो राजकारणांतून निवृत्त झाला. पुढें बारभाई प्रकरण उभारून सखारामबापूनें दादास विरोध करण्यांत प्रमुख भाग घेतला. पुढें बापूचीं कांहीं फितुरीं पत्रें शिंद्यातर्फें नानास मिळाल्यानें नानानें बापूस कैद केलें. तेथूनही त्याचे कारस्थानी उद्योग चालूच होते. पुढें सन १७८१ मध्यें कैदेंत असतांच तो मरण पावला.

५. पटवर्धन सरदार—माधवरावाच्या वेळीं पटवर्धन सरदार उदयास आले. त्यांचा मूळ पुरुष हरभटबाबा होय. माधवरावाच्या वेळीं गोपाळराव पटवर्धन फार गाजला. नानासाहेबाचा त्याच्यावर विशेष लोभ असे. गोपाळराव शूर तसाच स्पष्टवक्ता व व्यवहारनिपुण होता. तो आनंदी, मानी, धाडसी व तल्लख होता. कर्नाटकांतील राजांस त्याचा मोठा दरारा वाटे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्नाटकांतील हैदरवर व खुद्द निजामावरही त्यानें अनेक यशस्वी मोहिमा केल्या होत्या. गोपाळराव सन १७७१ मध्यें मरण पावला. पुरुषोत्तमराव दाजी हा दुसरा एक पटवर्धन घराण्यांतील पुरुष मोठा मानी, स्वामिनिष्ठ, सच्चा व बाणेदार होऊन गेला. नारायणरावाच्या वधानंतर बारभाईच्यातर्फे बाल पेशव्याच्या संरक्षणार्थ त्यानें दाखविलेली स्वामिनिष्ठा व चतुरपणा विशेष उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे.

६. रामचंद्र गणेश कानडे—माधवरावाच्या वेळचा मुख्य सेनापति. शाहूच्या वेळीं त्याचा उदय झाला. कर्नाटक व उत्तर हिंदुस्थानांतील कामगिरी त्याच्या उद्योगाचें व श्रमाचेंच फळ होय. तो कसलेला सेनानायक होता. त्यानेंच जानोजी भोसल्यास वठणीवर आणलें, अंतर्वेदींत मराठ्यांचा जम बसविला व उत्तरेंत मराठ्यांचा दरारा पुन्हां स्थापन केला. पुढें पुढें त्याचें व विसाजीपंत बिनीवाले यांचें न पटल्यानें त्याची थोडी मानखंडना झाली. तरी पुढें त्याचा रुसवा काढण्यांत आल्यावर बारभाईना त्यानें उत्तम मदत केली. तो पुढें सन १७८० मध्यें इंग्रजांशीं लढत असतां मरण पावला.

७. हरिपंत फडके—माधवरावाच्या कारकीर्दींत याचा उदय झाला. उत्तम सेनानायक म्हणून त्यानें प्रसिद्धी मिळविली. माधवरावानंतर तो फारच प्रसिद्धीस आला. बारभाई प्रकरणांत तो होता. नाना फडणिसाचा तो केवळ उजवा हात होता. रघुनाथरावाचा पाठलाग करण्यांत त्यानेंच पुढाकार घेतला होता. हैदर व निजाम यांचा त्यानें कित्येकदां मोड करून त्यांस त्यानें नरम आणलें होतें. खुद्द इंग्रजांनीं त्याची धास्ती घेतलेली होती. तो मनमिळाऊ, सोशिक, तडजोडीनें वागणारा व कुशल सेनानायक होता. परशुरामभाऊ व हरिपंत हे दोघे वाटेल त्या संकटांत नानाकडे धांवत येऊन त्याची कामगिरी तात्काळ उठवीत. हरिपंत थोडा नरमच माणूस होता. अधिकार अगर पैसा यांपेक्षां राज्याच्या कल्याणाकडेच त्याचें सदैव लक्ष असे. लॉर्ड कॉर्नवॉलिसची त्याच्यावर बहाल मर्जी असे. असा हा स्वामिभक्त पुरुष सन १७९४ मध्यें आपल्या वयाच्या सुमारें पांसष्टाव्या वर्षी मृत्यु पावला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१७४०-१७७२

मराठे	इंग्रज	वर्ष	मोंगल	इंग्लंड
शाहू १७०८-४९	फ्रेंच गव्हर्नर डुप्ले १७४०-५४		मोहंमदशहा १७१९-४९	दुसरा जॉर्ज १७२७-६०
नानासाहेब १७४०-६१				
		१७४२	भास्कररामाची बंगालवर स्वारी	वॉलपोलचा राजीनामा
	१ लें कर्नाटक युद्ध	१७४४		
	मद्रासचा पाडाव	१७४६		
	युद्धाचा शेवट	१७४८	अब्दालीची १ ली स्वारी	एलाशापेलचा तह
शाहूचा मृत्यु. रामराजा	२ रें कर्नाटक युद्ध	१७४९		
मोठी सनद १७५२	क्लाइव्हनें अर्काट घेतलें	१७५१		पंचांगांत सुधारणा
आंग्र्याचें पारिपत्य	प्लासीची लढाई १७५७	१७५६	रघुनाथरावाची स्वारी	सप्तवार्षिक युद्ध
उदगीरची लढाई	वांदिवॉशची लढाई	१७६०		तिसरा जॉर्ज १७६०-१८२०
पानिपतची लढाई		१७६१		
माधवराव १७६१-७२				
राक्षसभुवनची लढाई		१७६३		पॅरिसचा तह
मल्हाररावाचा मृत्यु	दिवाणी मिळाली	१७६५	बक्सारची लढाई १७६४	स्टँप ॲक्ट
	हैदरशीं युद्ध	१७६७		
माधवरावाचा मृत्यु	वॉरन हेस्टिंग्ज १७७२-७४	१७७२	शाहआलमची गादीवर स्थापना १७७१	औद्योगिक क्रांति
नारायणरावाचा खून	रेग्युलेटिंग ॲक्ट	१७७३	बोस्टन प्रकरण	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४४. छत्रपति रामराजा व पेशवा नारायणराव

१. पेशवा नारायणराव (१७७२–१७७३ :—माधवरावानंतर त्याचा धाकटा भाऊ नारायणराव याला पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. त्यावेळीं तो फक्त सतरा वर्षांचा होता. मृत्यूसमयीं माधवरावानें राघोबास नजर कैदेंतून सोडलें व त्याचें कर्ज वारून त्याला जहागीर करून दिली होती. राघोबानेंच नारायणरावास सातान्यास नेऊन रामराजाकडून त्यास पेशवाईचीं वस्त्रें देवविलीं. परंतु नारायणरावाचा स्वभाव अत्यंत तामसी होता. तुसडेपणा, उताविळपणा व हेकटपणा यांमुळें त्यानें अनेकांचीं मनें दुखविलीं होतीं. प्रत्येक बाबतींत माधवरावाचें अनुकरण करण्यास तो बघे. पण तें त्याला साधलें नाहीं. धूर्ततेनें वागून दुसन्यावर छाप पाडण्याचें कसब त्याच्या अंगीं नव्हतें. शिवाय आपल्या सरदारांशींही तो मनमोकळेपणानें वागत नसे. यामुळें त्याचें कोणाशींच कधीं पटलें नाहीं. अर्थात त्याच्याबद्दल कोणासच प्रेम वाटेनासें झालें. हलक्या लोकांच्या संगतींतही तो वागूं लागला. त्यामुळें सर्वांस फार दुःख होई. तशांतच दरबारांत दुफळी माजली. नाना फडणीस, त्रिंबकराव पेठे, हरिपंत फडके, गोपाळराव पटवर्धन वगैरे मंडळी एका पक्षास झाली व राघोबा, त्याची महत्त्वाकांक्षी बायको आनंदीबाई, सरदार रायरीकर, सखारामबापू वगैरे लोक दुसऱ्या पक्षांत सामील झाले. त्याच-वेळीं निजाम व हैदर यांच्याशीं राघोबानें सलगी केली. तेव्हां नारायण-रावानें त्याला कैदेंत टाकलें.

२. नारायणरावाचा वध (१७७३):—कैदेंत असतांच रघुनाथराव कारस्थानें करीत होता. नारायणरावास कैद करावें व सर्व कारभार आपल्या हातीं घ्यावा असा घाटही त्यानें घातला. रघुनाथरावास कैदेंतून सोडवावें म्हणून आनंदीबाई, रायरीकर, सखारामबापू वगैरेंनीं कटही केले. पण ते सव फसले. राघोबानेंही त्रागा केला व अन्न वर्ज्य केलें. तेव्हां रघुनाथरावाच्या पक्षांतील लोकांनीं शनिवारवाड्यावरील गारदी, अरब वगैरे लोकांस फूस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लावून आपल्या पक्षांत घेतलें. त्यांतील खरगसिंग, सुमेरसिंग व मोहंमद युसफ वगैरे लोकांस रघुनाथरावानें नारायणरावास धरण्याचा हुकूम केला. रघुनाथरावाचा हुजऱ्या तुळ्या पवार हाही या कटांत होता. पुढें रघुनाथरावाच्या हुकुमांत कोणीतरी 'ध' चा 'मा' केला! त्यामुळें ता. ३० ऑगस्ट रोजीं नारायणराव दुपारचें साखरभाताचें जेवण करून आरामांत असतां हजार-पांचशें गारदी वाड्यांत शिरले व त्यांनीं नारायणरावाचा खून केला. नारायणरावास वांचवावें म्हणून त्याचा खिजमतगार चाफाजी टिळेकर मध्यें पडला; परंतु त्याला व इतर पांचसहा जणांस गारद्यांनीं ठार केलें. या कामगिरीकरितां रघुनाथरावानें गारद्यांस आठ लक्ष रुपये बक्षीस दिले.

३. रघुनाथरावास पेशवाई:—नारायणरावाच्या खुनानंतर रघुनाथरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. पण त्यानें दोन-तीन महिनेच कारभार केला. त्यानें नारायणरावाचा खून केला याबद्दल रामशास्त्री प्रभुणे याची खात्री झाली होती. तेव्हां रघुनाथरावानें नारायणरावाचा खून म्हणजे ब्रह्महत्या केली म्हणून त्याला रामशास्त्र्यानें देहान्त प्रायश्चित्त सांगितलें. एवढेंच नव्हे, तर रघुनाथराव पेशवाईवर असेतों 'पेशव्यांच्या राज्यांत पाणी पिणार नाहीं' अशी शपथ घेऊन व न्यायाधिशाच्या जागेचा राजीनामा देऊन रामशास्त्री पुण्याबाहेर एकदम चालता झाला. या प्रकारानें राज्यांत मोठी खळबळ उडाली. शिवाय पेशव्याचा खून म्हणजे राज्यनाशाचें चिन्ह होय असेंही लोक म्हणूं लागले.

४. बारभाईचें कारस्थान (१७७३):—रघुनाथरावास पेशवाई मिळाल्यावर, लोकांचें लक्ष नारायणरावाच्या खुनाकडून दुसरीकडे वळावें म्हणून, त्यानें मोहिमावर मोहिमा सुरू केल्या. नारायणरावास साबाजी भोसले मदत करी. त्यास निजाम सामील होता. तेव्हां राघोबानें निजामावर स्वारी केली व त्याचा पराभव केला. मात्र राघोबानें त्याच्यावर गय केली. तसेंच हैदरवरही राघोबा चालून गेला. त्याचा पराभव करूनही त्याच्याशीं राघोबानें स्नेह संपादिला. राघोबा अशा उद्योगांत असतांच पुण्यास सखारामबापू बोकील, नाना फडणीस, हरिपंत फडके, त्रिंबकराव पेठे, परशुरामभाऊ पटवर्धन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साबाजी भोसले, फत्तेसिंग गायकवाड वगैरे एकत्र होऊन त्यांनीं ब्रह्म-हत्या करणाऱ्या राघोबास पेशवाईवरून काढण्याकरितां कारस्थान रचलें. त्यांच्या कारस्थानास 'बारभाईचें कारस्थान' असें म्हणतात. गंगाबाई ही नारायणरावाची स्त्री एक महिन्याची गरोदर होती. तेव्हां तिला पुढें करून कारभार करावयाचा. तिला मुलगा झाल्यास ठीकच; न झाल्यास तिच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवानें पेशवाई चालवावयाची असा या मंडळीनीं घाट घातला. ताबडतोब नारायणरावाची बायको गंगाबाई हिला त्या सर्वांनीं पुरंदर किल्ल्यावर मोठ्या बंदोबस्तानें ठेवलें व तिच्या नांवें कारभार सुरू केला.

५. **राघोबाचें पारिपत्य** :—पुण्यांतील या कटाची बातमी राघोबास कळली. तेव्हां तो हैदरशीं चाललेला लढा तसाच टाकून पुण्याकडे परत फिरला. मात्र हैदरकडून त्यानें मदतीचें आश्वासन घेतलें. राघोबा पुण्याकडे येत आहे असें कळतांच त्रिंबकराव पेठे, हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे मंडळी त्याच्यावर चालून गेली. पंढरपुराजवळ कांसेगांवीं दोन्ही सैन्यांची लढाई होऊन राघोबा पळूं लागला. त्या लढाईत त्रिंबकराव मारला गेला. पुढें राघोबा उत्तरेकडे पळून गेला. तेव्हां निजाम व साबाजी भोसले यांच्या मदतीनें हरिपंत फडके त्याच्या मागें लागला. तेव्हां राघोबा गुजराथेंत पळाला; तेथें त्याला आश्रय मिळाला नाहीं. तेव्हां तो सुरतेस इंग्रजांच्या आश्रयास गेला. अनायासें आलेली अशी संधि धूर्त इंग्रज कशी गमावणार? त्यांनीं लगेच राघोबास आश्रय देऊन त्याच्याशीं तह केला.

६. **सवाई माधवरावाचा जन्म** (१७७४):—या घडामोडी चालू असतां गंगाबाई पुरंदरास प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव 'सवाई माधवराव' असें ठेवण्यांत येऊन साताऱ्याहून त्याच्या नांवानें रामराजाकडून पेशवाईचीं वस्त्रें आणविण्यांत आलीं. तेव्हां रामशास्त्रीही पूर्वीप्रमाणें न्यायाधिशाचें काम पाहूं लागला. याच सुमारास राघोबाची स्त्री आनंदीबाई ही प्रसूत होऊन तिलाही धार येथें सन १७७५ मध्यें मुलगा झाला. त्याचें नांव 'बाजीराव' असें ठेवण्यांत आलें. सवाई माधवरावाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षणाची नानानें चांगली व्यवस्था ठेविली होती. पुढें बारभाईतील मुत्सद्दी हळूहळू गळूं लागले व त्यामुळें नानाच्या हातींच सर्व कारभार राहिला. सवाई माधवरावाची कारकीर्द म्हणजे नानाचाच कारभार असेंही म्हणतां येण्यासारखें आहे.



सवाई माधवराव व नानाफडणीस

७. तोतयाचें बंड:—पानिपतच्या युद्धांत अनेक प्रसिद्ध व्यक्ति पतन पावल्या. कोणाचा धड मागमूसही लागला नाहीं. त्यामुळें तोतयेगिरीस ऊत आला. अनेक तोतये त्यावेळीं प्रसिद्धीस आले. त्यांत जनकोजी शिंदे, यशवंतराव पवार व सदाशिवरावभाऊ यांचे तोतये फार प्रसिद्ध होते. सुखनिधान नांवाचा एक कनोजा ब्राह्मण हुबेहूब सदाशिवरावासारखा दिसे. पहिल्या माधवरावाच्या वेळींच तो दक्षिणेंत आला व 'मी सदाशिवराव आहें' असें त्यानें जाहीर केलें. खऱ्या-खोट्याची पारख न करतां अनेक लोक त्याला मिळाले. तेव्हां माधवरावानें त्याची चौकशी केली व तो तोतया आहे हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिद्ध झाल्यावर त्याला अटकेंत ठेवलें. सदाशिवरावाची बायको पार्वतीबाई हिला मात्र तो तोतया नाहीं असें वाटे! यामुळें सर्वांस विस्मय होई. पुढें त्या तोतयास अनेक ठिकाणीं कैदेंत ठेवण्यांत आलें. सन १७७६ मध्यें रत्नागिरीच्या किल्ल्यांत कैदेंत असतां तेथील किल्लेदार रामचंद्रपंत नाईक यास फितवून तोतया तेथून निसटला. पुढें त्यानें फौजफांटा जमवून तो पेशव्याच्या मुलुखांत लुटालूट करूं लागला. इंग्रज व हैदर त्याला फूस देत. शेवटीं नानानें महादजी शिंदे व रघोजी आंग्रे यांच्या मदतीनें तोतयाला पकडून पुण्यास आणलें. लगेच एक चौकशीमंडळ नेमण्यांत येऊन तोतयास रामशास्त्री प्रभुणे यानें देहान्त शिक्षा ठोठावली. शेवटीं त्याची पुण्यांतून धिंड काढण्यांत येऊन व 'नंतर मेखसूनें डोचकें फोडून' त्यास देहान्त शासन देण्यांत आलें.

८. नारायणरावाच्या खुनाचा सूड :—गंगाबाईच्या नांवें कारभार चालू असतां बारभाईनीं खुनाचा तपास चालविला. त्यांत गारदी, ब्राह्मण, मराठे, प्रभु वगैरे सर्व जातीचे लोक आढळून आले. शेवटीं सुमेरसिंग खरगसिंग, तुळ्या पवार व मोहंमद युसफ यांस देहान्त शिक्षा झाल्या. परंतु ते त्यावेळीं फरारी होते. इतरांस निरनिराळ्या मुदतीच्या व सक्तीच्या शिक्षा झाल्या. हातीं येण्यापूर्वीच सुमेरसिंग मरण पावला होता. तुळ्या पवार व खरगसिंग हे पळून जाऊन हैदरच्या नोकरींत होते. फार दिवसांनीं ते हातीं आल्यावर त्यांचे हाल हाल करून त्यांस ठार मारण्यांत आलें. नारायणरावाच्या खुनाशीं राघोबाची बायको आनंदीबाई हिचा कितपत संबंध होता तें अजून कोणासही सप्रमाण सिद्ध करतां आलेलें नाहीं.

९. रामराजाचा मृत्यु (१७७७) :—सन १७७७ मध्यें सातारचा छत्रपति रामराजा मृत्यु पावला. त्याला फक्त तीन मुली होत्या, मुलगा नव्हता. तेव्हां रामराजानें त्र्यंबकराव वावीकर यांच्या विठोजी नामक मुलास दत्तक घेतलें व त्याचें नांव 'शाहूराजे' असें ठेवलें. पुढें रामराजाच्या मृत्यूनंतर एका वर्षानें शाहूस साताऱ्यास राज्याभिषेक झाला. त्यावेळीं तो फक्त अठरा वर्षांचा होता. त्याला पुत्रसंतान झालें होतें. रामराजाप्रमाणेंच हा शाहूही नामधारी राजा होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. नारायणरावाचा खून कोणीं केला ? कशाकरितां केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

२. बारभाईंचें कारस्थान म्हणजे काय ? तें कोणीं उभारलें ? कशाकरितां ?

३. राघोबाचें चरित्र थोडक्यांत द्या. त्याला घरभेद्या असें कां म्हणतात ? पेशवाई मिळविण्याकरितां त्यानें कोणकोणते उद्योग केले ?

४. खालीलसंबंधीं टिपणें करा.
तोतयाचें बंड, बारभाईंचें कारस्थान, नारायणरावाचा खून, गारदी.

उतारे

१. गारद्यांशीं करार—१७७३.

गारद्यांस हा मनसबा सांगितला ते समयीचा करार–किल्ल्यांपैकीं पुरंदर, नगर व साष्टी हे तीन किल्ले व पांच लक्ष रुपये रोख द्यावे. येणेंप्रमाणें करार असतां आडमुद्दे राज्याचे वगैरे गारद्यांनीं मनस्वी घातले. "नाहीं तरी त्यांची गती ती यांची ! अलीबहादर राज्यास खावंद करूं." असें चित्तास येईल तसें बोलत.......तेव्हां भकारनामक (भवानराव) प्रतिनिधि यांणीं सांगितलें कीं, "राज्य अथवा किल्ले कोणाचे ? वांटून कोण देणार ?......चार रुपये अधिक आगळे मागितल्यास चिंता नाहीं. देऊं." तेव्हां रदबदली पडून पांच लक्ष रुपये द्यावेसा करार होता. ते व किल्ल्याचे तीन लक्ष, एकून आठ लक्ष रुपये द्यावेसा करार झाला.

प्रश्न :—१. हा करार कोणांमध्यें झाला ? कशाकरितां ? गारद्यांनीं कोणता धाक घातला ? त्याचा परिणाम काय झाला ?

२. नारायणरावाचा खून—१७७३.

गडबडींत इच्छारामपंतास तीन जखमा लागल्या. दुसरे दिवशीं मृत्यु पावला.....त्याचप्रमाणें (हरिपंत) फडके यांस करावें म्हणून बोलिले. आणखी ब्राह्मण चारपांच व चाफाजी (टिळेकर) खिजमतगार ठार झाला. त्या गडबडींत (नारायणराव) थोरल्याजवळ (दादांकडे) जाऊन पोहोंचले होते. "दादा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साहेब ! वांचवावें, किल्ल्यावर घालावें, नाचण्यांची भाकरी द्यावी, " असें म्हणून गळां मिठी घातली. तेव्हां (त्यांणीं) लोटून दिला. तुळाजी पवार भेदला होता. त्यांणीं पायास धरून ओढिला. सुमेरसिंगानें वार टाकिला. पांच सहा वारांनीं पुरा केला. असें होतांच (दादासाहेब) सदरेस जाऊन बसले. तमाम चोपदारांस वगैरे यांस बोलावूं पाठवून बंदोबस्त करूं लागले. " वैरियाचें सुतक कशास ? " म्हणतात ! गोवधदेखील वाड्यांत झाला. दोघी कुणबिणी मेल्या. बालहत्या, ब्राह्मणहत्या, गोहत्या, स्त्रीहत्या सारेंच झालें ! हे राजकारण फार दिवस घाटत होतें. त्यांत मोठे मोठे होते असे उद्गार निघतात. ज्यांनीं राजकारणें केलीं होतीं त्यांचें मानस कैद करावें असें होतें. परंतु करावयास गेले एक, झालें एक ! आतां त्राता कोणी नाहींसा झाला.

प्रश्न :—१. नारायणरावास कोणीं मारलें ? दादांनीं त्याला जीवदान कां दिलें नाहीं ? ह्या कटांत कोण कोण होते ? गारद्यांनीं कोणत्या हत्या केल्या ?

३. खुनाबद्दल इंग्रजांचा अभिप्राय

पत्र पोहोंचलें. त्यांत नारायणराव मृत्यु पावल्याबद्दल लिहिलेलें होतें. त्यामुळें मला इतकें वाईट वाटलें कीं त्याच माणसाबरोबर आपला गादीवर बसण्याचा इरादा असल्याबद्दल मजकुराचें पत्र आलें नसतें तर तें दुःख मला आवरलें नसतें. ही शुभ वार्ता अमलांत आल्याबद्दल समजण्याची रात्रंदिवस वाट पहात आहे. शक्य तितक्या लौकर आपण ही शुभेच्छा अमलांत आणून मला खबर द्यावी. म्हणजे समाधान होईल.

प्रश्न :—१. या पत्रांतील मेख कोणती ? त्यावरून इंग्रजांबद्दल तुम्हांस काय वाटतें ?

४. बारभाईचें कारस्थान—१७७४.

श्रीमंत कैलासवासी यांचा प्रकार कसा कसा जाहला हा तुम्हीं ऐकलाच आहे. त्यास ते गोष्ट जहाली त्यावरही श्रीमंत मातुश्री गंगाबाई गरोदर, त्यावर ज्यांणीं पूर्वी अकर्म केलें त्यांच्या चवक्या महत् संकटांत असें जाणोन, चार पिढ्या ज्यांचें अन्न भक्षिलें त्यांचें सार्थक करावें ऐसें चित्तांत आणून रा. सखारामपंत,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्ही व चिरंजीव राजश्री मोरोबादादा लष्करांत आले. त्यांस अनुकूल करून रा. त्रिंबकराव मामा, साबाजी भोसले, वामनराव (पटवर्धन) वगैरे सरदार व हुजरातची फौज सर्वांचें मानस एक होऊन, यांचें संरक्षण करावें, दौलतीचा बंदोबस्त करावा असें चित्तांत आणून, आम्ही व सखारामपंत उभयतां श्रीमंत मातुश्रीस घेऊन सातारियासच येणार होतों. परंतु कित्येक बंदोबस्त होणें याकरितां येथें आलों. लवकरच सातारियास यांस घेऊन येऊं. तुम्ही कदाचित् बापूंचा संशय घ्याल तर सर्वांनीं आपले अभिमान सोडून निखालस खावंदांचे वंशाचें बरें व्हावें हीच इच्छा आहे. संशय नाहीं. शिंदे-होळकर येणार.

—नानाचें सातार्‍याचें वकिलास पत्र.

प्रश्न :—१. बारभाई कारस्थानांत कोण कोण सामील होते ? कशाकरितां ? गंगाबाईस कोठें व कां नेण्यांत आलें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४५. पेशवा सवाई माधवराव (१७७४–१७९५)

१. सुरतेचा तह (१७७५):—कासेगांवच्या लढाईनंतर रघुनाथराव आश्रय मिळविण्याकरितां उत्तरेकडे गेला. तेथें त्याला कोणींही थारा देईना. महादजी शिंदे व तुकोजी होळकर हेही त्याला मदत करीनात. म्हणून राघोबा गायकवाडाकडे गेला व तेथून तो सुरतेस इंग्रजांकडे गेला. हरिपंत फडके त्याचा सर्वत्र पाठलाग करीत होताच. सुरतेचा इंग्रज कारभारी रॉबर्ट गॅबियर यानें राघोबास आश्रय देण्याचें ठरवून त्याच्याशीं तह केला (१७७५). तो 'सुरतेचा तह' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांतील अटी अशा (१) इंग्रजांनीं तीन हजार सैन्यानिशीं राघोबास मदत करावी. (२) त्या फौजेच्या खर्चाकरितां दीड लाख रुपये राघोबानें द्यावे. (३) साष्टी व वसई हीं बेटें व भडोज, सुरत वगैरे १९ लक्षांचा मुलूख त्यानें इंग्रजांस द्यावा. हा तह राघोबानें मान्य केला. त्याप्रमाणें कर्नल कीटिंग सैन्यासह राघोबास मदत करण्याकरितां निघाला. मध्यंतरीं या सैन्याची गुजराथेंत आरास येथें हरिपंत फडक्याच्या सैन्याशीं गांठ पडून त्यांत फडक्याचा पराभव झाला.

२. पुरंदरचा तह (१७७६):—मुंबईकरांनीं राघोबाशीं केलेला तह बंगालचा गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याला पसंत पडला नाहीं. तेव्हां त्यानें आपल्यातर्फे कर्नल अॅप्टन याला पुणें दरबाराशीं नवा व स्वतंत्र तह करण्यास पाठविलें. एवढेंच नव्हे तर मराठ्यांशीं युद्ध करूं नये असें त्यानें मुंबईकरांस कळविलें. त्यानंतर पुणें दरबारशीं पुरंदर मुक्कामीं सन १७७६ मध्यें तह झाला. त्यांत खालील अटी होत्या. (१) सुरतेचा तह रद्द समजावा. (२) राघोबास इंग्रजांनीं मदत करूं नये. (३) त्यानें दरमहा पंचवीस हजार रुपये नेमणूक घेऊन कोपरगांवीं स्वस्थ बसावें. (४) पुण्याच्या दरबारानें इंग्रजांस साष्टी वगैरे ठाणीं व बारा लक्षांचा मुलूख द्यावा. मुंबई-करांस हा तह मान्य झाला नाहीं. तेव्हां त्यांनीं विलायतेंत डायरेक्टरमंडळाकडे लिहून सुरतेचा तह मान्य करावा असें सुचविलें. एवढेंच नव्हे तर तो निकाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येईतों राघोबास त्यांनीं आपल्याजवळच ठेंवलें. शेवटीं सन १७७७ मध्यें डायरेक्टरमंडळानें सुरतेच्या तहासच मान्यता दिली.

३. मोरोबाचें कारस्थान :—या सर्व घडामोडी होत असतां कोल्हापुरकर व हैदर यांचा धुमाकूळ बंद करून त्यांस ताळ्यावर आणण्यांत हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन व महादजी शिंदे गुंतले होते. त्यांनीं त्यांस वठणीवर आणलें. त्याच वेळीं नानाचा चुलतभाऊ मोरोबादादा फडणीस यानें नानास कारभारावरून हुसकून काढण्याचा कट रचला. त्या कामीं सखारामबापूचीही त्यास मदत होती. तुकोजी होळकराच्या मदतीनें राघोबास परत आणावयाचें व त्यास पेशवा करावयाचें असा त्या दोघांचा घाट होता. अखेरीस त्यांचें कारस्थान नानानें उघडकीस आणलें. मोठ्या प्रयासानें महादजीच्या करवीं नानानें मोरोबास कैद केलें व त्याला नगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें. पुढें सखारामबापूचीं कांहीं फितुरीचीं पत्रें सांपडल्यानें नानानें त्यासही कैदेंत टाकलें.

४. इंग्रजांशीं पहिलें युद्ध (१७७८-७९) :—डायरेक्टरमंडळाच्या निर्णयाप्रमाणें इंग्रजांनीं वागावयाचें ठरविलें. त्यामुळें इंग्रजांस मराठ्यांशीं प्रथमच युद्ध करावें लागलें. या युद्धास आणखी कांहीं कारणें घडलीं. इंग्रजांनीं तोतयास आश्रय दिला होता. त्यावेळीं नानानें सेंट ल्यूबिन या फ्रेंच वकिलास पुणें दरबारीं ठेवून घेतलें होतें. तेव्हां हें निमित्त पुढें करून मुंबईकर व कलकत्तेकर इंग्रजांच्या फौजा कर्नल इगर्टन याच्या नेतृत्वाखालीं पुण्यावर चाल करून निघाल्या. कार्ल्याजवळ मराठ्यांशीं इंग्रजांची पहिली चकमक झाली. तींत इंग्रजांचा ‘ इस्टुर फांकडा ’ ऊर्फ कॅप्टन स्टुअर्ट मारला गेला. तथापि इंग्रज फौजा तळेगांवापर्यंत पुढें सरकल्या. तेथें हरिपंत फडके, महादजी शिंदे वगैरेंच्या फौजांनीं इंग्रजांस टेकीस आणलें व त्यांनीं इंग्रजांचा पराभव केला. तेव्हां महादजीच्या मध्यस्थीनें इंग्रज–मराठ्यांत वडगांवीं सन १७७९ मध्यें तह ठरला. त्यांत खालील गोष्टी होत्या. (१) इंग्रजांनीं राघोबास शिंद्याचे हवालीं करावें. (२) इंग्रजांनीं जिंकलेलीं ठाणीं मराठ्यांस परत करावीं. (३) मराठ्यांनीं इंग्रजांस मुंबईस सुखरूप परत जाऊं द्यावें. त्याप्रमाणें राघोबास शिंद्याच्या हवालीं करून इंग्रज मुंबईस निघून गेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. नानाचें कारस्थान (१७८०) :—परंतु शिंदे उत्तरेकडे जात असतां त्याच्या ताब्यांतून पळून राघोबा पुन्हां सुरतेस गेला. तेथें असतांच त्यानें



श्रीगणेश दिवाणखान्यांतील पेशव्याचा दरबार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जनरल गॉडर्ड व फत्तेसिंग गायकवाड यांच्या मदतीनें अहमदाबाद घेतलें व पुढें सर्व गुजराथप्रांत काबीज केला. त्यामुळें पुन्हां युद्ध सुरू झालें. त्यावेळीं महादजीस पाठीस घालून नानानें इंग्रजांविरुद्ध एक मोठें कारस्थान रचलें. आपल्या कटांत त्यानें हैदरअल्ली, निजाम व नागपुरकर भोसले यांसही पुढें सामील करून घेतलें. या सर्वांनीं इंग्रजांवर एकाच वेळीं तुटून पडावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें हैदरनें मद्रासवर, भोसल्यानें कलकत्त्यावर व पेशव्यानें मुंबईवर हल्ला करण्याचें ठरलें. या कारस्थानास 'चौकडीचें कारस्थान' असें म्हणतात (१७८०). या कटाची बातमी लागतांच वॉरन हेस्टिंग्जनें भोसल्यास सोळा लाखांची लांच देऊन गप्प बसविलें. हैदरनें मात्र मद्रासेवर हल्ला करून इंग्रजांस जेरीस आणलें. जनरल गॉडर्डविरुद्ध पुण्याच्या फौजा चालून गेल्या व त्याला त्यांनीं सळो कीं पळो केलें. उत्तरेंत महादजीच्या फौजांनींही इंग्रजांस चांगलेंच पेचांत आणलें. अशा स्थितींत इंग्रजांनीं महादजीच्या मध्यस्थीनें सालपा ऊर्फ सालबाई येथें तह घडवून आणला.

६. **साल्प्याचा तह** (१७८२):—साल्प्याच्या ऊर्फ सालबाईच्या तहांत खालील अटी होत्या. (१) इंग्रजांनीं राघोबाचा पक्ष सोडावा व त्यानें सालीना तीन लाखांची नेमणूक घेऊन कोपरगांवीं स्वस्थ रहावें. (२) इंग्रजांनीं जिंकलेलीं सर्व ठिकाणें परत करावीं. (३) साष्टी बेट इंग्रजांकडे रहावें. (४) भडोच शिंद्याकडे रहावें. (५) फत्तेसिंह गायकवाडास बडोद्याची दौलत मिळावी; मात्र त्यानें पेशव्यास पूर्वीप्रमाणें खंडणी द्यावी. (६) इंग्रजांशिवाय इतर युरोपियनांस पेशव्यानें आपल्या राज्यांत आश्रय देऊं नये. या तहाच्या अंमलबजावणीकरितां महादजी दोन्हीकडून जामीन राहिला होता. इंग्रजांस साष्टी बेट मिळाल्यानें पश्चिम किनाऱ्यावर त्यांचें वर्चस्व स्थापन झालें. या तहाच्या आधींच सखारामबापू बोकील सन १७८१ मध्यें रायगडीं मरण पावला होता. पुढें सन १७८३ मध्यें मराठ्यांमधील भाऊबंदकीचें बीज राघोबाच्या रूपानें नष्ट झालें.

७. **म्हैसूरशीं युद्धें**:—म्हैसूरचा राजा हैदरअल्ली सन १७८२ मध्यें मरण पावल्यावर त्याचा महत्त्वाकांक्षी मुलगा टिपू म्हैसूरच्या गादीवर बसला. श्रीरंग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पट्टण ही त्याची राजधानी होती. तो उत्तम सेनानी होता. त्यानें आपल्या राज्यांतील पुष्कळ हिंदूंस इस्लामी धर्माची दीक्षा दिली होती. रामदुर्गचा सरदार नरगुंदकर भावे त्याचा मांडलिक बनला होता. त्याचें राज्य खालसा



सवाई माधवराव—भालाफेक-शिक्षण

करण्याचा टिपूनें बेत केला व त्याच्यावर स्वारी करून टिपूनें त्यास ठार मारलें. हा भावे पूर्वी पेशव्यांचा मांडलिक होता. तेव्हां त्याची कड घेऊन नानानें टिपूविरुद्ध युद्ध पुकारलें. तुकोजी होळकर व हरिपंत फडके हे त्याच्यावर चालून गेले व त्यांनीं टिपूस पेचांत आणलें. दरम्यान इंग्रजही त्याच्याविरुद्ध जाणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां त्यानें मराठ्यांशीं सन १७८७ मध्यें तह केला. त्या तहानें कित्तुर, बदामी, नरगुंद हे प्रांत मराठ्यांस मिळून शिवाय पंचेचाळीस लक्षांची खंडणीही मिळाली. पुढें लॉर्ड कॉर्नवॉलिसच्या वेळीं टिपूविरुद्ध मराठे, निजाम व इंग्रज यांनीं एकजूट केली व त्याच्याशीं युद्ध आरंभिलें (१७९२). त्यावेळीं हरिपंत फडके यानें मोठा पराक्रम करून इंग्रजांस ऐनवेळीं मदत केली. त्यामुळें टिपूचा पराभव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन त्यानें सन १७९२ मध्यें श्रीरंगपट्टण येथें तह केला. त्या तहानें मराठ्यांस एक कोट रुपये व सावनूरपर्यंतचा प्रदेश मिळाला.

८. **महादजीची कामगिरी**:—राणोजी शिंद्याचा महादजी दासीपुत्र होता. पानिपतच्या लढाईत त्याचा एक पाय अधु झाला होता. माधवरावानें शिंद्याच्या दौलतीवर त्याची नेमणूक केली होती. प्रबळ व स्वतंत्र व्हावें; परंतु पेशव्यांचें वर्चस्व न झुगारतां त्यांच्याशीं इमान राखावें असें महादजीचें धोरण होतें. इंग्रजांशीं त्यानें युद्धें केलीं. त्यांत त्याला कवायिती सैन्याचें महत्त्व कळलें होतें. म्हणून त्यानें जनरल डी बाईन या फ्रेंच लष्करी अधिकाऱ्याच्या मदतीनें उत्तम सैन्य तयार केलें होतें. वडगांव व सालपें येथील तह त्याच्याच वजनामुळें घडून आले. उत्तरेच्या व दिल्लीच्या राजकारणांत त्यानें महत्त्वाचें व मानाचें स्थान मिळविलें होतें. सन १७८० नंतर दिल्ली दरबारीं गोंधळ माजला होता. तो बंद करण्याकरितां बादशहानें महादजीस बोलाविलें. तेव्हां महादजीनें दिल्लीस जाऊन तेथील कारभार आपल्या हातीं घेतला व कामाची चोख व्यवस्था लावून दिली. त्या कामगिरीकरितां बादशहानें पेशव्यास 'वकीले मुत्लक' हा हुद्दा दिला व त्या हुद्याची नायबगिरी महादजीस दिली. महादजीचा हा उत्कर्ष मुसलमान व रजपूत यांस सहन झाला नाहीं. तेव्हां त्यांनीं महादजीविरुद्ध उठाव करून त्याच्याशीं लढाया दिल्या. त्यांत एकदोन वेळां त्याचा पराभवही झाला. तरी त्यानें शेवटीं आपला बोज राखला व दिल्लीच्या बादशहाची गुलाम कादराच्या जाचांतून सोडवणूक करून दिल्लीस आपलें वर्चस्व पुन्हां स्थापलें. गुलाम कादरास मात्र त्यानें देहान्त शासन केलें.

९. **महादजीचा मृत्यु (१७९४)**:—पुढें सन १७९२ च्या सुमारास महादजी पुण्यास आला. त्यावेळीं 'वकीले–मुत्लक' हा बादशाही किताब व बहुमानाचीं वस्त्रें पेशव्यास अर्पण करण्यास, परंतु खरोखर आपल्या वैभवानें सर्वांस दिपवून टाकून नानाकडील कारभार आपल्याकडे घेण्याकरितां तो पुण्यास आला होता. बडा दरबार भरवून तो किताब व तीं वस्त्रें सवाई माधवरावास अर्पण करण्यांत आलीं. त्यावेळीं नाना व महादजी यांच्यांत कारभाराबद्दल तेढ उत्पन्न झाली; परंतु हरिपंत फडक्याच्या मध्यस्थीनें दोघांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सलोखा निर्माण झाला. पुढें महादजी फार दिवस वांचला नाहीं. सन १७९४ मध्यें पुण्याजवळ वानवडी येथें तो मृत्यु पावला. त्यावेळीं त्याचें वय ६७ वर्षांचें होतें.

१०. महादजीची योग्यता :—मराठेशाहीच्या उत्तर काळांत महादजी ऊर्फ 'पाटीलबावा' अत्यंत धोरणी, कर्तृत्त्ववान, मुत्सद्दी व मोठा लढवय्या होऊन गेला. आपल्या धडाडीनें व कवायिती फौजेच्या जोरावर हिंदुस्थानांतील सर्व शत्रूंचा मोड करून त्यानें मराठ्यांचा दर्जा व इभ्रत वाढविली. दिल्ली येथें राहून त्यानें मोंगल राज्याची व्यवस्था आपल्या हातीं ठेविली होती. बारभाईस त्यानें मदत केली. परंतु प्रत्येक वेळीं आपला स्वार्थ साधण्याकडे त्यानें नेहमीं दृष्टि ठेविली. इंग्रजांचें धोरण तो ओळखून होता. कवायिती सैन्य व आग्र्याजवळ दारूगोळ्याचा कारखाना यांची त्यानें उभारणी केली होती. नाना व महादजी यांच्यांत नेहमीं चुरस असे. महादजी मुत्सद्दी व सेनानी होता. नाना फक्त मुत्सद्दी होता. त्यामुळें नानाचें त्याच्यावांचून नेहमीं अडे. अर्थात नाना त्याच्याशीं अत्यंत जपून वागे. पुढें त्यांच्यांत दिलजमाई झाली. महादजीच्या मृत्यूनें मराठेशाहीचा एक हात गळून पडला. त्याला मुलगा नसल्यानें त्याच्यानंतर त्याच्या दौलतीवर त्याचा पुतण्या दौलतराव शिंदे हा आला. त्यावेळीं तो केवळ सोळा वर्षांचा होता.

११. खर्ड्यांची लढाई (१७९५) :—राक्षसभुवनच्या लढाईच्यावेळीं कबूल केलेला मुलूख निजामानें मराठ्यांस दिलेला नव्हता. शिवाय मराठ्यांची मोठी बाकी त्याच्याकडे निघत होती. निजामाला मराठ्यांच्या वाढत्या सत्तेबद्दल नेहमीं वैषम्य वाटे. या सर्व कारवायांच्या बुडाशीं निजामाचा सुप्रसिद्ध दिवाण मशीरुन्मुल्क हा होता. तेव्हां मराठ्यांनीं थकलेली चौथाई व सरदेशमुखी त्याच्याकडे मागितली. इंग्रजांची मदत मिळेल या आशेवर विसंबून राहून निजामानें ती नाकारली व लढाईची तयारी चालविली. तेव्हां नानानें सर्व मराठे सरदारांस एकत्र करून निजामावर चाल केली. त्यावेळीं महादजी व हरिपंत फडके हे अनुभवी वीर वारल्यानें परशुरामभाऊ पटवर्धन मराठ्यांचा सेनापति होता. खर्ड्यांजवळ निजाम व मराठे यांची सन १७९५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें लढाई होऊन निजामाचा पराभव झाला. तेव्हां निजामानें मागील सर्व बाकी व युद्धखर्चाकरितां तीन कोट रुपये व सरहद्दीवरील ३७ लक्ष रुपयांचा मुलूख व दौलताबाद किल्ला मराठ्यांस देण्याचें कबूल केलें. सर्व मराठे सरदार एकत्र येऊन लढल्याचें मराठेशाहींतील हें अखेरचेंच उदाहरण होय.

१२. अहिल्याबाईचा मृत्यु (१७९५) :—अहिल्याबाई ही खंडेराव होळकराची बायको व मल्हाररावाची सून होय. तिचा जन्म सन १७२५ मध्यें झाला. कुंभेरीच्या वेढ्याच्या वेळीं तिचा नवरा मेला होता. मल्हाररावाच्या मृत्यूनंतर तिच्या हातींच सर्व कारभार आला. आपली जबाबदारी तिनें उत्तम रीतीनें पार पाडली व आपल्या घराण्याची प्रतिष्ठा कायम राखली. तिनें सुमारें तीस वर्षें कारभार केला. या बाणेदार स्त्रीपुढें राघोबालाही एकदां हार खावी लागली होती. अहिल्याबाई अत्यंत प्रेमळ व धार्मिक होती. औदार्य, भूतदया, न्याय, नीति व शहाणपणा यामुळें तिनें दिगंतीं कीर्ति मिळविली. देवालयें, अन्नछत्रें व आश्रम यांस तिनें कायमचें उत्पन्न तोडून दिलें होतें. रस्तोरस्तीं धर्मशाळा व विहिरी बांधून तिनें प्रवासाची चांगली सोय केली होती. काशीस तिनें अनेक घाटही बांधले. रयतेपासून ती नेमस्त वसूल घेई व वतनदारांच्या हक्कांस जपे. अनेक ऐहिक दुःखें तिच्यावर कोसळलीं तरी तिनें तीं मोठ्या धैर्यानें सोसलीं. सन १७९५ मध्यें ती वारल्यावर होळकरांच्या दौलतीवर तुकोजी होळकर याची नेमणूक झाली. तोच तिचा सेनापति होता.

१३. सवाई माधवरावाचा मृत्यु (१७९५):—सन १७९४ मध्यें आनंदीबाई वारली. तिला बाजीराव व चिमाजी हे दोन औरस मुलगे व अमृतराव हा दत्तक मुलगा होता. त्या सर्वांस नानानें शिवनेरीस मोठ्या बंदोबस्तानें कैदेंत ठेवलें होतें. तेथें असतांच बाजीरावाचा सवाई माधवरावाशीं गुप्तपणें पत्रव्यवहार सुरू होता. बाजीरावानें त्याच्यावर चांगलीच मोहिनी घातली होती. 'माझ्याप्रमाणेंच तूंही नानाच्या कैदेंतच आहेस' असेंही त्यानें माधवरावाच्या मनांत भरवून दिलें. तशांतच त्याचा गुप्त पत्रव्यवहार नानास कळला. तेव्हां नानानें पेशव्याचा निषेध केला. त्यामुळें माधवरावाच्या प्रकृतीवर परिणाम झाला व तो विषण्ण झाला. मनाच्या अशा स्थितींत असतांच तो आजारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडला. तशांतच एके दिवशीं त्यानें शनिवारवाड्यांतील कारंजावर उडी मारली. त्यामुळें त्याला मोठी जखम झाली व त्यांतच त्याचा सन १७९५ मध्यें अंत झाला.

अ भ्या स

१. महादजीचें चरित्र, कामगिरी व योग्यता थोडक्यांत सांगा.
२. इंग्रज-मराठ्यांचें पहिलें युद्ध कां झालें? त्यांत कोणाचा पराभव झाला? कां?
३. खालीलसंबंधीं टीपा तयार करा.
पुरंदरचा तह, सालबाईचा तह, खर्ड्याची लढाई, अहिल्याबाई, सुरतेचा तह, मोरोबाचें कारस्थान, चौकडीचें कारस्थान.
४. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या गोष्टी सांगा.
५. कानेटकरकृत–सखारामबापूचें चरित्र, खरेकृत–नाना फडणिसाचें चरित्र, केळकरकृत–मराठे व इंग्रज, देवकृत–नाना फडणीस, भानूकृत–नाना व महादजी, मुक्ताबाई लेलेकृत–देवी अहिल्याबाई हीं पुस्तकें वाचा.

उतारे

१. वडगांवची लढाई—१७७९.

'लष्करांत महादजीसुद्धां सर्व एकदील आहेत. होळकराचा मात्र भरंवसा नाहीं.' शुक्रवार ता. ८ रोजीं इंग्रज दादासुद्धां तळेगांवावर आले. सोमवारीं रात्रीस तळेगांवावरून पलटणें सुद्धां निघोन माघारे गेले. ही चाहूल समजतांच मराठी फौजा धांवून गेल्या. वडगांवास दोन तीन पलटणांची दिवस उगवतां गांठ पडली. सरकारच्या तोफांनीं इंग्रज तोफा बंद केल्या. पांच तोफा पाडाव आणिल्या. इंग्रजांचा मोड जाहला. चार पांचशें माणूस मारिलें. शिवाय दोन हजार बंदुका वगैरे लूट सांपडली. वडगांवास इंग्रज कोंडले आहेत.

प्रश्न :—१. वडगांवच्या लढाईंत मराठ्यांचा फायदा काय झाला?

२. आनंदीबाईचें इंग्रजांसंबंधीं मत—२-९-१७७८.

इंग्रज जबरदस्त आहेत. त्यांचें यांस (राघोबास) बोलणें कीं आपणांस दौलतीवर बसविणें, आम्हांस राहण्यास जवळ जागा द्या व दहा हजारांपर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमची फौज ठेवा. ही गोष्ट हुजुरांस (राघोबास) कठिण वाटली. परंतु रानोमाळ हिंडावें, त्यापेक्षां त्यांहीं श्रम करून कबूल केलें. असे इंग्रज घरांत येऊं पाहतात. तमाम अंमल आपले बसवितात. आम्हीं निमित्तमात्र. पण तेच दौलतेस गिऱ्हाईक होतात. लखनौचे शुजाउद्दौला व अर्काटचा महंमदअल्ली यांच्या घरांत प्रथम हे इंग्रज नम्रतेनें पायरव करून आतां उभयतांस पोटापुरतें देऊन आपण धनी झाले, तसेंच आमच्या घरांत होईल......कालच विपरीत आले. परंतु आम्हांस हाच भरंवसा आहे कीं, तुम्ही कालचक्रासही फिरवाल. म्हणून तुम्हांस पत्र लिहिलें आहे. तरी ब्राह्मणी दौलत नीट राहून, हुजुरचाही संतोष राहून बऱ्या होतील त्या गोष्टी कराव्या. नाहीं तर जन्मभर चांगलें केलें आणि म्हातारपणीं इंग्रजांच्या घरांत ब्राह्मणी दौलत घातली, हें अपेश येईल, तो अर्थ न करावा. —आनंदीबाईचें सखारामबापूंस पत्र.

प्रश्न :—१. आनंदीबाईनें इंग्रजांचा कोणता कावा स्पष्ट केला आहे? मग दादांनीं इंग्रजांची मदत कां घेतली? आनंदीबाईस कोणती भीति वाटत होती?

३. चौकडीचें कारस्थान—१७८०.

राजश्री लक्ष्मणराव चिटणीस सुरतेस पाठविले होते. त्यांचें इंग्रजांचें बोलणें सुरतेस चार महिने जाहलें. शेवटीं दादासाहेबास द्यावें, साष्टी द्यावी हें त्यांच्या मनांत नाहीं, व गोष्टीही मगरूरीच्या. बाहेर गोड बोलावें, आंतून लढाईचें सामान करावें, तेव्हां पारिपत्य करणें जरूर. इंग्रजांनीं चहूं दिशेस आकर्षण केलें आहे. कोणें समयीं काय करतील हा भरंवसा नाहीं. याकरितां नबाब निजाम अल्लीखान यांणीं सिकाकोल राजबंदरीकडे इंग्रजांचें पारिपत्य करावें. भोसल्यांनीं भारी फौजेनें जाऊन बंगाला मारावा व हैदरनाईक यांणीं चेनापट्टणाकडे जाऊन इंग्रजांचें पारिपत्य करावें व सरकारांतून सुरत, अहमदाबाद, वगैरेकडे जाऊन इंग्रजांचें पारिपत्य करावें. याप्रमाणें परस्पर निश्चय ठरला.

—नानाचें आपल्या सातारच्या वकिलास पत्र.

प्रश्न :—१. हें कारस्थान कोणीं घडवून आणलें? कशाकरितां? कोणीं, कोठें हल्ला करावयाचें ठरलें होतें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. पेशव्यास नवीं वस्त्रें—१७९२.

दिल्लीस पातशाहींत गुलाम कादर पातशाही नोकर असतां त्याणें फंद करून पातशहाशीं बहुत बेकैदी करून पातशहास कैदेंत ठेविलें. ते समयीं राजश्री पाटिलबावा याणीं गुलाम कादर याचें व त्याचे मिलाफी होते त्यांचें सर्वांचें पारिपत्य करून मुलुकाचा वगैरे बंदोबस्त केला व पातशहास मोकळें करून पुन्हां तख्तनिसीन केलें. ते समयीं " पातशाही चाकर बहुत होते. परंतु कोणाच्यानें बंदोबस्त जाहला नाहीं, आणि तुम्ही यथास्थित हरामखोरांचीं पारिपत्यें केलीं, व बंदोबस्त केला, असें कोणींही केलें नाहीं. याजकरितां पंतप्रधान यांस वकील-ई-मुत्लकीचे व मीरबक्षीगिरीचे दोन्हीं पदें सरकारांतून करार करून देतों. " याप्रमाणें बोलणें पाटीलबावांशीं होऊन वकील मुत्लकी व मीरबक्षीगिरी हीं दोन्हीं पदें करार करून देऊन पदांची खिलत व फर्दा व मरातब पाटीलबावाजवळ इनायत जाहला. तो पाटीलबावा हल्ली देशी आले. ते समयीं बराबर आणिला.

—नाना फडणिसाचें पत्र.

प्रश्न :—१. बादशहानें पेशव्यांचा गौरव कसा व कां केला? त्याला कारणीभूत कोण झाला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४६. मराठेशाहीची अखेर

१. बाजीरावास पेशवाई (१७९६) :— सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर त्याची बायको यशोदाबाई हिच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाई चालवावी असा नानाचा मानस होता. परशुरामभाऊ पटवर्धनासही हा विचार प्रथम पसंत होता. या कटाचा सुगावा बाजीरावास लागला. त्यावेळीं दौलतराव शिंदे पुण्यासच होता. त्याच्या मदतीनें पेशवाई मिळविण्याचा बाजीनें घाट घातला. दौलतराव मोठा मातबर व फौजबंद सरदार होता. त्याच्याशीं तंटा नको असें ठरवून नानानें बाजीरावास शिवनेरीहून आणून त्याची पेशवाईवर स्थापना केली. आपल्या बापाचा छळ नानानें केला अशी बाजीची दृढ समजूत असल्यानें तो नानाचा द्वेष करी. शिंद्याचेंही मत नानासंबंधीं चांगलें नव्हतें. नानाच्या पैशावर त्याचा डोळा होता. यानंतर पुण्यास अनेक घोटाळे माजले. तेव्हां नाना पुण्याहून साताऱ्यास व तेथून महाडास गेला. तेथें असतांच नानानें इंग्रज, निजाम, भोसले वगैरेंची मदत मिळविण्याकरितां खटपट चालविली. याचवेळीं शिंद्यानें बाजीरावास कैद करून चिमाजीस पेशवाई दिली होती. पुढें त्यानें नानाशीं सख्य करून बाजीरावाची पेशवाईवर पुन्हां स्थापना केली व नानास त्याचा कारभार सांगितला.

२. नानाचा कारागृहवास :— परंतु नाना व बाजीराव यांचें पटणें शक्य नव्हतें. त्यावेळीं नानानें तुकोजी होळकराशीं संधान बांधलें होतें. परंतु तोही सन १७९६ मध्यें वारला. तेव्हां नाना उघडा पडला. तुकोजीस काशीराव व मल्हारराव हे औरस मुलगे होते. त्यांच्यामध्यें होळकरांच्या दौलतीकरितां तंटा लागला. त्यावेळीं नानानें मल्हाररावाचा पक्ष स्वीकारला. अर्थात काशीरावाचा पाठपुरावा दौलतरावानें चालविला व त्यानें मल्हाररावास ठार मारलें. त्यामुळें तुकोजीचे अनौरस पुत्र यशवंतराव व विठोजी हे दोघे चिडून पुण्यांतून पळून गेले. या प्रकरणामुळें नाना व बाजीराव यांच्यांत पुन्हां तेढ वाढली. तेव्हां त्यानें नानाच्या हातचा कारभार काढून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन तो आपला दत्तक भाऊ अमृतराव यास चालविण्यास सांगितलें. तसेंच नानास कैद करण्यास त्यानें दौलतरावास सांगितलें व त्या कामगिरीकरितां त्याला दोन कोटि रुपये देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें दौलतरावानें नानास कैद करून अहमदनगरच्या किल्ल्यांत ठेवून दिलें. यामुळें बाजीरावास हायसें झालें, तरी त्याला दौलतरावाची धास्ती वाटत होतीच.

३. पुण्यांत कहर :—नानास कैद केल्यानंतर दौलतराव बाजीरावाजवळ कबूल केलेले पैसे मागूं लागला. परंतु बाजीरावास ते देतां आले नाहींत. तेव्हां बाजीरावानें पुणें शहर लुटून पैसा उभा करण्यास त्याला सांगितलें! त्याप्रमाणें दौलतरावानें आपला सासरा सर्जेराव घाटगे याच्या मदतीनें पुणें शहर लुटून फस्त केलें व तेथें कहर उसळून दिला! पुढें बाजीराव आपल्याविरुद्ध कारस्थानें करतो असें कळतांच दौलतरावानें नानास कैदेंतून मुक्त केलें. तेव्हां बाजीरावानें त्यास आपला कारभार सांगितला. परंतु पुढें नाना फार दिवस जगला नाहीं. तो सन १८०० मध्यें आपल्या राहत्या 'नानावाड्यांत' मरण पावला. त्याच्या आदल्या वर्षींच परशुरामभाऊ मरण पावला होता. त्या दोघांच्या मृत्यूनें मराठेशाहीचे फार नुकसान झालें.

४. नानाची योग्यता :—नानाचा जन्म सन १७४१ मध्यें झाला होता. पहिल्या माधवरावाबरोबरच त्याचें सर्व शिक्षण झालें होतें. सन १७६३ मध्यें त्याला फडणिशी मिळाली. पुढें नानानें तीसपस्तीस वर्षें पेशवाईचा कारभार चालविला व त्यानें 'खूप शर्तीनें राज्य राखलें.' तो मोठ्या टापटिपीनें व नेमस्तपणानें वागे. त्याची स्मरणशक्ति जबर होती. कुशाग्र बुद्धि, भेदक नजर, हुषारी, स्वामिनिष्ठा, तारतम्याची वागणूक वगैरेमुळें त्याचा कारभार उत्तम वठला. लोकांस त्याची मोठी जरब वाटे. चहूंकडची बातमी ठेवण्यांत त्याचा हातखंडा होता. अनेक वेळां पैसा उभारून त्यानें पेशव्यास ऋणमुक्त केलें होतें. बारभाईंच्या कारस्थानाचा नाना प्राणच होता. मुत्सद्देगिरीच्या जोरावर त्यानें अनेक कार्यें उत्तमरीतीनें तडीस नेलीं होतीं. सवाई माधवरावाची कारकीर्द म्हणजे नानाचीच कारकीर्द होय. स्वकीयांस कह्यांत ठेवणें, परकीयांचें मराठेशाहींत बोटही शिरूं न देणें व आपल्या राज्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोज वाढविणें अशी त्रिविध कामगिरी त्यानें उत्तमप्रकारें केली. राज्याचा वसूल व हिशोबाची पद्धति यासंबंधीं त्यानें उत्तम व्यवस्था लावून दिली होती. दप्तराची व्यवस्थाही त्यानें उत्तम ठेवली होती. यामुळें त्यानें राज्यकारभारास नवें वळण लावून दिलें. त्याच्या मृत्यूबरोबर मराठेशाहींतील धोरण, शहाणपणा, नेमस्तपणा व मुत्सद्देगिरी हीं लयास गेलीं असें इंग्रजही म्हणत. प्रतिपक्षाचे डाव ओळखून, तोडीस तोड काढण्यांत त्याचें कसब चांगलें होतें. त्याच्या मृत्यूबरोबरच मराठेशाहीच्या अंतास सुरुवात झाली. पेशवाईतील साडेतीन शाहण्यांपैकीं नाना अर्धा शाहणा समजला जाई; परंतु या अर्ध्या शाहण्यानें बाकीच्या तिन्ही शाहण्यांवर मात करून त्यांच्या सवाईनें कीर्ति मिळविली ! परंतु नाना इतरांप्रमाणें स्वार्थी होता व त्याला अधिकारलालसेनें पछाडलेलें होतें यांत शंका नाहीं.

५. यशवंतरावाची पुण्यावर स्वारी (१८०२) :—परशुरामभाऊच्या मृत्यूनंतर बापू गोखले हा सरदार बाजीरावाचा सेनापति झाला. त्यावेळीं दौलतराव पुण्यासच होता. यशवंतराव होळकर उत्तरेंत होता. त्यानें मल्हाररावाच्या वधाबद्दल दौलतरावावर सूड घेण्याचें ठरवून त्याच्या मुलुखांत लुटालूट चालविली. त्यावेळीं त्याचा भाऊ विठोजी होळकर सोलापुराकडे होता. आपल्या दौलतीवर हल्ला झालेला ऐकून दौलतरावानें तिकडे आपली फौज पाठविली. त्याच सुमारास बाजीरावानें विठोजीस पकडून हत्तीच्या पायीं देऊन ठार केलें. ही बातमी कळतांच यशवंतराव चवताळून पुण्यावर चालून आला. त्यावेळीं शिंद्याच्या व पेशव्याच्या सैन्याचा पराभव करून त्यानें पुणें लुटलें. त्यामुळें बाजीराव हवालदील झाला. त्याला कोणाचा आधार राहिला नाहीं. तेव्हां तो पळून इंग्रजांच्या आश्रयास वसईस गेला. त्यामुळें यशवंतरावानें अमृतरावास पेशवाई दिली.

६. वसईचा तह (१८०२) :—पुण्यास अशा भानगडी चालू असतां बाजीराव वसईस इंग्रजांच्या मदतीवर अवलंबून होता. तेथेंच त्यानें इंग्रजांशीं सन १८०२ मध्यें तह केला. त्याला वसईचा तह असें म्हणतात. त्यांत खालील अटी ठरल्या. (१) इंग्रजांनीं बाजीरावास पुण्यास नेऊन पेशवाईवर बसवावें. (२) त्यानें आपल्या पदरीं इंग्रजांची सहा हजार तैनाति फौज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवावी. (३) तिच्या खर्चासाठीं त्यानें २६ लक्षांचा मुलूख इंग्रजांस द्यावा. (४) इंग्रजांच्या परकीय शत्रूंस बाजीरावानें आश्रय देऊं नये. (५) परकीय दरबाराशीं बाजीरावानें इंग्रजांमार्फत तह अगर युद्ध करावें. या तहानें बाजीराव इंग्रजांच्या पूर्णपणें कह्यांत गेला व त्याचें स्वातंत्र्य लयास गेलें. मराठी राज्यांत इंग्रजांचा कायमचा शिरकाव झाला व त्यामुळें मराठ्यांचें स्वातंत्र्य व त्यांचें राज्य संपुष्टांत आलें. त्या तहानंतर आर्थर वेल्स्ली याच्या मदतीनें बाजीराव पुण्यास आला व त्याची पेशवेपदावर पुन्हां स्थापना झाली. वसईच्या तहास शिंदे, होळकर, भोसले व इतर मराठे सरदार यांनीं मान्यता दिली नाहीं. त्यामुळें इंग्रजांस त्यांच्याशीं लढावें लागलें.

७. शिंदे व भोसले यांचें पारिपत्य :—वसईच्या तहास मान्यता द्यावी असें शिंदे, होळकर व भोसले यांस इंग्रजांनीं कळविलें. परंतु त्यांनीं ती गोष्ट नाकारली. तेव्हां प्रथमतः शिंदे व नंतर भोसले यांच्याशीं इंग्रजांनीं युद्ध आरंभिलें. त्या युद्धाच्या अनेक मोहिमा झाल्या. शिंदे व भोसले यांचा पराभव झाल्यावर त्यांच्याशीं अनुक्रमें सुरजी अंजनगांव व देवगांव येथें इंग्रजांनीं तह केले. सुरजी अंजनगांवच्या तहांत खालील गोष्टी ठरल्या. (१) गंगा व यमुना यांच्या दुआबांतील प्रदेश व इतर मुलूख शिंद्यानें इंग्रजांस द्यावा. (२) मोंगल बादशाह, निजाम व गायकवाड यांजवरील आपले अधिकार शिंद्यानें सोडून द्यावे. (३) इंग्रजाशिवाय इतर युरोपियनांस आपल्या पदरीं ठेवूं नये. (४) इंग्रजांच्या स्नेह्यांस शिंद्यानें त्रास देऊं नये. हा तह सन १८०३ मध्यें झाला. त्याच वर्षीं देवगांव येथें भोसल्याशीं तह झाला. त्याच्या अटी अशा. (१) वर्धा नदीच्या पलीकडील वऱ्हाड व कटक प्रांत इंग्रजांस मिळावे. (२) निजामावरील सर्व हक्क भोसल्यानें सोडावे. (३) इतरांशीं तंटा लागल्यास भोसल्यानें तो तंटा इंग्रजांच्या मध्यस्थीनें मिटवावा. (४) भोसल्यानें इंग्रज रेसिडेंट आपल्या दरबारीं ठेवावा. या दोन्ही तहांमुळें मराठ्यांची सार्वभौम सत्ता नामशेष झाली; कारण मराठ्यांचीं राज्यें अलग होऊन त्यांचें तेज लोपलें. इंग्रज-मराठ्यांचें हें दुसरें युद्ध होय.

८. होळकराशीं युद्ध (१८०४) :—शिंदे व भोसले यांचें पारिपत्य केल्यावर इंग्रज होळकराशीं सामना देण्यास पुढें सरसावले. या युद्धाच्याही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक मोहिमा झाल्या. यशवंतराव आपल्याला स्वतंत्र समजत असे व रजपुतान्यांत लुटालूट करी. हें इंग्रजांस खपलें नाहीं. शिवाय वसईच्या तहास त्यानें मान्यता दिली नाहीं. यामुळें इंग्रजांनीं त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारलें. भरतपुरचा जाट राजा पुढें होळकरास सामील झाला. परंतु डीगच्या लढाईंत त्याचा इंग्रज सेनानी लेक यानें पराभव केला. होळकराशीं चाललेलें युद्ध थांबवावें असा इंग्लंडहून त्या वेळचा गव्हर्नर जनरल लॉर्ड वेल्स्ली याला हुकूम आल्यानें त्यानें तें युद्ध एकदम बंद केलें. पुढें बार्लोनें त्याच्याशीं सन १८०५ मध्यें दोस्तीचा तह केला. सन १८११ मध्यें यशवंतराव होळकर वेड लागून मरण पावला. हें युद्ध इंग्रज-मराठ्यांचें तिसरें युद्ध म्हणून प्रसिद्ध आहे.

९. दुसऱ्या शाहूचा मृत्यु (१८०८) :—पेशव्याकडे सर्व राज्याधिकार आल्यानें साताराचे छत्रपति नामधारी बनले होते. असा पहिला नामधारी राजा रामराजा होय. तो सन १७७७ मध्यें वारल्यावर त्याचा दत्तक मुलगा दुसरा शाहू सन १८०८ मध्यें वारला. त्याला दोन पुत्र होते. त्यांपैकीं वडील मुलगा प्रतापसिंह हा आपल्या बापानंतर सातारचा छत्रपति झाला. त्याचें व बाजीरावाचें जमत नसे. ही गोष्ट इंग्रजांस माहीत असल्यानें ते लोक नेहमीं छत्रपतीच्या कच्छपीं असत. तें बाजीराव ओळखून होता. तेव्हां आपल्या शेवटच्या पळांत बाजीराव छत्रपति प्रतापसिंह यास आपल्याबरोबर नेहमीं स्वारींत घेत असे. हेतु इतकाच कीं तो इंग्रजांस मिळूं नये.

१०. बाजीरावाचे चाळे :—इंग्रजांशीं ठरलेल्या वसईच्या तहाप्रमाणें बाजीराव पुण्यास येऊन पेशवा झाला. परंतु इंग्रजी तैनाती फौजेच्या जोरावर तो अत्यंत बेदरकारपणें वागूं लागला. बापाच्या पापक्षालनार्थ तो नेहमीं धर्मकार्यांत गुंतलेला दिसे. परंतु त्याच वेळीं त्यानें सरदारांच्या जहागिरी काढून घेतल्या. त्यामुळें रास्ते, पटवर्धन, प्रतिनिधि वगैरे सरदार असंतुष्ट झाले. अंताजी माणकेश्वर नामक एका कीर्तनकारास त्यानें आपला कारभार सांगितला. बापू गोखले हा बाजीरावाचा सेनापति होता. तोच एक लायक गृहस्थ त्याच्या पदरीं होता. बाकी त्रिंबकजी डेंगळ्यासारखे बेजबाबदार व मूर्ख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक त्याच्याभोंवतीं असल्यानें त्याचा कारभार अत्यंत बिघडून गेला व सर्वत्र बजबजपुरी माजून राहिली. स्वतः बाजीराव भित्रा, कपटी व नालायक होता. नीतिमत्तेची चाड त्याला अजीबात नव्हती. अनेक प्रकारच्या रंगढंगांत तो नेहमीं दंग असे.

११. गंगाधरशास्त्र्याचा खून (१८१५):—राज्यकारभारांत घोटाळे निर्माण झालेले असले, तरी बाजीरावाचीं कारस्थानें चालूच होतीं. बडोद्याच्या गायकवाडाकडे पेशव्याची बरीच बाकी तुंबली होती. त्याकरितां बाजीराव व गायकवाड यांच्यामध्यें बरेच दिवस तंटा माजून राहिला होता. तो मिटविण्याकरितां इंग्रजांच्या हमीनें गायकवाडानें गंगाधरशास्त्री पटवर्धन यास पेशव्याकडे पुण्यास पाठविलें. तेथें बाजीराव त्याच्याशीं इतका सलोख्यानें वागला कीं लोकांस शास्त्र्याचा हेवा वाटूं लागला. शेवटीं तडजोडीचीं बोलणीं करण्याकरितां बाजीराव व गंगाधरशास्त्री पंढरपुरास गेले. तेथेंच विठोबाच्या देवळाच्या महाद्वारासमोर गंगाधरशास्त्र्याचा खून झाला (१८१५). त्याच्या जिवास अपाय होणार नाहीं अशी बाजीरावानें हमी दिली होती!

१२. त्रिंबकजी डेंगळे:—गंगाधरशास्त्र्याचा खून झाल्यानें इंग्रजांस अत्यंत राग आला. ताबडतोब इंग्रजांचा पुण्याचा रेसिडेंट एल्फिन्स्टन यानें 'बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्यामार्फत खून केला' असा आपला समज करून घेतला. तेव्हां 'त्रिंबकजीस आमच्या हवालीं करा' असा त्यानें बाजीरावाकडे लकडा लावला. थोडी कांकूं करून बाजीरावानें त्रिंबकजीस इंग्रजांच्या स्वाधीन केलें. इंग्रजांनीं त्याला ठाण्याच्या तुरुंगांत ठेवलें असतां तेथून तो पळाला व नाशिक-खानदेश भागांत पुंडाई करूं लागला. या कामीं त्याला बाजीरावाची फूस होती असें एल्फिन्स्टन म्हणत होता. तेव्हां त्यानें सन १८१७ मध्यें बाजीरावाशीं दुसरा तह करून त्याचा आणखी दहा लक्षांचा मुलूख घेतला व गायकवाडप्रकरणाचा निकाल पेशव्याच्या विरुद्ध दिला.

१३. पेशवाईची समाप्ति (१८१८):—या सर्व कटकटींस बाजीराव कंटाळून गेला. तेव्हां इंग्रजांशीं लढण्याची तो तयारी करूं लागला. या कामीं शिंदे, होळकर, भोसले यांची मदत मिळविण्याचा उद्योगही अत्यंत गुप्तपणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें चालविला. स्वतः इंग्रज यावेळीं पेंढाऱ्यांशीं लढत होते. बाजीरावाशीं युद्धप्रसंग ओढवणार हें ते जाणून होते. तेव्हां त्यांनींही आपली तयारी ठेवली होती. बापू गोखले हा बाजीरावाचा सेनापति होता. युद्धाची सर्व सिद्धता झाल्यावर बाजीरावाच्या सांगीवरून बापूनें प्रथम इंग्रजांशीं युद्ध सुरू करून खडकीवर हल्ला केला. त्या लढाईंत पेशव्याचा पराभव होऊन पुणें इंग्रजांच्या हातीं गेलें. त्यानंतर सातारचा छत्रपति प्रतापसिंह यास आपल्याबरोबर घेऊन बाजीराव पळूं लागला. पुढें कोरेगांव व अष्टें येथें इंग्रजांशीं लढाया झाल्या. त्यावेळीं बापू गोखले व त्रिंबकजी डेंगळे यांनीं पुष्कळ पराक्रम केला. परंतु त्यांचा पराभव झाला. अष्ट्याच्या लढाईंत बापू गोखले ठार झाला (१८१८). तेव्हां शिंदे-होळकरांची मदत मिळविण्याकरितां बाजीराव उत्तरेकडे पळून जात असतां इंग्रजांनीं त्याला नर्मदेच्या कांठीं पकडलें. लगेच इंग्रजांनीं सन १८१८ मध्यें बाजीरावाशीं ठराव करून त्याचें राज्य खालसा केलें. त्या ठरावाप्रमाणें वार्षिक आठ लक्षांची नेमणूक घेऊन बाजीरावानें कानपुराजवळ बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथें राहण्याचें कबूल केलें. तसेंच छत्रपति प्रतापसिंह याच्याकडे नीरा व वारणा यांमधील चौदा लाखांचा मुलूख देण्यांत आला. त्रिंबकजी डेंगळे इंग्रजांच्या स्वाधीन झाला. तो चुनारगडच्या किल्ल्यांत तुरुंगांत असतांच सन १८२९ मध्यें वारला. दुसरा बाजीराव आपल्या वयाच्या ७६ व्या वर्षीं सन १८५१ मध्यें ब्रह्मावर्तीं निवर्तला.

१४. पेशवे घराण्याचा अंत :—बाजीरावाला पुत्र नव्हता. तेव्हां त्यानें धोंडोपंत यास सन १८२७ मध्यें दत्तक घेऊन त्याचें नांव नानासाहेब असें ठेवलें. हा पुढें १८५७ च्या बंडांत सामील झाला होता; व त्या धामधुमीनंतर नेपाळांत गेला. तेथेंच त्याचा अंत झाला. बाजीरावाचा दुसरा दत्तक मुलगा बाळासाहेब होय. तो सन १८५८ मध्यें मरण पावला. बाजीरावाचा तिसरा दत्तक मुलगा सदाशिवराव होय. त्याचा मुलगा रावसाहेब सत्तावनच्या बंडांत सामील झाला होता. त्याला इंग्रजांनीं पकडून सन १८६२ मध्यें फाशीं दिलें. बयाबाई आपटे ही बाजीरावाची मुलगी. ती सन १९१७ मध्यें काशीस वारली. बाजीरावाचा सख्खा भाऊ चिमाजी पेशवाई नष्ट झाल्यावर दोन लक्षांची नेमणूक घेऊन काशीस राहिला. तेथेंच तो सन १८१९ त वारला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला मूलबाळ नव्हतें. अमृतराव हा बाजीरावाचा दत्तक भाऊ. तो आठ लक्षांची नेमणूक घेऊन सन १८०४ मध्यें काशीस गेला होता. तेथें तो सन १८२४ मध्यें वारला. त्याचा मुलगा विनायकराव पुढें चित्रकूटास राहूं लागला. तो सन १८५६ त वारला. त्याच्या दत्तकाचा वंश अजून बरेलीस आहे.

१५. सातारचा प्रतापसिंह (१८०८–१८३९):—पेशवाई खलास झाल्यावर सातारचा राजा प्रतापसिंह याला इंग्रजांनीं साताऱ्यास नेऊन स्थानापन्न केलें व नीरेपासून वारणानदीपर्यंतचा मुलूख त्याला दिला. कॅप्टन ग्रँट डफ हा त्यावेळीं साताऱ्यास इंग्रजांचा रेसिडेंट होता. डफनें प्रतापसिंहास ममतेनें वागवून राज्यकारभारासाठीं त्याला उत्तम शिक्षण दिलें. खुद्द प्रताप-सिंह कुशाग्र बुद्धीचा, धूर्त, विद्याप्रवीण, शूर, निर्मळ अंतःकरणाचा, निर्व्यसनी, मानी, उदार व स्पष्टवक्ता होता. आपल्या जातीचा व धर्माचा त्याला अभिमान होता. डफ साताऱ्यास होता तोंपर्यंत त्या दोघांत निरतिशय प्रेम होतें. परंतु तो सेवानिवृत्त झाल्यावर इंग्रज व प्रतापसिंह यांचें जमेना. पेशव्यांचें राज्य आपल्याला मिळेल अशी प्रतापसिंहाची अपेक्षा होती; परंतु ती फोल ठरली. पूर्वजांचें राज्य पराक्रमानें राखावें, धर्म वृद्धिंगत करावा व पूर्ववैभव व लौकिक कायम राखावा अशी त्याची इच्छा होती. परंतु त्याचा बाणेदार स्वभावच त्याला नडला. ग्रँट डफनंतर जे इंग्रज रेसिडेंट साताऱ्यास आले ते त्याला बरें पहात नसत. मुंबईचे गव्हर्नरही त्याच्याकडे दूषित नजरेनें पहात. प्रतापसिंहानें उत्कृष्ट राज्यकारभार केल्यानें त्याची प्रतिष्ठा वाढली. ती त्यांस खपेना. तेव्हां त्यांनीं त्याच्यावर खालील आरोप केले. (१) हिंदुस्थानांतून इंग्रजांचें उच्चाटण करण्याकरितां प्रतापसिंहानें कट केला. (२) परकीयांशीं फितुरीचा पत्रव्यवहार केला. (३) धाकटा भाऊ आप्पासाहेब याचा त्यानें छळ केला. (४) ताब्यांतील जहागिरदारांवर त्यानें आपला हक्क सांगितला.

१६. प्रतापसिंहाची पदच्युति (१८३९):—वरील सर्व आरोप इंग्रजांनीं प्रतापसिंहावर केले. तो ते सर्व आरोप खोटे असल्याचें सिद्ध करण्यास तयार असतांही इंग्रजांनीं त्याला हद्दपार केलें व काशीस नेऊन ठेवलें. त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ आप्पासाहेब याला सातारच्या गादीवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बसविण्यांत आलें. तो नादान, निर्बुद्ध, व्यसनी व जड होता. पुढें सन १८४७ मध्यें प्रतापसिंह काशीस मरण पावला. परंतु जिवंत असेपर्यंत त्यानें आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्याकरितां आटोकाट प्रयत्न केले. त्याकरितां त्यानें रंगोबापूजी नामक आपला एक स्वामिनिष्ठ सेवक आपली सर्व हकीकत इंग्लंडच्या राजाच्या कानावर घालण्याकरितां इंग्लंडला धाडला. रंगोबापूजीनें इंग्लंडांत चार-पांच वर्षें अनेक खटपटी केल्या. परंतु त्याला अखेर हात हलवीत हिंदुस्थानांत परत यावें लागलें. तेथें असतांच त्यानें मोडी लिपींत 'प्रतापसिंहावरील आरोपाचें खंडन' हें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. शेवटीं आपल्यावरझालेल्या अन्यायानें त्रस्त होऊन प्रतापसिंह मेला.

१७. साताराच्या राज्याची समाप्ति (१८४९):—आप्पासाहेब ऊर्फ शहाजी इंग्रजांच्या तंत्रानें वागत असे. त्यानें पुष्कळ पैसा खर्चून नवे वाडे बांधले, पाण्याचे नळ आणले, पूल तयार केले व आपल्या पदरच्या मंडळीस पुष्कळ बक्षिसें वांटलीं. तो निपुत्रिक होता. तेव्हां त्यानें दत्तकाची परवानगी रेसिडेंटजवळ मागितली. पुढें रेसिडेंटसमक्ष मृत्यूसमयीं त्यानें दत्तकही घेतला. त्याच दिवशीं त्याचा अंत झाला (१८४८). परंतु लॉर्ड डलहौसीनें त्याचा दत्तक नामंजूर करून साताराचें राज्य खालसा केलें (१८४९). याप्रमाणें शिवाजीच्या राज्याचा हा अवशेष नष्ट झाला. शहाजीचा दत्तक मुलगा व्यंकोजी सन १८६४ त मरण पावला. त्याच्या राणीनें पुढें दुसरा मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव राजाराम. तो सन १९०४ मध्यें वारला. तेव्हां त्याचा थोरला मुलगा शिवाजी ऊर्फ आण्णासाहेब त्याच्या जहागिरीचा मालक झाला. तोही सन १९१४ मध्यें मेला; तेव्हां त्याचा भाऊ प्रतापसिंह ऊर्फ भाऊसाहेब यास साताराची जहागीर मिळाली. तो सन १९२५ मध्यें निपुत्रिक वारल्यानें त्याच्या राणीनें दत्तक घेतला. त्यांचें नांव शाहूराजे. तेच आज भोसल्यांचें नांव साताऱ्यास चालवीत आहेत.

१८. पडत्या काळांतील ठळक व्यक्ति—(१) परशुरामभाऊ पटवर्धन—पटवर्धन सरदारांत परशुरामभाऊ हा अत्यंत शूर, स्वामिनिष्ठ, धाडसी व युद्धकलानिपुण सरदार होऊन गेला. युद्धकलेचें शिक्षण त्याला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माधवरावाच्या वेळींच गोपाळराव पटवर्धनाच्या हाताखालीं मिळालें होतें. त्यामुळें तो त्यांत चांगलाच तरबेज झाला होता. सन १७७६ मध्यें वामनराव पटवर्धन वारल्यावर परशुरामभाऊ, पटवर्धन सरदारांचा मुख्य झाला. बारभाईचा त्यानें पुरस्कार केला होता. हरिपंत फडक्याच्या हातांत हात घालून त्यानें बारभाईची बाजू चांगलीच सांभाळली होती. पेशव्यांच्या कारभाराचें हृद्गत ओळखून अत्यंत आत्मीय भावनेनें त्यानें कामगिरी बजावली होती. तो मोठा धोरणी व मुत्सद्दीही होता. वडगांवच्या लढाईत त्यानें उत्तम कामगिरी केली होती. हैदरविरुद्ध त्यानें मोहिमा करून त्यास जेरीस आणलें होतें. खर्ड्याच्या लढाईतही त्यानें मोठा पराक्रम गाजविला. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर नानाचें व त्याचें वितुष्ट आलें. कारण भाऊनें बाजीरावाची बाजू उचलून धरली होती. हें वितुष्ट पुढें मिटलें; परंतु नाना व भाऊ यांचा पूर्ण सलोखा झाला नाहीं. करवीरकरांशीं लढत असतांच भाऊ मरण पावला (१७९९). मरणसमयीं त्याचें वय अदमासें साठ वर्षांचें होतें.

(२) **गणेश बळवंत ऊर्फ बापू गोखले**—याचा जन्म सन १७७८ च्या सुमारास झाला. उत्तर पेशवाईत व पळपुट्या बाजीच्या काळांत त्यानें सेनानायक म्हणून उत्तम नांव कमाविलें. मोठ्या अक्कलहुषारीनें वागून स्वपराक्रमानें उदयास आलेल्या मंडळींत त्याची गणना होते. कर्नाटकांतील कित्तुरकर देसाई व करवीरकर भोसले यांस त्यानेंच काबूंत आणलें. कर्नाटकांत धोंडजी वाघ यानें धुमाकूळ घातला असतां बापू गोखल्यानें इंग्रजांच्या मदतीनें त्याचा पूर्णपणें बंदोबस्त केला. उत्तम व पराक्रमी सेनापति म्हणून आर्थर वेल्स्ली ऊर्फ वेलिंग्टनचा ड्यूक यानेंही त्याची वाहवा केली होती. पुढें बाजीरावानें त्याला आपलें सेनापतीपद दिलें. इंग्रजांबरोबर झालेल्या शेवटच्या युद्धांत खडकी, कोरेगांव, अष्टें वगैरे ठिकाणच्या लढायांत अत्यंत स्वामिनिष्ठेनें वागून त्यानें आपलें नांव अजरामर केलें. शेवटीं अष्ट्याच्या लढाईत तो मारला गेला (१८१८).

(३) **मोरोबादादा फडणीस**—नानाफडणिसाचा सख्खा चुलत बंधु मोरोबादादा होय. त्याचा जन्म सन १७४० च्या सुमारास झाला होता. सन १७६३ मध्यें माधवरावानें नाना व मोरोबा यांची फडणिशीवर नेमणूक केली होती. नाना पुण्याच्या कारभारावर असे व मोरोबा माधवरावाचेबरोबर स्वारींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे. मोरोबा अती घमेंडखोर होता. माधवरावानें त्याचा हा दोष ओळखून आपल्या मृत्यूपूर्वी त्यास कारभारांतून दूर केलें. त्यामुळें त्याचें व नानाचें वितुष्ट आलें. बारभाईंत तो सामील असला तरी, त्याच्या कारस्थानी स्वाभावामुळें त्यांतून फुटून निघून तो इंग्रजांच्या पक्षास मिळाला. पुढें तो नानाच्या तावडींत सांपडल्यावर नानानें त्याला नगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें (१७७८). तेथेंही त्यानें कारस्थानें करण्यास कमी केलें नाहीं. तेथें तो सन १८०० पर्यंत कैदेंतच होता. नगरचा किल्ला शिंद्याला देण्याचें दुसऱ्या बाजीरावानें कबूल केलें होतें. म्हणून मोरोबास पुण्यास आणण्यांत आलें व त्याच्या समाधानाकरितां बाजीरावानें त्याला आपली फडणिशी वरकरणी देऊं केली. ती त्यानें स्वीकारली नाहीं. पुढें तो सन १८०३ मध्यें मृत्यु पावला. त्याच्या अनिश्चित स्वभावामुळेंच त्याला कधींही यश आलें नाहीं.

१९. मराठ्यांच्या नाशाचीं कारणें :—शिवाजीनें मराठ्यांचें राज्य स्थापलें, बाजीराव व नानासाहेब यांनीं त्याला साम्राज्याचें स्वरूप दिलें व दुसऱ्या बाजीरावानें आपल्या मूर्खपणानें त्याचा सत्यानाश केला. मराठ्यांचें राज्य नष्ट झालें त्याला अनेक कारणें झालीं. त्यांतील कांहीं प्रमुख कारणें खालीं दिलीं आहेत. (१) मराठ्यांची मध्यवर्ती सत्ता माधवरावानंतर कमकुवत झाली. त्यामुळें इतस्ततः विखुरलेल्या सरदारांस जरबेंत ठेवणें अशक्य झालें. (२) निरनिराळे मराठे सरदारांत स्वतंत्रबुद्धि बळावली व त्यामुळें त्यांच्यांत ऐक्य नांदलें नाहीं. प्रत्येकजण स्वतःच्या जहागिरी व वतनें यांच्या रक्षणार्थ झटे. त्यामुळें राज्याच्या रक्षणाची काळजी कोणीच वाहिली नाहीं. (३) शिवाय मराठे सरदारांमध्यें आपापसांत दुही माजली होती. ती राज्याच्या नाशास कारणीभूत झाली. (४) शिवाजीच्या वेळची शिस्त पुढें नष्ट होऊन लुटालूट, मारामारी, जाळपोळ, वगैरे प्रकारांस ऊत आला. त्यामुळें मराठेशाहीस लोक कंटाळून गेले. (५) मराठ्यांमध्यें राष्ट्रीय भावनाच नव्हती. राष्ट्राकरितां झटून काम करणें हा विचार त्यांस कधींच शिवला नाहीं. (६) मराठ्यांची सांपत्तिक स्थिति कधींही समाधानकारक नव्हती. (७) पेशव्यांनीं आरमाराकडे दुर्लक्ष केलें. (८) युद्धकला व शस्त्रास्त्रें यांच्याकडे मराठ्यांनीं दुर्लक्ष केलें. त्यांचें ज्ञान मिळविण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं कधीं प्रयत्न केला नाहीं. त्यामुळें त्या शास्त्रांत पारंगत असलेल्या इंग्रजांपुढें त्यांस हार खावी लागली. ज्यांनीं तें ज्ञान मिळवून आपलें लष्कर सुधारण्याचा प्रयत्न केला, ते मराठे सरदार आपल्या परकीय लष्करी अंमलदारावर सर्वस्वी बिसंबून रहात. ही त्यांची चूक झाली. (९) आजू-बाजूच्या राष्ट्रांचे उद्योग समजून घेण्याचा मराठ्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. पाश्चात्यांची शिस्त, त्यांची राज्यव्यवस्था व त्यांचें कारभाराचें रहस्य यांकडे मराठ्यांनीं दुर्लक्ष केलें. (१०) नारायणरावाच्या खुनानंतर मराठी राज्यांत तंटे-बखेडे, फंदफितुरी व बेबंदशाही यांना नुसता ऊत आला. या संधीचा इंग्रजांनीं फायदा करून घेतला. (११) शेवटीं राज्याची धुरा दुसऱ्या बाजीरावासारख्या एका नालायक पुरुषाच्या हातीं आल्यानें मराठे-शाहीचा अंत लौकर झाला.

अभ्यास

१. वसईचा तह कोणत्या परिस्थितींत झाला ? त्या तहाच्या अटी सांगून त्याचा परिणाम सांगा.

२. नाना फडणिसाचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा.

३. नाना व महादजी यांची तुलना करा. तुमच्या मतें त्या दोघांत सरस कोण ? कां ?

४. 'बाजीराव नालायक होता', या विधानाचें खंडण वा मंडण उदाहरणांसह करा.

५. बाजीरावानें इंग्रजांशीं युद्ध कां केलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

६. मराठ्यांच्या नाशाचीं कारणें द्या. प्रत्येक ठिकाणीं उदाहरणें द्या.

७. खालीलसंबंधीं टीपा करा.

गंगाधरशास्त्र्याचा खून, त्रिंबकजी डेंगळे, बापू गोखले, प्रतापसिंह, दौलतराव शिंदे, वसईचा तह, रंगो बापूजी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारा

१. दुसऱ्या बाजीचा स्वभाव व इंग्रजांस पेंच

बाजीरावासंबंधीं माझें अत्यंत वाईट मत आहे. त्याला शब्दाची किंमत नाहीं कीं जनाची लाज नाहीं. स्वभाव तर इतका खुनशी व दुष्ट आहे कीं कांहीं पुसूं नका. कपटविद्येंतही तो पूर्ण निष्णात आहे. वसईचा करार केल्या दिवसापासून आज एका वर्षांत त्यानें स्वतःच्या हिताची किंवा आम्हीं सुचविलेली एकही गोष्ट केली नाहीं. मग असला गृहस्थ राज्यावर ठेवणें युक्त आहे काय? मला दुसरा मार्गच दिसत नाहीं. आतांच सर्व राज्य आपण ताब्यांत घ्यावें तर भयंकर युद्ध माजून विश्वासघाताचें पाप आमचे माथीं येईल. चिमाजी अगर अमृतराव यांपैकीं कोणास तरी दिवाण नेमून त्याजकडून कारभार घ्यावा असें ठरवितां येईल, पण त्यामुळें बाजीरावाची सुडाची भावना कशी नाहींशी होणार? तिघा भावांमध्यें अमृतरावच शाहणा व राज्य सांभाळण्यास लायक आहे, आणि त्यासच आपण पेशवाईवर आणावा तर, पुढें कधीं काळीं जर आमच्याशीं वाकडा झाला तर, तो आपल्या राज्यास एक नवीनच कांटा उत्पन्न झाला असें समजा. त्यापेक्षां हल्लींचा बाजीरावच शतपटीनें बरा.

—आर्थर वेल्स्लीचें ग. ज. ला पत्र

प्रश्न :—१. बाजीरावाचे दुष्ट गुण कोणते? त्यामुळें इंग्रजांस कोणता पेंच पडला? अमृतरावापेक्षां बाजीराव इंग्रजांस कां पसंत होता?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१७७२-१८१८

मराठे	इंग्रज	वर्ष	मोंगल	इंग्लंड
सवाई माधवराव १७७४-९५	वॉरन हेस्टिंग्ज १७७४-८५		शाहआलम १७५९-१८०६	तिसरा जॉर्ज १७६०-१८२०
	नंदकुमारास फांशी	१७७५		अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध १७७५-८२
चौकडीचें कारस्थान		१७८०		
साल्प्याचा तह	हैदरचा मृत्यु	१७८२		अमेरिका स्वतंत्र झाली
	पिटचें बिल	१७८४		
			गुलाम कादरचा मृत्यु १७८९	फ्रेंच राज्यक्रांति १७८९
	कॉर्नवॉलिस १७८५-९३			
महादजीचा मृत्यु		१७९४		
खर्ड्याची लढाई		१७९५		नेपोलियनचा उदय १७९७
	शोअर १७९३-९८			
दुसरा बाजीराव १७९६-१८१८	वेलस्ली १७९८-१८०५		टिपूशीं युद्ध १७९९	
नानाचा मृत्यु		१८००		
	वसईचा तह	१८०२		अमीन्सचा तह
	भरतपूरचा पाडाव	१८०५		ट्रफाल्गरची लढाई
	लॉर्ड मिंटो १८०७-१३		शाहआलमचा मृत्यु १८०६	पिटचा मृत्यु १८०६
	लॉर्ड हेस्टिंग्ज १८१३-२३			
गंगाधरशास्त्र्याचा खून		१८१५		वॉटर्लूची लढाई
पेशवाईचा शेवट	खडकीची लढाई	१८१८		तिसरा जॉर्ज मृत्यु १८२०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४७. मराठ्यांचा राज्यकारभार

१. राजसत्ता :—शिवाजीनें मराठ्यांचें स्वतंत्र राज्य स्थापलें व त्याला अंतर्गत स्थैर्य प्राप्त होईल अशी राज्यव्यवस्था निर्माण केली. अष्टप्रधान-मंडळाची निर्मिति करून त्यानें आपल्यावर थोडें बंधन घालून घेतलें हें खरें. तरी त्याची सत्ता हीच खरी सत्ता होती. सर्व प्रधान त्याला जबाबदार होते. त्यामुळें त्यांना स्वतःच्या जबाबदारीवर कांहींही करतां येत नसे. अर्थात छत्रपतीची इच्छाच सामर्थ्यवान ठरे. त्यामुळें छत्रपति सर्वसत्ताधारी परंतु आपल्या रयतेच्या सुखाकरितां धडपडणारा होता. राजारामानेंही शिवाजीची पद्धति पुन्हां अमलांत आणली. तरी त्याला गोष्टी अशा कराव्या लागल्या कीं त्यामुळें मध्यवर्ती सत्तेला थोडा कमकुवतपणा आला. शाहूकडे छत्रपतिपद आल्यावर त्यानें पेशव्याला जास्त महत्त्व दिल्यानें अष्टप्रधानपद्धतीस गौणत्व प्राप्त झालें. त्याचप्रमाणें त्याच्या मृत्यूनंतर सर्व सत्ता त्यानें पेशव्याकडे सोंपविल्यानें सातारचा छत्रपति नामधारी बनला व मराठी राज्याचा मुख्य सूत्रधार पेशवा ठरून अनभिषिक्त राजाप्रमाणें तो आपला अधिकार चालवूं लागला. ही स्थिति पेशवाई खलास होईपर्यंत टिकली.

२. कमजोर मध्यवर्ती सत्ता :—मध्यवर्ती सत्ता कमकुवत व कमजोर झाल्यानें आधींच स्वातंत्र्यप्रिय असलेले मराठे सरदार जास्तच बळावले व जो तो आपापल्या स्वार्थावर नजर ठेवून सरंजाम मिळवून मध्यवर्ती सत्तेपासून फटकून वागूं लागला. त्यांना काबूंत ठेवून त्यांच्याकडून मराठेशाहीला सुदृढता प्राप्त करून घेण्याचें कार्य कोणालाही करतां आलें नाहीं. यामुळें प्रत्येक मराठा सरदार जड बुडाचा होऊन बसला. स्वार्थापुरता मध्यवर्ती सत्तेपुढें तो नम्र होई; नाहींपेक्षां आपला सरंजाम, आपलें वतन व आपली जहागीर यांच्यावर सर्व लक्ष केंद्रीभूत करून जो तो मोठ्या तोऱ्यानें व मिजाशीनें राही. यामुळें रयतेला या जुलमी व आडदांड सरदारांकडून वारंवार छळ सोसावा लागे. आपापसांतील धुसफूस, मत्सर व द्वेष यांमुळेंही सरदारांची सत्ता कमजोर होऊन त्यांस इंग्रजांच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. मराठा संघ :—शिवाजीच्या धोरणाप्रमाणें मराठ्यांनीं राज्य चालविलें असतें तर तें ठीक होतें; परंतु तें तसें झालें नाहीं. राजाराम व शाहू यांच्या कारकीर्दीत सरंजामी सरदार प्रथम निर्माण झाले. त्यांना आपल्या प्रांतांत सर्व प्रकारचे मुलकी व लष्करी अधिकार होते. फक्त छत्रपतीला दरसाल ठर-



लेली नक्त रक्कम ते देत. यामुळें सर्व सरदारांत स्वातंत्र्यप्रियता बळावून शाहूनंतर ते पेशव्याला जुमानीनासे झाले. तरीही मराठ्यांमध्यें एकी निर्माण करण्याकरितां पेशवा सर्वांशीं नम्रपणें वागे. यामुळें पेशवाईत मराठ्यांचा एक प्रबळ संघ निर्माण झाला होता. हा संघ कोणींही हेतुपुरस्सर निर्माण केला नव्हता. परिस्थितीनें तो निर्माण केला. मात्र या संघांत समाविष्ट झालेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरदाराच्या मनांत छत्रपतीबद्दल जी स्वामिनिष्ठा होती ती पेशव्याबद्दल राहिली नाहीं, (व माधवरावानंतर फडणीस मुखत्यार झाल्यावर) फडणिसाबद्दल नाहींच नाहीं. यामुळें मराठेशाहींतील संघाचें स्वरूप खालीलप्रकारचें होतें. 'संघ ही राज्यघटना अनेक अवयवांची बनलेली असते. हे सर्व अवयव फक्त एका अंगानें कोठें तरी एका बिंदूशीं एकमेकांना चिकटलेले असतात. तात्पुरता स्वार्थ हेंच काय तें त्यांच्या एकत्र येण्याचें कारण. हे अवयव एवजीव नसतात व त्यांच्यांत सामुदायिक प्रेमाचा पूर्ण अभाव असतो. अशा घटनेमध्यें फुटीची भावना तीव्र असते.' हुबेहूब अशाच प्रकारची मराठा-संघाची स्थिति होती. पेशवे, शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पवार, पटवर्धन वगैरे मराठे सरदार या संघांत होते. मध्यवर्ती सत्तेच्या हद्दीतील आपलें वतन सांभाळलें जावें म्हणून व आपल्या रक्षणार्थ त्या सत्तेची आपल्याला मदत मिळावी म्हणून हे सरदार मध्यवर्ती सत्तेस वचकून असत. मध्यवर्ती सत्ता कमजोर व तेजोहीन झाल्यावर संघांतील सर्व सरदार स्वतंत्रतेनें वागूं लागले व ते आत्मनाशास कारणीभूत झाले. त्यांना राष्ट्रप्रेम नव्हतेंच. केवळ स्वार्थांधतेनें वागून त्यांनीं आपलें स्वतःचें, आपल्या मराठी राज्याचें व राष्ट्राचें नुकसान करून घेतलें.

४. मुलकी व्यवस्था :—मराठ्यांनीं आपलें राज्य अत्यंत शहाणपणानें चालविलें होतें. हें त्यांच्या जमीनमहसुलाच्या पद्धतीवरून सहज दिसून येईल. तोडरमलाची पद्धति सुधारून मलिकंबरानें ती दक्षिणेंत सुरू केली. त्या पद्धतींतही शिवाजीनें सुधारणा करून ती आपल्या राज्यांत जारी केली. तरी ती सदोष राहिली. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांस त्याकडे लक्ष देण्यास फुरसत लाभली नाहीं. नानासाहेबानें त्यांत बऱ्याच सुधारणा करून यश मिळविलें. नाना फडणिसानें मात्र त्यांच्यावरही ताण करून त्या पद्धतीला इतकें पूर्णत्व आणलें कीं पेशवाई खालसा झाल्यावर एल्फिन्स्टननेंही तीच पद्धति सर्व मुंबई इलाख्यांत चालू ठेवली. ती अजूनही तेथें थोड्या फार फरकानें चालू आहे. मराठ्यांनीं सर्व जमिनीची पहाणी व मापणी करून तिच्या उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा प्रती लावल्या; त्या फक्त जिराईत जमिनीच्या. त्या प्रतींप्रमाणें मराठ्यांनीं दरसाल दर बिघ्यास अनुक्रमें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन, दीड व एक रुपया याप्रमाणें पंचवार्षिक मुदतीचा सारा ठरवून दिला होता. हा सारा खेड्यांतून ऊर्फ मौजांतून पाटील-कुलकर्णी वसूल करीत व तो तरफदाराकडे भरीत. तरफदार मामलेदाराकडे व मामलेदार सरकारी तिजोरींत पाठवून देत. मामलेदार (ऊर्फ कमाविसदार) हा सरकारी पगारी अधिकारी होता व त्याचा वार्षिक पगार साधारणतः पांच हजार रुपयांपर्यंत असे. मराठ्यांच्या राज्यांत देशपांडे व देशमुख हे वतनी वसुली अधिकारी असत. परंतु पुढें पुढें पेशवाईत त्यांच्याकडे वसुलाचा अधिकार राहिला नाहीं. मात्र मामलेदाराच्या कामावर त्यांची देखरेख राही. मराठ्यांच्या राज्याचा साधारणतः कागदी वसूल दहा कोटींचा होता; त्यापैकीं फक्त ७॥ कोटी उत्पन्न होई.

५. लष्कराची व्यवस्था :—शिवाजीनें लष्कराची व्यवस्था कशी ठेविली होती त्याचें वर्णन मागें आलेंच आहे. राजारामाच्या वेळीं घोडदळाचा उपयोग—विशेषतः गनिमी काव्याच्या लढाईच्या कामीं—फार होऊं लागल्यानें घोडदळाकडे मराठ्यांचें लक्ष फार लागलें. पुढें मराठ्यांचे इंग्रजांशीं युद्धप्रसंग होऊं लागले. तेव्हां त्यांस पायदळाची मातब्बरी फार आढळून आली. पाश्चात्यांच्या कवायिती फौजेचें अनुकरण मराठे करूं लागल्यानें त्यांस बंदुका व तोफा यांची जरूरी फार भासूं लागली. अर्थात त्यामुळें किल्ल्याचें महत्त्व संपुष्टांत आलें व त्यांचा उपयोग राज्यरक्षणापेक्षां तुरुंगांसारखा फार होऊं लागला. त्या काळीं मराठ्यांनीं लष्करी शिक्षणाच्या शाळा उघडल्याच नाहींत. असावें तसें व्यवस्थित स्वरूपही लष्करास नसे. लष्करांत अरब, पुरभय्ये, मुसलमान वगैरे उपरे लोकच फार. लढाईचें शिंग वाजलें कीं हे लोक सैन्यांत दाखल होत. खुद्द खडी फौज फारच कमी असे. ही स्थिति सुधारण्याचा महादजीनें चांगला प्रयत्न केला. डीबॉईनच्या मदतीनें त्यानें पाश्चात्य कवायिती सैन्य आपल्या पदरीं निर्माण केलें. एवढेंच नव्हे तर आग्यास तोफा ओतण्याचा व लहानमोठीं हत्यारें बनविण्याचा त्यानें कारखानाही काढला होता. पुढें पुढें आपली गनिमी काव्यानें लढण्याची पद्धति मराठ्यांनीं सोडली व पाश्चात्य धर्तीवर फौजा निर्माण केल्या. ही गोष्ट मराठ्यांनीं चांगली केली नाहीं असें अनेक इंग्रज लष्करी तज्ञांचें मत होतें. कारण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



हिंदुस्थानांत बांधलेलें जुनें लढाऊ जहाज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें मराठ्यांस जिंकणें इंग्रजांस सोपें गेलें. तें खरें असलें तरी आजचें मरण उद्यांवर गेलें असतें एवढेंच.

६. **आरमार :**—पश्चिम किनाऱ्याचें संरक्षण करणें, किनाऱ्यावरील फिरंग्यांचा बंदोबस्त करून तेथील व्यापार निर्वेध करणें वगैरे हेतूनें शिवाजीनें उत्तम आरमार निर्माण केलें. त्याचकरितां त्यानें कोंकणकिनाऱ्यावर जंजिरे किल्लेही बांधले. त्याच्या जहाजांची बांधणी व त्यांवरील वल्हीं इंग्रजांपेक्षांही उत्तम होतीं असें इंग्रजच म्हणत असत. दिलें त्यापेक्षांही शिवाजीनें आपल्या आरमाराकडे जास्त लक्ष दिलें असतें, तर त्यामुळें पश्चिम किनाऱ्यावर आपल्याला पाऊलही ठेवतां आलें नसतें असें इंग्रज म्हणत. शिवाजीचा आरमारी तळ राजापुरास होता. शिवाजीनंतर कान्होजी आंग्रे मराठी आरमाराचा मुख्य झाला. त्याचा तळ कुलाब्यास होता. तो उत्तम दर्यावर्दी व पराक्रमी होता. त्यानें आपल्या आरमाराची सुधारणा करून तें अधिक प्रबळ व अजिंक्य केलें. त्यामुळें इंग्रज, पोर्तुगीज वगैरे फिरंग्यांस व मोंगलांस त्याची चांगलीच दहशत बसली होती. पराक्रमाच्या बाबतींत त्या सर्वांस कान्होजीनें खालीं पहावयास लावलें होतें. अशा पराक्रमी पुरुषाचा नानासाहेब पेशव्यानें इंग्रजांच्या मदतीनें पराभव केला ही मोठी चूक झाली. माधवरावाच्या वेळीं आनंदराव धुळप हा मोठा दर्यावर्दी गृहस्थ उदयास आला. त्याच्या मदतीनेंच विजयदुर्गाला मराठ्यांनीं आपला आरमारी तळ स्थापला होता. त्यानें पराक्रमाचीं पुष्कळ कामें केलीं. मराठ्यांच्या आरमारांत होकायंत्र, दुर्बिण, वालुकायंत्र वगैरे नौकानयनास आवश्यक साधनें होतीं. जहाजांवर तोफाही असत. पेशवाईनंतर मराठ्यांचें आरमार नष्ट झालें.

७. **पेशव्यांचा उधळा कारभार :**—पेशव्यांची आर्थिक स्थिति कधींच समाधानकारक नसे. उत्पन्नाच्या मानानें त्यांचा खर्च जास्त होई. त्यांच्या खर्चाला प्रमाणच नव्हतें. अंदाजपत्रक असें कधीं नसेच. त्यामुळें खाजगी खर्च किती व्हावा व दरबारी खर्च किती असावा याची फोड कोणीही कधीं केली नाहीं. निरनिराळ्या युद्धांपायीं पुष्कळ खर्च होई. तहांत ठरलेल्या रकमा त्यांच्या हातीं नेहमीं येतच असाही प्रकार नव्हता ! या सर्व गोष्टींमुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेशव्यांस नेहमीं कर्ज होई. पहिला बाजीराव, नानासाहेब व माधवराव हे सर्व कर्जामुळें नेहमीं बेजार असत! जी गोष्ट पेशव्याची तीच गोष्ट इतर सरदारांची. परशुरामभाऊ पटवर्धन, हरिपंत फडके वगैरे सरदारही कर्जापायीं नाडले जात. या सर्व गोष्टींमुळें सैन्याचा पगार थके, शत्रूच्या मुलुखांत लूट होई, जरब लावून खंडण्या वसूल केल्या जात, अधिकाऱ्यांच्या हुकमतीस कमीपणा येई, हिशोबाच्या वेळीं हुज्जत घालण्यांत येई व सरदारांचे हिशोब दाखविणारे कारकून स्वतः पैसे खात व सरकारी अधिकाऱ्यांस लांच देत. मात्र कर्जानें गांजलेले पेशवे व सरदार आपल्या सावकारास कधींही लुटत नसत किंवा खाका वर करून मोकळे होत नसत. सरदारीला कर्ज असलें तरी स्वतः पेशवे किंवा इतर सरदार यांची खाजगी सांपत्तिक स्थिति चांगली असे.

८. न्यायपद्धति व न्यायदान :—दिवाणी व फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी मराठ्यांच्या राज्यांत चांगली होत असे. आपल्या प्रधानमंडळांतच शिवाजीनें न्यायाधिशाची नेमणूक केलेली होती. तोच मुख्य न्यायाधीश होय. सर्व हिंदूधर्मशास्त्रांत तो पारंगत असे. हिंदूंच्या धर्माप्रमाणें तो न्याय देई. पुढें मुख्य न्यायाधिशाचें न्यायासन पुण्यास आलें. तेव्हां पहिल्या माधवरावानें सुप्रसिद्ध रामशास्त्री प्रभुणे या शास्त्र्याची मुख्य न्यायाधिशाच्या जागीं नेमणूक केली. त्याचा पगार दीडमाही ४० रुपये असे! त्याशिवाय दक्षिणा वगैरे मिळून वर्षाकांठीं त्याला १०००।१२०० रुपये मिळत. पुढें हा पगार व दक्षिणा वाढली व त्याला पालखीचा बहुमान मिळून त्याकरितां सालीना हजार रुपये भत्ता मिळूं लागला. न्यायाचे कामीं रामशास्त्री अत्यंत निष्णात होता व कोणाचीही भीडमुर्वत न धरतां तो अत्यंत निःस्पृहपणें व निःपक्षपातबुद्धीनें न्याय देई. तो सन १७८९ मध्यें मृत्यु पावल्यावर अय्याशास्त्री सरन्यायाधीश झाला. प्रत्येक प्रांतांतही न्यायकचेऱ्या होत्या. पाटील, मामलेदार, कमाविसदार वगैरे सरकारी अधिकारीही खटले चालवीत व न्याय देत. त्यांच्या निकालाविरुद्ध सरन्यायाधिशाकडे अपीलें होत. होतां होईतों आपापसांत निकाल लावून घेण्याकडे लोकांची प्रवृत्ति होती. स्मृतिग्रंथ, पूर्वापार रूढि व आचार यांच्या आधारें न्याय दिला जात असे. पंचांतर्फे निकाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लावून घेण्याचीही पद्धति होती. तो मान्य न झाला तर खटला न्यायाधिशापुढें चाले. मोठ्या दाव्यांत खुद्द पेशव्यापर्यंतही दाद मागण्याचा रयतेला हक्क होता.

९. तुरुंग व शिक्षा :—न्यायनिवाडा झाल्यावर गुन्हेगाराची तुरुंगाकडे रवानगी होई. कैद्याच्या पायांत बिड्या ठोकण्यांत येत. प्रतिष्ठित कैद्यास मोकळे ठेवीत. तुरुंगांतील कैद्यास शिधा मिळे. सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या कैद्यांस अनेक कामें करावीं लागत. स्त्रियांसही तुरुंगवासाची शिक्षा होत असे. एकंदरींत कैद्याशीं सौम्यपणाची वागणूक ठेवण्यांत येई. देहान्ताची शिक्षा क्वचित देण्यांत येत असे. राजकीय गुन्हेगारास हत्तीच्या पायीं देणें, डोक्यांत मेखसू मारून ठार करणें, फाशीं देणें, कडेलोट करणें वगैरे शिक्षा देण्यांत येत. दरोडेखोरांचे हातपाय तोडीत. गुन्हेगार बाप पळून गेल्यास त्याची शिक्षा मुलास भोगावी लागे ! स्थावर व जंगम मालाची जप्ति हा एक शिक्षेचा नेहमींचा पण महत्त्वाचा प्रकार होता. बदकर्माबद्दल स्त्रियांस व पुरुषांसही शिक्षा होत. अग्निदिव्य करणें, लोखंडाचा लाल तापलेला गोळा हातांत धरणें, बेलभंडारा उचलून शपथ घेणें, तापलेल्या तेलाच्या कढईतून सोन्याचा रवा हातानें काढून देणें वगैरे दिव्येंही न्यायदानापूर्वी करून घेण्यांत येत. त्यांत गुन्हेगार सहीसलामत निघाला तर तो खरा असें समजून त्याला सोडून देत.

१०. पोलीस :—सन १७६४ मध्यें माधवरावानें पोलीसखातें निर्माण केलें होतें. पुण्याची वस्ती वाढल्यानें शहरांत व्यवस्था ठेवण्याकरितां हें खातें प्रथम निर्माण झालें. त्या खात्यावर कोतवाल हा प्रमुख अधिकारी होता. त्याच्या मदतीला प्रथम २५ पोलीस होते. पुण्यांत निरनिराळ्या पांच ठिकाणीं पोलिसचावड्या होत्या व प्रत्येक चावडीवर दोन पोलीस असत. पुढें पुणें येथील पोलिसांची संख्या १००।१५० पर्यंत गेली. मालाची किंमत ठरविणें, सरकारला मजूर पुरविणें, शहराची खानेसुमारी करणें, रस्त्यांचा बंदोबस्त ठेवणें, लहान गुन्ह्यांची चौकशी करणें, सरकारी जाहीरनाम्यांची शहरांत दौंडी पिटणें वगैरे कामें पोलिसांस करावीं लागत. पुण्याचा घाशीराम कोतवाल हा प्रसिद्ध आहे. पुढें पुण्याप्रमाणेंच इतर लहान शहरींही कोतवाल व पोलीस ठेवण्यांत येत. खेड्यांतील जागल्या हा पोलीसच होय. त्याशिवाय कमाविसदार व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मामलेदार याच्या हाताखालीं शिबंदी असे. लोकसंरक्षणार्थ ते तिचा उपयोग करीत. जत्रेच्या ठिकाणीं, घाटांतून वगैरे ठिकाणीं पोलिसचौक्या असत. प्रसंगविशेषीं एखाद्या गांवास पोलिसांची मदत दिली जाई. मात्र त्यांचा खर्च त्या गांवाकडून घेतला जाई. गुन्हेगार पकडण्याकरितां बक्षिसें लावण्यांत येत.

११. वेठ व गुलामगिरी :—वेठीची पद्धति पेशवाईत होती. कोणासही वेठीस धरून त्याच्याकडून सक्तीची नोकरी करून घेण्यांत येई. माणसांप्रमाणें बैल, गाड्या व इतर वाहनें यांसही वेठीस धरून त्यांच्याकडून सरकारी कामें मोफत करून घेण्यांत येत. कामाचा मोबदला मालकास क्वचितच मिळे. पुढें माधवरावानें ही पद्धति बंद केली. गुलामगिरीही चालू असून गुलामांची विक्री होई. मात्र गुलामांस चांगल्यारीतीनें वागविण्यांत येई. गुलामांची, बटीक व कुणबिणी यांची जनावरांप्रमाणें मोजदाद होई. बिनवारशी, अनाथ व दरिद्री अशा लोकांवर गुलामगिरीची आपत्ति येई. इमानानें नोकरी केल्यास गुलाम, बटकी वगैरेंस बक्षिसें देत व वेळेनुसार त्यांस स्वतंत्रही करण्यांत येई.

१२. टांकसाळी :—मराठेशाहींत अनेक प्रकारचीं नाणीं उपयोगांत होतीं. सोनें, रुपें व तांबें यांचीं नाणीं होतीं. अनेक नाणीं प्रचारांत असल्यानें नाणें मोडावयाचें झाल्यास वर्तावळा व वटावा द्यावा लागे. सरकारी टांकसाळ नव्हतीच. खाजगी टांकसाळी पुष्कळ असत. मात्र टांकसाळ घालण्याकरितां सरकारचा परवाना अगोदर घ्यावा लागे. अशा तऱ्हेच्या टांकसाळी नागोठणें, रेवदंडा, धारवाड वगैरे ठिकाणच्या सोनारांकडे होत्या. त्यामुळें सर्व ठिकाणचीं नाणीं सारखीं नसत. अर्थात घोटाळा होई; कारण त्या त्या नाण्यांच्या किंमती निरनिराळ्या असत. रुपयांमध्यें जोधपुरी, चांदवडी, खंदार वगैरे प्रकार होते. मोहरा सुरती, दिल्लीशिक्का, अहमदाबादी, बनारसी वगैरे असत. होन धारवाडी, महमदी, हैदरी वगैरे प्रकारचे असत. ढब्बू पैसे, शिवराई, आलमगिरी वगैरे किरकोळ नाणीं असत. मराठ्यांच्या राज्यांत मराठी नाणींच चालत असें नसून कोणतींही व कोणाचींही नाणीं चालत! त्यामुळें सर्वच घोटाळा उडे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. मराठ्यांची जमीनमहसुलाची व्यवस्था कशी होती ? तिचा विशेष फायदा काय ?

२. मराठ्यांची आरमार व लष्कर यांची व्यवस्था कशी होती ?

३. मराठा संघ म्हणजे काय ? तो कोणीं स्थापला ? तो नष्ट कसा व कोणत्या कारणांकरितां झाला ?

४. टीपा लिहा.
नाणीं, पेशव्यांची उधळपट्टी, पोलीसव्यवस्था, गुलामगिरी, शिक्षा.

५. मराठ्यांचा राज्यकारभार कसा चाले ? त्याचें वर्णन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४८. मराठेशाहींतील लोकांची राहणी

१. समाजरचना :—मराठेशाहींत सर्व समाजाचें नियंत्रण पूर्वापार चालत आलेले नियम व रूढि यांच्यामुळें होत असे. अर्थात जातिव्यवस्था रूढ असल्यानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा ठळक जाती समाजांत होत्या. पुढें जाती फार वाढल्यानें जातीजातींत मत्सर, हेवादावा व द्वेष यांमुळें तंटे व कलह माजत. त्यांचा निकाल पूर्वापार रूढि व परंपरा यांस अनुसरून दिला जाई. खुद्द ब्राह्मणांत कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांच्यामध्यें विषमता मानली जाई व तीही तीव्रतेनें. त्यामुळें त्यांच्यांत रोटी व बेटी व्यवहारही सहसा होत नसत. नानासाहेब पेशव्यासारखे सुधारक पूर्वापार नियम व शास्त्रें धुडकावून देऊन समाजाचें दिग्दर्शन करीत; परंतु त्याचा फारसा फायदा होत नसे. तरी पण ब्राह्मणाब्राह्मणांत सौख्य व स्नेह होता. ब्राह्मण व अब्राह्मण यांचे संबंधही सलोख्याचे असत. प्रत्येक जातीचा धंदा वांटलेला असल्यानें संपत्तीची वांटणी सारखी नसली तरी, योग्य होई. प्रत्येक कृत्यास धर्माचा आधार घेऊनच तें कृत्य करण्यास जो तो तयार होई. समाजांत बालविवाह होत. मुलीच्या सातव्या-आठव्या वर्षी व मुलाच्या १०/१२ व्या वर्षी मुलांमुलींचीं लग्नें होत. अर्थात यामुळें विधवांचे व विषमविवाहांचे आकडेही फुगत. स्त्रियांवर वपनाची सक्ति होई. सती जाण्याची चालही रूढ होती. नीतिबाह्य वर्तनावर कडक नियंत्रण ठेवण्यांत येत असे. धर्मविहित नियमांचें पालन करणें हा धर्म समजला जाई. त्या विरुद्ध वर्तन करणारास वाळींत टाकण्यांत येई. बहिष्कारचें हें हत्यार त्यावेळीं अत्यंत उपयुक्त ठरलें होतें. सर्व जातींत नीतिबंधनें खंबीर रहावीं म्हणून सरकारचा प्रयत्न नेहमीं असे. त्याकरितां न्यायांतही सरकार परंपरा व रूढि यांस अग्रस्थान देई.

२. कुटुंबसंस्था :—मराठेशाहींत अंदाधुंदी फार असे; शांतता व तीही अखंड अशी फारशी नसेच. धरपकड, लुटालूट, जाळपोळ, घरांचा विध्वंस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वगैरे संकटांची भीति नित्याचीच होती. शत्रूचा घाला आला म्हणजेच हे प्रकार घडत असें नव्हे, तर मराठे सरदार आपल्या भाईबंदांवरही वरील संकटें आणीत. यामुळें निरनिराळें व स्वतंत्र राहण्यापेक्षां कुटुंबांत राहणेंच लोकांस जास्त पसंत पडे. त्या काळीं एका कुटुंबांत साधारणपणें २५–३० मंडळी सहज असत. त्या कुटुंबाच्या संरक्षणाची व पोषणाची जबाबदारी कुटुंबाच्या कर्त्या पुरुषावर पडे. त्याची आज्ञा सर्वांस मानावी लागे. त्याच्या छत्राखालीं राहण्यांत प्रत्येकाला आनंद व सौख्य मिळे. कर्ता पुरुष आपली जबाबदारी उत्तमरीतीनें पार पाडीत असे.

३. समाजाचा विशेष :—त्यावेळच्या समाजांत जातिव्यवस्था असली तरी प्रत्येकाला आपल्या अंगच्या गुणांच्या जोरावर व पराक्रमानें समाजांत मानाचें व वरचें स्थान मिळवितां येत असे. या कामीं जात, गोत, धर्म, वंश वगैरे आड येत नसत. अशा तऱ्हेनें पुढें आलेल्या लोकांस सरदारक्या, जहागिरी, इनामें व पदव्याही एकाच मापानें दिल्या जात. ब्राह्मणांनीं लष्करी पेशा स्वीकारला व त्यांतही अग्रेसरत्व प्राप्त करून घेतलें. राजकारणांत पडल्यामुळें त्यांनीं धर्माचरणाला बगल दिली; तरी पेशव्यांतील बरेच लोक स्नानसंध्या व तप करण्यांत गर्क असत. त्यामुळें धर्माचीं बंधनेंही थोडीं शिथिल झालीं. कोणत्याही पराक्रमी वीरास पुढें येण्यास अवसर मिळाल्यानें, तो आणखी विजय संपादण्यास झटे. त्यामुळें राष्ट्राचें पाऊल पुढें पडे.

४. शहरांतील जीवन :—मराठ्यांच्या काळीं महाराष्ट्रांत मोठमोठीं शहरें फारशीं नव्हती. परंतु होतीं तीं मात्र व्यवस्थित होतीं. विशेषतः पुण्यासारख्या राजधानीचें सौंदर्य अनुपम होतें. या शहरांतील घरें कोंदट व हवा व उजेड यांस बहुधा पारखीं असत. श्रीमंतांचे वाडे चौसोपी व कमींतकमी दोन चौकी असल्यामुळें त्यांत हवा व उजेड खेळे. परंतु वाड्यांस खिडक्या कमी असत. दगड, विटा, चुना व लाकूड यांचीं घरें असत. तीं एक मजली वा दोन मजली असत. श्रीमंतांचे वाडे क्वचितप्रसंगीं तीनपेक्षां जास्त मजल्यांचेही असत. त्यांतून बागा व कारंजींही असत. श्रीमंतांच्या घरीं पालखी, माल वाहण्यास गाडे, रथ, घोडीं वगैरे वाहनें असत. शिवाय ऐपतीप्रमाणें हत्ती,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उंट, घोडे, बैल, गाई वगैरे जनावरेंही असत. रथास सात बैल जुंपीत. शहरांतील रस्ते अत्यंत अरुंद, एक हत्ती जेमतेम जाईल इतके मोठे असत! त्यांस रस्ते म्हणण्याऐवजीं बोळ म्हटलें असतां चालेल त्यामुळें शहरांचें आरोग्य कसें असेल याची कल्पना येते. प्रत्येक घरांत गाद्या, गिरद्या, गालिचे, रुजामे, लोड, किनखापाचे व चिकाचे पडदे, सोन्याचांदीचीं भांडीं असत. हें ऐश्वर्य प्रसंगोपात्तच बाहेर निघे. कारण शत्रूच्या लुटीची भीति प्रत्येकास नेहमीं असे. शत्रूचा हल्ला आला म्हणजे लुटालूट, जाळपोळ, कत्तल, घरें उकरून काढणें वगैरे प्रकार नेहमीं चालत. त्यामुळें संपत्ति घरांत कोठें तरी लपवून ठेवण्याचा प्रघात रूढ होता. रंगपंचमी, दिवाळी, दसरा, गणेशोत्सव वगैरे सण व दरबार प्रसंग मोठ्या इतमानानें पाळले जात व त्यावेळीं शांतता असल्यास, दागदागिने, उंची पोषाख, वैभव वगैरेंचें उत्तम प्रदर्शन श्रीमंतांकडून होई. शहरांत व्यापारही चांगला चाले. त्यामुळेंही संपत्ति चांगली खेळे व ती खालपर्यंत झिरपत असे. श्रीमंतांच्या पदरीं कुळंबिणी व बटकी असत. त्या विकत घेतल्या जात. बटकी व पोरगे विकणें हा कांहीं लोकांचा धंदा होता! बटकी ६० रुपयांपर्यंत व पोरगा १०० रुपयांपर्यंत विकला जाई. विकत घेणारा इसम मात्र त्यांस, वागणुकीस चांगलीं माणसें असल्यास, चांगल्या रीतीनें वागवी. शहरांतील लोकांस शिक्षण नसे, तरी त्यांच्या ठिकाणीं चौकसपणा, सावधानता, बहुश्रुतपणा, चतुरस्रपणा, वगैरे गुण उत्तमरीतीनें वसत असत. एकंदरींत पाहतां शहरी जीवन सुखाचें व समाधानाचें होतें.

५. खेड्यांतील जीवन :—प्रत्येक खेडें स्वराज्याचें व स्वातंत्र्याचें प्रतीक समजलें जात असे. त्याचा राजा पाटील असे. तो मोठ्या डामडौलानें राही. त्याचा मान मोठा असे व त्याला त्याच्या कामाकरितां इनाम जमिनी दिलेल्या असत. गांवाची व्यवस्था नीट ठेवणें, भांडणें-मारामाऱ्या-कलह यांचा योग्य निकाल करणें, शेतकऱ्यांच्या सुखसोयीकरितां झटणें, शेतीस नीट वळण लावून देणें, सरकारसारा पैशाच्या अगर धान्याच्या रूपानें जमा करून तो मामलेदाराकडे पोंचता करणें, संकटकाळीं शत्रूपासून गांवाचें संरक्षण करणें वगैरे कामें पाटलाला करावीं लागत. गांवचा पाटील हा जसा राजा, तसा कुळकर्णी हा त्याचा प्रधान. पाटलाच्या खालोखाल त्याला मान असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांवाचा हिशोब ठेवणें व सर्व सरकारी कागदपत्रें तयार करणें हें कुळकर्ण्याचें मुख्य काम. शिवाय हरेक बाबतींत तो पाटलास मदत करी. कुळकर्णी व पाटील हे वतनदार असत. पाटील हा बहुधा मराठा व कुळकर्णी हा ब्राह्मण असे. प्रत्येक सणावारीं व उत्सवप्रसंगीं खेड्यांतील अलुतेदार-बलुतेदारांकडून त्यांचा मानपान होई व त्यांचे हक्क कसोशीनें पाळले जात. चौगुला, महार, चांभार, लोहार, सुतार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव व कोळी हे बारा बलुतेदार प्रत्येक खेड्यांत असत. तेली, तांबोळी, साळी, शिंपी, सनगर, माळी, गोंधळी, वाजंत्री, घडशी, तराळ वगैरे अलुतेदार समजले जात. गांवचा जो वसूल होई त्याचे १५।२० टक्के पैसा गांवांतील सरकारी व सार्वजनिक खर्चाकरितां गांवांत राखून ठेवीत. त्यास 'गांवफंड' असें म्हणत. महार हा पाटील-कुळकर्ण्यांचा खास सरकारी नोकर असे. रामोशी व तराळ गांवाचे रक्षणार्थ झटत. अलुतेदार व बलुतेदार यांचीं कामेंही नीट वाटलेलीं



पुण्याच्या न्यू इं. स्कूलमधील रमणबाग शाखेंतील मुलांनीं तयार केलेला 'मराठेशाहींतील खेड्याचा' एक काल्पनिक नमुना.

असत. त्यांना सरकारी व गांवकीचींही कामें करावीं लागत. गांवांतील बहुतेक देवघेव पैशानें न होतां धान्य अगर जिनसांच्या रूपानें होत असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेतकीचा धंदा गांवकऱ्यांचा मुख्य धंदा मानला जाई. मिरासदार व उपरी असे शेतकऱ्यांचे दोन प्रकार असत. मिरासदार अथवा वतनदार हे वंशपरंपरेनें शेताचे मालक असत. त्यांना जमिनीची खरेदी-विक्री करतां येत नसे. उपरे शेतकरी सरकारी जमिनी खंडानें घेऊन त्या करीत. अशातऱ्हेनें गांवांत जी ग्रामव्यवस्था असे ती फार नमुनेदार होती. खेड्यांतून आनंद सामावलेला असे. पाटील-कुळकर्ण्यांचीं घरें जरा चांगलीं असत; परंतु शेतकऱ्यांचीं घरें मात्र साधीं, तिघई व मातीच्या विटांचीं असत. गांवांत पैसा सहसा नसेच. खेडीं कंगालच असत. परंतु जर कोणाजवळ पैसा असला तर तो पुरून-लपवून ठेवण्यांत येई. खेड्यावर परचक्र आलें तर त्यापासून संरक्षण व्हावें म्हणून खेड्यास तट व भिंती असत. त्याच्या वेशी रात्रीं बंद करण्यांत येत. शिमगा, पोळा, वेंदूर, दिवाळी, दसरा वगैरे सण उत्साहानें साजरे होत. बाजरी, जोंधळा, साळ, नाचणी वगैरेंच्या भाकरी, दूध, तूप, भात वगैरे अन्न साधारणच असे. गांवांत फौजदारी गुन्हे सहसा होत नसत. झालेच तर पाटील त्यांची चौकशी करी. तराळ ऊर्फ जागल्या, रामोशी वगैरे चोरीचा व लफंग्यांचा तलास लावीत. चोरी सांपडली नाहीं तर जागल्यास जबाबदार धरून त्याच्याकडून ती भरून घेण्यांत येई. जास्त महत्त्वाचा खटला असल्यास तो मामलेदाराकडे वर्ग करीत असत.

६. दळणवळण व प्रवास:—दळणवळणाचीं साधनें त्यावेळीं फारशीं उपलब्ध नव्हतीं. सडका चांगल्या असत. गांवांतील रस्ते दगडी असत; परंतु सडका मुरुमाच्या व खडीच्याही करण्याची पद्धति होती. माल एका गांवाहून दुसऱ्या गांवीं अगर अन्यत्र न्यावयाचा झाल्यास लमाण व वंजारी लोक तो बैलाच्या पाठीवरून अगर मोठ्या गाड्यांतून नेत. या कामीं छकड्यांचाही उपयोग होत असे. लमाणाजवळ दोन दोन हजार बैल मालवाहतुकीकरितां असत. घाटांतून टोलनाकीं असत. तेथें दर बैलागणिक अगर दर गाडीगणिक जकात द्यावी लागे. माल वाहण्याकरितां उंटांचाही उपयोग होत असे. त्यावेळचा प्रवास एकंदरींत पाहतां सुखकर व सोयीचा असे. क्वचित प्रसंगीं लुटालूट होई. पायानें प्रवास करण्याकडे लोकांची प्रवृत्ति फार असे. घोड्यावरून प्रवास करणें त्यापेक्षां सुखाचें समजण्यांत येई. जास्त लांबचा प्रवास डोलींतून व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



१७ व्या व १८ व्या शतकांतील प्रवासाचीं साधनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पालखींतूनही करण्याची वहिवाट होती. छकडे व गाड्या यांचाही या कामीं उपयोग होत असे. श्रीमंत लोक प्रसंगीं हत्तीवरूनही प्रवास करीत. पेशवाईत हल्लींसारखी टपालाची व्यवस्था नव्हती. तरीही खाजगी व सरकारी डांक त्यावेळीं चालू होती. टपाल नेण्या-आणण्याकरितां जासूद असत. सांडणीस्वारांचाही या कामीं उपयोग करण्यांत येई. टप्याटप्यानें जासूद आपले टपाल नेत. दर टप्यागणिक नवा जासूद तें टपाल पुढील टप्यापर्यंत पोंचवी.

७. उद्योगधंदे व व्यापार :—त्या काळीं ठिकठिकाणीं अनेक प्रकारचे उद्योगधंदे चालत असत. एलिचपूर येथें कापडाचे व धातुसामान तयार करण्याचे कारखाने चांगले होते. पुण्यास जरतारी काम चांगलें होई. कापडाकरितां महेश्वर, नागपूर, पैठण, सोलापूर, अष्टी वगैरे पेठांची प्रसिद्धी होती. कलाकौशल्याचीं कामें महाराष्ट्रांत क्वचितच होत. परदेशचा व्यापार युरोपियनांच्या, त्यांतल्या त्यांत इंग्रजांच्या, हातीं होता. ते मेणबत्त्या, आरसे, हस्तिदंत, तंबाखू, सुऱ्या, तरवारी, घड्याळें, दुर्बिणी, अत्तरें, थर्मामीटर, लोहचुंबक वगैरे जिनसा महाराष्ट्रांत खपवीत. थोरला बाजीराव घड्याळ वापरीत असे. माधवरावाजवळ हातघड्याळही होतें. व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ व्हावी म्हणून पेशवे व छत्रपति यांनीं अनेक उपाय योजिले. त्यांनीं जकातींचीही सूट दिली, बक्षिसांची खैरात केली; परंतु महाराष्ट्रांत उद्योगधंदे व व्यापार वाढीस लागला नाहीं.

८. कपडे–पोशाख :—कपडे वापरण्याची त्यावेळीं चाल होती. डोक्यास घालण्याकरितां पुरुष पागोटीं, तिवट, मंदिल, फेटा, बत्ती वगैरेपैकीं एखादें शिरोभूषण वापरीत. तिवट व मंदिल लहान मुलेंही बांधीत असत. पटका व फेटा यांची ऐटबाज पोशाखांत गणना होई. टोप्याही कांहीं लोक वापरीत; पण त्या जरीच्या असत. अंगांत घालण्याकरितां झगा, अंगरखा, डगला, कुडतें, अंगडें, बंड्या वगैरे कपड्यांचे प्रकार होते. पुरुष धोतरें वापरीत. ब्राह्मण, शास्त्री व पंडित यांचा पोषाख कमरेखालीं धोतर, अंगावर शाल व डोकीस पागोटें असा असे. शाल मिळणें हा मोठा मान समजला जाई. दरबारी लोक विजारी, चुस्त पायजमे वगैरेही वापरीत असत. स्त्रिया लुगडीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साड्या, चिरड्या, पातळें, शालू, पैठण्या, शेले, परकर, चोळया, काचोळ्या, ओढण्या वगैरे वापरीत. त्यांस शिवून तयार केलेले कपडे लागत नसत. खालच्या वर्गातील लोक बहुधा वस्त्रहीन असत. लंगोटीचा उपयोग त्यांच्यांत होता. घोंगड्या, पासोड्या वगैरे प्रकार शीतनिवारणार्थ ते वापरीत. जे लष्करी पेशाचे लोक होते ते अंगांत चिलखतें वापरीत.

९. **अन्न-खाद्यपेयें** :—शाकाहारी व मांसाहारी असे दोन प्रकारचे लोक त्यावेळीं महाराष्ट्रांत होते. ब्राह्मण वगैरे लोक बहुधा शाकाहारी होते. त्यांच्या अन्नांत भात, वरण, पोळ्या, लाडू, श्रीखंड, बासुंदी, निरनिराळ्या प्रकारचे भात, जिलब्या, अनेक प्रकारच्या भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, पापड, सांडगे, फेण्या, चिकवड्या वगैरे प्रकार सणावारीं व श्रीमंतांकडे हरहमेश यावयाचे. मात्र गरिबांचें अन्न अत्यंत साधें पण रुचकर असे. साधारणतः भात-पिठलें व बाजरीची अगर ज्वारीची भाकरी त्यांच्या अन्नांत येई. मांसाहारी लोक निरनिराळ्या प्राण्यांचें मांस व मासे खात. दारूची चटक थोडी असे. पानतंबाकू खाण्याची संवय सर्वांस होती. इंग्रजांमुळें चहाचें व्यसन समाजांत हळूहळू घुसूं लागलें होतें. सखारामबापू चहा पीत असे. फळें फारच थोडीं खाण्यांत येत. अंजीर, फणस, मोसंबी, केळीं, आंबे, काजू वगैरे फळें महाराष्ट्रांत होत व तीं खाल्लीं जात. भोजनाचा 'पेशवाई थाट व नाना फडणिशी बेत' त्यावेळीं फार नांवाजला जात असे.

१०. **शिक्षण-शाळा** :—मराठ्यांच्या हातून विद्यावृद्धि फारशी झाली नाहीं. शास्त्रज्ञान मिळविणें, कला व हुन्नर शिकणें, व्यापार वाढविणें व शेती सुधारणें या गोष्टींकडे मराठ्यांनीं दुर्लक्षच केलें. 'दंडकारण्यमहात्म्य' हा त्यांचा भूगोलग्रंथ व 'भविष्यपुराण' हा त्यांचा इतिहासग्रंथ! त्या काळीं पंतोजीच्या शाळा व वेदशाळा असत. पंतोजीच्या शाळांतून व्यवहारास पुरेसें लेखन-वाचन-हिशोब यांचें शिक्षण मिळे. तें सर्व मोफत असे. लोकांच्या देणग्या व सणावारीं होणारी मिळकत एवढ्यावर पंतोजीला गुजराण करावी लागे. वेदशाळांतून शिक्षण फुकट मिळे. त्या शाळा शास्त्रीपंडितांच्या घरींच असत व त्यांतून वेदशास्त्रांचेंच शिक्षण व तेंही ब्राह्मणांसच मिळे. त्या विद्येच्या प्रसारार्थ शास्त्रीपंडितांस सरकारांतून वार्षिक दक्षिणे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवाय जमिनी, इनामें वगैरेही मिळत. इतर विद्येंत कोणी आपली प्रगति दाखविली तर त्यांसही बक्षिसें व इनामें सरकारकडून उत्तेजनार्थ मिळत; परंतु एकंदरींत पाहतां सर्वांगीण शिक्षण त्यावेळीं मिळतच नसे. इतर राष्ट्रांत अनेक प्रकारचे भौतिक शोध लागत होते. त्याकडे मराठ्यांनीं दुर्लक्षच केलें.

११. साधुसंत व कवि:—शिवाजीच्या वेळीं अनेक साधु व कवि उदयास आले होते. परंतु त्या सर्वांचा समाजाच्या शाश्वत कल्याणावर भर होता. हीच परंपरा पुढेंही साधुसंतांनीं राखली. शिवशाहींत तुकाराम, रामदास वगैरे संतकवि व पेशवाईंत चाकणचे कचेश्वर, पांडववाडीचे रामाजीपंत कोल्हटकर, कायगांव टोंक्याचे नारायण दीक्षित पाटणकर, धावडशीचें ब्रह्मेंद्रस्वामी, चिंचणेरचे ज्योतिपंत महाभागवत व बोरवनचे तुकाविप्र हे प्रसिद्ध साधु-संत होऊन गेले. ते बहुतेक वैराग्यशील होते. धर्म व ईश्वर यांचें श्रेष्ठत्व त्यांनीं राजकारणी पुरुषांच्या वारंवार नजरेस आणून दिलें व आसुरी अभिलाषापासून त्यांस परावृत्त केलें. त्या सर्वांत ब्रह्मेंद्रस्वामी यांचें पेशवाईंत फार महात्म्य वाढलें होतें. पहिला बाजीराव, चिमणाजी व खुद्द शाहूमहाराज यांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें होतें. रामाजीपंत कोल्हटकर याच्या कृपेमुळेंच रघूजी भोसले उदयास आला. त्याच्या स्मरणार्थ रघूजीनें त्याचा एक मुलगा कोन्हेराम कोल्हटकर यास आपला दिवाण नेमून दुसरा मुलगा भास्करराम कोल्हटकर यास आपलें सेनापतिपद दिलें. या साधुसंतांप्रमाणेंच कृष्णदयार्णव, श्रीधर, मध्वमुनीश्वर हे संतकवि पेशवाईच्या सुरुवातीस होऊन गेले. त्यांच्या काव्यांत वैराग्य व सांसारिक सौख्य यांचा मिलाफ दृष्टीस पडतो. त्यांतल्या त्यांत श्रीकृष्णविजय, रामविजय, पांडवप्रताप वगैरे ग्रंथ लिहिणारा श्रीधर फार प्रसिद्धी पावला. नानासाहेबाच्या वेळीं अमृतराय व रघुनाथपंत हे कवि होऊन गेले. पेशवाईच्या उत्तरार्धात महिपति, मोरोपंत, रामजोशी, अनंतफंदी, ज्ञानसागर, जनीजनार्दन वगैरे कवि फार प्रसिद्ध होते. त्या सर्वांत मोरोपंत हा कवि फार प्रसिद्धी पावला होता. त्याच्या आर्या फार प्रसिद्ध आहेत.

१२. करमणूक व खेळ:—चित्तास रमविण्याकरितां त्यावेळीं अनेक खेळ व करमणुकीचीं साधनें उपलब्ध होतीं. शिकारीचा नाद पुष्कळांस असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बागा तयार करणें, पशुसंग्रह करणें वगैरेचा शोक पुष्कळांना होता. सवाई-माधवरावास पशुपक्षांचा संग्रह करण्याचा नाद फार होता. त्या कामीं मॅलेट



मराठ्यांच्या वेळची चित्रकला—होळी मिरवणूक

या इंग्रज गृहस्थानें त्याला मदत केली. बैठ्या खेळांत सोंगट्या व फासे, गंजिफा, बुद्धिबळें वगैरे खेळ लोकांस फार आवडत. कुस्तीचा शोक बहुतेकांस होता. जत्रांच्या ठिकाणीं कुस्त्यांचे फड हमेशा पडत. साठमाऱ्या व उंटाच्या, कोंबड्यांच्या, बकऱ्यांच्या, कुत्र्यांच्या वगैरे झुंजी त्यावेळीं लावण्यांत येत. नाच-तमाशे त्यावेळीं चालत. पेशव्यासह सर्व श्रेष्ठ-कनिष्ठ ते पाहण्यास व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐकण्यास जात. नाटकांची प्रथा फारशी प्रचारांत नव्हती. कलावंतिणींचीं गाणीं, नाचरंग व गवयांचीं गाणीं लोकांस फार आवडत. ठिकठिकाणचीं उत्तम



पेशव्यांच्या गणपतीची मिरवणूक

चित्रें व कलाकौशल्याचीं कामें गोळा करून त्यांचा संग्रह करण्याचा छंद अनेकांस होता. रंगपंचमी, नागपंचमी, दसरा, दिवाळी, शिमगा, गणेशोत्सव वगैरे सण-समारंभ उत्साहानें साजरे करण्याची त्या काळीं प्रथा होती. त्या समारंभांत सर्वजण गुंगून जात.

१३. लोकांचा भोळा भाव :—भुतांखेतांवर लोकांचा विश्वास फार असे. भुतावळ्याकडून भुतें घालण्याची पद्धति त्या काळीं फार प्रचलित होती. भुतें घालण्याचें बंड फार माजल्यानें सरकारलाही त्याचा बंदोबस्त करावा लागे. शिवाय भुतें काढणाऱ्या मांत्रिकांस त्यावेळीं बराच भाव होता. चेटूक करणें व जारणमारण यासारख्या गोष्टींही त्या काळीं चालत. त्यामुळें देवऋषी व पंचाक्षरी यांची लोकांस मदत घ्यावी लागे. व्रतें, दानें, अनुष्ठानें वगैरेंमुळें व तुला केल्यानें ईश्वराचा व ग्रहादिकांचा कोप नष्ट होतो व आलेलीं संकटें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहिंशी होतात अशी लोकांची श्रद्धा होती. पायगुणावरही लोकांचा विश्वास होता. ग्रहण हें मोठें अरिष्ट समजलें जाई. अर्थात तें टळावें म्हणून जप, दान, अनुष्ठान वगैरेमध्यें लोक गर्क असत. एकंदरींत लोकांस शिक्षण मिळालें नसल्यानें ते अज्ञानी राहिले व त्यामुळें त्यांच्यांत भोळेपणा बोकाळला होता. ज्योतिषावरही लोकांचा विश्वास होता. लढाईच्या वेळीं मुहूर्त पाहून स्वारीस निघण्याचा परिपाठ पेशवाईत होता. ज्योतिषाचा नादच कांहीं लोकांस असे. कोणतीही गोष्ट करावयाची झाल्यास मुहूर्त पाहून ती केली जाई. पत्रिकेवरून आपले शत्रू कोण व त्यांचें पारिपत्य कसें करावें हें समजून घेण्याचा लोक प्रयत्न करीत. त्यांत यश कितपत येई हा भाग निराळा.

१४. धर्मा-धर्मांतील सलोखा :—सातारचे छत्रपति मनानें व कृतीनें हिंदु होते. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं राजकीय व धार्मिक अशा दोन्ही सत्ता एकवटल्या होत्या. पुढें त्यांची मुखत्यारी पेशव्यांकडे आल्यावर त्या दोन्ही सत्तांचा प्रजाशासनाचे वेळीं ते उपयोग करूं लागले. श्रीशंकराचार्य हे हिंदुधर्माचे मुख्य आचार्य. त्यांच्या पीठास पेशवे हरतऱ्हेची मदत करीत व त्यांचा मान राखीत; पण राजकीय बाबतींत त्यांची सत्ता ते अमान्य करीत. कांहीं कांहीं धार्मिक प्रसंगींही त्यांनीं त्यांचे हुकूम मानले नाहींत. मनुष्याच्या हातून निषिद्ध कर्म घडल्यास प्रायश्चित्तानें त्यास शुद्धि मिळे. परंतु क्वचित प्रसंगीं धर्मांतर केलेल्यास शुद्ध करून घेतल्याचें दाखलेही पेशव्यांच्या काळांत आहेत. हिंदु व मुसलमान एकदिलानें व संतोषानें मराठी राज्यांत असत. मराठ्यांनीं मुसलमान व इतर धर्मीय लोक यांच्यासंबंधीं सहिष्णुतेचें धोरण स्वीकारलें होतें. ज्यानें त्यानें आपल्या धर्माच्या शिकवणुकीप्रमाणें वागावें, दुसऱ्यावर आपल्या धर्माची सक्ति करूं नये, अशी हिंदूंची विचारसरणी होती. मुसलमान व इतर धर्मीय लोक यांस उपकारानें मारावें अशी पेशव्यांची विचारसरणी होती. त्याला अनुसरूनच पेशव्यांनीं आपल्या पदरीं मुसलमान, खिस्ती वगैरे विधर्मीयांस नोकऱ्या दिल्या, त्यांच्या देवादिकांना उत्पन्नें व नेमणुका दिल्या, असलेल्या चालू ठेवल्या व त्यांचा मानमरातब करून त्यांस जहागिरी दिल्या. मुसलमानांच्या धर्मासंबंधीं हिंदूंचें मत चांगलें होतें. हिंदू पिरास भजत, त्यास ईप्सितासाठीं नवस करीत व त्यांच्या उरुसांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामील होत. उलट मुसलमानही हिंदूंच्या देवदेवतांस भजत, त्यांस नवस करीत व त्यांच्या उत्सवांत सामील होत. एकंदरींत पाहतां हिंदु व मुसलमान अत्यंत गुण्यागोविंदानें मराठेशाहींत नांदत. मात्र एखादे वेळीं मुसलमानांनीं क्रौर्य केलेंच तर त्याचा पुरेपूर मोबदला त्यांस देण्यास मराठे कचरत नसत.

अभ्यास

१. मराठ्यांच्या वेळीं सामाजिक स्थिति कशी होती? तिचा विशेष कोणता होता?

२. महाराष्ट्रांतील घरें त्यावेळीं कशीं होतीं? त्या घरांत तुम्ही रहावयास गेलां आहांत असें समजून घरांची बांधणी, लोकांची राहणी, त्यांचा पोषाख, त्यांचें अन्न व त्यांचे खेळ यांसंबंधीं विवेचन करा.

३. त्यावेळीं सडका कशा होत्या? त्यावरून प्रवास करावयाचा झाल्यास कोणते अनुभव आले असते?

४. टिपणें करा—त्यावेळच्या शाळा व शिक्षण, कवि व साधुसंत, लोकांचा भोळा भाव, व्यापार, कपडे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्वाचीन काळ—ब्रिटिश अंमल

४९. युरोपियनांचा हिंदुस्थानांत प्रवेश

१. पूर्व व पश्चिम :—पूर्व व पश्चिम यांचा संयोग फार प्राचीन काळापासून झाला होता. मात्र त्या काळीं पूर्वेच्या संपत्तीनें व वैभवानें पश्चिम दिपून गेली होती. त्यामुळें पश्चिमेला पूर्वेवर अवलंबून रहावें लागत असे. शिकंदराच्या स्वारीनंतर हा पूर्व-पश्चिमसंयोग जास्त दृढावला; व त्या वेळेपासून हिंदुस्थानांतून हरतऱ्हेचा माल युरोपांत जाऊं लागला. हिंदुस्थानाशीं होणारा हा व्यापार प्रथमतः जमिनीवरून होत होता. नंतर तो समुद्रमार्गें होऊं लागला. त्यामुळें युरोपांतील व्हेनिस, जिनोआ, कॉन्स्टॅंटिनोपल वगैरे शहरें फार प्रसिद्धी पावलीं. फोनीशियन, कार्थेजीनियन, ग्रीक व रोमन या लोकांनीं हिंदुस्थानाशीं होणाऱ्या व्यापारावर अगणित संपत्ति मिळविली. त्यांना हिंदुस्थान ही मोठी सुवर्णभूमि वाटे. हिरे, मोतीं, सोनें, रेशमी कापड, मलमल, कापसाचें कापड, नीळ, हस्तिदंत, कातडीं, कांसवाच्या पाठी वगैरे अनेक प्रकारचा माल हिंदुस्थानांतून युरोपांत जाई. त्यांतल्या त्यांत मसाल्याच्या पदार्थांस युरोपांतून फार मागणी येई. त्याचें कारण असें कीं युरोपांत कडक हिंवाळा पडत असल्यानें त्या ऋतूंत गवतपाला मिळत नसे. अर्थात माणसांना व गुरांना अन्नाचा व चाऱ्याचा पुरवठा पुरा पडत नसे. त्यामुळें योग्य काळीं गुरें मारून त्यांचें मांस, मीठ व मसाल्यांचे निरनिराळे पदार्थ यांमध्यें सांठवून ठेवल्यास, त्याचा हिंवाळ्यांत जेवणाऱ्या वेळीं उपयोग होई. या योगानें मांस न कुजतां तें नेहमीं ताजें राही. यामुळें युरोपियनांस मसाल्याच्या पदार्थांची फार आवश्यकता वाटत असे; व ते पदार्थ हिंदुस्थानांत विपुल मिळत असल्यानें सर्व युरोपियनांस हिंदुस्थानाबद्दल प्रथमतः जिव्हाळा उत्पन्न झाला होता.

२. नव्या जलमार्गांचा शोध (१४९८) :—सन १४५३ मध्यें तुर्कांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोर करून कॉन्स्टँटिनोपल शहर जिंकलें. त्यामुळें युरोप व हिंदुस्थान यांच्यामधील महत्त्वाचा व्यापारी मार्ग त्यांच्या ताब्यांत गेला. अर्थात युरोपियन लोकांचा हिंदुस्थानाशीं असलेला संबंध तुटला व त्यामुळें त्यांचा मसाल्याच्या पदार्थांचा (मिरीं, दालचिनी, लवंग, सुंठ, मोहोरी वगैरे) व्यापारही नष्ट झाला. अशातऱ्हेनें जमिनीवरील व्यापारी मार्ग बंद झाल्यानें हिंदुस्थानाकडे जाण्याकरितां समुद्रमार्ग शोधण्याकडे युरोपियन व्यापाऱ्यांचें लक्ष लागलें. हिंदुस्थानाचा मार्ग शोधण्याकरितां म्हणून निघालेल्या कोलंबसानें सन १४९२ मध्यें अमेरिका शोधून काढली; परंतु त्यानें युरोपियनांचें समाधान झालें नाहीं. पुढें सन १४९८ मध्यें वास्को-ड-गामा हा पोर्तुगीज खलाशी 'केप ऑफ गुडहोपला' वळसा घालून हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर कालिकत बंदरीं उतरला. त्याच्या या उपक्रमानें हिंदुस्थानास जाण्यासाठीं नवा जलमार्ग सांपडल्यानें युरोपियनांस हर्ष झाला व हिंदुस्थानाशीं त्यांचा पुन्हां व्यापार सुरू झाला.

३. पोर्तुगीजांचा हिंदुस्थानांत शिरकाव :—वास्को-ड-गामानें कालिकतच्या राजाशीं मैत्री करून आपलीं जहाजें मालानें भरलीं व तो पोर्तुगालला परत गेला. कालिकतच्या झामोरीन राजानें वखार बांधण्यासही त्यास परवानगी दिली होती. त्यानंतर गामानें हिंदुस्थानाच्या बऱ्याच सफरी केल्या. त्यावेळीं झामोरीन राजाशीं त्याचे युद्धप्रसंगही झाले. गामानें नंतर कालिकत सोडून कोचीनचा राजा त्रिमंपारा याचा आश्रय घेतला. त्यावेळीं पोर्तुगीजांनीं मलबार किनाऱ्यावर अनेक वखारी स्थापल्या व कालिकत, कॅननोर, गोवा वगैरे ठिकाणीं किल्लेही बांधले. सन १५०५ मध्यें अल्मिडा हा त्यांचा पहिला पोर्तुगीज गव्हर्नर हिंदुस्थानांत आला. अरबांचा व्यापार मारून त्याऐवजीं पोर्तुगीजांचा व्यापार स्थापण्याची त्याची मनीषा होती. ती त्यानें पुष्कळ अंशीं शेवटास नेली. अल्मिडानंतर अल्फान्सो अल्बुकर्क पोर्तुगीजांचा गव्हर्नर झाला (१५०९). पोर्तुगीजांचें राज्य येथें स्थापणें हें त्याचें ध्येय होतें. त्याला अनुसरून त्यानें सन १५१० मध्यें गोवें शहर घेतलें.

वास्को-ड-गामा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेथूनच पोर्तुगीज सत्तेस खरी सुरुवात होते. तो मुसलमानांचा द्वेष्टा व हिंदूंचा आश्रयदाता होता. त्यानें हिंदु शिपायांची पलटण प्रथम तयार केली. विजापूर



वास्को-ड-गामाचें जहाज

व विजयनगर येथील राजांशीं त्यानें स्नेहाचे तह केले होते. थोड्याच दिवसांत पोर्तुगीजांनीं एडन, मस्कत, ऑर्मझ्, कोलंबो, मलाक्का वगैरे व्यापारी मार्गावरील नाक्याचीं ठिकाणें हस्तगत केलीं व आपल्या राज्याचा पसारा वाढविला. अल्बुकर्क सन १५१५ मध्यें गोवें येथें मरण पावला. त्याच्यानंतर जे पोर्तुगीज गव्हर्नर हिंदुस्थानांत आले, त्यांनीं वसई, ठाणें, मंगळूर, चौल, मुंबई, दीव, दमण वगैरे पश्चिम किनाऱ्यावरील महत्त्वाचीं बंदरें काबीज करून आपली सत्ता दृढ केली. बंगाल्यांत हुगळी येथेंही त्यांनीं वखारी स्थापल्या. लंका बेट सन १५९६ मध्यें त्यांच्या ताब्यांत आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. पोर्तुगीजांच्या नाशाचीं कारणें :—पोर्तुगीजांनीं हिंदुस्थानांत आपली सत्ता स्थापन केल्यानंतर त्यांचे अनेक धर्मगुरू हिंदुस्थानांत येऊं लागले. ख्रिस्ती धर्माच्या प्रसारार्थ त्यांनीं खटपट केली. परंतु या कामीं त्यांनीं फार धर्मछळ केला व अनेक क्रूर मार्गांचा अवलंब करून अनेकांस त्यांनीं आपला धर्म बळजबरीनें स्वीकारावयास लावलें. यामुळें येथील लोक फार असंतुष्ट झाले. पोर्तुगीजांच्या नाशाचें धर्मछळ हें एक जबरदस्त कारण होय. सन १५६५ मध्यें विजयनगरचें राज्य नष्ट झालें. त्या राज्याशीं पोर्तुगीजांचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चाले, तो बुडाला. त्यामुळें पोर्तुगीजांचा ऱ्हास होण्यास मदत झाली. पोर्तुगाल हें राष्ट्र लहान असल्यानें इकडील साम्राज्य सांभाळण्याचें काम पोर्तुगीजांस जमलें नाहीं. पोर्तुगीजांचा कारभार नीट नव्हता. पोर्तुगीज लोक पुढेंपुढें चांचेगिरी करूं लागल्यानें, त्यांचें राज्य मोडकळीस आलें. सन १५८० मध्यें स्पेन व पोर्तुगाल हीं राज्यें एकत्र केलीं गेलीं. त्यामुळें हिंदुस्थानांतील राज्याकडे त्यांचें दुर्लक्ष होऊं लागलें. डच, इंग्रज वगैरे प्रबळ लोकांपुढें पोर्तुगीजांचा टिकाव लागला नाहीं. त्यांचे शेवटचे अधिकारीही लायक नव्हते. मराठे, मोंगल वगैरे लोकांचे हल्ले परतविण्याचें सामर्थ्यही त्यांच्यांत नव्हतें. या सर्व कारणांमुळें पोर्तुगीज सत्तेचा नाश झाला. मात्र दीव, दमण व गोवें येथें अजूनही पोर्तुगीज सत्ता आहे.

५. डचांची सरशी :—पोर्तुगीजांनंतर डच लोक हिंदुस्थानांत, विशेषतः पूर्वेकडील बेटांत, व्यापाराकरितां आले. हाऊटमन हा त्यांचा पहिला खलाशी सन १५९५ मध्यें जावा बेटांत गेला. सन १६०२ मध्यें 'डच ईस्ट इंडिया कंपनी' स्थापन झाली. या कंपनीनें लंकेंत व हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर आपल्या वखारी स्थापन केल्या. थोड्याच दिवसांत पूर्वेकडील सर्व व्यापार त्यांनीं काबीज केला. चिनसुरा व तुतिकोरीन येथेंही त्यांच्या वखारी स्थापन झाल्या होत्या. प्रथमतः पोर्तुगीजांशीं त्यांचे तंटे सुरू झाले. हिंदुस्थानांत आपली सत्ता स्थापण्याकडे त्यांचा फारसा कल नव्हता. मसाल्याचीं बेटें मात्र आपल्या हातीं असावीं असें त्यांस वाटे. त्यामुळें पुढें इंग्रजांशीं त्यांचे तंटे होऊं लागले. सन १६२३ मध्यें त्यांनीं इंग्रज व्यापाऱ्यांची अंबोयना येथें अत्यंत क्रूरपणें कत्तल केली. तेव्हां डच व इंग्रज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांच्यांत वितुष्ट आलें व इंग्रजांनीं मसाल्याच्या बेटांतून काढता पाय घेतला. परंतु पुढें हिंदुस्थानांत इंग्रजांनीं शिरकाव करून घेऊन, आपलें आसन येथें स्थिर केलें. त्यामुळें डचांच्या वर्चस्वास बाध येऊन त्यांच्या प्रसारास आळा बसला. त्यामुळें उच लोक मसाल्याचीं बेटें व लंका बेट यांच्या स्वामित्वावरच खूष होऊन राहिले.

६. इंग्रजांचा शिरकाव :—पोर्तुगीज व डच लोकांनीं पूर्वेकडील व्यापार काबीज केलेला पाहून त्यांच्याप्रमाणें आपणही पूर्वेकडील देशांशीं व्यापार करावा असें इंग्रजांस वाटूं लागलें. त्याप्रमाणें इंग्लंडांत एलिझाबेथ राणी राज्य करीत असतां सन १६०० मध्यें 'ईस्ट इंडिया कंपनी' स्थापन झाली. त्या कंपनीला पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याचा परवाना व मक्ताही राणीनें दिला होता. मसाल्याच्या बेटांशीं व्यापार करण्याकरितांच ही कंपनी प्रथमतः स्थापन झाली होती; परंतु डचांनीं त्यांची तेथें डाळ शिजूं दिली नाहीं. त्यामुळें इंग्रज लोक हिंदुस्थानाकडे वळले. हिंदुस्थानांतही पोर्तुगीजांबरोबर इंग्रजांस आरमारी युद्धें करावीं लागलीं. त्यांत इंग्रजांस यश मिळत गेलें. सन १६०८ मध्यें इंग्रजांनीं आपली पहिली वखार सुरतेस स्थापिली. त्यामुळें इंग्रज व पोर्तुगीज यांच्यातील चुरस विकोपास गेली. तेव्हां सन १६१२ मध्यें इंग्रजांनीं पोर्तुगीजांचा पराभव करून आपली सत्ता सुरतेस स्थापन केली. तरीही त्यांस मोंगल अधिकाऱ्यांकडून फार त्रास होई. तेव्हां कंपनीनें सन १६०८ मध्यें कॅप्टन हॉकिन्स याला आपल्यातर्फे हिंदुस्थानांत पाठविलें. त्यानें सन १६१३ मध्यें जहांगीर बादशहाची भेट घेऊन सुरतेस वखार घालण्याची परवानगी मिळविली. आयात मालावर ३॥ टक्के जकात देण्याचेंही त्यानें कबूल केलें होतें. यामुळें इंग्रजांच्या व्यापाराचा पाया घातला गेला. हें वृत्त कळतांच पोर्तुगीज लोक चिडून गेले व ते इंग्रजांस जास्तच त्रास



इंग्रजांची सुरतेची वखार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देऊं लागले. सन १६१५ मध्यें सर टॉमस रो नांवाचा दुसरा इंग्रज वकील जहांगीरच्या भेटीस गेला. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याचा वकील म्हणून त्यानें मोंगल बादशहाची भेट घेतली. तो चार वर्षें आग्र्यास होता. त्यानेंही बऱ्याच सवलती मिळविल्या होत्या. मात्र व्यापाराची कायमची परवानगी त्याला मिळाली नाहीं.

७. इंग्रजांचा प्रसार :—यानंतर हिंदुस्थानाच्या पूर्व किनाऱ्याकडे इंग्रजांची दृष्टि वळली. सन १६२५ त अर्मागांव येथें व सन १६३२ मध्यें मच्छलीपट्टण येथें त्यांनीं वखारी स्थापिल्या. सन १६३३ मध्यें बंगाल्यांत वसाहती स्थापण्यास शाहजहाननें इंग्रजांस परवानगी दिली. त्याप्रमाणें बालासोर व हरिहरपूर या ठिकाणीं त्यांनीं आपल्या वसाहती व वखारी स्थापल्या. पुढें सन १६३९ मध्यें इंग्रजांनीं चंद्रगिरीच्या राजाकडून मद्रास विकत घेऊन तेथें सेंट जॉर्ज हा किल्ला बांधला व मच्छलीपट्टणची वखार तेथें नेली. गॅब्रियल बाउटन या नांवाच्या एका इंग्रज वैद्यानें बंगालच्या सुभेदारास औषध देऊन बरें केलें होतें. तेव्हां त्यानें इंग्रजांस हुगळी येथें वखार स्थापण्याची परवानगी दिली; व त्यांना जकात माफ करून पाटणा, मुर्शिदाबाद, डाक्का, काशीमबझार वगैरे ठिकाणींही वखारी स्थापण्याची पुढें परवानगी दिली. सन १६६२ मध्यें इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याचें लग्न पोर्तुगालच्या राजकन्येशीं झालें. तेव्हां आंदण म्हणून मुंबई बेट चार्लसला मिळालें. तें त्यानें सन १६६८ मध्यें वार्षिक दहा पौंड घेण्याचें ठरवून ई. इं. कंपनीस दिलें. तेव्हां तेथें आपली वखार कंपनीनें स्थापन करून सुरतेचें ठाणें मुंबईस नेलें. वेळ आल्यास सैन्य उभारून एतद्देशीयांशीं लढाई करण्याची परवानगीही दुसऱ्या चार्लसनें कंपनीस दिली होती. पुढें औरंगजेबाशीं इंग्रजांचा तंटा झाला. तेव्हां त्यानें इंग्रजांचीं सर्व ठाणीं जप्त केलीं; परंतु पुढें सन १६९० मध्यें जबर दंड घेऊन तीं ठाणीं बादशहानें त्यांस परत केलीं. सन १६९० मध्यें जॉन चॉर्नाक या इंग्रज गृहस्थानें बादशहाच्या परवानगीनें कलकत्त्यास एक वखार स्थापिली व तेथेंच 'फोर्ट विल्यम' नामक एक किल्ला बांधला. सन १७०० मध्यें बंगालचा सुभेदार अझीम उशान याच्याकडून सुतानती, कालीघाट व गोविंदपूर हीं गांवें इंग्रजांनीं विकत घेतलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचेंच रूपांतर पुढें कलकत्त्यांत झालें. सन १७१५ च्या सुमारास मुर्शिद-कुलीखान या बंगालच्या सुभेदारानें इंग्रजांस त्रास दिला. तेव्हां इंग्रजांनीं फर्रुखसियर बादशहाकडे एक मंडळ पाठविलें. त्यांत डॉक्टर हॅमिल्टन हा एक वैद्य होता. त्यानें बादशहास औषध देऊन दुखण्यांतून वांचविलें. तेव्हां खूष होऊन बादशहानें कंपनीस बंगाल्यांत ३८ गांवें व जकातींची माफी दिली. अशा तऱ्हेनें सतराव्या शतकामध्यें इंग्रजांचा मुंबई, मद्रास व बंगाल या प्रांतांमध्यें प्रसार झाला.

८. कंपन्यांचें एकीकरण (१७०८):—सन १६८८ मध्यें इंग्लंडमध्यें मोठी राज्यक्रांति झाली. त्यावेळीं ई. इं. कंपनीस कोणीही जुमानीना व तिचे हक्कही कोणी मानीना. त्यामुळें पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याकरितां अनेक कंपन्या स्थापन होऊं लागल्या. त्यांतल्या त्यांत सन १६९८ मध्यें स्थापन झालेल्या दुसऱ्या एका ई. इं. कंपनीनें पूर्वेकडील व्यापार काबीज करण्यापर्यंत मजल मारली. त्यामुळें जुन्या कंपनीचें फार नुकसान झालें. हें जाणून सन १७०८ मध्यें पार्लमेंटनें त्या दोन्ही कंपन्यांचें एकीकरण करून, त्या नव्या कंपनीस पूर्वीचे सर्व हक्क व मक्ते दिले. त्यामुळें इतर कंपन्याही नष्ट झाल्या. ही नवी कंपनी कथील, शिसें, पारा, काचेचे मणी, चांदी, सोनें, नाणीं, आरसे वगैरे माल हिंदुस्थानांत आणी व मिरीं, लवंगा, वेलदोडे, जायफळ वगैरे मसाल्याचे पदार्थ, रेशमी कापड, नीळ, मलमल, चिटाचें कापड, कापसाचें कापड, सोन्याच्या मुलाम्याचीं हत्यारें वगैरे माल इंग्लंडांत नेई. त्याशिवाय इराणांतून गालिचे, चीनमधून चहा, साखर, चिनीमाती, लाखेचे जिन्नस व जावा–सुमात्रामधून हस्तिदंत, सोनें, मसल्याचे पदार्थ दरसाल इंग्लंडांत नेऊन अपार संपत्ति मिळवीत असे.

९. ई. इं. कंपनीची व्यवस्था:—ई. इं. कंपनीची व्यवस्था कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्स ऊर्फ मालकमंडळ व कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ऊर्फ डायरेक्टर-मंडळ यांच्या हातीं असे. मालकमंडळाकडे कंपनीचें महत्त्वाचें काम असून पांचशें किंवा जास्त पौंडांचे शेअर्स ऊर्फ भाग घेणारासच त्या मंडळांत घेतलें जाई. डायरेक्टरमंडळ कंपनीचें कचें काम पहात असे. या मंडळांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४ सभासद असून, प्रत्येकास ३०० पौंड वार्षिक पगार मिळे. त्याच्या अध्यक्ष-उपाध्यक्षास मात्र ५०० पौंड वार्षिक पगार मिळे. त्याशिवाय इतर अनेक पोटमंडळें असून हिशोब ठेवणें, पत्रव्यवहार करणें, कायदे करणें, व्यापारी मालाची ने-आण करणें, मालाची विक्री करणें वगैरे कामें त्यांच्याकडे वांटून दिलीं होतीं. खुद्द हिंदुस्थानांत मुंबई, मद्रास व बंगाल या प्रत्येक इलाख्यास एक मंडळ असे. त्या मंडळाचा अध्यक्ष मंडळाच्या सल्ल्यानें आपल्या प्रांतांत कंपनीच्या हुकुमांची अंमलबजावणी करी. कंपनीच्या नोकरांस खाजगीरीतीनें व्यापार करण्याची मोकळीक असे. ही कंपनी प्रथमतः केवळ व्यापार करी व त्या बाबतींत कांहीं घोटाळे झाल्यास ते दूर करी. म्हणजे तिचें ध्येय केवळ व्यापारी होतें. परंतु सन १७७४ पासून ही कंपनी पूर्णपणें राजकारणांत पडून राज्यस्थापनेच्या नादास लागली.

१०. फ्रेंचाची प्रगति:—पोर्तुगीज, डच व इंग्रज यांच्याप्रमाणें आपणही पूर्वेकडील देशांशीं व्यापार करावा असें फ्रेंचांस वाटूं लागलें. त्याप्रमाणें सन १६१५ मध्यें त्यांनींही एक कंपनी स्थापन केली. प्रथमतः त्यांचा ओढा मसाल्याच्या बेटांकडे होता. परंतु डचांनीं त्यांची तेथें डाळ शिजूं दिली नाहीं. शिवाय फ्रेंच सरकारचें पाठबळही त्या कंपनीस प्रथम लाभलें नाहीं. त्यामुळें ती कंपनी फारशी भरभराटली नाहीं. पुढें कार्डिनल रिचल्यू व कॉलबर्ट या फ्रेंच मुख्य प्रधानांनीं या बाबतींत लक्ष घालून कंपनीचा व्यापार भरभराटीस आणला. सन १६६४ मध्यें कॉलबर्टनें फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची पुनर्रचना करून पन्नास वर्षें हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याचा परवाना त्या कंपनीला दिला. त्याप्रमाणें तिनें सन १६६६ मध्यें सुरतेस व सन १६६९ मध्यें मच्छलीपट्टण येथें वखारी घातल्या. त्याच्या अगोदरच मादागास्कर व बुर्बो हीं बेटें फ्रेंचांनीं घेतलीं होतीं. पुढें मार्टिन नामक फ्रेंच गृहस्थानें सन १६७४ मध्यें पांदिचरी येथें वसाहत स्थापन केली. त्यानंतर त्यानें कारिकल, फ्रेंचपट्टा, चंद्रनगर, बालासोर, डाक्का, पाटणा वगैरे ठिकाणीं वखारी घातल्या. सन १७३५ च्या सुमारास अलेक्झांडर डुमास फ्रेंचांचा गव्हर्नर होता. त्यानें व्यापाराची व्यवस्था चांगली राखली. कर्नाटकांतील राजांशीं स्नेह जोडून व वेळीं त्यांच्या भांडणांत हस्तक्षेप करून त्यानें आपलें महत्त्व वाढविलें. सन १७४० च्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुमारास मराठ्यांनीं कर्नाटकावर स्वारी केली असतां कर्नाटकचा नबाब सफदरअली व त्याचा जांवई चंदासाहेब हे फ्रेंचांच्या आश्रयास पांदिचरीस गेले. त्यामुळेंही फ्रेंचांचें वजन वाढलें. पुढें सन १७४१ मध्यें डुमासची जागा डुप्ले या प्रसिद्ध फ्रेंच मुत्सद्यानें घेतली.

११. फ्रॅन्सिस डुप्ले (१६९७–१७६३):—जोसेफ फ्रॅन्सिस डुप्ले याचा जन्म सन १६९७ मध्यें झाला. सन १७२० मध्यें फ्रेंच कंपनीच्या नोकरींत तो प्रथमतः शिरला. सन १७३१ मध्यें चंद्रनगर येथील वखारीवर तो मुख्य होता व पुढें १७४१ मध्यें डुमासनंतर तो फ्रेंचांचा गव्हर्नर झाला. तो अचाट बुद्धीचा व महत्त्वाकांक्षी होता. फ्रेंचांची सत्ता हिंदुस्थानांत स्थापणें हें त्याचें ध्येय होतें. त्यास अनुसरून दक्षिणेंतील राजकारणांत हात घालून आपल्या राष्ट्राचें महत्त्व वाढविण्याकरितां तो झटूं लागला. आपलें आरमार सुसज्ज ठेवून व किल्लेकोटांची डागडुजी करून, त्यानें फ्रेंचांची सत्ता बळकट केली. या कामीं त्यानें आपल्या खाजगी संपत्तीचाही उपयोग करण्यास कमी केलें नाहीं. अनेकांशीं त्यानें स्नेह संपादिला, आपल्या कंपनीची स्थिति सुधारली, लांचलुचपतीचे प्रकार थांबविले व इंग्रजांची सत्ता हाणून पाडून फ्रेंच सत्ता स्थापण्याच्या उद्योगास तो लागला. त्याच्या या उद्योगामुळेंच इंग्रज व फ्रेंच यांचा युरोपप्रमाणेंच हिंदुस्थानांतही अभूतपूर्व सामना सुरू झाला. मात्र यश इंग्रजांस मिळावयाचें होतें.

१२. बुसी (१७१८–१७८२):—डुप्लेचा केवळ उजवा हात व त्याच्या राजकारणाशीं सहमत झालेला गृहस्थ म्हणजे बुसी होय. सन १७१८ मध्यें त्याचा जन्म झाला व १७४६ मध्यें तो पांदिचरीस आला. डुप्लेशीं त्याची ओळख झाल्यावर परस्परांनीं एकमेकांच्या गुणांची समीक्षा करून मैत्री वाढविली. डुप्लेबद्दल बुसीला पूज्यबुद्धि वाटत होती. सन १७४९ मध्यें झालेल्या अंबूरच्या लढाईत तो प्रथम उदयाला आला व जिंजी काबीज केल्यामुळें उत्तम सेनापति म्हणून त्याची प्रसिद्धी झाली. पुढें निजामाच्या दरबारीं फ्रेंच वकील म्हणून त्याची डुप्लेनें नेमणूक केली. त्यावेळीं तेथें त्यानें आपलें बस्तान इतकें उत्तम बसविलें कीं निजामाचें त्याच्यावांचून क्षणभरही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालेनासें झालें. निजामाचा सर्व कारभार त्याच्याच हातीं होता. त्यामुळें दक्षिणेंत फ्रेंचांचें वर्चस्व अतोनात वाढलें. त्याच्या इतका शाहणा, प्रसंगावधानी, लष्करी योग्यतेचा व धोरणी मुत्सद्दी त्यावेळीं फ्रेंचांत दुसरा नव्हता. नाना-साहेब पेशव्याबरोबर तो स्नेहानें वागत असे. चाळीस लक्ष उत्पन्नाचा उत्तरसर-कारप्रांत फ्रेंचांस त्यानेंच मिळवून दिला होता. लालीचें व त्याचें पटलें नाहीं. त्यामुळें लालीनें त्याला निजामाच्या दरबारांतून परत बोलाविलें. त्यामुळें फ्रेंचांचें फार नुकसान झालें. वांदिवॉशच्या लढाईंत तो कैद झाला होता. पुढें तो फ्रान्समध्यें गेला व तेथें तो मजेंत रहात असे. परंतु सन १७८१ मध्यें तो पुन्हां इकडे परत आला व थोड्याच दिवसांत मरण पावला. डुप्ले त्याला दत्तक घेणार होता.

अभ्यास

१. युरोपियन लोक हिंदुस्थानाकडे कां येत ? वास्को-ड-गामाच्या शोधाचें महत्त्व सांगा.
२. पोर्तुगीजांच्या उत्कर्षापकर्षाचीं कारणें सांगा.
३. डच लोक कोण ? त्यांनीं कोठला व्यापार हस्तगत केला ? त्या बाब-तींत त्यांस कोणाबरोबर लढावें लागलें ? त्याचा परिणाम काय झाला ?
४. इंग्रजांच्या ई. इं. कंपनीची स्थापना केव्हां व कशाकरितां झाली ? तिचीं निरनिराळीं स्थित्यंतरें सांगा. कंपनीचा कारभार कोणाच्या हातीं होता ?
५. फ्रेंच ई. इं. कंपनीसंबंधीं तुम्हांस माहीत असलेली सर्व हकीकत सांगा.

उतारे

१. आमचे लोक व्यापाराच्या सौम्य उद्देशानें येत आहेत—१६००

एका देशानें दुसऱ्या देशाच्या उपयोगीं पडावें व एका देशांत जो जिन्नस विपुल पिकतो, त्यानें दुसऱ्या देशाची गरज भागावी, असा ईश्वरी उद्देश असल्यामुळेंच दूरदूरच्या अनेक देशांमध्यें व्यापाराची घडामोड चालते व मालाची देवघेव चालल्यानें, त्यांजमध्यें स्नेहभाव व प्रेम वाढत जातें......

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणीही परराष्ट्राचे लोक व्यापाराचा उद्देश मनांत धरून स्नेहभावानें व सौम्य वृत्तीनें आपल्या देशांत गेले असतां, आपण त्यांचा उत्तमप्रकारें आदर करतां. ह्यावरून आमच्या कित्येक व्यापाऱ्यांस आपल्या देशांत जाण्याची परवानगी देण्यास आम्हांस उमेद आली आहे. ......तेथें आपल्या लोकांशीं व्यापारी धोरणानें सौदा करावा, म्हणजे इकडचे जिन्नस त्यांस विकून तिकडचे इकडे विकत आणावे, असा ह्यांचा उद्देश आहे....बोलण्याचालण्यांत व व्यवहारांत ते चोख व सभ्य आहेत.......व ते आपल्या देशांत आल्याबद्दल आपणांस वाईट वाटण्याचें कारण राहणार नाहीं.......आमचे जे लोक केवळ व्यापाराच्या सौम्य उद्देशानें आपल्याकडे आज जात आहेत, त्यांस आपण मेहेरबानी करून आपल्या देशांत येऊं द्याल व व्यापाराचें व स्नेहाचें हें दळणवळण वृद्धिंगत कराल अशी आशा आहे. आमचें कांहीं व्यापारी आपल्या कृपाछत्राखालीं तेथेंच राहून तेथची भाषा वगैरे शिकतील; कीं जेणेंकरून एकमेकांचे विचार व रीतिरिवाज एकमेकांस कळल्यानें स्नेह वृद्धिंगत होऊन उभयतांचा उद्देश पार पडेल.......ह्यासाठीं हें पत्र घेऊन येणारे इसमास आमच्यातर्फे बोलणें व ठराव करण्यास आम्हीं संपूर्ण अधिकार दिला आहे.

—एलिझाबेथनें कंपनीस दिलेल्या सरपत्रावरून.

प्रश्न :—१. हें सरपत्र कोणीं कोणास दिलें? त्याचा उद्देश काय? इंग्रज इकडे कशाकरितां आले? येथें येऊन ते काय काय करणार होते? राणीनें इतकी गोड भाषा कां वापरली?

२. समुद्रावर व्यापार करणेंच योग्य—१६१६.

व्यापारासंबंधानें आपल्या मर्यादित इच्छा सफळ होण्यास अडचण नाहीं. आमची बादशहाजवळ चांगली पत आहे व आपल्या पाठिंब्याचा पुष्कळ उपयोग झाला. बरोबरीच्या नात्यानें बादशहाशीं आमचा तह होणें शक्य नाहीं. आपल्या-कडून योग्य नजराणे न आल्यानें माझी नाचक्की झाली आहे. तथापि थोडथोडा म्हणतांना माझ्या येण्याचा बराच फायदा झाला आहे. बाकी मोठ्या योग्यतेचा व दर्जाचा इंग्रज वकील ह्या दरबारीं राहण्याची आवश्यकता दिसत नाहीं. आम्ही मानपानास फार जपतों; वास्तविक ह्या दरबारास मानपान सोडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देणारा, हांजी हांजी करणाराच मनुष्य पाहिजे.......व्यापार व युद्ध ह्या गोष्टी परस्परविरोधी आहेत. पोर्तुगीज ह्या नादानें भिकेस लागले. ह्याचा नीट विचार करा. आपण असा नियम करून टाकावा कीं नफा मिळवावयाचा व झाला तर तो समुद्रावर शांतपणें व्यापार करूनच मिळवावयाचा. कारण कोणीं कुरापत काढिली नसतां तटबंदी व युद्धें करणें मोठी चूक आहे.

—टॉमस रोच्या इतिवृत्तावरून.

प्रश्न :—१. टॉमस रोनें कोणतें धोरण स्वीकारावयास सांगितलें ? कां ? त्याला वकील कसा पाहिजे होता ?

३. इंग्रजांचें व्यापारी धोरण सुटलें—१६८६.

आम्हांस जगाचा जो अनुभव आहे त्यावरून, असलें काम करणारास त्या त्या राष्ट्रांचे कायदेकानु व रीतिभाती माहीत पाहिजेत; तरच परकीय राजांशीं तह, युद्ध किंवा व्यापार हीं कामें त्यास करतां येतील. नुसतें लहानपणापासून सर्व आयुष्य हिंदुस्थानांत गेलें, किंवा तेथील भाषा शिकण्यांत फार दिवस घालविले, किंवा व्यापाराच्या उलाढाली समजून घेतल्या म्हणजे भागलें असें नाहीं. ...... आम्ही जेव्हां नुसतें व्यापाराच्याच मागें होतों, तेव्हां हे गुण कदाचित् पुरे झाले असते; पण हल्लीं आमच्या थोर राजांनीं आम्हांवर मेहेरबानी करून आम्हांस सनदा वगैरे देऊन आमची सत्ता व आमचे अधिकार वाढविले आहेत. आतां हिंदुस्थानांत राजाचीच योग्यता आमच्या अंगीं आली आहे. त्यामुळें आम्हांसही डचांप्रमाणें स्वतःचा बचाव, स्नेह्यांस मदत व शत्रूंस शिक्षा करणें प्राप्त झालें आहे.

—ई. इं. कंपनीचें विलायतेस पत्र.

प्रश्न :—१ या पत्रावरून कंपनीची महत्त्वाकांक्षा कोणती होती असें दिसतें ? कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५०. इंग्रज व फ्रेंच यांचा झगडा

१. इंग्रज-फ्रेंचांची चुरस :— हिंदुस्थानांत युरोपियनांचें आगमन झाल्यापासून येथें राज्यस्थापनेचा विचार त्यांच्या मनांत एकसारखा चालू होता. पोर्तुगीज व डच यांचे हेतु साध्य झाले नाहींत. तेव्हां इंग्रज व फ्रेंच पुढें सरसावले व त्यांनीं हिंदुस्थानांत राज्य स्थापण्याकरितां तयारी चालविली. प्रथमतः फ्रेंचांनीं प्रभूत पराक्रम करून आपलें वर्चस्व कर्नाटकांत वाढविलें. त्यामुळें इंग्रजांस त्यांच्याविषयीं बरेंपणा न राहून, ते त्यांच्याशीं दोन हात करण्यास सदैव तयार राहूं लागले. त्याचवेळीं इंग्रज-फ्रेंचांमध्यें युरोपांत तीव्रतर झगडा चालू होता व त्याचे प्रतिध्वनी बहुधा हिंदुस्थानांत उमटत. प्रत्येक वेळीं त्यामध्यें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें फ्रेंचांचें अंग पुष्कळ असे. मात्र युरोपांत तह झाला कीं, इकडे तह होई. कधीं कधीं येथील राजांच्या आपापसांतील कलहामुळेंही इंग्रज-फ्रेंचांची जुंपे. इंग्लिश व फ्रेंच यांच्यामधील हा झगडा बरींच वर्षें टिकला. त्याच्या बुडाशीं व्यापारी चुरस व साम्राज्य-विस्तार नेहमींच असे व त्यामुळें दोघेही निकरानें लढून अखेरी मारण्यास झटत. शेवटीं या झगड्यांत फ्रेंच नामोहरम व इंग्रज यशस्वी झाले. या तीव्रतर झगड्यांत जीं अनेक युद्धें झालीं त्यांतील खालील प्रमुख होत.

२. इंग्रज-फ्रेंचांची पहिली चकमक :— सन १७४० मध्यें युरोपांत ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध उत्पन्न झालें. त्या युद्धांत इंग्रज व फ्रेंच विरुद्ध बाजूनें लढत असल्यानें हिंदुस्थानांतही त्यांच्यांत युद्ध सुरू झालें. त्यावेळीं पांदिचरी येथें डुप्ले व लाबरडोने हे फ्रेंच अधिकारी मोठे समर्थ व सत्तावान होते. डुप्ले मोठा धोरणी व कारस्थानी पुरुष होता. त्याच्या सल्ल्यानेंच लाबरडोने यानें सन १७४६ मध्यें इंग्रजांचें मद्रास हें ठाणें घेतलें. इंग्रजांकडे त्यावेळीं कोणीही नाणावलेला सेनानी नव्हता. त्यामुळें मद्रासकर इंग्रजांचा पराभव होऊन अनेक इंग्रजांस कैदी म्हणून पांदिचरीस रहावें लागलें. पुढें फोर्ट सेंट डेव्हिडवर फ्रेंचांनीं हल्ला केला; पण तो फसला. नंतर इंग्रजांना इंग्लंडहून मदत आल्यावर त्यांनींही पांदिचरीवर उलट हल्ला केला; परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत त्यांना यश आलें नाहीं. या कटकटी चालू असतांच युरोपांत एला-शापेलचा तह होऊन युद्ध संपलें (१७४८). त्याबरोबर इंग्रज-फ्रेंचांमधील हें युद्धही संपलें. या युद्धाला कर्नाटकांतील पहिलें युद्ध (१७४४–४८) असें म्हणतात. यांत फ्रेंचांचा वरचष्मा राहिला.

३. इंग्रज-फ्रेंचांचें दुसरें युद्ध (१७४९–५५) :—वरील युद्ध थांबतें न थांबतें तोंच कर्नाटकांत युद्धाचे ढग पुन्हां जमूं लागले. सन १७४८ मध्यें हैदराबादचा निजामुल्मुल्क वारला. त्याला गाजीउद्दीन, नासिरजंग, सलाबतजंग, निजामअल्ली व इतर दोघे असे सहा मुलगे होते व मुजफरजंग हा मुलीकडील नातु होता. गाजीउद्दीन दिल्लीच्या बादशहाचा वजीर होता. तेव्हां आपल्या इतर मुलापेक्षां आपल्यामागें मुजफरजंगास आपली गादी मिळावी अशी निजामाची इच्छा होती. परंतु मुजफरजंगास दूर सारून नासिरजंग निजामीवर दाखल झाला. त्यामुळें मुजफरजंग व नासिरजंग यांच्यामध्यें गादीबद्दल तंटा उत्पन्न झाला. सन १७४९ मध्यें एका लढाईंत कर्नाटकचा नबाब अन्वरुद्दीन मारला गेला. त्याला मोहंमदअल्ली नामक मुलगा होता. त्याच सुमारास पूर्वीच्या एका नबाबाचा जांवई चंदासाहेब, याला डुप्लेनें मराठ्यांच्या कैदेंतून सात लाख रुपये दंड भरून सोडवून आणलें होतें. तेव्हां तो कर्नाटकच्या नबाबीवर आपला हक्क सांगूं लागला. त्यामुळें चंदासाहेब व मोहंमदअल्ली यांचा कर्नाटकच्या गादीबद्दल तंटा लागला. खरें पाहतां, मोहंमदअल्लीचा कर्नाटकच्या गादीवर हक्क नव्हता. कारण त्याच्या बापानें—अन्वरुद्दिनानें—ती गादी बळकावलेली होती. अर्थात मोहंमदअल्लीचा वारसा जोरकस नव्हता. तरीही इंग्रजांनीं त्याचाच पक्ष उचलून धरला. या दोन्ही तंट्यांचा फायदा करून घेण्याचें डुप्लेनें ठरविलें होतें. त्यामुळें त्यानें मुजफरजंग व चंदासाहेब यांचा पक्ष उचलून धरला. मुजफरजंग व चंदासाहेब यांचा स्नेह पूर्वीपासून होताच. त्याचप्रमाणें चंदासाहेब व डुप्ले यांचीही चांगलीच दोस्ती होती. चंदासाहेबास हातीं धरून प्रथम कर्नाटकांत व पुढें हिंदुस्थानांत फ्रेंचांचें राज्य स्थापण्याचा डुप्लेचा बेत होता. चंदासाहेब व मुजफरजंग यांचा पक्ष फ्रेंचांनीं उचललेला पाहून इंग्रजांनीं नासिरजंग व मोहंमदअल्ली यांचा पक्ष स्वीकारला. त्यामुळें युद्ध झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. फ्रेंचांची सरशी :— फ्रेंचांनीं मुजफरजंगास निजाम म्हणून व चंदासाहेबास कर्नाटकचा नबाब म्हणून मान्यता दिली. तेव्हां युद्धास सुरुवात



सलाबतजंगाचा दरबार

झाली. सन १७४९ मध्यें अंबूर येथें युद्ध होऊन नबाब अन्वरुद्दीन मारला गेला. तेव्हां मोहंमदअल्ली त्रिचनापल्लीस पळून गेला व तेथून त्यानें इंग्रजांची मदत मागितली. अंबूरच्या विजयानें चंदासाहेब व मुजफरजंग आनंदून जातात न जातात इतक्यांत नासिरजंग मराठ्यांच्या मदतीनें मुजफरजंगावर चाल करून गेला. त्यानें मुजफरजंगाचा पराभव करून मोहंमदअल्लीस कर्नाटकची नबाबी दिली. या विजयानंतर नासिरजंग परतत असतांच त्याच्या फौजेंत बंड होऊन नासिरजंग गोळी लागून मेला (१७५०). या घटनेमुळें मुजफरजंग व चंदासाहेब यांस जोर चढला. ते पांदिचरीस गेले. तेथें त्यांनीं मोठा दरबार भरविला व डुप्लेला कृष्णेच्या मुखापासून कन्याकुमारीपर्यंतच्या मुलुखाचा गव्हर्नर नेमलें. त्यानंतर मुजफरजंग हैदराबादेस जात असतांच तो सन १७५१ मध्यें मारला गेला. तेव्हां फ्रेंचांनीं कैदेंत असलेल्या सलाबतजंगास सोडून आणून त्याला निजाम केलें. त्यावेळीं फ्रेंचातर्फे बुसीनें त्याच्याकडून पूर्वींचे सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करार कायम करून घेतले. त्यामुळें फ्रेंचांची सरशी होऊन निजामाच्या दरबारीं त्यांचें प्रस्थ माजूं लागलें.

५. अर्काटचा वेढा (१७५१) :—चंदासाहेब व सलाबतजंग यांस आतां मोहंमदअल्ली हा एकच शत्रू राहिला होता. तेव्हां त्याचा पराभव करण्याकरितां डुप्लेच्या मदतीनें त्यांनीं त्रिचनापल्लीस वेढा दिला. तेव्हां त्रिचनापल्लीचा वेढा उठविणें इंग्रजांस भाग होतें. नाहींतर त्यांचा कर्नाटकांत पाडाव होऊन त्यांची बेअब्रू होण्याचा प्रसंग आला होता. मद्रासच्या गव्हर्नरला—सॉंडर्सला—इंग्रजांचें राज्य टिकविण्यास कांहींच मार्ग सांपडेना. तेव्हां मालाचीं पोतीं मोजणाऱ्या रॉबर्ट क्लाइव्ह या कंपनीच्या एका कारकुनानें एक युक्ति शोधून, गव्हर्नरच्या संमतीनें, ती स्वतःच तडीस नेली. अर्काट ही चंदासाहेबाची राजधानी होती. तेव्हां



लॉर्ड क्लाइव्ह

तिच्यावर हल्ला केल्यास चंदासाहेब त्रिचनापल्लीचा वेढा उठवून अर्काटच्या रक्षणाकरितां येईल; व मग अनायासें मोहंमदअल्ली व तेथें अडकलेले इंग्रज यांची सुटका होईल अशी त्याची कल्पना होती. त्याप्रमाणें क्लाइव्हनें ५०० लोकांच्या मदतीनें अर्काटवर हल्ला केला. त्याच्या अपेक्षेप्रमाणें चंदासाहेबाचा मुलगा राजासाहेब अर्काटच्या रक्षणार्थ धांवून आला. तेव्हां क्लाइव्हनें अर्काटचा किल्ला चांगलाच लढविला. याच सुमारास इंग्लंडहून कुमक आली. मुधोळच्या मुराररराव घोरपड्यानेंही क्लाइव्हला मदत केली. या बनावामुळें इंग्रजांचें पारडें चांगलेंच जड झालें. त्यामुळें पुढें झालेल्या कावेरीपाक, बाहूर वगैरे युद्धांत फ्रेंचांचा पराजय झाला. सन १७५२ मध्यें चंदासाहेबही मारला गेला. पुढेंही आणखी लढाया झाल्या. शेवटीं तह होऊन हें युद्ध संपलें. सर्व बाजू फ्रेंचांवर उलटल्यामुळें हुकमाशिवाय युद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केल्याचा ठपका ठेवून, फ्रेंच सरकारनें डुप्लेस परत बोलावलें. मोहंमदअल्ली कर्नाटकचा नबाब झाला व सलाबतजंग निजामीवर कायम झाला. कर्नाटकच्या दुसऱ्या युद्धांत इंग्रज-फ्रेंचांची एकंदरींत बरोबरी झाली.

६. डुप्लेची योग्यता :—डुप्ले हा अत्यंत धोरणी, राजकारणपटु, कोणत्याही प्रसंगीं न डगमगणारा, बुद्धीचा विशाल व कर्तृत्ववान होता. हिंदुस्थानांत राज्य स्थापण्याची कल्पना प्रथमतः त्यालाच सुचली. त्या कामीं त्यानें स्वतः जितका पैसा खर्चिला व आपलें जीवित जितकें खर्चिलें, तितक्या प्रमाणांत त्याला फ्रेंच सरकारनें मदत केली असती तर त्यानें हिंदुस्थानांत फ्रेंच राज्य स्थापण्यास कमी केलें नसतें. एतद्देशीयांस युरोपियनांसारखें लष्करी शिक्षण दिलें, तर ते युरोपियनांप्रमाणें उत्तम सैनिक होतील असें त्यास वाटे. एवढेंच नव्हे तर त्यांच्या मदतीनें हिंदुस्थानांत फ्रेंच राज्याची उभारणी करतां येईल अशी त्याची कल्पना होती. त्याच्या या कल्पनेस त्यानें थोडेंबहुत मूर्त स्वरूपही दिलें होतें. त्याचे सर्व बेत फसले, त्यास अतोनात कर्ज झालें व अंतःकाळीं त्यास हालांत दिवस काढावे लागले. यामुळें त्याची योग्यता कमी होत नाहीं. तो सन १७६४ मध्यें मृत्यु पावला.

७. कर्नाटकांतील तिसरें युद्ध (१७५६–६३) :—दुसरें युद्ध थांबलें तरी इंग्रज–फ्रेंचांतील धुसफूस व स्पर्धा नामशेष झालेली नव्हती. तशांतच सन १७५६ मध्यें युरोपांत सप्तवार्षिक युद्ध सुरू होऊन इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांमध्यें युद्ध सुरू झालें. तेव्हां हिंदुस्थानांतही इंग्रज-फ्रेंचांत युद्ध सुरू झालें. दुसऱ्या युद्धांत अनेक विजय मिळवून सन १७५३ मध्यें क्लाइव्ह इंग्लंडांत गेला होता. तो मोठ्या फौजेसह मद्रासचा गव्हर्नर होऊन सन १७५६ मध्यें परतला होता. त्याचप्रमाणें सन १७५८ मध्यें काउंट लाली हा फ्रेंचांचा गव्हर्नर होऊन मोठ्या आरमारासह हिंदुस्थानांत आला होता. लाली उतावळा होता. मुत्सद्देगिरी त्याजपाशीं नव्हती. येतां क्षणींच त्यानें बुसीला निजामाच्या दरबारांतून परत बोलाविलें. ही त्याची चूक झाली. कारण त्यामुळें निजामाच्या दरबारीं असलेलें फ्रेंचांचें वर्चस्व नष्ट होऊन तेथें इंग्रजांचें वजन स्थापन होण्यास मदत झाली. यानंतर लालीनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकदम फोर्ट सेंट डेव्हिडवर हल्ला करून तो किल्ला घेतला. पुढें मात्र इंग्रजांनीं त्याला सळो कीं पळो केलें. सलाबतजंगानें त्याच वेळीं मदत



मागितली. ती लालीला त्यास देतां आली नाहीं. यामुळें इंग्रजांकडे त्यानें मदतीची याचना केली. तेव्हां निजामाकडून उत्तरसरकारप्रांत घेऊन इंग्रजांनीं ती त्याला दिली. पुढें इंग्रज सेनानी कर्नल कूट यानें वांदिवॉश मुक्कामीं फ्रेंचांचा पूर्ण पराभव केला (१७६०). पांदिचरीही फ्रेंचांच्या हातची गेली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां लालीस फ्रेंच सरकारनें परत बोलावलें. फ्रान्समध्यें त्याला देहान्त शिक्षा देण्यांत आली. ती कळतांच त्यानें आत्महत्या केली (१७६६). वांदिवॉशच्या विजयानें फ्रेंचांची हिंदुस्थानांतील सत्ता नामशेष झाली. पुढें सन १७६३ मध्यें पॅरिस येथें तह होऊन सप्तवार्षिक युद्ध संपलें. त्यामुळें हेंही युद्ध खलास झालें.

८. फ्रेंचांच्या नाशाचीं कारणें :—वांदिवॉशच्या पराभवानें हिंदुस्थानांतील फ्रेंच सत्ता नामशेष झाली. त्याला अनेक कारणें झालीं. त्यांतील कांहीं खालीं दिलीं आहेत. (१) लालीसारख्या तापट व नालायक अधिकाऱ्याच्या हातीं सत्ता गेल्यानें फ्रेंचांचा नाश लौकर झाला. बुसीला त्यानें परत बोलाविलें ही त्याची घोडचूक झाली. (२) फ्रेंच अधिकारी आपापसांत भांडत॰ त्यांच्यांत एकी नसे. (३) फ्रेंचांचें आरमार अत्यंत कमी प्रतीचें होतें. त्यामुळें फ्रान्सकडून त्यांस वेळेवर मदत मिळाली नाहीं. शिवाय ब्रिटिश आरमाराशींही त्याला टक्कर देतां आली नाहीं. (४) फ्रेंच सरकारचा ओढा युरोपियन राजकारणाकडे होता. त्यामुळें फ्रेंच कंपनीला त्या सरकारकडून योग्य वेळीं मदत मिळाली नाहीं. (५) फ्रेंच कंपनीची अंतर्व्यवस्था नीट नव्हती. त्यामुळें तिला नेहमीं पैशाची टंचाई भासे. अर्थात इंग्रजांशीं तिला योग्यतऱ्हेनें सामना देतां आला नाहीं. (६) फ्रेंचांनीं आपलें सर्व लक्ष राज्यवृद्धीकडे लावून व्यापाराकडे दुर्लक्ष केलें. यामुळें त्यांचा व्यापार बसला व राज्यकारभार व राज्यवृद्धि यांस लागणारा पैसा त्यांस इकडे उभा करतां आला नाहीं. (७) डुप्लेला ऐन वेळीं हिंदुस्थानांतून परत बोलावल्यामुळेंही फ्रेंचांचें अत्यंत नुकसान झालें. फ्रेंच सत्तेचा शेवट झाल्यानें हिंदुस्थानांत इंग्रजांस एकही युरोपियन प्रतिस्पर्धी उरला नाहीं. तशांतच सन १७६१ मध्यें मराठ्यांचा पानिपतीं मोड झाल्यानें इंग्रजांना आपली सत्ता वाढविण्यास मोकळीक मिळाली. वांदिवॉशची लढाई झाल्यावर बहुतेक मद्रास प्रांत त्यांच्या ताब्यांत आला. त्याच्या आधींच सन १७५७ मध्यें प्लासीच्या विजयानें बंगाल्यांत इंग्रजांचें आसन स्थिर झालें होतें व तो प्रांत मिळवून घेण्याकडे त्यांची दृष्टि लागली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. इंग्रज व फ्रेंच यांच्यामध्यें लढा कां उत्पन्न झाला ? त्याचा परिणाम काय झाला ?
२. फ्रेंचांच्या नाशाचीं कारणें द्या. इंग्रजांस यश कां मिळालें ?
३. डुप्लेचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा.
४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
लाली, बुसी, डुप्ले, क्लाइव्ह, मुरारराव घोरपडे, चंदासाहेब, मुजफरजंग, नासिरजंग, अन्वरुद्दीन, वांदिवॉश, मोहंमदअली, सेंट डेव्हिड.
५. पुढील सन घेऊन इंग्रज-मराठ्यांचा व इंग्लंडचा एक समकालीन कालादर्श तयार करा. १७४०, १७४८, १७४९, १७५१, १७५६, १७५७, १७६०, १७६५, १७७३.

उतारा

१. डुप्लेचे अंतःकाळचे विचार—१७६४.

स्वराष्ट्राच्या फायद्याकरितां माझें तारुण्य, माझी धनदौलत व माझें सर्व जीवित मीं खर्च केलें; माझ्यावर भरंवसा टाकून माझे अनेक नातेवाईक व स्नेही माझ्यासारखेच भिकेस लागले. ते आज अत्यंत विपत्तींत काळ घालवीत आहेत. माझ्या कर्जाचे रोखे मी सर्व अधिकाऱ्यांस जाहीर केले, पण माझी दाद कोणीच घेत नाहींत. मी केलेलीं कामें सर्वांस खोटींच वाटतात व माझी मागणी पोरखेळाप्रमाणें समजतात. अत्यंत हलकट मनुष्यासही असें कोणीं वागविलें नसेल. माझी आज अतिशय अपेष्टा होत आहे. घरांत थोडेंबहुत कांहीं होतें तेंही सर्व सरकारनें जप्त केलें आहे. तुरुंगांत जाण्याची पाळी येऊं नये म्हणून दारोदार हिंडून मुदती मागण्याची मला पाळी आली आहे !

प्रश्न :—१. डुप्लेवर कोणती पाळी आली ? कां ? त्यानें स्वराष्ट्राकरितां कोणता स्वार्थत्याग केला ? कां ? त्याचें चीज कां झालें नाहीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५१. इंग्रजांस बंगालची प्राप्ति

१. बंगालचा नबाब सिराजउद्दौला :— औरंगजेबाचे वेळीं मुर्शिदकुलीखान बंगालचा सुभेदार होता. तो त्याच्यानंतर बहुतेक स्वतंत्र झाला. त्याचें इंग्रजांशीं पटत नसे. परंतु फर्रुखसियरला डॉ. हॅमिस्टन या इंग्रजानें दुखण्यांतून बरें केल्यानें इंग्रजांस बंगाल्यांत बऱ्याच सवलती मिळाल्या. त्या मुर्शिदकुलीखानास मान्य कराव्या लागल्या. पुढें मुर्शिदकुलीखान सन १७२५ मध्यें वारला. त्याच्यानंतर अलिवर्दीखान बंगालचा सुभेदार झाला. तोही स्वतंत्रपणें बंगालचा कारभार करीत असे. तो सन १७५६ मध्यें वारला. तेव्हां त्याच्या इच्छेप्रमाणें त्याच्या मुलीचा चोवीस वर्षांचा मुलगा सिराजउद्दौला बंगालचा नबाब झाला. मृत्यूच्या मांडीवर असतांना अलिवर्दीखानानें सिराजला जो उपदेश केला तो मोठा मार्मिक आहे. तो म्हणतो, "युरोपियनांनीं आपली सत्ता येथें बसविण्याकरितां जे प्रयत्न चालविलेले आहेत त्यांकडे दुर्लक्ष करूं नकोस. आपापसांत झगडून ज्यांनीं बादशाहीचे तुकडे केले आहेत, त्या सर्वांना एकदम नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न करूं नकोस. त्यांतल्यात्यांत इंग्रजांची सत्ता अधिक आहे. आंग्र्यांचा त्यांनीं नुकतांच पराभव केला आहे. प्रथम त्यांची सत्ता हाणून पाड; बाकीचे डोईजड होणार नाहींत. इंग्रजांस कोणत्याही सवलती देऊं नकोस. त्या दिल्यास तर तुझ्या देशाचें व राज्याचें वाटोळें होईल हें लक्षांत ठेव." अर्थात हा उपदेश लक्षांत घेऊन सिराजनें वागण्याचें ठरविलें होतें. इंग्रजांस सैन्य मना करावें व त्यांस तटबंदी बांधूं देऊं नये असें त्यानें ठरविलें होतें. इंग्रजांस बंगालमधून हुसकून द्यावें असाही त्याचा विचार होता. तो बंगालचा नबाब झाला त्याचवेळीं डाक्क्याचा सुभेदार राजवल्लभ यानें आपला मुलगा किसनदास याला आपल्या सर्व खजिन्यासह इंग्रजांच्या आश्रयास कलकत्त्यास पाठवून दिलें. ही गोष्ट सिराजला पसंत पडली नाहीं व त्यानें किसनदासास आपल्याकडे पाठविण्यास इंग्रजांस सांगितलें. परंतु इंग्रजांनीं ती गोष्ट नाकारली. याचवेळीं फ्रेंचांशीं युद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणार या भीतीनें इंग्रजांनीं कलकत्त्याच्या किल्ल्यास नवी तटबंदी केली. तीही पाडून टाकावी असा त्यानें त्यांस हुकूम केला. आम्हीं नवीन कांहींच केलें नाहीं, फक्त जुनी तटबंदी दुरुस्त केली, असें इंग्रजांनीं सिराजला कळविलें.

२. इंग्रजांशीं युद्ध (१७५६):—सर्व गोष्टी सामोपचारानें मिटविण्याचा सिराजनें प्रयत्न केला. तरीही इंग्रजांनीं बेगुमानपणें उत्तरें दिलेलीं पाहून सिराज रागावला व त्यानें कलकत्त्यावर स्वारी केली. कासीमबझार येथील वखार त्यानें लुटली. त्यावेळीं कलकत्त्यास ड्रेक हा इंग्रजांचा गव्हर्नर होता. नबाबाचा हल्ला आला असें कळतांच तो व इतर लोक बोटींत बसून पळून गेले. ज्यांना तसें करतां येणें अशक्य होतें त्या १४६ लोकांनीं हॉलवेलकडे आपलें नेतृत्व सोपविलें व आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून ते सर्व इंग्रज नबाबास शरण गेले. तेव्हां त्यांस अभय देऊन सिराजनें किल्ल्याचा व इंग्रजांच्या खजिन्याचा ताबा घेतला. त्यावेळीं पळून गेलेले सर्व इंग्रज लोक फुल्टा येथें जाऊन राहिले होते. नबाबाच्या ताब्यांत असलेल्या लोकांपैकीं कांहीं लोक मरण पावले. त्या सर्वांस नबाबाच्या अधिकाऱ्यांनीं एका अंधार कोठडींत ठेवल्याची व त्यांस अभूतपूर्व त्रास दिल्याची अद्भुतरम्य कथा अतिशयोक्तीची आहे असें कांहीं लोक म्हणतात. (पहा—मेजर बसूकृत ‘ख्रिस्ती लोकांचा उत्कर्ष’). कलकत्त्याच्या पाडावाची हकीकत मद्रासला कळली. तेव्हां क्लाइव्ह व वॉटसन यांची कलकत्त्याकडे रवानगी झाली.

३. प्लासीची लढाई (१७५७):—क्लाइव्ह व वॉटसन यांच्याबरोबर सुमारें २५०० सैनिक होते. आल्याबरोबर त्यांनीं प्रथमतः कलकत्ता जिंकून घेतलें. त्यामुळें सिराजनेंही इंग्रजांवर पुन्हां हल्ला केला; परंतु त्याचा पराभव झाला. तेव्हां त्यानें इंग्रजांशीं तह केला. परंतु यानंतरच्या काळांत दोघांनींही एकमेकांविरुद्ध कट करण्यास सुरुवात केली. फ्रेंचांची मदत आपल्याला मिळावी असा सिराजनें प्रयत्न चालविला. त्यावेळीं इंग्रज-फ्रेंचांचें युद्ध चालू होतें. तेव्हां कलकत्त्याजवळील चंद्रनगर हें फ्रेंच ठाणें क्लाइव्हनें प्रथमतः काबीज करून घेतलें. पुढें तो सिराजविरुद्ध कट करण्यांत गुंतला. सिराजचा सेनापति मीरजाफर याला अलिवर्दीखानाची बहीण दिलेली होती. त्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिराजशीं पटत नव्हतें. तेव्हां त्याला हाताशीं धरून सिराजचा मोड करण्याचें क्लाइव्हनें ठरविलें. सिराज आपल्या प्रजेलाही आवडत नव्हता. तेव्हां



प्लासीचा सामरिक नकाशा

क्लाइव्हनें मीरजाफरशीं कारस्थान ठरविलें. सिराजवर इंग्रज फौज चालून गेली म्हणजे सेनापति मीरजाफर यानें आपल्या सर्व सैन्यासह इंग्रजांस मिळावें व सिराजनंतर बंगालची नवाबी इंग्राजांनीं मीरजाफरला द्यावी, असें तें कारस्थान होतें. हें कारस्थान मुर्शिदाबादच्या अमीरचंद या हिंदु सावकारास माहीत होतें. तेव्हां तें गुप्त राखण्याकरितां त्यानें क्लाइव्हजवळ तीस लाख रुपये व लढाईनंतरच्या सर्व लुटीपैकीं शेंकडा पांच टक्के हिस्सा व हिरे-माणकांचाही वांटा मागितला. तेव्हां न डगमगतां क्लाइव्हनें त्याला फसविण्याचें ठरविलें. वरील मागणीस मान्यता देणारे पांढरा व तांबडा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे दोन कागद त्यानें तयार केले. पांढरा खरा होता व तांबडा खोटा होता. त्या खोट्या कागदांतच क्लाइव्हनें त्याची मागणी मान्य असल्याचें



प्लासीच्या विजयाचा स्मारकस्तंभ

लिहिलें होतें. त्या खोट्या कागदावर क्लाइव्हनें आपला मदतनीस वॉटसन याची सही मागितली. ती त्यानें दिली नाहीं. तेव्हां क्लाइव्हनें लॅशिंग्टन या एका दुय्यम अधिकाऱ्याकडून वॉटसनच्या सहीसारखी सही करून घेतली! तो कागद खरा आहे असें अमीरचंदास वाटलें व त्यानें त्याचें समाधान झालें. पुढें सन १७५७ मध्यें इंग्रज सिराजवर चालून गेले. ती बातमी ऐकून नबाब घाबरून प्लासी येथें गेला. परंतु मीरजाफरनें त्यास लढाई करण्यास भर दिली. त्याच्या सांगण्यावर विश्वासून सिराजनें इंग्रजांवर चाल केली. लढाई सुरू होतांच ठरल्याप्रमाणें मीरजाफर आपल्या फौजेसह रणांगण सोडून निघून गेला. त्यामुळें सिराज घाबरला. तेव्हां इंग्रजांनीं त्याच्यावर हल्ला करतांच तोही पळूं लागला. पुढें त्याला मीर जाफरचा मुलगा मीरन यानें पकडून ठार मारलें (१७५७).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. प्लासीच्या लढाईचे परिणाम :— प्लासी येथें म्हणण्यासारखी लढाई झालीच नाहीं. त्यामुळें लष्करीदृष्ट्या तिला फारसें महत्त्व नाहीं. मात्र इंग्रजांनीं ती लढाई जिंकल्यानें बंगालमध्यें राज्यक्रांति होऊन बंगाल प्रांतांत इंग्रजी राज्यसत्तेचा पाया घातला गेला. या राजकीय गोष्टीमुळेंच प्लासीची लढाई अत्यंत महत्त्वाची समजली जाते. या लढाईनें बंगालचा नबाब इंग्रजांच्या अंकित झाला. त्यामुळें बंगाल प्रांत इंग्रजांच्या ताब्यांत गेला. पुढें वांदिवॉशच्या लढाईनंतर हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावरून फ्रेंचांचें कायमचें उच्चाटण होऊन सर्व पूर्व किनारा इंग्रजांच्या ताब्यांत गेला. प्लासीच्या लढाईनंतर क्लाइव्हनें कर्नल फोर्डला सैन्यासह पाठवून फ्रेंचांचा उत्तरसरकारप्रांत जिंकून घेतला. यामुळें पूर्वेकडे इंग्रजांचें आसन स्थिर झालें.

प्लासीच्या लढाईनंतर क्लाइव्हनें मीरजाफर यास बंगालच्या नबाबीवर स्थापन केलें. तेव्हां मोठा समारंभ होऊन बक्षिसांची वांटणी झाली. क्लाइव्हनें स्वतःच्या मेहेनतीकरितां तीस लक्ष रुपये घेतले. शिवाय मीरजाफरनें त्याला तीन लक्षांची जहागीर दिली. कंपनीस मीरजाफरनें एक कोट रुपये द्यावे असें ठरलें होतें. एवढी रक्कम खजिन्यांत नव्हती. तेव्हां त्यानें आपलें जड-जवाहीर विकून ९५ लक्षांची भर केली. राहिलेल्या पांच लक्षांकरितां कलकत्त्याजवळील दहा लक्षांचा मुलूख त्यानें कंपनीस दिला. इतर इंग्रज अधिकाऱ्यांसही नबाबानें बक्षिसें दिलीं. अमीरचंद या समारंभास हजर होता. त्यास 'तुला कांहींही मिळणार नाहीं' असें क्लाइव्हनें सांगितलें. 'तुला दाखविलेला कागद खोटा होता' असें सांगण्यासही क्लाइव्ह कचरला नाहीं. यामुळें त्याला मोठाच धक्का बसला. परंतु पुढें त्यानें आपला व्यापार मोठ्या धैर्यानें व योग्यरीतीनें चालविला होता. क्लाइव्हनें केलेल्या या लुच्चेगिरीबद्दल त्याला कांहींही वाटलें नाहीं! आपल्या या निंद्य कृतीचें खंडण न करतां तो म्हणाला कीं 'पुनः जरूर पडल्यास शंभर वेळांही मी तसें करीन!' यावरून क्लाइव्हच्या स्वभावाची चुणुक कळून येण्यासारखी आहे.

५. मीरजाफर व क्लाइव्ह :— मीरजाफरच्या अंगीं राज्यकर्त्याचे कोणतेच गुण नव्हते. तो अत्यंत विषयलंपट होता. आलेल्या अडचणींशीं तोंड देण्यास तो असमर्थ होता. मात्र इंग्रज डोईजड झालेले त्यास पहावेना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण नोकर व ते मालक ही भावना त्याला नेहमीं त्रास देई. तेव्हां त्यानें डचांची मदत मिळविण्याचा प्रयत्न चालविला. ही गोष्ट कळतांच क्लाइव्हनें डचांचें चिनसुरा हें हुगळीजवळील ठाणें हस्तगत केलें (१७५९). या सुमारास दिल्लीचा बादशाह शाहाआलम व अयोध्येचा वजीर सुजा-उद्दौला यांनीं बंगालवर सत्ता स्थापण्याकरितां पाटण्यावर स्वारी केली. रामनारायण हा पाटण्यास मीरजाफरचा अंमलदार होता. त्यानें शहराचा बचाव केला. पुढें क्लाइव्हनें त्याला मदत पाठविली व मीरजाफराकडून बादशहास कांहीं पैसे देववून त्याला वाटेस लाविलें. यावेळीं बंगाल्यांत कंपनीनें आपलें राज्य जाहीर करावें असें क्लाइव्हला वाटूं लागलें व त्याप्रमाणें त्यानें विलायतेंत एक पत्रही लिहिलें. पुढें त्या बाबतींत खटपट करण्याकरितां तो स्वतः विलायतेस निघून गेला. त्याच्या गैरहजेरींत व्हॅन्सिटार्ट हा बंगालचा गव्हर्नर झाला. विलायतेंत गेल्यावर राजाकडून क्लाइव्हला सरदारी मिळाली.

६. मीरकासीमास नवाबी :—व्हॅन्सिटार्ट सरळ स्वभावाचा होता; परंतु त्याच्या कारकीर्दींत सर्वत्र अव्यवस्था माजली. कंपनीच्या लोकांनीं स्वतः द्रव्य मिळविण्याकरितां अनेक युक्त्या योजिल्या. त्यामुळें नवाबाची प्रजा गांजून गेली. याचवेळीं मीरजाफरविरुद्ध अनेक कागाळ्या व्हॅन्सिटार्टकडे गेल्या. तेव्हां त्यानें चौकशी करून त्याला काढून टाकलें व त्याचा जांवई मीरकासीम याला बंगालचा नबाब केलें. यावेळीं कंपनीचा चांगला फायदा झाला. कारण कासीमनें बरद्वान, मिदनापूर, चितगांव हे ५० लक्षांचे जिल्हे इंग्रजांस दिले (१७६१). याच सुमारास बादशहानें बंगालवर पुन्हां स्वारी केली; परंतु इंग्रजांच्या मदतीनें मीरकासीमनें त्याचा पराभव केला. पराभवानंतर बादशहानें मीरकासीमास नबाबाचीं वस्त्रें दिलीं.

७. मीरकासीमशीं बेबनाव :—मीरकासीम फार धूर्त, बुद्धिमान व गुणी होता. त्यामुळें त्याची कारकीर्द चांगली होणार असें वाटत होतें. परंतु एकंदर परिस्थिति त्याला फारशी अनुकूल नव्हती. इंग्रजांच्या हातचें बाहुलें होऊन राहणें त्याला आवडत नसे. तेव्हां अंतस्थपणें तो आपली शक्ति वाढवूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागला. प्रथमतः मुर्शिदाबाद ही आपली राजधानी त्यानें बदलली व त्याकरितां दूरचें मोंगीर हें शहर पसंत केलें. युरोपियन पद्धतीवर त्यानें उत्तम कवायिती सैन्य निर्माण करून तोफा व बंदुका तयार करण्याचे कारखानेही काढले. याचवेळीं व्यापारावरील जकातीसंबंधीं तंटा लागला. दरवर्षी तीन हजार रुपये देऊन कंपनीला सर्वत्र जकात माफ होती, नोकरांच्या खाजगी व्यापाराला नव्हती. परंतु ते सर्व नोकर आपल्या खाजगी व्यापारावरही जकातीची माफी मिळवूं लागले. आपल्या खाजगी बोटीवर कंपनीचें निशाण फडकवत ठेवावें व तें जहाज कंपनीचें आहे असें दर्शवून जकातीची माफी मिळवावी, असा त्यांचा नेहमींचाच धंदा होऊन बसला होता. एवढेंच नव्हे तर हे लोक एतद्देशी-यांसही जकात-माफीचे पास विकूं लागले होते. यामुळें नबाबास जकातीचें उत्पन्न मिळेनासें झालें. तेव्हां त्यानें कलकत्त्यास इंग्रजांकडे तक्रार केली. परंतु त्याचें म्हणणें कोणींही मान्य केलें नाहीं. तेव्हां मीरकासीमनें सर्वांसच जकात माफ केली. त्याच्या या हुकुमानें अगोदर बसलेला एतद्देशीयांचा व्यापार, एकदम पुढारला व इंग्रजांचा खाजगी व्यापार बसला. तेव्हां जकात माफ करण्याचा अधिकारच नबाबास नाहीं असें इंग्रज म्हणूं लागले. तें मीरकासीम मान्य करीना. तेव्हां दोन्ही पक्ष अटीतटीला पडल्यानें युद्धापूर्वीचीं वादळें जमूं लागलीं.

८. **पाटण्याची कत्तल** (१७६३):—सर्व प्रकरण हातघाईवर आलें असें पाहून पाटण्याचा रेसिडेंट एलिस यानें पाटण्यास वेढा दिला. ही बातमी नबाबास कळली. तेव्हां कलकत्त्याहून हत्यारांनीं भरलेलीं कांहीं जहाजें पाटण्यास जात होतीं तीं मोंगीर येथें त्यानें पकडलीं. एलिसला स्वाधीन करीत असाल तर जहाजें सोडतों असें तो म्हणूं लागला. शिवाय त्यानें सांपडतील त्या सर्व इंग्रजांस पकडण्याचाही हुकूम दिला. ही बातमी कळतांच मीरकासीमला पदच्युत करण्यांत येऊन मीरजाफरला पुन्हां नबाबी देण्यांत आली. पुढें मीरकासीम व इंग्रज यांच्यांत युद्ध होऊन, मीरकासीमचा पराभव झाला. पळत असतांच सर्व इंग्रज कैदी त्यानें आपल्याबरोबर बाळगले होते. त्यांची कत्तल करण्याचा त्यानें हुकूम दिला. त्याप्रमाणें वॉल्टर रेन्हार्ट ऊर्फ सुमरू यानें पाटण्यास १५० इंग्रज कैद्यांची कत्तल केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. बक्सारची लढाई (१७६४) :—पुढें मीरकासीम अयोध्येच्या वजीराकडे गेला. अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला व बादशाह शाहाआलम यांनीं त्याला मदत देण्याचें आश्वासन दिलें. त्याप्रमाणें त्यांचीं सैन्यें इंग्रजांवर चालून गेलीं. इंग्रज सेनेचा हेक्टर मन्रो हा सेनापति होता. दोन्ही सैन्यांची बक्सार येथें गांठ पडून मोठी दंगल माजली. या लढाईत इंग्रजांस जय मिळाला; व मीरकासीम, बादशाह व अयोध्येचा वजीर या त्रिवर्गांचा पराभव झाला. त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत इंग्रजांची सत्ता श्रेष्ठ ठरली. शाहाआलम बादशाह इंग्रजांच्या आश्रयास आल्यानें इंग्रजांचें महत्त्व वाढलें. बंगाल व बिहार प्रांतांवरील इंग्रजांचा लष्करी अंमल दृढ झाला. त्यामुळें सुजाउद्दौल्याचा मुलुखही इंग्रजांच्या काबूंत आला. मीरकासीम पुढें भटकत राहिला व सन १७७७ मध्यें मरण पावला.



बक्सारच्या युद्धाचा स्मारकस्तंभ

अभ्यास

१. प्लासीच्या लढाईचीं कारणें व परिणाम सांगा.

२. मीरकासीम व इंग्रज यांचा बेबनाव होण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. अमीरचंद व क्लाइव्ह यांच्यांत जो करार झाला त्यावेळीं व त्यानंतर बक्षिसाच्या वेळीं त्या दोघांमध्यें जीं संभाषणें होतील तीं लिहा.

४. इंग्रजांस बंगाल प्रांत कसा मिळाला तें थोडक्यांत सांगा.

५. टीपा लिहा—

मीरजाफर, अलिवर्दीखान, मुर्शिदकुलीखान, सिराजउद्दौला, बक्सारची लढाई, प्लासीची लढाई, कलकत्त्याची अंधार कोठडी.

इतिहास व्यवसाय

कलकत्त्याची अंधारकोठडी झाली कीं नाहीं ?

झाली नाहीं

१. ज्या कोठडींत १४६ लोकांस ठेवलें होतें असें म्हणतात, तिची लांबी-रुंदी नक्की किती होती हें कोणालाच सांगतां येत नाहीं. कांहींच्या मतें ती १६ × १६ होती. डॉ. विल्सनच्या मतें ती १८ × १४ फू. १० इं. होती. कोणतेंही मत खरें धरलें तरी त्या खोलींत १४६ लोक मावणेंच अशक्य. कारण एका माणसास निदान ३ चौरस फूट जागा धरल्यास एकंदर जागा कमीत कमी ४३८ चौ. फू. पाहिजे. वरील दोन्हीं मापांप्रमाणें ती खोली अत्यंत लहान होती हेंच सिद्ध होतें. मग त्या १४६ लोकांपैकीं कांहीं लोक एकमेकांवर लोळत असल्यास न कळे !

झाली

१. या प्रकरणांत एकंदर लोक किती मेले हेंच मुळीं अजून नक्की समजत नाहीं. तेव्हां ते १४६ होते असें कसें समजावयाचें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. त्या वेळच्या मुसलमानी ऐतिहासिक ग्रंथांत या गोष्टीचा उल्लेखही आढळत नाहीं.	२. ही गोष्ट अत्यंत साहजिक आहे.
३. क्लाइव्ह व वॅाटसन यांनीं त्यावेळीं जीं पत्रें लिहिलीं त्यांतही या प्रकरणाचा उल्लेख नाहीं! क्लाइव्हसारख्यानें याचा अनुल्लेख करावा हें मोठें आश्चर्य होय !!	३. क्लाइव्ह व वॅाटसन यांनीं कांहीं ठिकाणीं तसा उल्लेख केलेला आहे. वॅाटसननें त्या प्रकरणानंतर जी लढाई पुकारली तिचें हें प्रकरण एक कारण म्हणून सांगितलें आहे.
४. मद्रासच्या कौन्सिलच्या सभेच्या इतिवृत्तांत याला स्थान नाहीं. कलकत्त्याच्या इतिवृत्तांतही हें प्रकरण नाहीं.	४. कलकत्त्याच्या इतिवृत्तांत तसा उल्लेख नसणें साहजिक आहे.
५. या प्रकरणाचा मुख्य उत्पादक हॅालवेल होय. परंतु त्यानें सन १७६० मध्यें सिलेक्ट कमेटीमुढें जी साक्ष दिली, त्यावेळीं अंधार कोठडीचा नुसता उल्लेखही त्यानें केला नाहीं. शिवाय त्याचा स्वभाव व त्याचें चारित्र्य त्याच्या शब्दावर विश्वास ठेवूं देत नाहींत. त्याचें वर्णन अतिरंजित आहे.	५. तत्कालीन लोकांत हॅालवेलचे अनेक शत्रू होते. त्यांनीं हॅालवेलनें अंधारकोठडीचें जें वृत्त दिलें त्यावर कोणत्याही रीतीची बरीवाईट टीका केलेली नाहीं. तेव्हां त्यांस ती गोष्ट पटलेली असावी.
६. क्लाइव्हनें मीरजाफरशीं जें कारस्थान केलें, त्यांत सर्व प्रकारच्या लहानमोठ्या गोष्टींबद्दल नुकसानभरपाई मागितली; परंतु अंधारकोठडींत सांपडलेल्या इंग्रजांच्या नातेवाईकांस देण्याकरितां त्यानें भरपाई मागितलेली आढळत नाहीं.	६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. अंधारकोठडींत जे लोक मेले असें मानण्यांत येतें तें खरें पाहतां, लढाईच्या वेळीं त्या ठिकाणाला जी आग लावण्यांत आली तींत सांपडून मेले.

७.

८. जे. एच. लिटल, बी. डी. बसू वगैरे लोक वरील मताचे आहेत.

८. केंब्रिज हिस्टरी भाग ४ मध्यें वरील मतें दर्शविलीं आहेत.

उतारे

१. मीरकासीमशीं जकातीचा तंटा—१७६३.

कंपनीनें येथें कारभार करावा असें पूर्वीं ठरलें आहे; परंतु या व्यापाराव्यतिरिक्त कंपनीचे गुमास्ते मीठ, तंबाखू, बोंबील, साग वगैरे माल या प्रांतांतील लोकांपासून जबरदस्तीनें घेतात. अर्थात त्यामुळें भांडणें व मारामाऱ्या यांना ऊत येऊन माझ्या अधिकाऱ्यांशीं त्यांनीं अतिप्रसंगही केले. यामुळें माझ्या गरीब प्रजेला, व्यापाऱ्यांना व कारखानदारांसही त्रास होऊं लागला व तुम्हांस व मलाही त्याचा उपसर्ग पोचूं लागला. अशातऱ्हेनें आपल्या व्यापारी कराराचा भंग करून तुमच्या गुमास्त्यांनीं वरील वस्तूंचा व्यापार कां करावा हें मला समजत नाहीं. बरें, असा व्यापार करून आमचे करही त्यांनीं देऊं नये अशी तुमची इच्छा आहे कीं काय ? तसें असेल तर राज्यकारभाराकरितां लागणारा पैसा मी कसा व कोठून खर्चावा ?

(याचें सरळ उत्तर आलें नाहीं व इंग्रज आपला हट्ट सोडीनात. तेव्हां)

तुमच्या गुमास्त्यांच्या जबरदस्तीमुळें जकातीपासून मला एका पैचेंही उत्पन्न मिळालें नाहीं. उलट तुमच्या संरक्षणाखालीं ते आपला व्यापार जकाती न देतां करीतच आहेत...अशा स्थितींत (कोणापासूनही) जकात घेऊं नये असें मी ठरविलें आहे व ठिकठिकाणच्या चौक्याही उठविल्या आहेत. माझे नोकर जर जकाती घेऊं लागले तर मी त्यांस शिक्षा करीन.

—मीरकासीमचीं इंग्रजांस पत्रें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नबाबाचें हें धोरण योग्य आहे असें कलकत्याचा गव्हर्नर व्हॅन्सिटार्ट व हेस्टिंग्ज यांस वाटत होतें. त्यांचें म्हणणें असें. "कौन्सिलचा निर्णय कळल्यावर नबाबानें सर्व जकाती रद्द करून सर्व व्यापार खुला करण्याचें धोरण जाहीर केलें आहे. त्या बाबतींत त्याला दोष देतां येत नाहीं. त्यानें असें केलें नसतें तरच आश्चर्य! कारण आमच्या नोकरांनीं जकातींविरहित व्यापार करावा व त्याच्या राज्यांतील व्यापाऱ्यांनीं जबर जकाती देऊन व्यापार करावा हें विसंगत दिसतें. त्याचप्रमाणें अशा परिस्थितींत नबाबाला चौक्या व जकातवसुलीचे अधिकारी यांचा खर्च व पगार कसा देतां आला असता? अर्थात त्यामुळें व्यापाराला अडथळा उत्पन्न झाला असतां व सरकारचें उत्पन्न घटलें असतें." परंतु त्यांचें हें मत कौन्सिलला अमान्य झालें व "नबाबाला असा हुकूम काढण्याचा अधिकारच नाहीं; व त्याचें करणें कंपनीच्या व्यापारास बाधक आहे." असें जाहीर केलें.

प्रश्न :—१. मीरकासीमनें सर्व जकाती माफ कां केल्या? त्याचा इंग्रजांवर कोणता परिणाम झाला? हेस्टिंग्जला मीरकासीमचें करणें कां योग्य वाटलें?

२. बंगालसंबंधीं क्लाइव्हचें धोरण—१७५९

(बंगालमध्यें) आमची सत्ता स्थापन होण्यास दुसरी कांहीं अडचण नाहीं. येथील लोकांस सुभेदाराबद्दल बिलकूल प्रेम वाटत नाहीं. लोकांस आपल्या जीविताची व वित्ताची मुळींच शाश्वती भासत नाहीं.......बादशहाचें दिल्लींतलें मध्यवर्ती आसनही डळमळीत झाल्यामुळें दूरच्या प्रांतांतल्या अंमलदारांवर त्याचा दाब थोडाच राहणार !.......(आज) दिवाणी स्वीकारली कीं, तिचे मागोमाग (बंगालची) सुभेगिरी मिळण्यासही विलंब लागणार नाहीं. बादशहाला ती गोष्ट अवश्य पाहिजे आहे. कारण आम्हीं आपलीं वचनें बरोबर पाळतों अशी त्याची खात्री असल्यानें तो हा प्रदेश आमच्या हवालीं करण्यास एका पायावर तयार आहे.........एवढें समृद्ध राज्य कबजांत आणण्यास अडचणी नाहींत हें मीं वर स्पष्ट केलेंच आहे. हे प्रांत असे तसे नाहींत. निसर्ग व मानवी अक्कल यांची जोड मिळून त्यांत मौल्यवान् जिनसांची पैदास होते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि दरसाल दोन कोटि रुपये उत्पन्न येतें. एवढें हें आदान सांभाळण्याचा उद्योग आपल्या अवांक्यांबाहेर नाहीं, (अमेरिकेप्रमाणें) हिंदुस्थानाचा हा उद्योग आंतबट्ट्याचा बिलकूल नाहीं. लहानशी फौज इंग्लंडहून पाठवावी लागेल तेवढीच. ती सुद्धां फार नको. कारण येथें काळ्या लोकांची पाहिजे तेवढी फौज थोड्या अवकाशांत उभारतां येते. —क्लाइव्हचें पिटला पत्र.

प्रश्न :—१. क्लाइव्ह बंगाल प्रांत घेण्यास कां उत्सुक झाला होता ? कारणें द्या.
२. येथील राज्य तो कसें सांभाळणार होता ? थोडी इंग्रज फौज कां पुरणार होती ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५२. दुहेरी राज्यव्यवस्थेचा बोजवारा

१. बंगालच्या नबाबाशीं नवा करार (१७६५):—मीरकासीमानंतर मीरजाफर बंगालचा नबाब झाला. परंतु तो सन १७६५ मध्यें मेला. तेव्हां त्याचा मुलगा मिरन याला नबाबी मिळावी असा प्रयत्न झाला. परंतु इंग्रजांनीं त्याला दूर सारून मीरजाफरचा एक अनौरस मुलगा हुडकून त्याला नबाबी दिली. त्याचें नांव नज्मुद्दौला होय. तो केवळ पंधरा वर्षांचा होता. त्याच्याकडे नबाबी देतांनाही कंपनीच्या नोकरांनीं भरपूर देणग्या व बक्षिसें वसूल केलीं. शिवाय कंपनीनें त्याच्याशीं एक नवा करार केला. त्यांत खालील अटी होत्या. (१) बंगालचा सर्व कारभार एका नायब नबाबाकडे सोंपवावा. (२) आपल्या राज्यांतील सर्व मुलकी नेमणुका नबाबानें इंग्रजांच्या संमतीनें कराव्या. (३) इंग्रजी फौजेच्या तैनातीसाठीं नबाबानें वार्षिक पांच लक्ष पौंड द्यावे. (४) इंग्रजांस सर्व जकाती माफ असाव्या. हा करार नव्या नबाबास पसंत नव्हता; परंतु त्याला त्याप्रमाणें वागावें लागलें. तसेंच मोहंमद रेझाखान यास मुर्शिदाबादेस व राजा सिताबराय यास पाटण्यास नबाबाचे कारभारी म्हणून नेमण्यांत आलें.

२. क्लाइव्हचें पुन्हां आगमन (१७६५):—वरील करार झाल्यानंतर व्हॅन्सिटार्टची मुदत संपल्यानें त्यानें राजीनामा दिला व त्याच्या जागीं लॉर्ड क्लाइव्ह याची बंगालचा गव्हर्नर म्हणून पुन्हां नेमणूक झाली. त्यावेळीं तो चाळीस वर्षांचा होता. त्यावेळीं कंपनीच्या कारभारांत अत्यंत अव्यवस्था माजली होती. कंपनीच्या नोकरांत द्रव्यलालसा, हेकेखोरपणा व भांडखोरपणा माजला होता. तिजोरींत पैसा नव्हता व सर्वत्र शिस्तीचा व आज्ञाधारकपणाचा अभाव माजलेला होता. शिवाय कंपनीचे नोकर लांच, बक्षिसें, चैनबाजी, उधळेपणा, वगैरेस लालचावलेले होते. तेव्हां ही सर्व स्थिति क्लाइव्हला सुधारावयाची होती. त्याचप्रमाणें बक्सारची लढाई नुकतीच झाल्यानें सुजाउद्दौला, बादशाह व बंगालचा नबाब यांचे व कंपनीचे संबंध त्याला ठरवून द्यावयाचे होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. दिवाणीची सनद (१७६५):—क्लाइव्ह सन १७६५ मध्यें हिंदुस्थानांत आला. लगेच तो अलाहाबाद येथें गेला. तेथें गेल्यावर त्यानें



शाहाआलम बादशहाशीं तह केला. तो असा:–(१) बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांची दिवाणी बादशहानें कंपनीस द्यावी. (२) त्याकरितां कंपनीनें बादशहास फक्त २६ लक्ष रुपये दरसाल (पूर्वी बंगालचा सुभेदार एक कोट रुपये देई) द्यावे. (३) उत्तरसरकारप्रांत इंग्रजांकडे रहावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(४) कोरा व अलाहाबाद हे प्रांत बादशहाच्या तैनातीकरितां वजीरानें द्यावे. (५) इंग्रजांशीं विनाकारण युद्ध केल्याकरितां वजीरानें ५० लक्ष रुपये इंग्रजांस द्यावे. (६) अयोध्या प्रांतांत इंग्रजांस सर्व जकातींची माफी असावी. (७) काशीचा राजा बळवंतराय यास वजीरानें स्वतंत्र करावें. या करारास 'अलाहाबादचा तह' असें म्हणतात (१७६५). या करारानें बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांतील कंपनीच्या सत्तेस कायदेशीर स्वरूप प्राप्त झालें.


शाहाआलम

४. दुहेरी राज्यव्यवस्था :– अलाहाबादच्या तहाप्रमाणें बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांची दिवाणी इंग्रजांस मिळाली. म्हणजे त्या प्रांतांचा वसूल गोळा करण्याचा व त्या प्रांतांचा कारभार पाहण्याचा हक्क कंपनीस मिळाला. त्यावेळीं मोंगल सुभ्यांत निजाम व दिवाण असे दोन कारभारी असत. दिवाण वसुलाचें काम पाही व न्याय देण्याचें काम निजामाकडे असे. अलाहाबादच्या तहान्वयें फक्त दिवाणी इंग्रजांकडे आली. मात्र न्यायदानाचें काम नबाबाकडेच राहिलें. 'फक्त दिवाणीच पत्करावी' असा क्लाइव्हला कंपनीच्या डायरेक्टरांचा हुकूम होता. त्याप्रमाणें त्यानें फक्त दिवाणीचा स्वीकार केला. मात्र लष्करी दृष्टीनें त्या प्रांतांचें संरक्षण करण्याची हमी त्यानें आपल्याकडे घेतली. ज्यांच्याकडून वसूल गोळा करावयाचा त्यांस योग्य न्यायदान करणें हें सरकारचें मुख्य कर्तव्य ठरतें; परंतु कंपनीनें केवळ वसुली आपणाकडे घेऊन न्यायदानाचें व रयतेचा सांभाळ करण्याचें काम बंगालच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नबाबाकडे ठेवलें. या व्यवस्थेसच 'दुहेरी राज्यव्यवस्था' असें म्हणतात. इंग्रजांस दिवाणी मिळाल्यानें चार कोट रुपये उत्पन्नाचा बंगाल प्रांत त्यांस मिळाला व कंपनीस निव्वळ दोन कोटींचा फायदा मिळूं लागला.

५. नोकरांसंबंधीं व्यवस्थाः—कंपनीचा कारभार अत्यंत अव्यवस्थित व घोटाळ्याचा झाला होता व तो सुधारणें जरूर होतें. तेव्हां क्लाइव्हनें तो सुधारण्याकरितां कांहीं नियम केले. ते असे, (१) कंपनीच्या नोकरांनीं खाजगी व्यापार करूं नये. (२) कोणीही लांच, बक्षिसें, नजराणा वगैरे घेऊं नये. (३) शिपायांस भत्ता म्हणून जास्त पैसा मिळूं नये. अर्थात हे नियम कंपनीच्या नोकरांस पसंत पडणें शक्यच नव्हतें. तेव्हां त्यांच्यांत असंतोष माजला. अनेकांनीं राजीनामेही दिले. त्यांचा क्लाइव्हनें स्वीकार केला. शिपायांनीं बंड करण्यासही कमी केलें नाहीं. तेव्हां अत्यंत कडकपणें क्लाइव्हनें तें मोडून टाकलें. मात्र कंपनीच्या नोकरांचे पगार वाढवावे अशी त्यानें डायरेक्टरांस सूचना केली. ती अंशतः त्यांनीं मान्य केली (१७६७). ही सर्व कामगिरी केल्यावर क्लाइव्ह विलायतेस परत गेला. तो पुन्हां हिंदुस्थानांत परत आला नाहीं.

६. क्लाइव्हची योग्यताः—क्लाइव्हचा जन्म सन १७२५ मध्यें झाला. लहानपणापासूनच त्याची विद्याभ्यासाकडे प्रवृत्ति नसून बंडखोरीकडे होती. तेव्हां कंटाळून त्याच्या आई-बापांनीं त्यास कंपनीच्या हिंदुस्थानांतील एका कचेरींत गुंतवून टाकलें! तेथें तो अर्काटच्या वेढ्याच्या वेळीं उदयास आला. तेव्हां या कारकुनानें हातांतील लेखणी टाकून देऊन हातीं तलवार धरली! त्यानंतर लष्करी शिक्षणाचा गंधही नसलेल्या या बहाद्दरानें प्लासीसारखी क्रांतिकारक लढाई जिंकली! तेव्हांपासून तो मोठा उत्कृष्ट सेनापति म्हणून गणला गेला. क्लाइव्ह हुशार, चलाख, धाडसी व बेडर वृत्तीचा होता. भल्याबुऱ्या मार्गांनीं आपलें ध्येय गांठण्यास तो कधींही डरत नसे. 'कुरापती काढण्यांत व लबाडींत निष्णात' अशी त्याची निंदा होत असतांही, 'देशाची मोठी व स्तुत्य कामगिरी करणारा स्वर्गीय सेनानी' अशी त्याची स्तुति केलेली आढळते. नीतितत्त्वांप्रमाणें तो कधींच वागला नाहीं. हिंदुस्थानांत इंग्रजी सत्तेचा पाया घालणारा व स्वराष्ट्रापेक्षांही जास्त लोकसंख्येचें राज्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रजांस मिळवून देणारा क्लाइव्ह अत्यंत स्वार्थसाधु, कुटिल नीतीचा अवलंब करणारा व विश्वासघातकी होता. बंगाल प्रांत मिळवितांना ज्या कपटी राजनीतीचा त्यानें अवलंब केला, त्यामुळें त्याच्या कीर्तीस अत्यंत मोठा डाग लागलेला आहे. समयसूचकता, मुत्सद्दीपणा, संकटास धैर्यानें तोंड देणें वगैरे गुण त्याच्या अंगीं होते. पुढें त्याच्या कारभाराची पार्लमेंटनें चौकशी केली. त्यावेळीं त्यानें अत्यंत जोरदारपणें आपलें समर्थन केलें. त्याचें हें प्रकरण बरींच वर्षें घोटाळत होतें. त्यामुळें त्याचा पैसा खलास झाला, मनास विवंचना लागल्या व तो उदास व हताश झाला. तशांतच त्यानें सन १७७४ मध्यें गळा कापून घेऊन आत्महत्या केली!

७. दुहेरी राज्यव्यवस्थेचा बोजवारा :—क्लाइव्हच्या नंतर व्हेरेल्स्ट सन १७७० पर्यंत बंगालचा गव्हर्नर होता. त्याच्यानंतर कार्टर सन १७७२ पर्यंत त्याच हुद्यावर होता. या सर्व वर्षांत कंपनीच्या कामांत सर्वत्र गोंधळ माजून राहिला होता. क्लाइव्हनें दिवाणी मिळविली ही गोष्ट कळतांच इंग्लंडांत सर्वांस अत्यंत आनंद झाला. जो तो कंपनीचे शेअर विकत घेऊं लागला. आपल्याला अफाट नफा मिळणार अशी प्रत्येकाची कल्पना होती. हेन्री फॉक्स व एडमंड बर्क यांच्यासारखे बडे मुत्सद्दीही त्या आशेच्या कचाट्यांतून सुटले नाहींत! यामुळें कंपनीच्या कारभाराकडे सर्वांचें लक्ष वेधलें गेलें. त्यामुळें कंपनीची खरी स्थिति उघडकीस आली. क्लाइव्हची दुहेरी राज्यव्यवस्था अव्यवस्था ठरली! कारण वसूल एकानें घ्यावयाचा व न्याय दुसऱ्यानें द्यावयाचा अशी स्थिति राहिल्यानें रयतेचे हाल होऊं लागले. रयतेची दाद घेणाराच कोणी उरला नव्हता! कारण कंपनीचे नोकर केवळ उत्पन्नाच्या वसुलावर लक्ष ठेवीत. त्यामुळें रयत दीन झाली. तिच्याकडून वाटेल तसा वसूल जबरदस्तीनें उकळण्यांत येऊं लागला. मोहंमद रेझाखान व शिताबराय हे कंपनीच्या नोकरांस लांच, बक्षिसें वगैरे उपायांनीं खूष ठेवीत व शेतकऱ्यांस पिळून काढीत. त्यांच्याविरुद्ध अनेक तक्रारी झाल्या; परंतु तपासास आलेल्या लोकांस आदरातिथ्य व बडेजाव यांनीं ते दिपवून टाकीत! यामुळें प्रजा टेकीस आली, बंगालप्रांत भिकेस लागला. त्यांतच सन १७७० मध्यें बंगालमध्यें एक भयंकर दुष्काळ पडला. बंगाल्यांत सुमारें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकतृतीयांश लोक अन्नान्न करून तडफडून मेले ! त्या मोठ्या आपत्तीस तोंड देण्याइतकें सामर्थ्य त्या वेळच्या सरकारमध्यें नव्हतें. त्यामुळें देशाचें अतोनात नुकसान झालें; इतकें कीं पुढें चाळीस वर्षें हा दुष्काळ बंगालला चांगलाच जाणवला !

८. कंपनीची अव्यवस्था :—अशा स्थितींत खुद्द कंपनीची आर्थिक स्थिति कशी असेल याची कल्पना करणेंच चांगलें ! कंपनीच्या नोकरांवर क्लाइव्हनें अनेक कडक नियम लादले होते. परंतु क्लाइव्हचें दडपण नष्ट होतांच त्यांच्या द्रव्यलालसेनें व लांच स्वीकारण्याच्या वृत्तीनें तीव्र स्वरूप धारण केलें. कंपनीचे नोकर खाजगी व्यापार करीतच होते. तो त्यावेळीं इतका वाढला कीं, त्यामुळें कंपनीचा व्यापार अगदीं बसला. त्यामुळें तिला वसूल मिळेना कीं तिचा व्यापार चालेना. यामुळें कंपनीची आर्थिक स्थिति अत्यंत हलाखीची झाली. त्याचवेळीं कंपनीचे नोकर मोठ्या चैनींत व मिजाशींत राहूं लागले. ते इंग्लडांत गेल्यावर तेथें मोठ्या डामडौलानें वागत. लांच भरून ते पार्लमेंटमध्यें व डायरेक्टरांच्या मंडळांतही जागा मिळवूं लागले. त्यामुळें त्यांस 'नवाब' अशीं कुत्सित विशेषणेंही मिळूं लागलीं. या सर्व गोष्टी इंग्रजांच्या व पार्लमेंटच्या डोळ्यांत भरल्याशिवाय राहिल्या नाहींत; व त्यामुळें कंपनीची चौकशी करण्याकरितां जोराची मागणी येऊं लागली.

९. म्हैसूरशीं पहिलें युद्ध (१७६७–६९) :—कंपनीची अशी स्थिति असतांच तिला म्हैसूरच्या हैदरअल्लीशीं युद्ध करावें लागलें. हैदरनें म्हैसूरचें राज्य बळकावून व मोठी लष्करी तयारी करून आपली सत्ता वाढविण्यास सुरुवात केली होती. त्यामुळें हैदराबादचा निजाम निजामअल्ली हा भिऊन गेला. तेव्हां त्यानें इंग्रज व मराठे यांची मदत घेतली. ही बातमी कळतांच हैदरनें मराठ्यांस लांच देऊन व निजामाशीं तह करून इंगजांशीं युद्ध करण्याची तयारी दाखविली. लगेच युद्धाला सुरुवात (१७६७) होऊन हैदरनें खुद्द मद्रासवर चाल केली. सर्व कर्नाटक प्रांतही त्यानें उध्वस्त केला. शेवटीं इंग्रजांनीं त्याच्याशीं सन १७६९ मध्यें तह केला. या युद्धामुळेंही कंपनीला अतोनात खर्च झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. रेग्युलेटिंग ॲक्ट (१७७३):—कंपनीच्या आर्थिक हलाखीची बातमी हळूहळू विलायतेंत कळली. दिवाणी मिळाल्याबरोबर कंपनीनें विलायतसरकारला दरसाल ४० लक्ष रुपये देण्याचें व आपल्या भागीदारांस जास्त नफा देण्याचें कबूल केलें होतें. तें सर्व जागच्या जागींच राहून उलट कंपनीला आपली आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां विलायतसरकारकडे धांव घ्यावी लागली! या संधीचा पार्लमेंटनें फायदा घेण्याचें ठरविलें. त्यावेळीं लॉर्ड नॉर्थ इंग्लंडचा मुख्य प्रधान होता. त्यानें कंपनीच्या कारभाराची चौकशी करण्याकरितां दोन कमिशनें नेमलीं. त्यांनीं कंपनीच्या आर्थिक परिस्थितीवर चांगलाच प्रकाश पाडला. तेव्हां कंपनीच्या कारभारावर नियंत्रण घालण्याचें विलायतसरकारनें ठरवून कंपनीला बंधनकारक असा 'रेग्युलेटिंग ॲक्ट' नामक एक कायदा सन १७७३ सालीं पास केला. त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) विलायतसरकारनें कंपनीस एक कोट रुपये कर्ज द्यावें. (२) बंगालच्या गव्हर्नरास 'बंगालचा गव्हर्नर जनरल' असा हुद्दा देऊन, त्याला इतर गव्हर्नरांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याचा अधिकार असावा. (३) गव्हर्नर जनरलच्या मदतीकरितां चार सभासदांचें एक मंडळ असावें व त्या मंडळानें बहुमतानें सर्व प्रश्नांचा निकाल लावावा. त्या निकालाप्रमाणें ग. ज. नें वागावें. (४) कलकत्त्यास एक वरिष्ठ न्यायकोर्ट स्थापन करण्यांत यावें. (५) कंपनीनें आपल्या कारभाराची माहिती नेहमीं विलायतसरकारला पुरवावी. (६) दर वीस वर्षांनीं कंपनीच्या सनदेची व कारभाराची तपासणी व्हावी. (७) कंपनीच्या नोकरांनीं बक्षिसें व लांच घेऊं नये व खाजगी व्यापार करूं नये.

११. रेग्युलेटिंग ॲक्टाचे परिणाम:—वरील कायद्यास अनुसरून वॉरन हेस्टिंग्ज याची बंगालचा गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली; व त्याच्या कौन्सिलांत क्लॅव्हरिंग, मॉन्सन, सर फिलिप फ्रॅन्सिस व बार्वेल या चौघांची नेमणूक झाली. शिवाय सर एलिजा इंपे हा हेस्टिंग्जचा शाळू सोबती कलकत्त्याच्या वरिष्ठ कोर्टाचा न्यायाधीश नेमला गेला. या कायद्यानें पार्लमेंटला कंपनीच्या कारभारांत हात घालतां येतो हें सिद्ध झालें; व कंपनी पार्लमेंटच्या हुकमतीखालीं आली. कंपनीचा कारभार एकमुखी झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें तिच्या व्यवस्थेंतील अंदाधुंदी नाहींशी झाली. या कायद्यांतील मुख्य दोष म्हणजे गव्हर्नर जनरलला कौन्सिलच्या बहुमताप्रमाणें वागावें लागल्यानें तो निर्माल्यवत् बनला. त्यामुळेंच पुढें कौन्सिलांत भांडण-तंटे निर्माण झाले.

अभ्यास

१. लॉर्ड क्लाइव्हचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा.
२. 'क्लाइव्हची दुहेरी राज्यव्यवस्था अव्यवस्थाच ठरली', या म्हणण्याचें खंडण वा मंडण करा. तुमच्या उत्तरांत आधाराकरितां उदाहरणें द्या.
३. रेग्युलेटिंग ॲक्ट पास करण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत झाली ? त्या कायद्याचीं कलमें व परिणाम सांगा.
४. टीपा लिहा—दुहेरी राज्यव्यवस्था, रेग्युलेटिंग ॲक्ट, अलाहाबादचा तह, क्लाइव्हच्या सुधारणा.

उतारे

१. बंगालची दिवाणीच कां घेतली ?—१७६५.

नबाबाची सत्ता व त्याचें वैभव यांचें रक्षण होण्याकरितां त्याची व बादशहाची नेमणूकही आपल्याला वेळेवर दिली पाहिजे. तेवढें देणें देऊन टाकलें कीं राहिलेलें सर्व उत्पन्न आपलेंच आहे. येथें आतां राज्यक्रांति होणें अगदीं अशक्य आहे. आपले नोकरही दंगे करणें शक्य नाहीं; कारण त्यांत त्यांचा कांहींही फायदा नाहीं. अर्थात त्यांस यापुढें बक्षिसी देण्याची जरूरीच नाहीं; कारण आतां आपण मालक आहोंत.......बंगालची दिवाणी घेण्यांतच आपला फायदा आहे. कारण राज्यकारभार घेतला असता तर नुसता पहाणी—तपासणीचा खर्चच वाढला असता. राज्यकारभार हातीं नसल्यानें आपली वसुली कदाचित् कमी येईल. तरीही ती तशी कां आली याकडे आपण लक्ष देऊं शकतों व योग्य गुन्हेगारास शिक्षाही करूं शकतों. शिवाय राज्यकारभार हातीं घेतल्यानें जे दोष आपल्या माथीं लोकांस मारतां येतील, त्यांतून आपली सुटका होईल. (आपण दिवाणी स्वीकारली तरी) बंगालवर नबाब हा राहणारच व त्याचा अधिकारही प्रांतावर चालणार. मात्र कंपनीकडे फक्त वसूल येणार. आज आपले नोकर वसुली करूं लागले तर परकीय लोकांस तें आवडणार नाहीं. शिवाय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वसुलीसंबंधांच्या सर्व तक्रारी ब्रिटिश कोर्टापुढेंच चालत्या तर तीही गोष्ट परकीयांस आवडली नसती.......आमच्या कामगारांची नीति अत्यंत भ्रष्ट झालेली आहे. ती सुधारण्याकरितां दिवाणी घेणेंच योग्य ठरणार आहे. आमची सत्ता व राज्य कायम झालें म्हणजे नबाबास आम्हांला त्रास देतां येणार नाहीं. कारण एका ठिकाणीं दोघांची हुकमत कशी चालणार ?

—क्लाइव्हचें डायरेक्टरांस पत्र.

प्रश्न :—१. क्लाइव्हनें दिवाणीच कां स्वीकारली ? त्यानें कारभार कां घेतला नाहीं ?

२. दिवाणीच्या मागील धोरण—१७६७.

आज आपण बंगालचे खरे मालक आहोंत. सुभेदार केवळ नामधारी आहे. मात्र त्याचें हें नामधारित्व रक्षिण्याची आपण अत्यंत कसोशी केली पाहिजे. त्याला अदबीनें वागविलें पाहिजे, त्याचा कोणी अपमान केल्यास त्यास आपल्याकडे त्याबद्दल तक्रार करण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. सुभेदाराच्या नांवावर परकीयांनीं बंगाल्यांत घातलेला धुडगूस आपल्याला बंद करतां येईल; व त्यांच्या खऱ्या तक्रारींचें निराकरणही त्याच उपायान करतां येईल. (यामुळें आपणास मात्र प्रत्येक वेळीं नामानिराळें राहतां येईल.) तेव्हां हें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं या प्रांतांत एक सुभेदार आहे, त्याला आपण नक्त नेमणूक देण्याचें ठरविलें आहे व त्याचा मानमरातब आपल्याला राखावयाचा आहे; राज्याचा सर्व वसूल कंपनीच्या मालकीचा असला तरी न्यायदानाचें काम सुभेदार व त्याचे अधिकारी यांच्याकडेच आहे. मात्र राज्यकारभार त्यानें आपल्या संमतीनें करावयाचा.

प्रश्न :—नामधारी सुभेदार ठेवण्यांत इंग्रजांचा कोणता हेतु होता ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५३. वॉरन हेस्टिंग्ज

१. वॉरन हेस्टिंग्ज-पूर्ववृत्त :—एका मोडकळीस आलेल्या पण घरंदाज घराण्यांत सन १७३२ मध्यें इंग्लंडांत वॉरन हेस्टिंग्जचा जन्म झाला. घरची गरीबी असल्यामुळें वयाच्या अठराव्या वर्षींच त्यानें कंपनीची नोकरी धरली व सन १७५० मध्यें तो हिंदुस्थानांत आला. हिशोबाच्या कामांत त्यानें हुशारी दर्शविल्यानें क्लाइव्हनें त्याला हाताशीं धरून मीरजाफरच्या दरबारीं वकील म्हणून सन १७५७ मध्यें त्याला नेमलें. सन १७६४ मध्यें तो परत इंग्लंडला गेला होता. पुढें सन १७६९ मध्यें मद्रासच्या कौन्सिलांत त्याची नेमणूक झाल्यानें तो परत हिंदुस्थानांत आला. तेथें त्यानें उत्तम काम केल्यानें सन १७७२ मध्यें त्याची बंगालचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली; व रेग्यु-लेटिंग ॲक्टानंतर त्याला बंगालचा गव्हर्नर जनरल नेमण्यांत आलें. त्यावेळीं त्याला तीन कामें करावयाचीं होतीं. (१) इंग्रजांच्या नव्या राज्यास स्थैर्य प्राप्त करून देणें. (२) कंपनीच्या कारभारांतील घोटाळे नाहींसे करून कार-भारास लागणारा पैसा व डायरेक्टरमंडळाच्या मागण्यांस पुरे पडणारा पैसा उभा करणें. (३) भावी युद्धांकरितां पैसा जमा करणें.

२. हेस्टिंग्जचा कारभार (१७७२–७४) **:**—हेस्टिंग्ज बंगालचा गव्हर्नर झाला त्यावेळीं कंपनीची आर्थिक स्थिति अत्यंत खालावलेली होती. ती त्याला सुधारावयाची होती. तेव्हां त्यानें अनेक गोष्टी केल्या. त्यांपैकीं खालीं कांहीं दिल्या आहेत. (१) **जमीन महसुलासंबंधीं सुधारणा**—क्लाइव्हनें दुहेरी राज्यव्यवस्था सुरू केली होती; परंतु तिचा बोजवारा उडाला होता. रेझाखान व सिताबराय यांच्याकडून वसुलाचें काम नीट होत नसे. त्यांच्याविरुद्ध तक्रारीही पुष्कळ आल्या होत्या. तेव्हां हेस्टिंग्जनें त्यांस कामावरून दूर केलें; व प्रत्येक जिल्ह्यांत इंग्रज कलेक्टर व प्रांतावर इंग्रज कमिशनर नेमून त्यांच्याकडे वसूल गोळा करण्याचें काम त्यानें सोंपविलें. पांच वर्षांचा वसूल मक्त्यानें देण्याची पद्धति त्यानें निर्माण केली. जमीनमहसुलाच्या कामावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देखरेख ठेवण्याकरितां त्यानें बंगाल्यांत चार मंडळें नेमलीं; व त्यांच्या कामावर नजर ठेवण्याकरितां एक 'वसुली-मंडळ' नेमलें. या सर्व व्यवस्थेमुळें तात्पुरती कां होईना कंपनीची आर्थिक स्थिति सुधारण्यास मदत झाली. (२) **न्यायखात्यांतील सुधारणा**—कलकत्त्यास व इतर ठिकाणीं त्यानें मुलकी व फौजदारी कोर्टें स्थापिलीं. जिल्ह्याच्या कलेक्टरनें आपल्या जिल्ह्यांत दिवाणी व फौजदारी गुन्ह्यांच्या खटल्यांचा निकाल द्यावा असेंही त्यानें ठरवून दिलें. कोर्टाच्या उपयोगीं पडेल असें हिंदु व मुसलमानी कायद्याचें एक पुस्तक त्यानें तयार केलें. या सुधारणांमुळें लोकांस न्याय सुलभ झाला.

३. हेस्टिंग्जचीं पैसे मिळविण्याकरितां कृत्यें :—कंपनीची आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां हेस्टिंग्जनें जमीनमहसुलासंबंधीं ज्या सुधारणा केल्या त्या वर दिल्या आहेतच. त्यानेंही पैसा पुरा पडेना. तेव्हां त्याला इतर मार्गांनीं पैसा उभा करणें भाग पडलें. त्यांतील कांहीं खालीं दिले आहेत. (१) **बादशहाची खंडणी बंद :**—दिवाणी घेतांना बादशहास २६ लक्षांची खंडणी देण्याचें क्लाइव्हनें कबूल केलें होतें. परंतु १७७१ मध्यें बादशहानें महादजी शिंद्याची मदत घेऊन दिल्लींत बादशाह म्हणून प्रवेश केला होता. ती सबब पुढें करून हेस्टिंग्जनें त्याची नेमणूक रद्द केली. तसेंच कोरा व अलाहाबाद हे त्याच्या दिमतीस दिलेले प्रांत त्यानें परत अयोध्येच्या वजीरास ४० लक्ष रुपयांस कायमचे विकून टाकले (१७७३)! (२) अयोध्येच्या नबाबाकडे त्यानें तैनाती फौज ठेवून दिली व तिच्या खर्चाकरितां त्याच्याकडून कांहीं रक्कम घेण्याचें ठरविलें. (३) **रोहिल्यांशीं युद्ध**—रोहिले व मराठे आपल्यावर स्वारी करतील अशी अयोध्येच्या वजीरास नेहमीं भीति वाटत असे. सन १७७२ मध्यें मराठ्यांनीं रोहिल्यांवर स्वारी केली होती. तेव्हां त्यांचा पुढारी हाफीज रहमतखान यानें भिऊन जाऊन वजीराशीं स्नेह केला; व वजीरानें मराठ्यांविरुद्ध मदत केल्यास ४० लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. पुढें मराठ्यांची रोहिल्यांवर स्वारी झालीच नाहीं. तरीही ४० लक्ष रुपये देण्याबद्दल अयोध्येच्या वजीरानें रहमतखानाकडे नेट लावला. ती गोष्ट त्यानें नाकारली. तेव्हां हेस्टिंग्जची मदत घेऊन वजीरानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोहिल्यांचा पराभव केला व त्यांचा रोहिलखंड प्रांत आपल्या राज्यास जोडला. मात्र या मदतीकरितां इंग्रजांस ४० लक्ष रुपये मिळणार होते. रोहिल्यांचें स्वातंत्र्य हरण करणें व सुधारलेल्या देशांतील युद्धपद्धतीविरुद्ध वर्तन करून रोहिल्यांस अनन्वित छळ सोसण्यास लावणें या आरोपांवरून हेस्टिंग्जची पुढें चौकशी झाली. तेव्हां 'रोहिल्यांनीं इंग्रजांविरुद्ध कारस्थानें रचलीं. शिवाय मराठ्यांच्या सत्तेस आळा घालण्याकरितां रोहिलखंड हातीं असणें जरूर होतें. अर्थात रोहिल्यांविरुद्ध शस्त्र उचलणें जरून पडलें' असें हेस्टिंग्जनें आपलें समर्थन केलें. (४) बंगालच्या सुभेदारास क्लाइव्हनें ६० लक्षांची नेमणूक करून दिली होती. त्यानेंच ती ४५ लक्ष केली होती. मात्र ती कमी करूं नये असें त्यानें ठरविलें होतें. पुढें व्हॅन्सिटार्टनें ती ३५ लक्ष केली व हेस्टिंग्जनें ती आणखी कमी करून १८ लक्षांवर आणून ठेवली (१७७३).

४. गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जचा कारभार :—सन १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टाप्रमाणें हेस्टिंग्ज बंगालचा पहिला गव्हर्नर जनरल झाला; व त्याच्या मदतीस एक मंडळ देण्यांत आलें होतें. त्या मंडळांत बार्वेल हा हिंदुस्थानांतील परिस्थिति जाणणारा असून तो हेस्टिंग्जला नेहमीं मदत करी. त्याशिवाय जे इतर तिघे होते ते हिंदुस्थानाची परिस्थिति न जाणणारे व कंपनीच्या नोकरांच्या जुलमी वर्तनावर देखरेख करण्याकरितां झटणारे होते. त्यांचा पुढारी सर फिलिप फ्रॅन्सिस हा हुशार, अनुभवी व विद्वान गृहस्थ होता. तो हेस्टिंग्जला नेहमीं विरोधी व मॉन्सन व क्लॅव्हरिंग त्याची 'री' ओढीत. एलिजा इंपे हा न्यायाधीश मात्र हेस्टिंग्जची बाजू सांभाळून धरी. कौन्सिलच्या बहुमतानें हेस्टिंग्जला वागावयाचें असल्यानें त्यास मंडळाकडून फार विरोध झाला. अनेक वेळां त्याला अध्यक्ष या नात्यानें आपल्या जादा मताचा उपयोगहि करावा लागे. अशा स्थितींत एक नवीनच प्रकरण उपस्थित झालें. तें नंदकुमाराचें प्रकरण होय.

५. नंदकुमाराचें प्रकरण (१७७५) :—बंगालच्या राजकारणांत मुरलेला व बंगालच्या स्वातंत्र्याकरितां तळमळणारा नंदकुमार हा एक वजनदार ब्राह्मण होता. रेझाखान व सिताबराय यांची हेस्टिंग्जनें चौकशी केली. त्यावेळीं नंद-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुमारानें हेस्टिंग्जला अतिशय मदत केली होती. त्यांना कामावरुन दूर केल्यावर रेझाखानाची जागा आपल्याला मिळावी अशी नंदकुमाराची इच्छा होती. परंतु हेस्टिंग्जनें तसें केलें नाहीं. मात्र त्याचा मुलगा गुरुदास यास त्यानें तिजोरीची व्यवस्था सांगितली. तेव्हां नंदकुमार हेस्टिंग्जचा शत्रू झाला होता. कौन्सिलांतील सभासदांस त्यानें वश करून घेतलें होतें. पुढें मीरजाफरची बायको मणीबेगम हिच्याकडून साडेतीन लक्ष रुपयांचा लांच खाल्ल्याचा आरोप त्यानें हेस्टिंग्जवर आणला. ही रक्कम हेस्टिंग्जनें भरावी असा कौन्सिलनेंही निकाल दिला. त्यामुळें हेस्टिंग्ज नंदकुमारावर चिडून गेला. त्यावेळीं कलकत्याच्या मोहनप्रसाद नामक एका व्यापाऱ्यानें नंदकुमारावर सहा वर्षांपूर्वीं एक खोटा दस्तैवज केल्याची फिर्याद दाखल केली. या फिर्यादीची चौकशी इंपेच्या कोर्टांत होऊन नंदकुमारास फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली. त्याप्रमाणें त्याला फांशीही देण्यांत आलें. पुढें चौकशीच्या वेळीं या गोष्टीचें समर्थन करतांना हेस्टिंग्जनें सांगितलें कीं, “नंदकुमाराची चौकशी निःपक्षपाती व स्वतंत्र ज्यूरीकडून झाली होती. तेव्हां त्यास झालेली शिक्षा न्याय्य होय.” या प्रकरणानंतर मॉन्सन सन १७७६ मध्यें व क्लॅव्हरिंग १७७७ मध्यें मरण पावले. पुढें फ्रॅन्सिसही इंग्लंडांत निघून गेला. तेथें राहूनही त्यानें हेस्टिंग्जचा एकसारखा पिच्छा पुरविला.

६. **चेतसिंहाचें प्रकरण** (१७८०):—काशीचा राजा चेतसिंह हा सन १७७५ पासून इंग्रजांचा मांडलिक बनला होता. तो इंग्रजांस दरसाल २२ लक्ष रुपये खंडणी देत असे. सन १७७९ मध्यें खंडणीशिवाय आणखी पांच लाख रुपये हेस्टिंग्जनें त्याजकडे मागितले. ते त्यानें निमुटपणें दिले. पुढल्या वर्षीं हेस्टिंग्जनें पुन्हां तितकीच रक्कम त्याजपाशीं मागितली; व शिवाय स्वतःच्या खर्चानें चेतसिंहानें एक पलटण इंग्रजांच्या उपयोगाकरितां आपल्याजवळ ठेवावी अशी हेस्टिंग्जनें त्याजजवळ निकड लावली. तेव्हां त्या दोन्ही गोष्टी नाकारण्यांत आल्या. अर्थात हेस्टिंग्जनें त्याच्याविरुद्ध फौज पाठवून चेतसिंहाचा पराभव केला, त्याला पदच्युत केलें व त्याच्या पुतण्यास राज्यावर बसवून त्याच्याकडे ५० लक्ष रुपये दंडादाखल घेण्याचें ठरविलें. शिवाय दरसालची खंडणी दुप्पट करण्यांत आली. या प्रकरणीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हेस्टिंग्जचें वर्तन अत्यंत अन्यायाचें होतें. केवळ लूट करून पैसा मिळवावा असा त्याचा हेतु असल्याचा त्याच्यावर आरोप करण्यांत आला. त्या आरोपाचें समर्थन करतांना मांडलिकानें साम्राज्य सरकारास संकटकाळीं मदत करणें जरूरीचें आहे व त्या तत्त्वाच्या सिद्धतेकरितांच चेतसिंहाशीं आपल्याला तसें वागावें लागलें; असें हेस्टिंग्जनें सांगितलें.

७. अयोध्येच्या बेगमा (१७८१):—अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला सन १७७५ मध्यें मरण पावला होता. तेव्हां त्याचा मुलगा असफउद्दौला वजीर झाला. त्याची आई व आजी या जिवंत होत्या. त्यांसच 'अयोध्येच्या बेगमा' असें म्हणत. असफउद्दौला याला तैनाती फौजेबद्दल इंग्रजांस एक कोट रुपयांचें देणें झालें होतें. त्याच्याजवळ पैसे नव्हते. तेव्हां तो पैसा आपली आई व आजी यांच्याकडून जरबीनें घेण्याविषयीं हेस्टिंग्जनें त्याला सुचविलें. त्याप्रमाणें त्यानें हेस्टिंग्जच्या मदतीनें ते पैसे त्या बेगमांकडून काढून घेऊन हेस्टिंग्जची भर केली. त्यावेळीं बेगमांचा अनन्वितरीतीनें छळ करण्यांत आला होता. या गोष्टीचें समर्थन करतांना बेगमांनीं इंग्रजांविरुद्ध चेतसिंहास मदत केली होती व संस्थानचा पैसा घेण्याचा हक्क बेगमांस नव्हता असें हेस्टिंग्जनें सांगितलें.

८. हेस्टिंग्जनें केलेलीं युद्धें :—हेस्टिंग्जला आपल्या कारकीर्दींत तीन मोठीं युद्धें करावीं लागलीं. त्या सर्वांतून निभावून जाऊन त्यानें इंग्रजी राज्याचा बचाव केला. (१) **म्हैसूरकरांशीं दुसरें युद्ध** (१७८०–८४) या युद्धाला कांहीं कारणें झालीं. तीं अशीं (१) सन १७६९ मध्यें कबूल केल्याप्रमाणें इंग्रजांनीं सन १७७१ मध्यें मराठ्यांविरुद्ध हैदरला मदत केली नाहीं. (२) सन १७७८ मध्यें इंग्रजांनीं फ्रेंचांचें पश्चिम किनाऱ्यावरील माही हें बंदर जिंकून घेतलें. त्याबद्दल हैदर त्यांच्यावर रागावला होता. कारण त्या बंदरांतून त्याला शस्त्रास्त्रें मिळत असत. (३) सन १७८० च्या सुमारास हिंदुस्थानांतून इंग्रजांचें कायमचें उच्चाटण करण्याकरितां नाना फडणिसानें एक संघ निर्माण केला होता. त्यांत हैदर सामील झाला होता. या गुप्त तहास अनुसरून हैदरानें मद्रासवर हल्ला चढविला. ही लढाई चालू असतांच हैदर १७८२ त मरण पावला. तरी न डगमगतां त्याचा मुलगा टिपू सुलतान व दिवाण पूर्णय्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांनीं तें युद्ध जोरानें चालविलें. शेवटीं सन १७८४ मध्यें इंग्रजांस टिपूबरोबर मंगळुरास बरोबरीचा तह करावा लागला. (२) **मराठ्यांशीं युद्ध** (१७८०-८२) यासंबंधाची हकीकत मराठ्यांच्या भागांत दिली आहे. (पहा, पानें ३९०–९२). (३) **रोहिल्यांशीं युद्ध** (१७७२)—याची हकीकत (पानें ३८१–८२) वर दिली आहे, ती पहा. हेस्टिंग्ज बंगालचा गव्हर्नर जनरल असतां अमेरिकन स्वातंत्र्य युद्धास सुरुवात झाली होती. त्यांत इंग्लंडचा पराभव होऊन अमेरिकन वसाहती इंग्लंडच्या हातून गेल्या. त्याच वेळीं इंग्रजांच्या हिंदुस्थानी साम्राज्यावरही गदा आली होती. परंतु आपल्या अंगच्या अलौकिक गुणांनीं हेस्टिंग्जनें इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील राज्यास निभावून नेलें. तो सन १७८५ सालीं विलायतेस परत गेला.

९. वॉरन हेस्टिंग्जची योग्यता :—वॉरन हेस्टिंग्ज मोठा धूर्त, राजकारस्थानी व कार्यसाधु होता. एकदा एक गोष्ट करावयाची असें ठरविल्यावर, त्याकरितां तो वाटेल तो उपाय योजण्यास डरत नसे. बिकट प्रसंगीं न डगमगतां धैर्यानें वागून तो यशस्वी होत असे. मनोवृत्ती ताब्यांत ठेवण्यांत तो फार वाकबदार होता. विद्येची त्याला आवड होती. अरबी, बंगाली, फारशी वगैरे भाषा त्याला अवगत होत्या. 'रॉयल एशियाटिक सोसायटी' त्याच्याच कारकीर्दींत स्थापन झाली. त्याचा निरलस उद्योग, अढळ निश्चय, शांतपणा, मनाचें गांभीर्य व व्यावहारिक दूरदर्शीपणा यांमुळें त्याची सर्वांवर छाप पडे. खाजगी व्यवहारांत तो सुशील व गोडव्या स्वभावाचा होता. द्रव्यलालसा व लांचखाऊपणा आजूबाजूस घोंघावत असतां त्यानें आपले हात व मन त्यापासून अलिप्त ठेवलें होतें. क्लाइव्हनें स्थापिलेल्या ब्रिटिश राज्यास त्यानें बळकटी आणून दिली व हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्यास त्यानें वांचविलें ही त्याची थोर कामगिरी होय.

१०. हेस्टिंग्जची चौकशी :—हेस्टिंग्जनें अनेक अन्यायाचीं कृत्यें केलीं त्यांत अयोध्येच्या बेगमांचा छळ, रोहिल्यांशीं युद्ध व चेतसिंहाचा छळ हीं त्याचीं कृत्यें दोषस्पद ठरविण्यांत आलीं व त्याची त्यासंबंधीं चौकशी करणें जरूर आहे असें मत बर्क, शेरिडन, डंडास, फ्रॅन्सिस वगैरे इंग्रजांनीं व्यक्त केलें होतें. त्याप्रमाणें पार्लमेंटनें त्याच्यावर खटला भरून त्याची चौकशी केली. हा खटला सात वर्षें चालला होता. बर्क व शेरिडन या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुत्सद्यांनीं अमोघ वक्तृत्व गाजवून हेस्टिंग्जचे वाभाडे काढले ! हेस्टिंग्जनें अत्यंत धैर्यानें हा खटला चालवून आपलें समर्थन केलें. त्याच्यापायीं त्याची सर्व संपत्ति खलास झाली. शेवटीं त्यास निर्दोषी म्हणून सोडून देण्यांत आलें (१७९५). या खटल्यामुळें त्याचें मन विटलें व तो सार्वजनिक कार्यातून निवृत्त झाला. मात्र कंपनीनें त्याला नेमणूक करून दिली होती. पुढें तो सन १८१८ मध्यें मरण पावला.



एडमंड बर्क

११. पिटचें बिल (१७८४):— हेस्टिंग्जच्या अरेरावी कृत्यांमुळें पार्लमेंटचें लक्ष हिंदुस्थानाच्या कारभाराकडे पुन्हां वेधलें गेलें. तेव्हां विलायतसरकारनें चौकशी करण्याकरितां एक कमिशनही नेमलें होतें. शिवाय रेग्युलेटिंग ॲक्टांतील दोषांची जाणीवही पार्लमेंटला होतीच. तेव्हां ते दोष नाहींसे करण्याकरितां धाकट्या पिटनें सन १७८४ मध्यें एक बिल पार्लमेंटकडून पास करून घेतलें. त्याला 'पिटचें बिल' असें म्हणतात. त्या बिलांत खालील गोष्टी होत्या. (१) डायरेक्टरमंडळानें कंपनीच्या व्यापारावर पूर्वीप्रमाणें देखरेख ठेवावी. (२) गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलांत तीनच सभासद असावेत. (३) इंग्लंडांत बोर्ड ऑफ कंट्रोल ऊर्फ नियामकमंडळ नेमण्यांत येऊन त्या मंडळानें हिंदुस्थानांतील राजकीय कारभारावर देखरेख ठेवावी. (४) कंपनीनें

धाकटा पिट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानांत जास्त मुलूख मिळवून आपली जबाबदारी वाढवूं नये. ह्या बिलास कायद्याचें स्वरूप प्राप्त झाल्यानें कंपनीचा राजकीय व्यवहार इंग्लंडच्या राजाच्या स्वाधीन झाला. मात्र गव्हर्नर जनरलनें कौन्सिलच्या बहुमताप्रमाणें वागावें हा जो रेग्युलेटिंग ॲक्टामध्यें मुख्य दोष होता, तो या कायद्यानें नाहींसा झाला नाहीं. तो नष्ट करण्याकरितां सन १७८६ मध्यें कॉर्नवॉलिसमुळें पार्लमेंटला एक कायदा पास करावा लागला. त्यानें गव्हर्नर जनरलला कौन्सिलच्या बहुमताविरुद्धही वागण्यास मोकळीक दिली.

अभ्यास

१. वॉरन हेस्टिंग्जचीं अरेरावीं कृत्यें वर्णन करा. त्यांचें त्यानें समर्थन कसें केलें ? तें कितपत योग्य होतें ?

२. वॉरन हेस्टिंग्जनें पैसा मिळविण्याकरितां कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला ? ह्या मार्गांनीं त्याला पैसा कां मिळवावा लागला ?

३. 'हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य हेस्टिंग्जनें वांचविलें.' हें विधान सिद्ध करा व त्याकरितां हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याची आर्थिक व राजकीय स्थिति सुधारण्याकरितां त्यानें कोणकोणत्या गोष्टी केल्या तें सांगा.

४. हेस्टिंग्जच्या सुधारणा सांगा.

५. हेस्टिंग्जचें अल्प चरित्र देऊन त्याची योग्यता वर्णा.

६. खालीलसंबंधीं टीपा तयार करा.

नंदकुमार, कौन्सिलांतील तंटे, अयोध्येच्या बेगमा, चेतसिंह, पिटचें बिल.

उतारे

१. हेस्टिंग्जची असहायता—१७७६.

आज माझी परिस्थिति अत्यंत शोकजनक व दुःखदायक आहे. पार्लमेंटच्या कायद्यानें मला जे जे अधिकार दिले ते सर्व आज मजपासून हिरावून घेतले गेले आहेत. माझ्या महत्पदाची आज बेअदबी होत आहे. माझ्यावर शिंतोडे उडत आहेत. ज्यांच्याबरोबर दररोजच्या कारभारासंबंधीं मला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चर्चा करावी लागते, ते लोकही माझा बोज ठेवीनासे झाले आहेत. ज्या गोष्टी मला पटत नाहींत त्यांची जबाबदारी माझ्यावरच येऊन पडूं लागल्यानें माझें नांव बदू होऊं लागलें आहे. अशा स्थितींत मन वैतागून जातें व राजीनामा देऊन या जंजाळांतून मुक्त व्हावें असे विचारही मनांत येतात. पण कर्तव्य आड येतें. शिवाय ज्यांनीं माझ्यावर इतका विश्वास प्रगट केला ते माझ्यावर अन्याय होऊं देणार नाहींत असें वाटल्यानें माझें मन त्या गोष्टीस तयार होत नाहीं. तुमच्या दसराची अवज्ञा व्हावी व कंपनीच्या हिताची वाऱ्यावर वरात निघावी असें तुम्हांस वाटत असेल तर मात्र सध्यांच्या कौन्सिलांत चालू असलेल्या भांडणांपासून मी पूर्णपणें अलिप्त राहण्यास तयार आहें.

प्रश्न :—१. हेस्टिंग्जला कोणत्या गोष्टी बोंचत होत्या? कां? त्यावर त्यानें कोणता उपाय सुचविला?

२. हेस्टिंग्जचें कारभारासंबंधीं धोरण—१७७६

हिंदी कारभाराचें धोरण आंखतांना मी खालील गोष्टी मनांत योजून ठेवल्या होत्या. प्रथमतः या देशाच्या कारभारांत कंपनीची सत्ता व इंग्लिश राजाची सत्ता दृढ करणें. दुसरें असें कीं येथें आजवर चालू असलेले गुप्त प्रकार नष्ट करून प्रत्येक गोष्ट सरकारनें आपल्या हुकुमानें व आपल्या जबाबदारीवर केली आहे असें सर्वांस दाखवून दिलें पाहिजे. तिसरें असें कीं जुलमी कर रद्द करून येथील प्रजेस सुखी करणें. त्याकरितां त्यांच्या तक्रारी जबाबदार अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानीं जातील अशी व्यवस्था करणें जरूर आहे. प्रजेला योग्य न्याय मिळावा व तिचें संरक्षण उत्तम व्हावें म्हणून योग्य तजवीज केली पाहिजे. कंपनीला विलायतेंत येणाऱ्या अडचणी दूर करून तिला ऋणमुक्त करणें जरूर आहे. शिवाय येथील कारभाराची व वसुलाची पद्धति घालून देऊन व एकंदर व्यवहारांत काटकसरीनें वागून धनसंचय केला पाहिजे. एकंदरींत पाहतां कंपनीचें राजकीय वर्चस्व वाढविण्याकरितां येथील जास्त प्रदेश मिळविणेंच योग्य होय.

—हेस्टिंग्जचें सुलीव्हनला पत्र.

प्रश्न :—१. हेस्टिंग्जनें आपल्यापुढें कोणतीं ध्येयें ठेविलीं होतीं?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. रोहिल्यांचा निःपात—१७८६.

रोहिल्यांशीं युद्ध सुरू होण्यापूर्वी, तें चालू असतां व तें संपल्यावर रोहिलखंडाची स्थिति कशी होती हें समजून घेणें आवश्यक आहे. तो देश अत्यंत सुपीक व संपन्न होता. त्याचें उत्पन्नही पुष्कळ असे. तेथील सरदार आपल्या प्राचीन वैभवानें व मानानें रहात. तेथील व्यापारी व सावकार आपापले धनोत्पादक धंदे मोठ्या जोमानें करीत. माळरानालाही स्वकष्टानें सुपीक जमिनीचें स्वरूप देणारा शेतकरी दुष्काळ व तत्सम इतर आपत्तींस धैर्यानें तोंड देई. अशा या देशाची आजची स्थिति किती अनुकंपनीय आहे बरें? तो संपन्न देश आज धुळीस मिळाल्यानें तेथील लोकांस रहावयासही जागा उरली नाहीं. रोहिलखंडाची रम्य बागेश्री आज कोमेजून गेलेली आहे!—आणि या कामाकरितां हेस्टिंग्जनें सर रॉबर्ट बार्करला ५०००००० पौंड देऊं केले!! आणि हें कशाकरितां तर हाफीज रहमतखानाच्या रोहिलखंडावर आपल्या सैन्याकरवीं नांगर फिरविण्याकरितां! यापासून खुद्द हेस्टिंग्जला तरी प्राप्ति किती झाली? केवळ ४०००००० पौंड!

—खटल्याच्या वेळचें बर्कचें भाषण.

प्रश्न :—१. रोहिल्यांवर कोणती आपत्ती हेस्टिंग्जनें लादली? कशाकरितां?

४. राजा चेतसिंह व हेस्टिंग्ज

राजा चेतसिंहानें आमचा अत्यंत घोर आपराध केला होता. अर्थात आमचें ध्येय, धोरण व न्याय यांची कसोटीचीच वेळ ती! तेव्हां चेतसिंहाला शिक्षा करणेंच योग्य होतें. थोडक्यांत म्हणजे त्याला माफी करावयाची; पण त्या कृत्याची सव्याज फेड करून घ्यावयाची. त्याच्या घोर अन्यायाकरितां त्याला जबरदस्त दंड करावयाचा असें मी ठरविलें होतें. याकरितां चेतसिंहाच्या अपराधाचें त्याच्या पदरीं भरपूर माप पडून, वर कंपनीची आर्थिक स्थितीही सुधारणार होती.

—हेस्टिंग्जचा अभिप्राय.

राजा चेतसिंहाच्या प्रकरणीं हेस्टिंग्जनें जी निर्दयता व जो अन्याय केला त्याला तोडच नाहीं. कंपनीचे आपण अत्यंत निष्ठावंत सेवक आहोंत असें भासविण्याकरितां त्यानें वेळीं आपल्या खिशालाही चाट लावून घेतली. मात्र ज्यानें त्याला मोठी देणगी दिली व ज्याला त्यानें अत्यंत कडकपणें वागविलें, त्याच्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडून मिळविलेल्या पैशांतूनच त्यानें हे पैसे खर्च केले. 'कंपनीच्या हिताच्या व तिच्या धोरणास विसंगत असें धोरण स्वीकारून चेतसिंहानें कंपनीबद्दल अप्रीति उत्पन्न केली' असें हेस्टिंग्ज म्हणतो. परंतु त्याच राजाकडून त्यानें २३००० पौंड घेऊनच्या घेऊन त्याचा छळ व सत्यानाश केला.

—सिलेक्ट कमेटीचा अभिप्राय—१७८३.

प्रश्न :—१. हेस्टिंग्जनें राजा चेतसिंहावर कोणता आरोप केला? त्याला कोणती शिक्षा त्यानें केली? या प्रकरणीं त्याला कोणता ठपका देण्यांत आला? त्याचें स्वतःचें समर्थन कोणतें?

कालादर्श—१७६०–१७८५.

इंग्रज	मराठे	वर्ष	इंग्लंड	प्रसिद्ध व्यक्ति
वाँदिवॉशची लढाई		१७६०	तिसरा जॉर्ज	लॉर्ड चॅटहॅम,
	पानिपतची लढाई पहिला माधवराव १७६१–१७७२	१७६१	१७६०-१८२०	नानासाहेब
पाटण्याची कत्तल	राक्षसभुवनची लढाई	१७६३	पॅरिसचा तह	क्लाइव्ह, सखारामबापू
दिवाणीची सनद	मल्हाररावाचा मृत्यु	१७६५	स्टँप ॲक्ट	
वॉरन हेस्टिंग्ज बंगालचा गव्हर्नर	माधवरावाचा मृत्यु	१७७२		महादजी शिंदे
रेग्युलेटिंग ॲक्ट नंदकुमार फांशी	नारायणरावाचा खून सवाई माधवराव १७७४–९५	१७७३		जॉर्ज वॉशिंग्टन
		१७७५	अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध	नाना फडणीस
सालब्याचा तह	हैदरचा मृत्यु	१७८२	अमेरिका स्वतंत्र झाली	
पिटचें बिल		१७८४		
वॉरन हेस्टिंग्ज परत गेला		१७८५		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५४. लॉर्ड कॉर्नवॉलिस व सर जॉन शोअर

१. लॉर्ड कॉर्नवॉलिस (१७८६-१७९३):—कौन्सिलांतील सर्वांत वरिष्ठ सभासद मॅक्फरसन याच्याकडे आपला कारभार सोंपवून वॉरन हेस्टिंग्ज विलायतेस निघून गेला. मॅक्फरसननें सुमारें वीस महिने काम केलें. त्यानंतर लॉर्ड कॉर्नवॉलिस हा गव्हर्नर जनरल म्हणून हिंदुस्थानांत आला. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धांत त्यानें इंग्रजांचा मुख्य सेनापति म्हणून काम केलें होतें. तो निस्पृह, निःपक्षपाती, प्रामाणिक व नेकीनें काम करणारा होता. तो बुद्धिमान नव्हता; परंतु नेकीनें काम करण्याची संवय त्यास असल्यानें त्याचा कारभार चांगला झाला. अलिप्तपणाच्या धोरणाचा तो भोक्ता होता व त्या धोरणाचा अवलंब करावा अशी त्यास आज्ञा होती. न्याय व महसूल यांसंबंधीं त्यानें उपयुक्त सुधारणा केल्या.

२. कायमधाऱ्याची पद्धति (१७९३):—हेस्टिंग्जनें पांच वर्षांनीं लिलांवानें मक्ते देण्याचा परिपाठ पाडला होता. त्यामुळें फायदा न होतां कंपनीला नुकसान मात्र फार होऊं लागलें. शिवाय मक्ते वेळेवर येत नसत. त्यामुळें फडणिशी खात्यांत नेहमीं घोटाळे माजून रहात. ही स्थिति सुधारण्याचें कॉर्नवॉलिसनें ठरविलें. अकबराच्या वेळेपासून बंगाल्यांत जमीनदारी चालू होती. वॉरन हेस्टिंग्जच्या वेळेपासून ती मागें पडली. अर्थात जमीनदार मागें पडल्यानें जमिनीचें उत्पन्न घटे. हें ओळखून कॉर्नवॉलिसनें मक्त्याची पद्धति बंद केली व जुन्या व माहितगार जमीनदारांस महसूल गोळा करण्याचें काम दिलें. कंपनीच्या उत्पन्नांत अनिश्चितपणा नसावा म्हणून त्यानें मागील पांच वर्षांच्या वसुलाची सरासरी काढली व तितका वसूल जमीनदारांनीं दरसाल द्यावा व ती पद्धति दहा वर्षें चालावी असें त्यानें ठरवून दिलें. त्याचप्रमाणें जमीनदार जमिनीचे कायमचे मालक आहेत व एकदां ठरवून दिलेला सारा सरकारनें पुन्हां फिरवूं नये असें ठरविण्यांत आलें. ही पद्धति सन १७९३ मध्यें मंजूर झाली. तिला 'कायमधारा पद्धति' असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणतात. यामुळें सरकारचा सारा नियमित झाला, वसुलाचा अनिश्चितपणा नष्ट झाला व जमीनदार जमीनीची उत्तम मशागत करूं लागल्यानें शेती सुधारली. मात्र शेतकऱ्यांवर जुलुम होऊं लागून सरकारचें उत्पन्न कायमचें खुंटलें.

३. न्यायखात्यांतील सुधारणा :— (१) कलेक्टरकडील न्याय देण्याचें काम त्यानें काढून टाकून त्याच्याकडे फक्त वसुलाचें काम सोंपविलें. न्याय देण्याकरितां स्वतंत्र कोर्टांची त्यानें स्थापना केली. (२) प्रत्येक जिल्ह्यांत दिवाणी व फौजदारी कोर्टें त्यानें स्थापिलीं. (३) त्यांच्या निकालावर अपील करण्याकरितां त्यानें कलकत्ता, पाटणा, डाक्का व मुर्शिदाबाद येथें चार हायकोर्टें स्थापन केलीं. त्यांच्या निकालाविरुद्ध वरिष्ठ कोर्टाकडे अपील करण्याची परवानगी ठेवण्यांत आली. (४) सदर दिवाणी अदालत व सदर निझामत अदालत अशीं दोन वरिष्ठ कोर्टें निर्माण करण्यांत आलीं. (५) या सर्व कोर्टांतून वापरण्यांत यावें म्हणून त्यानें एक कोडही तयार केलें. त्याला 'कॉर्नवॉलिसचें कोड' असें म्हणतात. (६) सर्व कोर्टांतून इंग्लिश न्यायाधिशांस हिंदु पंडित व मुसलमान काजी मदतीकरितां नेमण्याचें ठरविण्यांत आलें. या सर्व सुधारणांमुळें न्यायदान पद्धति सुधारण्यास पुष्कळच मदत झाली.

४. इतर सुधारणा :— (१) कायम नोकरांच्या पगारांत सुधारणा करून त्यास पुरेसा व कायम पगार मिळण्याची त्यानें व्यवस्था केली. (२) व्यापारापासून मिळणाऱ्या नफ्याचा अंश नोकरांस मिळे. तो त्यानें अजीबात बंद केला. (३) कंपनीच्या नोकरांचें लांच घेणें, खाजगी व्यापार करणें वगैरे गोष्टी त्यानें बंद केल्या. (४) सनदी नोकरींत अत्यंत गैरव्यवस्था होती. ती त्यानें नाहींशी केली. (५) जिल्ह्यांत निरनिराळीं पोलिस ठाणीं त्यानें निर्माण केलीं व प्रत्येक ठाण्यावर दरोगे नांवाचे पोलिस ठेवण्याची त्यानें व्यवस्था केली. (६) हातपाय तोडणें वगैरे सारख्या अमानुष शिक्षा त्यानें रद्द केल्या. या सर्व सुधारणांमुळें कारभारांत शिस्त व व्यवस्था निर्माण होऊन राज्यव्यवस्था चांगली झाली.

५. म्हैसूरकरांशीं तिसरें युद्ध (१७९०–९२) :— पिटच्या कायद्याप्रमाणें कंपनीनें अलिप्तपणाच्या धोरणाचा स्वीकार केला होता. स्वतः कॉर्न-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वॉलिसही त्या धोरणाचा पुरस्कर्ता होता. परंतु कॉर्नवॉलिसवर तें धोरण सोडून युद्ध करण्याचा प्रसंग आला. मात्र अगदीं नाइलाजानें त्यानें टिपूशीं युद्ध केलें. त्याला कारणें अशीं झालीं. (१) कोचीनचा राजा टिपूचा आश्रित होता. त्या राजाच्या ताब्यांतील करंगनूर व आयकोट हीं शहरें त्रावणकोरच्या राजानें डचांपासून विकत घेऊन तेथें तटबंदी केली. ही गोष्ट न खपून कोचीन व त्रावणकोर यांच्यांत युद्ध सुरू झालें. त्यांत कोचीनचा पक्ष टिपूनें घेतला व त्रावणकोरचा पक्ष इंग्रजांनीं घेतला. (२) टिपू इंग्रजांचा द्वेष करी. त्याचा बालाघाट प्रांत निजामास देण्याचा विचार इंग्रजांनीं केला होता. हें त्याला खपलें नाहीं. या कारणांकरितां कॉर्नवॉलिसनें टिपूशीं युद्ध करण्याचें ठरवून त्याच्या विरुद्ध त्यानें निजाम व मराठे यांच्याशीं तह केला. याला 'त्रिवर्गांची जूट' असें म्हणतात. या युद्धानंतर जो फायदा होईल तो त्रिवर्गांनीं वांटून घ्यावा असें त्या तहांत ठरलें होतें. या युद्धांत अनेक मोहिमा झाल्या. स्वतः कॉर्नवॉलिस श्रीरंगपट्टणवर चालून गेला होता. हरिपंत फडके व परशुराम-भाऊ मराठ्यांतर्फे सैन्यासह त्याच्या मदतीस आले होते. शेवटीं टिपूचा पराभव होऊन सन १७९२ मध्यें श्रीरंगपट्टण येथें तह झाला. त्या तहांत ठरल्याप्रमाणें टिपूनें आपला अर्धा मुलूख व युद्धखर्चाकरितां तीन कोट रुपये त्रिवर्गांस देण्याचें कबूल केलें.

६. सर जॉन शोअर (१७९३–९८):—सन १७९३ मध्यें कौन्सिलचा वरिष्ठ सभासद सर जॉन शोअर याजकडे आपलें काम सोंपवून लॉर्ड कॉर्नवॉलिस विलायतेस निघून गेला. शोअरचीच पुढें गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. शोअर अलिप्तपणाच्या धोरणाचा कट्टा पुरस्कर्ता होता व त्या धोरणाचा अक्षरशः त्यानें अवलंब केला. त्या धोरणाचीं तत्त्वें अशीं. (१) एतद्देशीय संस्थानांच्या कारभारांत इंग्रजांनीं पडूं नये. (२) एतद्देशीय राजांनीं आपलीं भांडणें आपापसांत मिटवावीं. (३) कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं हिंदुस्थानांत जास्त मुलूख मिळवून आपली जबाबदारी वाढवूं नये. (४) लढाई करणेंच झाल्यास ती स्वसंरक्षणार्थ करावी. या धोरणाप्रमाणें सर जॉन शोअर शब्दशः वागणारा होता. सन १७९५ मध्यें निजाम व मराठे यांच्यामध्यें खर्डें येथें लढाई झाली. त्यावेळीं निजामानें मागील तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रजांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मदत मागितली. अलिप्तपणाच्या धोरणास अनुसरून शोअरनें ती मदत त्याला दिली नाहीं. यामुळें निजामाचा पराभव झाला. त्यामुळें त्याच्या मनांत इंग्रजांबद्दल वैषम्य उत्पन्न झालें होतें. तेव्हां त्यानें इंग्रजांची फौज काढून टाकून आपल्या पदरीं फ्रेंचांची फौज ठेवून दिली. अर्थात निजामाच्या दरबारीं असलेलें इंग्रजांचें वर्चस्व व वजन नष्ट होऊन, त्या ऐवजीं तेथें फ्रेंचांचें वजन वाढलें. शिवाय इंग्रज कमजोर झाले आहेत असा सर्वांचा समज झाला.

७. इतर गोष्टी :—कंपनीच्या नोकरांनीं आपले पगार वाढवावे म्हणून अर्ज केला. तो मान्य न झाल्यास बंड करण्याची धमकीही त्यांनीं दिली. तेव्हां त्यांचा बंडावा शोअरनें मोडला. सन १७९७ मध्यें अयोध्येचा वजीर असफउद्दौला मेला. तेव्हां त्याचा भाऊ सादतअली यास शोअरनें वजिरी दिली. शिवाय त्याच्याजवळ फौज ठेवण्यांत आली; व तिचा खर्च म्हणून ७६ लक्ष रुपये त्यानें त्याच्याजवळ मागितले. अशी कामगिरी करून सर जॉन शोअर सन १७९८ मध्यें विलायतेस गेला. सन १७९३ मध्यें कंपनीच्या सनदेची फेरतपासणी झाली. त्यावेळीं हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची सर्वांस मोकळीक देण्यांत आली. यानंतर कंपनीची सनद आणखी वीस वर्षांनीं वाढविण्यांत आली.

अ भ्या स

१. कॉर्नवॉलिसच्या सुधारणा सांगा. कायमधारा पद्धति त्यानें कां सुरू केली ? तिचे गुणदोष सांगा.

२. अलिप्तपणाचें धोरण म्हणजे काय ? इंग्रजांनीं तें धोरण कां स्वीकारलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

३. लॉर्ड कॉर्नवॉलिसच्या कारकीर्दीचें थोडक्यांत समालोचन करा.

४. अलिप्तपणाचें धोरण योग्य कीं चढावाचें धोरण योग्य या विषयावर तुमच्या चर्चामंडळांत वादविवाद करा व चर्चेचे मुद्दे लक्षांत घेऊन त्यावर एक निबंध लिहा.

५. शोअरनें अलिप्तपणाचें धोरण कां स्वीकारलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारे

१. कायमधारा पद्धति—१७८९.

'सर्व जमीन सरकारच्या मालकीची आहे व सरकारनें जमीनदार व तालुकदार यांस ती खंडानें दिली आहे; अर्थात ते केवळ सरकारी अधिकारी झाले आहेत,' असा कांहीं लोकांचा समज आहे. कसेंही असलें तरी आमच्या मतें कायमधारा पद्धतीमुळें जमीनदार व तालुक्दार यांच्याकडे जमिनीच्या मालकीचा थोडा तरी अंश येतो खास. नव्या पद्धतीमुळें अनेक फायदे सिद्ध झाले आहेत. जमीनदार आपल्या जमिनीचे कायमचे मालक झाल्यानें त्यांच्यामध्यें जमिनीबद्दल आपलेपणाची भावना उत्पन्न झाली आहे. त्यामुळें ते आपल्या जमिनींत अनेक सुधारणा करून जमिनीचें उत्पन्न अधिक वाढविणें त्यांस शक्य झालें आहे. या अधिक उत्पन्नांतून सरकारला कांहींही वांटा मिळावयाचा नाहीं, याची त्यांस खात्री आहे. अर्थात त्यामुळें शेतीची सुधारणा होईल व व्यापार भरभराटेल. आपल्या शेतकऱ्यांवर जबर खंड लादून त्यांची पिळवणूक करणें जमीनदारांस आवडेनासें होईल. त्यामुळें शेतकरीही नेहमीं आनंदांत व समाधानांत राहून तो शेतीची निगा चांगली राखील. देशांत संपत्ति खेळूं लागल्यानें देशाच्या लोकसंख्येंतही भर पडते. या वाढलेल्या लोकांचे श्रम शेती सुधारण्यास खर्चीं तरी पडतील किंवा देशांत इतर उद्योगधंदे वाढण्यास मदत होईल. एकंदरींत पाहतां या नव्या पद्धतीनें कनिष्ठ वर्गाला समाधानी लाभेल, मध्यम व वरिष्ठ वर्गांची भरभराट होईल व सरकारलाही दरसाल नियमित खंड वेळच्यावेळीं मिळत जाईल.

—कलकत्ता गॅझीटवरून–ता. २१-५-१७८९.

प्रश्न :—१. कायमधारा पद्धतीचे कोणते फायदे वर सांगितले आहेत ? ते खरे होते ?

२. शोअरला वेलस्लीचें सर्टिफिकेट

जन्म हलक्या कुळींत, संवयी जडलेल्या गांवढळ, प्राच्य प्रघात अंगांत खिळलेले, भेदरट व अव्यवस्थित वळणाची बुद्धि, त्यांतून प्रकृति तर अगदींच खालावलेली आणि स्वभाव मूळचा आळशी. अशा इसमाचे हातून पराक्रम तो काय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्हायचा तें दिसतेंच आहे ! सर्व देशांत या टोंकापासून त्या टोंकापर्यंत शिस्त व दरारा यांचा मागमूसही हल्लीं आढळत नाहीं. खुद्द कलकत्त्यांतच गव्हर्नर जनरलची टर उडत आहे, मग बाहेरचें काय विचारावें ! मी मात्र यापासून निराळाच बोध घेतला आहे. प्रत्येक बाबतींत या स्थानाची आदब भरपूर सांभाळली पाहिजे; दरबार, डामडौल, मानपान इत्यादी हरेक बाबतींत अणुरेणूइतकेंही न्यून पडूं द्यायचें नाहीं अशी मी कडक शिस्त खासगी वागणुकींत देखील चालू केली आहे. जिकडे तिकडे धाक व दरारा यांचें प्रदर्शन मी चालविलें आहे. लोकांना तर मी चळचळां कांपायला लावलें आहे !

प्रश्न :—१. शोअर व वेल्स्ली यांच्या मनोवृत्तींतील फरक कोणता आहे ? त्याचा त्यांच्या कारभारावर काय परिणाम झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५५. लॉर्ड वेल्स्ली (१७९८–१८०५)

१. लॉर्ड वेल्स्ली :— शोअरच्या मागून लॉर्ड वेल्स्ली याची बंगालचा गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. कंपनीच्या नियामकमंडळावर त्यानें चार वर्षें काम केलें होतें. त्यामुळें त्याला हिंदुस्थानाच्या कामकाजाची माहिती झाली होती. त्याचा स्वभाव करारी व निश्चयी होता. त्याचा आत्मविश्वासही दांडगा होता. स्वतःचा बडेजाव मिरविण्याची व शब्दांचें अवडंबर माजविण्याची त्याला फार हौस होती. अलिप्तपणाचें धोरण सोडून देऊन चढावाचें धोरण स्वीकारावें असें तो म्हणत असे. आर्थर वेल्स्ली ऊर्फ वेलिंग्टनचा ड्यूक हा त्याचा सख्खा भाऊ होय. तोही हिंदुस्थानाचा सेनापति म्हणून त्याच्याबरोबर इकडे आला होता.

२. तत्कालीन परिस्थिति :— युरोपांत इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत त्यावेळीं युद्ध सुरू होतें. त्याच वेळीं वेल्स्ली इकडे आला. त्यावेळची हिंदुस्थानाची परिस्थिति अत्यंत बिकट होती. मराठे पुढें सरसावले होते; तरीही त्यांची सत्ता अत्यंत खिळखिळी झाली होती. मोंगल बादशाही जवळ जवळ नामशेष झाली होती. शिंदे, होळकर, भोसले वगैरे मराठे सरदार आपल्या मुलुखांत स्वतंत्रतेनें वागूं लागले होते. त्यांनीं आपल्या लष्करास युरोपियन पद्धतीचें लष्करी शिक्षण फ्रेंच अधिकाऱ्यांकरवीं देण्यास सुरुवात केली होती. इंग्रजांचें राज्य जोरांत होतें. तरी शोअरनें अलिप्तपणाचें धोरण स्वीकारल्यानें त्यांची प्रतिष्ठा बरीच कमी झाली होती. शिवाय कर्नाटकचा नबाब, म्हैसूरचा टिपू, अयोध्येचा वजीर वगैरे लोक इंग्रजांचा द्वेष करूं लागले होते. खर्ड्यांच्या लढाईच्या वेळीं इंग्रजांनीं मदत दिली नाहीं म्हणून निजाम इंग्रजांवर जळफळत होता. टिपूनें तर इंग्रजांचें हिंदुस्थानांतून उच्चाटण करण्याकरितां चंग बांधला होता. हिंदुस्थानांत इंग्रजांविरुद्ध त्यानें मुसलमानांचा एक संघ घडवून आणला होता. आपल्या मदतीकरितां त्यानें अफगणिस्थानचा बादशाह झमानशाह व फ्रान्सचा नेपोलियन यांस बोलाविलें होतें. त्या दोघांनींही त्याचें बोलावणें मान्य केलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. इजिप्तपर्यंत नेपोलियन आलाही होता. अशी स्थिति असतांच लॉर्ड वेल्स्ली गव्हर्नर जनरल झाला.



नेपोलियन बोनापार्ट

३. वेल्स्लीचें ध्येय व धोरण:—हिंदुस्थानांत आल्याबरोबर वेल्स्लीनें या सर्व परिस्थितीचा बारकाईनें अभ्यास केला. या परिस्थितींतून इंग्रजांचें राज्य निभावून नेऊन त्याला साम्राज्याचें स्वरूप देण्याचें त्यानें ठरविलें होतें. अर्थात हें ध्येय साध्य करून घ्यावयाचें असेल तर अलिप्तपणाचें धोरण टाकून देऊन चढावाचें धोरण स्वीकारणें योग्य होय असें त्यानें ठरविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याकरितां या देशांतील राजांचे त्यानें निरनिराळे वर्ग करून प्रत्येकास निरनिराळ्या मार्गांनें वठणीवर आणावयाचें त्यानें ठरविलें. ते वर्ग असे (१) स्नेह्याच्या नात्यानें आटोक्यांत येणारे राजे; या वर्गांत निजाम, गायकवाड, अयोध्येचा वजीर हे होते. (२) जे पुढेंमागें शिरजोर होणार होते ते; या वर्गांत टिपू, शिंदे, होळकर वगैरे मोडत होते. (३) जे निर्माल्यवत् होते त्यांचा तिसरा वर्ग. या सर्वांशीं एकदम लढणें शक्य नव्हतें. तेव्हां पहिल्या वर्गांतील लोकांशीं त्यानें प्रथम स्नेहाचे तह करून त्यांस वश करून घेतलें. दुसऱ्या वर्गांतील लोकांचा बंदोबस्त करण्याची त्यानें तयारी केली. अर्थात त्यांच्याशीं त्याला युद्धें करावीं लागलीं. तैनाती फौजेच्या जोरावर त्यानें कांहींस आपलें मांडलिकत्व स्वीकारावयास लावलें व कांहींचीं राज्यें त्यानें खालसा केलीं.

४. तैनाती फौजेची पद्धति :—आपल्या राज्यास साम्राज्याचें स्वरूप देण्याकरितां वेल्स्लीनें ज्या पद्धतीचा विशेष अवलंब केला ती पद्धति म्हणजे तैनाती फौजेची पद्धति होय. या प्रकारच्या फौजेचा पूर्वी क्लाइव्ह, हेस्टिंग्ज वगैरेंनीं थोडा उपयोग केला होता. परंतु वेल्स्लीनें त्या पद्धतीला जोरानें चालना देऊन इंग्रजांचें राज्य वाढविलें. मराठ्यांच्या राज्याचा फैलाव होण्यास ज्याप्रमाणें चौथाई व सरदेशमुखी या हक्कांचा फार उपयोग झाला, त्याप्रमाणेंच इंग्रजांसही तैनाती पद्धतीचा राज्यवृद्धीच्या कामीं फार उपयोग झाला. किंबहुना तिच्या जोरावरच इंग्रजांनीं आपल्या राज्यास साम्राज्याचें स्वरूप दिलें. या फौजेचा जो कोणी स्वीकार करील त्याला खालील अटी मान्य कराव्या लागत. (१) ही फौज ठेवणारानें इंग्रजांचें सार्वभौमत्व मान्य करावें. (२) फौजेच्या खर्चाबद्दल त्यानें ठराविक खंडणी द्यावी अगर मुलूख तोडून द्यावा. (३) इंग्रजांच्या परकीय शत्रूंस त्यानें आपल्या नोकरींत ठेवूं नये. (४) त्यानें परभारें कोणाशींही युद्ध अगर तह करूं नये. आपापसांतील तंट्यांचा निकाल इंग्रज देतील तो त्यानें मान्य करावा. (५) इंग्रजांस लागेल तेव्हां व वाटेल तेथें ही फौज हलविण्याचा अधिकार असावा. या अटींचा स्वीकार करणारा इंग्रजांचा मांडलिक होई. ठिकठिकाणीं सैन्याची उभारणी होऊन व सैन्याचा खर्च परभारें भागून इंग्रजांचें लष्करी सामर्थ्य वाढण्यास या पद्धतीचा फार उपयोग झाला!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. तैनाती फौजेची अंमलबजावणी :—(१) शोअरच्या वेळेपासून निजाम इंग्रजांचा शत्रू बनला होता. तेव्हां वेल्स्लीनें प्रथमतः सामोपचारानें



व पुढें धाकदपटशानें त्याच्या पदरची फ्रेंच फौज काढून टाकण्यास त्याला भाग पाडलें. या कामीं निजामाचा दिवाण मशीरुन्मुल्क याची त्याला फार मदत झाली. शेवटीं निजामानें इंग्रज फौज आपल्या पदरीं ठेवण्याचें कबूल केलें. याप्रमाणें निजाम पुन्हां एकदां इंग्रजांचा अंकित झाला. अर्थात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें टिपूचा एक प्रबळ मद्दतनीस त्याच्या संघांतून फुटला. (२) सन १८०२ मध्यें बाजीराव इंग्रजांच्या आश्रयास आला होता. तेव्हां त्याच्याशीं वसईचा तह करून वेल्स्लीनें त्यालाही आपल्या अंकित करून घेतलें. (जास्त माहितीकरितां पान ४०२ पहा). (३) यापूर्वींच बडोद्याच्या गायकवाडानेंही इंग्रजांशीं तह करून त्यांची तैनाती फौज आपल्या पदरीं ठेवून घेतली होती (१८०२). या कामीं गायकवाडाचा दिवाण रावजी आप्पाजी याचा इंग्रजांस फार उपयोग झाला. (४) अयोध्येचा वजीर इंग्रजांस जुमानीत नव्हता. शोअरनें त्याला दुखविलें होतें. तेव्हां त्याची समजूत घालून त्याच्या पदरीं वेल्स्लीनें आपली तैनाती फौज ठेवून दिली. या कामीं वेल्स्लीला थोडी जबरदस्ती करावी लागली. मात्र फौजेच्या खर्चाकरितां त्यानें वजीराचे एक कोट रुपये उत्पन्नाचे कोरा, अलाहाबाद व रोहिलखंड हे प्रांत आपल्याकडे घेतले. या गोष्टींमुळें इंग्रजांची सत्ता जोरकस झाली.

६. राज्यें खालसा :—(१) सन १७७१ मध्यें तंजावरचें राज्य इंग्रजांनीं खालसा केलें होतें. परंतु तें कृत्य डायरेक्टरमंडळास पसंत पडलें नाहीं. तेव्हां सन १७७६ मध्यें तें राज्य तुळजाजी भोसले याला परत देण्यांत आलें. मात्र त्याच्या पदरीं तैनाती फौज ठेवून देण्यांत आली व तिच्या खर्चाकरितां इंग्रजांनीं २७७ गांवें घेतलीं. पुढें तुळजाजी सन १७८७ मध्यें वारला. तेव्हां त्याचा भाऊ अमरसिंह यास राज्यावर बसविण्यांत आलें. त्याचा कारभार नीट नव्हता. तेव्हां त्याला सन १७९९ मध्यें पदच्युत करण्यांत येऊन तंजावरचें राज्य वेल्स्लीनें खालसा केलें. मात्र योग्य वारसास त्यानें नेमणूक ठरवून दिली. (२) कर्नाटकचा नबाब मोहंमदअली सन १७९५ मध्यें वारला. त्याचा मुलगाही सन १८०१ मध्यें वारला. तेव्हां वेल्स्लीनें त्याचें राज्य खालसा करून वारसास नेमणूक करून दिली. (३) सन १७९९ मध्यें सुरतेचा नबाब वारल्यानें त्याचें राज्य खालसा करण्यांत आलें.

७. म्हैसूरशीं चौथें युद्ध (१७९९) :—शिरजोरांशीं युद्धें करून त्यांस वठणीवर आणण्याचें वेल्स्लीनें ठरविलें होतें. अशा राजांमध्यें म्हैसूरचा टिपू सुलतान प्रमुख होता. त्यावेळीं हिंदुस्थानांत फ्रेंचांच्या कारस्थानांस बराच ऊत आला होता. त्यांच्या मदतीनें इंग्रजांची हिंदुस्थानांतून कायमची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उच्चलबांगडी करण्याचा टिपूनें चंग बांधलेला होता. त्या दृष्टीनें त्यानें खुद्द नेपोलियन बोनापार्ट याच्याशीं पत्रव्यवहारही केला होता. शिवाय अफगाणिस्थानच्या झमानशहाशीं त्यानें संधान बांधलेलें होतें. झमानशहानें पंजाबवर स्वारी करण्याचें आश्वासनही टिपूस दिलें होतें. फ्रेंच सैन्यही मॉरिशस बेटांतून मंगळुरास येऊन उतरलें होतें.

टिपू सुल्तान

अशा स्थितींत टिपूशीं युद्ध करणें वेल्स्लीला श्रेयस्कर वाटलें व त्यानें युद्धाची तयारी जोरांत चालविली. ही बातमी टिपूस लागली. तेव्हां बाह्यात्कारीं तो इंग्रजांशीं स्नेह दाखवूं लागला. तें ओळखून तैनाती फौज स्वीकारण्याची सूचना वेल्स्लीनें त्यास केली. ती नाकारतांच वेल्स्लीनें युद्धास सुरुवात केली; व जनरल हॅरिस याला वीस हजार सैन्यासह टिपूवर पाठवून दिलें. शिवाय आर्थर वेल्स्लीही त्याच्या मदतीकरितां होताच. त्यांनीं श्रीरंगपट्टणवर स्वारी केली. त्यावेळीं जोराचा संग्राम होऊन टिपूचा पराभव झाला. लढतां लढतां रणांगणांवर तो मरून पडलेला इंग्रजांस आढळला. या विजयानें म्हैसूरचें राज्य इंग्रजांच्या हातीं आलें. तेव्हां म्हैसूरचें राज्य खालसा न करतां वेल्स्लीनें पूर्वीच्या पदच्युत घराण्यांतील कृष्णराज वोडियार यास राज्यावर बसवून त्याच्याकडे ६० लक्षांचें अर्धें राज्य दिलें. मात्र तैनाती फौजेच्या अटींनीं त्यास बांधून घेण्यास वेल्स्ली विसरला नाहीं. या युद्धाच्या कामीं निजामानें इंग्रजांस मदत केली होती. तेव्हां त्याला ३० लक्षांचा मुलूख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देण्यांत आला. पेशवा मदतीस येणार होता. तो आला नाहीं. तेव्हां त्याचा हिस्सा निजाम व इंग्रज यांनीं वांटून घेतला. टिपूच्या कुटुंबीयांस नऊ लक्षांची नेमणूक देऊन, त्यांस वेलोर येथें नजर कैदेंत ठेवण्यांत आलें.

आर्थर वेल्स्ली ऊर्फ वेलिंग्टनचा ड्यूक

८. मराठ्यांशीं युद्ध :—वसईचा तह शिंदे, होळकर व भोसले या मराठे सरदारांस मान्य झाला नाहीं. तेव्हां त्यांच्याशीं वेल्स्लीला युद्ध करावें लागलें. त्यासंबंधींची हकीकत मागें आली आहे. (पानें ४०३–४०४ पहा.) यावेळीं मराठे फार प्रबळ होते. किंबहुना ते आपल्याला सर्व सत्ताधारी म्हणवीत असत. त्यांस वेल्स्लीनें थोड्याच वेळांत वठणीवर आणलें व इंग्रजांच्या सत्तेस सार्वभौमत्व प्राप्त करून दिलें. याबद्दल त्याला अजूनही इंग्लिश लोक धन्यवाद देत आहेत. होळकरांशीं लढण्यांत लॉर्ड लेक प्रमुख सेनापति होता.

९. वेल्स्लीची योग्यता :—वेल्स्लीनें चढावाचें धोरण स्वीकारून हिंदुस्थानांत इंग्रजांची सार्वभौम सत्ता स्थापन केली. परंतु डायरेक्टरमंडळास त्याचें धोरण पसंत पडलें नाहीं. त्याच्या या धोरणानें अनर्थ उद्भवेल असें त्यास वाटलें व म्हणून होळकरांशीं युद्ध चालू असतांच वेल्स्लीला परत बोलावण्यांत आलें. त्याप्रमाणें तो सन १८०५ मध्यें इंग्लंडांत परत गेला. वेल्स्ली खंबीर मनाचा होता. माणसाची त्याला उत्तम पारख होती. त्यानें व्यापारास उत्तेजन दिलें, नौका बांधण्याचा हिंदुस्थानांत उपक्रम केला व पौर्वात्य वाङ्मय, इतिहास व काव्य यांच्या शिक्षणाकरितां एक विद्यालयही स्थापलें. तो मोठा राजकारणी मुत्सद्दी होता. डावपेंच लढवून यश मिळविण्याकडे त्याचें सर्व लक्ष असे. तो सन १८४२ मध्यें वयाच्या ब्यायशींआव्या वर्षी मरण पावला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लॉर्ड लेक

अभ्यास

१. लॉर्ड वेल्स्लीचा स्वभाव व योग्यता सांगा. त्याचें ध्येय व धोरण सांगा.

२. वेल्स्लीच्या वेळची हिंदुस्थानची परिस्थिति कशी होती ? ती त्यानें आटोक्यांत कशी आणली ?

३. तैनाती फौजेची पद्धति म्हणजे काय ? ती प्रथम कोणीं सुरू केली ? तिचा जास्त फैलाव कोणीं केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

४. लॉर्ड वेल्स्लीनें पेशवा व टिपू यांस आपल्या अंकित कसें केलें ?

५. खालीलसंबंधीं कारणें द्या.
म्हैसूरकरांशीं युद्ध, तंजावरचें राज्य खालसा, वसईचा तह.

६. 'इंग्रजांच्या राज्यास वेल्स्लीनें साम्राज्याचें स्वरूप दिलें' असें म्हणतात तें कितपत खरें आहे ? कारणें देऊन सिद्ध करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारे

१. हिंदुस्थानची स्थिति—१७९८.

प्रस्तुतच्या हिंदी राजकारणांत फार अनास्था माजून राहिली आहे. सर्वांस धाकांत ठेवणारा असा एक एकच सत्ताधीश तेथें कोणी नाहीं. यामुळें लहानमोठ्या दौलतदारांत एक प्रकारची अराजकता उत्पन्न होऊन शांतता बिघडण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. अनेकांस आपल्या बचावाची फिकीर पडली असून त्यासाठीं त्यांस सामर्थ्याबाहेर फौजा बाळगाव्या लागत आहेत. जुन्या गनिमी काव्यानें लढणाऱ्या फौजा निरुपयोगी ठरून कवायिती फौजेची वाढ होत आहे. अशा फौजा मदतीस देण्याविषयीं अनेकांच्या मागण्या इंग्रजांकडे येत आहेत. खर्ड्यांचे प्रसंगीं निजामास इंग्रजांनीं मदत न केल्यामुळें इंग्रजांविषयीं लोकांचा आदर कमी झाला आहे. अशा स्थितींत कांहीं तरी एक व्यवस्थित धोरण ठरवून त्या धोरणांत सर्व हिंदी सत्ताधीश गुंतवून घ्यावे, म्हणजे फ्रेंचांचा बंदोबस्त होऊन इंग्रजांचा निभाव हिंदुस्थानांत ठीक लागेल.

—नियामकमंडळाचा अध्यक्ष डंडास याचें वेल्स्लीला पत्र.

प्रश्न :—१. शांतता बिघडण्याचें कारण काय ? इंग्रजांची स्थिति कशी होती ? कां ?

२. वेल्स्लीची अहंमन्यता—१८००.

माझा कोणत्याही तऱ्हेचा सन्मान झालेला नाहीं व तो तसा व्हावा अशी माझी इच्छाही नाहीं. कोणीं माझ्यावर पदव्यांचा वर्षाव केलाच तर त्या मी स्वीकारीन असेंही नाहीं. माझी प्रकृति नीट नाहीं; त्यास मात्र अगदीं निराळीं कारणें आहेत. आत्यंतिक भावनेच्या अगर आत्यंतिक रागाच्या अगर त्वेषाच्या भरीं पडून मध्यंतरींच राजीनामा देऊन मी इंग्लंडला परत जाईन, असें मात्र कधींही शक्य नाहीं. उलट ज्यांनीं माझ्यावर उपकारांचें ओझें लादलें आहे तें अनेक पटींनीं वाढवून मी त्यांस लाजवीन व माझ्यावर त्यांनीं जो अन्याय केला आहे त्याचें उट्टें फेडीन. मी राज्येंच्या राज्यें जिंकीन, विजयावर विजय मिळवीन व राज्याचें उत्पन्न अनेक पटींनीं वाढवीन. वैभव, संपत्ति व सत्ता यांची मी इतकी वाढ करीन कीं माझ्या अधिकाऱ्यांस त्यांची शिसारी यावी ! माझ्यासारख्या कर्तृत्व-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वानाची आजपर्यंत उपेक्षा, हेटाळणी व अवहेलना झाली आहे. तरीही माझ्या कृतीनें मी त्यांस असें सिद्ध करून देईन कीं, कृतज्ञता म्हणजे केवळ मातीचा एक इवलासा कण होय. —वेल्स्लीचें आपल्या मैत्रिणीस पत्र.

प्रश्न :—१. वरील पत्रावरून वेल्स्लीच्या स्वाभावासंबंधीं तुम्हांस काय माहिती मिळते ? त्यानें कोणकोणते विजय व राज्यें मिळविलीं ? 'वेल्स्ली अहंमन्य होता' हें तुम्हीं कशावरून सिद्ध कराल ?

३. तैनाती फौजेचा बोजवारा—१८०५.

संस्थानिकांच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांच्याशीं तैनाती फौजेचे तह केल्यानें नवीन घोटाळे व भानगडी उत्पन्न झाल्या आहेत. बाजीरावाचेंच उदाहरण घ्या. त्याच्या रक्षणाची हमी इंग्रजांनीं घेतल्यामुळें तो कारभाराच्या जबाबदारींतून मुक्त होऊन खुशालचंद, उधळ्या व बेफिकीर बनला आहे. वसूल जमा झाला नाहीं, लोकांनीं तक्रारी केल्या, रयत व अंमलदार उघड बंड करून उठले, तरी इंग्रजांनीं त्याचा कारभार दुरुस्त करून देऊन त्याचें संरक्षण केलेंच पाहिजे !......या सत्ताधीशांचीं राज्यकारभाराचीं पूर्वीचीं सर्व सोंगें कायम राहून, त्याची जबाबदारी मात्र त्यांजवर नाहीं.......या पद्धतीनें घोटाळे माजवून ते दूर करीत बसण्यापेक्षां हीं सर्व राज्यें एकदम खालसा तीं करून इंग्रजी अंमलाखालीं आणलीं तर त्यांत रयतेचें तरी कल्याण होईल. राज्यलोभाच्या नादीं लागून इंग्रज सरकार निष्कारण सर्वांस लुबाडीत आहे, आणि न्यायान्याय त्यांनीं गुंडाळून ठेवला आहे असाच बोभाटा हल्लीं सर्वत्र ऐकूं येतो.......तेव्हां केलेल्या करारांतून हलके हलके आपला हात काढून घेऊन कारभाराची जबाबदारी ज्याची त्याजवर टाकणें एवढाच तरणोपाय सद्यःस्थितींत मला दिसतो.

—कॉर्नवॉलिसचें वरिष्ठांस पत्र.

प्रश्न :—१. तैनाती फौजेमुळें इंग्रजांवर कोणती जबाबदारी आली ? त्यांतून सुटका करून घेण्यास कोणता उपाय कॉर्नवॉलिसनें सुचविला ?

४. तैनाती फौजेचा बोजवारा—१८०४.

मद्रास वगैरे प्रांतांत हाताशीं सदैव जय्यत फौज असल्याशिवाय वसूल पदरांत येणार नाहीं, रयतेचें संरक्षण होणार नाहीं कीं कारभार चालणार नाहीं, अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजची आमच्या मुलुखाची स्थिति आहे. मग निजाम, पेशवा इत्यादि एतद्देशीय संस्थानिकांची स्थिति आमच्याहून पन्नासपट निकृष्ट असल्यास नवल नाहीं. त्यांच्या रक्षणाची हमी आम्हीं घेतल्यानें ते स्वतः फौज ठेवीत नाहींत व आम्ही त्यांस ठेवूं देत नाहीं; म्हणून त्यांच्या मुलुखांत सदैव अंतर्गत बंडाळी व बाहेरच्या लुटारूंची धाड सारखी चालू असते. हजारों लोकांच्या टोळ्या शस्त्रें घेऊन जो कोणी नेता भेटेल त्याच्या हाताखालीं दाखल होतात आणि लूट करीत फिरतात. शेतीचा व इतर व्यवस्थित उद्योग करून पोट भरणाऱ्या रयतेचा सांभाळ कोणीच करीत नाहीं.......प्रत्येक गांवांत २५।३० तरी लोक नोकरी सुटून रिकामे झालेले, स्वतःचे घोडे बाळगून आहेत. त्यांना लुटीशिवाय निर्वाहाचें साधन कांहीं एक नाहीं. त्यांचें नियंत्रण करण्यास पेशवा व निजाम यांच्यापाशीं नाहीं फौज कीं नाहीं कायदा! मग इतर रहिवाशी शेतीचा किंवा इतर दुसरा पोटाचा धंदा करणार कसे ! प्रत्येकाच्या संरक्षणार्थ फौज कशी कोण ठेवणार! आमची सत्ता व राज्य वाढत गेलें, तसें हें नवीन अरिष्टही वाढत चाललें... कंपनीचा प्रदेशदेखील यांच्या लुटीपासून फार काळ अलिप्त राहील असें तुम्ही समजूं नका.......याला उपाय म्हणजे संस्थानिकांस स्वतंत्र फौजा ठेवण्याची मोकळीक द्यावी.......दुसरा म्हणजे सरकारी परवानगीशिवाय कोणी घोडा ठेवूं नये किंवा घोड्यावरून प्रवास करूं नये. यामुळें घोड्याची निपज थांबून लुटारूपणास आळा बसेल. —आर्थर वेल्स्लीचें भावास पत्र.

प्रश्न :—१. तैनाती फौजेनें कोणता घोटाळा उत्पन्न झाला? त्याला कोणतीं कारणें घडलीं? लुटारूपणा बंद करण्याकरितां कोणते उपाय सुचविण्यांत आले?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१७८५–१८०५.				
इंग्रज	मराठे	वर्ष	इंग्लंड	प्रमुख व्यक्ति
कॉर्नवॉलिस	सवाई माधवराव		तिसरा जॉर्ज	
१७८६–९३	१७७४–९५		१७६०–१८२०	नाना फडणीस
पिटच्या कायद्यांत सुधारणा		१७८६		धाकटा पिट
म्हैसूरशीं युद्ध		१७९०		
कायमधारापद्धति		१७९३		
सर जॉन शोअर				
१७९३–९८	खर्ड्यांची लढाई	१७९५		टिपू
	दुसरा बाजीराव			
	१७९६–१८१८			नेपोलियन
लॉर्ड वेल्स्ली				
१७९८–१८०५				
	टिपूचा अंत	१७९९		
	नानाचा मृत्यु	१८००		नेल्सन
वसईचा तह		१८०२	अमीन्सचा तह	
वेल्स्ली परत	भरतपूरचा पाडाव	१८०५	ट्रफालगरची लढाई	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५६. बार्लो—मिंटो—हेस्टिंग्ज—ॲम्हर्स्ट

१. सर जॉर्ज बार्लो (१८०५–१८०७) :—उठावाच्या धोरणाचा पुरस्कर्ता लॉर्ड वेल्स्ली हिंदुस्थानांत अनर्थ करील या भीतीनें त्याला इंग्लंडांत परत बोलावण्यांत आलें; व अलिप्तपणाचा कट्टा पुरस्कर्ता व वृद्ध मुत्सद्दी लॉर्ड कॉर्नवॉलिस यास अजीजी करून पिटनें गव्हर्नर जनरल म्हणून पुन्हां नेमलें. परंतु येथें आल्यावर तो थोड्याच दिवसांत गाझीपूर येथें सन १८०५ मध्यें मृत्यु पावला. तेव्हां सर जॉर्ज बार्लो याची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. त्याच्या वेळीं वेलोर येथें शिपायांचें एक बंड झालें (१८०५). विशिष्ट तऱ्हेचे फेटे शिपायांनीं घालावे, दाढ्या राखाव्या, गंध लावूं नये वगैरे नव्या नियमांमुळें असंतोष माजला व शिपायांनीं सुमारें १५० युरोपियनांची कत्तल केली. पुढें हें बंड मोडण्यांत आलें. मात्र त्याचा ठपका मद्रासचा त्यावेळचा गव्हर्नर लॉर्ड बेंटिंक याच्यावर ठेवण्यांत येऊन त्याला परत बोलावण्यांत आलें. त्याच्या जागीं बार्लोची नेमणूक झाल्यानें लॉर्ड मिंटो गव्हर्नर जनरल झाला (१८०७).

२. लॉर्ड मिंटो (१८०७–१८१३) :—बार्लोप्रमाणें मिंटोही अलिप्तपणाच्या धोरणाचाच पुरस्कर्ता होता. शिवाय उठावाच्या धोरणाचा अवलंब करूं नये अशी त्याला सक्त ताकीद होती. त्याच्या वेळीं वायव्यसरहद्दीवर गडबड उडणार व त्या बाजूनें फ्रेंचांचा हल्ला हिंदुस्थानावर होणार अशी इंग्रजांस भीति वाटत होती. तेव्हां सरहद्दीवरील राजांशीं मैत्री करण्याचा मिंटोनें प्रयत्न केला. हिंदुस्थानच्या वायव्यसरहद्दीवर त्यावेळीं रणजितसिंग हा शिखांचा प्रबळ राजा पंजाबमध्यें ठाण मांडून बसला होता. त्याच्या पलीकडे अफगाणिस्थानचा अमीर व त्याच्याही पलीकडे इराणचा शहा होता. या सर्वांशीं स्नेहाचे तह करण्याकरितां मिंटोनें आपले वकील पाठविले होते. सन १८०९ मध्यें रणजितसिंगाशीं तह होऊन इंग्रज व शीख यांची सतलज नदी सरहद्द मानण्याचें ठरलें; व शीख व इंग्रज यांच्यांत मैत्री स्थापन झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां इराणच्या शहाशीं सर जॉन माल्कम व अफगाणिस्थानाशीं माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांस तह करण्यास पाठविण्यांत आलें होतें. इराणच्या शहानें मैत्रीचा तह केला. अफगाणिस्थानांत भानगडी झाल्यानें तह होऊं शकला नाहीं. सन १८१३ मध्यें कंपनीच्या सनदेची फेरतपासणी झाली. त्यावेळीं खालील गोष्टी ठरल्या. (१) कंपनीची सनद आणखी वीस वर्षें वाढवावी. (२) हिंदुस्थानांतील राज्याची मालकी कंपनी व इंग्लंडचा राजा या दोघांची समाईक समजावी. (३) हिंदुस्थानाचा व्यापार सर्वांस खुला व्हावा; मात्र चीनशीं कंपनीनेंच व्यापार करावा. यानंतर लॉर्ड मिंटोची मुदत भरून तो इंग्लंडांत गेला व त्याच्या जागीं लॉर्ड हेस्टिंग्ज गव्हर्नर जनरल झाला (१८१३).

३. लॉर्ड हेस्टिंग्ज (१८१३-२३) :—लॉर्ड हेस्टिंग्ज इंग्लंडांत असतां अलिप्तपणाच्या धोरणाचा तो पुरस्कर्ता होता. हिंदुस्थानांत आल्यावर मात्र त्याचें मत बदललें. उठावाच्या धोरणाचा पुरस्कार करून त्यानें इंग्रजांचें हिंदी राज्य वाढविलें. त्याकरितां त्याला अनेक युद्धें करावीं लागलीं; व इंग्रजी राज्यास साम्राज्याचें स्वरूप देण्याचें लॉर्ड वेल्स्लीचें अर्धवट राहिलेलें कार्य त्यानें शेवटास नेलें. त्याचीं पहिलीं पांच वर्षें लढायांत गेलीं. पुढील पांच वर्षांत त्यानें साम्राज्यास स्थैर्य येण्याकरितां कांहीं सुधारणा केल्या. त्या अशा (१) शाळा व कॉलेजें स्थापून त्यानें विद्येस उत्तेजन दिलें. (२) मद्रास इलाख्यांत त्यानें रयतवारी पद्धति सुरू केली. (३) त्यानें लोकांस कांहीं नियम घालून देऊन मुद्रणस्वातंत्र्य दिलें. (४) कायमधारापद्धतींतील दोष सुधारले. (५) फर्रुखसियरनें बांधलेला यमुनेचा कालवा त्यानें दुरुस्त केला. (६) न्यायाधिशांचे पगार वाढविले. (७) कलकत्ता शहराची सुधारणा केली.

४. नेपाळशीं युद्ध (१८१४-१६) :—हिमालयाच्या दक्षिण उतरणीवर नेपाळ हा प्रांत आहे. त्यांत नेपाळी गुरखे रहात असत. जातीनें ते रजपूत होत. त्यांचा राजा काटमांडूस रहात असे. शेती व व्यापार करून ते रहात. कंपनीशींही त्यांचा व्यापार होता. परंतु पुढें गुरखे लोक आपली दक्षिण सरहद्द वाढवूं लागले. त्यामुळें त्यांच्यांत व इंग्रजांत वेबनाव होऊं लागला. तरीही त्यांचा उपक्रम थांबेना. हळूहळू २०० गांवें त्यांनीं काबीज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलीं. हें कळल्यावर हेस्टिंग्जनें त्यांच्याशीं युद्ध करण्याचें ठरवून नेपाळवर फौजा पाठविल्या. गुरखे शूर व लढाऊ वृत्तीचे असल्यानें प्रथमतः त्यांस जिंकणें इंग्रजांस थोडें अवघड गेलें. परंतु पुढें इंग्रजांनीं त्यांच्यावर तीन



डेव्हिड ऑक्टरलोनी

बाजूंनीं हल्ला करून त्यांस पराभूत केलें. शेवटीं सन १८१६ मध्यें सेगोली येथें उभयतांत तह होऊन युद्ध थांबलें. या युद्धानें इंग्रजांस जो थोडा डोंगरी मुलूख मिळाला त्यांत सिमला, मसूरी, नैनीताल वगैरे हवा खाण्याचीं उत्तम ठिकाणें मिळालीं. तसेंच शूर व लढवय्ये गुरखे इंग्रजांच्या लष्करांत राहूं लागले. शिवाय नेपाळची सरहद्द ठरल्यानें तिकडून होणारा त्रास कायमचा बंद झाला.

५. पेंढाऱ्यांशीं युद्ध (१८१७) :—मोंगल बादशाहीच्या पडत्या काळांत पेंढाऱ्यांनीं हिंदुस्थानांत धुमाकूळ माजविला होता. माळवा ते गुजराथ-पर्यंतच्या भागांत त्यांचा उपद्रव फार होई. पेंढाऱ्यांमध्यें सर्व धर्मांचे लोक होते. व्यवस्थितपणें लुटालूट करावी, लोकांस भरपूर उपद्रव द्यावा व आपली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुजराण करावी हा त्यांचा मुख्य धंदा. तट्टांवर स्वार व्हावें, दिवसभर पन्नास पन्नास मैलांच्या मजला सहज माराव्या, वाटेल तेथें वाटेल तितकी लूट करावी व लष्कर येण्यापूर्वीच त्याच्या टप्प्याबाहेर पळून जावें हा त्यांचा नित्यक्रम होता. शिंदे-होळकरांची त्यांस फूस होती व ते त्यांची



वारंवार मदत घेत असें म्हणतात. पुढें पुढें हे लोक इंग्रजांच्या मांडलिकांस त्रास देऊं लागले. निजामाच्या राज्यावर व उत्तरसरकार प्रांतावरही त्यांची धाड कोसळली होती. तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याचें हेस्टिंग्जनें ठरवून त्यांच्यावर त्यानें चोहोंबाजूंनीं फौज पाठविली. पेंढाऱ्यांस गराडा घालून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रज फौजेनें त्यांस कोंडींत पकडलें. त्यामुळें पेंढाऱ्यांचे पुढारी अमीरखान व गफूरखान हे शरण आले. त्यांस इंग्रजांनीं जहागिरी दिल्या. मात्र वासील महंमद व छट्टू या त्यांच्या दुसऱ्या दोन पुढाऱ्यांचा नाश झाला.

६. मराठ्यांशीं युद्ध (१८१७-१८१८):—वसईच्या तहानें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरितां बाजीराव प्रयत्न करीत होता. परंतु त्याचीं सर्व कारस्थानें इंग्रजांस समजून युद्धास सुरुवात झाली. त्यांत बाजीरावाचा पराभव झाला व इंग्रजांची नेमणूक घेऊन ब्रह्मावर्त येथें त्याला हरिहरि करीत बसावें लागलें. या संबंधाची हकीकत मराठ्यांच्या भागांत पानें ४०५-०६ वर दिली आहे ती पहा.

७. लॉर्ड अॅम्हर्स्ट (१८२३-१८१८):—लॉर्ड हेस्टिंग्ज सन १८२३ मध्यें स्वदेशीं निघून गेला. त्यानंतर लॉर्ड अॅम्हर्स्ट याची त्याच्या जागेवर गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. त्याच्या कारकीर्दीत ब्रह्मदेशाशीं युद्ध झालें. इंग्रजांनीं बंगाल प्रांत जिंकला त्याचवेळीं अलोंपारा या शूर व धाडसी ब्रह्मी माणसानें ब्रह्मदेश जिंकून त्याचें एकीकरण केलें होतें. पुढें ब्रह्मी लोक इंग्रजांच्या मुलुखांत आक्रमण करूं लागले. आसाम, काचार, मणिपूर हे प्रांत व सिल्हट व चितगांव हे इंग्रजांचे जिल्हे त्यांनीं काबीज केले. ब्रह्मी लोकांनीं आराकान प्रांत जिंकून घेतला त्यावेळीं तेथील कांहीं लोक इंग्रजांच्या आश्रयास गेले होते. त्यांस ब्रह्मी लोकांनीं परत मागितलें; परंतु इंग्रजांनीं ती गोष्ट नाकारली. त्याचवेळीं शहापूर बेट आपलें आहे असें समजून ब्रह्मी लोकांनीं तेथील इंग्रजांस हुसकून लावलें. इंग्रजांनीं फौज पाठवून तें ठिकाण पुन्हां जिंकून घेतलें. या सर्व गोष्टींचा सलोख्यानें निर्णय लावावा असें इंग्रजांनीं सुचविलें; परंतु ब्रह्मी राजानें ती गोष्ट नाकारली. तेव्हां लॉर्ड अॅम्हर्स्टनें त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारलें. प्रथमतः इंग्रजांचें फार नुकसान झालें; परंतु पुढें इंग्रजांस विजय प्राप्त झाला. अखेरीस सन १८२६ सालीं येंदाबू येथें तह होऊन युद्ध संपलें. त्या तहानें तेनासरीम, आराकान व आसाम हे प्रांत इंग्रजांस मिळाले. त्यामुळें हिंदुस्थानाची ईशान्य दिशा बिनधोक होऊन त्या बाजूनें परचक्राचें भय राहिलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. भरतपूरच्या जाटांशीं युद्ध (१८२६):—जाट लोक मूळचे सीथियन जातीचे होते. जे पंजाबांत राहिले ते शीख झाले. बाकीच्यांनीं भरतपूर येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें. सुरजमल्ल जाट हा पराक्रमी जाट राजा अठराव्या शतकांत होऊन गेला. तो मेल्यावर त्याचे वंशजांनीं इंग्रजांशीं दोस्तीचे तह केले होते. ॲम्हर्स्टचे कारकीर्दीत भरतपूरच्या गादी-बद्दल तंटे उत्पन्न झाले. त्यांत इंग्रजांनीं हात घातला. दुर्जनसाल हा बाल जाट राजा बळवंतसिंह याचे हाल करीत होता व त्याला दूर करून स्वतःच गादीवर बसण्याचा त्याचा इरादा होता. बळवंतसिंहास इंग्रजांनीं गादीवर बसविलें होतें. तेव्हां त्याची बाजू घेऊन बंड करणाऱ्या दुर्जनसालास त्यांनीं कैदेंत ठेवलें. पुढें लॉर्ड ॲम्हर्स्ट सन १८२८ मध्यें विलायतेस गेला. तेव्हां लॉर्ड विल्यम बेंटिंक याची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली.

अभ्यास

१. पेंढारी लोक कोण होते? त्यांच्याशीं युद्ध करण्याचें कारण काय?
२. नेपाळ व ब्रह्मदेश यांशीं इंग्रजांनीं युद्ध कां केलें? त्याचा परिणाम काय झाला?
३. अलिप्तपणाच्या धोरणाचा पुरस्कर्ता असतांही लॉर्ड हेस्टिंग्जनें उठावाचें धोरण कां स्वीकारलें? त्याचा परिणाम काय झाला?
४. टिपणें करा. वेलोरचें बंड, हेस्टिंग्जच्या सुधारणा, भरतपूरचा दुर्जनसाल.

उतारे

१. पेंढारी लोक

'मल्हारराव व तुकोजी होळकर यांच्या काळीं पेंढाऱ्यांचा उदय झाला. मराठ्यांच्या लष्करांतच त्यांचा स्वतंत्र तळ असे. मराठी मुलुखांत लूट करण्याची त्यांस मनाई असे; मात्र त्याकरितां त्यांस दिवसास प्रत्येकीं चार आणे भत्ता मिळे. याशिवाय पेंढारी लोक घोड्यांवरून अगर बैलांवरून गवत, धान्य, लांकूड वगैरे माल नेत व तो लष्करास विकून पैसा उभा करीत. ज्यावेळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लूट करण्याची त्यांस परवानगी मिळे, व ती बहुधा शत्रूच्या मुलखांतच मिळे, त्यावेळीं त्यांस मिळत असलेला भत्ता बंद करण्यांत येई.'

'पेंढाऱ्यांचा आपल्या पुढाऱ्यावर अत्यंत विश्वास असे. जिवंत जीव असेतों ते अनंत हालअपेष्टा भोगतील, परंतु आपल्या पुढाऱ्याशीं बेइमानानें कधींही वागणार नाहींत. पेंढाऱ्यांच्या कांहीं पुढाऱ्यांनीं भटकण्याच्या व लुटमार करण्याच्या धंद्यास वाहून घेतलें, अनेक आपत्ति सोसल्या, उपाशी पोटीं काळ कंठला व दुःखें, संकटें व मृत्यु यांस कवटाळण्यासही कमी केलें नाहीं. या सर्व बाबतींत त्यांच्या अंगची चिकाटी व स्वातंत्र्यप्रेम उत्कटत्वानें निदर्शनास येतें. कांहीं खेड्यांतील लोक त्यांचा उच्छेद होऊं नये व त्यांची बातमी इंग्रजांस लागूं नये म्हणून कसोशी बाळगीत हें आश्चर्यकारक होय!

प्रश्न:—१. पेंढारी लोक कोण होते? त्यांचा धंदा कोणता? त्यांच्या अंगीं कोणते गुण होते? इंग्रजांनीं त्यांचा नायनाट कां केला? 'तैनाती फौजेमुळें पेंढाऱ्यांचें फावलें' हें म्हणणें बरोबर होईल काय? कां?

२. नेपाळच्या गुरख्यांचा पराक्रम—१८१५.

आपल्यापेक्षां पराक्रमी शत्रूशीं आपली सध्यां गांठ पडलेली आहे; त्यामुळें हातीं घेतलेल्या कामांत आपल्यावर काय प्रसंग ओढवेल तें सांगतां येणार नाहीं. आपली फौज संख्येनें जास्त असूनही, केवळ काठ्या व दगड यांच्या मदतीनें गुरख्यांनीं आपल्याला मागें हटविलें असल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत. शिवाय हातीं तरवारी घेऊन व आपल्या फौजेचा पाठलाग करून तिला मेंढ्यांप्रमाणें मागें हटविण्याचा पराक्रमही गुरख्यांनीं केलेला आहे. एका लढाईंत आपला संपूर्ण पराभव झाला असतां, आपलेच लोक शत्रूपेक्षां जास्त मेल्याचें दिसून आलें! या सर्व गोष्टींमुळें आपला ऱ्हासकाळ समीप आला असें मला वाटूं लागलें आहे; कारण ज्या लष्करी सामर्थ्यावर आपला भरंवसा तेंच डळमळूं लागलें. या (नेपाळच्या) युद्धांत आपली फौज असंख्य असली तरी आपल्या शत्रूच्या ठिकाणीं कौशल्य व पराक्रम जास्त आहे यांत शंका नाहीं.

—मेटकाफ्‌चे उद्गार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. इंग्रजांशीं तह करूं नये—१८१५.

इंग्रजांनीं या युद्धासाठीं आज कैक दिवस केवढी प्रचंड तयारी केली आहे हें आपण जाणतां. अशा स्थितींत एवढासा अल्प मोबदला घेऊन त्यांचें समाधान होईल असें आपणांस कसें वाटतें ? कदाचित् ते आज या गोष्टी यंदा कबूल करतील आणि मागाहून टिपूसारखी आपली अवस्था करतील. प्रथम त्यांनीं टिपूचा अर्धा मुलूख व सहा कोटी रुपये घेतले आणि पुढें अल्पकाळांत त्याचें सगळें राज्य घशांत घातलें ! आज आपण त्यांना थोडा प्रदेश देऊं खरा, पण पुन्हां उद्यां ते कांहीं तरी खुसपट काढतील आणि जास्त मुलूख मागतील....... लष्करीदृष्टीनें आम्ही जर का कमी झालों तर त्यांच्या वकिलातीचें बुजगावणें पुन्हां सुरू होईल. तें आम्ही नाकारलें तर व्यापाराच्या सवलती ते मागतील. नुसता व्यापार करण्यास ते कधींही कबूल होणार नाहींत. बरोबर फौज घेऊन येतील. प्रथम फक्त एक लहानशी तुकडीच आणतील, तिच्यामागून सबंध पलटण येईल व पुढें सर्व फौजच आपल्या सरहद्दीवर येऊन धडकेल. आपण त्यांचा विश्वास बिलकूल धरूं नका.......आपण तहाचें बोलणें सोडून द्या व सर्व ठिकाणच्या सेनानायकांस शिकस्तीनें लढण्याचे हुकूम सोडून धीर धरण्यास सांगा. वरच्या डोंगराळ प्रदेशांत चढून येण्याची इंग्रजांची छाती नाहीं. खालच्या दलदलीच्या प्रदेशांत ते पाहिजे तितका धुमाकूळ घालोत. हलके हलके तेथूनही त्यांस आपण हुसकावून देऊं.

—गुरखा सेनापति अमरसिंह याचें आपल्या पुत्रास पत्र.

प्रश्न :—१. गुरखे लोक इंग्रजांशीं तह करण्यास कां तयार नव्हते ? वरील पत्रांत इंग्रजांचे कोणते गुण व धोरण दर्शविलें आहेत ?

४. इंग्लिश रेसिडेंटचा पराक्रम

‘ तुम्ही स्वतंत्र राजे आहां ’ असें आम्ही तहांत कबूल करतों व नंतर येथील राजांच्या दरबारीं आम्ही आपला रेसिडेंट ऊर्फ वकील पाठवितों. वकील या नात्यानें त्यानें तटस्थ राहिलें पाहिजे; परंतु तसें न करतां तो सर्व सत्ताधारी अरेराव बनतो, राजांच्या खासगी व्यवहारांतही वाटेल ती ढवळाढवळ करतो, असंतुष्ट प्रजेस राजाविरुद्ध बंडास प्रवृत्त करतो व आपल्या सत्तेची शेखी मोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिमाखानें मिरवितो. आपल्या कृत्यास आमच्या सरकारचा पाठिंबा मिळविण्याकरितां तो एकादें प्रकरण आमच्याकडे पाठवितो. त्या प्रकरणाची तड कशी लावावयाची तें त्यानें अगोदर लिहून टाकलेलें असतें. त्याप्रमाणें आम्हींही त्या प्रकरणाचा निकाल लावतों; एवढेंच नव्हे तर आमच्या रेसिडेंटाच्या सर्व कृत्यांसही आमची पूर्ण संमति असल्याचें दर्शवितों. मयत संस्थानिकाच्या गादीवर कोणास बसवावयाचें हा प्रश्न आला कीं मोठा लाग साधण्याचाच प्रसंग तो!

—लॉर्ड हेस्टिंग्जच्या खाजगी डायरीवरून.

प्रश्न :—१. देशी संस्थानांत इंग्रज़ आपला प्रवेश कसा करून घेत ?

कालादर्श—१८०५-१८२८

इंग्रज	मराठे	वर्ष	इंग्लंड	प्रमुख व्यक्ति
		१८०६		
		१८०७		
		१८१३		
		१८१४		
		१८१७		
		१८१८		
		१८२६		
		१८२८		

प्रश्न :—वरील कालादर्श तयार करा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५७. लॉर्ड विल्यम बेंटिंक (१८२८–१८३५)

१. लॉर्ड विल्यम बेंटिंक :—सन १८०७ मध्यें मद्रासचा गव्हर्नर असतां ठपका देऊन ज्याला कंपनीनें नोकरींतून कमी केलें होतें, तो लॉर्ड विल्यम बेंटिंक सन १८२८ मध्यें गव्हर्नर जनरल होऊन हिंदुस्थानांत आला. त्यानें लढायांमध्यें वेळ न घालवितां इंग्रजी साम्राज्याच्या दृढीकरणार्थ खटपट केली. त्याच्या कारकीर्दीपासूनच इंग्रजांचें लक्ष भक्कम सुधारणांकडे वळूं लागलें. बेंटिंकनें आपल्या सात वर्षांच्या कारकीर्दींत हिंदूंतील क्रूर चाली बंद केल्या, जातिभेदास चाट दिली, लोकांस योग्य तें शिक्षण देऊन त्यांस ज्ञानरूपी ठेवा साध्य करून देऊन त्यांचा बौद्धिक व नैतिक विकास होण्यास मदत केली. या दृष्टीनें त्यानें ज्या निरनिराळ्या सुधारणा केल्या, त्यामुळें त्याचें नांव अजरामर होऊन राहिलें आहे. त्याच्या वेळेपासूनच हिंदुस्थानांत नवा मनू सुरू झाला. तो त्याच्या सुधारणांमुळें होय. तोच 'हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर' जनरल म्हणून समजला जातो.

२. सामाजिक सुधारणा :—(१) प्राचीन कालापासूनच नवरा मेल्यावर त्याच्या स्त्रीनें सती जाण्याची चाल हिंदूंमध्यें रूढ होती. हिंदु स्त्रिया अत्यंत स्वखुषीनें आपल्याला आपल्या पतीच्या प्रेताबरोबर जिवंतपणीं जाळून घेत; परंतु पुढें या बाबतींत त्यांच्यावर सक्ति होऊं लागली. अकबरानें ही चाल बंद करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. एकदां एका वर्षीं खुद्द बंगाल्यांत ८०० स्त्रिया सती गेल्याचा दाखला आहे. तेव्हां सन १८२९ मध्यें बेंटिंकनें ' सती जाणें ' हा कायद्यानें गुन्हा ठरविला. सतीस प्रवृत्त करणाराही गुन्हेगार समजला जाईल असें त्यानें जाहीर केलें. तेव्हां ती चाल बंद पडली. (२) राजपुतान्यांतील कांहीं मागासलेल्या जातींतील लोक आपल्याला मुलगी झाली तर तिला ताबडतोब ठार करीत. असें केल्यानें तिच्या लग्नाच्या वेळीं होणारा त्रास वांचतो अशी त्यांची समजूत होती. त्या चालीस बेंटिंकनें पायबंद घातला. (३) गोंड वगैरे लोक देवीस प्रसन्न करून घेण्याकरितां मनुष्याचा बळी देत असत. असें केल्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेतीचें पीक उत्तम येतें अशी त्यांची कल्पना होती. ह्या चालीसही बेंटिंकनें आळा घातला.

३. ठक लोकांचा बंदोबस्त :—पूर्वी हिंदुस्थानांतील राजेलोकांच्या पदरीं पुष्कळ शिपाई असत. परंतु देशांत शांतता नांदूं लागल्यानें जास्त फौजेची त्यांस गरज भासेनाशी झाली. तेव्हां अनेक शिपाई बेकार झाले. हे बेकार लोक जंगलांत अगर अवघड डोंगराळ भागांत जाऊन राहत व तेथून जाणाऱ्या-येणाऱ्या प्रवाशांस गांठून त्यांस लुटीत, लुबाडीत अगर ठार मारीत. हे लोक ठक या नांवानें प्रसिद्ध होते. ते आणा-शपथा घेऊन व काली देवीची आराधना करून संघटित होऊन रहात. या ठकांपासून लोकांस फार त्रास होऊं लागला. तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याचें काम कर्नल स्लीमन यानें स्वीकारलें. त्यानें सतत सात–आठ वर्षें खपून ठकांचा पूर्ण बंदोबस्त केला. अनेकांस देहान्त शिक्षा मिळाल्या. मात्र जे शरण आले, त्यांस त्यानें क्षमा करून उद्योगधंद्यांस लावलें.

४. शिक्षणविषयक सुधारणा :—हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य स्थापन झाल्यावर येथील लोकांस शिक्षण द्यावें कीं न द्यावें हा प्रश्न इंग्रजांपुढें उत्पन्न झाला. या प्रश्नाकडे इंग्रजांनीं आतांपर्यंत दुर्लक्षच केलें होतें. अप्रत्यक्षरीत्या पौर्वात्य शिक्षणास इंग्रजांनीं थोडेंसें उचलून धरलें होतें. परंतु त्या बाबतींतील त्यांचे प्रयत्न नसल्यासारखेच होते. वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड हेस्टिंग्ज वगैरेनीं पौर्वात्य वाङ्मयाच्या अभ्यासाचा पुरस्कार केला होता. सन १८१३ मध्यें पौर्वात्य शिक्षणाकरितां एक लाख रुपये मंजूर झाले होते. पुढें सन १८२३ मध्यें शिक्षणाकरितां एक कमिटीही स्थापन झाली होती; परंतु तिनें फारसें काम केलें नाहीं. बेंटिंक गव्हर्नर जनरल असतां एतद्देशीयांच्या शिक्षणाचा प्रश्न त्याच्यापुढें आला. त्याच वेळीं लॉर्ड मेकॉले सन १८३४ मध्यें त्याच्या कौन्सिलांत आला होता. तेव्हां त्याच्या मदतीनें बेंटिंकनें शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला. हिंदी प्रजेस सज्ञान करून त्यांच्यावर राज्य करणें चांगलें कीं, त्यांस अज्ञानी ठेवून त्यांजवर राज्य करणें चांगलें असा प्रश्न त्याच्यापुढें होता. त्याचप्रमाणें येथील लोकांस प्राच्य विद्या शिकविणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगलें कीं पाश्चात्य विद्यामृत त्यांस पाजणें योग्य होय, हाही प्रश्न त्याच्यापुढें होता. या सर्व प्रश्नांचा विचार करण्याकरितां त्यानें एक कमिटी नेमली. त्या कमिटींत होरेस विल्सन, सर चार्ल्स ट्रिव्हेलियन, डॉ. डफ, लॉर्ड मेकॉले वगैरे वजनदार गृहस्थ होते. या सर्व विद्वानांनीं प्रचलित प्रश्नांचा खल केला. मात्र त्यांच्यांत दोन तट पडून हिंदी लोकांस पाश्चात्य शिक्षण व तेंही इंग्रजींतून द्यावें असें ठरलें. या मताचा लॉर्ड मेकॉलेनें जोरदार पुरस्कार केला. मात्र विल्सन, प्रिन्सेप वगैरेनीं त्याला विरोधून पौर्वात्य शिक्षण देणेंच योग्य होय असा अभिप्राय दिला होता. शेवटीं सन १८३५ मध्यें बेंटिंकनें इंग्रजी भाषेंतून पाश्चात्य विद्या हिंदी लोकांस द्यावी असा आपला आभिप्राय जाहीर केला. त्याप्रमाणें पुढें सर्व शाळांतून त्याप्रकारचें शिक्षण सुरू झालें. (२) सन १८३३ मध्यें 'जातगोत लक्षांत न घेतां शाळा-कॉलेजांतून शिक्षण घेणाऱ्या इसमांस सरकारी नोकऱ्या देण्यांत येतील' असें सरकारनें जाहीर केलें.

५. न्यायखात्यांतील सुधारणा:—(१) पूर्वीं प्रत्येक प्रांतांत फिरतीं कोर्टें असत. तीं कोर्टें रद्द करून बेंटिंकनें त्यांचें काम जिल्ह्याच्या न्यायाधिशाकडे सोंपविलें. (२) प्रत्येक कोर्टांतून त्या त्या प्रांताची प्रचलित देशी भाषा वापरावी असें त्यानें ठरवून दिलें. (३) खटल्यांचा निकाल लौकर व्हावा व त्या कामीं लोकांचा पैसा फार खर्च होऊं नये म्हणून बेंटिंकनें न्यायाधिशांचे पगार व त्यांची संख्या वाढविली. (४) अलाहाबाद येथें दुसरें एक वरिष्ठ कोर्ट त्यानें स्थापिलें. (५) न्यायाधिशांच्या जागेवर हिंदी लोकांस नेमावें असें त्यानें ठरविलें.

६. कारभारासंबंधीं सुधारणा:—(१) मोंगलांच्या वेळेपासून सरकारी दप्तर फारशी भाषेंत ठेवण्याची वहिवाट होती. त्यामुळें फार त्रास होतो असें पाहून बेंटिंकनें ज्या त्या प्रांतांतील दप्तर त्या त्या प्रांताच्या देशी भाषेंत ठेवावें असें ठरविलें. (२) लायकीप्रमाणें हिंदी लोकांस न्याय व मुलकी या खात्यांत नोकऱ्या देण्यांत येतील असें त्यानें जाहीर केलें. (३) आग्रा व अयोध्या या प्रांतांची पहाणी करून त्यानें सरकारसारा ठरवून दिला. (४) अफूच्या विक्रीचे परवाने देऊन त्यांपासून त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्पन्न सुरू केलें. (५) नोकरांच्या पगारांचें मान त्यानें ठरवून दिलें. (६) लष्करांत चालू असलेली भत्त्याची पद्धति त्यानें बंद केली.

७. इतर महत्त्वाचीं कृत्यें:—(१) 'पेनिन्शुलर अँड ओरिएन्टल स्टीम नॅव्हिगेशन कंपनी' (पी. अँड ओ.) या कंपनीच्या बोटी प्रथमतः बेंटिंकच्याच कारकीर्दीत हिंदुस्थान व युरोप यांच्या दरम्यान समुद्रमार्गें जाऊं-येऊं लागल्या. त्या बोटी तांबड्या समुद्रापर्यंत जात. तेथून सर्व उतारू रेल्वेनें सुवेजपर्यंत पोंचविले जात व पुढें पुन्हां बोटींचा प्रवास सुरू होई. (२) सन १८३५ मध्यें कलकत्ता येथें पाश्चात्य वैद्यक शिकविण्याकरितां एक कॉलेज स्थापण्यांत आलें. (३) कलकत्ता-दिल्ली-लाहोर-पेशावर व मुंबई-आग्रा असे दोन मोठे रहदारीचे रस्ते तयार करण्यांत आले.

८. संस्थानिकांशीं संबंध:—एतद्देशीय संस्थानिकांसंबंधीं सरकारी धोरण एका सांच्याचें नव्हतें. प्रसंग पडेल त्याप्रमाणें इंग्रज वागत. प्रत्येक संस्थानांत इंग्रजांचा रेसिडेंट होता; मात्र दुसऱ्याच्या कारभारांत हात घालणें न घालणें वरिष्ठांच्या मर्जीवर अवलंबून असे. तरीही विल्यम बेंटिंकनें हिंदी संस्थानिकांच्या बाबतींत फारच सौम्य धोरण स्वीकारलें होतें. जोधपूर, उदेपूर, जयपूर, इंदूर, भोपाळ वगैरे संस्थानांत गादीबद्दल तंटे माजले असतां बेंटिंकनें त्यांत हात घालून योग्य वारसास गादीवर बसविलें. म्हैसूरच्या गादीवर वेल्स्लीनें कृष्णराज वोडियार याची स्थापना केली होती. त्यावेळीं तो लहान असल्यानें सर्व कारभार त्याचा दिवाण पूर्णय्या पहात असे. सन १८११ मध्यें वयांत आल्यावर कृष्णराजानें आपल्या हातीं राज्यकारभार घेतला. परंतु कृष्णराज नादान निघाला. त्याच्याकडून राज्यकारभार नीट होईना. तेव्हां त्याला साडेतीन लाख रुपयांची नेमणूक व राज्याच्या उत्पन्नाचा १/५ हिस्सा देण्याचें ठरवून त्याला पदच्युत करण्यांत आलें. त्यानंतर म्हैसूरचा कारभार एका इंग्रज रेसिडेंटाकडे सोंपविण्यांत आला (१८३१). ही स्थिति पुढें सुमारें ५० वर्षें टिकली. काचर व कूर्ग या संस्थानांतही अव्यवस्था माजलेली होती. सन १८३० मध्यें काचरचा राजा गोविंदचंद निपुत्रिक मरण पावला. तेव्हां तें राज्य बेंटिंकनें खालसा करून आपल्या राज्यास जोडलें. कूर्ग प्रांतांत अव्यवस्था माजलेली पाहून व तेथील राजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांचा छळ करतो असें पाहून बेंटिंकनें कूर्ग प्रांतांत सैन्य पाठविलें. सैन्यानें तो प्रांत काबीज केला. तेव्हां तोही प्रांत बेंटिंकनें खालसा केला.

९. सनदेची फेरतपासणी (१८३३):—सन १८३३ मध्यें कंपनीची सनद वाढवावी कीं नाहीं याबद्दल पुन्हां वादविवाद झाला. कंपनी मोडून टाकून हिंदुस्थानचा कारभार इंग्लंडच्या राजानें आपल्या हातीं घ्यावा असें त्यावेळीं बहुमत होऊं लागलें. तसेंच हिंदुस्थानचा व्यापार सर्वांस मुक्तद्वार ठेवावा असेंही कांहीं म्हणूं लागले. शेवटीं खालील गोष्टी ठरल्या. (१) चीनचा व्यापार सर्वांस खुला ठेवावा. (२) गव्हर्नर जनरलच्या मंडळांत एका कायदेपंडिताची नेमणूक व्हावी. (३) हिंदुस्थानांत वाटेल त्या युरोपियनानें जमिनी खरीदाव्या व तेथें कायमची वस्ती करावी. (४) आग्रा व अयोध्या यांचा एक स्वतंत्र प्रांत व्हावा. (५) हिंदुस्थानांत गुलामगिरी रद्द करावी. (६) जातगोत लक्षांत न घेतां हिंदी लोकांस सरकारी नोकऱ्या द्याव्या. (७) निरनिराळ्या प्रांतांकरितां कायदे करण्याचा अधिकार फक्त गव्हर्नर जनरलासच असावा. (८) बंगालच्या गव्हर्नर जनरलास ‘ हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल ’ असें म्हणण्यांत येऊन त्याचा अधिकार हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांवर चालवा.

१०. सर चार्लस मेटकाफ (१८३५–३६):—सन १८३५ मध्यें लॉर्ड विल्यम बेंटिंक इंग्लंडला परत गेला. तेव्हां सर चार्लस मेटकाफ त्याचें काम पाहूं लागला. त्यापूर्वी तो आग्रा प्रांताचा लेफ्टेनंट गव्हर्नर होता. तो एक वर्षच त्या कामावर होता. त्या काळांत त्यानें एक गोष्ट चांगली केली. ती म्हणजे मुद्रणस्वातंत्र्य होय. छापखाने, मुद्रक व वर्तमानपत्रवाले यांस वाटेल तो मजकूर छापण्यास त्यानें मोकळीक दिली. यामुळें खरें लोकमत जाहीर होईल असें त्याचें मत होतें. परंतु त्याचें हें कृत्य डायरेक्टरमंडळास पसंत पडलें नाहीं. त्याच्यानंतर लॉर्ड ऑकलंड याची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली.

११. कांहीं ठळक व्यक्ति :—लॉर्ड विल्यम बेंटिंकच्या वेळीं कांहीं ठळक व्यक्ति प्रसिद्धी पावून गेल्या. त्यांमध्यें माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रँट डफ, राजा राममोहन रॉय, जेम्स टॉड, मेकॉले, माल्कम, कोलेब्रुक, जेम्स प्रिन्सेप वगैरे गृहस्थ प्रमुख होते. (१) **एल्फिन्स्टन** (१७७९-१८५९) —इंग्रज मुत्सद्यांत यानें उत्तम नांव कमाविलें होतें. तो प्रथमतः सन १७९६ मध्यें कंपनीच्या नोकरींत शिरला. वेल्स्लीच्या उद्योगांत त्याचा हात बराच होता. पुढें सन १८०१ मध्यें पुण्याच्या रेसिडेन्सींत त्याची बदली झाली. सन १८०३-१८०८ पर्यंत तो नागपूरचा रेसिडेंट होता. असईच्या लढाईत तो जातीनें हजर होता. सन १८१० मध्यें पुण्याचा रेसिडेंट म्हणून त्याची नेमणूक झाली. उत्तम मुत्सद्दी व कुशल सेनानायक म्हणून तो प्रसिद्ध होता. लॉर्ड मिंटोच्या वेळीं अफगाणिस्थानाशीं मैत्री करण्याकरितां त्याला पाठविण्यांत आलें होतें. पेशवाईचा अंत करण्यांत त्यानें प्रमुख भाग घेतला होता. पेशवाई नष्ट झाल्यावर सन १८१९ मध्यें मुंबईचा पहिला गव्हर्नर म्हणून त्याचीच नेमणूक झाली होती. त्या जागीं तो सन १८२७ पर्यंत होता. त्या काळांत इंग्रजी कारभारांत नव्या गोष्टींचा उपक्रम प्रथमतः करून प्रजाजनांच्या सुखाकडे व उन्नतीकडे त्यानें चांगलेंच लक्ष पुरविलें. मुंबई प्रांतांत शिक्षणाकरितां त्यानें अनेक सुधारणा केल्या. मुंबईचें एल्फिन्स्टन कॉलेज त्याच्या नांवाशींच निगडित झालेलें आहे. कायद्याचें एक कोडही त्यानें तयार केलें होतें. हिंदुस्थानाच्या इतिहासाचें पुस्तकही त्यानें लिहून प्रसिद्ध केलें होतें. हा दूरदर्शी, उत्साही, निधड्या छातीचा वीर व मुत्सद्दी सन १८५९ मध्यें मरण पावला. (२) **ग्रँट डफ** (१७८९-१८५८):—याचा जन्म सन १७८९ मध्यें झाला. सन १८०५ मध्यें ग्रँट डफ मुंबईच्या पलटणींत शिरला. पुढें गुजराथेंतील बंडाचा त्यानें सन १८०८ मध्यें मोड केला. त्यानें हिंदुस्थानांत आल्यावर फारशी भाषेचा उत्तम अभ्यास केला होता. त्यामुळें कांहीं प्रसंगीं फारशी दुभाषाचेंही काम त्यानें केलें होतें. पेशवाईचा अंत झाल्यावर डफची साताऱ्यास रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली होती. त्यावेळीं सातारचा राजा प्रतापसिंह याच्यावर त्यानें बंधूप्रमाणें प्रेम केलें व त्याला राज्यकारभारांत उत्तमरीतीनें तरबेज केला. तो मोठा हुषार मुत्सद्दी होता. सन १८२२ मध्यें तो नोकरींतून मुक्त झाला. मराठ्यांच्या इतिहासाचें एक उत्तम पुस्तक त्यानें लिहिलें. तें पुस्तक एक आधारभूत ग्रंथ म्हणून मानण्यांत येतो. तो इंग्लंड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें सन १८५८ मध्यें मरण पावला. **(३) राजा राममोहन रॉय (१७७४–१८३३)**:—राजा राममोहन रॉय याचा जन्म बंगाल्यांत सन

राजा राममोहन रॉय

१७७४ मध्यें झाला. लहानपणींच त्यानें मूर्तिपूजेविरुद्ध एक चोपडें प्रसिद्ध केलें होतें. फारशी, इंग्रजी, अरबी वगैरे भाषांवर त्याचें दांडगें प्रभुत्व होतें. प्रथमतः असलेली सरकारी नोकरी सोडून देऊन राममोहन रॉय यानें लोकांची सामाजिक उन्नति करण्यास आपल्याला वाहून घेतलें. समाजांतील वेडगळ व आचरट धर्मकल्पना घालवाव्या, प्राच्य विद्येचें पुनरुजीवन करावें, गरीब रयतेला मदत करावी असें त्याला नेहमीं वाटे. हिंदुधर्माची पायाशुद्ध रचना करावी असें त्याचें मत होतें. त्याकरितां वेदांचा व उपनिषदांचा खोल अभ्यास करावा पण धर्मांत शिरलेलीं थोतांडें नष्ट करावीं असें तो म्हणे. त्याकरितां त्यानें वेदांचें इंग्रजीमध्यें भाषांतरही केलें. सन १८२७ मध्यें कलकत्त्यास त्यानें 'ब्रह्मो समाजाची' स्थापना केली. त्या कामीं द्वारकानाथ टागोर यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला चांगलीच मदत केली होती. हिंदी तरुणांस परधर्मीयांच्या तावडींतून सोडवून त्यांचें आत्मिक व नैतिक बळ वाढवावें असा ब्रह्मोसमाज स्थापण्यांत मोहनरॉय याचा उद्देश होता. पुढें प्रसिद्ध वंगीय कवि रवींद्रनाथ टागोर हे त्या समाजाचे अध्वर्यु बनले. धर्मसुधारणेप्रमाणेंच शैक्षणिक बाबतींत त्यानें उत्तम कामगिरी बजावली. अलेक्झांडर डफ याच्या मदतीनें त्यानें कलकत्त्यास इंग्रजी शिकविण्याची एक शाळा स्थापिली. बेंटिंकच्या वेळीं त्यानें शिक्षणाच्या कामीं उत्तम कामगिरी बजाविली. प्रादेशिक भाषांनाही त्यानें शिक्षणांत योग्य महत्त्व मिळवून दिलें होतें. मुद्रणस्वातंत्र्य मिळविण्याची त्यानें पुष्कळ खटपट केली. रयतेचा कैवारी व तिच्याकरितां एकनिष्ठेनें झटणारा राममोहन रॉय सरकारी धोरणावर नेहमीं कडक टीका करीत असे. मोंगल बादशहाची तरफदारी करण्याकरितां तो इंग्लंडला गेला होता. तेथें असतांच सन १८३३ सालीं ब्रिस्टल येथें तो मरण पावला. (४) **जेम्स टॉड** (१७८२–१८३५):—प्रथमतः कंपनीच्या लष्करांत दाखल होऊन वयाच्या अठराव्या वर्षी जेम्स टॉड हिंदुस्थानांत आला. राजपुतान्यांत सन १८०६ पासून १८२३ पर्यंत मोजणीच्या कामावर व पुढें तेथील रेसिडेंट म्हणून तो काम करीत होता. तेथें त्यानें उत्कृष्ट कामगिरी केली. 'राजस्थानचा इतिहास' हें त्याचें पुस्तक अजूनही वाचनीय आहे. आपल्या कारकीर्दींत मोठा मुत्सद्दीपणा गाजवून रजपुतांमध्यें त्यानें मराठ्यांबद्दल वाईटपणा उत्पन्न केला होता. मोठा कारस्थानी म्हणून तो प्रसिद्ध होता. हिंदुस्थानांत २०–२२ वर्षें कामगिरी केल्यावर तो इंग्लंडमध्यें गेला व तेथेंच सन १८३५ मध्यें मरण पावला. (५) **टॉमस बॅबिंग्टन मेकॉले** (१८००–१८५९):—प्रख्यात समाजसुधारक झॅचरी मेकॉले याचा पुत्र लॉर्ड मेकॉले हा मोठा विद्वान लेखक, सुप्रसिद्ध कायदेपंडित व चतुर वक्ता होता. वयाच्या एकतिसाव्या वर्षीं तो पार्लमेंटमध्यें निवडून आला. सन १८३४ मध्यें गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलांत कायदेमंत्री म्हणून त्याची नेमणूक झाली. हिंदुस्थानांतील लोकांस इंग्रजी भाषेंतून पाश्चात्य ज्ञान द्यावें व त्यांस सुसंस्कृत करावें असा त्यानें सल्ला दिला होता. तो बेंटिंकनें मान्य केला. 'इंडियन पीनल कोड'ही त्यानेंच तयार केलें. शिक्षणासंबंधीं त्यानें जी एक कैफीयत तयार केली ती फार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्ध आहे. सन १८३८ मध्यें इंग्लंडांत तो परत गेला. त्यानें लिहिलेला 'इंग्लंडचा इतिहास' गद्य काव्याचा नमुना म्हणून अजूनही ओळखला जातो. तो कवीही होता. सामाजिक सुधारणा करावी असें त्याचें ध्येय होतें. पुढें पार्लमेंटमध्यें त्यानें उत्तम कामगिरी बजावल्यावर तो आपल्या साठाव्या वर्षीं सन १८५९ मध्यें मरण पावला. (६) वरील सर्व व्यक्तींखेरीज सर हेक्टर मन्रो, जॉन माल्कम, कोलेब्रुक, प्रिन्सेप वगैरे गृहस्थ फार थोर मुत्सद्दी होऊन गेले. मन्रो मद्रासचा गव्हर्नर असतां त्या प्रांतांत त्यानें रयतवारीपद्धति सुरू केली. माल्कम मोठा कुशल मुत्सद्दी व सेनानी होता. शिंदे–होळकरांच्या लढ्यांत त्यानें प्रामुख्यानें भाग घेतला होता. एल्फिन्स्टनच्या तोडीचा तो पुरुष होता. त्यानेंही हिंदुस्थानचा इतिहास लिहिला. कोलेब्रुक व प्रिन्सेप यांनीं राज्यकारभाराचीं नवीं ध्येयें ठरवून त्याप्रमाणें कामगिरी बजावली. विशेषतः प्रिन्सेप यानें बेंटिंकच्या वेळीं हिंदी शिक्षणाच्या बाबतींत बराच मोठा भाग घेतला होता.

अभ्यास

१. लॉर्ड विल्यम बेंटिंकच्या सुधारणा सांगा. त्याला नव्या युगाचा प्रवर्तक असें कां म्हणतात?

२. 'लॉर्ड विल्यम बेंटिंकनें ब्रिटिश साम्राज्यास स्थैर्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.' हें विधान उदाहरणें देऊन सिद्ध करा.

३. खालीलसंबंधीं टीपा लिहा.
ठक्कांचा बंदोबस्त, सनदेची फेरतपासणी, शिक्षणासंबंधीं सुधारणा, सती.

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
कर्नल स्लीमन, लॉर्ड मेकॉले, पूर्णय्या, पी. अँड ओ., अमीरखान, ट्रिव्हेलियन, विल्सन.

उतारे

१. शिक्षण कोणतें द्यावें–पाश्चात्य कीं पौर्वात्य?—१८३५.

थोडक्यांत म्हणजे सन १८१३ च्या पार्लमेंटच्या कायद्यानें आपले हात जखडून टाकले आहेत असें नाहीं; स्पष्ट किंवा अस्पष्ट अशा कोणत्याही वचनानें आपण बांधलों गेलों नाहीं. अर्थात आपल्याला योग्य दिसेल त्याप्रमाणेंच आप-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला, आपल्या हातीं असलेला, पैसा खर्च करतां येईल. जें ज्ञान उत्तम आहे तें देण्यामध्यें तो पैसा आपण खर्च केला तर बिघडलें कोठें? संस्कृत, अरबी किंवा फारशी या भाषांपेक्षां इंग्रजी भाषा शिकणें हेंच परिणामीं हितकर होय अशी येथील लोकांची खात्री झालेली आहे. अर्थात भाषा शिकावयाची झाल्यास ती इंग्रजीच शिकावयाची असें त्यांस वाटतें. कायद्याची अगर धर्मग्रंथांची भाषा म्हणून संस्कृत किंवा फारशी या भाषांस आम्हीं उत्तेजन द्यावें हें चुकीचें आहे. येथील लोकांस इंग्रजी भाषा शिकवून त्यांस इंग्रजी विद्वान करतां येणें शक्य आहे; अर्थात त्या दृष्टीनेंच आपण आपल्या उद्योगाची पराकाष्ठा केली पाहिजे. हिंदुस्थानांतील सर्व लोकांस आपल्याला शिक्षण देऊन सुशिक्षित करतां येईल हें अशक्य दिसतें. तरी पण आज आपल्याला जें करणें शक्य आहे तें करून, आपली प्रजा व आपण यांचा भाषेच्या दृष्टीनें संयोग करणारे केवळ दुभाषे आपल्याला निर्माण केले पाहिजेत. अर्थात पाश्चात्य शिक्षणामुळें हिंदी लोकांचा रंगपालट होणार नाहीं हें खरें; परंतु त्यांचे विचार, त्यांचे आचार, त्यांची बुद्धि व त्यांची वृत्ति यांत परिपूर्ण क्रांति झाल्याशिवाय राहणार नाहीं.

—लॉर्ड मेकॉलेच्या कैफियतीवरून

प्रश्न :—१. लॉर्ड मेकॉलेला इंग्रजी शिक्षण देणें कां पसंत होतें?
२. त्यामुळें कोणाचा फायदा होणार होता? कसा?

२. ठकांचे मार्ग

आडमार्गानें बीनधोकपणें प्रवास करणारांस गांठावें व निष्ठूरपणें गळा दाबून त्यांचा जीव घ्यावा असा कांहीं लोकांचा धंदाच होऊन बसला आहे. या लोकांस ठक असें म्हणतात. लुच्चेगिरी व विश्वासघात त्यांच्या पांचवीस पूजिलेला दिसतो. हे लोक बदकर्म करण्यासच एकत्रित झालेले आहेत. मोठ्या गंभीरपणें ते धर्माची शपथ घेतात; परंतु अत्यंत अघोरपणें प्रवाशांचे खून करण्यास ते कमी करीत नाहींत. कृतांताचे हे दूत इतर प्रवाशासारखाच पोशाख करतात. वेषांतर करावें व लोकांस नागवावें हा त्यांचा नेहमींचा धंदा होय. सर्वांनीं आडरस्त्यावर यावें, तेथून दोन दोन, चार चार लोकांच्या टोळ्या करून गांवांत शिरावें व गांवांतील इतर लोकां-प्रमाणें वावरावें असा त्यांचा प्रकार असे. कधीं कधीं ते मोठ्या मिजाशीनें व दरबारी डामडौलानेंही वागत. वेषांतर केलेले ठक प्रवाशावर हल्ले करीत. प्रथम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकजण प्रवाशाच्या मानेवर फांस टाकी, दुसरा ताबडतोब तो आवळी व मग तिसरा त्याचे हातपाय आवळून व त्यास खालीं पाडी. मग त्याचे कपडे फाडून काढण्यांत येत, त्याची सर्व चीजवस्त लुबाडली जाई व मग त्याचा मुडदा गाडून टाकण्यांत येई. त्यावेळीं तेथें दुसरा एखादा प्रवासी आलाच तर हे लोक मुडद्यावर एखादें बहुमोल वस्त्र टाकीत व रडून मोठा आकांत करीत! जणूं काय त्यांचा एखादा नातेवाईकच मृत झाला आहे!!

प्रश्न :—१ ठक लोकांचा मुख्य धंदा कोणता? कोणत्या मार्गानें प्रवाशांस ते लुबाडीत? असें करण्यामध्यें त्यांचा मुख्य उद्देश कोणता होता?

३. सतीचा कायदा—१८२९.

१. मृत नवऱ्याच्या चितेवर जाळून घेणें अन्याय्य आहे व त्याकरितां शिक्षा होईल.

२. सर्व सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्यानजीक असलेल्या पोलिस ठाण्यावर सतीची वर्दी ताबडतोब दिली पाहिजे. त्यांनीं तसें केलें नाहीं तर त्यांस दंड अगर शिक्षा होईल.

३. वर्दी मिळाल्याबरोबर पोलिस अधिकाऱ्यानें सतीच्या ठिकाणीं जाऊन तेथें जमलेल्या लोकांस सती जाणें अन्याय्य आहे असें सांगून सतीविरुद्ध त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे व त्या कृत्यापासून ते परावृत्त न झाल्यास ते शिक्षेस पात्र होतील असें त्यांस सांगितलें पाहिजे. इतकें करूनही जमलेले लोक सतीस उत्तेजन देऊं लागले, तर सती जाणाऱ्या स्त्रीस व तिला उत्तेजन देणारांस गिरफदार करण्याचा पोलिसांस अधिकार आहे.

४. सतीचा गुन्हा घडल्यानंतर पोलिस गुन्ह्याच्या ठिकाणीं गेल्यावर त्यांनीं गुन्ह्यासंबंधीं सर्व चौकशी करावी व मॅजिस्ट्रेटकडे त्याचा वृत्तांत कळवावा.

५. जे लोक सतीला उत्तेजन देतील वा त्या कृत्यास मदत करतील त्यांस दंड वा शिक्षा अगर दोन्हीही करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

प्रश्न :—१. सतीची चाल सरकारनें बंद कां केली? सतीस मदत करणें अगर त्या कृत्यास उत्तेजन देणें अन्याय्य कां समजण्यांत आलें? त्यासंबंधीं पोलिसांस अगर मॅजिस्ट्रेटास कोणते अधिकार देण्यांत आले?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतिहास व्यवसाय

इंग्रजी भाषेमधूनच पाश्चात्य शिक्षण द्यावें

१ पौर्वात्य ज्ञानच योग्य	२. पाश्चात्य ज्ञानच योग्य
१. पौर्वात्य भाषांच्या अभ्यासाकरितांच सरकारनें सन १८१३ च्या कायद्यानें एक लाख रुपये ठेवले आहेत.	१. तसेंच नाहीं; तर फक्त वाङ्मयाच्या अभ्यासास. आतां प्रश्न असा कीं तें वाङ्मय कोणतें ? पाश्चात्य कीं पौर्वात्य ?
२. पण संस्कृत व अरबी या भाषांमध्यें प्राचीन तत्त्वज्ञान सांठवून ठेवलेलें आहे. त्याच्या अभ्यासास उत्तेजन दिलें पाहिजे.	२. ज्या भाषा मृत आहेत व ज्यांमधील शास्त्रीय प्रमेयें अपसिद्धांत ठरलीं, त्यांच्या शिक्षणापासून काय फायदा ?
३. पौर्वात्य भाषांमध्यें उत्तम वाङ्मय आहे.	३. परंतु कोणत्याही पाश्चात्य भाषेंतील वाङ्मयापेक्षां तें हीन दर्जाचेंच आहे.
४. पाश्चात्य भाषांची इतकी थोरवी आपण गातां ती कशाकरितां ?	४. कारण त्यांत पुढारलेलें वाङ्मय व आधुनिक जगांतील अत्यंत श्रेष्ठ शास्त्रीय ज्ञान सांठविलेलें आहे.
५. मग इंग्रजी भाषेलाच तुम्ही प्राधान्य कां देतां ?	५. कारण ती राजभाषा आहे व ती शिकल्यानेंच हिंदी लोकांचें अंतिम हित साधणारें आहे.
६. परंतु या धोरणास हिंदी लोकांचा पाठिंबा नाहीं. त्यांच्या सहकार्यावर ही गोष्ट अवलंबून ठेवावयास नको काय ?	६. या ठिकाणीं त्यांच्या पाठिंब्याचें कारणच काय ? हिंदी लोकांस कोणतें शिक्षण द्यावयाचें तें आम्ही राज्यकर्त्यांनीं ठरवावयाचें; शिकणारांनीं नव्हे. शिकवणाराच शिकणाराला 'तुला काय शिकवूं' असें विचारूं लागला तर शिक्षणच संपलें !
७. परंतु हिंदी लोक इंग्रजीपेक्षां पौर्वात्य भाषा शिकण्यास जास्त उत्सुक आहेत.	७. हें म्हणणें खोटें आहे. कारण त्या भाषा शिकण्याकरितां आम्हांस जबरदस्ती करावी लागते व शिक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णारांस उत्तेजनार्थ शिष्यवृत्त्यांचें आमिष दाखवावें लागतें! उलट इंग्रजी शिकणारे आम्हांस फी देतात.

८. इंग्रजीला राजाश्रय आहे म्हणून असें होतें.

८. मुळींच नाहीं. कारण पौर्वात्य भाषा जे आज शिकले आहेत त्यांचा समाजांत मानच रहात नाहीं व म्हणून त्यांस पोटाकरितां व मानाकरितां दारोदार भटकावें लागतें. त्या भाषांतील पुस्तकेंही विकलीं जात नाहींत. हा सर्व दोष सरकारचा कसा? पौर्वात्य ज्ञान संपादणारांची अशी स्थिति होण्यास हिंदी लोकच कारणीभूत आहेत.

९. पण हिंदु व मुसलमानी कायदा समजून घेण्याकरितां तरी त्या भाषांच्या अभ्यासाची जरूरी नाहीं काय?

९. परंतु त्या कायद्यांची जरूरीच काय? आम्ही नवीनच कायदा तयार करणार आहोंत.

१०. संस्कृत व अरबी भाषांत पवित्र धर्मज्ञान ग्रथित केलेलें आहे. त्याकरितां तरी त्या भाषा अभ्यासावयास नकोत काय?

१०. धर्माच्या भानगडींत आम्हांस पडावयाचें नाहीं. परंतु ज्या भाषेंत खोटा इतिहास, खोटें वैद्यक व खोटें ज्योतिष आहे, त्या भाषांच्या अभ्यासानें लोकांचा काय फायदा होणार? वेदांमध्यें ज्या वेडगळ कल्पना आहेत त्यांचा अभ्यास केल्यानें मनुष्य सुधारेल असें वाटत नाहीं!

११. परंतु इंग्रजी भाषेचा अभ्यासही तुटपुंजाच होणार नाहीं का?

११. हें म्हणणें अत्यंत भ्रामक आहे; कारण परके लोक इंग्रजी भाषेवर उत्तम प्रभुत्व मिळवूं शकतात असा अनुभव आहे.

—मेकॉलेच्या कैफियतीच्या आधारें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५८. ऑक्लंड—एलेनबरो—हार्डिंज

१. लॉर्ड ऑक्लंड (१८३६–१८४२):—मेटकाफ हा कंपनीचा नोकर होता. गव्हर्नर जनरलच्या जागीं कंपनीचा नोकर नेमल्यानें आपल्याला कमीपणा येतो असें ब्रिटिश प्रधानमंडळाला वाटल्यानें मेटकाफच्या जागीं लॉर्ड ऑक्लंडची नेमणूक झाली. ऑक्लंड लिबरल पक्षाचा होता. रशियाचा कट्टा शत्रू लॉर्ड पामर्स्टन त्यावेळीं इंग्लंडचा परराष्ट्रमंत्री होता. रशियाची स्वारी हिंदुस्थानावर होईल अशी त्याला एकसारखी भीति वाटत होती. कारण त्यावेळीं रशियाच्या राज्याचा विस्तार झपाट्यानें होऊन, त्याची सरहद्द इराण-अफगाणिस्थानच्या उत्तरेपर्यंत येऊन भिडली होती. तेव्हां इराण व अफगाणिस्थान या देशांच्या भानगडींत लॉर्ड ऑक्लंडला पडावें लागलें. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर इराण, अफगाणिस्थान, सिंध व पंजाब हीं राज्यें व संस्थानें होतीं. त्यांच्याशीं सख्य ठेवून त्या संस्थानांस एकेका लोडसंस्थानाचें स्वरूप (दोन विरोधी पण सामर्थ्यवान् देशांमधील एक सामर्थ्यहीन देश) द्यावयाचें असा पामर्स्टनचा बेत होता. परंतु इराण व रशिया यांचें सूत होतें. पंजाबच्या रणजितसिंगाशीं स्नेहाचा तह पूर्वीच कायम झाला होता. सिंधची भीति फारशी नव्हती. तेव्हां अफगाणिस्थानाकडे लक्ष देऊन इंग्रज बसले.

२. अफगाणिस्थानांत क्रांति :—तिसऱ्या पानिपतच्या युद्धांत मुसलमानांचा पुढारी असलेला अहमदशाह अब्दाली सन १७७३ मध्यें मेला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा तेमूरशाह यानें सन १७९३ पर्यंत राज्य केलें. त्याचा मुलगा झमानशाह होय. हे सर्व राजे दुराणी वंशाचे होत. झमानशहाचा वजीर फत्तेखान बरकझै वंशाचा होता. त्यानें झमानशहास कैद केलें, त्याचे डोळे काढले व अफगाणिस्थानची गादी स्वतः बळकावली. तेव्हां झमानशाह व त्याचा भाऊ शहाशुजा सन १८१०च्या सुमारास हिंदुस्थानांत पळून प्रथम रणजितसिंगाच्या आश्रयास राहिले. पुढें फत्तेखानाचा खून होऊन त्याचा भाऊ दोस्त मोहंमद अफगाणिस्थानचा अमीर झाला. अफगाणिस्थानांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा भानगडी माजल्या असतां इराणचा शहा, रशियाचा झार, पंजाबचा रणजितसिंग व इंग्रज हे त्या देशाकडे डोळे लावून बसले व आपला डाव साधण्याच्या संधीची वाट पहात राहिले.

३. इराणची अफगाणिस्थानावर स्वारी (१८३७):—सन १८२८ मध्यें रशिया व इराण यांच्यामध्यें स्नेहाचा तह झाला होता. त्यामुळें इराणच्या दरबारीं रशियाचें वजन वाढलें होतें. पुढें रशियानें इराणचा टापू घेतल्यानें इराण रशियावर रागावला होता. त्याची भरपाई करण्याकरितां रशियानें इराणला हिरातचा किल्ला घेण्याकरितां मदतीचें आश्वासन दिलें. हिरातचा किल्ला अफगाणिस्थानच्या ताब्यांत होता. तेव्हां सन १८३७ मध्यें इराणच्या शहानें हिरातच्या किल्ल्यास रशियाच्या फुशीनें वेढा दिला.



लॉर्ड ऑक्लंड

४. शहाशुजाचे प्रयत्न :—अफगाणिस्थानांतून पळून आल्यावर शहाशुजा पेशावर प्रांतांत राहिला होता. तेथें असतांच त्यानें रणजितसिंगाची मदत घेऊन आपलें राज्य परत मिळविण्याकरितां अफगाणिस्थानावर दोन स्वाऱ्या केल्या होत्या. या मदतीकरितां त्यानें कोहिनूर हिरा रणजितसिंगास दिला होता. शहाशुजाचा दोन्ही स्वाऱ्यांच्या वेळीं पराभव झाला. त्या स्वाऱ्यांत शहाशुजा गुंतला असतांच रणजितसिंगानें त्याचा पेशावर प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडून टाकला. या सर्व गोष्टीनें हताश होऊन शहाशुजा लुधियाना येथें इंग्रजांच्या आश्रयास गेला. मात्र पेशावर प्रांत रणजितसिंगाकडे गेला तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कायमचाच. अफगाणिस्थानचा नवा अमीर दोस्त मोहंमद हाही कचाटींत सांपडला होता. कारण एका बाजूस हिरातला वेढा पडलेला व दुसऱ्या बाजूस पेशावर प्रांत जाऊन इंग्रजांसारख्या शत्रूच्या स्वारीची भीति मागें लागलेली. त्याच्या मनांतून इंग्रजांशीं दोस्ती करावयाची होती; परंतु रशियासही त्याला दुखवावयाचें नव्हतें. अशा स्थितींतच सन १८३७ मध्यें रणजितसिंग, शहाशुजा व इंग्रज यांच्यामध्यें लाहोरास तह झाला. त्या तहाप्रमाणें शहाशुजास अफगाणिस्थानच्या गादीवर बसविण्याचें इंग्रज व रणजितसिंग यांनीं कबूल केलें. मात्र पेशावर प्रांत रणजितसिंगास देण्याची व गादी मिळाल्यावर रशियाच्या स्वारीस अडथळा करण्याची शहाशुजानें कबुली दिली. त्याच सुमारास सन १८३८ मध्यें हिरातचा वेढाही उठला होता.

५. शहाशुजा अमीर झाला :—लाहोरच्या तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रजांनीं शहाशुजाच्या मदतीकरितां अफगाणिस्थानावर स्वारी केली. सर जॉन कीन हा ब्रिटिश सेनापति होता. प्रथमतः गझनी इंग्रजांनीं घेतली. पुढें दोस्त मोहंमद पळून बुखाऱ्याकडे गेला. तेव्हां इंग्रजांनीं काबूल घेऊन शहाशुजास काबूलच्या गादीवर बसविलें (१८३९). त्यानंतर कांहीं इंग्रज फौज काबूलास ठेवून बाकीची फौज हिंदुस्थानाकडे परतली. काबूलास बालाहिसार या किल्ल्यावर इंग्रज फौजेंतील लोक, थंड हवेंत, आपल्या बायकामुलांसह मोठ्या आनंदानें राहूं लागले होते. सन १८४० च्या सुमारास दोस्त मोहंमदही इंग्रजांस शरण आला होता. त्यामुळें सर्वत्र आनंदीआनंद झाला होता. परंतु शहाशुजाचा जम नीट बसण्याचें चिन्ह दिसेना. तो आंधळा व वृद्ध होता. शिवाय तो आपल्या प्रजेस आवडत नव्हता. त्यामुळें सर्वत्र बेदिली उत्पन्न झाली होती.



दोस्त मोहंमद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. अनर्थपरंपरा :— शहाशुजा लोकप्रिय नसल्यानें त्यावेळीं अफगाणिस्थानांत बंड होण्याचा संभव फार होता. तशांतच बालाहिसार किल्ल्यावरील इंग्रज लोक काबूलच्या आजूबाजूंस राहूं लागले होते. अनुभवी इंग्रज लष्करी अधिकारी हिंदुस्थानांत परत गेलेले होते. मॅक्नॉटन हा इंग्रज अधिकारी काबूलास होता. अशा स्थितींत दोस्त मोहंमदाचा मुलगा अकबरखान शहाशुजाविरुद्ध बंड करून उठला. इंग्रजांस तो दाणावैरणही मिळूं देईना. त्यांतच सन १८४१ मध्यें बंडवाल्यांनीं इंग्रज वकील बर्न्स याचा खून केला. त्यामुळें काबूलास राहणें अत्यंत धोक्याचें झालें. कोणाकडून मदत येण्याचीही आशा नव्हती. अशा स्थितींत मॅक्नॉटननें अकबरखानाशीं तहाचें बोलणें सुरू केलें. परंतु तें चालू असतांच बंडवाल्यांनीं त्याचा खून केला. अखेरीस आपलीं बायकांमुलें व हत्यारें अकबरखानाकडे



बालाहिसार—काबूल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओलीस ठेवून व त्याच्याकडून सुरक्षिततेचें आश्वासन घेऊन सर्व मंडळी हिंदुस्थानाकडे परतली. परंतु वाटेंत खिंडींतून जात असतां अफगाण बंडखोरांनीं या निःशस्त्र लोकांवर गोळ्या घातल्या व अनेकांस कापून काढलें! त्यामुळें पंधरा हजारांपैकीं फक्त डॉ. ब्रायडन हा एकच गृहस्थ मरणोन्मुख स्थितींत जलालाबादेस पोंचला. या बातमीनें ऑक्लंडचें धैर्य खचलें व राजीनामा देऊन तो इंग्लंडला परत गेला. त्याच्यानंतर एलेनबरो गव्हर्नर जनरल झाला.

७. लॉर्ड एलेनबरो (१७४२–४४):—एलेनबरोनें प्रथमतः काबूलास अडकून राहिलेल्या इंग्रज बायकामुलांस सोडवून आणण्याचें धोरण स्वीकारलें. त्याप्रमाणें त्यानें पोलॉक व नॉट या सेनापतींस फौजेसह काबूलास पाठविलें. त्यांनीं काबूल काबीज केलें. त्यावेळीं शहाशुजाचा खून झाल्याचें त्यांस आढळून आलें. तेव्हां प्रथमतः त्यांनीं शत्रूच्या हातचे आपले स्त्रीपुरुष सोडविले व मग काबूलचा बाजार उड्वून दिला. त्यानंतर ते हिंदुस्थानांत परत आले. यानंतर अफगाणिस्थानासंबंधीं अलिप्तपणाच्या

लॉर्ड एलेनबरो

धोरणाचा एलेनबरोनें अवलंब केला व अफगाणिस्थानच्या कारभारांत यापुढें हात घालावयाचा नाहीं असें एलेनबरोनें जाहीर केलें. दोस्त मोहंमदासही त्यानें सोडून दिलें. तो अफगाणिस्थानांत गेल्यावर त्याला तेथील गादी मिळाली. तो पुढें सन १८६३ मध्यें वारला. अफगाणिस्थानच्या या प्रश्नास 'मध्यपूर्व प्रश्न' असें म्हणतात.

८. सिंधचा कबजा (१८४३):—सन १८३० पर्यंत सिंधचे अमीर स्वतंत्र होते. पुढें दोन वर्षांनीं इंग्रजांनीं सिंधच्या अमिरांजवळ व्यापाराची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परवानगी मागितली. मात्र सिंध प्रांतांत लष्करी हालचाली करूं नयेत व तेथें त्यांनीं वस्ती करूं नये या अटींवर ती त्यांस मिळाली. अफगाण युद्धाच्या वेळीं इंग्रजांनीं त्या अटी मोडल्या; व शिवाय अमिरांबरोबर एक नवाच तह केला (१८३९). त्या तहानें इंग्रजांनीं आपली तैनाती फौज अमिरांवर लादली; व तिच्या खर्चाकरितां तीन लाख रुपये घेण्याचें ठरविलें. शिवाय कराची बंदर व बक्कर हा मजबूत किल्लाही आपल्या कबजांत घेतला. मेजर जेम्स औट्रॅम हा इंग्रज रेसिडेंट अमिरांच्या दरबारीं होता. त्यानें अमिरांविरुद्ध विनाकारण तक्रारी केल्या. त्यांची चौकशी करण्याकरितां एलेनबरोनें सर चार्ल्स नेपियर यास सेनापतीचे अधिकार देऊन पाठविलें. चौकशीचें सोंग करून नेपियरनें अमिरांस एक नवाच तह करावयास भाग पाडलें. शिवाय तैनाती फौजेच्या तीन लाख रकमेऐवजीं वीस लाखांचा मुलूख त्यानें अमिरांकडून घेतला. याशिवाय अमिरांनीं स्वतंत्र नाणीं पाडूं नयेत, इंग्रजांच्या गलबतांस जळण पुरवावें वगैरे मागण्याही अमिरांकडे त्यानें सुपूर्त केल्या. अमिरांस त्या मान्य झाल्या नाहींत. आपल्या अमिरांस इंग्रजांनीं फसविलें असें वाटून अमिरांच्या अनुयायांनीं बंड केलें. शेवटीं युद्ध होऊन अमिरांचा पराभव झाला व इंग्रजांनीं सिंधप्रांत खालसा केला. या युद्धाच्या वेळीं इंग्रजांनीं ज्या कुटिल नीतीचा उपयोग केला त्याचें कोणासही समर्थन करतां येणार नाहीं.


सर जेम्स औट्रॅम.

९. लॉर्ड हार्डिंज (१८४४–४८):—एलेनबरोचा कारभार डायरेक्टर-मंडळाला पसंत न पडल्यानें त्यांनीं त्याला परत बोलावलें; व त्याच्या जागीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लॉर्ड हार्डिंज याची नेमणूक केली. तो कसलेला लष्करी अधिकारी होता. तरीही अलिप्तपणाच्या धोरणाचा पुरस्कर्ता म्हणून त्याची प्रसिद्धी होती. मात्र त्याला इकडे युद्ध करावें लागलें. वेलिंग्टनच्या ड्यूकच्या नेतृत्वाखालीं त्यानें युरोपांतील द्वीपकल्पाच्या युद्धांत महत्त्वाची कामगिरी बजावली होती. तो गव्हर्नर जनरल झाला त्यावेळीं त्याचें वय साठ वर्षांचें होतें. तरीही त्याचा उत्साह कमी झालेला नव्हता. त्याला शिखांशीं युद्ध करावें लागलें.

१०. शिखांचा उदय :—नानकानें शीखधर्माची स्थापना केली होती. त्यानंतर शिखांची वाढ कशी झाली तें मागें मोंगल रियासतींत सांगितलेंच आहे. मोंगलांच्या खालावलेल्या स्थितींत शिखांनीं आपलें डोकें पुन्हां वर काढलें व पंजाबांत निरनिराळीं बारा संस्थानें स्थापिलीं. प्रत्येक संस्थानास 'मिसल' असें म्हणत. या बारा संस्थानांपैकीं एकाचा महानसिंग हा एक कर्ता व तेजस्वी पुरुष होऊन गेला. त्यानें शिखांच्या बाराही संस्थानांचें एकीकरण करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो त्याला साधला नाहीं. त्याच्या मृत्यूनंतर तें काम त्याचा मुलगा रणजितसिंग यानें केलें. या कामीं कधीं गोडीनें तर कधीं बळजबरीनें वागून त्यानें बहुतेक सर्व शीख संस्थानें आपल्या हुकमतीखालीं आणलीं व बहुतेक सर्व पंजाब प्रांतांत त्यानें आपली सत्ता चालू केली.

११. महाराणा रणजितसिंग (१७८०-१८३९) :—रणजितसिंगाचा जन्म सन १७८० मध्यें झाला. बाराव्या वर्षींच त्यानें शिपाईगिरी सुरू केली. त्याला तोफा व घोडे यांचा फार शोक होता. मद्यपान व विषयासक्ति यांमुळें त्यानें आपलें शरीर दुर्बल करून घेतलें होतें. पुढें पुढें अर्धांगाच्या आजारानें त्याची वाचाही गेली होती. एका डोळ्यानेंही तो अंध होता. असें असतांही त्यानें बहुत कर्तबगारी गाजविली. आपल्या अंतःकरणाचा थांग तो कोणासही लागू देत नसे. प्रसंग पडेल तशी बतावणी करण्यांत तो तरबेज होता. मोठ्या धूर्तपणानें वागून इंग्रजांचें वैर त्यानें टाळलें. इंग्रजांची सर्व शक्ति त्यांच्या लष्करी तयारींत होती, हें तो ओळखून होता. तेव्हां युरोपीय पद्धतीनें व आयुधांनीं सुसज्ज केलेलें फार मोठें सैन्य आपल्याजवळ त्यानें तयार ठेवलें होतें. नेपोलियनच्या हाताखालीं शिकून तयार झालेले कर्नल अलार्ड व कर्नल व्हेंच्युरा यांस त्यानें आपल्या पदरीं ठेविलें व त्यांच्याकडून त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या फौजेस पाश्चात्य युद्धकलेचें उच्च शिक्षण दिलें. त्याचा तोफखानाही सुसज्ज असे. त्याची ही सुसज्जता पाहून इंग्रजही त्याला मनांतून घाबरत; त्यामुळें त्याच्याशीं सलोख्यानें वागण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें होतें. अफगाण युद्धाच्या वेळीं त्यानें पेशावर प्रांत जिंकून घेतला होता. तसेंच यमुनेपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार करण्याचा त्याचा विचार होता. परंतु शेवटीं त्याला सतलज हीच आपल्या राज्याची पूर्व सरहद्द ठरवून गप्प बसावें लागलें. आपल्यामागेंही इंग्रजांचा स्नेह टिकावा अशी त्याची इच्छा होती. सन १८३९ मध्यें तो मरण पावला.

१२. रणजितसिंगानंतर :—अफगाण युद्ध चालू असतांच रणजितसिंग मेला. तेव्हां त्याचा वेडसर मुलगा खरकसिंग गादीवर आला. त्यामुळें राज्यांत सर्वत्र अव्यवस्था माजून घातपात यांना ऊत आला. शेवटीं धुलीपसिंग हा रणजितसिंगाचा पांच वर्षांचा मुलगा गादीवर आला व राणी जिंदन त्याची पालक बनली. सर्व सत्ता मात्र खालसा सैन्याच्या हातीं होती. ह्या खालसा फौजेचें व धुलीपसिंगाची आई व तिचे सल्लागार लालसिंग व तेजसिंग यांचें पटेना. खालसा सैन्यास इंग्रजांबरोबर सामना देण्याची खुमखुमी होती. राणीनें खालसा फौजेस कह्यांत ठेवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो साध्य झाला नाहीं. तेव्हां राणीनें त्या सैन्याच्या त्रासांतून सुटण्याकरितां तिला सतलज नदी ओलांडून दिल्लीच्या लुटीकरितां पाठवून दिलें. त्याप्रमाणें खालसा फौजेनें सतलज नदी ओलांडून इंग्रजी मुलखांत प्रवेश केला. तेव्हां इंग्रजांस लढाई पुकारावी लागली. त्यावेळीं सर ह्यू गो हा इंग्रजांचा सेनापति होता.

१३. शिखांशीं पहिलें युद्ध (१८४५–४६):— जिंदन राणीनें परवानगी दिली त्यांत तिला दुहेरी स्वार्थ साधावयाचा होता. फौजेला यश आल्यास शिखांच्या राज्याचा फैलाव होणार होता; शिवाय ती फौज बाहेर गेल्यानें लाहोर या राजधानींत होणारे रक्तपात व अत्याचार थांबणार होते. बरें इंग्रजांकडून त्या फौजेचा पराभव झाला, तर इंग्रजांशीं स्नेहाचा तह करून तिला सुखानें राहतां येणार होतें. युद्धास सुरुवात झाल्यानंतर मुडकी, फिरोजपूर, अलिवाल, सोब्राऊन वगैरे ठिकाणीं शीख व इंग्रज यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लढाया झाल्या. त्या अत्यंत निकराच्या होऊन शिखांचा पराभव झाला. त्यांचा संहारही अपार झाला. या लढाईमुळें पंजाब प्रांत इंग्रजांच्या हातीं आला. शेवटीं लाहोर येथें सन १८४६ मध्यें तह झाला. त्या तहानें खालील गोष्टी ठरल्या. (१) शीख सैन्य २० हजारच असावें व युद्धांत उपयोगांत आणलेल्या तोफा इंग्रजांस देण्यांत याव्या. (२) सतलज नदीच्या अलीकडील सर्व प्रदेश व जालंदर दुआब हा मुलूख इंग्रजांकडे रहावा; बाकीचें राज्य राजा धुलीपसिंग याच्याकडे रहावें. (३) लढाईच्या खर्चाकरितां शिखांनीं एक कोट रुपये इंग्रजांस द्यावे. (४) सर हेन्री लॉरेन्स लाहोरच्या दरबारीं रेसिडेंट म्हणून असावा; व त्याच्या सल्ल्याप्रमाणें धुलीपसिंग, त्याची आई राणी जिंदन व त्यांचा सल्लागार लालसिंग यांनीं पंजाबचा कारभार करावा. वरीलप्रमाणें तह झाल्यावर इंग्रजांनीं गुलाबसिंगास एक कोट रुपयांस काश्मीरप्रांत विकला.

सर हेन्री लॉरेन्स

१४. लॉर्ड हार्डिंजची कामगिरीः–शीख लोकांशीं युद्ध करून त्यांस काबूंत ठेवणें ही लॉर्ड हार्डिंजची मोठी कामगिरी होय. त्या युद्धानंतर शिखांची भीति उरली नव्हती. शिवाय पंजाबचा कारभार लॉरेन्स बंधूंच्या हातीं राहिल्यानें पंजाबचा कारभार सुधारला, तेथील जुलूम बंद झाले व प्रजेस सुख होऊं लागलें. पुढें गेलेली सत्ता मिळविण्याकरितां राणीनें कारस्थानें केल्यानें तिला सन १८४७ मध्यें दुसरीकडे पाठविण्यांत आलें. लॉर्ड हार्डिंज हा लष्करी अधिकारी होता. तरीही त्यानें शिक्षणप्रसारार्थ प्रयत्न केले. गंगानदीचा कालवा दुरुस्त केला, संस्थानांतून सतीची व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसें बळी देण्याची चाल बंद करण्याचा प्रयत्न केला. पुढें तो सन १८४८ मध्यें विलायतेस परत गेला व पुढें आठ वर्षांनीं तिकडे मरण पावला.

अ भ्या स

१. ऑक्लंडनें अफगाणिस्थानासंबंधीं कोणतें धोरण स्वीकारलें? कां? त्यामुळें इंग्रजांवर कोणतें अरिष्ट कोसळलें? त्याचा शेवट कसा झाला?
२. इंग्रजांनीं सिंध प्रांत कसा मिळविला?
३. रणजितसिंगाचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याची योग्यता वर्णा.
४. इंग्रज व शीख यांचेमध्यें युद्ध कां झालें? त्याचा परिणाम काय झाला?
५. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
दोस्त मोहंमद, अकबरखान, तेजसिंग, लॉर्ड पामर्स्टन, शहाशुजा, राणी जिंदन, धुलीपसिंग, मक्नॉटन, पोलॉक, फत्तेखान, अब्दाली, जॉन कीन, बर्न्स, झमानशाह, ब्रायडन.

उतारे

१. अफगाणिस्थानासंबंधीं एलेनबरोचें धोरण—१८४२

एकंदर गोष्टींचा विचार करतां आज सर्व अफगाणिस्थानची जनता आपल्या विरुद्ध उठलेली दिसते. त्यामुळें या लढ्यास नुसतें धार्मिकच नव्हे तर राष्ट्रीय स्वरूपही प्राप्त झालें आहे. तेव्हां अफगाणिस्थानच्या प्राप्तीपासून कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां, उलट त्या बाजूनें परकीय सत्तेचा हल्ला आलाच तर अफगाणिस्थान म्हणजे एक धोक्याचेंच ठिकाण होणार. अर्थात ज्या कारणाकरितां आम्ही अफगाणिस्थानचा अभिलाष धरला, तेंच नष्ट झाल्यानें अफगाणिस्थानशीं युद्ध करण्याची जरूरीच उरलेली नाहीं. तेव्हां आज आम्हीं आमच्या सैन्याच्या संरक्षणार्थ व आमचें लष्करी श्रेष्ठत्व टिकविण्याकरितांच अफगाणिस्थानला एक जबरदस्त तडाखा देणार आहोंत. तो दिला म्हणजे अफगाणांना, आमच्या प्रजाजनांना व आमच्या दोस्तांना समजून येईल कीं जे आमच्यावर अत्याचार करतात व जे आमचा विश्वासघात करतात त्यांस नेस्तनाबूद करण्याची ताकद आमच्या बाहूंत पूर्णपणें आहे. अफगाणिस्थानशीं आम्हीं अलिप्तपणाचें धोरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वीकारीत आहोंत ते आम्हीं असमर्थ आहोंत म्हणून नव्हे, तर ज्याला आम्हीं अफगाणिस्थानच्या गादीवर बसविणार होतों त्याला लोकांचा पाठिंबा नाहीं म्हणूनच होय.

—एलेनबरोचें पत्र

प्रश्न :—१. एलेनबरोनें अफगाणिस्थानशीं अलिप्तपणाचें धोरण कां स्वीकारलें ?

२. सिंधसंबंधीं नेपियरचें मत—१८४३

एलेनबरोनें अलिप्तपणाचें धोरण स्वीकारलें व सिंधूपर्यंतच्या हिंदुस्थानांतील भागापर्यंत राज्य वाढविण्याचें धोरण आंखलें. सिंधच्या अमिरांशीं केलेले तह तो पाळण्यास तयार होता....सिंधचे अमीर कांहीं मूर्ख नाहींत; उलट ते पक्के लुच्चे व कपटी आहेत. अफगाण युद्धांत आम्ही पराभूत झालों असा त्यांनीं समज करून घेतला. त्यामुळें त्यांस चेव येऊन ते मागील सर्व तह मोडावयास व कराचीस काबूलचें स्वरूप देण्यास तयार झाले. तेव्हां आम्हीं तरी काय करावें ? सनदशीर राज्यपद्धतीचा उत्कर्ष व्हावा, प्रजेचें कल्याण व्हावें व या उपटसुंभ, लुच्च्या, जुलमी, लबाड, दारुबाज, विषयलंपट, कारस्थानी व नीच अमिरांस चांगला धडा शिकवावा म्हणून आम्हांस हें साहस करावें लागलें. याकरितांच एलेनबरोनें त्यांच्याविरुद्ध शस्त्र उपसलें. तें अयोग्य आहे अशी मला शंका आली असती, तर मी आपली जागा केव्हांच सोडली असती.

प्रश्न :—१ नेपिअरचें सिंधच्या अमिरांसंबंधीं काय मत होतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५९. लॉर्ड डलहौसी (१८४८–५६)

१. लॉर्ड डलहौसी :—लॉर्ड हार्डिंजनंतर लॉर्ड डलहौसीची हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. त्यावेळीं त्याचें वय ३५ वर्षांचें होतें. प्रसिद्ध इंग्रज मुत्सद्दी सर रॉबर्ट पील याची त्याच्यावर बहाल मर्जी होती. त्याची प्रकृति नाजूक असली तरी आपल्या दांडग्या इच्छाशक्तीच्या जोरावर त्यानें अनेक धडाडीचीं कामें करून सर्व गव्हर्नर जनरलांत पहिल्या प्रतीचें स्थान पटकावलें. तो अत्यंत हुशार, तल्लख बुद्धीचा उद्योगी व व्यासंगी होता. तो उत्तम कलमबहाद्दरही होता. त्याची जरब इतकी असे कीं हाताखालचे लोक त्याला चळचळां कापत. त्याच्यापुढें बोलण्याची कोणाचीही छाती होत नसे. त्याला कामाचा उरक दांडगा होता. मात्र तो हेकेखोर व गर्विष्ठ होता. त्याच्या कारकीर्दींत राज्यविस्तार पुष्कळच झाला. लोकोपयोगीं कामें त्यानें पुष्कळ केलीं. राज्यकारभाराची घडी त्यानें घालून दिली व संस्थानांचें उच्चाटण करून इंग्रजांच्या राज्याला सलगपणा प्राप्त करून दिला.

लॉर्ड डलहौसी

२. शिखांशीं दुसरें युद्ध (१८४८–४९) :—पहिल्या शीख युद्धानंतर बाळराजा धुलीपसिंग व राणी जिंदन यांच्यातर्फे लॉरेन्स पंजाबचा कारभार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहात होता. त्यावेळीं मुलतान प्रांत पंजाबच्या राज्यांत होता. त्याचा वसूल मूळराज पहात असे. त्याच्याकडे लॉरेन्सनें हिशोब मागितला. परंतु मूळराजानें हिशोब न देतां आपल्या जागेचा राजीनामा दिला. तेव्हां मुलतानचा ताबा घेण्याकरितां लॉरेन्सनें दोन इंग्रज अधिकारी पाठविले. परंतु तेथील लोकांनीं बंड करून त्या दोघांस कंठस्नान घातलें! लगेच मूळराजानेंही बंड पुकारलें. या बंडाचा फैलाव सर्वत्र झाला. त्यामुळें इंग्रजांस युद्ध पुकारणें जरूर पडलें. प्रथमतः इंग्रजांनीं राणी व धुलीपसिंग यांस काशीस नेऊन ठेवलें. त्यावेळीं सर ह्यू गो हा इंग्रजांचा सेनापति होता. त्यानें चिलीयनवाला, गुजराथ वगैरे लढायांत शिखांचा पूर्ण मोड केला. पुढें डलहौसीनें जाहीरनामा लावून पंजाब प्रांत खालसा केला व तो आपल्या राज्यास जोडला. धुलीपसिंगास पांच लक्षांची नेमणूक देण्यांत येऊन त्याला इंग्लंडांत पाठवून दिलें. तेथें त्यानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला. तेथें असतांच आपल्याजवळचा प्रसिद्ध कोहिनूर हिरा त्यानें व्हिक्टोरिया राणीस नजर केला. यानंतर हेन्री लॉरेन्स याला पंजाबचा कमिशनर नेमण्यांत आलें. त्यानें पंजाबची व्यवस्था उत्तम लावली.

लॉर्ड ह्यू गो

३. दुसरें ब्रह्मी युद्ध (१८५२):—पंजाब प्रांत खालसा केल्यानंतर तीन वर्षांनीं डलहौसीला ब्रह्मी लोकांशीं युद्ध करावें लागलें. ब्रह्मदेशचा राजा इंग्रजांचा द्वेष करीत असे. तो आपल्या राज्यांत ब्रिटिश रेसिडेंट टिकूंच देत नसे. पुढें त्यानें इंग्रज रेसिडेंट कायमचाच काढून टाकला. ब्रह्मी लोकांचा इंग्रज-द्वेषच कमी झाला नव्हता. शेफर्ड या नांवाच्या एका इंग्रज व्यापाऱ्यानें एका ब्रह्मी माणसाचा खून केला (१८५१). तेव्हां त्याला सुमारें १००० रुपये दंड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला. तसेंच आणखीही कांहीं खटले इंग्रजांविरुद्ध झाले. अशा स्थितींत त्यांनीं डलहौसीकडे तक्रार केली. तेव्हां डलहौसीनें रंगूनच्या व्यापाऱ्यांकडे त्याबद्दल नुकसान भरपाई मागितली; व त्या मागणीबरोबर कांहीं लढाऊ बोटीही लँबर्टच्या नेतृत्वाखालीं पाठविल्या. लँबर्टबरोबर एक पत्रही डलहौसीनें ब्रह्मी राजाला देण्याकरितां दिलें होतें. तेव्हां राजानें रंगूनचा अधिकारी बदलला. पण तोही पहिल्यासारखाच गुर्मीत होता. त्यानें इंग्रज वकिलाची भेटही घेण्याचें नाकारलें. हा अपमान सहन न होऊन इंग्रजांनीं युद्ध पुकारलें. पुढें जोरांत युद्ध होऊन इंग्रजांनीं ब्रह्मी लोकांचा पराभव केला. त्यावेळीं डलहौसी स्वतः ब्रह्मदेशांत गेला व त्यानें पेगू प्रांत ब्रिटिश राज्यांत समाविष्ट केला. त्यामुळें मंडाले प्रांत फक्त ब्रह्मी राजाच्या ताब्यांत राहिला. पेगू प्रांत फार सुपीक होता. या युद्धानें सिंगापूरपर्यंतचा किनारा इंग्रजांच्या ताब्यांत आला.

४. राज्यें खालसा :—इंग्रजांच्या राज्याचा विस्तार बहुतेक सर्व हिंदुस्थानभर झाला होता. परंतु त्याला सलगपणा प्राप्त झालेला नव्हता. त्यामुळें इंग्रजांचें राज्य तुटक झालें होतें. हा दोष काढून टाकणें प्राप्त होतें. कारण त्यामुळें डलहौसीला आगगाड्या, तारायंत्र वगैरेसारख्या सुधारणा करणें त्रासाचें व जिकिरीचें काम होऊन बसलें होतें. मध्यें येणारीं संस्थानें नष्ट केल्यास आपला मार्ग निर्विघ्न होईल असें डलहौसीला वाटल्यानें त्यानें अनेक राज्यें खालसा केलीं. शिवाय या संस्थानांतील राजे आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत व सुखलोलुप होऊन आपल्या प्रजेचा छळ करीत. तेव्हां प्रजेला त्यांच्या त्रासांतून व जुलुमांतून सोडविण्याचें श्रेय त्याला मिळवावयाचें होतें. तेव्हां या ना त्या कारणानें त्यानें अनेक संस्थानें खालसा केलीं. राज्यें खालसा करतांना त्यानें जीं कारणें दाखविलीं त्यांत खालील प्रमुख आहेत. (१) दत्तक-वारसा नामंजूर करणें, (२) अव्यवस्था, (३) राजांचा निपुत्रिकपणा.

५. दत्तकवारसा नामंजूर :—(१) सातारा—सातारचा राजा प्रतापसिंह यास पदच्युत करून इंग्रजांनीं त्याचा भाऊ शहाजी याला सातारच्या गादीवर बसविलें होतें (१८३९). तो सन १८४८ मध्यें निपुत्रिक वारला. त्यानें इंग्रज रेसिडेंटाच्या संमतीनें एक दत्तक घेतला होता; व त्याप्रमाणें रेसिडेंटानें ती गोष्ट डलहौसीला कळविली होती. हिंदुधर्माप्रमाणें कोणासही दत्तक घेतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येत असे. परंतु या प्रसंगीं डलहौसीनें अशा दत्तकाला राज्याचा वारसा मिळणार नाहीं—खाजगी उत्पन्न मिळेल–असें जाहीर केलें. दत्तक घेणारानें साम्राज्यसरकारची अगोदर संमति घेणें जरूर आहे असेंही त्यानें सांगितलें.



ती मिळाली तर ठीक; नाहींपेक्षा त्याचा दत्तक-वारसा नामंजूर झाला असें समजावें. तेव्हां त्यानें साताराचें दत्तक–प्रकरण नामंजूर करून साताराचें राज्य खालसा केलें. त्याच्या या कृत्यास डायरेक्टरमंडळाची त्यानें संमति मिळविली होती. (२) साताऱ्याप्रमाणेंच त्यानें झांशी येथील दत्तकवारस नामंजूर करून तेथील राज्य खालसा केलें. (३) दुसऱ्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दत्तक मुलाचें–नानासाहेबाचें–दत्तकविधान त्यानें नामंजूर केलें व बाजीरावास मिळणारी नेमणूक त्यानें बंद केली. यामुळें नानासाहेब असंतुष्ट झाला.

६. निवारशी राज्यें खालसा:—एखादा राजा निपुत्रिक वारला म्हणजे त्याचें राज्य बिनवारशी समजून तें खालसा करण्याचें धोरण डलहौसीनें स्वीकारलें होतें. त्याला अनुसरून त्यानें अर्काट, तंजावर, नागपूर व संबळपूर हीं राज्यें खालसा केलीं. त्याचप्रमाणें अंतर्व्यवस्था नीट नाहीं म्हणून त्यानें अयोध्या, सिकीम, खैरपूर हीं संस्थानें खालसा केलीं. निजामाकडे फौजेची बाकी थकल्यानें त्याच्याकडून डलहौसीनें वऱ्हाड प्रांत घेतला व तो आपल्या राज्यास जोडला. त्याशिवाय कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील रायचूर दुआब व नन्दिदुर्ग हे सुपीक प्रांत डलहौसीनें निजामाकडून घेतले.

७. डलहौसीच्या सुधारणा:—डलहौसीनें केवळ लढाया मारण्याचें व संस्थानें खालसा करण्याचें धोरण ठरविलेलें नव्हतें. त्या काळच्या मनूस अनुसरून अनेक प्रकारच्या सोयी व सुधारणा करून आधुनिक पद्धतीची राज्यव्यवस्था त्याला स्थापावयाची होती. शिवाय राज्याच्या संघटनेकरितां व संवर्धनाकरितांही त्या गोष्टी करणें अत्यंत आवश्यक होतें. तेव्हां त्या दृष्टीनें त्यानें ज्या अनेक गोष्टी केल्या त्या खालीं दिल्या आहेत. (१) राज्यकारभाराच्या सोयीसाठीं त्यानें निरनिराळीं खातीं स्थापन केलीं व प्रत्येक मंत्र्याकडे एकेक खातें त्यानें नेमून दिलें. यामुळें कौन्सिलच्या कामाची नीट व्यवस्था लागली. (२) हिंदुस्थानांत लोकहिताचीं कामें व्हावीं म्हणून त्यानें एक खातें निर्माण केलें. त्याला 'सार्वजनिक हित-कृत्यांचें खातें' असें म्हणतात. या खात्याकडे त्यानें रस्ते, पाटबंधारे, जहाजें जाण्यास योग्य असे कालवे बांधणें वगैरे कामें सोंपविलीं. या खात्यानेंच दिल्ली–लाहोर हा रस्ता त्याच्या कारकीर्दीत तयार केला व गंगानदीचा कालवा खणला. (३) व्यापारी व लष्करी दळणवळण सोपें जावें म्हणून त्यानें आग-गाडीची सोय केली. पहिली आगगाडी कलकत्ता ते राणीगंज अशी तयार झाली व नंतर मुंबई–ठाणें व अर्काट–मद्रास हे लोहमार्ग सन १८५२ मध्यें सुरू झाले. (४) पोस्टखात्याची नवीन धर्तीवर त्यानें मांडणी केली व अर्ध्या आण्यांत हिंदुस्थानाच्या कानाकोपऱ्यांत पत्रें पोंचविण्याची त्यानें सोय केली. (५)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तारायंत्राचीही त्यानें सोय केली. त्यामुळें दूर ठिकाणीं जलद संदेश पाठविणें शक्य झालें. (६) पूर्वी बंगालची राज्यव्यवस्था गव्हर्नर जनरलकडेच असे. त्यामुळें त्याला काम फार पडे. तेव्हां पार्लमेंटकडे तगादा लावून बंगालची व्यवस्था



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहण्याकरितां एका लेफ्टेनंट गव्हर्नरची नेमणूक करण्याचें त्यानें ठरविलें. (७) सनदी नोकरीची परीक्षा इंग्लंडांत होई. त्या परीक्षेस बसण्याची हिंदी लोकांस त्यानें परवानगी दिली. ती परीक्षा पास झाल्यास हिंदी लोकांस सनदी नोकरींत घेण्यांत येईल असें त्यानें जाहीर केलें. (८) सन १८५४ मध्यें सर चार्ल्स वूडनें शिक्षणविषयक एक खलिता डलहौसीकडे पाठविला. त्यांतील योजनेप्रमाणें सर्व जिल्ह्यांमधून देशी भाषेच्याद्वारें शिक्षण देणाऱ्या शाळा, सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या शाळा व विश्वविद्यालयें स्थापावीं असें ठरलें. त्याचप्रमाणें शाळांस ग्रँट देण्याची पद्धति डलहौसीनें सुरू केली. शिक्षणाच्या फैलावाकरितां त्यानें शिक्षणखातेंही स्थापन केलें. प्रत्येक प्रांतांत शाळा तपासण्याकरितां डायरेक्टर, इन्स्पेक्टर वगैरे सरकारी अधिकारी नेमण्याचेंही ठरलें.

८. सनदेची फेरतपासणी (१८५३):—सन १८५३ मध्यें कंपनीच्या सनदेची फेरतपासणी झाली. त्यावेळीं पूर्वीप्रमाणें वीस वर्षांची मुदत पार्लमेंटनें घातली नाहीं. मात्र कंपनीकडून हिंदुस्थानचा राज्यकारभार वाटेल तेव्हां काढून घेण्यांत येईल असें पार्लमेंटनें तिला कळविलें. बंगाल व बिहार या प्रांतांचा कारभार लेफ्टेनंट गव्हर्नरांकडे सोंपविण्याचें ठरलें. सनदी नोकरींतील जागा चढाओढीच्या परीक्षेंत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांस द्याव्या, डायरेक्टरमंडळाच्या मर्जीप्रमाणें नव्हे, असेंही ठरविण्यांत आलें. त्यामुळें डायरेक्टरमंडळ केवळ सल्लागारमंडळ राहिलें.

९. डलहौसीच्या कामगिरीचा परिणाम:—डलहौसीच्या कामाचा तडाखा जबरदस्त होता. आपल्या आज्ञा पाळल्या जातात किंवा नाहीं हें तो कसून पाही. त्यामुळें त्याचे नोकर सांगकाम्ये बनले. राज्यें खालसा करण्याचें त्याचें धोरण अनेक इंग्रजांसही पसंत नव्हतें. त्यामुळें सर्व हिंदुस्थानांत मोठी अस्वस्थता माजली आणि प्रत्येक जमीनदाराला व जहागीरदाराला मोठी धास्ती उत्पन्न झाली. इंग्रजी राज्य टिकतें कीं नाहीं असें कांहीं इंग्रजांसही वाटूं लागलें होतें. त्यानें अनेक उपयुक्त सुधारणा केल्या खऱ्या; परंतु त्या बाबतींत त्यानें लोकांच्या मनाची कधींच पर्वा केली नाहीं. तो लोकांच्या पुढें होता व म्हणूनच त्याला स्वतःच्या जबाबदारीवर विसंबून अनेक सुधारणा करतां आल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें लोकांचीं मनें त्याच्यासंबंधीं अत्यंत कलुषित झालीं. त्याच्या साध्या पण महत्त्वाच्या सुधारणांमुळेंही लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या. शिवाय हिंदुधर्मांतील कांहीं कल्पना त्यानें कायद्यानें बंद केल्यानेंही लोक असंतुष्ट झाले. स्तुतिनिंदेची पर्वा त्यानें कधींच केली नाहीं. मनांत आलें तें त्यानें केलें. एकंदरींत पाहतां डलहौसीहून वरचढ असा दुसरा कोणीही इंग्रज गव्हर्नर त्याच्यापूर्वीं झाला नाहीं. कर्तृत्त्वांतही तोच अग्रेसर होता. मात्र त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं वादळापूर्वीची शांतता पसरली होती व धुमसत राहिलेल्या अग्नीचा स्फोट केव्हां होईल तें सांगणें अशक्य होतें.

अभ्यास

१. लॉर्ड डलहौसीच्या सुधारणा सांगा. त्यांचा हिंदी लोकांवर काय परिणाम झाला ?

२. शिखांशीं व ब्रह्मी लोकांशीं डलहौसीनें युद्धें कां केलीं ? त्यांचा परिणाम काय झाला ?

३. लॉर्ड डलहौसीचें ध्येय व धोरण सांगा. त्याप्रमाणें त्यानें इंग्रजी राज्याचा फैलाव करण्याकरितां कोणत्या मार्गाचा अवलंब केला ?

४. डलहौसीनें कोणतीं संस्थानें कोणत्या कारणाकरितां खालसा केलीं ? त्याचा परिणाम काय झाला.

५. डलहौसीच्या कारकीर्दीचा परिणाम सांगा.

उतारे

१. दत्तकाचा अधिकार कोणास असावा ?—१८५४.

हिंदुस्थानांतील हिंदु संस्थानांचे माझ्या मतें खालीलप्रमाणें तीन गट पाडतां येतील. आपली सत्ता स्थापन होण्यापूर्वीं जे पूर्णपणें स्वतंत्र होते व जे दुसऱ्या कोणाचेही ताबेदार नव्हते, त्यांना पहिल्या गटांत घालतां येईल. त्याचप्रमाणें जीं पूर्वीं स्वतंत्र होतीं, परंतु ज्यांची उत्पत्ति दुसऱ्या एखाद्या सामर्थ्यवान राजाच्या मर्जीनें झाली व जीं आज आपल्या ताब्यांत आलीं त्यांस दुसऱ्या गटांत घालावें. जीं संस्थानें आपल्या मेहेरबानीनें स्थानापन्न झालीं तीं सर्व तिसऱ्या गटांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येतील. पहिल्या गटांतील संस्थानिकांस दत्तक घेण्याचा अधिकार पूर्णपणें असावा व योग्यरीतीनें तो घेतला असल्यास त्याला आपण संमति द्यावी. दुसऱ्या गटांतील संस्थानिकांनीं दत्तक घेतल्यास तो आपल्याला नामंजूर करतां येईल; परंतु सहसा या थराला गोष्ट आणूं नये. तिसऱ्या गटांतील संस्थानिक वारले तर त्यांचीं संस्थानें खालसा करण्यांत यावींत.

—सर चार्ल्स वूडच्या खलित्यावरून.

प्रश्न :—१. संस्थानांचे गट कोणत्या तत्त्वावर पाडण्यांत आले? दत्तकाचा अधिकार कोणाचा मान्य झाला?

२. साताऱ्याची कहाणी—१८४८.

महाराज प्रतापसिंहाचा मृत्यु योग्य वेळीं घडून आला. हल्लींच्या राजाची प्रकृति बरी नसते असें मीं ऐकलें आहे. त्याला मूलबाळ न होतां तो मरण पावला, म्हणजे सातारा खालसा करण्यास कोणतीच आडकाठी उरणार नाहीं. तो दत्तक घेऊं म्हणेल, तर दत्तकाची परवानगी देण्यांत येऊं नये. माझ्या कारकीर्दींत ही गोष्ट घडून आली, तर सातारा ब्रिटिश राज्यांत सामील करण्याबाबत मी कोणताच उपाय योजावयाचा शिल्लक उरूं देणार नाहीं.

—नियामक मंडळाचा अध्यक्ष हॉबहौस याचें डलहौसीला पत्र.

पेशवाईचा नुकताच लोप झाला असल्यानें, इंग्रजी सत्तेला महाराष्ट्राचा पाठिंबा मिळावा म्हणून सन १८१८ मध्यें सातारा संस्थान अबाधितपणें राखणें जरूर व शहाणपणाचें असेल, नव्हे होतें; व त्याबद्दल त्यावेळचे इंग्रज अधिकारी प्रशंसेस पात्र आहेत. परंतु पेशवाई आपल्या ताब्यांत येऊन तीस वर्षें आतां लोटलीं आहेत, आणि प्रजा देखील कोणताही दंगाधोपा न करतां शांतपणें नांदत आहे. त्यामुळें सातारचें संस्थान हल्लीं पूर्वींप्रमाणें अबाधित राखण्याचें कोणतेंच कारण उरलें नाहीं. इंग्रजी राज्य आतां मजबूत झालें असून शिंदे—होळकर निरुपद्रवी बनले आहेत. तेव्हां शिवाजीच्या वंशजांचें हें बुजगावणें यापुढें ठेवण्यांत कांहींच मतलब नाहीं.

—लॉर्ड डलहौसीच्या १८४८ च्या खलित्यावरून.

प्रश्न :—१. सातारचें राज्य नष्ट कां करण्यांत आलें? तें प्रथम अस्तित्वांत कां आलें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. ब्रह्मदेशाशीं झालेल्या युद्धाची मीमांसा—१८५३.

ब्रह्मदेशाच्या राजानें इंग्रजांच्या पहिल्या अटी कबूल केल्याच होत्या. शिवाय दहा लाख रुपये खंडणी हप्त्याहप्त्यानें देण्याचेंही बिचाऱ्यानें अखेर कबूल केलें होतें. परंतु राजाचें उत्तर येईतोंपर्यंत डलहौसीनें धीर तर धरला पाहिजे ! इतक्या दूर पत्र जाऊन त्याचें ताबडतोब उत्तर येण्याला त्या काळीं निदान ४२ दिवस लागत होते. परंतु डलहौसीनें ३५ दिवसांनंतर लढाईला सुरुवात केली. त्यामुळें राजाचें पुढें आलेलें उत्तर निरुपयोगी ठरलें. त्यापूर्वी, या प्रकरणीं बोलाचाली करण्यास गेलेला लँबर्ट, रंगून येथें इतका उद्दामपणें वागला कीं सांगतां सोय नाहीं. राजाचें जहाज खाडींत नांगरून स्वस्थ पडलें होतें, तें त्यानें गव्हर्नर जनरलची परवानगी न घेतां आपल्या ताब्यांत घेतलें. किनाऱ्यावरील लोकांनीं या गोष्टीला साहजिकच विरोध केला; तेव्हां त्यांच्यावर इंग्रजी जहाजांवरून तोफांचा भडिमार करून हजारों लोकांस यमसदनीं पाठविण्यांत आलें ! आणि इंग्रजांना खूष करण्याकरितां राजानें रंगूनचा जुना गव्हर्नर बदलून पाठविला, तेव्हां अनाहूत व प्रथम भेटीची वेळ मुक्रर न करतां लँबर्ट तिकडे गेला. अर्थात त्याच्या स्वागताची तयारी करण्यास गव्हर्नरला थोडा वेळ लागला. लागलीच लँबर्टचें पित्त खवळलें. एवढ्या निमित्तानें दहा हजार रुपयांची खंडणी दहा लाखांवर जाऊन पोहोंचली आणि ती वाटाघाट होण्यापूर्वीच पेगू प्रांत जिंकून घेण्यांत आला ! लढाईपेक्षां कत्तल हेंच नांव या युद्धाला शोभतें ! बिचाऱ्या ब्रह्मी लोकांजवळ धड हत्यारेंदेखील नव्हतीं. तोफांचा मारा करतांच त्यांची कत्तल उडाली.

—कॉबडेनचें दुसऱ्या ब्रह्मीयुद्धासंबंधींचें पत्रक.

प्रश्न :—१. लँबर्टनें कोणता अन्याय केला ? कशाकरितां ? डलहौसीकडे कोणता दोष येतो ?

४. नागपूर खालसा—१८५४.

नागपूर प्रांत अखेर ब्रिटिश अमलाखालीं आला. ८०००० चौरस मैल प्रांत व अर्धकोट रुपये उत्पन्नाचा मुलूख आमचे हातीं लागला. आमची प्रजाही अर्ध्या कोटीनें वाढली. इंग्रजी अमलाखालीं येण्याची या लोकांना पुष्कळ दिवसांपासून उत्कंठा लागली होती. नागपूर खालसा केल्यामुळें निजामाच्या चारी बाजूला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रजांचें राज्य झालें आहे; आणि आतां राज्यकारभारही सुलभरीतीनें हांकतां येईल. नागपूर हातीं आल्यानें कलकत्त्यापासून मुंबईपर्यंतचा सर्व रस्ता निर्विघ्न झाला आहे आणि तो सर्व आमचे हद्दींतून जात असल्यामुळें सैन्य व व्यापार या दोघांचीही शक्ति वाढेल. —डलहौसीचा खुलासा.

नागपूरसारखें राज्य जिंकणें कठीण गेलें असतें. त्याऐवजीं एकदां तें खालसा केल्यावर आपल्या ताब्यांत ठेवणें सोपें व सोयिस्कर आहे. राजाच्या नोकरांना पगार चांगला मिळे व ते त्याच्याशीं कृतज्ञतेनें वागत. त्यांना लांच-लुचपत देऊन वश करणें कठीण काम होतें व त्यांनीं लढाईंत फार अडथळा केला असता.

—एका इंग्रज अधिकाऱ्याचें निवेदन.

प्रश्न :—१. नागपूर खालसा केल्यानें इंग्रजांचा कोणता फायदा झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—१८२८–१८५७

इंग्रज	वर्ष	इंग्लंड	प्रमुख व्यक्ति
विल्यम बेंटिंक १८२८–३५		चौथा जॉर्ज १८२०–३०	
सतीचा कायदा	१८२९	कॅथॉलिक विमोचन	वेलिंग्टन, मॅझिनी
म्हैसूरचें राज्य खालसा	१८३१	चौथा विल्यम १८३०-३७	राजा राममोहन रॉय
	१८३२	पार्लमेंट-सुधारणा कायदा	
कंपनीची फेरतपासणी	१८३३	गुलामगिरी रद्द	
लॉर्ड ऑक्लंड १८३६–४२		व्हिक्टोरिया १८३७–१९०१	रणजितसिंग
त्रिवर्गाचा तह	१८३८		
पहिलें अफगाण युद्ध–रणजितसिंग मृत्यु	१८३९	पेनी पोस्टेज	
दोस्त मोहंमद शरण	१८४०		सर रॉबर्ट पील
लॉर्ड एलेनबरो १८४२–४४		चीनशीं युद्ध १८४२	
सिंध खालसा	१८४३		
लॉर्ड हार्डिंज १८४४–४८			
शिखांशीं युद्ध	१८४५		पामर्स्टन
	१८४६	धान्याचा कायदा रद्द	
लॉर्ड डलहौसी १८४८–१८५६			
सातारा खालसा	१८४८		
पंजाब खालसा	१८४९		प्रतापसिंह
ब्रह्मदेशाशीं युद्ध	१८५२	वेलिंग्टनचा मृत्यु	
कंपनीची फेरतपासणी	१८५३		
अयोध्या खालसा	१८५६	पॅरिसचा तह	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६०. सन १८५७

१. लॉर्ड कॅनिंग (१८५६–६२) :—लॉर्ड डलहौसीनंतर लॉर्ड कॅनिंग या शांत स्वभावाच्या माणसाची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. तो मेहनती, हुशार, कर्तबगार, सालस, सद्सद्विवेकी व कनवाळू होता. तसेंच पाहिलें तर डलहौसीच्या व त्याच्या स्वभावांत दोन ध्रुवांइतकें अंतर होतें! इंग्लंडचा प्रसिद्ध मुत्सद्दी, परराष्ट्रीय मंत्री व मुख्य प्रधान जॉर्ज कॅनिंग याचा तो मुलगा होता. एकदां निश्चय केल्यावर तो शेवटास नेण्याची तो पराकाष्ठा करी. डलहौसीच्या कारकीर्दींत ज्या घडामोडी झाल्या त्यामुळें देशांत असंतोषाचे वारे वाहूं लागले होते. त्यामुळें कॅनिंगच्या कारकीर्दींत मोठा लोकक्षोभ होऊन एक मोठी क्रांति झाली. अर्थात त्याच्या कारकीर्दीला जितका उठावदारपणा यावयास पाहिजे होता तितका आला नाहीं.

२. सन १८५७ च्या युद्धाचीं कारणें :—सन १८५७ चें युद्ध कां झालें व त्याचें स्वरूप काय होतें याबद्दल बराच मतभेद आहे. कोणी त्याला शिपायांचें बंड म्हणतात, कोणी त्याला स्वातंत्र्ययुद्ध म्हणतात, कोणी मुसलमानांनीं हिंदूंच्या असमाधानाचा फायदा घेऊन उठविलेलें बंड असें म्हणतात व कांहीं त्याला हिंदी लोकांचें बंड असेंही म्हणतात. कांहींही नांव दिलें तरी त्या वर्षीं हिंदुस्थानांत फार मोठी अस्वस्थता निर्माण झाली यांत शंका नाहीं. या युद्धांत सामान्य प्रजेपेक्षां हिंदी शिपायांचाच भाग फार होता. त्याला मुख्यतः लष्करी अव्यवस्था कारणीभूत झालेली असली तरी इतरही कांहीं कारणें झालीं. त्याचीं कांहीं कारणें अशीं. **राजकीय**—(१) डलहौसीनें केलेल्या सुधारणा आपल्या फायद्याकरितां नसून त्या इंग्रजांची जुलमी सत्ता हिंदुस्थानांत चिरकाल टिकावी म्हणून आहेत असें सर्वांस त्यावेळीं वाटत होतें. पोस्ट, तारायंत्र, आगगाडी वगैरे पाश्चात्य सुधारणा हिंदुस्थानांत त्यांनीं सुरू केल्या. परंतु पौर्वात्य संस्कृति व परंपरा नष्ट करून युरोपियनांची पाश्चात्य संस्कृति या देशावर लादण्याकरितां त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत्या असा येथील लोकांनीं त्याचा अर्थ केला. अर्थात त्यामुळें त्यांचीं मनें दूषित झालीं. (२) डलहौसीनें निरनिराळ्या कारणांकरितां एकामागून एक अनेक राज्यें खालसा केलीं. त्यामुळें आपले पुरातन हक्क व आपल्या परंपरेचें जतन करणारीं राज्यें नष्ट झालीं असें वाटून सर्व लोक असंतुष्ट झाले. (३) अयोध्या प्रांतांतील जमिनदारांचे हक्क त्यानें काढून घेतल्यानें तो समाज असंतुष्ट झाला होता. (४) दिल्लीचा मोंगल बादशाह बहादुरशाह याला डलहौसीनें दिल्ली सोडून जाण्यास सांगितलें होतें. त्यामुळें मुसलमान रुष्ट झाले. याप्रमाणें डलहौसीच्या कारकीर्दीमुळें हिंदुस्थानांतील राजेरजवाडे, जमिनदार व सामान्य लोक यांच्या मनांत इंग्रजांबद्दल अनादर व द्वेष माजल्यानें जिकडेतिकडे असंतोष माजला.

लॉर्ड कॅनिंग

३. सामाजिक व धार्मिक कारणें :—इंग्रजी अमदानींत इंग्रज मिशनरी व पाद्री या लोकांचा फार सुळसुळाट झाला होता. येथील लोकांस खिस्ती बनविण्याकरितां त्यांची खटपट चालू आहे असें हिंदी लोकांस वाटे. खिस्ती धर्मप्रसारास इंग्रज मदत करतात, असाही लोकप्रवाद होता. पाद्री शाळा चालवीत. त्यांतून खिस्ती धर्माचें शिक्षण देऊन व खेड्यांतील विहिरीविहिरींतून पावाचे तुकडे टाकून पाद्री खिस्ती धर्माचा प्रसार करतात अशी लोकांची कल्पना झाली. डलहौसीनें विधवांस पुनर्लग्नाची मोकळीक दिली. त्यामुळें हिंदु लोकांच्या धर्मभावना दुखावल्या गेल्या. कारण इंग्रज लोक आमच्या धर्मांत ढवळाढवळ करतात असा लोकांचा समज झाला होता. प्लासीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लढाईनंतर शंभर वर्षांनीं इंग्रजांचें राज्य बुडणार अशी लोकांची भ्रामक कल्पना होती.

४. लष्करविषयक :—त्यावेळीं लष्कराची अत्यंत अव्यवस्था होती. हिंदुस्थानांत लष्कराची गरज असतां बरेंचसें युरोपियन सैन्य हिंदुस्थानाबाहेर नेण्यांत आलें होतें. वायव्यसरहद्दीच्या रक्षणाकरितां अनुभवी व लायक अधिकारी पाठविण्यांत आल्यानें हिंदुस्थानी लष्करांत त्यांची वानवा होती. त्यामुळें हिंदी अधिकाऱ्यांच्या हातीं महत्त्वाचीं ठाणीं राहिलीं. दिल्लीचें दारूगोळ्याचें भांडारही हिंदी लोकांच्या हातीं होतें. त्यावेळीं सर्व हिंदुस्थान इंग्रजांच्या राज्यांत समाविष्ट झाला होता. त्यामुळें शिपायांचें कार्यक्षेत्र वाढलें. दूर देशीं व हिंदुस्थानाबाहेर गेल्यानेंही आपलें धार्मिक आचार सुटतात व आपल्यावर धर्मभ्रष्ट होण्याची पाळी येते असें शिपायांस वाटत होतें. शिवाय वाटेल तेथें नेल्यास इंग्रज शिपायांस देत, त्याप्रमाणें हिंदी शिपायांस भत्ता दिला जात नसे. आपण कितीही इमानेइतबारें नोकरी केली तरी आपल्याला लष्करांत हुद्याच्या जागा मिळत नाहींत, अशी हिंदी शिपायांची तक्रार होती. सैन्यांत त्यावेळीं ब्राह्मण, रजपूत वगैरे उच्चवर्णीयांचा भरणा फार होता. परंतु सैन्यभरतीच्या नव्या नियमांत सुधारणा करून भरतीसंबंधीं अनेक जाचक नियम लादण्यांत आले होते. त्यामुळेंही शिपाई असंतुष्ट झाले होते. या व अशा अनेक कारणांमुळें हिंदी शिपायांचीं मनें बिथरलीं होतीं.

शेवटचा मोंगल बादशाह बहादूरशाह

५. तात्कालिक कारण :—अशी एकंदर कारणपरंपरा जुळून येत असतां युद्धाचा स्फोट होण्यास एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तात्कालिक कारण घडलें. त्यावेळीं एनफील्ड नांवाची एक नवीन बंदुक शिपायांस देण्यांत आली होती. तिच्यासाठीं जीं काडतुसें वापरण्यास दिलीं जात त्यांस गाईची व डुकरांची चरबी लावलेली होती अशी शिपायांची कल्पना झाली होती. याचा स्फोट अत्यंत विलक्षणरीतीनें झाला. बराकपुरच्या छावणींतील विहिरीवर एक ब्राह्मण व एक महार शिपाई यांच्यांत शिवाशिवीवरून बाचाबाची झाली. त्यावेळीं महारानें ब्राह्मणास टोमणा मारून काडतुसांस लावलेल्या गाईच्या चरबीचा उल्लेख केला. ही बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरली व आपल्यास भ्रष्ट करण्याकरितां गाईची व डुकराची चरबी काडतुसांस लाविली जाते असें हिंदु-मुसलमान शिपायांस वाटलें. त्यामुळें एकदम क्षोभ झाला व इतके दिवस धुमसत असलेल्या असंतोषाच्या अग्नीनें पेट घेऊन सर्वत्र हलकल्लोळ माजवून दिला.

६. युद्धाचीं क्षेत्रें :—सन १८५७ सालच्या युद्धांत उत्तरहिंदुस्थान व मध्यहिंदुस्थान या भागांस फार झळ पोंचली. त्या प्रांतांतील दिल्ली, कानपूर, लखनौ, मिरत, बराकपूर, झांशी, ग्वाल्हेर, बरेली वगैरे शहरें हीं बंडवाल्यांचीं मुख्य मान्याचीं ठाणीं बनलीं. दिल्लीस मोंगल बादशाह होता. कानपूरजवळ ब्रिठुरास दुसऱ्या बाजीरावाचा दत्तक मुलगा नानासाहेब होता. खालसा झालेल्या झांशी संस्थानाची राणी लक्ष्मीबाई झांशीस होती. या सर्वांस बंडवाल्यांनीं आपल्या बाजूस वळवून घेतलें होतें. इंग्रजांची सत्ता नामशेष करावयाची व दिल्लीची मोंगल बादशाही पुन्हां स्थापन करून नानासाहेब पेशव्यास त्याची मुख्य वजिरी द्यावयाची असा बंडवाल्यांचा मुख्य उद्देश होता. त्याप्रमाणें पहिला स्फोट रविवार ता. १० मे रोजीं मिरत येथील पलटणींत होऊन, तेथील शिपाई दिल्लीवर चाल करून गेले. थोड्याच वेळांत त्यांनीं दिल्ली शहर हस्तगत केलें व तेथील सिंहासनावर बहादुरशाह या मोंगलवंशजास बसविलें. लगेच त्याच्या नांवानें सर्वत्र द्वाही फिरविण्यांत आली. दिल्लीचें दारूचें कोठार बंडवाले काबीज करतील असें वाटल्यावरून तेथील इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्याला आग लावून दिली.

७. कानपूर व लखनौ :—बंडाचा वणवा पेटतांच बंडवाल्यांनीं कानपुरास वेढा दिला. इंग्रजांनीं प्रथम त्याचें चांगलें रक्षण केलें; परंतु त्यांचें पुढें चाललें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. तेव्हां ते सर्व नानासाहेब पेशव्याच्या स्वाधीन झाले. त्यावेळीं त्या शरण आलेल्या इंग्रजांस व त्यांच्या बायकामुलांस बंडवाल्यांनीं कंठस्नान घातलें! या कत्तलींत सुमारें २०० लोक मृत्युमुखीं पडले. त्या सर्वांचीं प्रेतें पुढें बंडवाल्यांनीं एका विहिरींत टाकून दिलीं. या प्रकारानंतर नील, कॉलिन कँबेल व हॅवलॉक या इंग्रज सेनापतींनीं कानपूर शहर जिंकून घेतलें. परंतु त्यानंतर बंडवाल्यांचा सेनापति तात्या टोपे यानें नीलसाहेबास पेंचांत धरलें; परंतु हॅवलॉकनें त्याची सुटका केली. त्याच वेळीं नील, हॅवलॉक वगैरे इंग्रज सेनापतींनीं लखनौ शहरही बंडवाल्यांकडून घेतलें. दिल्ली शहरही त्यांच्या ताब्यांत आलें. कानपूर, लखनौ व दिल्ली हीं शहरें इंग्रजांनीं जिंकून घेतल्यानें बंडवाल्यांचा जोर बराच कमी झाला. परंतु त्यांनीं पुन्हां जोर करून लखनौ जिंकलें. तेव्हां त्यांस तेथून घालवून देऊन इंग्रजांनीं तें शहर आपल्याकडे कायमचें ठेवलें. यानंतर तात्या टोपे झांशी-ग्वाल्हेरकडे पळून गेला.



सर हेन्री हॅवलॉक

८. झांशीची राणी :—सन १८१४ मध्यें झांशीचा राजा रामचंद्रराव याच्याशीं इंग्रजांनीं तह करून त्याचें राज्य वंशपरंपरा त्याच्याकडे राहील असें त्यांनीं त्याला वचन दिलें होतें. पुढें सन १८३७ मध्यें गंगाधरराव हा झांशीचा राजा झाला. तो निपुत्रिक होता; म्हणून त्याला दत्तकाची परवानगी देण्यांत आली. त्याची बायको म्हणजेच झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई होय. मोरोपंत तांब्यांची ती मुलगी. लहानपणींच तिला सर्व प्रकारचें लष्करी शिक्षण मिळालें होतें. तिला एक मुलगा होता तो पुढें वारला. पुढें तिचा नवरा गंगाधर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राव एकाएकीं सन १८५३ मध्यें मेला. परंतु त्यापूर्वी इंग्रज रेसिडेंटाच्या परवानगीनें त्यानें दत्तक घेतला होता; व त्याच्या अल्पवयांत लक्ष्मीबाईनें कारभार पहावा असें ठरलें होतें. परंतु डलहौसीनें दत्तकाला परवानगी दिली नाहीं व झांशी संस्थान खालसा केलें होतें. यामुळें राणी लक्ष्मीबाई रागावून बंडांत सामील झाली होती. प्रथमतः तेथील शिपायांनीं बंडाचा उठाव करून अनेक इंग्रजांस ठार केलें. यानंतर बंडवाले उत्तरेकडे नानासाहेबास जाऊन मिळाले. पुढें इंग्रजांचा सेनापति सर ह्यू रोझ यानें झांशीस वेढा दिला. राणीच्या मदतीस तात्या टोपे आला होता; परंतु त्याचा पराभव झाला. राणीचाही पराभव होऊन ती पळून गेली. पुढें राणी, तात्या टोपे, नानासाहेब पेशव्यांचा पुतण्या रावसाहेब वगैरे लोक ग्वाल्हेरवर चालून गेले व तें शहर त्यांनीं जिंकून घेतलें. तेव्हां ह्यू रोझनें त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा पराभव केला. लढत असतांच ही शूर झांशीवाली गोळी लागून मरण पावली. त्यानंतर तात्या टोपे इंग्रजांच्या हातीं सांपडला. त्याला फांशी देण्यांत आलें. नानासाहेब पेशव्याचा पाठलाग होत होता. तोही नेपाळांत पळून गेला. तेथें तो पुढें मरण पावला असा समज आहे. या सर्व घडामोडीनंतर बंडाचा लौकरच उपशम झाला (१८५८).

९. **परिणाम**:—बंडाची वार्ता ऐकून इंग्रजांचें हिंदुस्थानाकडे लक्ष लागलें. त्यामुळें कंपनीच्या हातून हिंदुस्थानचा कारभार काढून घेण्यांत यावा असें इंग्लंडांत लोकमत झालें. शेवटीं सन १८५८ मध्यें पार्लमेंटनें एक कायदा पास करून कंपनी रद्द केली व हिंदुस्थानचा कारभार इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिच्या नांवें सुरू केला. हिंदुस्थानचा कारभार पहाण्याकरितां भारतमंत्र्याची नेमणूक होऊन, त्याच्या मदतीस पंधरा सभासदांचें एक मंडळ देण्यांत आलें. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलास 'व्हाइसरॉय' हा नवा हुद्दा देण्यांत आला. नियामकमंडळ रद्द करण्यांत आलें. हिंदुस्थानांतील सर्व सैन्य विलायतसरकारच्या नियंत्रणाखालीं ठेवण्याचें ठरलें. शिवाय हिंदी लोकांस संतुष्ट करण्याकरितां व्हिक्टोरिया राणीनें सन १८५८ मध्यें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो 'राणीचा जाहीरनामा' म्हणून प्रसिद्ध आहे. लॉर्ड कॅनिंग यानें दिल्लीस मोठा दरबार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरविला व त्यांत तो मोठ्या इतमामानें सर्वांस वाचून दाखविला. हा जाहीरनामा हिंदुस्थानच्या राज्यघटनेचा मूळ पाया म्हणून उल्लेखण्यांत येतो. त्या दृष्टीनें त्याचें पुष्कळच महत्त्व आहे.

१०. लॉर्ड कॅनिंगच्या सुधारणा :—बंडाचा उपशम झाल्यावर कॅनिंगनें आपल्या मनाचा समतोलपणा सोडला नाहीं. आपल्या दयाळू वृत्तीस अनुसरून त्यानें कांहीं झालेंच नाहीं, अशा समजुतीनें आपल्या कारभाराचा गाडा पूर्ववत् चालू करून अनेक चांगल्या गोष्टी केल्या. (१) कंपनीचें सैन्य व राणीचें सैन्य यांचें त्यानें एकीकरण केलें. हिंदी सैन्यांत पुष्कळ सुधारणा केल्या. (२) जमाखर्चाची घडी अत्यंत बिघडली होती, ती सुधारण्याकरितां जेम्स विल्सन व सॅम्युअल लेंग या तज्ञांना त्यानें इंग्लंडांतून इकडे आणविलें व त्यांच्याकडून जमाखर्चाची सुधारणा करून घेतली. (३) वूडच्या खलित्यास अनुसरून त्यानें सन १८५७ मध्यें मुंबई, मद्रास व कलकत्ता येथें विश्वविद्यालयें स्थापन केलीं. (४) कायदे एकत्रित करून त्यानें 'पीनल कोड' व 'क्रिमिनल प्रोसीजर कोड' हीं कायद्याचीं पुस्तकें तयार केलीं; व त्यांचा उपयोग सुरू केला. (५) शेती करणाऱ्या कुळांच्या हिताच्या रक्षणार्थ त्यानें सन १८५९ मध्यें कायदा तयार करून तो बंगाल, बिहार, मध्यप्रांत, आग्रा व अयोध्या या प्रांतांना लागू केला. (६) सन १८६१ मध्यें कौन्सिलसंबंधीं कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यान्वयें मुंबई, मद्रास व बंगाल या प्रांतांस कायदेमंडळें देण्यांत आलीं. (७) पूर्वींचीं वरिष्ठ कोर्टें रद्द करण्यांत येऊन हायकोर्टें सुरू करण्यांत आलीं. इतकी कामगिरी केल्यावर सन १८६२ मध्यें लॉर्ड कॅनिंग राजीनामा देऊन परत गेला. हिंदुस्थानचा पहिला व्हाइसरॉय होण्याचा मान त्याला मिळाला. इंग्लंडमध्यें गेल्यावर तीनच महिन्यांनीं तो मरण पावला.

अभ्यास

१. सन १८५७ च्या युद्धाचीं कारणें सांगा. त्याचा परिणाम काय झाला ?

२. कॅनिंगचा स्वभाव सांगा. त्यानें कोणत्या सुधारणा केल्या ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. 'डलहौसीच्या कारकीर्दीमुळेंच सन १८५७ चें युद्ध झालें' असें म्हणतात, तें खरें का ? कशावरून ?

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
रावसाहेब, झांशीवाली, तात्या टोपे, बहादुरशाह, ह्यू रोझ, लेंग, विल्सन, नील, हॅवलॉक, नानासाहेब, मोरोपंत तांबे, मिरत, कानपूर.

५. राणीच्या जाहीरनाम्यांतील महत्त्वाचा भाग कोणता ? त्या जाहीरनाम्याचें महत्त्व वर्णा.

उतारे

राणीचा जाहीरनामा

व्हिक्टोरिया, ईश्वरकृपेनें ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याची व राणीच्या ताब्यांत युरोप, आशिया, आफ्रिका, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या खंडांमध्यें ज्या वसाहती व उपराज्यें आहेत त्या सर्वांची मालिका मआझमा (राणी) व धर्मसंरक्षक आहे.

आम्ही या जाहीरनाम्याच्याद्वारें कळवितों व प्रसिद्ध करितों कीं, पार्लमेंट सभेंत जमलेले स्पिरीच्युअल व टेंपोरल लॉर्ड व कॉमन्स यांची सल्ला व अनुमति घेऊन हिंदुस्थानांतील मुलुखांचा राज्यकारभार आम्ही आपल्या हातीं घेतला आहे......

सदरहू मुलुखांत आमचे पहिले व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणून आमचे मोठे विश्वासू आणि फार प्रीतींतले मंत्री नबाब चार्ल्स जॉन व्हायकौंट कॅनिंग यांस नेमतों......

ऑनरेबल ईस्ट इंडिया कंपनी यांनीं हल्लीं ज्या ज्या मुलकी व लष्करी कामांवर जे जे असामी नेमलेले आहेत त्या सर्वांस, त्या त्या कामांवर आम्ही कायम करतों....

हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांस आम्ही जाहीर करतों कीं, त्यांजबरोबर ऑनरेबल ईस्ट इंडिया कंपनीनें जे तहनामे व करारनामे केले असतील, किंवा जे सदरहू कंपनीच्या हुकमानें झाले असतील, ते सर्व आम्हांस मान्य आहेत, व आम्ही ते लक्षपूर्वक पाळूं; याचप्रमाणें राजेरजवाडे यांनींही आपापलेतर्फें ते तहनामे व करारनामे पाळले पाहिजेत...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमचें जें हल्लींचं राज्य आहे तें वाढविण्याची आम्हांस भगदीं इच्छा नाहीं. ज्याप्रमाणें आम्ही आपला अधिकार, आपला दर्जा व आपली प्रतिष्ठा राखतों त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांचा अधिकार, दर्जा व प्रतिष्ठा आम्ही राखूं.

ख्रिस्ती धर्माच्या खरेपणावर आमचा विश्वास आहे... धर्मासंबंधीं आमचे जे विचार आहेत ते आमच्या रयतेनें स्वीकारण्याविषयीं सक्ति करण्यास आम्हांस अधिकार नाहीं व तशी आमची इच्छाही नाहीं.... आमच्या सर्व अधिकाऱ्यांस आमची अशी सक्त ताकीद आहे कीं, आमच्या रयत लोकांची धर्मासंबंधीं समजूत किंवा भक्ति या प्रकरणीं त्यांनीं कोणतेहीप्रकारें हात घालूं नये; ते घालतील तर त्यांवर आमची मोठी इतराजी होईल....

महाराणी व्हिक्टोरिया

आणखी आमची अशी आज्ञा आहे कीं, आमच्या रयत लोकांपैकीं जे कोणी विद्येनें, हुशारीनें व प्रामाणिकपणें जीं जीं सरकारीं कामें यथाशक्ति चालविण्यास लायक असतील तीं तीं कामें, सवड असेल त्याप्रमाणें, बिनदिक्कत व निःपक्षपातानें त्या लोकांस ज्ञात किंवा धर्म मनांत न आणतां द्यावीं.......

जे लोक पुनः योग्यरीतीनें चालूं इच्छितात त्यांवर दया करून, त्यांच्या अपराधांची क्षमा करावी अशी आमची इच्छा आहे.......

ईश्वरकृपेनें जेव्हां हिंदुस्थानांत स्वस्थता होईल तेव्हां त्या देशांतील व्यापारधंद्यांस उत्तेजन द्यावें, लोकोपयोगी आणि लोककल्याणाच्या कृत्यांची वृद्धि करावी व त्या देशांत राहणाऱ्या आमच्या सर्व रयतेचें हित होईल अशारीतीनें राज्यकारभार चालावा अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमच्या रयतेच्या आबादानींतच आमचें सामर्थ्य आहे, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती व त्यांची कृतज्ञता तेंच आम्हांस उत्तम फल, असें आम्हीं समजतों.

प्रश्न :—१. ह्या जाहीरनाम्यांत राणीनें कोणतीं वचनें दिलें ? कशाकरितां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्वाचीन काळ

बादशाही अंमलाखालील हिंदुस्थान

६१. लॉर्ड लॉरेन्स ते लॉर्ड रिपन

१. लॉर्ड लॉरेन्स (१८६४–६९) :—हिंदुस्थानचा कारभार बादशाही अंमलाखालीं आल्यानंतर कॅनिंग हाच पहिला व्हाइसरॉय झाला. त्याच्या कारकीर्दीचा भाग मागील धड्यांत आलाच आहे. त्याच्यानंतर लॉर्ड एल्जिन व्हाइसरॉय झाला. एका वर्षांतच त्यानें राजीनामा दिल्यानें सर जॉन लॉरेन्स व्हाइसरॉय झाला. सत्तावन सालच्या बंडाच्या वेळीं पंजाबचें त्यानें रक्षण केलें होतें. सनदी नोकरांस व्हाइसरॉयची जागा मिळत नसे. त्याला लॉर्ड लॉरेन्स अपवाद होय. देशांत शांतता राखून राज्यकारभारांत सुधारणा करण्याचें त्याचें धोरण होतें. तसेंच परराष्ट्रीय धोरणांतही त्यानें अलिप्त-पणाच्या धोरणाचा अवलंब करण्याचें ठरविलें होतें. तो दृढनिश्चयी, धोरणी व खंबीर मनाचा होता.

२. अफगाणिस्थानासंबंधीं धोरण :—सन १८६३ मध्यें अमीर दोस्त-मोहंमद मरण पावल्यानें अफगाणिस्थानांत गादीबद्दल तंटे माजले. त्यावेळीं सर्व वारसांत जो कोणी यशस्वी होईल त्याला आपण मान्यता देऊं असें लॉरेन्सनें जाहीर केलें. अंतस्थ भानगडींत पडावयाचें नाहीं असेंही त्यानें जाहीर केलें. अखेर शेरअल्ली हा विजयी होऊन अफगाणिस्थानचा अमीर झाला. लॉरेन्सनें त्याला मान्यता दिली व त्याच्याशीं मैत्रीचा एक तह केला. हेतु इतकाच कीं त्या मार्गानें रशियाचा हल्ला आल्यास अफगाणिस्थानचा लोडसंस्थानासारखा उपयोग व्हावा. अफगाणिस्थानासंबंधाच्या त्याच्या धोरणास ‘ नमुनेदार तटस्थपणाचें धोरण ’ असें म्हणतात. त्याच्या कारकी-र्दींत भूतानी लोकांशीं त्याला युद्ध करावें लागलें. त्यांत इंग्रजांस यश मिळ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें हिमालयाच्या पायथ्याकडील चहाच्या मळ्यांचा भाग त्यांस मिळून इतरही कांहीं प्रदेश मिळाला.

३. राज्यकारभार :—लॉरेन्सच्या वेळीं हिंदुस्थानांत सन १८६६ त ओरिसामध्यें एक मोठा दुष्काळ पडला. दुष्काळग्रस्तांस योग्य ती मदत दळणवळणाच्या अभावीं मिळूं शकली नाहीं. त्यामुळें दुष्काळांत सुमारें दहा लाख लोक मेले. पुढें सन १८६८ मध्यें बुंदेलखंड व राजपुताना येथेंही दुष्काळ पडला. त्यावेळीं सरकारनें चांगली मदत केली. अयोध्याप्रांतांतील कुळांच्या संरक्षणाकरितां त्यानें एक कायदा पास केला व शेतकऱ्यांस जास्त सवलती दिल्या (१८६८). तशाच तऱ्हेचा कायदा पंजाबकरतांही त्यानें पास केला होता. त्यावेळीं अमेरिकन यादवीयुद्ध सुरू होतें. त्यामुळें अमेरिकन कापूस इंग्लंडमध्यें येण्याचें बंद झालें. तेव्हां हिंदी कापसाला फार मागणी येऊं लागली. त्यामुळें प्रथमतः हिंदी व्यापाऱ्यांस फार फायदा झाला. पुढें युद्ध थांबल्यानें हिंदी कापसाची मागणी एकदम बंद झाली. व्यापाऱ्यांनीं यावेळीं सट्टेबाजी फार केली. त्यामुळें भांडवलवाले व बँका यांचीं दिवाळीं निघालीं व व्यापाऱ्यांचें फार नुकसान झालें. सन १८६९ मध्यें लॉर्ड लॉरेन्स विलायतेंत गेला.

४. लॉर्ड मेयो (१८६९–१८७२) :—लॉरेन्सनंतर लॉर्ड मेयो व्हाइसरॉय झाला. तो गोड व आनंदी वृत्तीचा व डिझरेलीच्या पारखीस उतरलेला मुत्सद्दी होता. हिंदुस्थानांत येतांच सन १८६९ मध्यें त्यानें अंबाला येथें दरबार भरवून शेरअल्लीची भेट घेतली. त्यावेळीं रशियाच्या स्वारीचें भय अफगाणिस्थानला वाटत होतें. तेव्हां शेरअल्लीला इंग्रजांची मदत हवी होती. मेयोनें त्याला मदतीचें आश्वासन दिलें; मात्र ती केव्हां व कोणत्या स्वरूपांत द्यावयाची तें आपल्या मर्जीवर अवलंबून ठेवलें. याच वेळीं मेयोनें विलायतसरकारकडे निकड लावून रशियाकडे एक वकील पाठविला व त्याच्याकडून रशिया व अफगाणिस्थान यांच्या सरहद्दी ठरवून घेतल्या. एकंदरींत मेयोनेंही लॉरेन्सचें ' नमुनेदार तटस्थपणाचें धोरण ' स्वीकारलें होतें.

५. अंतर्गत कारभार :—त्यावेळीं सरकारी खजिन्यांत फार तूट येत असे. सर्व हिंदुस्थानच्या जमाखर्चाचें काम मध्यवर्ती सरकारकडे होतें. मात्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांतिक सरकारांस जरूरीपुरता पैसा मध्यवर्ती सरकार पुरवी. ही स्थिति सुधारण्याकरितां सन १८७१ मध्यें मेयोनें 'प्रांतिक करारनाम्याची पद्धति' सुरू केली. त्या पद्धतीप्रमाणें पोलिस, शिक्षण, वैद्यक, रस्ते वगैरे महत्त्वाचीं खातीं प्रांतांकडे सर्वस्वी सोपविण्यांत आलीं व त्यांच्या जमाखर्चाची जबाबदारीही प्रांतांवर टाकण्यांत आली. शिवाय मध्यवर्ती सरकारकडून देणग्याही त्यांस मिळत. त्याचप्रमाणें मेयोनें मिठावरील करांत वाढ केली. इतर खात्यांकडेही त्यानें लक्ष पुरविलें. त्यानें रस्ते व सडका, आगगाड्या व कालवे यांची वाढ करून दळणवळणांत सुधारणा केली. अगदीं प्रथमच त्यानें हिंदुस्थानची खानेसुमारी केली. शेतकी व व्यापार यांसंबंधीं त्यानें एक नवें खातें सुरू केलें. अजमीर येथें संस्थानिकांच्या मुलांच्या शिक्षणाकरितां त्यानें एक महाविद्यालय स्थापिलें. तें 'मेयो कॉलेज' या नांवानें प्रसिद्ध आहे. सर्व देशाची पहाणी करून निरनिराळ्या बाबींसंबंधीं त्यानें आंकडेवार माहिति प्रसिद्ध केली. त्याला तुरुंगांच्या व्यवस्थेंत सुधारणा घडवून आणावयाच्या होत्या; व तेवढ्याकरितां तो अंदमान बेटांत पहाणीकरितां गेला होता. तेथेंच एका माथेफिरू पठाणानें त्याचा खून केला (१८७२).

६. **लॉर्ड नॉर्थब्रुक** (१८७२–१८७६):—लॉर्ड मेयोनंतर लॉर्ड नॉर्थब्रुक व्हाइसरॉय झाला. विलायतेंत असतां त्याला कामाचा अनुभव चांगला मिळालेला होता. त्याच्या कारकीर्दींत सन १८७५ मध्यें इंग्लिश युवराज एडवर्ड हा हिंदुस्थानांत आला. त्याचें हिंदी प्रजेनें हार्दिक स्वागत केलें. फर्डिनंड डी लेसेप्स या फ्रेंच एंजीनियरनें खोदलेला सुवेझचा कालवा सन १८६९ मध्यें खुला झाला. त्यामुळें इंग्लंड–हिंदुस्थानचा व्यापार वाढला. तेव्हां मँचेस्टरवरील जकात रद्द करण्याबद्दल नॉर्थब्रुकला डिझरेलीनें सुचविलें. परंतु हिंदुस्थानच्या हितास ती गोष्ट बाधक आहे असें सांगून नॉर्थब्रुकनें ती गोष्ट नाकारली. प्राप्तीवरील कर त्यानें अजीबात रद्द केला. मात्र मिठावरील कर त्यानें ठेवून दिला. सन १८७४ मध्यें बिहारमध्यें दुष्काळ पडला होता. त्यावेळीं दुष्काळग्रस्तांस त्यानें पुष्कळ मदत केली. बडोद्याचा इंग्रज रेसिडेंट कर्नल फेअर याच्यावर विषप्रयोग होऊन, तो मरण पावला. बडोद्याचा राजा मल्हारराव गायकवाड याच्यामुळें हा प्रसंग घडला असें मत त्यावेळीं प्रचलित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालें. तेव्हां नॉर्थब्रुकनें एक कमिशनर नेमून मल्हाररावाची चौकशी केली. त्या कमिशनमध्यें असणाऱ्या सभासदांत मतभेद होऊन, युरोपियन सभासदांनीं मल्हारराव दोषी असल्याचें ठरविलें. तेव्हां त्याला पदच्युत करण्यांत येऊन सयाजीराव गायकवाड या दत्तक मुलास बडोद्याच्या राज्यावर बसविण्यांत आलें (१८७५). त्याचा कारभारी म्हणून सर टी. माधवराव याची नेमणूक झाली. नॉर्थब्रुकच्या वेळीं रशियाची सरहद्द अफगाणिस्थानाला जवळ जवळ येऊन भिडली. तेव्हां शेरअल्लीनें मदतीकरितां नॉर्थब्रुकची याचना केली. परंतु नॉर्थब्रुकनें मेयोच्या वेळच्या तहाकडे बोट दाखवून, जास्त कांहींही करण्याचें नाकारलें. त्यामुळें शेरअल्ली असंतुष्ट राहिला. मात्र नॉर्थब्रुकनें त्याला ६००० बंदुका बक्षीस दिल्या. त्याचा त्यानें आनंदानें स्वीकार केला. यानंतर नॉर्थब्रुकनें राजीनामा दिला.

७. लॉर्ड लिटन (१८७६–१८८०):—लॉर्ड लिटन हा नॉर्थब्रुकनंतर व्हाइसरॉय झाला. तो उत्तम लेखक, कवि व वक्ता होता. अंगीं मोठी तडफ व कर्तबगारी असूनही डिझरेलीच्या सांगीप्रमाणें वागून त्यानें सर्व घोटाळा केला. येथें आल्यावर त्यानें सन १८७७ मध्यें दिल्ली येथें एक मोठा दरबार भरविला व त्या दरबारांत राणी व्हिक्टोरियानें 'कैसर-ई-हिंद' ऊर्फ हिंदुस्थानची सम्राज्ञी हा किताब धारण केल्याचें जाहीर केलें. सन १८७७ मध्यें दक्षिण हिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडला. जवळ जवळ पन्नास लाख लोक दुष्काळास बळी पडले ! तेव्हां त्यानें एक दुष्काळ–कमिशन नेमलें. त्या कमिशननें सर्व चौकशी करून (१) दुष्कळांत दुष्काळी कामें सुरू करून लोकांस अन्न द्यावें, (२) दरवर्षी दीड कोटींचा दुष्काळफंड निराळा ठेवावा व त्यांतून पाटबंधारे, आगगाडी, दुष्काळकर्जफेड वगैरे खर्च व्हावा (३) देशांत धान्याचा व्यापार मुक्त ठेवावा, अशा सूचना केल्या. त्याच्या-वेळीं मिठावरील जकात निरनिराळ्या प्रांतांत वेगवेगळी होती. ती त्यानें सर्व प्रांतांत सारखी केली. खुल्या व्यापाराच्या तत्त्वांस अनुसरून त्यानें कित्येक जिनसांवरील जकाती कमी केल्या. सन १८७४ मध्यें मेयोच्या प्रांतिक करारनाम्याच्या पद्धतीस अनुसरून त्यानें जमीनमहसूल, न्यायखातें व कांहीं किरकोळ वसूल हीं जादा खातीं प्रांतिक सरकारकडे सोपविलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १८७८ मध्यें 'देशी वर्तमानपत्रांसंबंधीं कायदा' पास केला. त्यावेळीं रशिया व तुर्कस्थान यांच्यामध्यें युरोपांत युद्ध सुरू होतें. तेव्हां देशी वर्तमानपत्रवाले रशियन लोकांच्या पराक्रमाचें वर्णन व इंग्रजांच्या धोरणाचा निषेध करीत. म्हणून त्यांच्यावर नियंत्रण घालण्याकरितां हा कायदा लिटननें केला. तो कायदा फार अप्रिय झाला होता. सन १८७९ पासून सनदी नोकरीची परीक्षा हिंदुस्थानांत सुरू करून, शेंकडा सोळा जागा हिंदी लोकांकरितां राखून ठेवण्यांत आल्या.

८. **दुसरें अफगाण युद्ध** (१८७८–१७८०):—लॉर्ड लिटनच्या कारकीर्दींत अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे दुसरें अफगाण युद्ध ही होय. लिटन चढावाच्या धोरणाचा पुरस्कर्ता होता. तेव्हां त्यानें हिंदुस्थानांत आल्यावर शेरअल्लीकडे आपला वकील ठेवण्याबद्दल बोलणें काढलें. अगोदरच इंग्रजांवर नाखूष असल्यानें, शेरअल्ली रशियाच्या मैत्रीकरितां झटत होता. अशा स्थितींत शेरअल्लीनें 'आपला वकील पाठवा. परंतु त्याच्या जिवाची हमी मला देतां येणार नाहीं; शिवाय तुमचा वकील माझ्या दरबारीं आल्यास रशियाचा वकीलही मी दरबारीं ठेवीन' असें त्या लिटनला उत्तर धाडलें. या उत्तरानें आपला अपमान झाला असें लिटनला वाटलें. त्याच सुमारास इंग्रजांनीं बलुचिस्थानच्या अमिरापासून क्वेट्टा आपल्या ताब्यांत घेतलें. त्यामुळें शेरअल्लीस इंग्रजांचा संशय येऊन त्यानें रशियाचा वकील आपल्या दरबारीं ठेवला व इंग्रजांचा वकील ठेवण्याचें साफ नाकारलें. तेव्हां त्याच्याकडे एक शिष्टमंडळ पाठविण्याचें लिटननें ठरविलें. त्याला शेरअल्ली अफगाणिस्थानांत येऊं देण्यास तयार होईना. तेव्हां युद्धास सुरुवात झाली. त्यांत शेरअल्लीचा पराभव होऊन तो तुर्कस्थानांत पळून गेला. तेव्हां इंग्रजांनीं त्याच्या याकुबखान नामक मुलास गादीवर बसविलें व त्याच्यांशीं सन १८७९ मध्यें गंडमुख येथें तह केला. या तहान्वयें ब्रिटिश वकील अफगाण दरबारीं रहावा व अमिरानें आपलें परराष्ट्रीय धोरण इंग्रजांच्या सल्ल्यानें ठरवावें असें ठरलें. त्याप्रमाणें कॅव्हग्नारी काबूलास वकील म्हणून गेला. परंतु काबूलांत बंड होऊन त्याचा व इतरांचा खून झाला. तेव्हां युद्धास पुन्हां सुरुवात झाली. सेनापति लॉर्ड रॉबर्टसनें पुढें काबूल घेतलें. याकुब-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खानास पदच्युत केलें व तेथें आपली जरब बसविली. परंतु त्याचवेळीं इंग्रजांच्या पराभवानें लिटनचे मनोरथ ढांसळले. त्याचें धोरण अयशस्वी झाल्यानें त्याच्यावर टीका होऊं लागली. तेव्हां त्यानें राजीनामा दिला (१८८०).

९. **लॉर्ड रिपन** (१८८०–१८८४):—लॉर्ड लिटननंतर लॉर्ड रिपन व्हाइसरॉय झाला. तो उदारमतवादी व मुत्सद्दी होता. हिंदुस्थानांत आल्यावर अफगाणिस्थानशीं चाललेला लढा एकदम मिटता घ्यावा असा त्याचा बेत होता. परंतु त्यामुळें इंग्रजांच्या प्रतिष्ठेला बाध येतो असें वाटून रिपननें कांहीं दिवस युद्ध चालू ठेवलें. त्याचवेळीं लॉर्ड रॉबर्ट्सनें कंदाहार व काबूल जिंकल्याची वार्ता आली. तेव्हां लॉर्ड रिपननें अबदुल रहमान यास अफगाणिस्थानचा अमीर म्हणून मान्यता दिली व ब्रिटिश फौजा परत बोलाविल्या. अशातऱ्हेनें रिपननें लिटनचें चढावाचें धोरण टाकून देऊन तो इतर गोष्टींकडे वळला. **आर्थिक बाबतींत** त्यानें बऱ्याच सुधारणा केल्या. मिठावरील कर पूर्वीं दर मणीं अडीच रुपये होता, तो त्यानें दोन रुपये केला. जमाबंदी खात्यांत सुधारणा करून त्यानें ‘ विभागलेल्या खात्यांची पद्धति ’ सुरू केली. तिला अनुसरून त्यानें जंगलखातें, अबकारी खातें, कोर्टांची तिकिटें वगैरेंपासून होणारें उत्पन्न मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार यांनीं अर्धें अर्धें वांटून घ्यावें व मीठ, अफू व जकाती यांचें उत्पन्न मध्यवर्ती सरकारकडे रहावें असें ठरविलें. सन १८८२ मध्यें खुल्या व्यापाराच्या तत्त्वास अनुसरून त्यानें बहुतेक सर्व जकाती उठविल्या. **स्थानिक स्वराज्य** लोकांस दिलें तर त्यांस राजकीय शिक्षण मिळून लोकसत्ताक राज्यपद्धतीचा अनुभव मिळेल अशी त्याची ठाम कल्पना होती. त्याप्रमाणें त्यानें सन १८८२ मध्यें ‘ स्थानिक स्वराज्याचा कायदा ’ केला. या कायद्यान्वयें स्थानिक स्वराज्य-संस्थांस बरीच स्वतंत्रता प्राप्त होऊन, त्यांच्यावरील कामाची जबाबदारी वाढली. त्या कायद्यानें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें स्थापण्यांत आलीं. देशी वर्तमानपत्रांसबंधीं लिटननें पास केलेला कायदा रिपननें रद्द केला. त्यामुळें त्यांस पुन्हां मुद्रणस्वातंत्र्य मिळालें. कारखान्यांतून मुलांकडून फार काम करून घेत. तेव्हां त्यासंबंधीं त्यानें एक कायदा पास करून मुलांकडून फक्त नऊ तास काम करून घ्यावें असें ठरविलें. सन १८८३ मध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इलबर्ट बिल पास करण्यांत आलें. त्या बिलानें युरोपियन गुन्हेगारांची चौकशी करण्याचा अधिकार हिंदी न्यायाधिशांस देण्यांत आला. मात्र त्या गुन्हेगारांस युरोपियन मताधिक्याची ज्यूरी मागण्याचा अधिकार ठेवण्यांत आला. हें बिल पास झाल्यानें रिपनची लोकप्रियता फार वाढली. त्यानें रेल्वेचा विस्तार करण्यास व शेतीला उत्तेजन मिळावें म्हणून कालवे खणण्यास प्रोत्साहन दिलें. सन १८८३–८४ मध्यें त्यानें कलकत्त्यास एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविलें. सन १८८२ मध्यें सर विल्यम हंटर याच्या अध्यक्षतेखालीं त्यानें एक शिक्षण कमिशन नेमिलें. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाची सुधारणा करण्याकरितां कोणत्या उपायांची योजना करावी, हें सुचविण्याकरितां हें कमिशन नेमण्यांत आलें होतें. त्या कमिशननें सर्व चौकशी करून प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष देण्यांत यावें व दुय्यम शाळा खाजगी संस्थांकडे सोंपवून त्यांस सरकारनें आर्थिक मदत करावी असें सुचविलें. कमिशनच्या सूचनांप्रमाणें रिपननें नवीन नियम केले. त्यामुळें प्राथमिक व दुय्यम शिक्षणाचा फैलाव झाला. सन १७९९ मध्यें लॉर्ड वेल्स्लीनें म्हैसूरचें राज्य टिपूकडून जिंकून घेतलें व त्या राज्यावर पूर्वींच्या वोडियर घराण्यांतील कृष्णराजास बसविलें. त्याचा कारभार नीट नसल्यानें बेंटिंकनें तो एका इंग्रज रेसिडेंटाकडे सोंपविला होता. सन १८८१ मध्यें रिपननें म्हैसूरच्या गादीवर कृष्णराजाच्या दत्तक मुलास पुन्हां बसवून त्याच्या हातीं म्हैसूरचा कारभार दिला (१८८१). तसेंच बडोद्याचा सयाजीराव गायकवाड वयांत आल्यानें त्याच्याकडे बडोदा संस्थानचा राज्यकारभार सोंपविला. सन १८८४ मध्यें लॉर्ड रिपन राजीनामा देऊन इंग्लंडला निघून गेला. हिंदी लोकांचा कैवारी म्हणून त्याची फार ख्याति झाली. त्यामुळें तो फार लोकप्रिय झाला. त्याच्या कारकीर्दींत राजकीय व सामाजिक सुधारणा झाल्यानें हिंदुस्थानची प्रगति झाली.

अभ्यास

१. लॉर्ड मेयोनें केलेल्या सुधारणा सांगा.

२. सन १८६० ते १८८० पर्यंतचें इंग्रजांचें अफगाणिस्थानासंबंधींचें धोरण सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. 'लॉर्ड लिटन अप्रिय झाला परंतु लॉर्ड रिपन लोकप्रिय झाला' हें विधान उदाहरणें देऊन सिद्ध करा.

४. दुसऱ्या अफगाण युद्धाचीं कारणें सांगा. लॉर्ड लिटन त्या युद्धाला कितपत जबाबदार होता ?

५. रिपनच्या सुधारणा सांगा. तो लोकप्रिय कां झाला ?

६. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.
नमुनेदार तटस्थपणाचें धोरण, प्रांतिक करारनाम्याची पद्धति, इलबर्ट बिल, वर्तमानपत्रांसंबंधीं कायदा, स्थानिक स्वराज्य, मल्हारराव गायकवाड, दुष्काळ कमिशन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६२. लॉर्ड डफरिन ते लॉर्ड मिंटो

१. लॉर्ड डफरिन (१८८४-१८८८) :— लॉर्ड डफरिन रिपनच्या जागीं व्हाइसरॉय झाला. तो मोठा मार्मिक वक्ता, व्यवहारचतुर मुत्सद्दी व प्रेमळ स्नेही होता. त्याच्या कारकीर्दीतच अफगाणिस्थान व रशिया यांच्या सरहद्दीवर असलेल्या पेनजेह या ठाण्याबद्दल रशिया व अफगाणिस्थान यांच्यांत तेढ उत्पन्न झाली. तेथें अफगाण व रशियन यांच्यामध्यें चकमकीही झडल्या. त्यामुळें युद्धाचा वणवा पेटणार अशी भीति वाटूं लागली. तेव्हां अमीर अबदुल रहमान यानें रशियाशीं सलोख्याचें धोरण स्वीकारलें व युद्ध टाळलें. डफरिनच्या कारकीर्दीत **तिसरें ब्रह्मी युद्ध** झालें (१८८६). दुसऱ्या ब्रह्मी युद्धानंतर ब्रह्मी लोक इंग्रज व्यापाऱ्यांस आपल्या राज्यांत येऊं देईनात. शिवाय ब्रह्मी राजा थिबा यानें इंग्रज वकिलाचा अपमान केला. त्याचप्रमाणें थिबानें इटली व फ्रान्स या देशांशीं व्यापारी तहाची वाटाघाट चालविली. एका इंग्रज कंपनीकडून थिबानें जबर दंडही घेतला. त्या शिक्षेचा फेरविचार व्हावा, आपला वकील दरबारीं ठेवावा, इतर युरोपियनांशीं संबंध ठेवूं नये, ब्रह्मदेशांतून चीनशीं व्यापार करण्याची इंग्रजांस परवानगी द्यावी वगैरे मागण्या डफरिननें थिबाकडे केल्या. त्या झिडकारण्यांत आल्यानें युद्ध सुरू झालें. पराभूत थिबा राजा इंग्रजांस शरण आला. तेव्हां त्याच्या ताब्यांतील मंडाले प्रांत इंग्रजी राज्यास जोडण्यांत आला. यामुळें सर्व ब्रह्मदेश इंग्रजांच्या ताब्यांत आला. ब्रह्मी लोकांचा शेवटचा राजा थिबा याला इंग्रजांनीं रत्नागिरीस कैदेंत ठेवलें. तेथेंच तो सन १९२६ मध्यें वारला.

२. इतर गोष्टी :— सन १८८७ मध्यें व्हिक्टोरिया राणीच्या राज्यकारभारास पन्नास वर्षें झाल्यानें सुवर्णमहोत्सव साजरा करण्यांत आला. सन १८८६ मध्यें डफरिननें ग्वाल्हेरचा किल्ला शिंदेसरकारास कांहीं मोबदला घेऊन परत केला. त्याच वर्षीं ज्या रेल्वे कंपन्यांची ठराविक मुदत संपली असेल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या रेल्वेची मालकी सरकारनें आपल्याकडे घ्यावी असें ठरविण्यात आलें. बंगाल, अयोध्या व पंजाब या प्रांतांतील कुळांच्या संरक्षणार्थ महत्त्वाचे कायदे पास करण्यांत आले.

३. हिंदी राष्ट्रीय सभा (१८८५):—राणीच्या जाहीरनाम्यानंतर हिंदी राज्यकारभारांत हिंदी लोकांस कांहीं भाग मिळेल अशी येथील लोकांस आशा वाटत होती. पुढें रिपनच्या कारकीर्दींत लोकांस राजकीय शिक्षण देण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें. त्यामुळें एकराष्ट्रीयत्वाच्या भूमिकेचें बीजारोपणही हिंदुस्थानांत झालें. त्यानें प्रोत्साहित होऊन कांहीं हिंदी पुढाऱ्यांनीं हिंदी राष्ट्रीय सभेची सन १८८५ मध्यें स्थापना केली. त्या बाबतींत सर ॲलन ह्यूम, सर हेन्री कॉटन, न्यायमूर्ति माधवराव रानडे, तेलंग, दादाभाई नौरोजी वगैरेंचे श्रम फार कारणीभूत झाले. या सभेची पहिली सभा पुण्यास भरणार होती. परंतु तेथें प्लेग असल्यानें ती मुंबईस भरली.

४. लॉर्ड लॅन्सडाऊन (१८८८–१८९४):—लॉर्ड डफरिननंतर लॉर्ड लॅन्सडाऊन व्हाइसरॉय झाला. पूर्वी देशांत चांदीचीं नाणीं असत. परंतु यावेळीं युरोपियन देशांनीं सोन्याचें नाणेंच चालू ठेवल्यानें हिंदी रुपयाची किंमत घटूं लागली. त्यामुळें फार नुकसान होऊं लागल्यानें सरकारनें पौंड व रुपया यांच्या किंमतीचें प्रमाण एक रुपयास सोळा शिलिंग असें ठरवून दिलें. अफगाणिस्थान व हिंदुस्थान यांची सरहद्द ठरविण्याकरितां मार्टिअर ड्यूरांड याच्या मध्यस्थीनें एक कमिशन अमिराकडे पाठविण्यांत आलें. त्याच्याशीं अमिरानें सलोख्याचें बोलणें केलें. त्याप्रमाणें सरहद्दी-वरील वझिरी, आफ्रिडी वगैरे जमातींवर इंग्रजांचें वर्चस्व स्थापन होऊन सरहद्दीची रेषाही ठरविण्यांत आली. सन १८९२ मध्यें कौन्सिल-संबंधीं नवा कायदा पास करण्यांत आला. या कायद्यानें कौन्सिलांतील सभासदांची संख्या वाढविण्यांत येऊन लोकनियुक्त बिनसरकारी सभासदांची संख्याही जास्त ठेवण्यांत आली. तसेंच कौन्सिलांतील सभासदांस अंदाजपत्रका-वर चर्चा करण्याचा व माहितीकरितां सरकारला प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्यांत आला. हा कायदा पास झाल्यानें हिंदी लोकांस राज्यकार-भारासंबंधीं विचारविनिमय करण्याचा अधिकार मिळाला व सरकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धोरणावर लोकमताचा दाब बसूं लागला. कामगारांचें संरक्षण करणारा कायदाही यावेळीं पास करण्यांत आला. यानंतर सन १८९४ मध्यें लॅन्सडाऊननें राजीनामा दिला.

५. **लॉर्ड एल्जिन** (१८९४–१८९९):—मागील एका व्हाइसरॉयचा हा मुलगा होय. तो व्हाइसरॉय असतांना हिंदुस्थानावर फार संकटें आलीं. त्याच्या कारकीर्दींत चित्रळ प्रांतावर स्वारी करण्यांत आली. दुसरी स्वारी खैबर घाटाच्या खालीं दक्षिणेस असलेल्या तिऱ्हा प्रांतावर झाली. त्या प्रांतांत आफ्रिडी लोक रहात. त्यांनीं इंग्रजांशीं हें युद्ध मोठ्या चिकाटीनें चालविलें होतें. शेवटीं त्यांचा मोड झाला. हिंदुस्थानांत सन १८९६ मध्यें मोठा दुष्काळ पडला. त्यांत सुमारें सात–आठ लाख लोक मृत्युमुखीं पडले. अफूचा व्यापार अनीतिमूलक आहे असें अनेकांस वाटत होतें. तेव्हां त्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्यांत आलें व तो व्यापार हळूहळू कमी करण्याचें धोरण हिंदुस्थानसरकारनें मान्य केलें. सन १८९७ मध्यें राणी व्हिक्टोरियाच्या राज्यकारभारास साठ वर्षें झाल्यानें हीरकमहोत्सव साजरा करण्यांत आला. त्यावेळीं दिल्लीस मोठा दरबार भरविण्यांत आला होता. सन १८९६ मध्यें मुंबईस प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यानें लक्षावधि लोक मरूं लागले. पुढें दरवर्षीं प्लेगची सांथ हिंदुस्थानांत पसरूं लागली. सन १८९७ मध्यें पुण्यास दोन प्लेग अधिकाऱ्यांचे खून झाले. प्लेगचा प्रसार थांबविण्याकरितां सरकारनें प्लेगप्रतिबंधक उपाय योजले होते. सन १८९८ मध्यें लॉर्ड एल्जिन मुदत भरल्यानें इंग्लंडला गेला.

६. **लॉर्ड कर्झन** (१८९९–१९०५):—लॉर्ड एल्जिननंतर लॉर्ड कर्झनची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक झाली. तो चार वेळां हिंदुस्थानांत येऊन गेलेला असल्यानें त्याला हिंदुस्थानची बरीच माहिती झाली होती. कट्टर कंझर्व्हेटिव्ह म्हणून त्याची फार ख्याति होती. हुशार व्हाइसरॉयांच्या यादींत त्याचें नांव चांगलेंच झळकेल. तो हेकेखोर, उत्साहानें काम करणारा, कुशाग्र बुद्धीचा व साधकबाधक विचार करणारा होता. अमुक एका खात्यावरून त्याचा हात फिरला नाहीं असें एकही खातें त्यावेळीं त्यानें शिल्लक ठेवलें नाहीं. लॉर्ड डलहौसीनंतर हिंदुस्थानच्या कारभारावर त्याचाच ठसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जास्त उठावदारपणें उठला आहे. त्यामुळें त्यानें नकळत डलहौसीचें ध्येय व धोरण स्वीकारल्याचें दिसतें.

७. अफगाणिस्थानासंबंधी धोरण :—अफगाणिस्थानासंबंधीं त्यानें अलिप्तपणाच्या धोरणाचा स्वीकार केला. त्या वेळीं पूर्वीचा अमीर अबदुल रहमान वारला व त्याचा मुलगा हबीबुल्ला अमीर झाला होता. तेव्हां कर्झननें एक शिष्टमंडळ पाठवून त्याच्याशीं नवा तह केला. त्या तहानें अफगाणिस्थानच्या अमिराचा 'राजा' हा किताब मान्य करण्यांत आला. या तहानें इंग्रज व अफगाण यांच्यांत सलोखा निर्माण झाला. याचवेळीं सरहद्द प्रांताच्या रक्षणाकरितां तेथील लोकांचेंच लष्कर उभारण्याचें कर्झननें ठरविलें. यामुळें तेथील जमातींचें रक्षण चांगलें होईल अशी त्याची कल्पना होती. पंजाबचे कांहीं जिल्हे व सरहद्दीवरील कांहीं प्रदेश यांचा एक स्वतंत्र प्रांत बनवून, त्याचा राज्यकारभार एका लेफ्टेनंट गव्हर्नरकडे कर्झननें सोंपविला.

लॉर्ड कर्झन

८. तिबेट व इराण :—तिबेटी सरकार रशियाशीं गुप्त पत्रव्यवहार करून हिंदी व्यापारास आडकाठी आणूं लागलें. त्यामुळें कर्झननें तिबेटवर सन १९०४ मध्यें स्वारी केली. कर्नल यंगहजबंडनें तिबेटी लोकांचा पराभव केला. त्यानंतरच्या तहानें इंग्रजांस बऱ्याच व्यापारी सवलती मिळाल्या. परंतु त्याला रशिया व चीन यांनीं जोराचा विरोध केल्यानें ब्रिटिश प्रधानमंडळानें तो तह रद्द केला. तिबेटप्रमाणेंच इराणच्या आखातांतही इंग्रजांचें प्रस्थ माजविण्याचा कर्झननें प्रयत्न केला. सन १९०३ मध्यें त्यानें इराणी आखाताकडे स्वतः दौरा काढला व ठिकठिकाणीं ब्रिटिश व्यापार वाढवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेथें ब्रिटिश अधिकारी ठेवले. त्यामुळें इराण व इराणचें आखात येथें इंग्रजांचें वर्चस्व कायम राखण्यास मोठी मदत झाली.

९. व्हिक्टोरियाचा मृत्यु (१९०१) :—सन १९०१ मध्यें व्हिक्टोरिया राणी मृत्यु पावली. मरणसमयीं तिचें वय ८२ वर्षांचें होतें. तिनें ६४ वर्षें राज्य केलें. तिचा ज्येष्ठ पुत्र सातवा एडवर्ड इंग्लंडचा राजा व हिंदुस्थानचा बादशाह झाला. पुढें सन १९०३ मध्यें एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त दिल्लीस मोठ्या थाटाचा दरबार भरविण्यांत आला. त्या प्रसंगीं हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व हिंदी संस्थानिक दिल्लीस हजर होते.

१०. दुष्काळ व प्लेग :—सन १९०० मध्यें हिंदुस्थानांत पुन्हां कडक दुष्काळ पडला. त्यामुळें सुमारें दहा लाख लोक मृत्युमुखीं पडले. त्यावेळीं कर्झननें एक दुष्काळ कमिशन नेमलें होतें. दुष्कळाप्रमाणेंच प्लेगमुळेंही सन १९०४–५ मध्यें सुमारें नऊ लाख लोक मेले. तेव्हां प्लेगसंबंधींही त्यानें आणखी एक कमिशन नेमलें. नेहमीं नेहमीं दुष्काळ पडतो, त्याचें मुख्य कारण म्हणजे जबर शेतसारा होय, असें मत रमेशचंद्र दत्त यानें मांडलें होतें. तेव्हां कर्झननें त्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून खालील सुधारणा केल्या. (१) कालव्यांची वाढ करून शेतीस उत्तेजन दिलें. (२) शेतकऱ्यांस लागणारें भांडवल माफक व्याजानें मिळावें म्हणून त्यानें सहकारी पतपेढ्या स्थापन केल्या. (३) ठिकठिकाणीं शेतीचें शिक्षण देणारीं शेतकी कॉलेजें स्थापिलीं. (४) लांब मुदतीनें सारा वाढवावा, ही वाढ हप्त्यानें करावी व दरसाल आणेवारी करून सारा ठरवावा असें ठरविण्यांत आलें. याशिवाय व्यापार व उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळावें म्हणून त्यानें 'व्यापारीखातें' निर्माण केलें व त्यावर एका स्वतंत्र कार्यकारी मंत्र्याची नेमणूक केली.

११. कर्झनच्या इतर सुधारणा :—(१) हिंदी संस्थानांतील लोकांस लष्करी शिक्षण मिळावें म्हणून त्यानें राजकुमारपथकें निर्माण केलीं व राजकुमारांस डेहराडूनच्या लष्करी कॉलेजांत शिक्षण मिळण्याची सोय केली. (२) त्यानें सरकारी उत्पन्नांत दरसाल भर पडूं लागलेली पाहून ५०० ऐवजीं १००० रुपये उत्पन्नावर प्राप्तीवरील कर घेण्याचें ठरविलें, मिठावरील कर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमी केला व सोनें हें कायदेशीर चलन ठरविलें. (३) सन १९०४ मध्यें त्यानें पुराण वस्तूंच्या संरक्षणाचा कायदा पास केला. जुन्या ऐतिहासिक इमारतींची डागडुजी करण्याकरितां व ज्या इमारती जमिनींत पुरल्या गेल्या होत्या त्या उकरून काढण्याकरितां त्यानें 'पुराणवस्तुसंशोधन खातें' स्थापन केलें. या खात्याचें काम फार समाधानकारक होत असून हिंदी कलाकुसरीचीं व संस्कृतीचीं स्मारकें रक्षिण्याकरितां तें खातें अहर्निश झटतें. कर्झननें या कामीं जो उत्साह दाखविला त्याबद्दल त्याचें अजूनही अभिनंदन होतें. (४) सन १९०४ सालीं त्यानें 'युनिव्हर्सिटी कमिशन' नेमलें. त्याच्या शिफारशींप्रमाणें कर्झननें एक नवा कायदा पास केला. त्या कायद्यानें विश्वविद्यालयांची सुधारणा केली. तसेंच दुय्यम खाजगी शाळांच्या मान्यतेसंबंधीं कडक नियम करण्यांत येऊन त्यांची सरकारी अधिकाऱ्यांकरवीं दरसाल तपासणी करण्याचें त्यानें ठरविलें. शिक्षणासंबंधाचें त्याचें धोरण त्यावेळीं जनतेस पसंत पडलें नाहीं.

१२. वंगभंग ऊर्फ बंगालची फाळणी:—बंगाल प्रांत फार मोठा असल्यानें त्याची फाळणी करून राज्यकारभाराच्या सोयीकरितां त्याचे दोन भाग पाडावे अशी कर्झनची इच्छा होती. त्याप्रमाणें त्यानें आसाम, चितगांव व पूर्व बंगालमधील १५ जिल्हे यांचा एक नवा व स्वतंत्र प्रांत पाडला व बाकीचा पूर्वीचा बंगाल प्रांत तसाच कायम ठेवला. या दोन्ही प्रांतांवर दोन स्वतंत्र लेफ्टेनंट गव्हर्नरांची नेमणूक करण्यांत आली. या योजनेमुळें बंगाली लोक फार चिडले. परंतु कर्झननें फाळणीचा आपला बेत रद्द केला नाहीं. तेव्हां आपलें एकजीव असलेलें राष्ट्र विभागलें जातें असें वाटून बंगाली लोकांनीं अभूतपूर्व चळवळ चालू केली. खून, अत्याचार व मारामारी यांसही बंगाल्यांत ऊत आला. शेवटीं सन १९११ सालीं जो दिल्लीदरबार झाला त्यावेळीं ही फाळणी रद्द केल्याचें बादशाह पांचवे जॉर्ज यांनीं घोषित केलें. मात्र नव्या योजनेप्रमाणें पूर्वीच्या बंगालचे बिहार, ओरिसा, बंगाल व आसाम असे चार भाग आज झालेले आहेत.

१३. कर्झनचा राजीनामा (१९०५):—सन १९०४ मध्यें थोडी रजा घेऊन कर्झन इंग्लंडांत गेला होता. त्याची व्हाइसरॉयच्या जागीं पुन्हां नेमणूक झाल्यानें तो त्याच वर्षीच्या डिसेंबरांत पुन्हां हिंदुस्थानांत आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यावेळीं लॉर्ड किचनेर हिंदुस्थानचा सरसेनापति होता. तोही मोठा कार्यक्षम व कर्तबगार होता. त्यानें लष्कराच्या बाबतींत अनेक नव्या सुधारणा केल्या होत्या. त्यावेळीं सरसेनापतीचा दर्जा कोणता असावा याबद्दल कर्झन व किचनेर यांच्यांत तंटा लागला. त्याचा निकाल ब्रिटिश प्रधानमंडळानें किचेनेरच्या बाजूनें दिला. त्यामुळें कर्झननें राजीनामा दिला. सन १९०५ मध्यें इंग्लंडचा युवराज हिंदुस्थानांत आला होता. त्याच्या स्वागतानंतर लॉर्ड कर्झन इंग्लंडला परत गेला.



लॉर्ड किचनेर

१४. लॉर्ड मिंटो (१९०५–१९१०):—लॉर्ड कर्झननंतर लॉर्ड मिंटो याची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक झाली. रशिया व इंग्लंड यांच्यामध्यें इराण, अफगाणिस्थान व तिबेट यांच्यासंबंधीं नेहमीं विरोध उत्पन्न होई. तो मिंटोच्या कारकीर्दींत सन १९०७ मध्यें एक करार होऊन नाहींसा झाला. कर्झनच्या वेळीं बंगालची फाळणी झाली होती, ती नष्ट न झाल्यानें बंगाल्यांत अराजकता फार फैलावली. त्याचप्रमाणें राष्ट्रीय सभेनें देशांत जोरानें चळवळ सुरू करून लोकांच्या राजकीय आकांक्षांस नवें वळण दिलें. त्यामुळें हिंदी स्वराज्याच्या चळवळीस उत्तेजन मिळालें. त्याखेरीज स्वदेशी व बहिष्कार वगैरे सारख्या चळवळी देशांत सुरू झाल्यानें जिकडे तिकडे अशांतता निर्माण झाली. लोकमान्य टिळक अशा अशांततेचे जनक होत असेंही युरोपियन म्हणूं लागले. सन १९०७ च्या सुरतेच्या राष्ट्रीय सभेंत मतभेद होऊन टिळकपक्षानें विरुद्ध पक्षावर मात केली व स्वदेशी व बहिष्कार यामुळेंच देशाची राजकीय स्थिति सुधारेल असें सर्वांस बजावलें. पुढें हिंदुस्थानांत दंगे होऊं लागले. बंगाल्यांत क्रांतिकारकांच्या चळवळीसही ऊत येऊं लागला. सन १९०८ मध्यें या क्रांतिकारकांनीं मुझफरपूर येथें पहिला बॉंब उडविला. या सर्व चळवळीस वर्त-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानपत्रें उत्तेजन देतात असें वाटून सरकारनें सन १९१० मध्यें वर्तमानपत्रांवर नियंत्रण घालण्याकरितां 'मुद्रण-कायदा' पास केला; व राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्याकरितां इतरही कडक कायदे पास केले. त्याच्यापूर्वी सरकारनें दडपशाहीचें धोरण स्वीकारलें व सन १९०८ मध्यें राष्ट्रीय चळवळीचे पुढारी लो. टिळक यांस मंडालेच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. त्यामुळें ती चळवळ थोडी मंदावलीही.

१५. मोर्ले-मिंटो सुधारणा :—अशा स्थितींतच सन १९०९ मध्यें त्या वेळचा भारतमंत्री लॉर्ड मोर्ले यानें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याकरितां ब्रिटिश पार्लमेंटकडून एक कायदा पास करून घेतला. त्या कायद्यानें ज्या सुधारणा झाल्या त्या 'मोर्ले-मिंटो सुधारणा' या नांवानें प्रसिद्ध आहेत. त्या सुधारणांप्रमाणें कौन्सिलें विस्तृत करण्यांत आलीं व त्यांस बरेंच प्रातिनिधिक स्वरूप मिळालें. त्याचप्रमाणें शिफारसवजा ठराव मांडणें, प्रश्नावर उपप्रश्न विचारणें वगैरे नवीन अधिकार सभासदांस मिळाले. कार्यकारी मंडळांतही बिनसरकारी सभासदांचा शिरकाव होऊं लागला. निवडणुकीचें तत्त्व मान्य करण्यांत आलें. या सुधारणांमुळें हिंदी लोकांचें समाधान होईल अशी सरकारची अटकळ होती. ती मात्र चूक ठरली. हा कायदा झाल्यानंतर सन १९१० मध्यें सातवा एडवर्ड मरण पावला. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यांत मुदत संपल्यामुळें मिंटोही स्वदेशीं परत गेला.

अभ्यास

१. लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या गोष्टींची माहिती सांगा.
२. तिसऱ्या ब्रह्मी युद्धाचीं कारणें सांगा.
३. वंगभंग म्हणजे काय ? तो कशामुळें उत्पन्न झाला ?
४. खालीलसंबंधीं टिपणें करा :—
हिंदी राष्ट्रीय सभा, पेनजेह प्रकरण, ड्यूरांड कमिशन, पुराणवस्तु-संशोधन खातें, वंगभंग, मोर्ले-मिंटो सुधारणा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६३. लॉर्ड हार्डिंज ते आजतागाईत

१. लॉर्ड हार्डिंज (१९१०–१९१६) :—लॉर्ड मिंटोनंतर लॉर्ड हार्डिंज याची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक झाली. त्याच्या कारकीर्दींत सन १९१२ मध्यें बादशाह पांचवा जॉर्ज यानें हिंदुस्थानास भेट दिली. त्यावेळीं दिल्ली येथें मोठा दरबार भरविण्यांत आला. त्यावेळीं एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत येऊन बंगालची फाळणी रद्द झाली, दिल्ली ही हिंदुस्थानची राजधानी झाली व शिक्षणाकरितां ५० लाख रुपये देणगी जाहीर करण्यांत आली. सन १९१५ सालीं काशीस 'बनारस हिंदु विश्वविद्यालयाची' स्थापना झाली. मदनमोहन मालवीय यांनीं त्या विश्वविद्यालयाकरितां लाखों रुपयांच्या देणग्या मिळवून त्याला आज मोठें स्वरूप प्राप्त करून दिलेलें आहे.

२. दक्षिण आफ्रिकेंतील चळवळ :—बरेच हिंदी लोक दक्षिण आफ्रिकेंत जाऊन राहिले होते. तेथें त्यांस नागरिकत्वाचे हक्क मिळेनासे झाले. तशांतच अनेक हिंदी मजूर मुदतबंदीनें तेथें जात व आपल्या नोकरीची मुदत संपल्या-वर तेथेंच स्थाईक होत. त्यांसही नीट वागविलें जात नसे. ही स्थिति सुधारण्याकरितां बॅ. मोहनदास करमचंद गांधी यांनीं तेथें निशःस्त्र प्रतिकाराची चळवळ जोरानें सुरू केली. त्याचवेळीं ना. गोपाळ कृष्ण गोखले तेथें गेले. त्यांनीं तेथील परिस्थितीचें अवलोकन करून हिंदुस्थानांत आल्यावर मुदत-बंदीची मजुरी बंद करविली. लॉर्ड हार्डिंज यांनींही परिणामकारक मध्यस्थी करून दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांवरील कांहीं जाचक निर्बंध रद्द करविले.

३. महायुद्ध (१९१४–१८) :—सन १९१४ मध्यें युरोपांत महायुद्ध सुरू झालें. व्यापार व वसाहती वाढविण्याकरितां त्यावेळीं युरोपियन राष्ट्रांत मोठी चुरस लागून राहिली होती. त्यामुळें इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांचा एक व जर्मनी व ऑस्ट्रिया यांचा दुसरा, असे दोन बलाढ्य संघ युरोपांत निर्माण झाले. त्यांतच सॅराजेव्हो येथें ऑस्ट्रियाच्या युवराजाचा खून झाल्यानें युरोपांत युद्धास सुरुवात झाली. या युद्धांत हिंदुस्थानानें साम्राज्यसरकारास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar



Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पैसा व मनुष्यबळ यांचें उत्तम साहाय्य केलें. हिंदी सैनिकांनींही रणांगणावर उत्तम कामगिरी करून ठिकठिकाणीं उत्तम यश मिळविलें. हें युद्ध चालू असतांच हिंदुस्थानांत लो. टिळक यांच्या नेतृत्वाखालीं स्वराज्याची चळवळ सुरू झाली. त्यामुळें राष्ट्रीय पक्षास जोर चढून त्यानें राष्ट्रीय सभा जिंकली व मुस्लिम लीगशीं सहकार्य करून आपल्या स्वराज्याच्या मागणीस सर्वांचा पाठिंबा मिळविला. अशा स्थितींतच सन १९१६ मध्यें लॉर्ड हार्डिंज सेवानिवृत्त होऊन इंग्लंडला गेला.

४. लॉर्ड चेम्सफर्ड (१९१६–१९२१):—हार्डिंजनंतर लॉर्ड चेम्सफर्ड व्हाइसरॉय झाला. त्यावेळीं युरोपांतील युद्ध चालू होतें. तसेंच हिंदी चळवळीनेंही उग्र रूप धारण केलें. त्यावेळीं मॉंटेग्यू हा भारतमंत्री होता. महायुद्धाच्या कामीं हिंदुस्थाननें साम्राज्य सरकारला जी मदत केली त्यामुळें हिंदुस्थानासंबंधींचा दृष्टिकोन बदलूं लागला. तशांतच राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीग यांची एकी होऊन त्यांनीं सुधारणांचा एक खलिता गव्हर्नर जनरलला सादर केला. कित्येक प्रागतिक हिंदी पुढाऱ्यांनींही आपला खर्डा व्हाइसरॉयकडे पाठविला. तेव्हां सन १९१७ मध्यें भारतमंत्र्यानें एक घोषणा करून 'देशाचा कारभार लोकमतानुवर्ती करण्याचें व हिंदुस्थानास साम्राज्यांतर्गत स्वराज्य क्रमशः देण्याचें' जाहीर केलें. त्यानंतर मॉंटेग्यू हिंदुस्थानांतही आला व त्यानें येथील पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. तसेंच येथील राजकीय परिस्थितीचें अवलोकन करून व्हाइसरॉयच्या मदतीनें एक प्रतिवृत्त लिहिलें व तें ब्रिटिश पार्लमेंटला सादर केलें. त्याला 'मॉंटफर्ड रिपोर्ट' असें म्हणतात. त्या प्रतिवृत्तास अनुसरून, महायुद्ध संपल्यावर पार्लमेंटनें एक कायदा पास केला (१९१९). त्याला अनुसरून हिंदुस्थानास ज्या सुधारणा मिळाल्या त्या 'मॉंटफर्ड सुधारणा' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

५. मॉंडफर्ड सुधारणा (१९१९):—मॉंटफर्ड सुधारणा कायद्यानें खालील गोष्टी केल्या. (१) भारतमंत्र्याचा पगार व त्याच्या कौन्सिलचा खर्च इंग्लंडनें सोसावा. (२) भारतमंत्र्याच्या कौन्सिलांत तीन हिंदी सभासद असावेत. (३) हिंदुस्थानसरकारच्या कार्यकारी मंडळांत तीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदी सभासद असावेत. (४) गव्हर्नर जनरलला मदत करण्याकरितां कौन्सिल ऑफ स्टेट व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली अशीं दोन कायदेमंडळें असावींत. (५) प्रांतांतून द्विदल राज्यव्यवस्था सुरू करण्यांत येऊन कांहीं खातीं लोकनियुक्त हिंदी प्रधानांकडे सोंपवावीं. (६) प्रांतिक कौन्सिलांत शेंकडा सत्तर सभासद लोकनियुक्त असावे. (७) प्रांतिक अगर वरिष्ठ कायदेमंडळांस अंदाजपत्रक पास अगर नापास करण्याचा अधिकार असावा. (८) सर्वत्र प्रात्यक्षिक निवडणुकीचें तत्त्व सुरू करण्यांत यावें. या सुधारणांमुळेंही हिंदी लोकांचें समाधान झालें नाहीं. जबाबदार राज्यपद्धति हिंदुस्थानांत अल्पांशानें सुरू झाली; तरी वरील सुधारणा असमाधानकारक असल्याचा शिक्का हिंदी पुढाऱ्यांनीं त्यांवर मारला.

६. **महायुद्धाचा शेवट** (१९१८) :—लॉर्ड चेम्सफर्डच्या कारकीर्दींतच युरोपांतील महायुद्ध संपलें. अमेरिकेनें दोस्तांना मदत दिल्यानें दोस्त राष्ट्रांचा जय झाला व जर्मनीचा पराभव झाला. शेवटीं सन १९१८ मध्यें व्हर्साय येथें तह झाला. महायुद्धानंतर हिंदुस्थानचा दर्जा वाढला. त्यामुळें युरोपांत जो राष्ट्रसंघ स्थापला गेला, त्यांतही एक स्वयंसिद्ध घटक म्हणून हिंदुस्थानास स्थान मिळालें. महायुद्धानंतर जी तहपरिषद झाली त्यांतही दोन हिंदी प्रतिनिधी होते. ते लॉर्ड सिंह व बिकानेरचे महाराज होत. त्यांनीं व्हर्सायच्या तहावर हिंदुस्थानातर्फे सह्या केल्या होत्या.

७. **रौलेट ॲक्ट—जालियनवाला बाग** :—राष्ट्रीय चळवळीनें यावेळीं उग्र स्वरूप धारण केलें होतें. त्याचा परिणाम अराजक चळवळींत होऊं नये अशी सरकारची इच्छा होती. तेव्हां प्रतिबंधक योजना म्हणून सरकारनें 'रौलेट ॲक्ट' नामक एक दडपशाही कायदा पास केला. त्याविरुद्ध सर्व देशांत सर्वत्र जागरूकता होऊन त्याच्या निषेधार्थ जिकडेतिकडे सभा होऊं लागल्या. अमृतसर येथें जालियनवाला बागेंत अशा प्रकारची एक सभा भरली असतां जनरल डायर यानें गोळीबार केला. त्यामुळें फार प्राणहानी झाली व देशांत असंतोषानें उसळी मारली.

८. **सत्याग्रह व असहकारिता** :—सन १९१९ च्या सुधारणा हिंदी लोकांस पसंत नव्हत्या. सन १९१७ मध्यें एन्फ्लुएंझाची सांथ व १९१८ मध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुष्काळ यांमुळें हिंदी लोक त्रस्त झाले होते. शिवाय महायुद्धामुळें महागाईही फार वाढली होती. रौलेट ॲक्टामुळेंही असंतोष माजला होता. या सर्व गोष्टींमुळें देशांतील असंतोषाचा पारा फारच वर चढला होता. याच सुमारास दक्षिण आफ्रिकेंतून बॅरिस्टर गांधी हिंदुस्थानांत आले होते. त्यांनीं देशांत सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. लोकांच्या भावना त्यामुळें उद्दीपित होऊन सर्वत्र 'हरताळाचें' व 'बहिष्काराचें' युग सुरू झालें. तुर्कस्थानचा सुलतान आपला धर्मगुरु आहे. तेव्हां सुलतानाच्या हक्कांवर महायुद्धानंतर गदा आल्यास आपल्या धर्मावर गदा येते असा हिंदी मुसलमानांनीं युक्तिवाद केला. त्याला गांधींनीं पाठिंबा दिला. त्यामुळें हिंदु व मुसलमान यांची एकी झाली व या दोन्ही जमातींच्या सहकार्यानें सत्याग्रह चळवळीस जास्तच उग्र स्वरूप प्राप्त झालें. यानंतर गांधींनीं नव्या सुधारणा राबवूं नयेत असें जाहीर केलें; व स्वराज्य मिळविणें, खिलाफतीचा प्रश्न सोडविणें, अस्पृश्यता निवारण करणें, दडपशाहीचें निराकरण करणें वगैरे गोष्टी साध्य करण्याकरितां चळवळ सुरू केली. वरील सर्व गोष्टींचा समाधानकारक निकाल लागेपर्यंत सरकारशीं असहकारिता करावी असेंही त्यांनीं आपल्या अनुयायांस सांगितलें. आपलें उद्दिष्ट साध्य होण्याकरितां, सरकारी पदव्यांचा त्याग, शाळा व कॉलेजें यांवर बहिष्कार, वकिली न करणें, चरका चालवून सूत काढणें, स्वदेशी व्रत धारण करणें वगैरे उपाय त्यांनीं सुचविले. त्याप्रमाणें सन १९२० मध्यें कलकत्त्यास एक जादा कॉंग्रेस भरून तिनें असहकारितेच्या तत्त्वांस मान्यता दिली. त्यामुळें असहकारितेची चळवळ देशांत जोरानें सुरू झाली. सन १९२१ मध्यें मुदत संपल्यानें लॉर्ड चेम्सफर्ड विलायतेस निघून गेला.

९. लॉर्ड रीडिंग (१९२१–२६) :—लॉर्ड चेम्सफर्डनंतर लॉर्ड रीडिंग व्हाइसरॉय झाला. त्याच्या आधीं तीन चार महिने बादशहांचे काका, कॅनॉटचे ड्यूक, हिंदुस्थानांत आले होते. त्यांनीं नवीन कौन्सिलें उघडलीं. असहकारवाद्यांनीं कौन्सिलांवर बहिष्कार पुकारल्यानें सर्व कौन्सिलांतून नेमस्तपक्षाचेच लोक निवडून आले होते. पुढें सन १९२१ मध्यें इंग्लंडच्या युवराजांनींही हिंदुस्थानास भेट दिली. त्यावेळीं असहकरितेची चळवळ सर्व हिंदुस्थानांत पसरली होती. साधी राहणी, निरलस उद्योग, प्रेमळपणा, स्वार्थत्याग,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्पष्टवक्तेपणा, अतुलनीय देशभक्ति वगैरे गुणांमुळें गांधींना लोकांनीं आपलें पुढारीपण दिलें व त्यांस ते 'महात्मा' नांवानें संबोधूं लागले. सन १९२१ मध्यें महात्मा गांधींनीं कायदेभंगाची चळवळ सुरू केली व त्याकरितां सुरत जिल्ह्यांत बार्डोली येथें सामुदायिकरीत्या मिठाच्या कायद्याविरुद्ध कायदेभंग करण्याचें ठरविलें. परंतु चौरीचुरा येथें भयंकर दंगा झाल्यानें तो कार्यक्रम त्यांनीं रद्द केला. तेव्हां कायदेभंगाचा कार्यक्रम त्यांनीं मागें घेऊन टिळक-स्वराज्य-फंड उभारला व चरका, खादीप्रसार, राष्ट्रीय शिक्षण, अस्पृश्यता-निवारण वगैरे सौम्य कार्यक्रम हातीं घेतला. मात्र यामुळें असहकारितेच्या चळवळीस उतरती कळा लागली. पुढें वैयक्तिक कायदेभंग सुरू झाला. तेव्हां सरकारनें महात्मा गांधी वगैरेस कैदेंत टाकलें. त्यावेळीं 'फेर-नाफेर' वाद निर्माण होऊन काँग्रेसमध्यें दोन पक्ष स्थापन झाले. एक कौन्सिलवर बहिष्कार टाकावा असें म्हणे, दुसरा तो टाकूं नये असें म्हणे. तेव्हां दास, नेहरू, पटेल, केळकर वगैरे पुढाऱ्यांनीं स्वराज्यपक्ष काढून ते कौन्सिलांत गेले. या नव्या उपक्रमामुळें काँग्रेसनें असहकारिता तहकूब केली. पुढें या नव्या पक्षानें प्रतियोगी सहकारिता करण्याचें ठरवून पूर्वीचें निव्वळ अडव-णुकीचें धोरण टाकून दिलें (१९२५). त्याचवेळीं विठ्ठलभाई पटेल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून निवडले गेले. सन १९२२ मध्यें महात्मा गांधी तुरुंगांतून सुटून आले. त्यावेळीं स्वामी श्रद्धानंद व पंडित मदनमोहन मालवीय यांनीं 'शुद्धि' व 'संघटण' यांचा उपक्रम केला. त्यामुळें 'तबलीघ' व 'तंजीम' या चळवळी मुसलमानांनीं हातीं घेतल्या. तशांतच खिलाफत बंद झाल्यानें खिलाफत चळवळीचा आधार तुटला. या सर्व गोष्टींमुळें हिंदु-मुसलमानांतील एकोपा कमी होऊं लागला होता. सन १९२६ मध्यें दक्षिण आफ्रिकेनें 'एशिॲटिक बिल' आपल्या पार्लमेंटपुढें मांडलें. त्यामुळें तेथील हिंदी लोकांच्या हक्कांस बाध येणार होता. लॉर्ड कर्झननें सन १९०२ मध्यें करार करून वऱ्हाड प्रांत दरसाल पंचवीस लक्ष रुपयांच्या कायमच्या भाडेपट्ट्यानें निजामाकडून घेतला होता. तेव्हां तो आप-ल्याला परत मिळावा अशी त्यानें मागणी केली व आपला दर्जा ठरवावा अशी इच्छा दर्शविली. तेव्हां लॉर्ड रीडिंगनें वऱ्हाड परत देण्याचें नाकारून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानसरकार व मांडलिक संस्थानें यांचा दर्जा समान नाहीं असा स्पष्ट जबाब दिला. सन १९२६ मध्यें लॉर्ड रीडिंग मुदत संपल्यानें परत गेला.

१०. **लॉर्ड आयर्विन ऊर्फ लॉर्ड हॅलिफॅक्स** (१९२६–३१):— रीडिंगनंतर लॉर्ड आयर्विन व्हाइसरॉय झाला. त्याच्याच कारकीर्दींत सन १९२६ मध्यें स्त्रियांस मतदानाचा अधिकार देण्यांत आला. सन १९२७ मध्यें दक्षिण आफ्रिकेच्या सरकारशीं तडजोड झाली. सन १९२७ मध्यें मॅांटफर्ड सुधारणांची तपासणी करण्याकरितां सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखालीं एक रॉयल कमिशन नेमण्यांत आलें. त्यामध्यें एकही हिंदी इसम नसल्यानें हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पक्षांनीं त्याच्यावर बहिष्कार टाकला. शिवाय तेव्हांपासून हिंदुस्थानांत असंतोष वाढत गेला. सन १९२९ मध्यें व्हाइसरॉयनें एक जाहीरनामा प्रसिद्ध करून हिंदुस्थानास ‘ वसाहतीचें स्वराज्य ’ क्रमाक्रमानें देण्यांत येईल असें जाहीर केलें. त्याला उत्तर म्हणूनच कीं काय वसाहतीचें स्वराज्य लौकर मिळालें नाहीं तर स्वातंत्र्याचें ध्येय कॉंग्रेस जाहीर करील अशी महात्मा गांधींनीं घोषणा केली. पुढें सन १९३० मध्यें कॉंग्रेसनें कायदेभंगाची मोहीम पुन्हां सुरू केली. त्याच वेळीं सायमन कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. तो अत्यंत निराशाजनक होता. यामुळें कायदेभंगाची मोहीम पुन्हां जोरानें सुरू झाली. अनेक स्त्री-पुरुष त्या मोहिमेंत सामील झाले. तेव्हां महात्मा गांधींसकट सर्वांना कैदेंत टाकण्यांत आलें. त्याच वेळीं हिंदुस्थानास नव्या सुधारणा कोणत्या देण्यांत याव्यात हें ठरविण्याकरितां इंग्लंडांत पहिली गोलमेज परिषद सन १९३० मध्यें भरली. तिच्यावर काग्रॅसपक्षीयांनीं बहिष्कार टाकला. कॉंग्रेसच्या सहकार्याशिवाय गोलमेज परिषदेचें कार्य सफळ होणार नाहीं असें समजून सरकार व गांधी यांच्यामध्यें तडजोड झाली. त्यावेळीं आयर्विन व गांधी यांच्यामध्यें एक करार झाला (१९३१). तो ‘ गांधी–आयर्विन करार ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या करारास अनुसरून सरकारनें सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता केली व गांधींनीं गोलमेज परिषदेस हजर राहण्याचें कबूल केलें. यानंतर मुदत संपल्यानें लॉर्ड आयर्विन इंग्लंडला गेले (१९३१). तेथेंच पुढें त्यांना लॉर्ड हॅलिफॅक्स ही पदवी मिळाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. लॉर्ड विलिंगडन (१९३१–३६):—लॉर्ड आयर्विननंतर लॉर्ड विलिंगडन हिंदुस्थानचे व्हाइसरॉय झाले. त्यापूर्वीं ते मुंबई व मद्रास प्रांताचे निरनिराळ्या वेळीं गव्हर्नर होते. दुसऱ्या गोलमेज परिषदेस महात्मा गांधी हजर होते. ती परिषद सन १९३१ मध्यें झाली. त्यावेळीं सर सॅम्युअल होअर हे भारतमंत्री होते. परिषदेच्या अखेरीस इंग्लंडचे मुख्य प्रधान व त्या परिषदेचे अध्यक्ष रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनीं पहिल्या गोलमेज परिषदेचे निर्णय मान्य करण्यांत येतील असें जाहीर केलें. शिवाय जातिनिर्णयाचा निकालही त्यांनीं द्यावा असें त्याच परिषदेंत ठरलें होतें. त्याप्रमाणें तो निर्णय मॅक्डोनाल्डनें सन १९३२ मध्यें जाहीर केला. मध्यंतरीं महात्मा गांधी विलायतेंतून परत आले. इकडे आल्यावर त्यांनीं कायदेभंगाची मोहीम पुन्हां सुरू केली. तेव्हां सरकारनें त्यांना व इतर पुढाऱ्यांस तुरुंगांत टाकलें. तुरुंगांत असतांच मुख्य प्रधानांचा जातीय निर्णय त्यांस कळला. त्यामुळें हिंदु समाजांत फूट पडेल असें सांगून त्याच्या निषेधार्थ तुरुंगांत असतांच गांधींनीं प्रायोपवेशन सुरू केलें. त्यामुळें पुढें त्यांची तुरुंगांतून सुटका झाली. अनेक पुढारी पुण्यास जमले, खलबतें झालीं व पुण्यास एक करार झाला. तो ‘ पुणें-करार ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या कराराला मुख्य प्रधानांनींही मान्यता दिली. त्या करारान्वयें स्पृश्यास्पृश्यांस एकच संयुक्त मतदारसंघ मिळाला. पुढें सन १९३२ मध्यें तिसरी गोलमेज परिषद झाली. पण त्यावेळीं महत्त्वाचा असा एकही निर्णय घेण्यांत आला नाहीं. पुढें सन १९३३ मध्यें तिन्ही गोलमेज परिषदांच्या निर्णयावर आधारलेला एक खलिता ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध केला; व त्यांतील सूचनांचा विचार करण्याकरितां पार्लमेंटमधील कांहीं लोकांची एक जोड-कमिटी नेमली. त्या कमिटीनें सन १९३४ मध्यें आपल्या शिफारशी प्रसिद्ध केल्या व त्यांच्या आधारावरच पुढें सन १९३५ मध्यें एक सुधारणा कायदा पार्लमेंटनें पास केला.

१२. सन १९३५ चा कायदा:—सन १९३५ च्या कायद्यानें खालील गोष्टी सुचविल्या. (१) भारतमंत्र्याचें इंडिया कौन्सिल रद्द करण्यांत यावें व त्याच्या मदतीकरितां एक सल्लागारमंडळ असावें. (२) मध्यवर्ती सरकारमध्यें खालसा मुलूख व संस्थानें यांच्याकरितां संयुक्त राज्यपद्धति सुरू करण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावी. (३) मध्यवर्ती सरकारला मदतीकरितां दोन कायदेमंडळें असावींत व त्यांत खालसांतील व संस्थानांतील प्रतिनिधी असावेत. (३) मध्यवर्ती सरकारच्या कारभारांत द्विदल राज्यपद्धति सुरू करावी. (४) गव्हर्नर



बादशाह सहावे जॉर्ज व राणी एलिझाबेथ

जनरलला सनदी नोकरांचे हक्क, व्यापार व हिंदी आर्थिक स्थिति यांचें संरक्षण, अल्पसंख्यांकांचें संरक्षण वैगरे बाबतींत जादा अधिकार असावेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(५) प्रांतांत प्रांतिक स्वायत्तता सुरू करावी. 'कायदा व व्यवस्था' व 'पोलिस खातें' याबद्दल गव्हर्नरला विशेष हक्क असावेत. (६) ब्रह्मदेश व एडन हिंदुस्थानापासून अलग करावे. (७) ओरिसा व सिंध हे दोन नवे प्रांत करण्यांत यावेत. ह्या सुधारणा हिंदी लोकांस पसंत पडल्या नाहींत.

१३. इंग्लंडांत क्रांति (१९३६):—सन १९३६ मध्यें हिंदुस्थानचे बादशाह पांचवे जॉर्ज मरण पावले. सन १९३५ मध्येंच त्यांच्या कारभारास पंचवीस वर्षें झाल्यानें रौप्यमहोत्सव करण्यांत आला होता. त्याच्यानंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव 'आठवे एडवर्ड' हिंदुस्थानचे बादशाह झाले. परंतु विली सिमसन या दोनदां घटस्फोट झालेल्या अमेरिकन स्त्रीशीं लग्न करण्याचा त्यांनीं हेका धरल्यानें त्यांस राज्यत्याग करावा लागला (१९३६). त्यामुळें इंग्लंडांत मोठी क्रांति झाली. त्यांच्यानंतर त्यांचे धाकटे बंधू जॉर्ज हे इंग्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशाह झाले. सहावे जॉर्ज व राणी एलिझाबेथ हे फारच लोकप्रिय आहेत.



लॉर्ड लिनलिथगो

१४. लॉर्ड लिनलिथगो (१९३६ –चालू):—मुदत संपल्यावर लॉर्ड विलिंगडन सन १९३६ मध्यें विलायतेस गेले व त्यांच्यानंतर लॉर्ड लिनलिथगो यांची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक झाली. त्यांच्या कारकीर्दींत नव्या सुधारणा-कायद्याची अंमलबजावणी ता. १ एप्रिल १९३७, पासून सुरू झाली. प्रथमतः कॉंग्रेसनें त्या सुधारणांवर बहिष्कार घातला होता; मात्र कौन्सिलांच्या निवडणुकी लढवून निरनिराळ्या ११ पैकीं ८ प्रांतांत आपल्या पक्षास बहुमत मिळविलें होतें. पुढें ५–६ महिन्यांनीं प्रांतांतून अधिकारग्रहण करण्याचें कॉंग्रेसनें ठरविलें व त्याप्रमाणें सुमारें दोन वर्षें त्यांनीं प्रांतांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यकारभार हांकला. सन १९३९ मध्यें युरोपांत दुसरें जागतिक युद्ध सुरू झालें. इंग्लंड व फ्रान्स हीं दोन राष्ट्रें एका बाजूस व जर्मनी दुसऱ्या बाजूस होता. जर्मनीनें सन १९१९ चा व्हर्सायचा तह धुडकावून देऊन आक्रमक धोरण स्वीकारलें व त्या धोरणास अनुसरून ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, डेन्मार्क, नॉर्वे, हॉलंड, बेल्जम वगैरे राष्ट्रें आत्मसात केलीं. पुढें फ्रान्स देशालाही जर्मनीपुढें हार खावी लागली. तेव्हां अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध चालू ठेविलें. यावेळीं इंग्लंडला युद्ध-साहाय्य देण्याच्या धोरणावर काँग्रेस व सरकार यांच्यांत मतभेद निर्माण झाला. त्यामुळें काँग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. तेव्हां आठही प्रांतांचा कारभार गव्हर्नरांनीं आपल्या हातीं घेतला. पुढें युद्धविरोधी भाषणस्वातं-त्र्याचा आपल्याला अधिकार मिळावा असें सरकारला गांधींनीं सुचविलें. ती सूचना नाकारण्यांत आल्यानें गांधींनीं वैयक्तिक कायदेभंगाची मोहीम सुरू केली. ता. ८ ऑगस्ट १९४० रोजीं व्हाइसरॉयनीं एक घोषणा करून युद्धानंतर हिंदुस्थानास वसाहतीचें स्वराज्य शक्य तितक्या लौकर देण्यांत येईल असें जाहीर केलें. त्याच-प्रमाणें आपलें कार्यकारीमंडळ अधिक विस्तृत करून जास्त हिंदी लोकांस त्यामध्यें जागा देण्याचेंही त्यांनीं घोषित केलें. त्या-प्रमाणें सन १९४१ मध्यें हें कार्यकारी-मंडळ विस्तृत करण्यांत येऊन त्यांत लोक-नायक अणे, सर अकबर हैदरी, सर सुलतान अहंमद, सर होमी मोदी, सर नलि-नीरंजन सरकार, डॉ. राघवेंद्रराव, सर फेरो-जखान नून वगैरेंची नेमणूक केली. याच वेळीं इंग्लंडचे मुख्य प्रधान विन्स्टन चर्चिल व अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांची ॲटलांटिकमध्यें भेट होऊन त्यांनीं सर्व राष्ट्रांस युद्धोत्तर काळीं स्वातंत्र्य देण्यांत येईल असें जाहीर केलें. त्यामुळें

विन्स्टन चर्चिल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदी लोकांस आशा निर्माण झाली. परंतु त्यानंतर ही घोषणा हिंदुस्थानाला लागू नाहीं; फक्त युरोपियन राष्ट्रांसच ती लागू असल्याचें चर्चिल यांनीं जाहीर केलें. त्यामुळें हिंदी लोकांची आशा नष्ट झाली. पुढें सरकारनें सर्व राजकीय कैद्यांस मुक्त केलें. तेव्हां कॉंग्रेसनें सत्याग्रह रद्द करून अहिंसेच्या तत्त्वांस मूठमाती दिली. तरीही सरकार व कॉंग्रेस यांचें जमत नाहीं. ७ डिसेंबर १९४१ रोजीं जपाननें अमेरिका व इंग्लंड यांच्याविरुद्ध युद्ध पुकारून थोड्याच दिवसांत मलाया व सिंगापूर हीं महत्त्वाचीं ठाणीं हस्तगत केलीं आहेत. शिवाय ब्रह्मदेशांत शिरून तेथील कांहीं भाग जपाननें जिंकला आहे. या सर्व गोष्टींमुळें आज हें युद्ध हिंदुस्थानच्या अगदीं दारीं येऊन ठेपल्यासारखें झालें आहे. भवितव्य काय आहे हें आजच कोण व कसें सांगणार! चालू महायुद्धांत हिंदुस्थाननें इंग्लंडला सैन्य, पैसा, युद्धोपयोगी माल वगैरे रूपानें उत्तम मदत केली आहे. हिंदी शिपायांनीं अबिसीनिया, लिबिया, सीरिया वगैरे भागांत लढून उत्तम मर्दुमकीची पराकाष्ठा केली व अनेकांकडून वाहवा मिळविली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६४. हिंदी संस्थानें

१. देशी संस्थानें :—इंग्रजांनीं हिंदुस्थानांतील निरनिराळीं राज्यें पादाक्रांत केलीं, कांहीं जिंकलीं, कांहीं सामदामानें घेतलीं व कांहीं तैनाती फौजेच्या जोरावर आत्मसात् करून घेतलीं. मात्र जिंकलेलीं राज्यें त्यांनीं सर्वच आपल्या मुलुखांत समाविष्ट करून घेतलीं नाहींत. कांहींच्याकडून त्यांनीं आपलें मांडलिकत्व कबूल करून घेऊन, त्यांस थोडा मुलूख बहाल केला. त्यामुळें व इतर कित्येक कारणांमुळें हिंदुस्थानांत आज आपल्याला अनेक संस्थानें दिसतात. त्यांची संख्या सुमारें ७०० आहे. सर्व संस्थानांचें क्षेत्रफळ सुमारें सात लक्ष चौरस मैल असून, त्यांची लोकसंख्या सात-आठ कोटी आहे. सर्व संस्थानांचे तीन वर्ग पाडण्यांत आलेले आहेत. म्हैसूर, बडोदें, हैदराबाद, काश्मीर हीं संस्थानें पहिल्या वर्गांत मोडतात. ग्वाल्हेर, इंदूर, भोपाळ, उदेपूर, जयपूर, बलुचिस्थान वगैरे दुसऱ्या वर्गांत मोडतात. बाकीचीं तिसऱ्या वर्गांत मोडतात. सर्व संस्थानांचा संबंध राजप्रतिनिधींमार्फत बादशहाशीं पोंचतो व व्हाइसरॉयतर्फे सर्वांवर बादशाही एजंट देखरेख ठेवतो.

२. हिंदुस्थानसरकार व संस्थानें :—संस्थानांवर येणाऱ्या परचक्रांपासून त्यांचें संरक्षण करणें, वेळेनुसार अंतर्गत शांतता राखणें वगैरे कामें बादशहातर्फे हिंदुस्थानसरकारला करावीं लागतात. संस्थानिकांना कोणाहीबरोबर युद्ध अगर तह करतां येत नाहीं. ठरावापेक्षां जास्त सैन्य ठेवणें, आपल्या हद्दींत किल्ले बांधणें, हत्यारें तयार करणें वगैरे गोष्टींची त्यांस मनाई आहे. दुसऱ्या राष्ट्रांशीं कसलाही व्यवहार करण्याची त्यांस परवानगी नसून दोन संस्थानांमधील भांडणांचा निकाल व्हाइसरॉय करील तो त्यांना मान्य करावा लागतो. संस्थानाच्या अंतर्व्यवस्थेंत हिंदुस्थानसरकार सहसा पडत नाहीं. मात्र संस्थानांत अव्यवस्था माजल्यास ती नाहींशी करण्यास हिंदुस्थानसरकार मदत करतें. परंतु वेळ पडलीच तर संस्थानाच्या कारभारांत प्रत्यक्ष हात घालून तेथील कारभार सुधारणें, वेळेनुसार तें खालसा करणें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगर एका संस्थानिकाला काढून दुसऱ्यास नेमणें वगैरे अधिकार सार्वभौम सरकारला आहेत. संस्थानचा अधिपति अल्पवयी असल्यास त्याला राज्यकारभारांत मदत करण्याकरितां 'पालकसंस्था' ऊर्फ 'रीजन्सी' नेमून



तिच्यातर्फे संस्थानचा कारभार चालविण्यांत येतो. त्यालाही सार्वभौम सरकारची मान्यता असावी लागते. संस्थानिक निपुत्रिक वारल्यास दत्तकाची परवानगी अगोदर मिळवावी लागते. ती मिळाली नाहीं तर दत्तकास संस्थानचा अधिकार मिळत नाहीं. संस्थानाची वांटणी संस्थानिकांच्या मुलांमध्यें होऊं शकत नाहीं.

३. संस्थानिकांचा अधिकार :—वरील गोष्टी सोडल्यास संस्थानिकांस पूर्ण स्वातंत्र्य आहे. कायदे करणें, नाणीं पाडणें, कायदे पास करून त्यांची अंमलबजावणी करणें, कर बसविणें, वगैरे गोष्टी संस्थानिकांस आपल्या अधि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारांत आपल्या संस्थानांत करतां येतात. आपल्या प्रजेला राजकीय अधिकार-दानही संस्थानिकांना करतां येतें. त्याप्रमाणें अलिकडे अनेक संस्थानिकांनीं आपल्या प्रजेस कांहीं अधिकार दिलेले आहेत; कांहीं संस्थानांतून कायदेमंडळेंही स्थापन झालीं आहेत. प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या बाबतींतही हिंदुस्थानसरकार संस्थानिकांस मदत करतें. स्वतःच्या मुलुखाच्या संरक्षणा-करितां व साम्राज्यसरकारच्या मदतीकरितां संस्थानिकांस सैन्यही ठेवतां येतें. आजच्या संस्थानांपैकीं अनेकांनीं आपल्या हक्कांचा उत्तम उपयोग करून आपल्या संस्थानांत अनेक उपयुक्त कायदे व अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या आहेत. त्यांमुळें ज्या कांहीं गोष्टी खालसांत नाहींत त्याही संस्थानांत दिसून येतात. संस्थानांतून खालसांतील कायदे, नाणीं, पोस्टाचीं तिकिटें वगैरे आजही चालू आहेत.

४. सरकारी अधिकारी :—सर्व संस्थानांचा बादशहाशीं प्रत्यक्ष संबंध असतो हें वर सांगितलें आहेच. परंतु व्हाइसरॉय हा राजप्रतिनिधी या नात्यानें सर्व संस्थानांवर हुकमत चालवतो. त्याच्या हुकुमांची अंमल-बजावणी करण्याकरितां प्रत्येक संस्थानांत अधिकारी नेमलेले असतात. मोठमोठ्या संस्थानांतून 'रेसिडेंट' नांवाचा अधिकारी असून लहान संस्था-नांच्या गटांवर व्हाइसरॉयचा एजंट असतो. या अधिकाऱ्याच्यातर्फेच सरकार व संस्थानिक यांच्यामधील सर्व प्रकारचा व्यवहार चालतो. संस्था-निकांस राज्यकारभारांत प्रत्यक्ष मदत करण्याचें त्याचें मुख्य काम असतें. हिंदी संस्थानिकांस योग्य व लायक अधिकारीही सार्वभौम सरकारकडून पुरविले जातात.

५. नरेंद्रमंडळ :—सन १९१९ च्या सुधारणान्वयें हिंदुस्थानसरकार व संस्थानिक यांचे संबंध दृढ करण्याकरितां नरेंद्रमंडळाची स्थापना कर-ण्यांत आली आहे. परस्पर विचारविनिमय करण्यास या योजनेमुळें सोय झाली आहे. तसेंच अमुक अमुक संस्थानिकानें अमुक अमुक सुधारणा आपल्या संस्थानांत घडवून आणल्या आहेत, तशा आपणही घडवून आणाव्या अशी त्यांस बुद्धि होते. शिवाय सरकारला त्यांच्याशीं सल्ला-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मसलतही करण्यास सांपडते. कोणत्याही संस्थानाच्या अंतर्गत कारभाराची चर्चा करण्याचा अधिकार या मंडळाला नाहीं. या मंडळाचा अध्यक्ष व्हाइसरॉय स्वतःच असतो. त्याच्या गैरहजेरींत एखादा संस्थानिक अध्यक्षाचें काम करतो. त्याला चॅन्सेलर असें म्हणतात. या मंडळाची वर्षांतून एकदां सभा भरते. सर्व मोठे संस्थानिक या मंडळाचे सभासद आहेत. मात्र लहान संस्थानांतर्फे प्रतिनिधी निवडले जातात.

६. संस्थानांचें भवितव्य :—सन १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वयें 'संयुक्त घटना' हिंदुस्थानांत सुरू करण्याचें ठरलें व त्यांत संस्थानिकांनाही सामील करून घेण्यांत आलें आहे. मात्र ही संयुक्तघटना संस्थानिकांस अजून मान्य झालेली नाहीं. हिंदुस्थान एकजिनसी राष्ट्र व्हावें हा उद्देश वरील योजनेंत आहे. तो केव्हां फलद्रूप होतो तें पाहणें आहे. परंतु कांहींच्या मतें संस्थानें ही एक मोठी अडगळ आहे व तीं नष्ट करावींत असें ते म्हणतात. या म्हणण्यांत सत्यांश कितीसा आहे कोणास कळे! परंतु संस्थानांचा कारभार काळास अनुसरून राहिल्यास व त्यांनीं हिंदुस्थानचें हित तेंच आपलें हित मानल्यास हिंदुस्थान हें राष्ट्र सामर्थ्यवान व वैभवसंपन्न होण्यास मदत होईल यांत शंका नाहीं.

अभ्यास

१. हिंदुस्थानांत संस्थानें कशीं निर्माण झालीं ? तीं कितीं आहेत ? त्यांना कोणत्या गोष्टी आपल्या संस्थानांत करतां येतात ?
२. हिंदुस्थानसरकार व संस्थानिक यांचे संबंध वर्णा. संस्थानें ही एक अडचण आहे काय ? कारणें द्या.
३. नरेंद्रमंडळासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६५. इंग्रजी अंमलांतील स्थित्यंतरें

१. बादशाही अंमल :—हिंदुस्थानांत अधिकाराचें केंद्रीकरण आहे. हिंदुस्थानांत सर्व सत्ता व अधिकार हिंदुस्थानच्या बादशहांच्या हातीं केंद्रीभूत झालेले आहेत. राजप्रतिनिधी या नात्यानें हिंदुस्थानचा कारभार बादशहांच्या-तर्फे व्हाइसरॉय व प्रांतिक गव्हर्नर चालवितात हें खरें; परंतु खरा व सार्वभौम अधिकार बादशहांचा आहे. लष्कर, आरमार, वैमानिक दळ, संस्थानिकांशीं संबंध, सनदी अधिकाऱ्यांच्या नेमणुका, बँका, चलन वगैरे बाबतींत सार्वभौम अधिकार बादशहांस आहेत. मात्र त्यांचा प्रत्यक्ष उपभोग ब्रिटिश प्रधानमंडळांतील भारतमंत्री हाच घेतो व अंमलबजावणी व्हाइसरॉय, प्रांतिक गव्हर्नर वगैरे अधिकारी करतात. मात्र भारतमंत्र्याच्या प्रत्येक कृत्यास ब्रिटिश पार्लमेंटची संमति असावी लागते. अशा तऱ्हेनें हिंदुस्थानांत राजसत्ता केंद्रीभूत असली, तरी अलिकडे प्रांतांच्या कारभारांत अधिकारांची थोडी विभागणी केल्यासारखी दिसते. परंतु ती दिखाऊ आहे. कारण प्रत्येक बाबतींत बादशहांच्या संमतीची आवश्यकता असतेच. हिंदुस्थानांत ब्रिटिशसत्ता पूर्णपणें स्थापन झाल्याला दीडशें वर्षें होऊन गेलीं. या अवधींत हिंदी लोकांचें पाऊल अनेक तऱ्हांनीं पुढें पडलेलें आहे. तरीही राजकीय बाबतींत लोकांचें पूर्ण समाधान झालेलें दिसत नाहीं. तें समाधान व्हाव म्हणून सन १९४० मध्यें व्हाइसरॉयनें एक घोषणा करून दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदुस्थानाला वसाहतीचें स्वराज्य शक्य तितकें लौकर देण्यांत येईल असें जाहीर केलें. हिंदुस्थान व इंग्रज यांचा संबंध सहजासहजीं आला; परंतु त्यामुळें हिंदी लोकांच्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे बाबतींत मोठीं स्थित्यंतरें घडून आलीं. त्याचें वर्णन खालीं दिलें आहे.

२. राजकीय स्थित्यंतरें—राष्ट्रीय सभा :—इंग्रजांशीं संबंध आल्यानें हिंदी लोकांस इंग्रजांच्या राजकीय संस्था, त्यांची वाढ, त्यांचे हक्क व अधिकार वगैरेंचें ज्ञान झालें. त्यामुळें त्यांच्यामध्यें आपल्या हक्कांची व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अधिकारांचीही जाणीव उत्पन्न झाली. शिवाय इंग्रजी भाषा सर्वत्र झाल्यानें निरनिराळ्या लोकांत विचारविनिमय करणें सोपें होऊं लागलें. यामुळें येथील राज्यकर्त्यांस आपल्या तक्रारी कळाव्या व त्यांच्याकडून त्यांचें निराकरण व्हावें म्हणून एखादी सनदशीर संस्था असावी असें हिंदी लोकांस वाटूं लागलें. अशा तऱ्हेच्या संस्था प्रत्येक इलाख्याच्या मुख्य शहरीं होत्या. परंतु तशा संस्थांस अखिल भारतीय स्वरूप नव्हतें. अर्थात त्या सर्वांचें एकीकरण करून एक अखिल भारतीय राजकीय संस्था काढावी असें वाटून सन १८८५ मध्यें लॉर्ड डफरिनच्या कारकीर्दीत मुंबईस कॉंग्रेसचा ऊर्फ राष्ट्रीय सभेचा जन्म झाला. ॲलन ह्यूम हा इंग्रज गृहस्थ नुकताच पेन्शनींत निघाला होता. तोच कॉंग्रेसचा संस्थापक समजला जातो. न्यायमूर्ति रानडे, सर फेरोजशहा मेथा, काशीनाथपंत तेलंग, सुरेंद्रनाथ बानर्जी, उमेशचंद्र बानर्जी वगैरे मंडळीनीं खूप मेहेनत करून कॉंग्रेस स्थापण्यास मदत केली. पहिली कॉंग्रेस पुण्यास भरावयाची होती; परंतु कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें ती मुंबईस श्री. उमेशचंद्र बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं नाताळांत भरली. त्या सभेला 'दादा, बाबा' करून जमविलेले ७२ प्रतिनिधी हजर होते. या सभेनें आपलें ध्येयही आखलें होतें तें असें. हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांचें एकीकरण करून, त्यांच्यामध्यें धार्मिक, सामाजिक, नैतिक व राजकीय बाबतींत जागृति उत्पन्न करणें; व ज्या अन्याय्य व चुकीच्या गोष्टी इंग्रजसरकारच्या हातून घडल्या असतील, त्या त्याच्याकडून दुरुस्त करून घेऊन इंग्लंड व हिंदुस्थान यांचें संघटन करणें. पुढें ह्यूमनें इंग्लंडांत जाऊन जॉन ब्राइट व चार्ल्स ब्रॅडलॉ यासारख्या पुढाऱ्यांची सहानुभूति कॉंग्रेसला मिळवून दिली.

त्या वेळेचे कॉंग्रेस-नेते नेमस्त राजकारणाचे होते; व ते वरील ध्येयास अनुसरून दर नाताळांत हिंदुस्थानांतील एखाद्या शहरांत कॉंग्रेस भरवूं लागले. केवळ ठरावाच्या रूपानें तक्रारी मांडाव्या व सभेचें काम संपवावें अशांत पहिलीं पांच वर्षें गेलीं. परंतु नुसते ठराव पास करून भागत नाहीं असें पाहून कॉंग्रेसनें आपले कांहीं प्रतिनिधी कॉंग्रेसप्रचारार्थ व तेथील लोकांची सहानुभूति मिळविण्याकरितां इंग्लंडमध्यें पाठविले. त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदी लोकांच्या तक्रारी इंग्रजांपुढें मांडल्या; परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. सरकारही कॉंग्रेसकडे लक्ष देईना. अशा परिस्थितींत एक नवा ‘तरुणपक्ष’ कॉंग्रेसमध्यें निर्माण झाला. त्याला जुन्या नेमस्तांचें धोरण व मार्ग पटेनासे झाले. सरकारही कॉंग्रेसला विरोधून दडपशाही कायदे पास करूं लागले. कांहीं तरी भरीव कामगिरी हातीं घेऊन कॉंग्रेसचें भवितव्य उज्ज्वल करून दाखवावें असें तरुणपक्षाला वाटूं लागलें. तेव्हां स्वदेशीचा प्रसार व विलायती मालावर बहिष्कार या मार्गांनीं इंग्रजांवर दडपण आणावयाचें व त्या धोरणास कॉंग्रेसची सहानुभूति मिळवावयाची असा तरुणपक्षानें प्रयत्न चालविला. या नव्या पक्षांतील लोकांस ‘जहाल’ व जुन्या लोकांस ‘मवाळ’ अशीं नांवें पडून, जहालांचे अग्रणी लो. बा. गं. टिळक झाले. सन १९०६ मध्यें दादाभाई नौरोजी कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनीं ‘स्वराज्याची’ मागणी उघड उघड करून स्वदेशीचा पुरस्कारही केला. त्यामुळें तरुणपक्षास जोर आला. सन १९०७ मध्यें सुरतेस राष्ट्रीय सभेचें अधिवेशन होतें; परंतु तरुणपक्षानें तें अधिवेशन उधळून लावून नेमस्तांना आपला प्रभाव दाखविला. यामुळें कॉंग्रेसमध्यें दुफळी माजली. तरीही यापुढें सन १९१४ पर्यंत राष्ट्रीय सभेचें नेतृत्व नेमस्ताकडेच राहिलें.

लो. बाळ गंगाधर टिळक

स्वदेशी व बहिष्कार यांची चळवळ चालू असतांच हिंदुस्थानांत क्रांतिकारकांचा एक नवा पक्ष निर्माण झाला होता. या क्रांतिकारकास सनदशीर मार्गांचें अवलंबन मान्य नव्हतें. तेव्हां लोकांना दहशत घालण्यास त्यांनीं सुरुवात केली. त्यामुळें दंगे, खून, मारामाऱ्या, दरोडे वगैरे मार्गांनीं त्यांनीं आपला उद्योग आरंभिला. त्यामुळें सरकारलाही दडपशाही करावी लागली. क्रांतिकारकांस कडक शिक्षाही करण्यांत आल्या. या सर्व गोष्टींमुळें देशाचा फायदा न होतां तोटाच होतो हें लोकांनाही कळून चुकलें व त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रांतिकारकांच्या चळवळीचा जोर कमी झाला. मात्र यावेळीं देशांत शांतता निर्माण व्हावी म्हणून सन १९०९ मध्यें मोर्ले-मिंटो सुधारणांचा हप्ता हिंदुस्थानास देण्यांत आला.

सन १९०७ नंतर कॉंग्रेसच्या ध्येयामध्यें फरक करण्यांत आला होता. त्या ध्येयाप्रमाणें 'ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य उपभोगणाऱ्या वसाहतीं-प्रमाणें आपल्याला स्वराज्य मिळावें व ब्रिटिश साम्राज्यांतील इतर वसाहतीं-प्रमाणेंच हिंदुस्थानालाही सम दर्जा मिळावा;' मात्र हें ध्येय 'सनदशीर मार्गांनीं प्राप्त करून घ्यावें' असें कॉंग्रेसनें ठरविलें. परंतु सन १९१४ पर्यंत मवाळ व जहाल यांचा समेट करण्याचे सर्व प्रयत्न फसले. सन १९१६ मध्यें त्या दोन्ही पक्षांत अखेर समेट घडून आला. याचवेळीं युरोपांत महायुद्ध सुरू झालें. तेव्हां सरकारला हिंदी लोकांच्या मदतीची जरूरी वाटूं लागली. याच-वेळीं कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांचीही सन १९१७ मध्यें एकी घडवून आणण्यांत आली. या सर्व गोष्टींमुळें कॉंग्रेसला स्वराज्याची मागणी करतां आली. त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे सन १९१९ च्या 'मॉंटफर्ड सुधारणा' होत. परंतु त्यांच्यामुळें कॉंग्रेसचें समाधान झालें नाहीं.

सन १९२० मध्यें लो. टिळक मृत्यू पावले व कॉंग्रेसचें पुढारीपण महात्मा गांधींकडे आलें. त्यांनीं असहकाराची चळवळ सुरू करून कौन्सिलें, शाळा-कॉलेजें, न्यायकोर्टें व विलायती माल यांवर बहिष्कार सुरू केला. परंतु त्यांचें हें धोरण अनेक कॉंग्रेसभक्तांस पसंत पडलें नाहीं. त्यांनीं कॉंग्रेसच्या कार्यक्रमांत फेरफार घडवून स्वराज्यपक्षाची स्थापना केली व कायदेमंडळें, न्यायकोर्टें, शाळा-कॉलेजें यांवरील बहिष्कार मागें घेतला. यामुळें कॉंग्रेसच्या चळवळीचें उग्र स्वरूप पालटून गेलें. पुढें कॉंग्रेसमध्यें 'स्वातंत्र्यवादी' पक्ष पुढें येऊं लागला. त्यानें बराच नेट धरल्यानें सन १९२७ च्या कॉंग्रेसनें 'स्वातंत्र्य' हें आपलें ध्येय ठरविलें. पुढील वर्षी कॉंग्रेसनें वसातंत्र्याचें ध्येय मान्य करून, एका वर्षाच्या आंत हिंदुस्थानास वसाहतीचें स्वराज्य मिळाल्यास त्याचा स्वीकार करावा असेंही ठरविलें. त्याच सालीं एक सर्वपक्षीय परिषद भरविण्यांत आली व तिनें 'वसाहतीचें स्वराज्य' हें हिंदुस्थानचें ध्येय ठरविलें. परंतु १९२८ च्या कॉंग्रेसनें जी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मागणी केली त्याप्रमाणें कांहींही घडून न आल्यानें सन १९२९ च्या कॉंग्रेसनें ‘ पूर्ण स्वराज्य ’ हें आपलें ध्येय ठरवून जोरानें चळवळ सुरू केली. त्या चळवळीचा परिणाम सरकारवर होऊन कॉंग्रेस व सरकार यांच्यामध्यें ‘ गांधी–आयर्विन करार ’ होऊन समेट झाला (१९३०). त्या समेटांत ठरल्याप्रमाणें कॉंग्रेसतर्फे म. गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेकरितां इंग्लंडला गेले. परंतु त्यांच्या गैरहजेरींत हिंदुस्थानांत पुन्हां चळवळ सुरू झाली. तेव्हां सरकारनें दडपशाही सुरू केली. सन १९३२ मध्यें महात्मा गांधी इंग्लंडहून परत आले. त्यावेळीं त्यांना ताबडतोब कैद करण्यांत आलें. त्याचप्रमाणें इतरही अनेक पुढाऱ्यांस कैदेंत टाकण्यांत आलें. अशा परिस्थितींतच सन १९३५ चा सुधारणांचा हप्ता हिंदुस्थानास मिळाला.

महात्मा गांधी

सन १९३५ च्या सुधारणांप्रमाणें नव्या कायदेमंडळांच्या निवडणुकी सन १९३६ मध्यें झाल्या. त्यांत कॉंग्रेसनें भाग घेऊन हिंदुस्थानांतील अकरा प्रांतांपैकीं आठ प्रांतांत बहुमत मिळविलें. मात्र अधिकारस्वीकार केला नाहीं. पुढें कांहीं पेंचप्रसंगांनंतर कॉंग्रेसनें सन १९३७ मध्यें अधिकारग्रहण करून दोन वर्षें प्रांतांचा कारभार केला. इतक्यांत युरोपांत दुसरें जागतिक महायुद्ध निर्माण झालें. त्यावेळीं पुन्हां पेंचप्रसंग निर्माण होऊन कॉंग्रेसनें अधिकाराचा त्याग केला व महात्मा गांधींनीं वैयक्तिक कायदेभंगाची मोहीम सुरू केली. त्याप्रमाणें अनेक कॉंग्रेसभक्त कायदेभंग करून तुरुंगांत गेले. पुढें सन १९४० मध्यें मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचें अधिवेशन होऊन गांधींच्या वैयक्तिक कायदेभंगाच्या चळवळीस मान्यता देण्यांत आली. याच वेळीं कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांच्यामध्यें ऐक्य निर्माण करण्याचे प्रयत्न झाले; पण ते फसले. पुढें सन १९४१ मध्यें सरकारनें सर्व राजकीय कैदी मुक्त करून युद्धसाहाय्याची मागणी केली. कॉंग्रेसनेंही अहिंसेचें तत्त्व सोडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलें व कांहीं भरीव अधिकार दिल्यास युद्धसाहाय्य देण्याचें जाहीर केलें. परंतु सरकार व कॉंग्रेस यांचें जमलें नाहीं.

३. मुस्लिम लीग:—कॉंग्रेसप्रमाणें मुस्लिम लीग ही मुसलमानांची राजकीय संस्था होय. तिचा जन्म सन १९०६ मध्यें झाला. हळूहळू तिचें महत्त्वही वाढूं लागलें. इतकें कीं पुढें सन १९१७ मध्यें कॉंग्रेसला लीगबरोबर समेट करावा लागला. यामुळें देशांत राजकीय बाबतींत हिंदु–मुसलमानांमध्यें सलोखा निर्माण झाला. परंतु पुढें मुस्लिम लीगमध्यें फाटाफूट झाली. मॉंटफर्ड सुधारणांच्या वेळीं मुसलमान समाजांत आपल्या हक्कांची जाणीव होऊं लागली; व मुसलमान लोक जास्त हक्क मागूं लागले. यापुढें मुसलमानांत अधिक चळवळ होऊन जास्त जागृति होऊं लागली. तसेंच मुस्लिमांचें संघटन करून लीगला महत्त्व प्राप्त करून देण्याकरितां मुसलमान पुढारी झटूं लागले. सन १९२८ मध्यें मुसलमानांची एक सर्व-पक्षीय सभा भरली. पुढें सन १९३३ मध्यें जातीय निर्णयाचा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळीं आपल्या हक्कांस जपण्याकरितां मुसलमानांनीं आपापसांतील मतभेद विसरून जाऊन मुस्लिम सभा व मुस्लिम लीग या संस्थांचें एकी-करण करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. मात्र लीगचें महत्त्व राजकीय क्षेत्रांत वाढीस लागलें. त्याच सुमारास बॅ. जिना लीगचे पुढारी झाले. त्यांच्यामुळें लीगचें राजकीय महत्त्व व सामर्थ्य पुष्कळच वाढलें. यावेळीं कॉंग्रेस व लीग यांच्या ऐक्याचे प्रयत्न झाले, परंतु ते फसले. सन १९४० मध्यें लाहोरला मुस्लिम लीगचें अधिवेशन झालें. त्यावेळीं बॅ. जिनांनीं 'पाकिस्थान'ची योजना उघडपणें देशापुढें मांडली. त्यामुळें सर्व देशाला मोठाच धक्का बसला. मुसलमानांनीं मात्र ती योजना उचलून धरली.

४. नेमस्तांची स्वतंत्र सभा:—सन १९१८ मध्यें नेमस्त पुढारी कॉंग्रेसपासून फुटून निघाले व त्यांनीं आपली स्वतंत्र सभा दरसाल भरवि-ण्याचा उपक्रम सुरू केला. त्याप्रमाणें त्यांची पहिली सभा सन १९१८ मध्यें सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस भरली. या सभेनें वसाह-तीच्या स्वराज्यासारखें स्वराज्य अत्यंत सनदशीर मार्गांनीं मिळवावयाचें असें आपलें ध्येय ठरविलें. मॉंटफर्ड सुधारणांनंतर कॉंग्रेसनें कायदेमंडळांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बहिष्कार घातला. त्यावेळीं नेमस्त पुढारी कायदेमंडळांत घुसले व त्यांनीं प्रधानमंडळेंही बनविलीं. परंतु पुढें कॉंग्रेसनें कायदेमंडळांवरील बहिष्कार उठवून नेमस्तांचें कायदेमंडळांतून उच्चाटण केलें, तें कायमचेंच ठरलें. तरीही न डगमगतां नेमस्तांच्या सभा दरसाल कोठें ना कोठें भरत असतातच. आज हा पक्ष नामशेष झाल्यासारखा दिसत आहे. तरीही त्या पक्षानें कॉंग्रेस व सरकार यांच्यामध्यें सलोखा व एकवाक्यता घडवून आणण्याचा यशस्वी प्रयत्न एक-दोनदां केलेला आहे. तसेंच सर्वपक्षीय परिषदांतून भाग घेऊन अनेक वेळां या पक्षानें सरकारी धोरणाचा निषेधही केला आहे.

५. **हिंदुमहासभा** :—हिंदुस्थानच्या राजकीय क्षेत्रांत ज्या आणखी एका संस्थेला आज महत्त्व देण्यांत येतें, ती संस्था म्हणजे हिंदुमहासभा होय. हिंदुसमाज निद्रित अवस्थेंत आहे व त्याला जागें करून आपल्या हक्कांची व अधिकारांची जाणीव करून देणें योग्य आहे असें हिंदु पुढाऱ्यांस वाटत होतें. त्यास अनुसरून हिंदुत्वनिष्ठांची पहिली सभा सन १९०९ मध्यें पंजाबांत लाहोरास झाली. हिंदूंच्या हितांचें, अधिकाराचें व हक्कांचें संरक्षण करणें व त्यांच्यामध्यें एकी व संघटना निर्माण करणें हा त्या सभेचा हेतु होता. परंतु त्या सभेला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालेलें नव्हतें. पंजाबमध्यें आर्यसमाज जोर धरून होता. त्यानेंच पंजाबांत प्रथम जागृति केली. पुढें सन १९१८ पर्यंत पंजाबची हिंदुसभा आपली चळवळ सुरू करून हिंदूंमध्यें जागृति निर्माण करीत असे. त्या वर्षी मात्र पंजाबच्या हिंदुसभेस अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालें व त्या वर्षी राजा सर रामपालसिंग यांच्या अध्यक्षतेखालीं हिंदुमहासभेचें पहिलें अधिवेशन दिल्लीस पार पडलें. यानंतर सन १९२० मध्यें असहकारतेची चळवळ देशांत सुरू झाल्यानें हिंदुमहासभा लोपून गेली. परंतु त्या काळीं लाला लजपतराय, पंडित मालवीय, स्वामी श्रद्धानंद वगैरे कार्यकर्त्यांनीं अविरत श्रम करून शुद्धि, संघटण, अस्पृश्योद्धार वगैरे महत्त्वाचीं कार्यें हिंदुमहासभेतर्फे करण्यास सुरुवात केल्यानें हिंदुमहासभेस पुन्हां महत्त्व प्राप्त झालें. पण तेंही अल्प काळ टिकलें. पुढें सन १९२६ नंतर हिंदुमहासभेस पुन्हां महत्त्व प्राप्त होऊन राजकीय बाबतींत तिला मानाचें स्थान प्राप्त झालें. यानंतर महासभेनें नेटानें काम सुरू ठेवून हिंदूंच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हक्कांचें व हितांचें संरक्षण केलें. ही परिस्थिति सन १९३७ पर्यंत टिकली. त्या वर्षी बॅ. विनायकराव सावरकर हिंदुमहासभेचे प्रथमतःच अध्यक्ष झाले. त्यांनीं आपल्या वक्तृत्वानें व व्यक्तिमत्वानें सर्वांस भारून टाकलें. अर्थात त्यामुळें हिंदुमहासभेस अपूर्व महत्त्व प्राप्त झालें. इतकें कीं राजकारणाची गुंतागुंत सोडविण्याच्या कामीं सरकारलाही हिंदुमहासभेचा सल्ला विचारांत घेणें भाग पडूं लागलें.

६. सामाजिक स्थित्यंतरें :—राजकीय स्थित्यंतरांचा आतांपर्यंत आपण विचार केला. आतां सामाजिक गोष्टींकडे आपण वळूं. इंग्रज लोक इकडे आल्यावर हिंदुस्थानांतील समाजावर जोराचे आघात होऊं लागले. इंग्रजांचें वाङ्मय, त्यांचे रीतिरिवाज, त्यांची संस्कृति, त्यांचें राजकारण यांचा अभ्यास सुरू झाला. यामुळें हिंदी संस्कृतीवर युरोपियन संस्कृतीची छाप पडूं लागली. त्यामुळें त्या दोन संस्कृतींमध्यें जोराचा झगडा सुरू झाला. अर्थात हिंदी लोकांच्या मतांमध्यें, आचारविचारांत, संस्कृतींत, रीतिरिवाजांत व सामाजिक बंधनांत फरक पडूं लागला. त्यांतल्यात्यांत थोडें इंग्रजी जाणणारा व विलायतेला जाऊन आलेला गृहस्थ समाजांत मान्यता मिळवूं लागला. ही परिस्थिति पुढें जसजशी वाढूं लागली, तसतशी हे लोक युरोपियन संस्कृतीशीं तादात्म्य पावूं लागले. त्यामुळेंही हिंदी समाजरचना व हिंदी संस्कृति यांवर आघात होऊं लागले. अर्थात इकडे समाजक्रांति होऊं लागून हिंदी संस्कृति मागें पडूं लागली; व युरोपियन वळणावर इकडील समाज जाऊं लागला व तोही नकळत. इंग्रज सरकारनेंही हिंदी समाजांतील दोष कायद्यानें काढून टाकण्याचा अनेकदां प्रयत्न केला. त्यामुळेंहीं हिंदी समाजास नवें वळण लागण्यास मदत झाली. या सर्व गोष्टींमुळें हिंदी समाजांत अनेक स्थित्यंतरें घडून आलीं. त्यांपैकीं कांहींचें वर्णन खालीं दिलें आहे.

७. जातिभेद व अस्पृश्यतानिवारण :—प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत जातिभेद व जातिबंधनें यांकरवीं हिंदुसमाज जखडून गेला होता. त्यामुळें हिंदुसमाजाचें अनेक वेळां नुकसान झालें आहे. जन्मावरून जात ठरविली गेल्यानें हिंदुसमाजाचें पाऊल मागें पडतें असें अनेकांस वाटूं लागलें. अर्थात ते लोक जातिभेदावर आग पाखडूं लागून जातिभेद नष्ट करावेत असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उघड उघड प्रतिपादूं लागले. असें म्हणणारांत राममोहन रॉय, स्वामी दयानंद, लोकहितवादी, आगरकर वगैरे लोक प्रमुख होत. या सर्वांस जातिभेद मान्य नव्हता व हिंदुसमाजास जातिभेद म्हणजे एक मोठें लांछन आहे असें ते प्रतिपादूं लागले. पुढें त्यांचें म्हणणें महात्मा गांधी, सावरकर वगैरेनींही मान्य केलें. त्यांतल्या त्यांत हिंदी समाजांत जे सहा-सात कोटि अस्पृश्य आहेत त्यांस समाजांतील इतर घटकांप्रमाणेंच सर्व प्रकारच्या सवलती द्याव्यात व शाळांतून, देवालयांतून, पाणवठ्यांवर व इतर सार्वजनिक ठिकाणीं त्यांस मज्जाव करूं नये असें मत प्रचलित झालें. या कामीं महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर व सावरकर यांचे प्रयत्न चांगलेच फळास आले. त्यांमुळें महार, मांग, चांभार, ढोर, भंगी वगैरे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींतील लोकांस पुढें येण्यास वाव मिळाला. सरकारनेंही या कामीं योग्य तें धोरण स्वीकारून अस्पृश्य समाजांतील लोकांस पुढें येण्यास अनेक सवलती दिल्या. आज जातिभेद हिंदुस्थानांत नष्ट झालेला नाहीं; तरीही तो पूर्ववत् दृढ पायावरही नाहीं.

८. स्त्रीशिक्षण :—पूर्वीं हिंदुस्थानांत स्त्रियांस शिक्षण बहुधा देण्यांत येत नसे; परंतु इंग्रजी अमदानींत तें सुरू झालें. या कामीं पंडिता रमाबाई यांनीं प्रथमतः सुरुवात करून स्त्रियांस सुशिक्षित करण्यास सुरुवात केली. पुढें या कामीं प्रा. डॉ. धोंडो केशव कर्वे यांनीं केलेल्या कामगिरीचा उल्लेख मोठ्या गौरवानें करण्यासारखा आहे. त्यांनीं प्रथम एका शाळेपासून सुरुवात करून स्त्रियांकरितां हिंदुस्थानांत स्वतंत्र विश्वविद्यालय स्थापण्यापर्यंत मजल मारली. त्यांच्यामुळें स्त्रीशिक्षणाचें पाऊल झपाट्यानें पुढें पडत आहे. सरकारी शाळा व कॉलेजातूनही स्त्रियांची संख्या वाढत आहे. आज सुशिक्षित स्त्रियांचें प्रमाण थोडें असलें, तरी तें दरसाल वाढत आहे.

९. विधवाविवाह व बालविवाह :—पूर्वीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें विधवेला पुनर्लग्न करण्याची परवानगी नव्हती; उलट पतीच्या चितेवर तिनें स्वतःस जाळून तरी घ्यावें किंवा उरलेल्या आयुष्यांत संन्यस्तवृत्तीनें रहावें असें धर्मशास्त्र सांगे. परंतु सतीची चाल सरकारनें बंद केली व विधवांस पुनर्लग्न करण्याची परवानगीही कायद्यानें दिली. यामुळें हिंदुसमाजास मोठाच धक्का बसला. वरील दोन्ही कायद्यांचा हिंदु लोकांनीं निषेधही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेकवार केला. सतीची चाल आज अजीबात बंद झाली आहे; विधवा-विवाह मात्र दिवसेंदिवस वाढत आहेत. पुनर्विवाहाच्या प्रश्नाचा अत्यंत जोरानें पुरस्कार पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं बंगाल्यांत व न्यायमूर्ति माधवराव रानडे व आगरकर यांनीं महाराष्ट्रांत केला. बालविवाहाची चाल हिंदुस्थानांत सर्वत्र चालू होती. तिच्यामुळें समाज पोखरला जातो असें समाजसुधारकांस वाटूं लागलें व त्यामुळें ते बालविवाहाविरुद्ध उठले. यामुळें व शिक्षणाचा प्रसार जसजसा जास्त होऊं लागला तसतसा बालविवाहाला विरोध होऊं लागला. पुढें सन १९२७ मध्यें हरिविलास सारडा यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत बिल मांडून बालविवाहास आळा बसविला. मात्र आज ज्या गोष्टींकडे लोकांचें डोळे जास्त लागले आहेत ते प्रश्न म्हणजे प्रौढविवाह, यशवंतीविवाह, सुशिक्षित कुमारिकांचे विवाह वगैरे होत.

१०. **धार्मिक स्थित्यंतरें :**—हिंदुस्थानांत अगदीं पूर्वी प्रथमतः कोणता धर्म होता तें न कळे; परंतु आर्यांनीं भारतवर्ष व्यापल्यावर या देशांत त्यांनीं आर्यधर्माचा सर्वत्र फैलाव केला यांत शंका नाहीं. पुढें बौद्ध, जैन, लिंगायत वगैरे नवे धर्म हिंदुस्थानांत उत्पन्न झाले. तसेंच इस्लामी, पारशी व ख्रिश्चन वगैरे धर्मांचे अनुयायीही हिंदुस्थानांत आले. त्यामुळें हिंदुस्थानांत जगांतील बहुतेक सर्व धर्मांचे लोक आज आपल्याला दिसतात. या सर्वांच्या धार्मिक मतांचा परस्परांच्या धार्मिक मतांवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्याशिवाय जसजसें पाश्चात्य शिक्षण लोकांस मिळूं लागलें, तसतशी त्यांच्यांत चिकित्सक बुद्धि बळावूं लागली. यामुळें ज्याला त्याला आपल्या धर्मांत कांहींना कांहीं दोष आढळूं लागले व ते सुधारण्याचा ते लोक प्रयत्न करूं लागले. यामुळें अनेक धर्मपंथ हिंदुस्थानांत निर्माण झाले. त्यांत खालील पंथ बरेच प्रसिद्धी पावले.

११. **ब्राह्मोसमाज :**—राजा राममोहन रॉय यांनीं ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. राममोहनचा कल प्रथमतः बौद्धधर्माकडे होता; परंतु पुढें त्यानें सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करून चिकित्सेच्या निकषावर अनेक तत्त्वें पारखून पाहिलीं. त्यानंतरच त्यानें सन १८२८ मध्यें ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. या पंथाला मूर्तिपूजा मान्य नाहीं. निर्गुण व निराकार परमेश्व-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राची प्रार्थना करावयाची व त्यास प्रसन्न करून घ्यावयाचें, दुसऱ्या धर्माची निंदा करावयाची नाहीं, अशी या पंथाची शिकवण होती. पुढें सन १८३३ मध्यें राममोहन रॉय मृत्यु पावले. पण त्यांचें अर्धवट राहिलेलें कार्य कविवर्य डॉ. रवींद्रनाथ टागोर यांचे वडील देवेंद्रनाथ टागोर यांनीं मोठ्या हिरीरीनें अंगावर घेतलें. त्यावेळीं मिशनऱ्यांचे उद्योग बंगाल्यांत फार मोठ्या प्रमाणावर चालले होते. त्याची देवेंद्रांस फार चीड येई. तेव्हां देवेंद्रांनीं मोठी चळवळ करून ख्रिस्त्यांकडे जाणारा हिंदूंचा लोंढा थोपवून धरून हिंदुधर्माचें मोठें कार्य केलें. पुढें केशवचंद्र सेन यानें ब्राह्मोसमाजाचा पुरस्कार केला. परंतु त्यानें कांहीं ख्रिस्तीधर्मतत्त्वांचा आपल्या पंथांत समावेश केल्यानें मूळ पंथाचें स्वरूप पालटलें. त्यामुळें मूळ पंथाला 'आदि ब्राह्मोसमाज' हें नांव प्राप्त झालें. आज ब्राह्मोसमाज लुप्तप्राय झालेला दिसत असला तरी एकेकाळीं सुमारें पाऊण-शतकभर त्यानें बंगाल्यांतील हिंदूंमध्यें जी जागृति निर्माण केली, त्यामुळें अनेक नामवंत पुरुष बंगाल्यांत निर्माण झाले यांत शंका नाहीं. बंगालमध्यें बौद्धिक व अध्यात्मिक जागृति या समाजामुळेंच झाली व बंगालमध्यें नवें चैतन्य निर्माण झालें तें ब्राह्मोसमाजामुळेंच होय असें मानतात.

१२. आर्यसमाज :—स्वामी दयानंद सरस्वती यांनीं आर्यसमाज स्थापन केला. स्वामींचा जन्म काठेवाडांत सन १८२४ मध्यें झाला. बालवयांतच त्यांचा मूर्तिपूजेवरील विश्वास उडाला होता. त्यामुळें त्यांच्यांत वैचारिक जागृति होऊन, ते धर्मतत्त्वांचा सखोल बुद्धीनें अभ्यास करूं लागले. पुढें त्यांच्या वडिलांनीं त्यांच्या विवाहाचा घाट घातला असतां स्वामी पळून गेले व त्यांनीं संन्यास घेतला. सन १८७५ मध्यें मुंबईस त्यांनीं 'आर्यसमाजाची' प्रथम स्थापना केली. परंतु महाराष्ट्रांत त्यांचा पंथ रुजला नाहीं. त्यामुळें सन १८७७ मध्यें त्यांनीं लाहोरास मुख्य शाखा स्थापिली. तेंच ठिकाण आजही आर्यसमाजाचें मुख्य केंद्र मानण्यांत येतें. मूर्तिपूजा, जातिभेद, अस्पृश्यता वगैरे गोष्टी आर्यसमाजास मान्य नाहींत. वेदांवर आर्यसमाजाचा पूर्ण विश्वास आहे. मात्र पुराणें त्यास मान्य नाहींत. वेदांत आधुनिक सर्व शोध आहेत असें दयानंद सांगत. तें मात्र लोकांस पटत नसे. परधर्मीयांस व बाटलेल्यांसही हिंदुधर्मांत परत घेण्याची आर्यसमाजानें व्यवस्था केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें सन १८८५ मध्यें अजमिरास स्वामी परलोकवासी झाले. त्यांच्या पश्चात् आर्यसमाजाची वाढ पंजाबांत जोरानें झाली. परंतु उदारमतवादी व पुराणमतवादी असे दोन पंथ निर्माण होऊन मूळ पंथाचीं छकलें झालीं. तरीही शिक्षणाचा प्रसार, समाजसेवा व परोपकार यांवर आर्यसमाज जोर देतो. 'गुरुकुल' नांवाची हरिद्वार येथें स्थापन केलेली संस्था व लाहोरचें 'दयानंद कॉलेज' या संस्थांनीं शिक्षणाची चांगली सोय केली. शिवाय 'शुद्धीकरण' व 'संघटण' यांवर आर्यसमाज विशेष जोर देतो. अस्पृश्यता नष्ट करण्याकरितांही त्यांचे प्रयत्न चाललेले असतात. हिंदुधर्माला ओजस्वी स्वरूप प्राप्त करून देण्याकरितां आर्यसमाजी लोक झटत असतात. सनातनी हिंदु व आर्यसमाज यांच्यामध्यें समेट घडवून आणण्याकरितां स्वामी श्रद्धानंद फार झटले व त्यांना बरेंच यशही लाभलें.

१३. थिऑसफी:—थिऑसफीचा जन्म अमेरिकेंत झाला. व डॉक्टर ॲनी बिझांट या स्त्रीनें त्याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानांत केला. मॅडम ब्लॅव्हॅटस्की व कर्नल ऑलकॉट यांनीं सन १८७५ मध्यें थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना केली. निरनिराळ्या धर्मांतील निवडक धर्मतत्त्वांवर या पंथाची उभारणी करण्यांत आली आहे. जातिभेद व वर्णभेद नाहींसे करणें, गूढ सृष्टिनियमांचें संशोधन करणें, बंधुभाव व प्रेम वाढविणें, अनुभवाला येतील त्या गोष्टींवर विश्वास ठेवणें वगैरे गोष्टी या पंथाला मान्य आहेत. सर्व गुणांची पूर्णावस्था म्हणजे मुक्ति होय. मुक्त मनुष्याचें व्यक्तित्व नष्ट होत नाहीं, सर्व जीवन्मुक्तांचा एक संघ असतो व तो सर्व जगाचा योगक्षेम चालवितो असें या पंथांतील लोक समजतात. अंधश्रद्धेनें विचारस्वातंत्र्य नष्ट होतें. तेव्हां तसें होऊं नये व धर्मप्रेमी लोकांस सत्यान्वेषणानें योग्य व स्वतंत्र विचारांस चालना देतां यावी असें हे लोक समजतात. मद्रासजवळील अड्यार हें गांव हिंदी थिऑसफिस्टांचें मुख्य ठिकाण आहे. शिक्षणाचें कार्यही या पंथांतील लोक जोमानें चालवीत आहेत. बिझांटबाईनींच सन १८९८ मध्यें 'बनारस' हिंदु कॉलेज स्थापन केलें व त्यांतून 'बनारस हिंदु विश्वविद्यालयाची' उत्पत्ति झाली असें मानण्यांत येतें. आज पांच हजारांवर थिऑसफिस्टस् हिंदुस्थानांत आहेत. परंतु त्यांचा पंथ हिंदुस्थानांत फारसा प्रसार पावेल असें वाटत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. प्रार्थनासमाज :—ब्राह्मोसमाजाचीं तत्त्वें ज्यांना मान्य होतीं, त्यांनींच त्यांत थोडा फरक करून प्रार्थनासमाज स्थापन केला. केवळ प्रार्थनेनेंच परमेश्वरास प्रसन्न करून घेतां येतें; अर्थात निर्गुण व निराकार परमेश्वरास भजणेंच योग्य होय असें या पंथांतील लोकांचें म्हणणें होतें. हा समाज सन १८६७ मध्यें मुंबईस स्थापन झाला. डॉ. भांडारकर, न्यायमूर्ति रानडे, सर नारायण चंदावरकर वगैरे लोक त्या पंथाचे अध्वर्यु बनले; व त्यांनीं प्रार्थनासमाजाच्या तत्त्वांची लोकांस माहिती करून देण्याकरितां पुष्कळ व्याख्यानेंही दिलीं. परंतु प्रार्थनासमाजाचें पाऊल पडावें तितकें पुढें पडलें नाहीं. त्याला अनुयायी मूठभरच मिळाले; व ते आजही पुण्या-मुंबईच्या बाहेर फारसे नाहींत.

१५. रामकृष्ण मिशन :—हिंदुधर्मास जें मलिन स्वरूप प्राप्त झालें व त्याचा तेजस्वीपणा नष्ट झाला तो त्यास पुन्हां प्राप्त करून द्यावा असें अनेकांस वाटत होतें. त्यांत रामकृष्ण परमहंस, स्वामी रामतीर्थ व स्वामी विवेकानंद हे प्रमुख होत. स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंसांचे शिष्य होत. त्यांचा जन्म सन १८६३ मध्यें झाला. विसाव्या वर्षी रामकृष्णांचें शिष्यत्व पत्करून विवेकानंदांनीं हिमालयांत बरींच वर्षें घालविलीं. पुढें अमेरिकेंत शिकागो येथें भरणाऱ्या सर्वधर्मपरिषदेकरितां ते सन १८९३ मध्यें अमेरिकेस गेले. त्यांच्या वक्तृत्वानें परिषदेंतील लोकांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्यामुळें अनेक अमेरिकन लोक त्यांच्या भजनीं लागले. पुढें अमेरिकेंत त्यांनीं अनेक व्याख्यानें दिलीं व तेथील लोकांस हिंदुधर्माचें तत्त्वज्ञान विशद करून सांगून, वेदांततत्त्वज्ञानाचा अभ्यास सुकर व्हावा म्हणून अनेक संस्था त्यांनीं अमेरिकेंत स्थापिल्या. पुढें स्वामी इंग्लंडांत गेले व तेथेंही त्यांनीं आपल्या धर्माचा विजयध्वज फडकवीत ठेऊन, ते हिंदुस्थानांत परत आले. येथें आल्यावर त्यांनीं ‘रामकृष्ण मिशन’ नांवाची संस्था स्थापून तिच्यातर्फे अखंड धर्मकार्य चालावें अशी व्यवस्था केली. स्वामी विवेकानंद सन १९०२ मध्यें समाधिस्थ झाले. ‘वेदान्ततत्त्वांच्या शिकवणुकीकडे वळा’ हा त्यांच्या शिकवणुकीचा मुख्य कटाक्ष होता.

१६. औद्योगिक स्थित्यंतरें :—फार प्राचीन काळापासून हिंदुस्थान देश व्यापाराकरितां व येथील उद्योगधंद्यांकरितां अति प्रसिद्ध आहे. सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारच्या साधनांची विपुलता येथें असल्यानें वाटेल तो जिन्नस आजही येथें तयार होऊं शकतो. प्राचीन काळीं डाक्क्याची मलमल, काश्मिरी गालिचे, रेशमी कापड, कापसाचें कापड, धातुकाम, कलाकौशल्याचीं कामें वगैरे अनेक तऱ्हेचा माल हिंदुस्थानांतून युरोपांत जात असे. प्राचीन काळीं रोममधून तर हिंदुस्थानाकडे पैशाची रीघ लागलेली होती. पुढें व्हेनिस व जिनोआ हीं इटालियन बंदरें हिंदुस्थानशीं व्यापार करूं लागलीं. तुर्कस्थाननें कॉन्स्टँटिनोपल काबीज केल्यावर हिंदुस्थानास जाणाऱ्या नव्या मार्गाकरितां युरोपियनांची धडपड सुरू झाली. तो सांपडल्यावर हिंदुस्थानशीं मोठ्या प्रमाणावर युरोपियनांचा व्यापार सुरू झाला. पुढें ई. इं. कंपनीनें येथें राज्यस्थापनेस सुरुवात केली. त्यामुळें येथील उद्योगधंदे घटूं लागले. इंग्लंडनेंही हिंदुस्थानच्या कापडावर शेंकडा ८० टक्के इतकी जबर जकात ठेवली. त्यामुळें हिंदी कापडाचा धंदा बुडाला. शिवाय येथील कोष्टयांचा धंदा बुडावा म्हणून कंपनीनें त्यांस हरतऱ्हेनें गुंतवून ठेवलें. यामुळेंही येथील रेशमी व कापसाच्या कापडाचे धंदे बुडाले. याचप्रमाणें जहाजें बांधण्याचे कारखानेही कंपनीच्या धोरणामुळें नष्ट झाले. त्यामुळें हिंदी नौकानयनाची पीछेहाट झाली. पुढें इंग्लंडांत औद्योगिक क्रांति होऊन यांत्रिक प्रगतीबरोबरच उद्योगधंद्यांचीही त्या देशांत प्रगति झाली. यामुळें तेथें यंत्रांच्या साहाय्यानें अनेक प्रकारचा माल तयार होऊं लागला व तो हिंदुस्थानांत स्वस्ताईनें विकण्यांत येऊं लागला. यामुळें हिंदुस्थानांतील उद्योगधंदे मागें पडूं लागले व कालांतरानें त्यांचें अस्तित्वही उरलें नाहीं.

१७. औद्योगिक सुधारणा :—कंपनीच्या धोरणानें हिंदुस्थानांतील घरगुती धंदे नष्ट झाले. त्यांतल्यात्यांत सूत कांतण्याचा व कापड विणण्याचा धंदा अजिबात नष्ट झाल्यासारखा झाला. यामुळें हिंदुस्थानाला कापडाकरितां परदेशांकडे—विशेषतः इंग्लंडकडे–पहावें लागलें. असें असलें तरी हिंदी लोक स्वस्थ बसले नाहींत. हिंदुस्थानांत कापसाची विपुलता असल्याचें पाहून कापडाच्या गिरण्या हिंदुस्थानांत काढण्याचा विचार हिंदी लोकांच्या मनांत आला. त्याप्रमाणें सन १८५१ मध्यें मुंबईस पहिली गिरणी स्थापन झाली. यानंतर हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं कापडाच्या गिरण्या निघूं लागल्या व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोड्याच काळांत अहमदाबाद, सोलापूर, मुंबई, कलकत्ता, कानपूर, नागपूर, लखनौ, मदुरा वगैरे अनेक ठिकाणीं गिरण्या निघाल्यानें इंग्लंडमधील मँचेस्टरचा व्यापार बुडूं लागला. तेव्हां सरकारनें इंग्लिशांस संरक्षण देण्याच्या हेतूनें खुल्या व्यापाराचें तत्त्व स्वीकारलें. परंतु त्यामुळें जपान, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, बेल्जम वगैरे देशांतून अनेक प्रकारचा माल व कापडही हिंदुस्थानांत येऊं लागलें. त्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांचा जम बसेना. तेव्हां हिंदी धंद्यांस उत्तेजन देण्याचा प्रश्न उत्पन्न होऊन परदेशी मालावर संरक्षक जकात बसविण्यांत येऊं लागली. याच काळांत हिंदुस्थानांत स्वदेशी चळवळ सुरू होऊन परकीय मालावर बहिष्कार घालण्यास सुरुवात झाली. त्यांतच सन १९१४–१८ च्या महायुद्धामुळेंही देशी उद्योगधंद्यांकडे सरकारला लक्ष पुरवावें लागलें. या सर्व घटनांमुळें सरकारला व्यापाराच्या बाबतींत संरक्षक पद्धतीचा अवलंब करावा लागला. येवढेंच नव्हे तर हिंदी उद्योगधंद्यांस उत्तेजन व संरक्षण देऊन त्यांनीं तयार केलेला माल सरकारनें घ्यावा असें धोरणही सरकारनें स्वीकारलें. यामुळें हिंदी उद्योगधंद्यांस पुढें सरसावण्यास वाव मिळाला. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळींही सरकारनें हेंच धोरण अवलंबिल्यासारखें दिसतें. या काळांत दोन महत्त्वाचे धंदे हिंदुस्थानांत सुरू करण्यांत आले. विमानोत्पादनाचा धंदा बंगलोरास व नौकाबंधनाचा धंदा विझगापट्टणास सुरू झाला. त्याचें बरेचसें श्रेय शेट वालचंद हिराचंद यांचेकडे जातें.

१८. औद्योगिक सुधारणांचे जनकः—हिंदुस्थानांतील औद्योगिक सुधारणांचे जनक म्हणून जमशेद टाटा यांचें नांव महशूर आहे. त्यांनीं 'जमशेदपूर' हें गांव वसवून तेथें अनेक तऱ्हेचे–विशेषतः लोखंडाचे–कारखाने सुरू केले. त्यामुळें निरनिराळी यंत्रसामुग्री व लोखंडी सामान हिंदुस्थानांत प्रथमतः निर्माण होऊं लागलें. त्याचप्रमाणें डोंगरावरून पडणाऱ्या पाण्याच्या साहाय्यानें वीज उत्पन्न करण्याचे कारखानेही त्यांनीं अनेक ठिकाणीं स्थापले. त्यामुळें हिंदुस्थानांत वीज उत्पन्न करण्याचे अनेक कारखाने निर्माण झाले. विमानानें वाहतुक करण्याचा मानही टाटांसच प्रथमतः मिळाला. यामुळें टाटांचें नांव हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबतींत चांगलेंच गाजून राहिलें आहे. जमशेदपूरच्या पोलादाच्या कारखान्या-प्रमाणेंच कांच व कांचेचें सामान तयार करणें, कागद तयार करणें, साखर तयार करणें, पोलादी व लोखंडी सामान तयार करणें वगैरे प्रकारचे अनेक धंदे आज हिंदुस्थानांत उत्पन्न झालेले आहेत. ज्यूटचा धंदा तर हिंदुस्थानचा मक्ताच होऊन बसला आहे. कारण बंगाल प्रांत सर्व जगाला आज ज्यूट पुरवितो. हिंदुस्थानांतील चहाचे मळेही प्रसिद्ध आहेत. अलीकडे अफूचें उत्पन्न घटूं लागलें असलें तरी तंबाकूचें उत्पन्न वाढलें आहे. कापूस व कापसाचें कापड हा धंदा चांगलाच उर्जितावस्थेस येईलसें वाटतें. शाली व रेशमी कापडही हिंदुस्थानांत चांगल्या प्रकारचें निर्माण होतें.

१९. **शेतींत सुधारणा**:—हिंदुस्थान देश शेतीप्रधान आहे. येथील लोकांचा मुख्य धंदा शेतीचाच समजला जातो. परंतु येथील शेतकऱ्यांचा उद्योग पावसावरच नेहमीं अवलंबून असतो. पाऊस योग्य वेळीं व योग्य प्रमाणांत पडला म्हणजे शेतकरी सुखी असतो. शेतकरी सुखी कीं राष्ट्र सुखी. परंतु हिंदुस्थानच्या शेतीस अवर्षण अगर अतिवर्षण यांमुळें नेहमीं धोका पोंचतो. अर्थात शेतीचें पीक चांगलें येण्याकरितां व वरील आपत्तीपासून शेतीचें संरक्षण करण्याकरितां सरकारला लक्ष पुरविणें भाग पडतें. अवर्षणाचे काळीं व ज्या भागांत पाऊस फार कमी पडतो त्या भागांतील शेतीस पाणीपुरवठा योग्य व्हावा म्हणून सरकारनें कालवे व पाटबंधारे बांधण्यास सुरुवात केली. अशात-हेचीं भाटघर व सक्कर येथील धरणें प्रसिद्ध आहेत. तसेंच दुष्काळाच्या-वेळीं शेतकऱ्यांस मदत पुरविण्याचेंही सरकारनें धोरण स्वीकारलें आहे. याकरितां व इतर कामांकरितां शेतकऱ्यांस सहकारी पतपेढ्यांचा उपयोग फार होतो. युरोपीय देशांतून शेतीच्या बाबतींत ज्या सुधारणा होतात, त्याच प्रकारच्या येथेंही व्हाव्यात असें सरकारी धोरण आहे. त्यामुळें शेतींत अनेक प्रकारच्या सुधारणा प्रत्यहीं होऊं लागल्या आहेत. तसेंच प्रदर्शनें, उत्तम बीं-बियाणें, खत, नवीन प्रकारचीं शेतीचीं साधनें व हत्यारें, उत्तम वळूंची निपज कशी करावी यासंबंधींची माहिती वगैरे गोष्टींही शेतकऱ्यांच्या निदर्शनास येऊं लागल्या आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



आधुनिक प्रवासाचीं साधनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२०. दळणवळण व वाहतुक :—उद्योगधंदे व वाहतुक यांचा संबंध निकटचा आहे. पूर्वींच्या वाहतुकीच्या साधनांत सध्यां अनेक प्रकारची भर पडत आहे. बैलगाड्या, घोडीं, उंट, गाडे वगैरे प्रकारचीं वाहतुकीचीं साधनें सध्यांही चालू आहेतच. त्यांशिवाय आगगाडी, आगबोट, विमानें, मोटारी वगैरेंचा उपयोग सध्यां माल वाहण्याकडे मोठ्या प्रमाणावर होऊं लागला आहे. दळणवळणाच्या साधनांचा जसजसा जास्त उपयोग होऊं लागला तसतशी मोठ्या व चांगल्या स्थितींतील सडकांचीही जरूरी भासूं लागली. त्याप्रमाणें मोठ्या सडकाही इकडे झाल्या आहेत. वाहतुक व प्रवास चांगल्या-प्रकारें व्हावा म्हणून हिंदुस्थानांतील सडका अलिकडे डामरी अगर सीमेंटच्याही होऊं लागल्या आहेत. प्रवासाकरितां आगगाडी, मोटारी, ट्रामगाड्या व विमानें यांचाही उपयोग होऊं लागला आहे. यामुळें पूर्वींच्या मानानें प्रवासही सुखकर व वक्तशीर होऊं लागला आहे.

२१. टपाल व डांक :—पूर्वीं टपालाची पद्धति हिंदुस्थानांत होती; परंतु ती अत्यंत मर्यादित व महाग होती. त्यावेळीं घोड्यावरून अगर सांडणी-स्वारांच्या करवीं टपाल पोंचतें करण्यांत येत असे. सध्यां टपाल आगबोटी, आगगाड्या व विमानें यांच्यातर्फे पोंचविण्याची सोय सरकारनें केल्यानें थोड्या हंशिलांत हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत पत्रें व बातम्या पोंचविल्या जातात. परदेशाशीं पत्रव्यवहारही सोयीचा व स्वस्त झाला आहे. पूर्वी अशी सोय नसल्यानें हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यवहार अत्यंत मर्यादित असे. बातम्या व वृत्तें पोंचविण्याकरितां टपालाप्रमाणें तारायंत्र व टेलिफोन यांचाही उपयोग अलिकडे होऊं लागला आहे. यामुळें व्यापारही द्रुतगतीनें होतो. रेडियो ब्रॉडकास्टिंगचा उपक्रम सुरू झाल्यानेंही बातम्या, व्यापारी वृत्तें व हकीकती हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेरही लोकांस मिळूं लागल्या आहेत. रेडियोमुळें हिंदुस्थानच्या व्यापारी, औद्योगिक व राजकीय बाबतींत पुष्कळ क्रांति झाली आहे. टेलिव्हिजनचा उपयोग रेडियोइतका अजून सर्वत्र झालेला नाहीं.

२२. वर्तमानपत्रें व बातम्या :—वर्तमानपत्रें पूर्वीं नव्हतींच. लोकमत तयार करण्याकरितां व बातम्यांचा सर्वत्र फैलाव करण्याकरितां वर्तमान-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्रांचा उपयोग फार होतो ही गोष्ट इंग्रजांपासूनच हिंदी लोक शिकले. हिंदुस्थानांत प्रथमतः बंगाल्यांत वर्तमानपत्र निघालें. त्याचें नांव 'बंगाल गॅझेट'. तें सन १७८० सालीं एका इंग्रजानें सुरू केलें. सन १७८९ मध्यें 'बॉम्बे हेरल्ड' नांवाचें पत्र मुंबईस निघूं लागलें. मुंबई टाइम्सचा जन्म सन १८३८ मध्यें झाला. याचेंच पुढें 'टाइम्स ऑफ इंडिया' हें नांव पडलें. परंतु प्रथमतः सर्व पत्रें इंग्रजांनीं इंग्रजींत काढलेलीं असत. पुढें सन १८४९ मध्यें पुण्यास 'ज्ञानप्रकाश' हें मराठी पत्र व सन १८८० मध्यें 'केसरी' पत्र निघालें. यामुळें प्रांतिक भाषांत अनेक पत्रें निघालीं व त्यांनीं लोकमत तयार करण्याकरितां अनेक प्रकारांनीं खटपट केली. वर्तमानपत्र ही संस्था इंग्रजी आहे व ती इंग्रजी अंमलांत निघून थोड्या वेळांत लोकप्रिय झाली. पुढें पुढें सरकारनें कायदे करून मुद्रण-स्वातंत्र्याची गळचेपी अनेक वेळां केली.

२३. शैक्षणिक प्रगति :—प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत शिक्षणाची सोय होती. नालंद, तक्षशिला, उज्जयिनी वगैरे ठिकाणीं विश्वविद्यालयेंही होतीं. परंतु हिंदी शिक्षणपद्धतींत अनेक प्रकारचे दोष होते. मोंगल व मराठे यांच्या काळांतही सदोष पद्धतीच अनुसरली जात होती. परंतु इंग्रजी अमलांत अनेक आधुनिक प्रकार शिक्षणांत आले व शिक्षण सार्वत्रिक होऊं लागलें. लॉर्ड मेकॉलेनें इंग्रजी भाषेंतून पाश्चात्य शिक्षण देण्याचें घोषित केल्यापासून हिंदी लोकांचें लक्ष पाश्चात्य ज्ञानाकडे वळलें. त्यामुळें इकडील लोकांस पाश्चात्य वळणाचें शिक्षण देण्याकरितां शाळा, कॉलेजें व विश्वविद्यालयें स्थापण्यास सुरुवात झाली. प्रथमतः कारकून तयार करण्याकरितांच हें पाश्चात्य शिक्षण सरकारकडून देण्यांत येई. परंतु पुढें या धोरणांत फरक पडत गेला. प्रथमतः शहरांतील लोकांस इंग्रजी शिक्षण देऊन त्यांच्यातर्फे बहुजनसमाजास शिक्षण द्यावें व अशातऱ्हेनें शिक्षणाचा खेडोपाडीं प्रसार करावा असा सरकारचा उद्देश होता. सध्यां शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत असला तरी शिक्षितांचें प्रमाण शेंकडा ८।१० टक्क्यांपेक्षां पुढें गेलेलें नाहीं. शिक्षणखात्यावर सरकार फार थोडा पैसा खर्च करतें, हें यावरून सिद्ध होतें. पुस्तकीज्ञानाची सोय सरकारनें पुष्कळ केली आहे; परंतु औद्योगिक शिक्षणाची हेळसांडच होत आहे. अलिकडे मात्र या गोष्टीकडे सरकारचें लक्ष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेधलें गेलें आहे. त्यामुळें नव्या नव्या संस्था निर्माण होऊं लागल्या आहेत हें देशाचें सुदैव होय. मात्र राष्ट्रांत इंग्रजीला जें महत्त्व प्राप्त झालें आहे तें फाजील होय, असें कांहींचें म्हणणें आहे. इंग्रजी ही राज्यकर्त्यांची भाषा असली किंवा ती दरबारी भाषा असल्यामुळें सार्वत्रिक झालेली असली तरी त्यामुळें प्रांतिक भाषांची वाढ खुंटून त्यांची गळचेपी होते यांत शंका नाहीं.

२४. खेळ–करमणूक :—इतर अनेक बाबतींप्रमाणें खेळांमध्येंही अनेक स्थित्यंतरें घडून आलीं आहेत. खोखो–आट्यापाट्या, कुस्ती, लंगडी, पट्टा, बोथाटी, फरीगदगा, लेझीम वगैरे देशी खेळ मागें पडून सर्व लोकांस 'क्रिकेटनें वेडें केलें' आहे. क्रिकेटप्रमाणेंच हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल वगैरे खेळही विदेशी लोकांपासून हिंदी लोकांनीं उचलले आहेत. गंजिफा, सोंगट्या, बुद्धिबळें वगैरे देशी बैठे खेळ मागें पडून पत्ते, कॅरम वगैरे विदेशी खेळांनीं त्यांची जागा घेतली आहे. खेड्यांतून साठमाऱ्या आतां क्वचितच होतात. कुस्त्यांचे फड जत्रेच्या वेळीं अजूनही पडतात. नाच, तमाशे व नाटकें यांमुळें लोकांचें मनोरंजन चांगलें होतें. सर्कशीचा खेळही त्या कामीं कधीं कधीं उपयोगीं पडतो. परंतु अलिकडे सिनेमाचें वेड लोकांना फार लागलें आहे. त्यांतल्या त्यांत देशी चित्रपटांपेक्षां विदेशी चित्रपटांकडे सुशिक्षितांचें लक्ष पुष्कळ वेधलें गेलें आहे. करमणुकीकरितां प्रवास करण्याची व देशांतील व परदेशांतील देखावे व रम्य स्थळें पाहण्याकडे लोकांची प्रवृत्ति झुकूं लागलेली आहे. पुणें, मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास वगैरेसारख्या मोठमोठ्या शहरीं घोड्यांच्या शर्यतीवर पैसे लावून करमणूक करून घेण्याची पद्धति अगदीं इंग्रजी वळणाची आहे; त्यापायीं अनेक लोक आपल्या वेळेचा व पैशाचाही विनियोग करतात.

२५. घरांची बांधणी :—लोकांच्या राहणींतही फरक पडूं लागला आहे. आमचीं घरें बांधण्याची पद्धति पार बदलून गेली आहे. पूर्वींचीं तीं तिघई तीन खणी, अगर अनेक खणी पण चौकी घरें बांधण्याची पद्धति मागें पडत आहे. त्या पद्धतीमुळें उजेड, प्रकाश व हवा यांना आमच्या घरांतून मोठ्या प्रमाणांत बंदी असे व त्यामुळें लोकांच्या आरोग्यावर पुष्कळ वाईट परिणाम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होई. आतां नव्या घरांतून उजेड व हवा मुबलक असते. घरेंही नव्या नव्या प्रकारचीं बांधलीं जाऊं लागलीं आहेत. माती, चुना व लांकूड यांच्या ऐवजीं आतां दगड, विटा, चुना, सीमेंट, लोखंडी तुळया वगैरे माल घरांकरितां वापरण्यांत येतो. घरांस खिडक्याही मुबलक ठेवण्यांत येतात. या नव्या प्रकारच्या घरांभोवतीं नव्या प्रकारचे बगीचे होऊं लागले आहेत. घरांतून युरोपियन पद्धतीचें फर्निचरही येऊं लागलें आहे. गांवांतून अगर शहरांतून मोठे व रुंद रस्ते होऊं लागले आहेत व या रस्त्यांची निगा राखण्याकरितां पंचायिती अगर म्युनिसिपालिट्याही स्थापन झाल्या आहेत. मोठमोठ्या शहरांतील भव्य, डौलदार व नव्या नव्या प्रकारच्या मनोहर इमारती अगदीं युरोपियन पद्धतीच्या होऊं लागल्या आहेत. तसेंच वाचनालयें, सार्वजनिक बागा, उद्यानें, पदार्थसंग्रहालयें, अजबखाने, पशुसंग्रहालयें वगैरेही मोठमोठ्या शहरीं होऊं लागलीं आहेत.

२६. पोशाख, अन्न वगैरे :—हिंदी घरांतून पाहिल्यास दारिद्य मी म्हणतांना दिसेल. एके काळीं हिंदी घरांतून सोन्याचा धूर निघे; परंतु त्याच घरांतून आतां साध्या कोळशाचा धूरही निघण्याची पंचाईत पडूं लागली आहे! अन्नाकरितां प्रत्येकाची धडपड असते. मात्र हिंदी लोकांस पुरेसें अन्नही मिळत नसल्याची तक्रार सर्वत्र ऐकूं येते. साधी मीठ-भाकरी व कांदा-लसूण हें गरिबाचें अन्न आजही आपल्याला दिसून येतें. सणासुदीच्या दिवशीं पांढरी पोळी व एखादी भाजी व भात मिळाल्यास तो गरिबाचा सुदीन होय! अन्नाची ही स्थिति तर गरिबांच्या कपड्याची स्थिति काय असेल तें वर्णन न करतांच कळण्यासारखें आहे. कांबळें, मळकट धोतर, कसेंबसें डोक्यास गुंडाळलेलें मुंडासें हा गरिबांचा पोषाख! त्याची स्त्री साधेसें लुगडें व चोळी नेसून त्याला मदत करण्यास सदैव तयार असते. अशा तऱ्हेच्या राहणीच्या लोकांचाच भरणा हिंदुस्थानांत फार. मध्यम वर्गांतील लोक मात्र सुखी दिसतात. गहूं, ज्वारी, तांदूळ, निरनिराळ्या डाळी व कडधान्यें, निरनिराळीं फळें, भाज्या, दूध, तूप, ताक, साखर, गूळ, तेल वगैरे जिन्नस त्यांच्या जेवणांत दृष्टीस पडतात. सदरा, कोट, धोतर, टोपी व पायांत वहाणा वा जोडा असा पुरुषाचा साधारण पोशाख असतो. लुगडें, पोलकें, चोळी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वगैरे स्त्रियांचा पोषाख असतो. श्रीमंतांमध्यें मात्र अनेक तऱ्हेचें युरोपियन पद्धतीचें अनुकरण दिसून येतें. त्यांची राहणी, आचार-विचार, चालचलणूक, पोषाखाची तऱ्हा, अन्नाचे प्रकार व जेवण्याचे प्रकार या सर्वांवर युरोपियन पद्धतीची दाट छाया पडलेली आढळून येते. यामुळें त्यांच्या विचारांवरही इंग्रजी छाप पडलेली दिसते. रहावें इंग्रजांसारखें, खावें इंग्रजांसारखें, ल्यावें इंग्रजांसारखें, ऐट करावी इंग्रजांसारखी व मिळावें-मिसळावें इंग्रजांमध्यें अशी त्यांची सर्व इंग्रजमय राहणी झाल्यासारखी दिसते. अर्थात त्यामुळें इंग्रजी समाजांत वावरणारे अनेक दोषही त्यांच्यांत दिसूं लागल्यास नवल नाहीं.

२७. उपसंहार :—एकंदरींत पाहतां हिंदुस्थानापुढें उज्ज्वल भवितव्य आहे यांत शंका नाहीं. हिंदुस्थानला आज जगामध्यें मानाचें स्थान नसलें व हिंदी लोकांस जगांतील राष्ट्रांमधून मानानें वागविलें जात नसलें तरी ही स्थिति फार काळ टिकेल असें वाटत नाहीं. हिंदी लोकांमध्यें जागृति झाली आहे. ते आपल्या हक्कांस व अधिकारांस जपूं लागले आहेत, युरोपियन लोकांप्रमाणें चिकित्साबुद्धि त्यांच्यांत बाणूं लागली आहे, अधिक ज्ञान मिळविण्याकडे त्यांच्या वृत्ती झुकूं लागल्या आहेत, सर रमण, सर जगदीशचंद्र बोस, लो. टिळक, ना. गोखले, महात्मा गांधी, डॉ. रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, सर राधाकृष्णन्, ना. श्रीनिवास शास्त्री वगैरे निष्णात व चौकस व चौरस सुपुत्र हिंदुस्थानांत निपजूं लागले आहेत; अर्थात यामुळें हिंदुस्थानचें भवितव्य उज्ज्वल होणारच. पश्चिम ती पश्चिमच राहणार असली, तरी पूर्वेचें पूर्वपणही लोपणार नाहीं. शिवाय ज्या देशाचा प्राचीन इतिहास रोमहर्षणकारी अर्थात उज्ज्वल आहे, त्या देशाचा भावी काळ वैभवाचा, सुखाचा व भरभराटीचा जाणारच.

अभ्यास

१. इंग्रजी अमलांतील सामाजिक स्थित्यंतरें वर्णा. तीं कां घडून आलीं ?

२. इंग्रजी अंमलाचा सामाजिक, धार्मिक व राजकीय गोष्टींवर कोणता परिणाम घडून आला तें थोडक्यांत सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. राष्ट्रीय सभेचा थोडक्यांत इतिहास सांगा.

४. हिंदी लोकांच्या राहणीवर नव्या युगाचा कोणता परिणाम झाला? सोदाहरण वर्णन करा.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
हिंदुमहासभा, मुस्लिमलीग, जातिभेद, स्त्रीशिक्षण, अस्पृश्यतानिवारण, बालविवाह, ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, स्वामी विवेकानंद, थिऑसफी, औद्योगिक सुधारणा, जमशेद टाटा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधारभूत ग्रंथांची यादी

1. Rise and Fulfilment of British Rule in India—*Thompson and Garret.*
2. History of India—*Marshman.*
3. Rise of British Power in India—*P. Roberts.*
4. Oxford History of India—*Vincent Smith.*
5. Rise of Christian Power in India—*B. D. Basu.*
6. The Cambridge Shorter History of India—*Dodwell.*
7. Cambridge History of the British Empire, Part IV.
8. History of Mediæval India—*Ishwari Prasad.*
9. Mediæval India—*Lanepool.*
10. British Dominions in India—*Lyall.*
11. Ancient India—*S. K. Aiyanger.*
12. The Early History of India—*V. A. Smith.*
13. The Civilization of India—*R. C. Dutt.*
14. Ancient India, Vol. I—*Dr. T. L. Shah.*
15. A History of India, Part I—*Rangaswami Aiyanger.*
16. Prehistoric, Ancient and Hindu India—*Bannerji.*
17. Mughal Rule in India—*Edwards and Garret.*
18. Alberuni's India—*Schau.*
19. The Development of Indian Policy—*Anderson and Subedar.*
20. Administrative Systems of the Mahrattas—*Dr. S. Sen.*
21. Mediæval India from Contemporary Sources—*Lanepool.*
22. Speeches and Documents on Indian Policy, Vol. I & II —*A. B. Keith.*
23. Rulers of India Series.

२४. मध्ययुगीन भारत भाग, १।२।३—चिंतामणराव वैद्य.

२५. महाभारताचा उपसंहार—चिंतामणराव वैद्य.

२६. इतिहास मंजिरी—द. वि. आपटे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२७. प्रतापगडचें युद्ध—कॅ. मोडक.
२८. रावबहादुर सरदेसाई यांच्या सर्व रियासती.
२९. ऐतिहासिक पत्रव्यवहार—सरदेसाई व काळे.
३०. राजस्थानचा इतिहास—लोकहितवादी.
३१. पेशवेकालीन महाराष्ट्र—भावे.
३२. मराठे व इंग्रज—न. चिं. केळकर.
३३. पहिले बाजीराव पेशवे—प्रा. बेहेरे.
३४. सन १८५७.—प्रा. बेहेरे.
३५. शिवाजी व शिवकाल—यदुनाथ सरकार.
३६. ज्ञानकोश—बुद्धोत्तर जग, वेदविद्या व हिंदुस्थान—डॉ. केतकर.
३७. कौटिलीय अर्थशास्त्र—करंदीकर-हिवरगांवकर.
३८. महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास—आपटे-ओतुरकर.
३९. ब्रिटिशांचा इतिहास—खंड १।२।३—वि. सि. चितळे.
४०. हिंदुस्थानचा इतिहास—प्रा. शं. रा. कानिटकर.
४१. हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास—ओतुरकर.
४२. इतिहास कसा शिकवावा ?—शं. दा. चितळे.
43. Teaching of History—*Jarvis*.
44. Teaching of History—*Worts*.
45. Suggestions for the teaching of History in India—*V. D. Ghate*.

वि. सू.—वरील बहुतेक सर्व ग्रंथांचा हें पुस्तक लिहितांना मीं अनेक प्रकारें पुष्कळ उपयोग केला आहें. त्याकरितां त्या त्या ग्रंथकर्त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूचि

(आंकडे पृष्ठांकांचे आहेत)

अ

अगस्ती २७७
अकबर १८४, १९०, १९१–२०८, २३८
अजात शत्रू २५
अनंगपाळ ११८, ११९
अन्वरुद्दीन ४५१, ४५२
अफजलखान २९१, २९२
अबुल फज्ल १९७, २०४, २०६
अब्दाली २५२, २५५, २५६, ३५६ ३५८, ३५९
अमोघवर्मा १०४, १०५
अलप्तगीन ११७
अलिप्तपणाचें धोरण ४९३, ४९४, ४९७.
अलाउद्दीन १३६–१४२
अल्बेरुणी १२१
अल्तमिश १३१
अल्मिडा ४३९
अर्जुनसिंग २३२
अशोक ४६, ४७, ४८, ४९
अष्टप्रधानमंडळ ३१०, ३१७, ३१८
अहिल्याबाई ३६९, ३९६
ॲम्हर्स्ट ५१३, ५१४

आ

आईने–अकबरी २०५
आनंदीबाई ३८१, ३८३, ३८५, ३९५
आयर्विन ५८७
आर्यलोक २, ११, १५, २०, २१
आर्यसमाज ६०७–६०८
आरण्यकें २१
आलमगीर (२ रा) २५७
आसफखान २१५, २१९
ऑक्लंड (लॉर्ड) ५३२–५३६

इ

इब्ने बतूता १४६
इब्राहीम लोदी १५०
इब्राहीमखान गारदी ३६०
इलबर्ट बिल ५७१
इंपे ४८२, ४८३

ई

ई. इं. कंपनी ४४२, ४४३–४४५, ४७६, ४७७, ४८६, ५१०, ५२२, ५४९, ५६१

उ

उदगीरची लढाई ३५५, ३६०, ३६५
उदाजी पवार ३४५
उपगुप्त ४७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपनिषदें २१
उर्दू भाषा १७१

ए

एक्कोजी ३०४, ३०६
एलेनबरो ५३६, ५३७, ५४१
एलाशापेल ४५१
एल्फिन्स्टन ४०५, ४१६, ५२३

औ

औट्रॅम ५३७
औरंगजेब २१९–२२१, २२९–४०, २६२, २६३, २९७, ३०६, ३२०–३२६

अं

अंभी २७
अंधार कोठडी ४५९, ४६६, ४६७

क

कडफायसिस (१ ला) ६१
कडफायसिस (२ रा) ६१
कनिष्क ६१, ६२, ६३
कबीर १७१, १७२
कर्नाटक युद्धें ४५०–४५५.
कर्झन ५७५–५७८
कलुशा ३२०, ३२१
कान्होजी आंग्रे ३३२, ३३४, ३३७, ३७१
कालिदास ५७, ७१, ७५
कायमधारा पद्धति ४९१, ४९२, ४९५
कासीम (मोहंमद) ११४
किचनेर ५७८
कुतुबुद्दीन १२६, १३०
कुमारिल भट्ट ९१
कुशान लोक ६०, ६१
कूट (आयर) ४५५
कोलंबस ४३९
कौटिल्य ४०
कॅनिंग ५५६–५६२
कॉर्नवॉलिस ३९३, ४९१
क्लाइव्ह ४५३, ४५४, ४५९, ४६०–६३, ४६९, ४७१–७५

ख

खर्ड्यांची लढाई ३९५,
खानजहान लोदी २१९
खिजरखान १४९
खिलाफत ११३, ११४
खुर्रम २१२, २१५
खंडेराव दाभाडे ३२३, ३३५
खंडोबल्लाळ ३२०, ३२१, ३२८, ३३२

ग

गागाभट ३०२
गाजीउद्दीन २५६, ४५१
गियासुद्दीन १४४
गुलाम कादर २५९, २६०
गोखले (बापू) ४०६, ४०९
गोविंदपंत बुंदेले ३४१, ३४६, ३६२
गोविंदसिंग २३२
गौतमबुद्ध २५, ३२–३६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गंगाधरशास्त्री ४०५
गांधी (महात्मा) ५८१, ५८५-८७, ५९१, ५९६, ५९७-९८, ६००, ६०१,

च

चव्हाण (पृथ्वीराज) ९७, ९८, १२५.
चाणक्य ४०
चालुक्य १००-१०३
चिमाजी ३३८, ३४१, ३४२, ३४३
चेतसिंह ४८३, ४८४, ४८७
चेम्सफर्ड ५८३-५८५.
चैतन्य १७२
चौथाई ३१२, ३३५
चंगीझखान १३२
चंदासाहेब ३५१, ४४६, ४५१, ४५२
चंद्रराव मोरे २९०, २९१
चंद्रगुप्त मौर्य २६, ४०-४४, ५७
चंद्रगुप्त (१ ला) ६८
चंद्रगुप्त (२ रा) ६९-७१
चांदबिबी १९६

छ

छत्रसाल २३३, ३४१
छत्रपति प्रतापसिंह ४०६-४०८, ५४५

ज

जगन्नाथ पंडित १७१
जयसिंह २३३, २९८, २९९
जहांगीर १९७, २११-२१६
जहांदरशाह २४५
जलालुद्दीन १३६
जाट लोक २३१, २४६, ५१४
जातिभेद २२, १०६
जानोजी भोसले ३४६, ३७०, ३७१
जाबेताखान २५९, ३७२
जिजाबाई २८७, २८८, ३०३
जिझिया १४०, २३०, २३३, २३४, २४०
जिंजीचा वेढा ३२२
जुल्फकारखान २४४, २४५, ३२३, ३३९
जैनधर्म ३१, ३२, ३७, ३८

झ

झमानशाह ४९७, ४९८, ५३२
झामोरिन ४३९

ट

टिपू ३९३, ४९३, ४९७ ५०१, ५०२
टिळक ५८०, ५८३, ५९९, ६००.
टोपे ५६०, ५६१.
टॅव्हर्नियर २२५
टॉड ५२५
टॉमस रो २१४, २१७, ४४३

ठ

ठक्क लोक ५१९, ५२७, ५२८

ड

डभईची लढाई ३४०
डफ (ग्रँट) ४०७, ५२३, ५२४
डफरिन ५७३-७४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डरायस २५
डलहौसी ५४३–५५१
डुमास ४४५
डुले ४४६, ४५०, ४५१–४५७
डेंगळे ४०४, ४०५, ४०६.

त

तानसेन २०६, २२३
तानाजी ३०१
ताराबाई ३२४, ३२७, ३३२, ३३४, ३५४
तुकाराम २८०, ४३२
तुकोजी होळकर ३६९, ३७१, ३९०, ३९३
तुळशीदास २०६
तेजबहाद्दर २३२
तैनाती फौज ४९९, ५००, ५०१, ५०६, ५०७.
तैमूरलंग १४८, १४९
तोडरमल २०२, २०६
तोरमण ७३

द

दत्ताजी शिंदे ३५९
दमाजी गायकवाड ३४५, ३६०, ३६२
दादाजी कोंडदेव २८७, २८८
दारा शेको २२१
दाहीर ११४
दिलेरखान २९८, २९९
दिने इलाही २०४, २०८
दुहेरी राज्यव्यवस्था ४७३, ४७४, ४७५
दुर्गादास २३३
दोस्त मोहंमद ५३४, ५३५
दौलतखान लोदी १५०
दौलतराव शिंदे ३९५, ४००, ४०१–२
द्रविड लोक २, ७, १५, १६, ११९

ध

धनाजी जाधव २३६, ३०२, ३२१–३२३, ३२६, ३३२, ३३३
धुळप ३६७, ३७७
धुलीपसिंग ५३९, ५४०

न

नहपान ६०
नजीबखान २५७, २५८, २५९, ३५८, ३६९, ३७२
नानक १७२, २३१, ५३८
नादीरशहा २५१, २५२, २५७
नाना फडणीस ३६२, ३६७, ३८१, ३८२, ३९०–३९२, ३९८, ४००, ४०१
नानासाहेब २५७, ३५१–५५, ३५६, ३६४, ३६५
नारायणराव पेशवा २५९, ३८१–८२, ३८५, ३८६
नासिरुद्दीन १३३
नासीरजंग ४५१
निजामुल्मुल्क २४५, २४९, २५०, ३३९–३४०, ४५१
नूरजहान २१२, २१३–१५
नेपियर ५३७, ५४०
नेताजी पालकर २९२, २९३
नंदकुमार ४८२, ४८३
नॉर्थब्रुक ५६७–६८.

प

पतंजली ५६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूचि

परशुरामभाऊ ३८२, ३९०, ३९५, ४००, ४०८, ४०९, ४२०
पद्मिनी १३७
पाणिनी २२
पानिपतची लढाई (१ ली) १५०, १५१, १९०
पानिपतची (२ री) लढाई २५८
पानिपतची लढाई (३ री) २५८, ३६०-६२, ३६५, ४५६
पिट ४८६, ४९२
पुलकेशी १००-१०३.
पुलुयामी ६५, ६६.
पुष्यमित्र ५६
पेंढारी ५१२, ५१४, ५१५
पोरस २७.
पोर्तुगीज २१४, २२०, ३२०, ३४३, ४३९-४४१.
प्रवास १७०, २७१, ४२८
प्रताप (राणा) १९३, १९४, २००
प्लासीची लढाई ३६७,४५६,४६०-६१.

फ

फर्रुखसियर २४५, २४६
फाहाएन ७१, ७२
फेरोजशाह १४६, १४७
फैजी २०६
फ्रॅन्सिस ४८०,४८५

ब

बक्सारची लढाई ४६५
बदाऊनी २०६
बल्बन १३३, १३४
बर्नियर २२४,२२५
बसव १०५
बहामनी राज्य १५४-१५८
बहादुरशाह २४४
बहलोल लोदी १४९
बाणभट्ट ८१
बाप्पारावळ ९७
बाबर १५०,१५२, १७४-१८०
बाजीप्रभु २९४
बाजीराव (१ ला) २५०,३३८-३४३ ३४७,३४८,३४९
बाजीराव (२ रा) ३६६, ४००, ४०१-४०६, ५०१,५१३
बार्लो ५०९
बारभाईंचें कारस्थान ३८२,३८७
बाळाजी बाजीराव ३५१-३६२
बाळाजी विश्वनाथ २४७, २४९, ३३३, ३३६
बिंदुसार ४३,४४
बिंबिसार २५
बिरबल २०६,२०७
बुक्क १६१,१६२
बुसी ४४६,४४७,४५४
बेगमा (अयोध्येच्या) ४८४
बेंटिंक ५०९,५१८-५२२
बैरमखान १९०,१९२
ब्राह्मणें २१

भ

भगवद्गीता १९
भागवतधर्म १०७
भवभूति ८७
भास्कराचार्य १०७,१७१
भोज (राजा) ९६
भोपाळची लढाई ३४२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म

मध्वाचार्य ९१
मनुस्मृति ६६
मन्रो ५२६
मलिकंबर २१२,२१९,२८३,४१६
मलिक काफूर १३९,१४०
मल्हारराव २५०, ३४५, ३५८, ३६२, ३६७ ३६९
महमूद ११८–१२२
महादजी २५८-६०,३६२,३६७,३७२, ३९०, ३९४, ३९५, ४१७
महाभारत १९,२०
महाबतखान २११, २१५
महायान ६३
महावीर २५, ३०, ३१
माधवराव ३६७,३६८,३६९–७५,
माधवराव (सवाई) ३८३,३८९,३९६, ४३३
माधवाचार्य १६१,१६२,१७१
मानसिंह २०६,२०७
मिनांदर ५६,५७
मिराबाई १७२
मिहीरगुल ७४
मिंटो (लॉर्ड) ५०९, ५१०
मिंटो (लॉर्ड) ५७९–८०.
मीरजुम्ला २२०,२२९,२३०
मीरकासीम २५८,४६३-६५,४६८-६९
मीरशेहाबुद्दीन २५७
मीरजाफर २५८,४६०,४६१,४६२ ४७०,४८३
मुजफरजंग ४५१,४५२
मुमताजमहल २२०,२२१,२२३
मुर्शिदकुलीखान २२०,४५८
मुराद २२१–२२२
मेकॉले ५१९,५२५,५२७,५२८,५२९
मेगॅस्थेनिस ४१,४३
मेटफाक ५२२
मेयो ५६६–६७.
मोहंमदअली ४५१,४५२,४५४,५०१
मोहंमदशाह २४७,२४९,२५०
मोहंमद बीन कासीम ११४
मोहंमद गावान १५५,१५६
मोहंमद घोरी १२४,१२५,१२६,१२७
मोहंमद तुगलुक १४४,१४६
मोहंमद पैगंबर १११, ११३
मोहोंजोदारो ८,९
मोरोबादादा ३६७,३९०,४०९
मोरोपंत पिंगळे २८८, २९२, ३०१
मंडेल्स्लो २२५

य

यशवंतराव होळकर ४०२
यशोवर्मा ८७
यादव १०७, १०८
यूची ६०, ६१, ६४

र

रघूजी भोसले ३५१, ३५३,३५६ ४३२
रणजितसिंग ५३२, ५३८, ५३९
रहमतखान (हाफीज) २५५
राक्षनभुवनची लढाई ३६८, ३६९,३७३
राक्षसतागडीची लढाई १६४
राघोबा २५७, ३५८, ३५९, ३६७, ३६८, ३७०, ३८०, ३८१–३८२, ३८९, ३९०
राज्यश्री ७८, ८१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजसिंह २३२, २३३
राजाराम २३६, ३१४, ३२१–३२३
रामदास २८०, २८१, ३२०, ४३२
रामचंद्रपंत अमात्य ३२१, ३२७,३३२
रामदेवराव १०८, १३६, १३९
राममोहन रॉय ५२४, ५२६
रामशास्त्री ३७२, ३७७, ३८२, ४२०
रामनुजाचार्य ९१, १०९, १७१
रामानंद १७२
राष्ट्रकूट १०३, १०४
रिपन ५७०–७१
रुद्रदमन ६०, ६१
रुद्रसिंह ७०
रुस्तुमजमाल २९३
रेग्युलेटिंग ॲक्ट ४७७, ४७८
रेडिंग (लॉर्ड) ५८५–८६
रेझाखान ४७१, ४७५, ४८०

ल

लक्ष्मीबाई झांशीवाली ५५९, ५६०, ५६१
लखुजी जाधव २८३
लाबरडोने ४५०
लाली ४५४, ४५५
लिटन (लॉर्ड) ५६८–७०
लिंगायत १०५, १०६
लेक (लॉर्ड) ५०३, ५०४
लॉरेन्स ५४३, ५४४
लॅन्सडाऊन ५७४

व

वराहमिहर ७१, ७५
वसईचा तह ४०२, ४०३
वसईची मोहीम ३४३, ३४७
वास्को-ड-गामा ४३९
विज्ञानेश्वर १०५
विक्रमादित्य (चंद्रगुप्त) ६९–७१
विजयनगर १६१–१६६
विश्वासराव ३५५, ३६०
वेद १३, १४, २१, २२
वेल्स्ली ४९७, ४९८–४९९, ५०३,
वेल्स्ली (आर्थर) ४९७, ५०२, ५०७
वांदिवॉश ३६७, ४४७, ४५५, ४५६
व्यंकोजी ३०४, ३०६

श

शक लोक ५८, ६०, ६१, ६४
शशांक ७८, ७९
शहाजी २८१–८३, २९०, २९४–९५
शहाशुजा ५३२, ५३३, ५३४, ५३६
शाहजहान २१५, २१८–२२७, २९०
शाहाआलम २५८, २५९, ४६३, ४६५, ४७२–७३
शाहू ३२४ ३३२, ३३४, ३३५, ३३८, ३४८–४९, ३५१, ३५३, ३५४
शायिस्तेखान २९७
शिकंदर २७, २८, २९
शिवाजी २३३, २३४, २८७–२९७, ३०९–३१४, ३३६, ३४८
शिलालेख ४८, ५०, ५१
शुजा २२१
शेरशाह १८३, १८५–१८६, १८८
शेरअल्ली ५६८, ५६९
शेहाबुद्दीन १२४, १२५, १२६
शोअर ४९३, ४९४, ४९५
शंकराचार्य ९१, ९२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शंकराजी नारायण ३२२, ३२८, ३२९, ३३२

स

सखारामबापू ३६७, ३७८, ३८२
सदाशिवराव ३५५, ३६०, ३६२
सबुक्तगीन ११७, ११८
समुद्रगुप्त ६८, ६९
सख्येदबंधू २४५–२४८, ३३४
सलीम १९७, २११–२१६
सरदेशमुखी ३१०, ३२५
सलाबतजंग ३५५, ४५१, ४५२ ४५४, ४५५
सायणाचार्य १६१, १६२, १६३
सालबाईचा तह २५९, ३९२
सिंघण १०७
सिताबराय ४७१, ४७३, ४९०
सिद्दी जोहार २९३, २९४
सिराज उद्दौला ४५८, ४५९, ४६०
सुजा उद्दौला २५७, २५८, ४६३, ४६५, ४८४
सुफी १७०
सुरजमल जाट २५६, २५७
सुरतेचा तह ३८९
सेल्यूकस ४१, ५७
संग (राणा) १७७, १७८
संभाजी २३६, ३००, ३१४, ३१९–२१
संताजी घोरपडे २३३, ३२२, ३२३, ३२६

ह

हरिहर १६१
हरिपंत फडके ३६७, ३७९, ३८२, ३९०, ३९३, ३९५, ४२०
हर्ष ७९, ८०–८४
हसनगंगू १५४
हार्डिंज ५८१, ५८३
हार्डिंज ५३७–५४०
हिमू १९०
हीनयान ६३
हुसैनअल्ली २४५
हुमायून १८२, १८३, १८४
हूण लोक ७२, ७३, ७८
हेमाडपंत १०८
हेस्टिंग्ज (वॉरन) ३८९, ४६९, ४८०–४८६, ४८७–८८
हेस्टिंग्ज (लॉर्ड) ५१०–५१४
हैदरअल्ली ३६९, ३७०, ३९२, ४८४
हॅवलॉक ५६०
हॅमिल्टन २४६, ४४४
हॉकिन्स २१४, ४४२
हॉलवेल ४५९
ह्यूएनत्संग ८१, ८२, ८३

ज्ञ

ज्ञानेश्वर १०७, १७१, २८०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
LIBRARY,
GURUKULA KANGRI.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
LIBRARY,
GURUKULA KANGRI.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंमत २॥ रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar